श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

सभा क्र.२/२०२१ दिनांक ३१.०७.२०२१
स्थळ- साईनिवास अतिथीगृह वेळ-सकाळी १०.०० वाजता

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.१२०/२०१९ यावर दि. ०९/१०/२०१९ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा शनिवार दिनांक ३१/०७/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित केली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/१३८१/२०२१, दि.२३.०७.२०२१ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार सदरहु सभा शनिवार दिनांक ३१/०७/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. न्या. सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
२. मा.श्री. कान्हूराज बगाटे, भा.प्र.से. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. तथा सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.
३. मा.श्री.भानुदास ह. पालवे, अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक, तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
४. मा.श्रीमती गीता प्र.बनकर, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर, तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.
त्यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

विषय नं.०१ दि.१९.०६.२०२१ रोजी झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

निर्णय क्र.३८ दिनांक १९.०६.२०२१ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊ, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.

१. निर्णय क्र.०८ - यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन निर्णय क्र.सांसवि १०२०/४०१/प्र.क्र.१६७/का-१६ दि.१८/११/२०२० अन्वये, तदर्थ समितीच्या दि.३१/१०/२०२० रोजीच्या निर्णयानुसार तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये प्रलंबित जनहित याचिका क्र.१२०/२०१९ व रिट याचिका क्र.६२२४/२०२० मधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रस्तावात नमुद केलेले ०१ ते २९ वैद्यकीय अधिकाऱ्यांना उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे दि.०१ आक्टोबर, २०१९ ते ३० सप्टेंबर, २०२० या कालावधीतील त्यांना अदा करणेत आलेल्या एकुण वार्षीक मानधनाचे ८.३३ % यानुसार सानुग्रह अनुदान वित्त विभागाद्वारे तपासणी करून दि.२४/११/२०२० रोजीचे आदेशातील अटी शर्तीनुसार त्यांचेकडून बंधपत्र घेऊन अदा करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.

निर्णय क्र.०८- यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन निर्णय क्र.सांसवि १०२०/४०१/प्र.क्र.१६७/का-१६ दि.१८/११/२०२० अन्वये, तदर्थ समितीच्या दि.३१/१०/२०२० रोजीच्या निर्णयानुसार तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या ,औरंगाबाद खंडपीठामध्ये प्रलंबित जनहित याचिका क्र.१२०/२०१९ व रिट याचिका क्र.६२२४/२०२० मधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रस्तावात नमुद अ, ब, क व ड मधील नमुद वैद्यकीय अधिका-यांना उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे दि.०१ आक्टोबर, २०१९ ते ३० सप्टेंबर, २०२० या कालावधीतील त्यांना अदा करणेत आलेल्या एकुण वार्षीक मानधनाचे ८.३३ % यानुसार सानुग्रह अनुदान वित्त विभागाद्वारे तपासणी करून दि.२४/११/२०२० रोजीचे आदेशातील अटी शर्तीनुसार त्यांचेकडून बंधपत्र घेऊन अदा करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.०२ चक्रिय पध्दतीने निर्णय दिलेले विषय वाचून कायम करणे.

१. सन २०२१-२२ करीता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी व नविन सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करणेकामी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले सिव्हील ॲप्लीकेशन मंजूर होईपावेतो आहे त्या ठेकेदारांना मुदतवाढ देणेबाबत.

निर्णय क्र.३९/१ दि.२३.०६.२०२१ रोजी चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या उपरोक्त विषयावरील मा.अध्यक्ष महोदय व समिती सदस्य यांनी जे म्हणणे मांडले व निर्णय दिला तो वाचून कायम करण्यात आला.

---

२. सर्व्हे नं.१२४ मधील मध्यवर्ती भांडार इमारतीचे छताचे पत्रे बदलणे, रंगकाम करणे व इतर अनुषंगीक कामांसाठी प्राप्त ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारक संकेत नानासाहेब नवले, कोपरगाव यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करुन त्यांना कार्यादेश देणेकामी निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.३९/२ चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या उपरोक्त विषयावरील निर्णय वाचून कायम करण्यात आला.

---

३. श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०२१ साजरा करणेस व याकामी येणा-या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.३९/३ सदर विषयावरील निर्णय वाचून कायम करण्यात आला.

---

४. श्री साईसच्चरित पारायण सोहळा वर्ष २७ वे नेहमीचे प्रथा आणि परंपेरप्रमाणे साजरा करणेबाबत.

निर्णय क्र.३९/४ सदर विषयावरील निर्णय वाचून कायम करणयात आला.

---

५. श्री.आकाश रामहरी किसवे, नायब तहसीलदार यांचे प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या प्रतिनियुक्तीचे पदावरील मुदतवाढीबाबत.
सदर विषयावरील निर्णय वाचून कायम करणयात आला.

निर्णय क्र.३९/५ सदरचा विषय नियमीत सभेत सादर करणेबाबत निर्देश झालेले आहेत. त्यानुसार दि.३१.०७.२०२१ रोजीचे सभेतील अजेंडावर विषय क्र.१७ वर घेण्यात आलेला आहे. त्यामुळे चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या विषयावरील निर्णय वाचून कायम करण्यात आला.

---

६. संस्थानचे भांडार विभागाकडील गाईचे शुध्दाचे तुपाचे साठयाबाबत.(५.७.२०२१)

निर्णय क्र.३९/६ सदर विषयावरील निर्णय वाचून कायम करणयात आला.

---

७. संस्थानचे भांडार विभागाकडील गाईचे शुध्दाचे तुपाचे साठयाबाबत. (१२.७.२०२१)

निर्णय क्र.३९/७ या विषयावरील चक्रिय पध्दतीने झालेला निर्णय वाचून कायम करण्यात आला.

---

८. संस्थानचे स्थायी कर्मचा-यांना गणवेश भत्ता देणेबाबत.

निर्णय क्र.३९/८ सदरचा विषय नियमीत सभेत सादर करणेबाबत निर्देश झालेले आहेत. त्यानुसार दि.३१.०७.२०२१ रोजीचे सभेतील अजेंडावर विषय क्र.७६ वर घेण्यात आलेला आहे. त्यामुळे चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या विषयावरील निर्णय वाचून कायम करण्यात आला.

---

९. श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के, सेवानिवृत्त जनसंपर्क अधिकारी यांचे रुपये १७,५०,०००/- रक्कमेबाबत.

निर्णय क्र.३९/९ सदरचा विषय नियमीत सभेत सादर करणेबाबत निर्देश झालेले आहेत. त्यानुसार दि.३१.०७.२०२१ रोजीचे सभेतील अजेंडावर विषय क्र.१९ वर घेण्यात आलेला आहे. त्यामुळे चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या विषयावरील निर्णय वाचून कायम करण्यात आला.

---

१०. श्री साईबाबा महाविद्यालय–शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता प्राध्यापक भरती करणेबाबत.

निर्णय क्र.३९/१० चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या विषयावरील झालेला निर्णय वाचून कायम करण्यात आला.

---

११. संस्थान व्यवस्थापनामार्फत सन २०२२ (दि.०१, जानेवारी २०२२ ते ३१ डसेंबर,२०२२) अखेरचे कालावधीकरीता विविध प्रकारच्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशित करुन, साईभक्तांना सशुल्क उपलब्ध करुन देणेबाबत.

निर्णय क्र.३९/११ चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या विषयावरील झालेला निर्णय वाचून कायम करण्यात आला.

विषय नं.०३ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे अधिकारी/कर्मचा-यांसाठी (प्रशासकीय/तांत्रिक) सेवाप्रवेश नियमास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४० यावर सविस्तर चर्चा केली. परिशिष्ट 'अ' चा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. मा.उच्च न्यायालयात कर्मचा-यांनी दाखल केलेल्या प्रलंबीत याचिका मधील मागण्या विचारात घेऊन त्यांचा विचार करुन आवश्यक चर्चा करुन पुर्ण तयारीने समीतीच्या बैठकीत फेरसादर करावे.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.०४ स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करणेस चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४१ यावर सविस्तर चर्चा केली. सर्व वेगवेगळया प्रकाराच्या स्पर्धा परिक्षा प्रशिक्षणासाठी, तिर्थक्षेत्र विकास प्रशिक्षण व मार्गदर्शन, राज्य सरकारचे वेगवेगळे परिक्षा प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक माहिती, मनुष्यबळाची माहिती, पदांची माहिती, आर्थिक तरतुदीची माहिती घेऊन समितीपुढे सादर करावे. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.०५ श्री. भाऊसाहेब एकनाथ अनाप, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, यांना गैरशिस्त वर्तनाबाबत ठेवण्यात आलेला ठपका रद्द करणेकरीता मा.अध्यक्ष, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेकडेस केलेल्या दि.१५/०६/२०२० रोजीचे अपिल अर्जाबाबत.

निर्णय क्र.४२ यावर सविस्तर चर्चा केली. या संबधीत प्रकरणाची रेकॉर्ड अॅन्ड प्रोसीडींग्ज (सर्व कागदपत्रे) समिती सदस्यांना अवलोकनार्थ सादर करण्यात यावीत. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.०६ श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता (मेकॅनिकल), वाहन विभाग, सध्या मेकॅनिकल विभाग यांचे दि.१२.११.२०२० रोजीचे अपिल अर्जाबाबत.

निर्णय क्र.४३ यावर सविस्तर चर्चा केली. या संबधीत विभागीय चौकशीचे रेकॉर्ड अॅन्ड प्रोसीडींग्ज व सर्व कागदपत्रे समिती सदस्यांना अवलोकनार्थ सादर करण्यात यावे. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.०७ श्री. भारत एकनाथ सोनवणे (सध्या सेवा निलंबीत) वर्ग-०४ कर्मचारी, श्री साई प्रसादालय विभाग यांचे दि.३०.११.२०२० रोजीचे खाते चौकशी अहवालाबाबत.

निर्णय क्र.४४ यावर सविस्तर चर्चा केली. या संबधीत विभागीय चौकशीचे रेकॉर्ड अॅन्ड प्रोसीडींग्ज व सर्व कागदपत्रे समिती सदस्यांना अवलोकनार्थ सादर करण्यात यावे. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.०८ श्री. संजय रामदास राऊत,(सध्या सेवा निलंबीत) वर्ग-४ कर्मचारी, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग दि.३०.११.२०२० रोजीचे खाते चौकशी अहवालाबाबत.

निर्णय क्र.४५ यावर सविस्तर चर्चा केली. या संबधीत विभागीय चौकशीचे रेकॉर्ड अॅन्ड प्रोसीडींग्ज व सर्व कागदपत्रे समिती सदस्यांना अवलोकनार्थ सादर करण्यात यावे. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.०९ श्री.रंगनाथ बन्शी सोनवणे (सध्या सेवा निलंबीत) सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे दि.३०.११.२०२० रोजीचे खाते चौकशी अहवालाबाबत.

निर्णय क्र.४६ यावर सविस्तर चर्चा केली. या संबधीत विभागीय चौकशीचे रेकॉर्ड ॲन्ड प्रोसीडींग्ज व सर्व कागदपत्रे समिती सदस्यांना अवलोकनार्थ सादर करण्यात यावे. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.१० श्री. मिनीनाथ भाऊसाहेब कोते व श्री. विलास अशोक आंबेकर, प्रयोगशाळा सहाय्यक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय,शिर्डी यांना पुर्वलक्षी प्रभावाने वेतनश्रेणी लागु करणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४७ यावर सविस्तर चर्चा केली. श्री.मिनीनाथ भाऊसाहेब कोते व श्री.विलास अशोक आंबेकर, प्रयोगशाळा सहाय्यक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांना पुर्वलक्षी प्रभावाने वेतनश्रेणी लागु करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.११ श्री. बापुसाहेब बाबुराव गायके, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग यांचा खाते निहाय चौकशी दरम्यान न मिळालेल्या (वंचित) वेतनवाढी, वार्षिक वेतनवाढ, लाभ व भत्ते पुर्वलक्षी प्रभावाने मिळणेस तसेच मला सन २०१२ व २०१३ मध्ये करण्यात आलेल्या सेवा निलंबन शिक्षा रद्द करुन त्या कालावधीतील लाभ पुर्ववत मिळणेबाबतचा अपिल अर्ज.

निर्णय क्र.४८ यावर सविस्तर चर्चा केली. या संबधीत विभागीय चौकशीचे रेकॉर्ड ॲन्ड प्रोसीडींग्ज व सर्व कागदपत्रे समिती सदस्यांना अवलोकनार्थ सादर करण्यात यावे. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.१२ सुनिल जोसेफ गायकवाड यांचे दि.०१.०७.२०२० चे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ समिती, श्री साईबाबा ट्रस्ट शिर्डी यांना दिलेले तसेच सामान्य प्रशासनाकडे दि.१४.०७.२०२० रोजी प्राप्त पत्र.

निर्णय क्र.४९ यावर सविस्तर चर्चा केली. या विषयी सविस्तर अभ्यास करणे आवश्यक वाटते. सबब तहकुब. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.१३ सन २००९ पासून प्रतिक्षासुचीवर असलेल्या पात्र अनुकंपा उमेदवारांना गट क व गट ड चे पदावर नेमणूका देणेबाबत.

निर्णय क्र.५० यावर सविस्तर चर्चा केली. शासन निर्णय विधी व न्याय विभाग दि. २७.०८.२०२०चे शासन निर्णयास अधिन राहून सन २००९ पासून प्रत्येक वर्षी रिक्त झालेल्या पदांच्या १० टक्के गट क संख्या १२ पदे व गट ड ची संख्या १६ पदे मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन त्यांचे निर्णयाचे अधिन राहून या पद भरतीस मान्यता देण्यात येते. मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)

विषय नं.१४ श्री.किशोर साहेबराव गवळी, प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग यांचे खातेचौकशी दि.०७.०५.२०२१ रोजीचे अपील अर्जाबाबत.

निर्णय क्र.५१ यावर सविस्तर चर्चा केली. सदर प्रकरणी अभ्यास करुन निर्णय घेणे आवश्यक वाटते. या संबधीत रेकॉर्ड ॲन्ड प्रोसीडींग्ज व सर्व कागदपत्रे समिती सदस्यांना अवलोकनार्थ सादर करण्यात यावे. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.१५ श्री.विकास महादेव शिवगजे, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांचे दि.०१.१२.२०२० रोजीचे अपील अर्जाबाबत.

निर्णय क्र.५२ यावर सविस्तर चर्चा केली. सदर प्रकरणी अभ्यास करुन निर्णय घेणे आवश्यक वाटते. या संबधीत रेकॉर्ड ॲन्ड प्रोसीडींग्ज व सर्व कागदपत्रे समिती सदस्यांना अवलोकनार्थ सादर करण्यात यावे. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.१६ श्री.विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग-०४ कर्मचारी, श्री साई आश्रम भक्तनिवास सध्या आरोग्य विभाग यांचे दि.१५.०६.२०२१ रोजीचे अपील अर्जाबाबत.

निर्णय क्र.५३ यावर सविस्तर चर्चा केली. सदर प्रकरणी अभ्यास करुन निर्णय घेणे आवश्यक वाटते. या संबधीत रेकॉर्ड अॅन्ड प्रोसीडींग्ज व सर्व कागदपत्रे समिती सदस्यांना अवलोकनार्थ सादर करण्यात यावे.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.१७ डॉ.आकाश रामहरी किसवे, नायब तहसीलदार यांचे प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या प्रतिनियुक्तीचे पदावरील मुदतवाढीबाबत.

निर्णय क्र.५४ यावर सविस्तर चर्चा केली. डॉ.आकाश रामहरी किसवे, नायब तहसीलदार यांचे प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या प्रतिनियुक्तीचे पदावरील प्रस्तावीत मुदतवाढीस मान्यता देण्यात आली. शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.१८ मा.कामगार/औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे श्री साईबाबा संस्थानचे अॅडव्होकेट/ सल्लागार पॅनल नेमणूकीस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५५ यावर सविस्तर चर्चा केली. अट क्र.६ मध्ये नेमणूक ही तात्पुरत्या स्वरुपात पुढील तीन वर्षासाठी किंवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे आगोदर होईल तोपर्यंत राहील, असा बदल करण्यात यावा. नेमणूक करावयाचा विधिज्ञ हा करदाता असावा अशी नविन अट टाकण्यात यावी. तसेच मौखीक मुलाखतीस स्वखर्चाने हजर राहवे लागेल, अशी एक अट टाकण्यात यावी. या दुरुस्तीसह सदरचा प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-कामगार विभाग)

विषय नं.१९ श्री. ताराचंद विठ्ठलराव म्हस्के, सेवानिवृत्त जनसंपर्क अधिकारी यांचे रुपये १७,५०,०००/- रक्कमेबाबत.

निर्णय क्र.५६ यावर सविस्तर चर्चा केली. श्री. ताराचंद विठ्ठलराव म्हस्के, सेवानिवृत्त जनसंपर्क अधिकारी यांनी मा.उच्च न्यायालय; खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र. ४७९६/२०२१ संस्थान विरुध्द दाखल केलेली आहे. या प्रकरणात यापुर्वी तडजोडनाम्याप्रमाणे ठरविण्यात आलेली रु.१७,५०,०००/- ही रक्कम देण्यास संस्थान तत्वतः तयार होते. श्री. ताराचंद म्हस्के यांना दि.१२ जानेवारी, २०१२ रोजी रजिस्टर पोस्ट पोचदेय डाकेने पत्र देऊनही श्री. ताराचंद म्हस्के यांनी तडजोडनामा विहीत वेळेत न दिल्यामुळे अशी रक्कम त्यांना अदा करता आली नाही. पुर्वीच्या निर्णयाप्रमाणे तडजोडनाम्यात नमुद केलेली रक्कम श्री.ताराचंद म्हस्के यांना देण्यास संस्थान आजही तयार आहे. परंतु त्यांनी सदर याचिकेत केलेली व्याजाची मागणी किंवा सेवानिवृतीच्या अनुषंगाने इतर कुठलीही मागणी करावयाची नाही अशी अट राहील. अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र मा.उच्च न्यायालयात सदर याचिकेत दाखल करण्यात यावे. असे ठरले.

(कार्यवाही- कामगार विभाग)

विषय नं.२० मंदिर विभागास पुजारी पदाचे प्रशिक्षण घेतलेले व संबधीत कामाचा अनुभव असलेले कर्मचारी कंत्राटी पध्दतीने सहाय्यक पुजारी म्हणून नेमणूक करणेबाबत.

निर्णय क्र.५७ यावर सविस्तर चर्चा केली. सहाय्यक पुजारी पदाची एकूण आठ रिक्त पदे विचारात घेता ही आठ पदे पुजारी पदाचे प्रशिक्षण घेतलेले व संबधीत कामाचा अनुभव असलेले कर्मचारी कंत्राटी पध्दतीने सहाय्यक पुजारी म्हणून बहिस्थ यंत्रणेमार्फत ११ महिने कालावधीसाठी नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली. सदर पदांच्या मुलाखतीत भाग घेणेसाठी तदर्थ समिती सदस्यांमधुन मा.श्रीमती गीता बनकर यांचा पॅनलमध्ये समावेश करणेत यावा, यास सर्व संमती देण्यात आली.

(कार्यवाही- कामगार विभाग)

विषय नं.२१ माहे एप्रिल-२०२० ते मार्च-२०२१ अखेर लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणेबाबत.

निर्णय क्र.५८ यावर सविस्तर चर्चा केली. समिती सदस्य मा.श्रीमती बनकर यांनी असे सुचविले की दि.३१.०७.२०२१ अखेर मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रस्तावात तशी नोंद घेतली गेलेली नाही, ती घेण्यात यावी. अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव ठेवावा, तहकुब.

(कार्यवाही-कामगार विभाग)

विषय नं.२२ संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणारे ठेकेदार यांचेकडील कंत्राटी कर्मचा-यांचे मुदतवाढीचे कालावधीकरीता विमा पॉलीसी रक्कमेबाबत.

निर्णय क्र.५९ यावर सविस्तर चर्चा केली. विमा पॉलीसी नसलेल्या काळात एखादी व्यक्ती मयत झाल्यास त्याचे वारसाला शासन निर्णयाप्रमाणे किमान ४ लाख रुपये दयावे लागतात. याउलट एकुण कर्मचा-यांचा विमा उतरविण्यासाठी रक्कम रु.३.४१ लाख विमा हप्ता भरावा लागणार आहे. व असा विमा उतरविल्यानंतर मृत व्यक्तीच्या वारसांना १० लाख रुपये विमा मिळणार आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता एक वर्षाकरीता विमा उतरविण्याची अनुमती देण्यात आली.

(कार्यवाही-कामगार विभाग)

विषय नं.२३ सन २०२१-२२ करीता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी व नविन सिक्युरिटी नेमणूक कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक होईपावेतो आहे त्या ठेकेदारांना मुदतवाढ देणेकामी मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६० यावर सविस्तर चर्चा केली. सन २०२१-२२ करीता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी ५०५ पदांकरीता ३१ ऑक्टोंबर, २०२१ किंवा सिव्हील ॲप्लीकेशन मध्ये मा.न्यायालयाचे आदेश होईपावेतो किंवा समितीचा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे आगोदर होईल तो पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. श्रींचे मंदिर दर्शनासाठी खुले झाल्यास अशा परिस्थीतीत जादा सुरक्षा कर्मचारी लावण्याची गरज भासल्यास त्याबाबतीतचा प्रस्ताव संस्थान प्रशासनाने समितीसमोर आणावा. (कार्यवाही-कामगार विभाग)

विषय नं.२४ (अ) आर्थिक अनुदान मागणीकरीता आलेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत.

निर्णय क्र.६१/अ यावर सविस्तर चर्चा केली. तरतुद नाही. सबब नामंजूर.

(कार्यवाही- लेखाशाखा)

(ब) आर्थिक अनुदान मागणीकरीता आलेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत.

निर्णय क्र.६१/ब यावर सविस्तर चर्चा केली. तरतुद नाही. सबब नामंजूर.

(कार्यवाही- लेखाशाखा)

विषय नं.२५ परकीय चलन आर्थिक व्यवहार अखंडीत चालू राहण्यासाठी समिती सदस्यांचे KYCs कागदपत्र उपलब्ध होणेबाबत.

निर्णय क्र.६२ यावर सविस्तर चर्चा केली. याबाबत मा.उच्च न्यायालयाचा दि.२६.०७.२०२१ रोजी आदेश झालेला आहे, त्यामुळे या विषयावर निर्णय घेण्याची आवश्यकता नाही.

(कार्यवाही-लेखाशाखा)

विषय नं.२६ नियोजीत शैक्षणिक संकुल प्रकल्पातील शालेय इमारतीकरीता बेंचेस व इतर इंटेरीअर वर्क, फॉल्स सिलिंग वर्क तसेच डीजीटल क्लास रुम करणेसाठी आवश्यक कामे करणे आणी ऑडीटोरीअमकरीता फर्निचर, ॲकॉस्टिक वर्क, स्टेज लाईट, स्टेज क्राफ्ट, व्हिडीओ वॉल, साऊंड सिस्टीम व एच.व्ही.ए.सी. यंत्रणा बसविणे तसेच स्पोटर्स कॉम्प्लेक्ससाठी विविध इनडोअर व आऊटडोअर खेळांचे मैदाने विकसीत करणे, खेळांचे व व्यायामाचे साहित्य खरेदी करणे व लॅण्डस्केपिंग करणे, स्कल्पचर करणे,

सोलर सिस्टीम बसविणे व अनुषंगीक सिव्हील व इलेक्ट्रीकल कामे करणेकामी येणारे अंदाजपत्रकीय रक्कम रु.७९,३७,९४,४५८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६३ यावर सविस्तर चर्चा केली. सदर प्रकरणी जुना प्रस्ताव व नवीन प्रस्ताव यामध्ये मोठी तफावत दिसुन येते. याचा कारणासह तुलनात्मक तक्ता सादर करण्यात यावा. तहकुब.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.२७ श्री साईबाबा समाधी मंदिराचे दक्षिण बाजुकडील खिडक्यांना बुलेटप्रुफ काचा बसविणेसाठी येणा-या अंदाजे रु.१९,३८,०००/-मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास व सदर कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता देणेबाबत.

निर्णय क्र.६४ यावर सविस्तर चर्चा केली. स्थळ निरीक्षणाची आवश्यकता भासते. तहकुब.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.२८ मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ मधील संस्थानचे भांडार परिसरात वेयरहाऊस पध्दतीचे गोडाऊन बांधणेसाठी आर्किटेक्ट बिनेश सुकुमार, कोची यांनी सादर केलेले आराखडे व रु.३.०३ कोटी खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६५ यावर सविस्तर चर्चा केली. आर्किटेक्ट नेमणूकीबाबत धोरण ठरविणेसाठी सविस्तर प्रस्ताव ठेवण्यात यावा. तहकुब.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.२९ मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१४८ मधील श्री साईनाथ रुग्णालय व व्दारावती भक्तनिवासचे वाढीव इलेक्ट्रीकल लोडकरीता सबस्टेशन व जनरेटर इमारत बांधकामासाठी आर्किटेक्ट इनजिनियस स्टुडीओ प्रा.लि.गुरगाव यांचे अंदाजपत्रकानुसार रु.७१,१०,४४४/- खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६६ यावर सविस्तर चर्चा केली. मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१४८ मधील श्री साईनाथ रुग्णालय व व्दारावती भक्तनिवासचे वाढीव इलेक्ट्रीकल लोडकरीता सबस्टेशन व जनरेटर इमारत बांधकामासाठी आर्किटेक्ट इनजिनियस स्टुडीओ प्रा.लि.गुरगाव यांचे अंदाजपत्रकानुसार रु.७१,१०,४४४/- खर्चास मान्यता देण्यात आली. मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे मंजूरीसाठी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे.

(कार्यवाही- बांधकाम विभाग/विधी विभाग)

विषय नं.३० श्री साईबाबा मंदिर परिसरातील देणगी काऊंटर नं.०२ व व्हि.आय.पी. प्रतिक्षा कक्ष (पारायण हॉल)चे पाठीमागील (पश्चिम) बाजूस साईभक्तांचे ऊन व पावसापासून संरक्षण होणेसाठी कॉरीडॉरचे बांधकाम करणेसाठी येणारे रु.१९,५५,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास व याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६७ यावर सविस्तर चर्चा केली. आर्किटेक्ट नेमणूकीबाबत धोरण ठरविणेसाठी सविस्तर प्रस्ताव ठेवण्यात यावा. तहकुब.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.३१ मंदिर परिसरात श्री गणेश मंदिरालगत दक्षिण बाजूस वस्तुसंग्रहालयात ठेवलेल्या श्रीराम, सिता, लक्ष्मण व हनुमान या मुर्ती स्थापित करणेसाठी मंदिर बांधकामास येणारे रक्कम रु.९,५१,०००/- मात्रचे खर्चास व याकामी दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६८ यावर सविस्तर चर्चा केली. पुर्वी पासून अस्तित्वात असलेल्या वास्तुमध्ये बदल करण्याचा विषय आहे. विषय यापुर्वी चर्चेसाठी आला होता काय? याची माहिती घेणे. बदल करावयाचा किंवा नाही याचे धोरण ठरविणे, करावयाचा असल्यास कन्सल्टंटची नियुक्ती करण्याचे धोरण ठरविणे, डिझाईन बोलाविणे, खर्चाचा विचार करणे, या सर्व बाबींचा विचार करणे असल्याने, तसा सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.३२ मौजे निमगाव को-हाळे येथील संस्थानचे श्री साई प्रसादालय परिसरातील अंतर्गत रस्त्याचे मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टेनन्स ब्लॉक या लांबीचे डांबरीकरण करणे व मेन्टेनन्स ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लांट या लांबीतील रस्त्याचे खडीकरण करणे कामासाठी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारक समवेत चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.६९ यावर सविस्तर चर्चा केली. चर्चेअंती प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.३३ श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीचे बांधकाम ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई यांनी काम पुर्ण करणेसाठी नोव्हेंबर-२०२१ अखेर केलेल्या मुदतवाढीचे विनंतीबाबत.

निर्णय क्र.७० यावर सविस्तर चर्चा केली. प्रस्तवातील अ.नं.०१ ते ०४ बाबत ३१, ऑक्टोंबर-२०२१ अखेर मुदतवाढ देण्यात आली. ही मुदतवाढ अंतिम आहे. यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही. अ.नं.५ बाबत पुर्वी ठराव झालेला असल्याने त्याचा विचार करण्याची गरज नाही.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.३४ मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.१६९ मधील वर्ग-०४ कर्मचारी निवासस्थान (सेवाधाम) इमारतीचे आतील व बाहेरील भागाचे रंगकाम करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारकासमवेत चर्चा वाटाघाटी करुन कार्यादेश देणेबाबत दि.११/१२/२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ समितीचे सभेतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल.

निर्णय क्र.७१ नोंद घेतली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.३५ मंदिर परिसराचे दक्षिण बाजूकडील हद्दी वरील गेट नं.०४ ते नगर-मनमाड रस्त्यापर्यंतचे कम्पाऊंड भिंतीचे नव्याने बांधकाम करणे व भिंतीवर परफोरेटेड एम.एस.शिटचे कम्पाऊंड करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारकासमवेत चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत दि.११.१२.२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ समितीचे सभेतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल.

निर्णय क्र.७२ नोंद घेतली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.३६ संस्थानचे मंदिर परिसरातील गुरुस्थान समोरील तळघरात स्ट्रॉगरुमचे बांधकाम करणेसाठी रक्कम रु.६५,००,०००/-मात्रचे सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास व विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देणेबाबत.

निर्णय क्र.७३ यावर सविस्तर चर्चा झाली. याबाबत प्रत्यक्ष पाहणी करणेत यावी. आर्किटेक्ट नेमणूकीबाबत धोरण ठरविणेसाठी सविस्तर प्रस्ताव ठेवण्यात यावा. तहकुब.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.३७ श्री साईबाबा समाधी मंदिरातील स्टेनलेस स्टील रेलींग काढून त्या ठिकाणी सागवान लाकडाचे डिझाईन मधील रेलिंग करणेकामी येणारे रक्कम रु.१,६९,३१,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबत.

निर्णय क्र.७४ यावर सविस्तर चर्चा केली. पुर्वी पासून अस्तित्वात असलेल्या वास्तुमध्ये बदल करण्याचा विषय आहे. विषय यापुर्वी चर्चेसाठी आला होता काय? याची माहिती घेणे. बदल करावयाचा किंवा नाही याचे धोरण ठरविणे, करावयाचा असल्यास कन्सल्टंटची नियुक्ती करण्याचे धोरण ठरविणे, डिझाईन बोलाविणे, खर्चाचा विचार करणे, या सर्व बाबींचा विचार करणे असल्याने, तसा सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.३८ संस्थानचे वस्तु संग्रहालयात ठेवलेली भगवान श्रीकृष्णाची मुर्ती श्री साईबाबा समाधी मंदिराचे सभामंडपातील स्टेजवर स्थापीत करणेस तत्वत: मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.७५ यावर सविस्तर चर्चा केली. पुर्वी पासून अस्तित्वात असलेल्या वास्तुमध्ये बदल करण्याचा विषय आहे. विषय यापुर्वी चर्चेसाठी आला होता काय? याची माहिती घेणे. बदल करावयाचा किंवा नाही याचे धोरण ठरविणे, करावयाचा असल्यास कन्संल्टंटची नियुक्ती करण्याचे धोरण ठरविणे, डिझाईन बोलाविणे, खर्चाचा विचार करणे, या सर्व बाबींचा विचार करणे असल्याने, तसा सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.३९ श्याम सुंदर हॉल व उदी रुम छताची ऊंची वाढविणे, जुने व खराब झालेले पत्रे बदलून नवीन पत्रे व त्यावर कौल बसविणे ही कामे देणगीदाखल करणेस अथवा संस्थान निधीतून करणेकामी येणारे रक्कम रु.६,८५,०००/-मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.७६ यावर सविस्तर चर्चा केली. पुर्वी पासून अस्तित्वात असलेल्या वास्तुमध्ये बदल करण्याचा विषय आहे. विषय यापुर्वी चर्चेसाठी आला होता काय? याची माहिती घेणे. बदल करावयाचा किंवा नाही याचे धोरण ठरविणे, करावयाचा असल्यास कन्संल्टंटची नियुक्ती करण्याचे धोरण ठरविणे, डिझाईन बोलाविणे, खर्चाचा विचार करणे, या सर्व बाबींचा विचार करणे असल्याने, तसा सविस्तर प्रस्ताव सादर करावा. (कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.४० श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळयानिमित्त कोपरगाव-कोल्हार रस्ता (प्र.रा.मा.०८) या तात्पुरत्या स्वरुपात उभारलेली स्वागत कमान काढून घेणेबाबत.

निर्णय क्र.७७ यावर सविस्तर चर्चा केली. चर्चेअंती मंजूर.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.४१ मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१८३ पै.मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक कॉम्पलेक्सचे बांधकाम कारणे कामाचे ठेकेदार मे.न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सल्टंट प्रा.लि.पुणे यांचे रनिंग बिलातून कपात केलेली ५० टक्के सुरक्षा ठेव रक्कम रु.५,४५,००,०००/-मात्र विनाशर्त बॅंक गॅरंटीच्या (दोष दायित्व निवारण कालावधीपर्यंत) बदल्यात मुक्त करणेबाबत.

निर्णय क्र.७८ यावर सविस्तर चर्चा केली. चर्चेअंती मंजूर. (कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.४२ मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१८३ पै.मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक कॉप्लेक्सचे बांधकाम करणेकामाचे ठेकेदार मे.न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सल्टंट प्रा.लि.पुणे यांचे प्रकल्पाचे मुदतवाढ मागणीबाबत.

निर्णय क्र.७९ यावर सविस्तर चर्चा केली. दि.२२ सप्टेंबर,२०२१ पर्यंत कुठलीही दरवाढ न देण्याचे अटीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. यापुढे कुठल्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.४३ साईआश्रम भक्तनिवास येथील इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती करणेकामाचे ठेकेदार ॲडमायकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.मुंबई यांनी काम पुर्ण करणेसाठी दि.१५/०९/२०२१ अखेर व्दितीय मुदतवाढ मागणीबाबत.

निर्णय क्र.८० यावर सविस्तर चर्चा केली. दि.१५/०९/२०२१ पर्यंत कुठलीही दरवाढ न देण्याचे अटीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. यापुढे कुठल्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.४४ कान्होबा उर्फ कानिफनाथ देव देवस्थान ट्रस्ट मढी, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर यांना शिर्डी संस्थान परिसरात माहिती केन्द्राकरीता इमारत उपलब्ध करुन देणेबाबत श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर, माजी अध्यक्ष, कान्होबा उर्फ कानिफनाथ देव देवस्थान ट्रस्ट मढी यांचेकडील दि.२९.१०.२०२० रोजीचे पत्र.

निर्णय क्र.८१ यावर सविस्तर चर्चा केली. याबाबत धोरण निश्चीत करणे आवश्यक आहे. यापुर्वी अशा पध्दतीचे काही प्रस्ताव आलेले असल्यास त्याची माहिती द्यावी.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

विषय नं.४५ महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा, ता.राहाता येथील शेती महामंडळाची जमीन संस्थानला कायम खरेदी मिळणेकामीचा सुधारीत प्रस्ताव सादर करणेबाबत.

निर्णय क्र.८२ यावर सविस्तर चर्चा केली. सविस्तर अभ्यास करणे आवश्यक आहे. सदरचा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

विषय नं.४६ श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरात रुग्ण व त्यांचे नातेवाईकांच्या सोयीसाठी झेरॉक्स मशिन चालविणेस देणेबाबत.

निर्णय क्र.८३ यावर सविस्तर चर्चा केली. याबाबतचे धोरण, मागदर्शक तत्वे याबाबतचा अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

विषय नं.४७ शिर्डी येथील साईबाबा सुपर हॉस्पिटल समोरील साईनगर मैदान येथील वाहन पार्किंगबाबत.

निर्णय क्र.८४ यावर सविस्तर चर्चा केली. याबाबतचे धोरण, मागदर्शक तत्वे याबाबतचा अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

विषय नं.४८ श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे यांना शिर्डी संस्थान परिसरात माहिती केंद्रासाठी जागा मिळणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे ता.पाथर्डी यांचेकडील पत्र क्र.५१/२०२०, दि.११.०२.२०२०

निर्णय क्र.८५ यावर सविस्तर चर्चा केली. याबाबत धोरण निश्चीत करणे आवश्यक आहे. यापुर्वी अशा पध्दतीचे काही प्रस्ताव आलेले असल्यास त्याची माहिती द्यावी.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

विषय नं.४९ मौजे शिर्डी येथील साईबाबा हॉस्पिटल परिसरातील सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांचे ए.टी.एम. मशिनचे जागा वापरास मुदतवाढ देणेबाबत मा.शाखाधिकारी, सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांचेकडील जा.नं.शिर्डी/२०२१-२२/०५/३, दि.१३.०५.२०२१ रोजीचे पत्र.

निर्णय क्र.८६ यावर सविस्तर चर्चा केली. चर्चेअंती मंजूर.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

विषय नं.५० मौजे शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थान परिसरात रेल्वे बुकींग काऊंटरसाठी रेल्वे विभागास विनामुल्य वापरास दिलेल्या सेवाधाम इमारतीतील दोन रुम्सच्या वापराची मुदत वाढवून मिळणेबाबत सिनियर डिव्हीजनल कमर्शिअल मॅनेजर, सोलापूर यांचेकडील पत्र जा.नं. SUR/C/518/SNSI/PRS/2021, दि.११७.०५.२०२१.

निर्णय क्र.८७ यावर सविस्तर चर्चा केली. चर्चेअंती मंजूर.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

विषय नं.५१ मौजे शिर्डी येथील जमीन सर्व्हे नं.४८/०१ पै.क्षेत्र १ हे.६२ आर व सर्व्हे नं.४८/२ पै. क्षेत्र २ हे.४० आर असे एकूण ४ हे.२ आर ही जमीन संस्थानला कायमस्वरुपी विकत देणेबाबतचा श्री.प्रकाश जयराम शेळके, रा.शिर्डी व इतर ६ यांचा दि.२४.११.२०२० रोजीचा अर्ज.

निर्णय क्र.८८ यावर सविस्तर चर्चा केली. सदरची जमीन संस्थानचे मालमत्तेलगत नाही, तसेच या जमिनीची संस्थानला आवश्यकता वाटत नाही. सबंब नामंजूर.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

विषय नं.५२ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत मौजे निमगाव को-हाळे, ता.राहाता येथील संस्थान मालकीच्या गट नं.१८३ मधील शैक्षणिक संकुलाच्या पोहोच रस्त्यासाठी जमीन भूसंपादन करणेबाबत.

निर्णय क्र.८९ यावर सविस्तर चर्चा केली. स्थळ निरिक्षण आवश्यक आहे. किती क्षेत्राची आवश्यकता आहे, खातेदार किती आहेत, जागेचा नकाशा तयार करणे व अंदाजे खर्च याबाबतचा अभ्यास पुर्वक सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

विषय नं.५३ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील गाळे/हॉल भाडेतत्वावर देणेबाबत.

निर्णय क्र.९० यावर सविस्तर चर्चा केली. सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून किंमत (Offset Price) ठरवावी. ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. सदर गाळे/ हॉल वापराचा संस्थानचे किंवा साईभक्तांचे हिताविरोधी नसावा. अशा अटी निविदेमध्ये समाविष्ट कराव्यात.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

विषय नं.५४ सन २०२०-२०२१ मध्ये (माहे एप्रिल-२०२० ते मार्च-२०२१) दर्शनरांगेत साईभक्तांना मोफत वाटप करणेत आलेल्या लाडूप्रसाद पाकीटांसाठी (५० ग्रॅम वजनाचे ०१ नगाचे पाकीट) आलेल्या खर्चाची एकत्रित नोंद घेणेबाबत.

निर्णय क्र.९१ नोंद घेतली.

(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

विषय नं.५५ लाडु प्रसादांची गुणवत्तेत सुधारणा करणेसाठी बदाम, सुंठ पुड, लिक्वीड, ग्लुकोज, खाता सोडा, मीठ व मगज बी इत्यादी किराणा मालाची ९० दिवसांसाठी खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.९२ यावर सविस्तर चर्चा केली. सदरचा प्रस्ताव तहकुब ठेवण्यात आला. श्रींचे मंदिर दर्शनासाठी खुले झाल्यानंतर प्रस्ताव ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

विषय नं.५६ दर्शन रांगेत साईभक्तांना वाटप करणेत येत असलेल्या ५० ग्रॅम सुटी बुंदी प्रसाद पाकीटाऐवजी त्याच वजनाचे ०१ नगाचे लाडू पाकीट प्रसाद रुपाने विनामुल्य वाटप करणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.९३ यावर सविस्तर चर्चा केली. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

विषय नं.५७ सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात लाडू प्रसाद बनविणेसाठी हरभरा डाळ व हिरवी विलायची या किराणा मालाची मान्य घट-तुटीपेक्षा जादा आलेल्या घट-तुटीस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.९४ यावर सविस्तर चर्चा केली. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

विषय नं.५८ सन २०२२ करीता लाडू व बर्फी प्रसाद बनविणेकामी उक्त्या मजुरीची अंदाजे रक्कम रु.१.५० कोटी मात्र खर्चाची ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.९५ यावर सविस्तर चर्चा केली. सन २०२२ करीता लाडू व बर्फी प्रसाद बनविणेकामी उक्त्या मजुरीची अंदाजे रक्कम रु.१.५० कोटी मात्र खर्चाची ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली. याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे.

(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग/विधी विभाग)

विषय नं.५९ पाणी वाटप आऊटसोर्स कंत्राटी कर्मचा-यांबाबत.

निर्णय क्र.९६ यावर सविस्तर चर्चा केली. सदरचे विषयावर यापुर्वी समितीने निर्णय घेतलेला असल्याने त्यावर विचार करण्याची गरज नाही. तथापी प्रस्तावात 'ब' मध्ये नमुद केल्यानुसार सानुग्रह अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली. 'अ' प्रस्ताव नामंजुर झाल्याने 'क' प्रस्तावाबाबत विचार करण्याचा प्रश्न येत नाही.

(कार्यवाही- साई प्रसाद निवासस्थान)

विषय नं.६० "श्री साईनाथ स्तवनमंजरी" पुस्तक ओरिया भाषेत संस्थानमार्फत प्रकाशित करणेबाबत.

निर्णय क्र.९७ यावर सविस्तर चर्चा केली. प्रायोगिक तत्वावर ५००० प्रती छपाई करण्यास मंजूरी देण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग)

विषय नं.६१ संस्थान व्यवस्थापनामार्फत सन २०२२ (दि.०१ जानेवारी, २०२२ ते दि.३१ डिसेंबर,२०२२) अखेरचे कालावधीकरीता विविध प्रकारच्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशित करुन साईभक्तांना सशुल्क उपलब्ध करुन देणेबाबत.

निर्णय क्र.९८ यावर सविस्तर चर्चा केली. ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली. श्री साई दैनंदिनी छपाई करण्यापुर्वी त्याचा मसुदा मंजूरीसाठी समिती समोर आणावा.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग)

विषय नं.६२ शिर्डी गावातील रहिवाशी साईभक्तांना दर्शन प्रवेशाकरीता स्मार्टकार्ड वितरीत करणेकामी सदरचे स्मार्ट कार्ड प्रचलीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून छपाई करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.६३ साईटेक प्रकल्पांतर्गत कार्यान्वीत **Oracle Database** व **Oracle ERP** या प्रणालीचे कार्यान्वीत **Licenses** चे नुतनीकरण तसेच आवश्यक **Licenses** खरेदी करणेकामी थेट उत्पादक कंपनी **M/s Oracle Corporation** यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.६४ वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालीका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा-१ चे कामातील पाईपलाईन रस्त्यांची दुरुस्ती खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.६५ सन २०२२-२३ करीता बारा महिन्याचे कालावधीसाठी पाणी पुरवठा विभागास पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक ब्लीचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेस व त्यासाठी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.६६ श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवर व देणगीदार साईभक्त तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांचे सत्कारासाठी लागणा-या शॉल्स खरेदी विभागामार्फत खरेदी करणेबाबत.

विषय नं.६७ समाधी मंदिर गाभा-यातील श्रींचे समकालीन साईभक्तांचे खराब/ जिर्ण झालेले फोटोचे चावडी मंदिरातील फोटोप्रमाणे अत्याधुनिकरण, नुतनीकरण करणेकामी साईभक्त श्री.श्रीकांत किशोर जाधव, शिर्डी यांना विनामुल्य सेवा करण्याची संधी देणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.६८ श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्याकरीता आणलेल्या केबल ऑक्सिजन प्लान्टकरीता वापरण्यास आलेल्या असल्याने आता वाढीव तिस-या मजल्यावरील इलेक्ट्रीकल लोडला सप्लाय देणेकरीता २४० स्केअर एम.एम.ची इलेक्ट्रीकल केबल, पितळी फ्लॅज टाईप केबल ग्लॅन्ड, ॲल्युमिनियम लग्जची खरेदी करणेकामी येणा-या खर्चास तसेच दरपत्रके मागविणे, संस्थानचे वेबसाईटवर दरपत्रक नोटीस प्रसारीत करणेबाबत.

विषय नं.६९ श्री साईबाबा संस्थानचे भोयरे पठार (सुपा) येथे उभारणेत आलेल्या २.५ मेगावॅट (१.५ मेगावॅटx२) पवनचक्की यंत्रणेचे वीज विक्री करणेकरीता तसेच त्यासाठी दिनांक ०१.१२.२०२१ ते दिनांक ३०.११.२०२२ या एक वर्षाचे कालावधीकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीशी वीज विक्री करारनामा करणेकरीता मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.७० शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता कामांचा सन २०२०-२१ चे पाहणी समिती मार्फत केलेल्या आकस्मित पाहणी अहवालाबाबत.

विषय नं.७१ संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिन साफसफाई करुन निघणारा प्लॅस्टीक कचरा विक्री करणेबाबत.

विषय नं.७२ गोवंश संवर्धनार्थ गाय हा राष्ट्रीय प्राणी (कामधेनू) म्हणून ठराव करणेबाबत.

विषय नं.७३ मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्याबाबत.

विषय नं.७४ पर्यटन विषयक प्रसिध्दी करीता साईबाबा समाधीमंदिर व परिसराचे फोटोग्राफ व चित्रिकरण करण्यास परवानगी बाबत.

विषय नं.७५ श्री साईबाबा संस्थान मंदिर परिसरामध्ये ड्रोन कॅमे-याने व शुटींग कॅमे-याने शुटींग करणेस बंदी असलेबाबतचे आशयाचे फलक मंदिर परिसरामध्ये लावणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.७६ संस्थानचे स्थायी कर्मचा-यांना गणवेश भत्ता देणेबाबत.

विषय नं.७७ श्री साई प्रसादालयातील माहे एप्रिल-२०२० ते मार्च-२०२१ अखेर खाद्यतेल वनस्पती तुप, शुध्द तुप व काजूचे रिकामे डब्यांचा अहवाल.

विषय नं.७८ सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षातील श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबतचा अवलोकनार्थ अहवाल.

विषय नं.७९ शाळामधील संरचनात्मक बदल व सुधारीत निकषांच्या आधारे माध्यमिक विभागासाठी आवश्यक लागणारे शिक्षक मानधन तत्वावर (११ महिने कालावधी) भरणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.८० प्राथमिक विभागासाठी शाळा संच मान्यतेनुसार आवश्यक शिक्षक मानधन तत्वावर (११ महिने) घेण्यास मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.८१ श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने तयार करण्यात आलेल्या तिस-या मजल्याकरीता मशिनरी/उपकरणे/ फर्निचर तसेच लिनन खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२,०२,६०,८३६/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.८२ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांचे संबधीत पदासाठी सातव्या वेतन आयोगात मंजुर वेतनश्रेणीनुसार मुळ वेतन व सध्याचे महागाई भत्त्यानुसार होणारे सुरुवातीचे वेतनाइतके एकत्रित मासिक मानधन देणेबाबत.

विषय नं.८३ डॉ.हरिष हुकुमचंद बजाज व डॉ.गौरव सरदारीलाल वर्मा, हृदयविकार तज्ञ (निलंबीत) श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे खाते चौकशी अहवालाबाबत.

विषय नं.८४ रुग्णालय प्रशासक (Hospital Administrator) पद तात्पुरत्या स्वरुपात ११ महिने कालावधीकरीता जाहिरातीव्दारे भरणेबाबत.

विषय नं.८५ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रयोगशाळा या विभागाकरीता जुने Fully Automatic Biochemistry Anealyser परत (Buyback) करुन नवीन Fully Automatic Biochemistry Anealyser खरेदी करणेबाबत.

विषय नं.८६ Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाच्या रक्ताच्या तपासण्या करणेकामी लॅबोरेटरी किट्स खरेदी करणेबाबत.

विषय नं.८७ श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयासाठी बॉन्डेड ग्रॅज्युएट व पोस्ट ग्रज्युएट उमेदवारांची नेमणूक करणेबाबत.

विषय नं.८८ (अ) संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

(ब) संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

(क) संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

विषय नं.८९ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये एप्रिल-२०२१ या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३१,०७,००१/-मात्रची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.९० श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये मे-२०२१ या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.१२,४४,०४१/-मात्रची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.९१ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता ५० नग Ventilator खरेदी करणेबाबत.

विषय नं.९२ महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णांच्या प्रत्यक्ष उपचारापोटी प्राथमिक मंजूरी आदेशापेक्षा विमा कंपनीकडून कमी मिळालेल्या रकमेस वैद्यकीय सवलत म्हणून नावे टाकण्यास मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.९३ दि.१५.०५.२०२१ रोजीचे मुलाखतीव्दारे वैद्यकीय संचालक पदासाठी निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारास नेमणूक देणेबाबत.

विषय नं.९४ दि.०१ एप्रिल २०२० ते दि.३१ मार्च, २०२१ अखेर / कालावधीत वाटप करणेत आलेली अनुदान रक्कम व रुग्ण संख्या यांची नोंद घेणेबाबत.

विषय नं.९५ एम.आय.टी. हॉस्पिटल (धर्मादाय) ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद या रुग्णालयाचा संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेचे यादीत समावेश करणेबाबत.

विषय नं.९६ श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईनाथ रुग्णालय येथे डेडीकेटेड कोव्हिड हेल्थ सेंटर (DCHC) सुरु करणेबाबत.

विषय नं.९७ श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोंबर-२०२० ते मार्च-२०२१ अखेर वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३,२७,१२,८९५/- च्या खर्चास नोंद घेणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.९८ स्वच्छता साहित्य खरेदी बाबत.

विषय नं.९९ संस्थानमधील स्थायी कर्मचा-यांसाठी लागु करण्यात आलेल्या सवलतपात्र गृहकर्ज व्याज सवलत योजनेच्या अट क्र.१२ मध्ये सुधारणा करणेबाबत.

विषय नं.१०० संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकुण ११ रस्त्यांपैकी एलएक्यएसआर नं.०७/२००७ या भूसंपादन प्रकरणात मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर,भाग श्रीरामपूर यांनी घोषित केलेला अंतिम निवाडा दि.३१.०१.२०११ चे भूसंपादन प्रकरणी संबधीत जमीन मालक यांनी कलम १८ खाली कोर्टात दाखल केलेल्या भूसंदर्भ दाव्याच्या निकालाच्या आधारे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेमार्फत मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांना अदा करणेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडील पत्र क्र.न.पं./टे-०८/९२१ दि.२५.०५.२०२१.

विषय नं.१०१ शिर्डी विकास योजना पालखी रस्ता ९.० मिटर रुंदीकरण भूसंपादन एलएक्यएसआर नं.२१/२००३ दि.२५.११.२००३ यामध्ये दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, राहाता यांचे कोर्टात लॅण्ड रेफरन्स नं. (भूसंपादन निर्देश अर्ज) ४/२००४ व ५/२००४ मध्ये वाढीव नुकसान भरपाईची रक्कम अदा करणेबाबत.

विषय नं.१०२ रुग्णालये विभागातील वार्षिक औषध खरेदीमध्ये खरेदी व्यवस्थापक यांच्या अनियमित व आक्षेपार्ह कामकाजाची विभागीय चौकीश होणेबाबत.

विषय नं.१०३ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुन २०२१ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.२६,४४,९२५/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.९९ सदर सभा दि.३१.०७.२०२१ मधील विषय नं.६२ ते १०३ हे वेळेअभावी प्रलंबित राहिल्याने पुढील दिनांकास सर्वसंमतीने तारीख व वेळ निश्चित करुन अजेंडयानुसार घेण्यात यावेत, असे सर्वानुमते ठरले. त्याकरीता स्वतंत्ररित्या नोटीस काढण्याची आवश्यकता नाही. असेही ठरले.

विषय नं.१०४ श्री गुरुस्थान मंदिराचे नुतनीकरण करणे.

निर्णय क्र.१०० यावर सविस्तर चर्चा केली. पुर्वी पासून अस्तित्वात असलेल्या वास्तुमध्ये बदल करण्याचा विषय आहे. विषय यापुर्वी चर्चेसाठी आला होता काय? याची माहिती घेणे. बदल करावयाचा किंवा नाही याचे धोरण ठरविणे, करावयाचा असल्यास कन्संल्टंटची नियुक्ती करण्याचे धोरण ठरविणे, डिझाईन बोलाविणे, खर्चाचा विचार करणे, या सर्व बाबींचा विचार करणे असल्याने, तसा सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.१०५ मंदिर परिसरातील श्री दत्त मंदिर व नंदादीप नुतनीकरण करणेसाठी मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१०१ यावर सविस्तर चर्चा केली. पुर्वी पासून अस्तित्वात असलेल्या वास्तुमध्ये बदल करण्याचा विषय आहे. विषय यापुर्वी चर्चेसाठी आला होता काय? याची माहिती घेणे. बदल करावयाचा किंवा नाही याचे धोरण ठरविणे, करावयाचा असल्यास कन्संल्टंटची नियुक्ती करण्याचे धोरण ठरविणे, डिझाईन बोलाविणे, खर्चाचा विचार करणे, या सर्व बाबींचा विचार करणे असल्याने, तसा सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

वरील निर्णय क्र.३८ ते १०१ घेण्यात आले.

यानंतर सायं. ०६.४५ वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(श्रीमती गिता पी.बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर. तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

स्वाक्षरीत/-
(भानुदास ह. पालवे)
अपर आयुक्त,नाशिक विभाग, नाशिक. तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

स्वाक्षरीत/-
(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

स्वाक्षरीत/-
(सुधाकर यार्लगड्डा)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

विषय क्र.- 2/9

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर

(कामगार विभाग)

विषय:- सन- २०२१ -२२ करीता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी व नविन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले सिव्हील ॲप्लीकेशन मंजूर होईपावेतो आहे त्या ठेकेदारांना मुदतवाढ देणेबाबत...

टिपणी -

सन २०२१-२२ करीता संस्थानला सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नविन ठेकेदारांची नेमूणक करणेकामी निविदा मागविणे तसेच निविदा प्रक्रिया पूर्ण होईपावेतो आहे त्याच ठेकेदारांना मुदतवाढ देणेकामी दि.०१.०३.२०२१ रोजी मा.तदर्थ समिती सभेसमोर खालीलप्रमाणे फेरप्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

अ) संस्थानकडे कायम व कंत्राटी म्हणून वर्ग केलेले १४५ सुरक्षा रक्षक वगळता उर्वरीत ६९४ सुरक्षा कामगार पुरविणेसाठी संध्याचे ठेकेदार यांना दि.०१.०३.२०२१ ते निविदा प्रक्रिया पूर्ण होवून नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत मुदतवाढ मिळावी.

ब) बाह्ययंत्रणेमार्फत ६९४ सुरक्षा रक्षक पुरविणेसाठी ई-निविदा मागविण्यास मान्यता असावी.

तथापि, त्यावर सदर ''परिस्थितीत ३३४ जादा पदे वाढवून देता येणार नसल्याने सद्या दिलेल्या प्रस्तावातील ८३९ पदांपैकी ३३४ पदे वगळून इतर ५०५ पदांकरिता पुढील दोन महिन्यांसाठी म्हणजेच दिनांक ३० एप्रिल, २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात माझी हरकत नाही. या दरम्यान वरील ५०५ कामगार पुरवण्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या परवानगीने ई-निविदा मागविता येईल. त्यासाठी संस्थान प्रशासनाने मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करावे. असे निर्देश दिलेले आहेत. तसेच, सदर प्रस्तावावर मा.श्रीमती गीता प्र.बनकर, सहाय्यक धर्मदाय आयुक्त, यांनी मा.अध्यक्ष, तदर्थ समिती यांचे निर्णयाशी सहमती दर्शविलेली आहे.

तथापि, मा.श्री भानुदास ह.पालवे, अपर आयुक्त, नाशिक सदस्य, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी यांनी याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

''दिनांक १४/०१/२०२० रोजीचे तदर्थ समितीच्या बैठकीमध्ये एकूण ८१३ सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी मंजूरी मिळाली होती. त्यामुळे सद्यस्थितीत एकूण कार्यरत ८३९ मधून १४५ वजा जाता ६९४ सुरक्षा कर्मचारी यांना ३० एप्रिल २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात हरकत नाही. यादरम्यान ६९४ कामगार पुरविण्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे परवानगीने ई-निविदा मागविता येईल त्यासाठी संस्थान प्रशासनाने मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे.'' असा निर्णय झालेला असल्याने, सध्याचे कार्यरत सुरक्षा ठेकेदार यांना दि.०१.०३.२०२१ ते दि.३०.०४.२०२१ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली होती.

त्यावर मा.तदर्थ (Ad-hoc) समिती दि.०१.०३.२०२१ रोजीचे चक्रिय पध्दतीने मिळालेल्या मान्यतेअन्वेये सन २०२१-२२ कालावधीसाठी संस्थानला कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेकामी व निविदा मागविणेस तसेच जाहिरात प्रसिध्द करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार www.mahatenders.gov.in, व संस्थानचे वेबसाईटवर, वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली होती.

सदर ई-निविदेमध्ये ०४ निविदा धारकांनी भाग घेतला होता. प्राप्त निविदा (तांत्रिक निविदा) दि.१६.०४.२०२१ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आले असून याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या ०४ निविदाधारकांच्या कमर्शिअल (वाणिज्यीक) निविदा दि.१९.०४.२०२१ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडल्या असता, सदर निविदामध्ये मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. पुणे व मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम्स, पुणे यांचे दर ०.०००१% असे L-1 आलेले असल्याने,

दि.२०.०४.२०२१ रोजी, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे दाखल करण्यात आलेल्या सिव्हील ॲप्लीकेशनचे अधिन राहून मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. पुणे व मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम्स, पुणे यांचे दर ०.०००१% L-1 व समान असल्याने त्यांना दि.०१.०५.२०२१ ते दि.३०.०४.२०२२ अखेर संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविण्याचे कार्यादेश विभागून देणेबाबत चक्रिय पध्दतीने निर्णय होणेकरीता प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

त्यावर, दि.२०.०४.२०२१ रोजी मा.अध्यक्ष, तदर्थ समिती यांनी, ''पूर्वी संस्थान प्रशासनाला ५०५ पदांकरिता दि.३०.०४.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. ती मुदतवाढ त्याच अटी व शर्तींवर माझेतर्फे ३० जून २०२१ पर्यंत देण्यात हरकत नाही.'' असे निर्देश दिलेले आहेत. तसेच उवरीत तदर्थ समिती सदस्य यांनी देखील ३० जून २०२१ अखेर मुदतवाढ देण्यास सहमती दर्शविल्याने, सध्याचे ठेकेदारांना दि.०१.०५.२०२१ ते दि.३०.०६.२०२१ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

प्रस्तावना:-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दि.०१.०३.२०२० ते दि.२८.०२.२०२१ अखेर कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी (१)मे.मॉडर्न विर रेज सिक्युरिटी फोर्स, पुणे यांना ३५३ कंत्राटी सुरक्षा रक्षक व (२)मे.ईगल हंटर सोल्युशन, लि. नवी दिल्ली यांना ३४१ कंत्राटी सुरक्षा रक्षक असे एकूण दोन्ही एजन्सी मिळून ६९४ कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरविण्याचे कार्यादेश देण्यात आलेले असून, त्यानुसार ते कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरवित आहेत. तथापि, सदर सुरक्षा ठेकेदार यांची मुदत दि.२८.०२.२०२१ रोजी संपुष्टांत आलेली आहे. सध्याचे ठेकेदार यांना ६९४ कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरविण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

तथापि,प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधिश, मा.अध्यक्ष, तदर्थ समिती व मा.सहाय्यक धर्मदाय आयुक्त,सदस्या, तदर्थ समिती यांनी दि.०१.०३.२०२१ रोजीच्या निर्णयानुसार ५०५ पदांकरीता दोन महिने मुदतवाढ व ५०५ पदांकरीता निविदा मागविणेकामी मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेस परवानगी दिलेली आहे.

तसेच, मा.अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक,सदस्य, तदर्थ समिती यांनी ६९४ सुरक्षा कर्मचारी यांना ३० एप्रिल २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात हरकत नाही. यादरम्यान ६९४ कामगार पुरविण्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे परवानगीने ई-निविदा मागविता येईल त्यासाठी संस्थान प्रशासनाने मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेस परवानगी दिलेली असल्याने, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करावयाचा सिव्हील अर्ज दि.३०.०३.२०२१ रोजी नोटरी करुन ॲड.अनिल बजाज यांचेकडे दाखल करणेकामी विधी विभागामार्फत पाठविलेला आहे. त्यानुसार मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन नं.-४६७४/२०२१ दाखल केले आहे. मात्र अद्याप त्यावर निर्णय झालेला नाही.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-

आता, दि.३०.०६.२०२१ रोजी पुर्वीचे ठेकेदार यांना देण्यात आलेली ०२ महिने मुदतवाढ संपुष्टांत येणार आहे, परंतू अद्याप पावेतो सिव्हील ॲप्लीकेशनबाबत कार्यवाही झालेली नाही.

सबब, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लीकेशनवर निर्णय होईपावेतो, सध्याचे ठेकेदार मे.मॉडर्न वीर रेज सिक्युरिटी फोर्स, पुणे व मे.ईगल हंटर सोल्युशन लि.न्यु दिल्ली यांना आहे त्याच अटी व शर्तीस अधिन राहून मुदतवाढ देणेस मान्यता असावी. सदर मुदतवाढीचे काळात सिव्हील ॲप्लीकेशनला मान्यता मिळाल्यास व त्यास अनुसरुन नवीन ठेकेदार यांना कार्यादेश देणेबाबतची प्रक्रिया पूर्ण झाल्यास, सदर ठेकेदारांना देण्यात आलेली मुदतवाढ आपोआप संपुष्टात येईल.

तरी, सदरचे प्रस्तावावर चक्रिय पध्दतीने निर्णय होणेस विनंती.

16/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

उपरोक्त प्रस्तावावर चक्रीय पध्दतीने मान्यता देणेत आली आहे.

संस्थान प्रशासनाला 505 पदांकरिता दि. 30/6/2021 पर्यंत मुदतवाढ दिलेली होती त्याच अटी व शर्तीवर मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधिन राहून दि. 31/7/2021 पर्यंत 1/7/2021 मुदतवाढ देणेस हरकत नाही

(श्रीमती गीता पी. बनकर)
सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्या, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती

(मा.श्री.भानुदास ह. पालवे)
अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
सदस्य, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती

16/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
तथा सदस्य सचिव,मा.तदर्थ (Ad-hoc) समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय दि. 23/06/2021

विषय – सन 2021-22 करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी व नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेले सिव्हील ॲप्लिकेशन मंजूर होईपावेतो आहे त्या ठेकेदारांना मुदतवाढ देणेबाबत...

1) संपूर्ण विषयाचा अभ्यास केला. दि. 25/02/2021 तसेच दि. 01/03/2021 रोजी झालेल्या निर्णयाप्रमाणे समितीच्या सदस्यांमध्ये 2x2 अशी मते विभागली गेली. सदस्य सचिव तसेच समितीचे दुसरे सदस्य श्री. पालवे यांनी 694 कर्मचा-यांसाठी निविदा काढण्यास परवानगी दिली मात्र समितीचे अध्यक्ष तसेच दुस-या सदस्या श्रीमती बनकर यांनी 505 पदांसाठी निविदा काढण्यासाठी परवानगी दिली. अशी परवानगी देतांना मा. उच्च न्यायालयासमक्ष सर्व बाबी स्पष्ट करण्यात याव्यात, असे संस्थान प्रशासनास दि. 25/02/2021 व 01/03/2021 च्या ठरावाप्रमाणे निर्देशित करण्यात आले होते.

2) अभिलेखावरुन असे दिसते की, संस्थान प्रशासनाने मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन नं. 4674/2021 दाखल केलेले आहे व ते प्रलंबित आहे.

3) अभिलेखांवरुन हे स्पष्ट होते की, मूलतः सदरील 694 पदांकरिता काढलेली निविदा हीच तदर्थ समितीच्या निर्णयास अनुसरुन काढलेली नाही. मा. उच्च न्यायालयाने संस्थान प्रशासनाला 694 कर्मचा-यांसाठी निविदा काढावी, असे स्पष्ट आदेश दिलेले नाहीत.

4) संस्थान प्रशासनाला फक्त 505 पदांकरिता दि. 30/06/2021 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती, ती मुदतवाढ त्याच अटी व शर्तींवर मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून माझेतर्फे 31 जुलै 2021 पर्यंत देण्यास हरकत नाही.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 23/06/2021

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि. २४.०६.२०२१

विषय : सन २०२१-२२ करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी व नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेले सिव्हील ॲप्लिकेशन मंजूर होईपावेतो आहे त्या ठेकेदारांना मुदतवाढ देणेबाबत . ..

विषय वाचला. दिनांक २५/०२/२०२१ व ०१/०३/२०२१ रोजी काही निर्णय झालेले आहेत. त्या निर्णयानुसार तदर्थ समितीमध्ये २ x २ अशी मत विभागणी झाली. त्या नुसार तदर्थ समितीमध्ये मा. सदस्य सचिव व दूसरे सदस्य मा. पालवे यांनी ६९४ कर्मचाऱ्यांसाठी निविदा काढण्यासाठी परवानगी दिली परंतू, तदर्थ समितीचे मा. अध्यक्ष व सदस्या सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी ५०५ पदांसाठी निविदा काढण्यांसाठी परवानगी दिली. तसेच अशी परवानगी देतांना मा. उच्च न्यायालयासमक्ष सर्व बाबी स्पष्ट कराव्यात, असे देखील वर नमूद दोन्हीं दिनांकाच्या ठरावामध्ये निर्देशित करण्यात आले होते. त्यानुसार संस्थान प्रशासनाने मा. उच्च न्यायालयामध्ये या संदर्भात दाखल केलेले सिव्हील ॲप्लिकेशन अदयाप प्रलंबित आहे.

येथे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे की, मुळातच ६९४ पदांकरिता काढण्यात आलेली निविदा ही तदर्थ समितीच्या निर्णयास अनुसरुन नाही. तसेच मा. उच्च न्यायालय यांनी देखील संस्थान प्रशासनाला ६९४ कर्मचाऱ्यांसाठी निविदा काढावी असे कुठेही स्पष्टपणे आदेश दिलेला नाही. तसेच संस्थान प्रशासनाला केवळ ५०५ पदांकरिता दिनांक ३०.०६.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तीच मुदतवाढ त्याच अटीं व शर्तींवर मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधिन राहून दिनांक ३१.०७.२०२१ पर्यंत मंजूरी देण्यास हरकत नाही.

24/06/2021

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि. २४.०६.२०२१

विषय क्र.- 2/2

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय
बांधकाम विभाग

विषय : सर्व्हे नं. १२४ मधील मध्यवर्ती भांडार इमारतीचे छताचे पत्रे बदलणे, रंगकाम करणे व इतर अनुषंगिक कामांसाठी प्राप्त ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारक संकेत नानासाहेब नवले, कोपरगाव यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करुन त्यांना कार्यादेश देणेकामी निर्णय होणेबाबत.

टिपणी.

१)	कामाचे नाव	**सर्व्हे नं. १२४ मधील भांडार इमारतीचे छताचे पत्रे बदलणे, रंगकाम करणे व इतर अनुषंगिक कामे करणे.**
२)	प्रशासकिय मान्यता	मध्यवर्ती भांडार इमारतीचे पत्रे बदलणे, रंगकाम करणे, टर्बो व्हेंटिलेटर सिस्टीम बसविणे व इतर अनुषंगिक कामांसाठी रु.३९,६२,७५५/- मात्र खर्चास मा. तदर्थ (Ad-hoc) समितीने दि.१०/०३/२०२१ अन्वये चक्रीय पद्धतीने मान्यता दिली आहे.
३)	अंदाजपत्रकीय रक्कम	अंदाजपत्रकीय रक्कम रु.३९,६२,७५५/- वजा ४% कॉन्टींजन्सीज (-) रु.१,२९,९२६/- वजा जुन्या पत्र्यांची रक्कम (-) रु.१,६२,८१३/- निविदा रक्कम **रु.३६,७०,०१६/-**
४)	प्रस्तावित कामाबाबत माहिती	मध्यवर्ती भांडार इमारतीचे पत्रे बदलणे, रंगकाम करणे, टर्बो व्हेंटिलेटर सिस्टीम बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणे.
५)	निवीदा तपशील	दि.२९/०४/२०२१ रोजी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई – निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.१३/०५/२०२१ पर्यंतचे अंतिम मुदतीत ०३ निवीदाधारकांनी ई-निवीदा अपलोड केल्या होत्या. दि.२१/०५/२०२१ रोजीचे खरेदी समितीचे सभेत तांत्रिक निवीदा उघडणेत आल्या असून ०३ ही निविदाधारक पात्र झाले आहेत. पात्र निविदांचा वाणिज्यीक लिफाफा दि.०७/०६/२०२१ रोजीच्या खरेदी समितीच्या सभेपुढे उघडणेत आला आहे.
अ)	निविदा कालावधी	२ महिने
ब)	तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक व वेळ	दि.२१/०५/२०२१सकाळी ११.०० वाजता.
क)	निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या	०३ (तीन)
ड)	सर्व निविदा धारकांनी संकेत स्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय?	होय, जमा केले आहेत.
इ)	सर्व निविदा धारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (ईएमडी) जमा केली आहेत काय?	होय, रु.३६,७००/- मात्र
ई)	निविदा रक्कम	रु.३६,७०,०००/-

तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यीक देकाराचा तपशिल:

अ. नं.	ठेकेदाराचे नांव	निविदा रक्कम रु.	वजा Buy back पत्र्यांची रक्कम	निव्वळ निविदा रक्कम रु.	निविदा टक्केवारी कमी/ अधिक
१.	कृष्णा इन्फ्रास्ट्रक्चर संगमनेर	३४,०७,८३१/-	३१,०००/-	३३,७६,८३१/-	७.९८८२७% कमी
२.	**संकेत नानासाहेब नवले, कोपरगाव**	३०,४७,२२८/-	२,२५,०००/-	२८,२२,२२८/-	२३.१०००४ % कमी

	३.	सौरभ रमेश तांबे, दाढ	३१,९०,९५२/-	४०,०००/-	३१,५०,९५२/-	१४.१४३०१ % कमी

६)	**निम्नतम निविदा धारकाचा तपशिल**	
अ)	ठेकेदाराचे नांव	संकेत नानासाहेब नवले, कोपरगाव
ब)	निविदा रक्कम	रु. २८,२२,२२८/-
क)	निविदा टक्केवारी कमी/ अधिक	**२३.१०००४% कमी**
७)	श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार	मा. व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

सदरचे निविदा प्रक्रियेत संकेत नानासाहेब नवले, कोपरगाव यांचे रु.३०,४७,२२८/- हे दर निम्नतम आहेत तसेच जी. आय. शीट बायबॅक(Buy back) करणे कामी Lump sum रक्कम संस्थानला देणेकामी त्यांचे रु.२,२५,०००/- हे दर उच्चतम आहेत. त्यामुळे सदर रक्कम वजा जाता त्यांची निव्वळ निविदा रक्कम रु.२८,२२,२२८/- निम्नतम आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि. २७/०९/२०१८ मधील ४.६.३. (अ) व (ब) मध्ये नमूद केलेनुसार प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा २३.१०००४% इतकी कमी आहे. त्यानुसार निविदा रक्कम रु. ३६,७०,०००/- वर एकूण २२.२०००८% दराने रु.८,१४,७४३/- रकमेची बँकेची प्रतिपूर्ती हमी /DD उपरोक्त अटीनुसार ठेकेदार यांचेकडून जमा करून घ्यावी लागेल.

प्रस्ताव : तरी सर्व्हे नं. १२४ मधील मध्यवर्ती भांडार इमारतीचे छतास बसविण्यात आलेले जी. आय. शीट काढून त्याऐवजी कलरकोटेड शीट बसविणे व इतर अनुषंगिक कामांसाठीचे ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक संकेत नानासाहेब नवले, कोपरगाव यांचेसमवेत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा वाटाघाटी करून त्यानुसार ठेकेदार संकेत नानासाहेब नवले, कोपरगाव यांना कार्यादेश देणेबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

20/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारीअधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

21.6 21/06

मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १२४ मधील मध्यवर्ती भांडार इमारतीचे पत्रे बदलणे, रंगकाम करणे व टर्बो व्हेंटिलेटर सिस्टीम बसविणेसाठी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक संकेत नानासाहेब नवले, कोपरगाव यांचेसमवेत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा वाटाघाटी करून त्यानुसार ठेकेदार संकेत नानासाहेब नवले, कोपरगाव यांना कार्यादेश देणेस चक्रीय पध्दतीने मान्यता देणेत आली.

06/07/2021 1/7/2021 29/6

(श्रीमती गीता बनकर)	(भानुदास पालवे)	(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)	(श्रीकांत एल. आणेकर)
सहा.धर्मादाय आयुक्त	अपर आयुक्त	मुख्य कार्यकारी अधिकारी,	प्रमुख जिल्हा व सत्रन्यायाधिश,अहमदनगर
अहमदनगर, सदस्या.	विभागिय आयुक्त,कार्यालय नासिक, सदस्य.	श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.	तथा अध्यक्ष, तदर्थ समिती.

विषय क्र.- 2|3

मा. तदर्थ समितीसमोर चक्रीय पध्दतीने मान्येसाठी सविनय सादर

सामान्य प्रशासन (वशी - ०५)

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय:- श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०२१ साजरा करणेस व याकामी येणा-या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत...

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. कलम २१ (१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे;

४. (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे;

प्रस्तावना-

उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार व पुर्वापार रुढी परंपरेनुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत धार्मिक पुजा विधी, उत्सव साजरे केले जात आहेत. यंदाचा श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०२१ **गुरुवार,दि.२२/०७/२०२१ ते शनिवार,** दि.२४/०७/२०२१ असा ०३ दिवस (आषाढ शु.१३ शके १९४३ ते आषाढ कृ.०१ शके १९४३) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

विभागाचा अभिप्राय –

Covid-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी क्र.डी.सी/कार्या९ब१/५६७/२०२१ दि.०५.०४.२०२१ व क्र.डी.सी/कार्या९ब१/१५०५/२०२१ दि.२६.०६.२०२१ चे आदेशानुसार महाराष्ट्रातील सर्व धार्मिक उपासना स्थळे बंद आहेत. धार्मिक स्थळाच्या ठिकाणी दर्शनासाठी भक्तांना परवानगी नाही. श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०२१ गुरुवार,दि.२२/०७/२०२१ ते शनिवार, दि.२४/०७/२०२१ असा ०३ दिवस आहे. **सदर कालावधीत महाराष्ट्र शासनाने भाविकांना मंदिरे दर्शनासाठी खुली केली गेल्यास. श्री गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करणेसाठी पुढीलप्रमाणे नियोजन करावे लागणार आहे.**

अ.नं.	तपशील	श्री गुरुपौर्णिमा -२०२१ चे उत्सवाचे अनुषंगाने करावयाचे नियोजन//कामे
०१	उत्सवाचा उदीप्रसाद भक्तमंडाचे सभासदांना पोष्टाने पाठविणे	अधिनियमातील तरतुदीनुसार भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाचा उदीप्रसाद पोस्टाने पाठविण्यात येईल. तसेच उत्सवाबाबत नेहमीप्रमाणे वर्तमानपत्रातून प्रेस नोट (न्यूज ॲटम) प्रसिध्दीस देण्यात येईल.
	सांस्कृतिक कार्यक्रमाची पार्श्वभुमी	श्री.गो.र.दाभोळकर लिखित व संस्थान प्रकाशित श्री साईसच्चरित या ग्रंथात तसेच याच ग्रंथाचे गद्य रुपांतर असलेल्या (ले.कर्नल.श्री.मु.ब. निंबाळकर लिखीत) श्रीसाईचे सत्यचरित्र या ग्रंथातल्या अध्याय क्र.२९ मध्ये पुढीलप्रमाणे मजकूर आहे. **श्री साईसच्चरित** साईबाबा महासंत । धीर उदार आणि दान्त । यात्रेकरुंसी कृपावंत । पैसे अत्यंत वांटिती॥४॥ दिडक्या चवल्या हाताचा कीस । अधेल्या-पावल्यांचा पाऊस । रुपये दहा कोणास वीस । कोणास पन्नास ते देत ॥५॥ हें काय सणासुदा दिसी । कार्यविशेषीं कां पर्वकाळासी । प्रतिदिवशीं उक्त प्रमाणेंसीं । संतोषेंसीं अर्पीत ॥६॥ पहूड येती भवय्ये नाचती । गवय्ये गाती भाट वानिती । तमासगीर मुजरे देती । भजनीं रंगती हरिभक्त ॥७॥ ऐसे महाराज उदारवृत्ती । दानधर्मी सढळ स्थिती । ऐकूनि कर्णोपकर्णी ही कीर्ति । इच्छा धरिती दर्शनाची ॥८॥ कधीं आलिया बाबांचे चित्तीं । पांथस्थांतेंही पैसे वांटिती । दीनदुबळयांचा परामर्ष घेती । कृपामुर्ति साईनाथ ॥९॥ **श्री साईचे सत्य चरित्र** साईबाबा थोर, उदार व दान करणारे महान संत होते. यात्रेकरुंना कृपावंत होऊन ते खूप पैसा वाटीत असत. दिडक्या-चवल्या (एक पैसा व दोन आण्यांची नाणी. त्या काळची अगदी कमी किंमतीची नाणी.४ पैसे = १ आणा, १६ आणे= १ रुपया) अगदी सहजपणे आणि अधेल्या पावल्यांचा (चार व आठ आण्यांचा म्हणजे आजच्या पंचवीस व पन्नास पैशांच्या नाण्यांचा)

पान नं. ०२ वर....

		पाऊस पाडत; म्हणजे भरपूर पैसे वाटत असत. कोणाला दहा, पैशांच्या नाण्यांचा) पाऊस पाडत; म्हणजे भरपूर पैसे वाटत असत.कोणाला वीस, तर कोणाला पन्नास रुपये ते देत असत. हे काय सणाच्या किंवा उत्सवाच्या दिवशी. काही विशेष कार्य असताना किंवा पुण्यकाळ असतानाच नव्हे, तर दररोज वर म्हटल्याप्रमाणे मोठ्या खुशीने ते वाटीत असत. पहूडे व भवय्ये (तमासगीर व नाचे लोक)येत असत आणि नाचत असत, गवई गाणे गात असत आणि भाट स्तुती करीत असत. तमासगीर मुजरे देत असत आणि हरिभक्त भजन करण्यात रंगून जात असत. महाराजांची अशा उदार स्वभावाची व दानधर्म करण्यात सढळ हाताची कीर्ती कर्णोपकर्णी ऐकून हे लोक दर्शनाची इच्छा मनात धरीत असत.कधी मनाला आले, तर बाबा प्रवाशांनाही पैसे वाटीत असत. साईनाथ दयेची मूर्ती होते. दीन-दुबळयांच्या गरजा व दु:खे काय आहेत याची सहृदयपणे ते विचारपूस करीत असत आणि त्यांना मदत करीत असत. थोडक्यात श्री साईबाबांच्या काळापासूनच शिर्डीत सांस्कृतिक कार्यक्रम होत असल्याचे आढळून येते व श्री साईबाबा हे कोणाचीही सेवा–चाकरी मोफत वा विनामुल्य घेत नसत ते स्वत: सढळहस्ताने कलाकारांना मानधन देत असत हीच परंपरा आजही शिर्डीत सुरु आहे.
०२	अ) सांस्कृतिक कार्यक्रम	संस्थानमार्फत उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम निश्चीत करावयाचे आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमाचा स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करण्यात येईल. मागील श्री गुरुपौर्णिमा उत्सवात (२०२०) मध्ये Covid-19 चा प्रादुर्भाव असल्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले नाही. यावर्षी तशी परिस्थिती असल्यास सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करता येणार नाही.
	प्रारंभ दिवस, गुरुवार, दि.२२/०७/२०२१ आषाढ शु.१३/१४ शके १९४३	सायंकाळी ७.३० ते रात्रौ १०.०० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल.
	मुख्य दिवस शुक्रवार, दि.२३/०७/२०२१ आषाढ शु. १५ शके १९४३	१) सायंकाळी ७.३० ते रात्रौ १०.०० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल. २) कलाकार हजेरी कार्यक्रमात रात्रौ. १०.३० ते पहाटे ५.०० पर्यत (दि.२४/०७/२०२१) इच्छुक कलाकारांच्या साईभजनांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल. या मुख्य दिवशी समाधी मंदीर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल.
	सांगता दिवस शनिवार, दि.२४/०७/२०२१ आषाढ कृ.०१ शके १९४३	सायंकाळी ७.३० ते १०.०० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल.
	गुरुवार, दि.२२/०७/२०२१ (सायं. ४ ते ६) शुक्रवार, दि.२३/०७/२०२१ (सायं. ४ ते ६) शनिवार, दि.२४/०७/२०२१ (सकाळी १० ते १२)	ब) कीर्तन कार्यक्रम उत्सवाचे तिन्ही दिवसांकरीता कीर्तनकार निश्चित करावयाचा आहे. याकरीता स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांची निवासव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे मानधन मंदीर विभागामार्फत आदा करण्यात येईल. नेहमीच्या प्रथेप्रमाणे कीर्तनकार्यक्रम समाधी मंदिराचे उत्तर बाजुस असलेल्या जागेत स्टेज उभारुन करता येईल. Covid-19 चा प्रादुर्भाव असल्यास मंदिर विभागाचे कर्मचा-यांमार्फत कीर्तन आयोजित करण्यात येईल.
०३	श्री सत्यनारायण पूजा व अभिषेक पूजा	उत्सव काळात साईभक्तांची गर्दी असल्याने मंदिर विभागामार्फत पार पाडल्या जाणा-या श्री साई सत्यव्रत पुजा व अभिषेक पूजा भक्तांच्या गर्दीचा अंदाज घेऊन चालू किंवा बंद ठेवता येईल.
०४	अखंड पारायण व्यवस्था	उत्सव काळात दि.२२/०७/२०२१ रोजी सकाळी ५.३० वाजता श्री व्दारकामाई मंदिरात श्री साईसच्चरिताचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दि.२३/०७/२०२१ सकाळी ५.०० वाजता त्याची समाप्ती होईल. मा. तदर्थ समितीचे सदस्य पहिले ०५ अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक याप्रमाणे ४८ भक्त वाचतील.

पान नं. ०३ वर....

अ.नं	तपशील	श्री गुरुपौर्णिमा -२०२१ चे उत्सवाचे अनुषंगाने करावयाचे नियोजन//कामे
		इच्छुक भक्तांची नावे दि.२१/०७/२०२१ रोजी नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणाकरीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. अखंड पारायणाकरीता व्दारकामाई रात्रभर उघडी ठेवण्यात येईल. श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा.तदर्थ समितीच्या सदस्यांची नांवे ठरविणे आहे. याबाबतची टिपणी मा.तदर्थ समितीचे सभेत अलाहिदा स्वतंत्रपणे सादर करण्यात येईल. Covid-19 चा प्रादुर्भाव असल्यास संस्थान अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फत पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा करण्यात येईल.
०५	पालखी व रथ मिरवणूक	उत्सवाचे पहिले दिवशी गुरुवार, दि.२२/०७/२०२१रोजी रात्रौ ९.१५ वाजता श्रींचे पालखीचे गावातून मिरवणूक व मुख्य दिवशी शुक्रवार, दि.२३/०७/२०२१ रोजी रात्रौ ९.१५ वाजता श्रींच्या रथाची गावातून मिरवणूक निघेल. Covid-19 चा प्रादुर्भाव असल्यास पालखीची व रथाची मिरवणूक काढता येणार नाही.
०६	विद्युत रोषणाई	श्री गुरुपौर्णिमा उत्सवात विद्युत विभागामार्फत समाधी मंदीर, व्दाराकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री रामनवमी उत्सव २०२१ मध्ये ओम साई लाईट डेकोरेटर्स, शिंगवे यांनी विद्युत रोषणाईचे काम विनामुल्य केले होते. यावेळेस श्री गुरुपौर्णिमा उत्सव **गुरुवार,दि.२२/०७/२०२१ ते शनिवार, दि.२४/०७/२०२१** असा ०३ दिवस साजरा करण्यात येणार आहे. तीन दिवस विद्युत रोषणाईचे काम त्यांचेकडून विनामुल्य करणेबाबत विचारना केली असता ते करण्यास तयार आहेत. मात्र विद्युत रोषणाईचे सामान आणणे व नेणेकामीचे गाडीभाडे व लेबर चार्ज खर्च रु.२१,०००/- मात्र मानधन म्हणून मिळावे अशी विनंती केली आहे. त्याप्रमाणे त्यांना देता येईल..
०७	संरक्षण व्यवस्था	उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच सांस्कृतिक कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा. पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल..
०८	प्रसाद-भोजन व्यवस्था	**Covid-19 चा प्रादुर्भाव नसल्यास खालीलप्रमाणे व्यवस्था करण्यात येईल.** उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह भक्तांना मोफत प्रसाद भोजन दिले जाते. मा. तदर्थ समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीसाठी येणा-या व्यक्तीची प्रसाद भोजनाची व्यवस्था नेहमीप्रमाणे केली जाईल. साईभक्तांचे सोयीसाठी स्वतंत्र चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादीची कॅटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीप्रमाणे देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी सुरु करणेत येईल. याकामी सबंधित विभागाकडुन नियोजन करणेत येईल. सन २०२१ चे श्री गुरुपौर्णिमा उत्सवात तिनही दिवसांचे प्रसाद भोजनात मिष्टांन्न पदार्थ देणेसाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर निश्चिती करता येईल.
०९	देणगी काऊंटर्स	**Covid-19 चा प्रादुर्भाव नसल्यास खालीलप्रमाणे देणगी काऊंटर्स चालू ठेवता येईल.** उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊंटर्स तीन शिफ्टमध्ये सुरु ठेवण्यात येतील. तसेच उत्सव कालावधीत देणगी काऊंटर्सची वेळ सकाळी ५ वा. ते रात्रौ ११ वा. पर्यंत करण्यात येईल.
१०	जादा कंत्राटी कर्मचारी	उत्सवाचे पुर्वतयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता विविध विभागांकडून आलेल्या मागणीची छाननी केल्यानंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचे स्तरावर ज्या-त्या खात्यास जादा कंत्राटी कर्मचारी वर्ग देण्यात येईल.
११	भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था	संस्थानचे भक्तनिवासस्थान इमारतीमधून तसेच साई आश्रम, व साई धर्मशाळा परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी पदयात्रीसाठी व भक्तांची निवासव्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदीर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने टाकणेत येतील. आवश्यकतेनुसार व गरजेनुसार त्यात वाढ करता येईल याकामी बांधकाम विभागासह इतर संबंधीत विभागामार्फत नियोजन करणेत येईल. पालखी धारकांची आलेल्या पत्रानुसार सर्व निवासस्थाने एकत्रीत नियोजन करतील.

पान नं. ०४ वर....

अ.नं	तपशील	श्री गुरुपौर्णिमा -२०२१ चे उत्सवाचे अनुषंगाने करावयाचे नियोजन//कामे
१२	पालखी व्यवस्था	श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पुणे तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सबात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था श्री साईबाबा धर्मशाळा येथे करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. त्याचप्रमाणे येणा-या पालख्यांसाठी पिण्याचे पाण्याची व्यवस्था मागील उत्सवाप्रमाणे यंदाही करण्यात येईल नेहमीप्रमाणे पालखी मंडप, वीज व्यवस्था व पाणी व्यवस्था करणेत येईल. **Covid-19 चा प्रादुर्भाव असल्यास पालखीधारकांनी पालख्या आणू नये असे आवाहन करण्यात येईल.**
१३	पाणीपुरवठा	पाटबंधारे खात्यास उत्सव काळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल.
१४	खर्चाचे अंदाजपत्रक	श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०२० मध्ये प्रत्यक्ष खर्च रुपये १०,३०,६४५/- इतका झालेला आहे श्री गुरुपौर्णिमा उत्सव सन-२०२१ करीता खालील तपशिलाप्रमाणे अंदाजे रु. ४३,८९,७४६.००/- (रु.त्रेचाळीस लाख एकोणनव्वद हजार सातशे शेहचाळीस) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०२१ अंदाजपत्रक

श्री गुरुपौर्णिमा उत्सवात येणा-या अंदाजे खर्चाबाबत संस्थानचे विभागांकडून खालीलप्रमाणे तरतुद करण्यात आली आहे.

अ.क्र	खर्च तपशिल	श्री गरुपौर्णिमा उत्सव -२०२०		श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०२१ अंदाजे खर्च
		अंदाजे खर्च	प्रत्यक्ष खर्च	
१	मंडप, कमानी, स्टेज, व इतर	५,५०,१२९	-	४,१८,०००
२	कलाकार बिदागी (वाजंत्री, किर्तनकार, निमंत्रीत कलाकार) व मंदिराकडील शिराप्रसाद,दहीहंडी, कलाकार निवास,इतर खर्च	५,३५,९००	-	२,८५,९००
३	भक्तांना मिष्टान्न व फर्निचर भाडे खर्च	७,२०,९०३	-	७,४०,०००
४	विदयुत रोषणाई (जनरेटर भाडे, इंधन खर्च)	१,२०,०००	२५,०००	१,००,०००
५	पालख्याचे ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था खर्च	३,२५,०००	-	३,२५,०००
६	सीसीटीव्हीसेल - कॅमेरे व सीडी डीव्हीडी खरेदी	३,६५,०००	-	६,१०,०००
७	मंदिर व मंदिर परीसर फुलाचे डेकोरेशन	२,००,०००	-	३,००,०००
८	वाहन विभाग भाडोत्री क्रेन	१०,०००	-	१०,०००
९	जादा कर्मचारी स्वयंसेवक (विदयार्थी) मानधन	८,८०,६२५	-	५,००,८४६
१०	उदीप्रसाद पाठविणेकामी पाकीटे तयार करणे व पोष्टेज खर्च (आश्रयदाते विदेशी भक्तांसह)	११,३५,०००	१०,०५,६४५	११,००,०००
	एकुण रुपये	४८,४२,५५७	१०,३०,६४५	४३,८९,७४६.००

विभागाचा अभिप्राय –

मंदिर व मंदिर परिसरात करावयाच्या फुल सजावटीसाठी देणगीदार साईभक्तांचा प्रस्ताव प्राप्त न झाल्यास संस्थानमार्फत फुल सजावट करणेसाठी उपरोक्त अ.नं.७ मध्ये तरतूद करणेत आलेली आहे.

संस्थानमध्ये साज-या होणा-या सर्वच उत्सवांना साईबाबा हयात असल्यापासूनची परंपरा आहे. साहजिकच उत्सव हा संस्थानचा नियमित कार्यक्रमांचा भाग आहे. पर्यायाने त्यासाठी विविध बाबींवर होणारा खर्च हा देखील नियमित खर्चाचा भाग आहे. संस्थान कर्मचा-यांची दरमहाची पगार बिले, विद्युत बिले, इंधन बिले आदी प्रमाणेच सुमारे शंभरपेक्षा अधिक वर्षाची परंपरा असलेल्या उत्सवांसाठी करावा लागणारा खर्च हा संस्थानच्या नियमित खर्चाचाच भाग आहे. सदर खर्चासाठी संस्थानच्या प्रत्येक वर्षीच्या मुळ अंदाजपत्रकात तरतुद केलेली असते व मुळ अंदाजपत्रकास मा. व्यवस्थापन/तदर्थ समिती यांची मान्यता घेतली जाते त्याचप्रमाणे प्रत्येक उत्सवाचे आगोदर त्या त्या उत्सवास लागणा-या अपेक्षित खर्चासही मा.व्यवस्थापन समिती/ तदर्थ समितीची मान्यता घेण्यात येते त्यामुळे अधिनियमातील तरतुदीनुसार उत्सव आयोजित करणे व तो पार पाडण्याची अंमलबजावणी करावयाची असल्याने उत्सवाच्या नियमीत खर्चास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेण्याची आवश्यकता नसावी असे नम्र मत आहे.

पान नं. ०५ वर....

(Covid-19 चा प्रादुर्भाव कमी होऊन शासनाने मंदिर भक्तांना दर्शनासाठी खुले केल्यास गुरुपौर्णिमा उत्सव २०२१ साजरा करण्यात येईल, अन्यथा Covid-19 चा प्रादुर्भाव राहिल्यास संस्थान अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फत साध्या पध्दतीने उत्सव साजरा करण्यात येईल.) second part

श्री गुरूपौर्णिमा उत्सव २०२१ साजरा करणेसाठी व याकामीच्या येणा-या अंदाजे खर्चाचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करण्यात आला होता.

त्यावर मा. न्या.सुधाकर वें. यार्लगड्डा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा मा अध्यक्ष तदर्थ समिती,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्देशीत केलेले आहे.

Please provide the data of estimated as well as actual figuars of two year prior to covid 19

मा. श्रीमती गीता प्र. बनकर सहायक धर्मादाय आयुक्त तथा सदस्य,तदर्थ (Ad-hoc) समिती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्देशीत केलेले आहे.

श्री गुरूपौर्णिमा उत्सव हा अवघ्या १० ते १२ दिवसांवर आलेला आहे. तसेच शासनाकडून अद्याप उघडणेबाबत कोणतीही विशिष्ट ठराव अथवा मार्गदर्शक सूचना अप्राप्त आहेत. त्याहीपेक्षा मा. अध्यक्ष यांनी सूचित केल्याप्रमाणे कोवीड १९ व त्यापूर्वीच्या उत्सवांच्या खर्चाचा आराखडा पाहणे योग्य होईल.

कोवीड- १९ पूर्वी श्री. गुरुपौर्णिमा उत्सव २०१८ व २०१९ मध्ये प्रत्यक्ष झालेला खर्च खालील प्रमाणे आहे.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१८ व २०१९ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च.

अ.क्र	खर्च तपशिल	श्री गरुपौर्णिमा उत्सव प्रत्यक्ष खर्च	
		सन २०१८	सन २०१९
१	मंडप, कमानी, स्टेज, व इतर	५,९३,९०९.५३	५२३०९५.०६
२	कलाकार बिदागी (वाजंत्री, किर्तनकार, निमंत्रीत कलाकार) व मंदिराकडील शिराप्रसाद , दहीहंडी, कलाकार निवास, इतर खर्च	६१,०४१.००	४,४५,५०३.००
३	भक्तांना मिष्टान्न व फर्निचर भाडे खर्च (श्रम परिहार मजुरीसह)	७,८६,८४८.००	८,०७,०४६.८०
४	विदयुत रोषणाई (जनरेटर भाडे, इंधन खर्च)	९४,९३९.००	७६,६००.००
५	निमंत्रण पत्रिका, उदीप्रसाद पाठविणेकामी पोष्टेज खर्च (आश्रयदाते विदेशी भक्तांसह)	२३,५३,९३७.२०	१३,५०,७११.००
६	जादा कर्मचारी स्वयंसेवक (विदयार्थी) मानधन	२,६७,६५८.००	१,४३,४००.००
७	पालख्यांचे ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था खर्च (टॅकर डिझेलसह)	२२०५.००	८४०.००
८	सीसीटीव्हीसेल - कॅमेरे व सीडी डीव्हीडी खरेदी	३,०००.००	-
९	मंदिर व मंदिर परीसर फुलाचे डेकोरेशन	-	-
१०	वाहन विभाग भाडोत्री क्रेन	२९,७००.००	२०३८५.००
	एकुण रुपये	४१,९३,२३७.७३	३३,६७,५८०.८६

तरी श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२१ साजरा करणेकामी येणा-या अंदाजे रुपये ४३,८९,७४६.०० (रुपये त्रेचाळीस लाख एकोणनव्वद हजार सातशे शेहचाळीस) मात्रचे खर्चास चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

15/7/21

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

सध्याच्या रोगाच्या मार्गदर्शक सूचनामध्ये कोणताही बदल केला नसल्या कारणाने मा. अध्यक्ष सो यांनी अधोरेखित केलेप्रमाणे second Part मंजूर करणेत येत आहे

(श्रीमती गीता प्रवीण बनकर) 16/07/2021

सदस्य तदर्थ समिती तथा
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

15/7/21

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

15/7/21

मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांनी अधोरेखित केलेप्रमाणे second part proposal मंजूर करणेत येत आहे

(भानुदास ह. पालवे)

सदस्य तदर्थ समिती तथा
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक

18/7/21

perused the data of 2018 and 2019. State Govt. did not raise covid-19 restrictions. Hence, proposal for spending Rs. 43,89,746 is not approved. second part proposal is approved.

(सुधाकर वे. यार्लगड्डा)
अध्यक्ष, तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,अहमदनगर

16.07.2021

विषय क्र.- 2\8

12 12

मा. तदर्थ समितीसमोर चक्रीय पध्दतीने मान्येसाठी सविनय सादर

सामान्य प्रशासन (वशी - ०५)

विषय- श्री साईसच्चरित पारायण सोहळा वर्षे २७ वे नेहमीचे प्रथा आणि परंपरे प्रमाणे साजरा करणेबाबत...

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-

१.अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील

प्रस्तावना :-

नाट्य रसिक मंच (संच) शिर्डी, सचिव यांनी दि.०४.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये महोदय दरवर्षी श्रावण महीन्यात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी आणि नाट्यरसिक मंच शिर्डी व शिर्डी ग्रामस्थ यांचे सहकार्याने साई सच्चरित पारायण सोहळा आयोजित करण्यात येतो.

यंदाचा पारायण सोहळा वर्षे २७ वे प्रथेप्रमाणे श्रावण शुध्द-१- श्रावण मासारंभ श्रावणी सोमवार दि. ०९.०८.२०२१ (ऑगस्ट) ते १६.०८.२०२१ सोमवार अखेर व मंगळवार दि. १७.०८.२०२१ काला किर्तन आणि महाप्रसाद अशा पध्दतीने व रिवाजाने येतो. तरी नाट्य रसिक मंचाचे वतीने आपणास विनंती करणेत येत आहे.

या वर्षीचे साईसच्चरित पारायण सोहळ्याचे आयोजनाकामी आमचे मंडळाचे सदस्यांना चर्चेसाठी आमंत्रीत केल्यास आम्ही सर्व सदस्य प्रत्यक्ष हजर राहून त्यावर सविस्तर चर्चा करुन आपले मार्गदर्शनाप्रमाणे नियोजन करणेस योग्य राहील आणि त्याप्रमाणे वाचकांना कळविणेसाठी आणि नाव नोंदणीसाठी सोईस्कर राहील आणि वाचकांना निश्चित माहीती मिळेल त्यासाठी लवकर आम्ही सर्व मंडळाचे सदस्यांना आमंत्रीत करावे ही विनंती, असे कळविले आहे.

विभागाचा अभिप्राय :-

सामुदायिक स्वरुपात श्री साईसच्चरित पारायण श्रावण शु.१ ते श्रावण शु.८ या कालावधीत गेली २५ वर्षे २०१९ पर्यंत आयोजन करण्यात आले.

मागिलवर्षी सन २०२० मध्ये शिर्डी ग्रामस्थ यांनी साईबाबांच्या काळात गोकुळाष्टमी उत्सव आठ दिवस चालत होता असे दाखले आहेत. काळाच्या ओघात तो दोन दिवसांवर आलेला आहे. गेल्या पंचवीस वर्षापासून श्री साईबाबा संस्थान व शिर्डी ग्रामस्थांच्या वतीने श्री साईसच्चरित पारायण सोहळ्याचे सामुदायिक वाचन करण्यात येते. दरवर्षी श्रावणाच्या पहिल्या दिवशी श्रावण शु.१ ला सुरु होणारे हे पारायण जवळपास पंधरा दिवस उशीरा श्रावण वद्य -१ ला सुरु करुन पारायण समाप्तीनंतर काल्याचे कीर्तन गोकुळअष्टमीच्या दिवशी ठेवण्यास साईबाबांच्या हयातीत सुरु असलेला आठ दिवसांचा गोकुळाष्टमी उत्सव पुन्हा सुरु होईल हा उत्सव पुर्नस्थापित करावा अशी ग्रामस्थांनी मागणी केली होती.

त्यास अनुसरुन सदरचा विषय मा. तदर्थ समितीचे दि.१३.०७.२०२० रोजीचे सभेत सादर करण्यात आला असता त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

मा. तदर्थ समितीचे दि. १३.०७.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४१६ नुसार "श्री साई सच्चरित पारायण सोहळ्याची गेल्या २५ वर्षांची दीर्घ परंपरा विचारात घेता सामुदायिक स्वरुपात पारायण आयोजित न करता श्रावण वद्य एक दि.४ ऑगस्ट २०२० रोजी सुरु करुन संस्थानला सोयीस्कर असलेल्या समाधी मंदिरासमोरील स्टेजवर संस्थान पुजा-यांची पारायण वाचनाची बैठक व्यवस्था करणेस, पारायणाचे प्रक्षेपण फेसबुक लाईव्हव्दारे करणेस व पारायण समाप्तीनंतर काल्याचे कीर्तन गोकुळअष्टमीच्या दिवशी ठेवण्यास मान्यता देण्यात आली. तथापी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव असल्यामुळे महाप्रसद (बुंदी) वाटप करण्यात येऊ नये, असे ठरले."

त्यानुसार श्रींच्या समाधी मंदिरासमोरील स्टेजवर संस्थान पुजा-यांची पारायण वाचनाची बैठक व्यवस्था करण्यात येऊन, संस्थान पुजा-यांमार्फत वाचन करण्यात येऊन श्रावण वद्य एक दि.४ ऑगस्ट २०२० ते श्रावण वद्य आठ, ११.ऑगस्ट २०२० या कालावधीत पारायणाचे प्रक्षेपण, पारायणार्थींना घरीच फेसबुक लाईव्हव्दारे दिसेल अशी व्यवस्था करण्यात येऊन पारायण समाप्तीचे काल्याचे कीर्तन गोकुळअष्टमीच्या दिवशी आयोजित करण्यात आले होते.

तरी नाट्य रसिक मंच (संच) शिर्डी, सचिव यांचे दि.०४.०२.२०२१ रोजीच्या पत्राचा विचार करता, सामुदायिक स्वरुपात श्री साईसच्चरित पारायण सोहळा श्रावण शु.१ ते श्रावण शु.८ या कालावधीत गेली २५ वर्षे आयोजन करण्यात आले असल्याने मागिल वर्षाप्रमाणे श्रावण वद्य -१ ला सुरु न करता, नेहमीच्या रितीरिवाजाप्रमाणे श्रावण शु.१ ते श्रावण शु.८ या कालावधीत आयोजित करणे योग्य राहिल असे मत आहे

श्री साईसच्चरित पारायण सोहळा कार्यक्रमाचे आयोजन उपरोक्तप्रमाणे केल्यास साधारणतः खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

अ.नं.	तपशील	श्री साई सच्चरित पारायण सोहळा - २०२०		श्री साई सच्चरित पारायण सोहळा - २०२१
		अंदाजे खर्च	प्रत्यक्ष खर्च	अंदाजे खर्च
१	मंडप, मॅटिन व स्टेज	--	--	११,९०,०००
२	प्रसाद खर्च, (चहा,कॉफी व दुध खर्चासह)	२,५०,०००	१३७०.००	३,६७,५००
३	जादा (कंत्राटी) कामगार	--	--	३,१५,५००
४	इतर खर्च	--	--	५४,०००
५	मंडपातील लाईट व्यवस्था, भाडोत्री जनरेटर इतर खर्च	५०,०००	--	१,२५,०००
६	फुल सजावट खर्च	--	--	५०,०००
	एकुण	३,००,०००	१,३७०	२१,०२,०००

प्रस्ताव –

तरी विभागाच्या अभिप्रायात नमूद केलेप्रमाणे पारायण सोहळ्याची गेल्या २६ वर्षांची दीर्घ परंपरा विचारात घेता या परंपरेला छेद जाऊ नये म्हणून खालीलप्रमाणे पारायणाची रुपरेषा ठरवता येईल.

श्री साईसच्चरित पारायण सोहळा श्रावण शु.१ ते श्रावण शु.८ या कालावधीत गेली २५ वर्षे आयोजन करण्यात आला असल्याने त्यात बदल न करता त्याच रितीरिवाजाप्रमाणे श्रावण शु.१ सोमवार दि.०९.०८.२०२१ ते श्रावण शु.८ सोमवार दि.१६.०८.२०२१ अखेर आयोजन करता येईल.

श्री साईसच्चरित पारायण सोहळा २०२१ साजरा करणेसाठी व याकामीच्या येणा-या अंदाजे खर्चाचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करण्यात आला होता.

त्यावर मा. न्या.सुधाकर वें. यार्लगड्डा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा मा अध्यक्ष तदर्थ समिती,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्देशीत केलेले आहे.

Kindly provide the estimated budget and actual expenses for the year prior to covid 19 lockdown.

मा. श्रीमती गीता प्र. बनकर सहायक धर्मादाय आयुक्त तथा सदस्य,तदर्थ (Ad-hoc) समिती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्देशीत केलेले आहे.

सदरचा प्रस्ताव वाचला.प्रस्तावावरुन तुलनात्मक पाहणेचे दृष्टीने सध्याची परिस्थिती पाहता कोवीड -१९ पूर्वीचा खर्च सादर करावे.

कोवीड- १९ पूर्वी श्री साईसच्चरित पारायण सोहळा २०१८ व २०१९ मध्ये प्रत्यक्ष झालेला खर्च खालील प्रमाणे आहे.

श्री साईसच्चरित पारायण सोहळा -२०१८ व २०१९ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च.

अ.नं.	तपशील	श्री साईसच्चरित सोहळा प्रत्यक्ष खर्च	
		सन २०१८	सन २०१९
१	मंडप, मॅटिन व स्टेज	२०,८५,६७०.२५	१२,८१,४००
२	कलाकार बिदागी	१,९०,४२२.००	५,९४,७७१
३	प्रसाद खर्च, (चहा,कॉफी व दुध खर्चासह)	१७,३५,२९१.००	५,६७,६४१
४	जादा (कंत्राटी) कामगार	३,७९,९८६.८४	३,०१,५९१
५	इतर खर्च (फर्निचर,भाडे,प्लस्टिक कापड, फोटोग्राफी किरकोळ खर्च इ.)	-	-
	फुल सजावट खर्च	-	७५,०००
	विद्युत रोषणाई	१२,१५२	-
	एकुण	४४,०३,५२२.०९	२८,२०,४०३

अ) कोव्हीड -१९ चा प्रादुर्भाव पूर्णपणे कमी होऊन महाराष्ट्र शासनाने नागरिकांना पूर्णपणे एकत्र येण्यास परवानगी दिल्यास संस्थान मालकीच्या साईनगर मैदानावर सामुदायीकरित्या श्री साईसच्चरित पारायण सोहळा २०२१ आयोजित करता येईल.

अथवा

ब) सदर कालावधीत कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव असल्यास, महाराष्ट्र शासनाचे कार्यक्रमावर निर्बंध असल्यास सामुदायीक पारायण सोहळा आयोजित न करता मागिल वर्षाप्रमाणे समाधी मंदिरासमोरील स्टेजवर संस्थान पुजा-यांची पारायण वाचनाची बैठक व्यवस्था करण्यात येऊन, पारायण वाचन करण्यात येईल, पारायणार्थीसाठी पारायणाचे प्रक्षेपण फेसबुक लाईव्हव्दारे करता येईल.

तरी कोव्हीड -१९ च्या प्रादुर्भावाचा विचार करुन "अ" अथवा "ब" नुसार श्री साई सच्चरित पारायण सोहळा आयोजित करता येईल,पारायण सोहळ्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रु.२१,०२,०००/- (अक्षरी रुपये एकविस लाख दोन हजार) मात्रचे खर्चास चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर .

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

As considet remaining period for proposed function and as there is no any direction for relaxation of Covid-19 approval 'B' allowed. Agreed 16/7/2021

(श्रीमती गीता प्रवीण बनकर)
सदस्य तदर्थ समिती तथा
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर.

Proposal 'B' is approved.

(भानुदास ह. पालवे) 18/7/2021
सदस्य तदर्थ समिती तथा
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(सुधाकर वे. यार्लगड्डा)
अध्यक्ष, तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,अहमदनगर

perused the expenses during 2018 and 2019. Since the State Govt. did not relax the covid-19 pandemic safety restrictions, there is no need of spending Rs 21,02,000 for the function. Hence 'B' is approved.

16.07.2021
(S.V. Yarlagadda)

दिषय क्र.- 2/5

15

मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सविनय सादर

सामान्य प्रशासन शाखा (आस्थापना)

विषय: डॉ. आकाश रामहरी किसवे, नायब तहसीलदार यांचे प्रशासकीय अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तवयवस्था, शिर्डी या प्रतिनियुक्तीचे पदावरील मुदतवाढीबाबत.... ..... .

टिपणी –

मान्यतेस्तव सविनय सादर,

डॉ. आकाश रामहरी किसवे, नायब तहसीलदार, ता. नांदुरा, जि. बुलढाणा यांची महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा व निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ३९ व ४० आणि सदर नियमांच्या परिशिष्ट–दोन मध्ये नमूदकेलेल्या अटी व शर्ती यांच्या अधीन राहून प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विशवस्तव्यवसथा, शिर्डी, या पदावर महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन आदेश क्र.सांसवि-१०१८/६९४/ प्र.क्र.७८/का. सोळा, दि. २५ जून २०१८ नुसार दिनांक २५/०६/२०१८ पासून प्रथमत: एक वर्षासाठी किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार डॉ. आकाश रामहरी किसवे, हे प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या पदावर दि. २५/०९/२०१८ रोजी मध्यान्हपूर्व हजर झाले आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र. २ नुसार जा.क्र. एसएसएस/ साप्रशा / आस्था/ १४६४/ २०१९ दि. १९/०७/२०२९ नुसार डॉ. आकाश रामहरी किसवे, हे प्रशासकीय अधिकारी यांचे प्रतिनियुक्तीस पुढील दोन वर्षाकरीता मुदतवाढ मिळणेसाठी मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र. ३ नुसार विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र. सासंवि-१०१८/६९४/ प्र.क्र.७८/ का. १६, दिनांक २२ ऑगस्ट, २०१९ नुसार डॉ. आकाश रामहरी किसवे, हे प्रशासकीय अधिकारी यांचे प्रशासकीय अधिकारी या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नियुक्तीस पुढील दोन वर्षासाठी किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत या पैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे..

डॉ. आकाश रामहरी किसवे, यांचेबाबत महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन आदेश क्र.सांसवि-१०१८/६९४/ प्र.क्र.७८/का. सोळा, मंत्रालय मुंबई-४०००३२, दि. २५ जून २०१८ पासून नेमणूक करणेत आलेली असल्यामुळे त्यांचे नेमणूक दिनांक २४ जून, २०२१ रोजी तिन वर्षाचा कालावधी पूर्ण होत आहे.

त्यानुसार डॉ. आकाश रामहरी किसवे, प्रशासकीय अधिकारी यांनी दिनांक ०७/०७/२०२१ रोजीचे अर्जान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे प्रशासकीय अधिकारी या पदावरील प्रतिनियुक्तीस पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्यानुसार डॉ. आकाश रामहरी किसवे, यांचे प्रतिनियुक्तीस पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीन निर्णयार्थ सादर करणेत आला होता.

त्यावर मा. न्या. सुधाकर वें यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा मा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्देशीत केलेले आहे-

It seems that 5 post of Administrative Officer are sanctioned in Staffing Pattern. Out of them, two post are reserved for appointment on deputation. Then three posts are to be filled in byu appointment. So explain, (1) whether these three post are appointed or not? And (2) If extension to Shri Kisve is not sought, which functions will be affected?

मा. श्रीमती गीता प्र. बनकर, सहायक धर्मादाय आयुक्त–तथा- सदस्य तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्देशीत केलेले आहे-

प्रस्ताव वाचला प्रस्तावावरुन डॉ. आकाश रामहरी किसवे यांच्या ३ वर्षाचा कालावधी २४ जून, २०२१ रोजी पूर्ण झालेला आहे. संस्थानमध्ये ५ प्रशासकीय अधिकारी यांची मंजूरी आहे. त्या पैकी २ पदे ह्या प्रतिनियुक्तीनी भरल्या जातात. त्या अनुषंगाने ३ पदे भरणेचे आहेत. परंतू या प्रस्तावावरुन हे तीन पदे नियुक्त केलेले आहेत किंवा कसे हे अवगत होत नाही. तसेच डॉ. आकाश रामहरी किसवे यांना मुदतवाढ दिली नाही तर त्या अनुषंगाने सविस्तर सादर करावे.

विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक सासंवि २००९ / ४३३ /(३७ /०९) /का. १६, दिनांक ०७ ऑगस्ट, २००९८ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचा आकृतीबंधास मान्यता देणेत आलेली आहे. मंजूर आकृतीबंधानुसार प्रशासकीय अधिकारी या संवर्गाची एकूण ०५ पदे मंजूर आहेत. शक्यतो संस्थानच्या मंजूर आकृतीबंधातील अधिकतम अधिकारी शासनाकडून प्रतिनियुक्तीवर घ्यावीत, असे नमूद केलेले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८/०७/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६३३ खालीलप्रमाणे झालेला आहे-

पान २ वर. कृ.म.प...

" संस्थानचा दिवसेंदिवस वाढता व्याप व नवीन संगणकीय माहिती तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी विचारात घेता सध्या रिक्त असणा-या प्रशासकीय अधिकारी या पदांच्या ५०% पदांवर शासनाकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेमार्फत निवड करण्यात आलेल्या तहसिलदार संवर्गातील व अन्य संवर्गातील अधिका-यांना प्रतिनियुक्तीवर घेण्यात यावे व उर्वरित ५०% पदे संस्थान सेवेतील कर्मचा-यांमधून पदोन्नतीने घेणेत यावे आणि एक प्रशासकीय अधिकारी पद तांत्रिक दृष्टया संस्थानचे कामाचे स्वरुप पहाता संस्थाननरे ठरविलेल्या आवश्यक शैक्षणिक पात्रता व कामाचा अनुभव असलेल्या संवर्गातील घेणेबाबत प्रस्ताव सादर करावा. "

सद्यस्थितीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मंजूर आकृतीबंधानुसार प्रशासकीय अधिकारी या संर्वगाचे मंजूर ०५ पदांपैकी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १५ मार्च, २०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २११ नुसार नेमणूक करणेत आलेल्या ०४ प्रशासकीय अधिकारी यांचेपैकी तीन प्रशासकीय अधिकारी सेवानिवृत्त झालेले असून सध्या श्री. दिलीप त्र्यंबकराव उगले, हे एकच प्रशासकीय अधिकारी कार्यरत आहे. श्री. दिलीप त्र्यंबकराव उगले, यांना तात्कालिक आधारावर (on Ad-hoc Basis promation) पदोन्नती नेमणूक देण्यात आलेली आहे.

तसेच डॉ. आकाश रामहरी किसवे यांच्यी प्रतिनियुक्तीने प्रशासकीय अधिकारी या पदावर नेमणूक करणेत आलेली आहे. उर्वरीत तीन पदांवर कुठल्याही प्रकारची नेमणूक अथवा पदोन्नती देणेत आलेली नाही. तथापि प्रशासकीय कामकाजाचे सोईसाठी मुख्य लेखाधिकारी- प्रतिनियुक्ती, प्रभारी कार्यकारी अभियंता, प्रभारी पाणी पुरवठा विभाग प्रमुख व लेखाधिकारी यांचेकडे जा.क्र.एसएसएस / साप्रशा /आस्था /६३१/ २०२१ दिनांक २२ जून, २०२१ नुसार त्यांचे मुळ पदाचे कामकाज सांभाळून प्रशासकीय अधिकारी पदाचे अतिरिक्त काम तदर्थ स्वरुपात सोपविणेत आलेले आहे. श्री किसवे हे वगळले तर ०५ पैकी एकाच पदावर नियमीत प्रशासकीय अधिकारी आहे. उर्वरीत प्रशासकीय अधिकारी यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. त्यामुळे त्यांचेवर अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे.

डॉ. आकाश रामहरी किसवे, प्रशासकीय अधिकारी प्रतिनियुक्ती यांचे नियुक्तीस दिनांक २४ जून, २०२१ रोजी तीन वर्ष पूर्ण झालेले आहेत. डॉ. किसवे यांचेनंतर संस्थानकडे फक्त एकच पूर्ण वेळ प्रशासकीय अधिकारी राहतील संस्थानचे कामकाज सुरळीत राहणे कामी डॉ. आकाश रामहरी किसवे, प्रशासकीय अधिकारी यांचे प्रतिनियुक्तीस मुदतवाढ मिळणे आवश्यक आहे.

सबब डॉ. आकाश रामहरी किसवे, प्रशासकीय अधिकारी, यांचे प्रतिनियुक्तीस पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करता येईल.

विभागाचा अभिप्राय: डॉ. आकाश रामहरी किसवे, प्रशासकीय अधिकारी, यांचे प्रतिनियुक्तीस पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ मिळणेबाबतचे निर्णयार्थ सदरचा प्रस्तवा मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

मा. तदर्थ समिती निर्णय

आकाश रामहरी किसवे यांची प्रतिनियुक्तीस एक वर्षाकरिता मुदतवाढ देणेस हरकत नाही.

(श्रीमती गिता पी. बनकर)
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर तथा
सदस्य , तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

(भानुदास ह. पालवे)
अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक, तथा
सदस्य , तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

आकाश रामहरी किसवे यांची प्रतिनियुक्तीस एक वर्षाकरिता मुदतवाढ देणेस हरकत नाही.

Needs discussion. To put up in the forthcoming meeting.

16.07.21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

(मा. न्या. सुधाकर वें यार्लगड्डा)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- २।६

भांडार विभाग

"मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर"

विषयः- संस्थानचे भांडार विभागाकडील गाईचे शुध्द तुपाचे साठ्याबाबत....

कोव्हिड-१९ चे प्रादूर्भावामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात अचानक दि.१८/०३/२०२० ते १५/११/२०२० या कालावधीत लॉकडाऊन झालेमुळे लाडू निर्मिती व भांडार विभागाकडे शिल्लक असलेले १,०५०.१५ क्विंटल शुध्द तुप पुरवठाधारक हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि. हरिव्दार यांचेकडून ते शुध्द तुप परत घेणेस तयार नसलेमुळे त्यांचेकडून शुध्द तुप बदलून घेण्यात आलेले होते, त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

अ.नं.	बदलून घेतलेले तुप (क्विंटल)	बॅच नं. व उत्पादन दि.	दर (प्रति क्विंटल)	एकुण किंमत (रु./पै.)	मुदत संपण्याची तारीख
०१	३६०.००० (२,४०० डबे)	२५/ २२.१०.२०२०	२६,१००/-	९३,९६,०००-/	२१.०७.२०२१
०२	४७०.१०० (३,१३४ डबे)	२८/ २३.११.२०२०	२६,१००/-	१,२२,६९,६१०-/	२२.०८.२०२१
०३	२२०.०५० (१,४६७ डबे)	०२/ ०५.०१.२०२१	२६,१००/-	५७,४३,३०५-/	०४.१०.२०२१
एकूण-	१,०५०.१५० (७,००१ डबे)			२,७४,०८,९१५-/	

दि.१६/११/२०२० पासून महाराष्ट्रातील सर्व मंदिरे भक्तांसाठी खुली झाली होती. त्या तारखेपासूनच श्री साई मंदिर दर्शनासाठी साईभक्तांना खुले करण्यात आले होते. तथापि, लाडू व बुंदी प्रसाद, श्री सत्यनारायण पूजा चालू नसल्यामुळे दि.०४/१२/२०२० रोजी वरील शुद्ध तुपाचा वापर प्रसादालयाकडील शिरा प्रसादासाठी करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता, त्यास मान्यता मिळालेली होती, त्यानुसार प्रसादालयात शिरा प्रसादासाठी शुद्ध तुपाचा वापर चालू आहे.

शुद्ध तूप बदलून घेणेसाठी १ डबा वाहतूक खर्च+ प्रोसेसिंग चार्जस रु. १६१/- म्हणजेच १५ किलोचा एक डबा बदलून घेण्यासाठी साधारण रु. ३४३.९१ इतका खर्च आलेला आहे, म्हणजेच १ किलो तूप बदलुन घेणेसाठी साधारण रु.२२.९२ चे दरम्यान खर्च आलेला होता. याकामी वाहतूक खर्चासह वरील तुप बदलून घेणेकामी रु.२४,०७,७१६/- इतका एकूण खर्च आलेला होता.

श्रींच्या समाधी मंदिरातून दर्शन करुन येणा-या प्रत्येक साईभक्तास दि.०६.०३.२०२१ पासून शुध्द तुपातील एक बुंदीचा लाडू वाटप करणेत येत होता. तसेच २०.०३.२०२१ पासून साईभक्तांना लाडूप्रसाद विक्रीही चालू करण्यात आली होती.

संस्थानने शुध्द तूप बदलून घेतलेनंतर प्रसादालय, लाडू व मंदिर विभागाने शुध्द तूपाचा वापर केलेला आहे, त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

अ.नं.	विभागाचे नांव	वापरलेले तुप (क्विंटल)
०१	प्रसादालय	१०८.००
०२	लाडू निर्मिती	५९.२५
०३	मंदिर नैवेदय कोठी	१.९५
	एकुण वापर -	१६९.२०

वरीलप्रमाणे शुध्द तूपाचा बदलून घेतलेनंतर आतापर्यंत वापर झालेला आहे. दि.३१/०३/२०२१ पासून श्री साईभक्तांना दर्शनानंतर केले जाणारे लाडू वाटप व लाडू विक्री बंद करण्यात आलेली होती.

दरम्यान महाराष्ट्र शासनाने कोव्हीड १९ चे वाढते प्रादुर्भावामुळे दि.५ एप्रिलपासून सर्व धार्मिक स्थळे भक्तांना दर्शनासाठी बंद केली होती. त्यास अनुसरुन श्री साई मंदिरही साईभक्तांना दर्शनासाठी बंद करण्यात आले होते. ते अजुनही बंद आहेत. त्यामुळे संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती व श्री साई सत्यव्रत पुजाही बंद आहेत.

वरीलप्रमाणे लॉकडाऊन चालू झालेमुळे दि.१२/०४/२०२१ चे टिपणी अन्वये भांडार विभागाकडे शिल्लक असलेले शुध्द तुपाचे वापराबाबतची माहिती अवलोकनार्थ सादर करण्यात येवून त्याबाबत मार्गदर्शनासाठी प्रस्ताव सा. करण्यात आला होता. त्यावर "सदयस्थितीत प्रसादालयाला त्यांचे मागणीप्रमाणे तुप उपलब्ध करुन दयावे" असे निर्देश झाले होते.

सदर निर्देशाची प्रत प्रसादालय विभाग व लाडू निर्मिती विभाग यांना देण्यात आली होती. प्रसादालय अधिक्षक यांचेशी याबाबत चर्चा केली असता, लाडू निर्मिती विभागाने त्यांचेकडे असलेले वापरलेले शुध्द तुप प्रसादालय विभागाला दिल्यामुळे तेथे त्या वापरलेल्या शुध्द तुपाचा वापर झालेला आहे. सध्या फक्त Hospital पेशंट, प्रसादालय स्टाफ व इतर मुकबधिर शाळा यांना जेवण चालू आहे, तसेच या दरम्यान कोव्हीड रुग्ण संख्याही कमी असल्यामुळे शि- यासाठी शुध्द तुपाचा वापरही अत्यंत कमी झाला आहे. शुद्ध तुपाचे दैनंदिन वापराची माहिती घेतली असता, सध्या प्रसादालयात दररोज सरासरी फक्त १५ किलो शुध्द तुप वापरले जात आहे.

सध्या शुध्द तूपाचा भांडार व लाडू निर्मीती विभाग यांचेकडे खालीलप्रमाणे साठा शिल्लक आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणेः-

अ.नं.	शिल्लक असलेले तुप (क्विंटल)	१५ कि.ग्रॅम डब्यांची संख्या	दर प्रती) (क्विंटल	एकुण किंमत (रु.पै.)	मुदत संपण्याची तारीख
०१	२३०.५२० - भांडार ९.००० लाडू विभाग (बॅच नं. २५/२२.१०.२०)	१,५३५ ६० १,५९५	२६,१००-/ २६,१००/-	६०,०९,५२५-/ २,३४,९००/- ६२,४४,४२५/-	२१.०७.२०२१
०२	४३१.८५० (बॅच नं. २८/२३.११.२०)	२,८७९	२६,१००-/	१,१२,७१,२८५-/	२२.०८.२०२१
०३	२२०.०५० (बॅच नं.२/ ०५.०१.२१)	१,४६७	२६,१००-/	५७,४३,३०५-/	०४.१०.२०२१
	८९१.४२०	५,९४१		२,३२,५९,०१५-/	

शासनाकडून मंदिरे भक्तांना दर्शनासाठी अजुनही बंद आहेत व शासनाचे मंदिरे खुली होण्यासाठी कधी आदेश होतील याबाबत निश्चितपणे काहीही सांगता येणार नाही.

वरील साठयाचा विचार करता अ.नं. ०१ चे २३९.५२० क्विंटल शुध्द तूपाची मुदत संपत असल्याने मागील वर्षीचे पुरवठाधारक मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉ.प्रा.लि. यांना दि.१२.०६.२०२१ चे पत्राने वरील शुध्द तुपाचे साठयापैकी गरजेप्रमाणे शुध्द तुप बदलून देणेकामी किती खर्च येईल ते कळविणेबाबत विनंती केली होती. तसेच याबाबत दुरध्वनीवरुन वारंवार पाठपुरावा केला होता परंतु त्यांचेकडून याबाबत माहिती मिळालेली नाही. त्यांनी २-३ दिवसापुर्वी आमचा प्लॅट Expansion साठी बंद असल्याने आमचेकडे तुपाचा साठा नाही व आमचा प्लॅट साधारण ऑक्टोबर महिन्यामध्ये चालू होईल. त्यामुळे संस्थानला शुध्द तुप बदलून देणेस असमर्थता दर्शविली आहे. म्हणून मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉ.प्रा.लि. यांचे मालकाशी दुरध्वनीवरुन मा.उपमुख्यकार्यकारी अधिकारी व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही आज दि.०५.०७.२०२१ रोजी चर्चा करुन पहिल्या लॉटचे २४० क्विंटल तुप बदलून देणेबाबत सुचना केली आहे. यावर त्यांनी याबाबत प्रयत्न करतो असे सांगितले आहे.

शासनाचे मंदिर सुरु होण्याचे आदेश झाले व लाडू विक्री आणि मोफत बुंदी प्रसाद पाकिटे वाटप जर लगेचच चालू झाले तर सदर शुध्द तूपाचा वापर होऊन सदर तूपाचा साठा काही प्रमाणात संपू शकतो. तथापि, धार्मिक स्थळे चालू होणे, बुंदी व लाडू प्रसाद वाटप सुरु होणे या सर्व बाबींबाबत सध्या तरी अनिश्चितता आहे.

मागील महिन्यामध्ये कोरोना प्रार्दुभाव कमी होवून मंदिर व शाळा, कॉलेज वगळता सर्व गोष्टी चालू झाल्या आहेत.

एस.टी महामंडळाने वाहतूक खर्चासाठी साधारण १,४३,०००/- + पथकर+ वाहनकर इतर राज्यांचे कर असा खर्च कळविला आहे. मागील वेळेस पथकर, वाहनकर वगैरे खर्च रु.१२ ते १३ हजारचे दरम्यान झालेला आहे. त्यामुळे एका खेपेसाठी साधारण १,६०,०००/- चे दरम्यान वाहतूकीचा अंदाजे खर्च होईल.

सध्याचे शुध्द तुप साठयासाठी खालील पर्याय उपलब्ध आहेत.

१. मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉ.प्रा.लि. यांचेकडून पुनश्च केलेले विनंतीनुसार बदलून देत असल्यास २४० क्विंटल शुध्द तुप बदलून घेणे. याकामी मागील वेळेस त्यांनी रु.१६१/- प्रति १५ किलोसाठी आकारले होते व वाहतूक खर्च संस्थानमार्फत करणेत आला होता. त्याप्रमाणे संस्थानने खर्च करणे. याकामी अंदाजे दोन खेपेसाठी रु. ६.५० ते ७ लाखापर्यंत खर्च होईल.

२. मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉ.प्रा.लि. यांनी शुध्द तुप बदलून न दिल्यास, वर्तमानपत्रात ७ दिवसाच्या मुदतीची जाहिरात प्रसिध्दी देवून सदर २४० क्विंटल शुध्द तुपाची जाहीर लिलावाव्दारे उच्चतम दराने विक्री करावी लागेल व प्राप्त होणारी रक्कम संस्थान जमा करुन घ्यावी लागेल.

तरी वरील अ.नं.१ पर्यायाप्रमाणे मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि. हरिव्दार यांनी शुध्द तूप बदलून न दिलेस अ.नं. २ पर्यायाप्रमाणे शुध्द तूपाची विक्री करणेस मान्यता मिळणेसाठी सदर विषय चक्रीय पध्दतीने मा.तदर्थ समितीसमोर सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(श्रीमती गीता प्रवीण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानुदास पालवे)
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

(सुधाकर यार्लगड्डा)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

20

दि. ०६.०७.२०२१

विषय : संस्थानचे भांडार विभागाकडील गाईचे शुध्द तुपाचे साठयाबाबत . . .

सदरचा विषय वाचला तसेच त्या अनुषंगाने त्या खाली दिलेले संबंधित विभागाचे अभिप्राय देखील वाचले. त्या नुसार अ. क्र. १ प्रमाणे करणे उचित होईल. अथवा तसे न झाल्यास अ. क्र. २ प्रमाणे मुलभूत रक्कम ठरवून त्या वरिल येणाऱ्या उच्चतम दराप्रमाणे मंजूरी देण्यास हरकत नाही.

06/07/2021

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि. ०६.०७.२०२१

विषय क्र.- 2/७

भांडार विभाग

"मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर"

विषयः- संस्थानचे भांडार विभागाकडील गाईचे शुध्द तुपाचे साठ्याबाबत....

मान्यतेस्तव सविनय सादर,

कोव्हिड-१९ चे प्रादूर्भावामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात अचानक दि.१८/०३/२०२० ते १५/११/२०२० या कालावधीत लॉकडाऊन झालेमुळे लाडू निर्मिती व भांडार विभागाकडे शिल्लक असलेले १,०५०.१५ क्विंटल शुध्द तुप पुरवठाधारक हर्ष फ्रेश डेअरी प्रा.लि. हरिव्दार यांचेकडून ते शुध्द तुप परत घेणेस तयार नसलेमुळे त्यांचेकडून शुध्द तुप बदलून घेण्यात आलेले होते, त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

अ.नं.	बदलून घेतलेले तुप (क्विंटल)	बॅच नं. व उत्पादन दि.	दर (प्रति क्विंटल)	एकुण किंमत (रु./पै.)	मुदत संपण्याची तारीख
०१	३६०.००० (२,४०० डबे)	२५/ २२.१०.२०२०	२६,१००/-	९३,९६,०००-/	२१.०७.२०२१
०२	४७०.१०० (३,१३४ डबे)	२८/ २३.११.२०२०	२६,१००/-	१,२२,६९,६१०-/	२२.०८.२०२१
०३	२२०.०५० (१,४६७ डबे)	०२/ ०५.०१.२०२१	२६,१००/-	५७,४३,३०५-/	०४.१०.२०२१
एकूण-	१,०५०.१५० (७,००१ डबे)			२,७४,०८,९१५-/	

दि.१६/११/२०२० पासून महाराष्ट्रातील सर्व मंदिरे भक्तांसाठी खुली झाली होती. त्या तारखेपासूनच श्री साई मंदिर दर्शनासाठी साईभक्तांना खुले करण्यात आले होते. तथापि, लाडू व बुंदी प्रसाद, श्री सत्यनारायण पूजा चालू नसल्यामुळे दि.०४/१२/२०२० रोजी वरील शुद्ध तुपाचा वापर प्रसादालयाकडील शिरा प्रसादासाठी करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता, त्यास मान्यता मिळालेली होती, त्यानुसार प्रसादालयात शिरा प्रसादासाठी शुद्ध तुपाचा वापर चालू आहे.

शुद्ध तूप बदलून घेणेसाठी १ डबा वाहतूक खर्च+ प्रोसेसिंग चार्जस रु. १६१/- म्हणजेच १५ किलोचा एक डबा बदलून घेण्यासाठी साधारण रु. ३४३.९१ इतका खर्च आलेला आहे, म्हणजेच १ किलो तूप बदलुन घेणेसाठी साधारण रु.२२.९२ चे दरम्यान खर्च आलेला होता. याकामी वाहतूक खर्चासह वरील तुप बदलून घेणेकामी रु.२४,०७,७१६/- इतका एकूण खर्च आलेला होता.

श्रींच्या समाधी मंदिरातून दर्शन करुन येणा-या प्रत्येक साईभक्तास दि.०६.०३.२०२१ पासून शुध्द तुपातील एक बुंदीचा लाडू वाटप करणेत येत होता. तसेच २०.०३.२०२१ पासून साईभक्तांना लाडूप्रसाद विक्रीही चालू करण्यात आली होती.

संस्थानने शुध्द तूप बदलून घेतलेनंतर प्रसादालय, लाडू व मंदिर विभागाने शुध्द तूपाचा वापर केलेला आहे, त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

अ.नं.	विभागाचे नांव	वापरलेले तुप (क्विंटल)
०१	प्रसादालय	१०८.००
०२	लाडू निर्मिती	५९.२५
०३	मंदिर नैवेदय कोठी	१.९५
	एकुण वापर -	१६९.२०

वरीलप्रमाणे शुध्द तूपाचा बदलून घेतलेनंतर आतापर्यंत वापर झालेला आहे. दि.३१/०३/२०२१ पासून श्री साईभक्तांना दर्शनानंतर केले जाणारे लाडू वाटप व लाडू विक्री बंद करण्यात आलेली होती.

दरम्यान महाराष्ट्र शासनाने कोव्हीड १९ चे वाढते प्रादुर्भावामुळे दि.५ एप्रिलपासून सर्व धार्मिक स्थळे भक्तांना दर्शनासाठी बंद केली होती. त्यास अनुसरुन श्री साई मंदिरही साईभक्तांना दर्शनासाठी बंद करण्यात आले होते. ते अजुनही बंद आहेत. त्यामुळे संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती व श्री साई सत्यव्रत पुजाही बंद आहेत.

वरीलप्रमाणे लॉकडाऊन चालू झालेमुळे दि.१२/०४/२०२१ चे टिपणीअन्वये भांडार विभागाकडे शिल्लक असलेले शुध्द तुपाचे वापराबाबतची माहिती अवलोकनार्थ सादर करण्यात येवून त्याबाबत मार्गदर्शनासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर "सदयस्थितीत प्रसादालयाला त्यांचे मागणीप्रमाणे तुप उपलब्ध करुन दयावे" असे निर्देश झाले होते.

सदर निर्देशाची प्रत प्रसादालय विभाग व लाडू निर्मिती विभाग यांना देण्यात आली होती. प्रसादालय अधिक्षक यांचेशी याबाबत चर्चा केली असता, लाडू निर्मिती विभागाने त्यांचेकडे असलेले वापरलेले शुध्द तुप प्रसादालय विभागाला दिल्यामुळे तेथे त्या वापरलेल्या शुध्द तुपाचा वापर झालेला आहे. सध्या फक्त Hospital पेशंट, प्रसादालय स्टाफ व इतर मुकबधिर शाळा यांना जेवण चालू आहे, तसेच या दरम्यान कोव्हीड रुग्ण संख्याही कमी असल्यामुळे शि- यासाठी शुध्द तुपाचा वापरही अत्यंत कमी झाला आहे. शुद्ध तुपाचे दैनंदिन वापराची माहिती घेतली असता, सध्या प्रसादालयात दररोज सरासरी फक्त १५ किलो शुध्द तुप वापरले जात आहे.

सध्या शुध्द तूपाचा भांडार व लाडू निर्मीती विभाग यांचेकडे खालीलप्रमाणे साठा शिल्लक आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणेः-

अ.नं.	शिल्लक असलेले तुप (क्विंटल)	१५ कि.ग्रॅम डब्यांची संख्या	दर प्रती) (क्विंटल	एकुण किंमत (रु.पै.)	मुदत संपण्याची तारीख
०१	२३०.२५ - भांडार ९.०० लाडू विभाग (बॅच नं. २५/२२.१०.२०)	१,५३५ ६० १,५९५	२६,१००-/ २६,१००/-	६०,०९,५२५-/ २,३४,९००/- ६२,४४,४२५/-	२१.०७.२०२१
०२	४३१.८५ (बॅच नं. २८/२३.११.२०)	२,८७९	२६,१००-/	१,१२,७१,२८५-/	२२.०८.२०२१
०३	२२०.०५ (बॅच नं.२/ ०५.०१.२१)	१,४६७	२६,१००-/	५७,४३,३०५-/	०४.१०.२०२१
	८९१.४२०	५,९४१		२,३२,५९,०१५-/	

शासनाकडून मंदिरे भक्तांना दर्शनासाठी अजुनही बंद आहेत व शासनाचे मंदिरे खुली होण्यासाठी कधी आदेश होतील याबाबत निश्चितपणे काहीही सांगता येणार नाही.

वरील २३९.२५ क्विंटल शुध्द तुप मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्टस प्रा.लि. यांनी बदलून न दिल्यास, वर्तमानपत्रात ७ दिवसाच्या मुदतीची जाहिरात प्रसिध्दी देवून सदर शुध्द तुपाची जाहीर लिलावाव्दारे उच्चतम दराने विक्री करणेस व प्राप्त होणारी रक्कम संस्थान जमा करणेस मा. तदर्थ समितीची चक्रीय पद्धतीने दि. ०६.०७.२०२१ रोजी मान्यता मिळालेली होती. त्यास अनुसरुन मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्टस प्रा.लि. यांचेशी संपर्क साधला होता, परंतु त्यांचेकडून प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे वरील अ.नं.१ २३९.२५ क्विंटल शुध्द तूपाची ई-निविदा कम ई-लिलावाद्वारे विक्री करण्यासाठी उचित कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्यानुसार शुद्ध तुपाचे विक्रीसाठी ई-निविदा कम ई-लिलाव ऑनलाईन प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे वेबसाईटवर सुरु आहे.

वरील शुद्ध तूपाव्यतिरिक्त सध्या भांडार विभागामध्ये खालीलप्रमाणे शुद्ध तूप शिल्लक आहे.

अ.नं.	शिल्लक असलेले तुप (क्विंटल)	१५ कि.ग्रॅम डब्यांची संख्या	दर प्रती) (क्विंटल	एकुण किंमत (रु.पै.)	मुदत संपण्याची तारीख
०१	४३१.८५ (बॅच नं. २८/२३.११.२०)	२,८७९	२६,१००-/	१,१२,७१,२८५-/	२२.०८.२०२१
०२	२२०.०५ (बॅच नं.२/ ०५.०१.२१)	१,४६७	२६,१००-/	५७,४३,३०५-/	०४.१०.२०२१
	६५१.९००	४,३४६		१,७०,१४,५९०/-	

शासनाचे मंदिर सुरु होण्याचे आदेश झाले व लाडू विक्री आणि मोफत बुंदी प्रसाद पाकिटे वाटप जर लगेचच चालू झाले तर सदर शुध्द तूपाचा वापर होऊन सदर तूपाचा साठा काही प्रमाणात संपू शकतो. तथापि, धार्मिक स्थळे चालू होणे, बुंदी व लाडू प्रसाद वाटप सुरु होणे या सर्व बाबींबाबत सध्या तरी अनिश्चितता आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, आता वरील तक्त्यातील अ.नं. १ मधील बॅच नं. २८ चे ४३१.८५ क्विंटल शुद्ध तुपाची Expiry दि.२२.०८.२०२१ रोजी संपत आहे. त्यामुळे या ४३१.८५ क्विंटल (२,८७९ डबे) शुद्ध तुपाची ई-निविदा कम लिलाव अगर ई-लिलावाद्वारे विक्री करावी लागेल, असे मत आहे.

तरी भांडार विभागाकडे शिल्लक असलेले ४३१.८५ क्विंटल शुद्ध तुप संस्थानने खरेदी केलेल्या प्रती क्विंटल रु. २६,१००/- दर Base Price निश्चित करुन त्यापुढे उच्चतम दराने ई-निविदा कम ई-लिलाव अगर ई-लिलावाद्वारे विक्री करणेस मान्यता मिळणेसाठी सदर विषय चक्रीय पध्दतीने मा. तदर्थ समितीसमोर सादर.

12/07/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

प्रस्तावानुसार, मुदत संपण्यास १ महिन्यापेक्षा जास्त अवधी आहे त्यामुळे e-tender नुसार येणाऱ्या प्रतिसादात्मक वाट पहावी. अथवा मा. अध्यक्ष महोदय यांनी सूचित केलेप्रमाणे इतर काही उचित मार्गाचा अवलंब करावा.

(श्रीमती गीता प्रवीण.बनकर) 13/7/2021
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

e-tender नुसार येणाऱ्या प्रतिसादात्मक वाट पाहावी. अथवा मा. अध्यक्ष यांनी सूचित केल्याप्रमाणे इतर काही उचित मार्गाचा अवलंब करावा.

14/7/2021
(भानुदास पालवे)
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

12/07/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

Since expiry date is more than one month away, it would be beneficial to see the result/response to the e-tender of previous lot. Secondly, T.C. etc. may be contacted to [illegible]

(सुधाकर यालगड्डी)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

STO-METTING-255-2021

विषय क्र.- 2|८

24

खरेदी विभाग

"मा.तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर"

विषय:- संस्थानचे स्थायी कर्मचाऱ्यांना गणवेश भत्ता देणेबाबत...

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५.०२.२०१७ चे सभेत निर्णय क्रं. ७४ अन्वये संस्थान स्थायी कर्मचारी यांना सुटींग- शर्टींग व शिलाईसह गणवेश जोड देणेकामी रु. ५४,९७,५९६/- चे खर्चास मान्यता मिळाली होती.

तथापी सदर प्रस्ताव दि. १८.१२.२०१७ रोजी प्राप्त झाला होता.त्यावर दि. १४.०२.२०१८ रोजी खरेदी विभागाकडून प्रस्ताव सादर केला होता. तथापी सदर कापड खरेदी ई-निविदेसाठी येणा-या अडचणींबाबत मा. उप जिल्हाधिकारी महोदय यांचेशी दि.०५.०३.२०१८ रोजी झालेले चर्चेत नाशिक महानगरपालिकेकडून कापडाचे तांत्रिक स्पेसिफीकेशन घेण्याचे ठरले होते. त्यानुसार प्राप्त झालेले स्पेसिफीकेशन नुसार दि. १३.०३.२०१८ रोजी प्रथम ई-निविदा प्रस्ताव तयार केला होता. त्यास मान्यता मिळून दि. १२.०४.२०१८ ते दि.०३.०५.२०१८ या कालावधीत प्रथम ई-निविदा प्रक्रीया करण्यात आली होती. तथापी सदर निविदेतील न्युनतम निविदाकार मे. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे कापडाचे काही लॅब रिपोर्ट निविदेतील तांत्रिक स्पेसिफीकेशनशी न जुळल्यामुळे दि. ३०.०१.२०१९ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रं. ३७४ अन्वये गणवेश कापड खरेदीसाठी फेर ई-निविदा प्रक्रीया करण्याचा निर्णय झाला होता.

त्यानंतर कापडाचे तांत्रिक स्पेसिफीकेशन पुन्हा तपासून ई-निविदा प्रक्रीया करण्याचे निर्देश झाले होते. त्यानुसार स्पेसिफीकेशन Textile Committee Lab, Mumbai यांचेकडून तपासून पुन्हा दुस-यांदा दि.२५.११.२०१९ ते दि. १०.१२.२०१९ या कालावधीत फेर ई-निविदा प्रक्रीया करण्यात आली होती. यामध्ये १० items पैकी २ items चे दर चुकल्याचे मे. खादी ग्रामोद्योग समिती, नवी दिल्ली यांनी कळविल्यामुळे निर्णय क्रं. ११६ दि. २४.०२.२०२० नुसार पुन्हा २ items साठी तिस-यांदा दि. १९.०३.२०२० ते दि. ३१.०३.२०२० या कालावधीत फेर ई-निविदा प्रक्रीया करण्यात आली.

दुस-यांदा फेर ई-निविदा प्रक्रीयेमध्ये मे. आशा, नासिक यांचे दर १० items साठी तर मे. सोनल टेक्स, मुंबई यांचे १ item साठी न्युनतम होते. तर तिस-यांदा केलेल्या निविदाप्रक्रीयेमध्ये मे. श्रध्दा सुनिल गिते, अकोले यांचे दर २ items साठी न्युनतम होते.

सदर तीनही न्युनतम दरधारकांकडून ते न्युनतम असणा-या कापडांचे नमुने घेण्यात आले होते. सदर कापडांच्या नमुन्यांपैकी मे. आशा, नासिक व मे.सोनल टेक्स, नासिक यांचे नमुने दि.०८.१०.२०२० रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात सादर केले होते. त्यावेळी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा. मुख्यलेखाधिकारी, प्र. अधीक्षक, सामान्यप्रशासन, प्र. अधीक्षक, खरेदी हे उपस्थित होते. सदर बैठकीत मे. आशा, नासिक यांनी सादर केलेले गणवेश कापडाचे नमुने संबंधित विभागांचे प्रतिनिधींना दाखवून अंतिम करण्याचे ठरले होते. परंतु सदर बैठकीत गणवेश कापडाचे दर्जाबाबत चर्चा होऊन नमुना दाखल केलेले कापड हे हलक्या दर्जाचे असलेमुळे ते खरेदी करणे उचित होणार नाही. तसेच हे कापड खरेदी करुन गणवेश शिवल्यास कापड चांगले दर्जाचे नसलेमुळे कापड व शिलाई दोन्ही खर्च वाया जाईल अशी परिस्थिती असलेमुळे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी संस्थान कर्मचा-यांना जे गणवेश द्यावयाचे आहेत. ते चांगल्या दर्जाचे असावेत असे निर्देशित करुन रेमंड सारख्या कंपनीचे कापडाचे गणवेश देणेबाबत सूचना केल्या होत्या.

वरील सुचनेस अनुसरुन रेमंड कंपनीशी संपर्क साधला असता त्यांनी नासिक येथील अधिकृत विक्रेते मे. चंपालाल & कंपनी, यांचे प्रो.प्रा. श्री.निलेश जाजू यांना शिर्डी येथे पाठविले होते. त्यांनी कापडाचे नमुने सादर केले होते. त्यानुसार खर्चाचा अंदाज येण्यासाठी त्यांना Estimate देण्यास सांगितले होते. त्यांनी १३९३ कर्मचा-यांना गणवेश कापड व शिलाईसह रक्कम रु. ४३,२४,९७७/- चे Estimate सादर केले होते. त्यानंतर रेमंड कंपनीने त्यांचे ठाणे येथील अधिकृत विक्रेते मे. कुबेर एंटरप्रायजेस, यांचे प्रो.प्रा. श्री.संजय शिंदे यांना शिर्डी येथे पाठविले होते. त्यांनी ही कापडाचे नमुने सादर केले होते. त्यामुळे मे. कुबेर एंटरप्रायजेस, ठाणे यांनाही खर्चाचा अंदाज येण्यासाठी Estimate देण्यास सांगितले होते.

मे. कुबेर एंटरप्रायजेस, ठाणे यांनी रक्कम रु. ६६,२७,४३४/- चे प्रथम Estimate सादर केले होते. तथापी ते जरा जास्त वाटत असल्यामुळे पुन्हा सुधारित Estimate देण्यास कळविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी दि.०३.०६.२०२१ रोजी सुधारित केलेले रक्कम रु. ५९,८५,८४९/- इतक्या रकमेचे Estimate सादर केले आहे. तथापी संस्थानला एखाद्या विक्रेत्याकडून थेट कापड खरेदी व शिलाईचे काम करुन घेता येणार नाही. तसेच वरील नमूद केलेप्रमाणे ३ वेळेस निविदा प्रक्रीया करुन ही समाधानकारक गणवेश कापड उपलब्ध होत नाही ही वस्तुस्थिती आहे. तसेच गणवेश शिलाई करुन घेणेचा मागील अनुभव विचारात घेता ते ही समाधानकारक होत नाही. त्यामुळे कर्मचा-यांना वर्ग वाईज गणवेशाचा ड्रेस कोड निश्चित करुन तसेच कापडाचा दर्जा ठरवून देऊन गणवेश जोड खरेदीकामी गणवेश भत्ता देण्याचे

वरील चर्चेत ठरले आहे. सदर गणवेश दर्जा व गणवेश वर्ग निहाय ड्रेस कोड ठरवून दिल्यामुळे त्या दर्जाप्रमाणे कर्मचारी त्यांचे पसंतीप्रमाणे बाजारातुन कापड खरेदी करून वर्गनिहाय ड्रेस कोड प्रमाणे गणवेश कोणाकडून ही शिवून घेतील. संस्थानने ठरवून दिल्याप्रमाणे कर्मचा-यांनी खरेदी करावयाच्या कापडाचा दर्जा व ड्रेस कोड यानुसार खरेदी करणे कर्मचा-यांवर बंधनकारक राहील. कमी दर्जाचे व ड्रेस कोड प्रमाणे नसलेला गणवेश ग्राह्य धरला जाणार नाही. त्यामुळे गणवेशांचा दर्जा व शिलाईही उत्तम होईल. तसेच कापड चांगले दर्जाचे घेतलेमुळे त्याचे life वाढेल. मागील गणवेश खरेदी व गणवेश शिलाईचा अनुभव विचारात घेता गणवेश भत्ता देण्याची बाब प्रायोगिक तत्त्वावर करणे उचित होईल असे वाटते.

ज्या संस्थान कर्मचा-यांना ड्रेस द्यावयाचे आहेत त्यांचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे:-

अ.नं	अधिकारी कर्मचारी तपशील	संख्या	ड्रेस कोड
१	उप कार्यकारी अभियंता, विद्युत विद्युत पर्यवेक्षक, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक अभियंता, कृषी अधिकारी, प्र. लेखाधिकारी, अधीक्षक, प्र.अधीक्षक, वरीष्ठ लिपीक- वरिष्ठ लेखापाल, साईलीला सहाय्यक संपादक, तांत्रिक सहाय्यक, कनिष्ठ अभियंता, उप अभियंता	५१	फुल शर्ट व पॅन्ट
२	लिपीक टंकलेखक	१७१	फुल शर्ट व पॅन्ट
३	सुरक्षा निरीक्षक व पहारेकरी	१३७	रेग्युलर खाकी सुरक्षा ड्रेस
४	सफाई कर्मचारी	१३३	हाफ सफारी
५	तांत्रीक कर्मचारी व नवीन आलेले फायर सेप्टी कर्मचारी	१३७	फुल शर्ट व पॅन्ट
६	फायर सेप्टी विभागातील कर्मचारी	२३	फुल शर्ट व पॅन्ट
७	मदतनीस/शिपाई	६५१	हाफ सफारी
८	वॉर्डबॉय / मदतनीस	८९	हाफ सफारी
९	प्र. फायर सेफ्टी ऑफीसर	१	शर्ट व पॅन्ट
	एकूण कर्मचारी संख्या	१३९३	

महाराष्ट्र शासनाचे महसूल व वन विभागाने शासन निर्णय क्रमांक एफएसटी-०९/१६/प्र.क्र./४१५/फ-४ दि. ०३.११.२०१६ अन्वये वन विभागातील कर्मचा-यांना गणवेश व त्यासोबतच्या २५ बाबींसाठी वार्षिक रु. ५,१६७/- प्रमाणे गणवेश भत्ता व अनुशंगिक साहित्य खरेदीसाठी देण्यासाठी शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच गृह विभागाकडील एमव्हीडी-०४१६/प्र.क्र.१८७/परि-४ दि. २७.०८.२०१८ अन्वये मोटार वाहन विभागातील सहायक मोटार वाहन निरीक्षक/मोटार वाहन निरीक्षक/सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांना गणवेश भत्त्यांसाठी रुपये ५,०००/- देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सर्वसाधारण शर्ट व पॅण्ट म्हणजेच १ ड्रेस शिलाईसाठी बाजारात अंदाजे रु.८०० ते ९००/- चे दरम्यान शिलाईचा भाव चालू आहे. त्याप्रमाणे २ ड्रेससाठी अंदाजे रु.१६०० ते १८००/- शिलाई व सध्या कापडाचे बाजारभाव रु. ३,००० ते ३,२००/- मध्ये ०२ ड्रेस साठी कापड अशी मिळून रक्कम रु. ५,०००/- संस्थान कर्मचा-यांना आदा करणेबाबतही वरील चर्चेत ठरले आहे.

वरील शासन निर्णयांच्या धर्तीवर संस्थानकडून संस्थानच्या कर्मचा-यांना चांगले दोन गणवेश उपलब्ध होणेसाठी प्रती अधिकारी/ कर्मचारी रुपये ५,०००/- गणवेश भत्ता म्हणून प्रायोगिक तत्वावर आदा करावी. यासाठी संस्थानच्या खरेदी समितीकडून कापडाचे वरील ड्रेस कोड ठरवून देता येतील व त्याप्रमाणे कापड संस्थानच्या कर्मचा-यांना खरेदी करणेबाबत व संस्थानकडून दिलेले ड्रेसकोड प्रमाणे शिवून घेणेस सुचित करता येईल.

तसेच कापड खरेदीचे दुस-या निविदेतील Specification प्रमाणे मे. आशा, नासिक आणि मे. सोनल टेक्स, मुंबई आणि तिस-या निविदेतील मे. श्रध्दा सुनिल गिते, अकोला यांनी दिलेले कापडाचे नमुने प्रथम दर्शनी समाधानकारक वाटत नसल्यामुळे त्यांना दिलेले इरादापत्र रद्द करावे लागेल. त्यांचे कापडाचे नमुने त्यांना परत करुन, सदर दोन्ही ही ई-निविदा प्रक्रीया रद्द करुन त्यांची सुरक्षा अनामत रक्कम परत करावी लागेल. तसेच पेटीकोट कापडासाठी पुन्हा दरपत्रके मागविता येतील.

गणवेश भत्ता कर्मचा-यांना देणे ही बाब सामान्यप्रशासन विभागाशी संबंधित असल्याने वरील १३९३ कर्मचा-यांना द्यावयाचे गणवेश भत्त्याची रक्कम अदा करणेची उचित कार्यवाही सामान्य प्रशासन विभागामार्फत करता येईल , गणवेश भत्ता अदा केल्यानंतर ६० ते ९० दिवसांत गणवेश शिवून घेण्याचे बंधन कर्मचा-यांवर ठेवता येईल. कर्मचा-यांनी ड्रेस शिवून घेतले की नाही? याबाबतची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखांवर सोपविता येईल. ज्याविभागातील कर्मचा-यांचे ड्रेस शिवून होतील त्याबाबत विभाग

प्रमुखांनी खात्री करुन सामान्य प्रशासन विभागाकडे याबाबतचा पूर्तता अहवाल सादर करणेस कळविता येईल. तसेच सामान्य प्रशासन विभागामार्फत या बाबीवर वेळोवेळी पाठ पुरावा करुन नियंत्रण ठेवता येईल.

वरील प्रमाणे १३९३ कर्मचा-यांना गणवेश जोडसाठी गणवेश भत्ता म्हणून रक्कम रु. ५,०००/- प्रमाणे एकूण रु.६९,६५,०००/- (अक्षरी रु. एकोणसत्तर लाख पासष्ट हजार मात्र) खर्च येणार आहे. सदर रक्कम ही रु. पन्नास लाखांपेक्षा जास्त असल्यामुळे मा. तदर्थ समितीची मान्यता मिळाल्यास याकामी मा. उच्च न्यायालयाची ही मान्यता घ्यावी लागेल असे वाटते.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता,

१. संस्थान कायम कर्मचा-यांना वरील महसूल व वन विभागाचे शासन निर्णय क्रमांक एफएसटी-०९/१६/प्र.क्र./४१५/फ-४ दि. ०३.११.२०१६ आणि गृह विभागाकडील एमव्हीडी-०४१६/प्र.क्र.१८७/परि-४ दि. २७.०८.२०१८ अन्वये शासन निर्णयाच्या धर्तीवर दोन गणवेश जोडसाठी प्रायोगिक तत्त्वावर गणवेश भत्ता म्हणून प्रत्येक अधिकारी/ कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभागामार्फत कार्यालयीन उचित पूर्तता करुन प्रती कर्मचारी रक्कम रु. ५,०००/- पगारात आदा करणेस व याकामी गणवेश भत्त्यासाठी एकूण येणारे रक्कम रुपये ६९,६५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस
२. संस्थान कर्मचा-यांना गणवेश खरेदीसाठी कापडाचे नमुने व ड्रेस कोड खरेदी समितीकडून निश्चित करुन देणेस
३. मे. आशा, नासिक आणि मे. सोनल टेक्स, मुंबई आणि मे. श्रध्दा सुनिल गिते, अकोला यांना दिलेले इरादापत्र व दोन्ही ही ई-निविदा प्रक्रीया रद्द करुन त्यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम परत करणेस
४. पेटीकोट कापडासाठी पुन्हा दरपत्रके मागविणेस
५. सदर खर्चाचे मान्यता मिळणेकामी मा. उच्च न्यायालयाची परवानगी घेणेसाठी विधी विभागामार्फत **Civil Application** दाखल करणेकामी उचित कार्यवाही करणेस

तरी वरील अ.नं. १ ते ५ प्रमाणे प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सदरचा विषय चक्रीय पध्दतीने मा. तदर्थ समितीसमोर सादर.

5/7/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

वरील विषयाची व्यापकता साहना नियमित बैठकीत ठेवावे

(श्रीमती गीता प्रवीण बनकर) 06/07/2021
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

विषयाची व्यापकता लक्षात घेऊन सदर विषय नियमित बैठकीमध्ये ठेवण्यात यावा

(भानुदास पालवे) 14/7/2021
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

5/7/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

Needs discussion in meeting. Hence we will discuss it in next week on later on.

(सुधाकर यार्लगड्डा) 6/7/2021
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अहमदनगर,
अध्यक्ष, तदर्थ समिती

विषय क्र.- 2/e

मा. तद्‌र्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर
(कामगार विभाग)

विषय- श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के,सेवानिवृत्त जनसंपर्क अधिकारी, यांना रुपये १७,५०,०००/-रक्कम आदा करणेस चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत...

टिपणी.

श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के हे दि.२१-०४-१९९२ पासून ते दि.२०-०४-१९९४ अखेर पर्यंत या परिविक्षाधिन कालावधीत जनसंपर्क अधिकारी म्हणून संस्थान सेवेत कार्यरत होते.तथापी मुळ व वाढीव परिविक्षाधीन कालावधीमध्ये श्री.म्हस्के यांचे काम समाधानकारक आढळुन न आल्यामुळे **दि.२०-०४-१९९४** रोजी त्यांची सेवा संपुष्टात आणण्यात आली.सदर सेवा समाप्ती संदर्भात श्री.म्हस्के यांनी मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे संस्थान विरुध्द **तक्रार (यु.एल.पी.) क्र.४१/१९९४** हि कोर्ट केस दाखल केली होती. त्यामध्ये मा.कामगार न्यायालयाने श्री.म्हस्के यांना सलग सेवा धरुन, मागील काळातील बॅक वेजेस सेवा समाप्ती तारखेपासून देवुन (माहे जुलै-१९९६ ते माहे नोंव्हेंबर २००२ हा कालावधी वगळून) पुर्ववत कामावर हजर करुन घ्यावे असा **आदेश दि.०५-०१-२००६** रोजी श्री.म्हस्के यांचे बाजूने दिला होता.

मा.कामगार न्यायालयाचा दि.०५-०१-२००६ रोजीचा आदेश बेकायदेशीर ठरवून, रद्द होवून मिळावा याकरीता संस्थानने श्री.म्हस्के यांचे विरुध्द मा.औदयोगीक न्यायालय, अहमदनगर येथे **रिव्हिजन (युएलपी) क्र.११/२००६** व श्री.म्हस्के यांनी माहे जुलै ९६ ते माहे नोंव्हेंबर २००२ या कालावधीतील बॅक वेजेससह कामावर रुजू करुन घ्यावे या मागणीसाठी संस्थान विरुध्द **रिव्हिजन (युएलपी) क्रं.१९/२००६** दाखल केले होते.सदर दोन्हीही रिव्हिजन संदर्भात मा.औदयोगीक न्यायालय, अहमदनगर यांनी **दि.०३-०७-२००८** रोजी श्री.म्हस्के यांना पुर्ववत कामावर न घेता, व बॅक वेजेस न देता **नुकसान भरपाई पोटी रु.७०,०००/- आदा** करणेत यावे.असा आदेश देवून रिव्हिजन (युएलपी) क्रं.११/२००६ पार्टली अलाऊड केले व रिव्हीजन (युएलपी) क्रं.१९/२००६ डिसमिस करुन निकाली काढले.**सदर आदेशास अनुसरुन श्री.म्हस्के यांना रु.७०,०००/- दि.२४-०७-२००८ रोजीचे डिमांड ड्राफ्ट अन्वये अदा करणेत आले.**

त्यानंतर श्री.म्हस्के यांनी मा.औदयोगीक न्यायालय, अहमदनगर यांचे **दि.०३-०७-२००८** रोजीचे आदेशा संदर्भात संस्थान विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्रं.५६२०/२००८ दाखल केले.त्यामध्ये मा.सिंगल जज्ज, उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी **दि.१५-०१-२०१०** रोजी आदेश करुन सदर रिट पिटीशन ॲडमीट करुन, मा.औदयोगीक न्यायालयाचे दि.०३-०७-२००८ रोजीचे आदेशास स्थगिती (स्टे) दिला होता.सदर दि.१५-०१-२०१० रोजीचा आदेश रद्द होवून मिळावा म्हणून संस्थानने श्री.म्हस्के यांचे विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथील डिव्हिजनल बेंच समोर **लेटर्स पेटंन्ट अपिल क्रं.५९/२०१० दाखल केले होते** त्यामध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी **दि.०८-०८-२०११ रोजी "रेसपॉन्डन्ट** श्री.म्हस्के यांनी दि.०५-०९-२०११ पासून पुर्ववत डयुटीवर हजर व्हावे.त्यांना कायदयाप्रमाणे प्रत्येक महिन्यास वेतन देण्यात यावे.कामगार न्यायालयाने दिलेल्या बॅक वेजेसला स्थगिती देण्यात आली" असा आदेश दिला आहे.

सदर आदेशास अनुसरुन श्री.म्हस्के हे दि.०५-०९-२०११ पासून संस्थानचे प्रकाशने विभागात जनसंपर्क अधिकारी म्हणून पुर्ववत सेवेत रुजू झाले आहे.तथापी श्री.म्हस्के हे दि. ०५-१०-२०११ पासून कामावरुन गैरहजर आहे.दरम्यानचे काळात श्री.म्हस्के यांचे प्रकरणां संदर्भात मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०९-२०११ रोजीचे सभेमध्ये चर्चा होवून **"मा.औरंगाबाद खंडपीठाने लेटर्स पेटंन्ट अपील क्रं.५९/२०१० मध्ये दि.०८-०८-२०११ रोजी केलेला आदेश हा अंतरिम आदेश आहे.श्री.म्हस्के यांचे संबधीत मुळ रिट पिटीशन न्याय प्रविष्ठ असून, प्रलंबीत आहे.त्यात श्री.म्हस्के यांनी दि.२०-०४-१९९४ पासून जनसंपर्क अधिकारी पदावर सलग सेवा धरुन, त्यानुसार सर्व आर्थीक लाभ मिळावेत अशी मागणी केलेली आहे.ही बाब विचारात घेवुन,श्री.म्हस्के यांनी त्यांची पुढील उर्वरित संस्थान सेवा सोडुन दयावी व चालु असलेल्या कोर्ट केसेस विना अट मागे घ्याव्यात या अटीवर तडजोडीने त्यांना रु.१७,५०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख पन्नास हजार) मात्र देण्यात यावेत.**

(पा.नं.२ वर..)

मात्र कोर्ट केस काढून घेतल्यानंतर व उर्वरित संस्थान सेवा सोडण्याबाबतचा तडजोडनामा मंजुर झाल्यानंतर त्यांना रक्कम आदा करावी."असा आयत्या वेळेचा निर्णय क्रं.७६०(०९) संमत झालेला आहे.

सदर निर्णयास अनुसरुन श्री ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांना इकडील जा.नं.एसएसएस /वशी-७ए/५११५/२०११ दिनांक १२/०१/२०१२ रोजीचे पत्रान्वये मा.उच्च न्यायालय,खंडपीठ , औरंगाबाद येथे चालु असलेल्या कोर्ट केसेस विना अट काढुन (विड्रान करुन) घेणेबाबत तडजोड नामा करुन देणेबाबत लेखी कळविणेत आलेले होते.

त्यास अनुसरुन श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांनी जनसंपर्क अधिकारी या पदाचा राजीनामा मंजुर करणेबाबत दि.२८-०३-२०१२ रोजीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "मा.व्यवस्थापन मंडळ, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांच्या बरोबर तडजोड होवून, दि.२४-०९-२०११ च्या व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय क्रं.१८ व निर्णय क्रं.७६० नुसार हायकोर्टातील प्रलंबीत मुळ दावा काढुन घ्यायचा व संस्थान सेवा सोडून दयायची.या अटीवर रु.१७,५०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख पन्नास हजार) देण्याचा निर्णय विश्वस्तमंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मंजूर झाला.या निर्णयाला अधिन राहून मी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाकडे प्रलंबित असलेली याचीका क्रं.५६२०/२००८ काढुन घेण्यासाठी केलेल्या अर्जावर सुनावणी होवुन हा अर्ज मा.न्यायमुर्ती चंदीवालसाहेब यांच्या खंडपीठाने २९ फेब्रुवारी २०१२ मध्ये मंजुर केला आहे.सोबत त्याची प्रत जोडली आहे तसेच याच अर्जाद्वारे आपणाला कळवु इच्छितो की, जनसंपर्क अधिकारी या पदाचा मी राजीनामा देत असून तो तात्काळ मंजुर करावा ही विनंती.

संस्थानचे जा.क्रं.एसएसएस/वशी-७ए/५११५/२०१२ दि.१२ जानेवारी २०१२ च्या पत्रान्वये मी सर्व अटीची पुर्तता केलेली आहे.माहे सप्टेंबर २०११ या महिन्याचे देय वेतन व तडजोडीपोटी मंजुर केलेली रक्कम रु.१७,५०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख पन्नास हजार) कुठलीही कपात न करता तात्काळ मिळावी "असे म्हटलेले आहे.

तथापि, श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांनी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे दि.१२.०१.२०१२ पासुन ते दि.२३.०६.२०१९ अखेर पर्यंत रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर तडजोड नामा (अंडरटेकिंग) करुन दिलेला नाही.त्यामुळे त्यांना रु.१७,५०,०००/- रक्कम अदा करणेत आलेली नाही.

त्यानंतर श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांनी दि.१५-०९-२०१२ रोजीचा विनंती अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " श्री साईबाबा संस्थानने घातलेल्या सर्व अटींची पुर्तता केलेली आहे. राजीनामा पत्र पाठवून साडेपाच महिने उलटून गेले तरी मला संस्थानकडून अद्यापही रक्कम मिळालेली नाही. यासंदर्भात मी अनेकदा मा.कार्यकारी अधिकारी यांना समक्ष भेटून मागणी केलेली आहे. माझी आर्थीक स्थिती चांगली नसल्याने मला पैशाची अत्यंत गरज आहे. तरी माझे देय्य पैसे त्वरीत देणेत यावे " असे म्हटलेले आहे.

श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के, जनसंपर्क अधिकारी, प्रकाशने विभाग यांनी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०९-२०११ रोजीचे सभेमध्ये झालेल्या तडजोडीस अनुसरुन मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ व प्रलंबीत असलेले रिट पिटीशन क्रं.५६२०/२००८ हि कोर्ट केस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे पुरसीस दाखल करुन, सदर कोर्ट केस काढुन (विड्रॉन) करुन घेतली आहे. तसा मा.जस्टीज श्री.के.यु.चंदीवाल साो.यांनी दि.२९ फेब्रुवारी २०१२ रोजी रिट पिटीशन क्रं.५६२०/२००८ संदर्भात "१) Heard.On instructions,the petitioner withdrawn the petition.A pursis for withdrawal of petition is filed, same is taken on record. २) Writ Petition is disposed of as withdrawn Rule discharged.No Costs."**असा आदेश करुन सदर रिट पिटीशन ५६२०/२००८ निकाली काढले आहे. तसे संस्थान हायकोर्ट ॲडव्होकेट, श्री.आर.एन.धोर्डे, औरंगाबाद यांनी दि.०१-०३-२०१२ रोजीचे पत्रान्वये संस्थानला लेखी कळविलेले आहे.** व मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील रिटपिटीशन क्र.५६२०/२००८ संदर्भातील दि.२९-०२-२०१२ रोजीचे आदेशाची प्रत देखील संस्थानला प्राप्त झालेली आहे.

(पा.नं.३ वर..)

तथापी श्री.ताराचंद म्हस्के यांनी स्वंतत्रपणे विनाअट राजीनामा अर्ज, तडजोडीमध्ये ठरल्या प्रमाणे उर्वरित संस्थान सेवा सोडण्याबाबतचा तडजोडनामा (अंडरटेकींग) रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करुन दिलेला नाही.

त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०९-२०११ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्रं.७६०(०९) व श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांचे दि.२८ मार्च २०१२ रोजीचे अर्जास अनुसरुन, तडजोडीत ठरले प्रमाणे श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के,जनसंपर्क अधिकारी, प्रकाशने विभाग यांनी संस्थान सेवा सोडणे कामी स्वतंत्र राजीनामा अर्ज व तडजोडीत ठरलेप्रमाणे रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर उर्वरित संस्थान सेवा सोडून दिलेबाबतचा तडजोडनामा (अंडरटेकींग) इत्यादी कागदपत्रांची पुर्तता करुन दिलेनंतर तडजोडीत ठरलेप्रमाणे त्यांना एकुण रक्कम रु.१७,५०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख पन्नास हजार) मात्र संस्थानचे लेखाशाखेमार्फत चेक (धनादेश) द्वारे आदा करणे संदर्भात निर्णय होणे कामी मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.०८.१०.२०१२ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८.१०.२०१२ निर्णय क्रं.८४५ अन्वये,"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांचे संदर्भात, उपरोक्त प्रकरणी, संस्थान कामगार कायदे सल्लागार ॲड.अशोकराव पाटील यांनी मा.अध्यक्ष महोदय यांचेबरोबर चर्चा करावी व चर्चेत ठरेल त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी," असे ठरले. असा निर्णय पारीत झालेला आहे.

उपरोक्त ठरावास अनुसरुन संस्थान कामगार कायदे सल्लागार ॲड.अशोकराव पाटील यांनी मा.अध्यक्ष महोदय यांचेबरोबर चर्चा करणेकामी व चर्चेत ठरेल त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३८८०/२०१२ दि.२७.११.२०१२ रोजीचे पत्र देण्यात येवुन, श्री.म्हस्के यांचेशी तडजोडीत ठरलेप्रमाणे रुपये १७,५०,०००/- अदा करणे संदर्भात मा.अध्यक्ष महोदय यांचेशी चर्चेत ठरल्याप्रमाणे त्यांचा लेखी अभिप्राय मिळणेकरीता पत्र देण्यात आले होते. त्याचप्रमाणे ॲडव्होकेट श्री.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी तत्कालीन मा.अध्यक्ष महोदय यांचेशी चर्चा केली होती.तथापी, त्याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. अथवा ॲडव्होकेट श्री.अशोक पाटील, अहमदनगर यांनी लेखी अभिप्राय दिलेला नाही.

श्री.ताराचंद म्हस्के यांनी दि.२३.०५.२०१९ रोजीचे अर्जान्वये वेतनापोटी तडजोडीने मंजूर झालेली देय रक्कम व्याजासह मिळणेबाबत व दि.२८.०३.२०१२ ते आज अखेर पर्यंत राष्ट्रीयकृत बँकेच्या सध्या सुरु असलेल्या प्रचलित व्याज दरानुसार वेतनापोटी तडजोडीने मंजूर असलेली देय रक्कम तातडीने देण्यात यावी ही विनंती.माझी अर्थिक स्थिती चांगली नसल्याने मला पैशांची अत्यंत गरज आहे.असे म्हटलेले आहे.

त्यानंतर , श्री.म्हस्के यांनी दि.२४.०६.२०१९ रोजीचा तडजोडनामा रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटरी करुन दिलेला आहे. त्यात त्यांनी, "मी, ताराचंद विठठलराव म्हस्के, जनसंपर्क अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी या संस्थेमध्ये दि.२१-०४-१९९२ पासुन नोकरीस होतो. व्यवस्थापनाने दि.२०-०४-१९९४ रोजी पासुन माझी सेवा संपुष्ठात आणली होती. म्हणुन मी मा.कामगार न्यायालय अहमदनगर येथे संस्थान विरुध्द तक्रार (यु.एल.पी) क्र.४१/१९९४ ही कार्ट केस दाखल केली होती. त्यातील मा.कामगार न्यायालय,अहमदनगर यांनी दि.०५-०१-२००६ रोजीचे आदेशा संदर्भात मा.औद्योगिक न्यायालय ,अहमदनगर येथे संस्थानचे वतीने माझ्या विरुध्द रिव्हीजन (यु.एल.पी) क्र.११/२००६ व मी संस्थान विरुध्द रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.१९/२००६ दाखल केले होते.सदर दोन्हीही रिव्हीजन मा.औद्योगिक न्यायालय,अहमदनगर यांनी दि.०३-०७-२००८ रोजी दिलेल्या आदेशा संदर्भात मी संस्थान विरुध्द मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.५६२०/२००८ दाखल केले आहे. त्यातील सिंगल बेंच यांचे दि.१५-०१-२०१० रोजीचे अंतरिम आदेशा संदर्भात संस्थाने माझे विरुध्द मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे लेटर्स पेटंन्ट अपील क्र.५९/२०१० दाखल केले होते. त्यातील मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.०८/-०८-२०११ रोजीचे आदेशास अनुसरुन संस्थाने मला दि.०५-०९-२०११ पासुन पुन्हा पुर्ववत 'जनसंपर्क अधिकारी' (पी.आर.ओ) म्हणुन सेवेत हजर/रुजू करुन घेतले आहे. व सध्या मी संस्थान विरुध्द दाखल केलेले रिट पिटीशन क्र.५६२०/२००८ ही कोर्ट केस मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ / प्रलंबीत होती.

(पा.नं.४ वर..)

सदरच्या रिट पिटीशन क्र.५६२०/२००८ हया कोर्ट केस वादाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०९-२०११ रोजीचे सभेमध्ये उभयपक्षात चर्चा होऊन त्यामध्ये 'मी माझी पुढील उर्वरीत संस्थान सेवा सोडून द्यावी. व चालु असलेल्या कोर्ट केसेस विना अट मागे घ्याव्यात या अटीवर तडजोडीने मला रुपये १७,५०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख पन्नास हजार) मात्र देणेत यावेत. तसेच कोर्ट केस काढुन घेतलेनंतर व उर्वरीत संस्थान सेवा सोडणेबाबतचा तडजोडनामा मंजूर झाल्यानंतर मला सदर रक्कम अदा करावी .' अशी तडजोड झालेली आहे.

उपरोक्त तडजोडीच्या सर्व अटी व शर्ती मी समजून घेतलेल्या आहेत. व त्या मला मान्य असुन, त्यांच्या सत्यतेसाठी मी आज रोजी शिर्डी येथे या तडजोडनामा पत्राखाली सही केली आहे. त्या तडजोडीतील अटी व शर्ती संदर्भात व वरील रिट पिटीशनमधील असलेल्या वादाविषयी मी येथुन पुढे कोणतेही मागणी अथवा तक्रार संस्थानकडे करणार नाही. तसेच तडजोडीत ठरलेप्रमाणे मी माझी यापुढील संस्थान सेवा / नोकरी सोडून दिली असुन मा. उच्च न्यायालय , खंडपीठ., औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ / प्रलंबीत असलेले रिट पिटीशन क्र.५६२०/२००८ ही कोर्ट केस दि.२९-०२-२०१२ रोजी मा.उच्च न्यायालय ,खंडपीठ औरंगाबाद येथुन विनाअट काढुन घेतली (विड्रॉन केली) आहे. यापुढील काळात मी पुन्हा मी उर्वरीत संस्थानमधील सेवेचा /नोकरीचा हक्क सांगणार नाही याची मी आज रोजी संस्थानला हमी देत आहेत. जर माझेकडून याबाबत काही वाद/ प्रश्न उपस्थित झाल्यास अथवा तडजोडनाम्यातील अटी व शर्तीचा भंग झाल्यास, संस्थान माझे विरुध्द जी कायदेशीर कारवाई करील ती मला मान्य राहील. त्याचप्रमाणे यापुढे उपरोक्त कोर्ट केस मधील वादा संदर्भात व मागील कालावधीतील तसेच या पुढील उर्वरीत सोडून दिलेल्या सेवेसंदर्भात मी कोणत्याही न्यायालय पुन्हा वाद उपस्थित करणार नाही. व संस्थानला कोणत्याही प्रकारची आर्थिक व इतर तोषीस/ झळ लागु देणार नाही याची मी संस्थानला हमी देतो.

'उपरोक्त तडजोडनामा पत्र' मी आज दि.२४/०६/२०१९ रोजी मौजे-शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना राजीखुशीने व स्वखुशने लिहुन दिलेले असुन त्यादाखल मी याखाली स्वाक्षरी केली आहे."असे म्हटलेले आहे.

आता, श्री.ताराचंद म्हस्के यांनी दि.२३.०८.२०१९ रोजीचे अर्जात कळविले आहे की, मुलीचे लग्न आणि मुलाचे उच्च शिक्षण याकामी मला पैशाची अत्यंत गरज आहे. कृपया माझे नावे मंजुर असलेली रक्कम व्याजासह १५ दिवसात देण्याची व्यवस्था करावी ही विनंती.

श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के,जनसंपर्क अधिकारी, प्रकाशने विभाग यांनी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०९.२०११ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्रं.७६० (०९) यास अनुसरुन श्री.ताराचंद म्हस्के यांनी त्यांची चालु असलेली कोर्ट केस मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथुन दि.२९.०२.२०१२ रोजी काढुन (विड्रान करुन) घेतली आहे तसे त्यांनी दि.२८.०३.२०१२ रोजीचे अर्जान्वये कळविले आहे.सदर अर्जात त्यांनी जनसंपर्क अधिकारी या पदाचा मी राजीनामा देत असुन तो तात्काळ मंजुर करावा असे नमुद केले आहे.

तथापी, मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णया प्रमाणे व दि.१२.०१.२०१२ रोजीचे पत्रान्वये कळविलेप्रमाणे श्री.ताराचंद म्हस्के यांनी तडजोडीमध्ये ठरल्याप्रमाणे उर्वरित संस्थान सेवा सोडल्याबाबतचा तडजोड नामा (अंडर टेंकिग) रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दिनांक २३.०६.२०१९ पर्यंत करुन दिलेला नाही. त्यामुळे त्यांना दि.२३.०६.२०१९ अखेर पर्यंत रु.१७,५०,०००/- रक्कम आदा करणेत आलेली नाही. म्हणुन श्री.म्हस्के यांना दि.२८.०३.२०१२ पासुन ते आतापर्यंत सदर रक्कमेवर व्याज़ मागणेचा अधिकार नाही. श्री.ताराचंद म्हस्के हे संस्थान सेवेतुन विहीत वयोमानानुसार दि.३१.०५.२०१९ रोजी सेवा निवृत्त झालेले आहे.तसे त्यांना संस्थान तर्फे लेखी पत्रान्वये कळविणेत आलेले आहे. **आता श्री.म्हस्के यांनी दि.२४.०६.२०१९ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत झालेल्या निर्णयाप्रमाणे तडजोड नामा (अंडर टेंकिग) रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करुन दिलेला आहे.** श्री.म्हस्के यांनी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे सर्व पुर्तता करुन दिलेली आहे.

श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांना त्यांचे दि.२२.०५.२०१९,दि. २३.०८.२०१९ व दि.२८.०९.२०२० रोजीचे विनंती अर्जास अनुसरुन **मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०९.२०११ रोजीचे सभेतील आयत्या**

(पा.नं.५ वर..)

वेळेचा निर्णय क्रं. ७६० (०९)"मा.औरंगाबाद खंडपीठाने लेटर्स पेटन्ट अपील क्र.५९/ २०१० मध्ये दि.०८.०८.२०११ रोजी केलेला आदेश हा अंतरिम आदेश आहे. श्री म्हस्के यांचे संबंधीत मुळ रिट पिटीशन न्यायप्रविष्ठच असुन, ते दि.२०.०४.१९९४ पासून त्यांना जनसंपर्क अधिकारी पदावर सलग सेवा धरुन त्यानुसार त्यांना त्या पदाचे सर्व आर्थिक लाभ मिळावेत या कारणासाठीचे आहे. हे विचारात घेऊन, श्री म्हस्के यांनी त्यांची पुढील उर्वरित सेवा सोडून द्यावी व चालू असलेल्या कोर्ट केसेस विनाअट मागे घ्याव्यात या अटीवर तडजोडीने त्यांना रु.१७,५०,०००/- (अक्षरी रु. सतरा लाख पन्नास हजार) मात्र देण्यात यावेत. मात्र **कोर्ट केस काढून घेतल्यानंतर व उर्वरीत संस्थान सेवा सोडण्या बाबतचा तडजोडनामा मंजूर झाल्यानंतर त्यांना रक्कम आदा करावी,**"असा पारित झालेला आहे.

श्री म्हस्के यांनी रु. १००/-स्टॅम्प पेपरवर तडजोडनामा दि.२३.०६.२०१९ पर्यंत संस्थानकडे सादर केलेला नाहीत. ते दि.३१.०५.२०१९ रोजी संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांनी दि. २४.०६.२०१९ रोजी तडजोडनामा संस्थानकडे सादर केलेला आहे.

सद्यस्थिती

१. श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांचे बाबत. मा.व्य.समितीचे दि.२४.०९.२०११ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्र ७६०(०९) यास अनुसरुन रु.१७,५०,०००/- मात्र देण्यात यावेत,मात्र कोर्ट केस काढून घेतल्यानंतर व उर्वरित संस्थान सेवा सोडण्या बाबतचा तडजोडनामा मंजुर झाल्यानंतर त्यांना रक्कम आदा करावी.असे नमुद आहे.

२.जा.न.एसएसएस/वशी-७ए/५११५/२०११.दि.१२.०१.२०१२ रोजीचे मा.उच्च न्यायालय,खंडपीठ, औरंगाबाद येथे चालू असलेल्या कोर्ट केसेस विना अट काढून घेणेबाबत तडजोडनामा करुन देणेबाबत श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांना पत्र देण्यात आले.

३.श्री.ताराचंद वि.म्हस्के दि.३१.०५.२०१९ रोजी संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त करण्यात आले.

४.श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांनी रु.१००/-स्टॅम्प पेपरवर तडजोडनामा दि.२३.०६.२०१९ पर्यंत संस्थानकडे सादर केलेला नाही. श्री म्हस्के यांनी माहे- जानेवारी २०१२ ते माहे-जून-२०१९ या अंदाजे ७ वर्षानंतर त्यांना सेवेतून सेवानिवृत्त केलेनंतर त्यांनी दि.२४.०६.२०१९ रोजी तडजोडनामापत्र संस्थानकडे सादर केलेला आहे.

कामगार विभागा मार्फत उपरोक्त विषयांकित दि.२१.१०.२०२० रोजी टिपणी सादर करण्यात आलेली होती.सदर टिपणीवर मुख्य लेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांनी खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत. यावर विभागाचा अभिप्राय पुढील प्रमाणे.

अ.न.	मुद्दा	विभागाचा अभिप्राय
१.	ताराचंद म्हस्के यांनी जनसंर्पक अधिकारी पदाचा दिलेला राजीनामा मंजुर झाला आहे काय	नाही, श्री. ताराचंद म्हस्के यांनी दि.२८.०३.२०१२ रोजी जनसंपर्क अधिकारी या पदाचा राजीनामा संस्थानकडे दिलेला आहे. परंतु, सदरचा राजीनामा मंजुर झाल्याचे दिसुन येत नाही.
२.	राजीनामा मंजुर झाला नसेल तर जनसंपर्क अधिकारी पदावर कायमस्वरुपी नेमणुक करता येत नाही.इतर कर्मचा-यांची या पदावर कायमस्वरुपी नियुक्ती केली काय	श्री. ताराचंद म्हस्के यांचा राजीनामा मंजुर झाल्याचे दिसुन येत नाही. तथापि,मोहन यादव यांची प्र.जनसंपर्क अधिकारी म्हणून दि २७.०८.२००४ पासून नियुक्ती करण्यात आलेली होती.
३.	राजीनामा मंजुर झाला नसेल तर ताराचंद म्हस्के नियतवयोमाना नुसार सेवानिवृत्त झाले असते म्हणजे दि.३१.०५.२०१९ पर्यंत संस्थान सेवेत होते काये	श्री. ताराचंद म्हस्के हे दि.३१.०५.२०१९ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत.प्रत्यक्षात ते कामावर हजर नव्हते.
४.	संस्थानने त्यांना राजीनामा मंजुर झाला नसल्याचे कळविले आहे का	श्री .म्हस्के यांनी दिलेला राजीनामा मंजुर झालेले नसलेबाबत त्यांना कळविण्यात आलेले दिसुन येत नाही.
५.	तडजोडनामा मसुदा मा. व्यवस्थापन समितीने मान्य केला आहे काय	नाही, श्री ताराचंद म्हस्के हे दि.३१.०५.२०१९ रोजी सेवानिवृत्त झाले,यांनी दि.२४.०६.२०१९ रोजी तडजोडनामा संस्थानकडे सादर केलेला आहे. तडजोडनामा मसुदा हा मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्य केलेबाबत दिसुन येत नाही.

(पा.नं.६ वर..)

६.	९ वर्षापुर्वीच्या मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार आता तडजोडनामा करावयाचा आहे. त्यामुळे उपरोक्त १ ते ५ बाबत विभागाने खुलासा करणे व मुद्दा क्र.६ बाबत व्यवस्थापन समितीचे तत्कालीन निर्णयाचे अमंलबजावणी बाबत विधिज्ञांचा सल्ला घ्यावा असे मत आहे.	९ वर्षापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार आता तडजोडनामा करावयाचा आहे.मा. व्यवस्थापन समितीचे तत्कालीन निर्णयांची अंमलबजावणी करणेबाबत विधीज्ञ. ॲड. अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा अभिप्राय घेणेकामी पत्र देता येईल.

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत :-

१)मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४.०९.२०११ सभेतील निर्णयानुसार श्री.ताराचंद म्हस्के यांनी मा. उच्च न्यायालयातील रिट पीटीशन काढून घ्यायची व संस्थान सेवा सोडून दयायची या अटीवर रु.१७,५०,०००/- श्री म्हस्के यांना देणे व तसा तडजोडनामा करणे आवश्यक होते.

२श्री.ताराचंद म्हस्के यांचा राजीनामा मंजुर झाल्याचे दिसत नाही. तथापि,त्या पदावर इतर अधिका-यांची नेमणूक मात्र संस्थानने केलेली होती.

३) श्री ताराचंद म्हस्के यांना दि.११ मार्च २०१९ च्या आदेशान्वये दि.३१.०५.२०१९ पासून संस्थान सेवेतून नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यात आलेले आहे. त्यानंतर यांनी दि.२४.०६.२०१९ रोजी तडजोडनामा संस्थानकडे सादर केलेला आहे

४) त्यामुळे मा. व्यवस्थापन समितीच्या दि.१४.०९.२०११ च्या निर्णयानुसार सेवा सोडून दिल्याचे दिसत नाही.मा.व्यवस्थापन समितीने सेवा सोडून देण्याची ठेवलेली अट पुर्ण होत नसल्याने ठरावाप्रमाणे तडजोडनामा करता येणार नाही.

५)सदर प्रकरण ९ वर्षापुर्वीचे आहे.त्यामुळे श्री ताराचंद म्हस्के यांचे मागणीनुसार रक्कम रु.१७,५०,०००/- जी तत्कालीन व्यवस्थापन समितीने ठरविली होती. ती देणेबाबत, ठरावाची अमंलबजावणी करणेबाबत तांत्रिक व कायदेशीर मुद्दे उपस्थित होतात.

६) श्री ताराचंद म्हस्के यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र ४९७६/२०२१ अन्वये संस्थानचे विरुध्द दावा दाखल केलेला आहे. या दाव्यात त्यांनी संस्थानकडे माझी वेतनापेटी देय असलेली रक्कम रु.१७,५०,०००/- व्याजासह मिळणेबाबत मागणी केलेली आहे. या संदर्भात मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागणार आहे.

प्रस्ताव-

श्री ताराचंद म्हस्के, तत्कालीन जनसंपर्क अधिकारी यांचे सेवे संदर्भात तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीने घेतलेले निर्णय व श्री.म्हस्के यांनी आता मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र ४९७६/२०२१ अन्वये संस्थानचे विरुध्द दाखल केलेला दावा तसेच सदर प्रकरणाची वस्तुस्थिती यांचे अवलोकन होऊन,श्री ताराचंद म्हस्के यांचे रु.१७,५०,०००/- मागणीबाबत निर्णय होण्यासाठी व त्यानुसार श्री. ताराचंद म्हस्के यांनी संस्थान विरुध्द दाखल केलेले रिट पिटीशन क्र.४९७६/२०२१ नुसार मा.उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव चक्रिय पध्दतीने मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

(कान्हुराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

प्रतिज्ञापत्र तदर्थ समिती समोर दाखल करावे त्यानंतर निर्णय घेऊ

(श्रीमती गीता पी बनकर)
सहा.धर्मदाय आयुक्त,अहमदनगर
सदस्या, मा.तदर्थ (Ad-hoc)समिती

(भानुदास पालवे) 28/3/2023
अपर महसुल विभागीय आयुक्त,नाशिक
सदस्य, मा.तदर्थ (Ad-hoc)समिती

प्रतिज्ञापत्र तदर्थ समितीसमोर दाखल करावे त्यानंतर निर्णय घेऊ

(कान्हुराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.
तथा, सदस्य सचीव,मा.तदर्थ (Ad-hoc)समिती

(श्रीकांत आणेकर) 28/5
प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष,मा.तदर्थ (Ad-hoc)समिती

दि. १५.०६.२०२१

विषय : श्री ताराचंद विठठलराव म्हस्के, सेवानिवृत्त जनसंपर्क अधिकारी, यांना रुपये १७,५०,०००/- रक्कम अदा करणेस चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत . . .

सदरचा विषय वाचला. विषयास अनुसरुन संस्थान प्रशासनाचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी सदरचा प्रस्ताव तदर्थ समिती समोर मांडण्यात आला आहे. त्यास मा. अध्यक्ष, तदर्थ समिती व दुसरे सदस्य श्री पालवे यांनी प्रतिज्ञापत्र तदर्थ समितीसमोर दाखल करावे, त्यानंतर निर्णय घेता येईल असा निर्णय दिनांक २८.०५.२०२१ रोजी दिला. त्यानंतर दिनांक १०.०६.२०२१ रोजी पून्हा संस्थान प्रशासनाने सदरचा प्रस्ताव ठेवला. परंतू, संस्थान प्रशासनाला या अनुषंगाने रिट पेटीशन क्रमांक ४९७६/२०२१ मध्ये प्रतिज्ञापत्र दाखल करावयाचे आहे असे नमूद केले आहे. परंतू यावरुन प्रतिज्ञापत्रामधील मजकूर उद्‌बोधित होत नाही. त्यामुळे प्रतिज्ञापत्र तदर्थ समिती समोर दाखल केल्यानंतरच योग्य निर्णय घेता येईल.

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि. १५.०६.२०२१

विषय क्र.- 2/90

"मा.तदर्थ समितीचे (Ad-Hoc) सभेपुढे चक्रिय पद्धतीने निर्णयार्थ विषय"
श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डी

दि.१३.०५.२०२१

विषय – श्री साईबाबा महाविद्यालय – शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता प्राध्यापक भरती करणेबाबत...

मान्यतेस सविनय सादर,

अधिनियम:- २००४ मधील तरतुद क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिररपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक –

प्रस्ताविक - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या व्यवस्थापनास मा. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्रमांक मान्यता-२०१८ /(३०/१८)/ मशि -४, दि. २८ फेब्रुवारी २०१८ चे आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासुन नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देणेबाबत मान्यता दिलेली आहे. तसेच शासन आदेश क्रमांक एनजीसी-२०१८(१००/१८) मशि-४, दि.१५ जुन, २०१८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये श्री साईबाबा महाविद्यालय या नामाभिधानाने नवीन महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सन २०१८-१९ मध्ये श्री साईबाबा महाविद्यालयाचे कामकाज सुरु करणेत आलेले असून, नैसर्गिक वाढीनुसार सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये द्वितीय वर्षाचे वर्ग व सन २०२०-२१ मध्ये तृतीय वर्षाचे वर्गांकरीता मान्यता प्राप्त झालेली आहे.

मा.शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांचेकडील जा.क्र.ससं/उशि/पुवि/कायम विना अनु. कार्यभार/महावि/२०२०/१४२८ दि.३०.०७.२०२० अन्वये सन २०१९-२० मधील विद्यार्थी संख्या विचारात घेता, प्रथम व द्वितीय वर्षाकरिता अनुज्ञेय शिक्षक व शिक्षकेतर पदांना मान्यता दिलेली होती.

तृतीय वर्षातील कार्यभारानुसार निर्माण होणा-या Ad-Hoc पदांसाठी मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांची पुर्वमान्यता घेणेकामी मा.शिक्षण सहसंचालक, पुणे यांचेकडे दि.०६.०८.२०२० रोजी प्रस्ताव दाखल केला असता, मा.शिक्षण सहसंचालक, पुणे यांनी त्यांचेकडील जा.क्र./उशिसं/पुवि/कायम विनाअनुदानित/कार्यभार/२०२०/ १४५५ दि.०६.०८.२०२० पत्रान्वये सदर पदनिश्चिती करतांना दि.०१ ऑक्टोबर रोजीची विद्यार्थीसंख्या गृहीत धरुन या कार्यालयाकडून पदनिश्चिती करुन देण्यात येते. तरी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी १ ऑक्टोबर, २०२० रोजीची विद्यार्थी संख्या सादर केल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता शिक्षक-शिक्षकेतर पदे निश्चिती करुन देण्यात येतील, असे कळविलेले होते.

त्यामुळे मा.शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांचेकडील जा.क्र.ससं/उशि/पुवि/कायम विना अनु. कार्यभार/महावि/२०२०/१४२८ दि.३०.०७.२०२० अन्वये मंजूर २२ प्राध्यापक, ०१ ग्रंथपाल व ०१ शारिरीक शिक्षण संचालक असे एकुण २४ पदे भरतीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, Walk In Interview घेऊन सर्व कार्यवाही करणेस मा. तदर्थ समितीचे सभेत दिनांक ११.०८.२०२० रोजी चक्रिय पद्धतीने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मान्यता मिळालेली होती. तसेच जा.क्र.एसएसएस/श्री साईबाबा महाविद्यालय/८७४/२०२० दि.१२.०८.२०२० रोजीचे पत्रान्वये, दिनांक २४ व २५ ऑगस्ट, २०२० रोजी सहाय्यक प्राध्यापक (Assistant Professor) , ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक या पदावरील नियुक्ती कामी Walk in Interview ची जाहिरात महाराष्ट्रातील प्रमुख वर्तमानपत्रातुन व संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती.

भरतीकामी विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्वानुसार निवड समिती गठीत करुन, उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखती घेतलेल्या उमेदवारांमधून शैक्षणिक अर्हता, अनुभव व मुलाखतीमध्ये मिळालेल्या गुणांनुसार पात्र उमदेवारांची निवड करण्यात आलेली आहे. सदर मुलाखतीकामी गठीत केलेल्या निवड समितीने झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल दि.२६.०८.२०२० रोजी मा.तदर्थ समितीचे सदस्यांसमोर चक्रिय पद्धतीने सादर केलेला होता. सदर अहवालामध्ये केलेल्या शिफारशींना मा.तदर्थ समितीने चक्रिय पद्धतीने मान्यता दिलेली आहे. सदरचा ठराव मा.तदर्थ समितीचे दि.११.१२.२०२० रोजीचे सभेत कायम करुन, पुढील कार्यवाहीसाठी दि.२९.१२.२०२० रोजी विभागाकडे देण्यात आलेला होता. त्यानुसार केलेल्या सर्व कार्यवाहीस मा.उच्च न्यायालय, खडपीठ औरंगाबाद यांची कार्योत्तर मान्यता मिळणेकामी संस्थानचे विधी विभागाकडे दि.०१.०२.२०२१ रोजी सिव्हील ॲप्लीकेशनचा मसुदा अंतिम करुन दिलेला आहे. मात्र सदरचा विषय अद्याप मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्याबाबत संस्थानचे प्र.विधी अधिकारी यांचेकडे वारंवार पाठपुरावा केलेला आहे.

पान क्र.२ वर

मा.तदर्थ समितीने चक्रिय पद्धतीने मान्यता दिलेल्या दि.२६.०८.२०२० चे प्रस्तावानुसार सामान्य प्रशासन विभागामार्फत २२ सहाय्यक प्राध्यापक, ०१ ग्रंथपाल व ०१ शारिरीक शिक्षण संचालक असे एकूण २४ पदांच्या निवड झालेल्या उमेदवारांना मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्णयास अधीन राहून जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/वरिष्ठ/१३१७ (१ ते २४)/२०२० दि.०७.०९.२०२० अन्वये दि.३१.०५.२०२१ अखेर नेमणूक आदेश देण्यात आलेले आहेत. त्यामध्ये संगणकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स विषयांच्या प्राध्यापकांना प्रती माह रु.२२,०००/-, विज्ञान शाखेच्या प्राध्यापकांना प्रती माह रु.२१,०००/- व कला व वाणिज्य शाखेच्या प्राध्यापकांना प्रती माह रु.२०,०००/- मात्र मानधन देण्यात आलेले आहे.

सदर नेमणूक आदेशांतील अटी व शर्तीनुसार २२ सहा.प्राध्यापक, ०१ ग्रंथपाल असे एकूण २३ उमेदवार कामावर हजर झालेले होते. पैकी इलेक्ट्रॉनिक्स विषयाचे सहा.प्राध्यापक कै.सुनिल रामनाथ पठारे यांचा दि.१९.०९.२०२० रोजी कोल्हार गावानजीक अपघाती निधन झालेले आहे. त्यांचे रिक्त झालेल्या जागेवर इकडील कार्यालयाकडील दि.०५.१०.२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये तासिका तत्वावर (व्हिजीटींग) प्राध्यापक आमंत्रित करण्यात येत आहे. तसेच शारिरीक शिक्षण संचालक पदासाठी मुलाखतीमध्ये पात्र उमेदवार यादीतील ०३ उमेदवारांना क्रमाक्रमाने नियुक्ती पत्र / नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. त्यापैकी कोणीही हजर झालेले नाही, त्यामुळे इकडील कार्यालाकडील दि.०३.११.२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये तासिका तत्वावर (व्हिजीटींग) शारिरीक शिक्षण संचालक यांना आमंत्रित करण्यात येत आहे.

दि.०७.०९.२०२० रोजी दिलेल्या नेमणूक आदेशांनुसार प्रथम टप्प्यात हजर झालेल्या १६ प्राध्यापकांचे मान्यतेचे प्रस्ताव मुदतीमध्ये विद्यापीठाकडे पाठविण्यात आले असता, सदर १६ पदांना संदर्भ क्र.CCO/3437 दि.२८.११.२०२० अन्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ संपेपर्यंत विद्यापीठाची मान्यता मिळालेली असून, उर्वरीत ०६ सहा.प्राध्यापक व ०१ ग्रंथपाल अशा ०७ पदांना मान्यता मिळणेकामी इकडील जा.क्र.एसएसएस/श्री साईबाबा महाविद्यालय/ ११४/२०२० दि.१५.१२.२०२०, जा.क्र.३४७७/२०२१ दि.०५.०२.२०२१, जा.क्र.१७८/२०२१ दि.०८.०३.२०२१ व जा.क्र.१९०/२०२१ दि.३०.०३.२०२१ अन्वये विद्यापीठाकडे पाठपुरावा करण्यात आलेला आहे. मात्र सदर ०७ पदांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव अद्याप विद्यापीठाकडे प्रलंबित आहे.

मा.शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे यांचेकडील जा.क्र.उशिंस/पुवि/कायम विनाअनुदानित/कार्यभार/२०२१/२९ दि.०४.०१.२०२१ रोजीचे पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विद्यार्थी संख्या व उपलब्ध होणारा कार्यभार गृहीत धरुन शिक्षक व शिक्षकेतर पदे मंजुर करण्यात आलेली आहेत. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे –

शिक्षकीय पदे

अ.क्र.	विद्याशाखा	विषय	कार्यभार तासिका	अनुज्ञेय पदे	
				पुर्णवेळ	तासिका तत्व
०१.	कला	मराठी	३६	०२	००
०२.		हिंदी	३२	०२	००
०३.		इंग्रजी	२४	०१	००
०४.		इतिहास	२८	०१	०१
०५.		भूगोल	३२	०२	००
०६.		राज्यशास्त्र	२८	०१	०१
०७.		अर्थशास्त्र	२४	०१	००
०८.	वाणिज्य	वाणिज्य	६४	०३	००
०९.	विज्ञान	रसायनशास्त्र	८८	०४	०१
१०.		वनस्पतीशास्त्र	७२	०४	००
११.		पदार्थविज्ञान	६८	०३	००
१२.		गणित	५४	०३	००
१३.		प्राणीशास्त्र	६४	०३	००
१४.	संगणकशास्त्र	इलेक्ट्रॉनिक्स	२०	०१	००
१५		संगणकशास्त्र	२०	०१	००
१६.		प्राचार्य	०६	०१	-
१७.		ग्रंथपाल	-	०१	-
१८.		शा.शि.संचालक	-	०१	-
		एकुण	६६०	३५	०३

पान क्र.३ वर

शै.वर्ष २०२०-२१ चे प्राध्यापक भरतीचा विषय अद्याप मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे प्रलंबित असून, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चे प्राध्यापक भरतीबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडूनही अद्यापपावेतो कोणत्याही प्रकारच्या सुचना अथवा निर्देश प्राप्त झालेले नाहीत. विद्यापीठामार्फत ज्या प्राध्यापकांच्या पदांना मान्यता मिळालेली आहे, त्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ संपेपर्यंत असे स्पष्ट नमुद केलेले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या व विद्यापीठाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार बहुतांशी दिवस महाविद्यालये बंद होती, त्यामुळे आजपावेतो फक्त प्रथम सत्राचे अध्यापन होऊन, प्रथम सत्राची परीक्षा झालेली आहे. अद्याप द्वितीय सत्राचे संपुर्ण अध्यापन, परीक्षा व अंतिम निकाल ही सर्व प्रक्रिया पार होणे बाकी आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ची द्वितीय सत्राची परीक्षा जुलै-२०२१ अखेर किंवा ऑगस्ट – २०२१ मध्ये होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. मात्र आपले महाविद्यालयाकरिता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता नियुक्त करण्यात आलेल्या प्राध्यापकांची मुदत दि.३१.०५.२०२१ रोजी संपुष्टात येत आहे.

त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता आवश्यक प्राध्यापक भरतीबाबत श्रीसाईबाबा महाविद्यालयामार्फत दि.०३.०५. २०२१ रोजी सविस्तर प्रस्ताव सादर केला असता, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेशी दि.१०.०५.२०२१ रोजी झालेली समक्ष चर्चा व श्रीसाईबाबा महाविद्यालयाकडील दि.१०.०५.२०२१ रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसार मा.तदर्थ समितीचे मान्यतेने खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

मागणी – (अ) वरिष्ठ महाविद्यालयाकडील शैक्षणिक वर्ष हे सरासरी मे महिन्याच्या अखेरीस संपत असते. मात्र शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सदरचे शैक्षणिक वर्ष संपण्यास जुलै किंवा ऑगस्ट-२०२१ पर्यंतचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. महाविद्यालयाकडे सध्या कार्यरत असलेल्या २१ प्राध्यापकांनी शै.वर्ष २०२०-२१ मध्ये नेमूण दिलेल्या वर्गांना अध्यापनाचे काम केलेले आहे, सदर प्राध्यापकांचे नियुक्ती आदेशातील अटी शर्तीनुसार त्यांची नेमणूक दि.३१.०५.२०२१ रोजी संपुष्टात येणार आहे, मात्र शैक्षणिक वर्ष संपण्यास जुलै किंवा ऑगस्ट महिना लागणार आहे, त्यामुळे शैक्षणिक वर्षाच्या शेवटच्या टप्प्यात व परीक्षेच्या कालावधीमध्ये त्यांचे जागी नवीन प्राध्यापक नेमणे हे विद्यार्थ्यांच्या व महाविद्यालयाच्या दृष्टीने योग्य होणार नाही. तसेच सध्या कार्यरत २१ प्राध्यापकांपैकी १६ प्राध्यापकांना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ संपेपर्यंत विद्यापीठाची मान्यता मिळालेली आहे. तसेच सध्या देशभरात कोरोना विषाणूमूळे उदभवलेली परिस्थिती व त्यासाठी केंद्र व राज्य सरकार करत असलेले उपाययोजना विचारात घेता, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे संपुर्ण कामकाज संपेपर्यंत (द्वितीय सत्राचे अध्यापन, परीक्षा व निकाल) सध्या कार्यरत ०१ ग्रंथपाल व २१ प्राध्यापकांना आहे त्याच अटी –शर्ती व मानधनावर शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे संपुर्ण कामकाज संपेपर्यंत (द्वितीय सत्राचे अध्यापन, परीक्षा व निकाल) मुदतवाढ देणे योग्य होईल, असे नम्र मत आहे.

(ब) दरम्यानचे काळात मा.शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे यांचेकडील जा.क्र.उशिंस/पुवि/कायम विनाअनुदानित/ कार्यभार/२०२१/२९ दि.०४.०१.२०२१ रोजीचे पत्रान्वये मान्यता मिळालेल्या ०१ प्राचार्य, ३५ सहा.प्राध्यापक, ०१ ग्रंथपाल व ०१ शारिरीक शिक्षण संचालक अशा एकूण ३८ पदांसाठी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीचा मसुदा तयार करुन, सदरचा मसुदा विद्यापीठाचे शैक्षणिक विभागाकडून अनौपचारिक तपासणी करुन, सामान्य प्रशासन विभागामार्फत वर्तमानपत्रात प्रसिद्ध करुन, विद्यापीठाच्या नियमानुसार तज्ञ समितीची नियुक्ती करुन मुलाखतीद्वारे उपरोक्त ३८ पदे एकत्रित मानधनावर (Ad-Hoc) भरती करणेबाबत कार्यवाही करता येतील, असे नम्र मत आहे.

कोविड-१९ आजाराच्या अनुषंगाने राज्य सरकाराकडून प्राप्त निर्देशानुसार संचारबंदी/जमावबंदी/जिल्हाबंदी व इतर बाबी विचारात घेऊन, प्राध्यापक भरतीबाबत वृत्तपत्रात जाहिरात देऊन, साधारणत: ७ ते १० दिवसांची मुदत देऊन, संस्थानच्या वेबसाईटवर पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन स्वरुपात अर्ज मागविता येतील. मुदतीअंती प्राप्त अर्जांची तपासणी करुन, त्यामध्ये पात्र असलेल्या उमेदवारांची विद्यापीठाचे नियमानुसार नियुक्त तज्ञ समितीमार्फत ऑनलाईन / ऑफलाईन मुलाखतीचे नियोजन करता येईल, असे नम्र मत आहे.

तसेच दरम्यानचे काळात शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे द्वितीय सत्राबाबत व शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चे प्राध्यापक भरतीबाबत विद्यापीठाकडून काही सुचना अथवा निर्देश प्राप्त झाल्यास त्यानुसार वरिष्ठांची परवानगी घेऊन योग्य ती कार्यवाही करता येईल.

पान क्र.४ वर

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान – प्रशासकीय मान्यतेअंती कार्यवाही करता येईल.

विभागाचा अभिप्राय – तरी प्रास्ताविकातील वस्तुस्थिती विचारात घेता मागणी परिच्छेदामध्ये नमुद केलेप्रमाणे (अ) व (ब) नुसार कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय चक्रिय पद्धतीने मा.तदर्थ समितीचे सभेत सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

निर्णय –

श्री साईबाबा महाविद्यालयासाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता आवश्यक प्राध्यापक भरतीबाबत चक्रिय पद्धतीने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील मागणी परिच्छेदातील (अ) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे संपुर्ण कामकाज संपेपर्यंत (द्वितीय सत्राचे अध्यापन, परिक्षा व निकाल) सध्या कार्यरत ०१ ग्रंथपाल व २१ प्राध्यापकांना आहे त्याच अटी –शर्ती व मानधनावर शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे संपुर्ण कामकाज संपेपर्यंत (द्वितीय सत्राचे अध्यापन, परिक्षा व निकाल) मुदतवाढ देणेस व (ब) दरम्यानचे काळात मा.शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे यांचेकडील जा.क्र.उशिंस/पुवि/कायम विनाअनुदानित/ कार्यभार/२०२१/२९ दि.०४.०१.२०२१ रोजीचे पत्रान्वये मान्यता मिळालेल्या ०१ प्राचार्य, ३५ सहा.प्राध्यापक, ०१ ग्रंथपाल व ०१ शारिरीक शिक्षण संचालक अशा एकूण ३८ पदांसाठी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीचा मसुदा तयार करुन, सदरचा मसुदा विद्यापीठाचे शैक्षणिक विभागाकडून अनौपचारिक तपासणी करुन, सामान्य प्रशासन विभागामार्फत वर्तमानपत्रात प्रसिद्ध करुन, विद्यापीठाच्या नियमानुसार तज्ञ समितीची नियुक्ती करुन ऑनलाईन/ ऑफलाईन मुलाखतीद्वारे उपरोक्त ३८ पदे एकत्रित मानधनावर (Ad-Hoc) भरती करणेबाबत कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे.

(श्रीमती गिता पी. बनकर)
सदस्य तदर्थ समिती तथा
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

(भानुदास पोलवे)
सदस्य तदर्थ समिती तथा
अपर महसुल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
सचिव-सदस्य तदर्थ समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(श्रीकांत ल.आणेकर)
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश
अहमदनगर

विषय क्र.- 2/99

मा. तदर्थ समितीसमोर चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर.

(प्रकाशने विभाग)

विषय – संस्थान व्यवस्थापनामार्फत सन २०२२ (दि. ०१ जानेवारी, २०२२ ते दि. ३१ डिसेंबर, २०२२) अखेरचे कालावधीकरीता विविध प्रकारच्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशित करुन, साईभक्तांना सशुल्क उपलब्ध करुन देणेबाबत..

टिपणी

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील तरतूद -

या अधिनियमातील कलम क्रमांक १७ (२)(ठ) मध्ये, *" श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"* अशी तरतूद आहे.

उपरोक्त तरतुदीस अनुसरुन, संस्थान व्यवस्थापनामार्फत दरवर्षी संस्थानकडून साईभक्तांना पुरविणेत येणा-या सोयी-सुविधा, वर्षभरात साई मंदिरात साजरे करणेत येणारे उत्सव, रथ-पालखी व इतर दैनंदिन कार्यक्रम या विषयाची सर्व माहितीने परिपूर्ण अशी श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका छपाई करुन, साई भक्तांना वाजवी व माफक दरात सशुल्क विक्री करणेत येतात. दरवर्षी अशा प्रसिध्द करणेत येणा-या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका यांना साईभक्तांचा चांगला प्रतिसाद मिळतो.

(अ) विषयाची पूर्वपीठीका –

(०१) सन २०२१ करीता मा. तदर्थ समितीचे दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २७३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय पारित करणेत आलेला होता -

".. .. सन-२०२१ ची श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका संस्थानमार्फत प्रकाशित करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू.४,९७,५०,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता देण्यात आली. साठा संपत आलेल्या सन-२०२१ ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका यांची २५ टक्के जादा छपाई करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले. "

(०२) मा. तदर्थ समितीचे दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २७३ अन्वये, सन २०२१ चे दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी मान्यता मिळणेसाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडेस दिवाणी अर्ज क्रमांक ४४९०/२०२० हा दिनांक ०९ जुलै, २०२० रोजी दाखल करणेत आलेला होता.

तथापि, माहे मार्च, २०२० पासून संपूर्ण देशात तसेच महाराष्ट्र राज्यात कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याने, संस्थानमार्फत दाखल करणेत आलेला दिवाणी अर्ज क्रमांक ४४९०/२०२० यावर मा. न्यायालयात सुनावणी होऊ शकली नाही व त्याबाबत आदेश प्राप्त झाले नाहीत.

(०३) दरम्यानचे कालावधीत, संस्थान प्रशासनामार्फत सन २०२१ करीता दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करणेसाठी माहे डिसेंबर, २०२० / माहे जानेवारी, २०२१ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या आदेशास अधिन राहून ई-निविदा मागणी करणेत आली.

(०४) सन २०२१ – दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी मागणी करणेत आलेल्या ई-निविदांच्या तांत्रिक व व्यावसायिक निविदा संस्थानचे प्रशासकीय स्तरावरील खरेदी समितीपुढे अनुक्रमे दिनांक १२/०१/२०२१ व दिनांक १४/०१/२०२१ रोजी उघडणेत आल्या. सदर ई-निविदांचा अहवाल मा. तदर्थ समितीचे समक्ष दिनांक १९ जानेवारी, २०२१ रोजी चक्रीय पध्दतीने मान्यतेस्तव सादर करणेत आला असतां, त्यावर मा. तदर्थ समितीने *" मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे."* असा निर्णय पारित केला.

(०५) सन २०२१ चे दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई कामी मा. तदर्थ समितीने दिनांक १९ जानेवारी, २०२० रोजी घेतलेल्या सुधारित निर्णयावर, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे समक्ष मूळ दिवाणी अर्ज क्रमांक ४४९०/२०२० वर सुनावणी होऊन, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे –

" .. .. Mr. Bajaj, the learned counsel submits that the applicant was under impression that the application has been allowed and the order is passed. The cause list also shows that the civil application is disposed of. However, no such order is passed. The applicant in good faith proceeded further with the e-tender process and the work order is issued subject to the confirmation by this Court. The total amount of work order for the said purpose is to the tune of Rs.1,35,30,007/- (Rupees One Crore Thirty five Lacks Thirty thousand and seven)

पान २ वर .. .. कृ. मा. प. .. ..

The printing of Shri Sai Diaries and Calenders is ritual undertaken every year by the Sansthan.

In light of the above, We permit the application to proceed ahead with the work order issued for printing Shri Sai Diaries and Calenders for the year 2021 as per its resolution dated 19.01.2021 which is annexed to the present civil application as per the leave granted by this Court. "

(०६) तथापि, सन २०२१ चे दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकरीता साधारणतः ०२ महिन्याचा विलंब झाल्याने, प्रशासकीय स्तरावरील मंजूर टिपणी दिनांक २२ जानेवारी, २०२१ व दिनांक २६ जानेवारी, २०२१ अन्वये एकूण ०८ प्रकारचे प्रकाशनापैकी फक्त श्री साई दैनंदिनी – २०२१ (छपाई संख्या - १५०००० प्रती) व श्री साई दिनदर्शिका – मोठी १ पानी (छपाई संख्या – ५०००० प्रती) याकरीता अनुक्रमे दिनांक २३ जानेवारी, २०२१ / ०१ एप्रिल, २०२१ व दिनांक ०२ मार्च, २०२१ रोजी कार्यादेश देणेत आले. या कार्यादेशानुसार माहे मार्च / एप्रिल, २०२१ अखेर छपाई पूर्ण होऊन, दैनंदिनी व दिनदर्शिका साईभक्तांसाठी वाजवी किंमतीत सशुल्क उपलब्ध करुन देणेत आलेली आहेत.

परंतु, माहे एप्रिल, २०२१ मध्ये पुनःश्च कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव वाढल्याने, मा. शासनाने घातलेल्या टाळेबंदी सदृश्य कडक निर्बंधामुळे दर्शन व इतर व्यवस्था ठप्प झाल्याने दैनंदिनी व दिनदर्शिका विक्रीत मोठ्या प्रमाणावर घट झालेली आहे. त्यामुळे सदरहू दैनंदिनी व दिनदर्शिका विक्री अथवा वाटपाबाबतचा प्रस्ताव स्वतंत्ररित्या अलाहिदा सादर करणेत येत आहे.

(०७) मा. तदर्थ समितीने दिनांक १९ जानेवारी, २०२१ व मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी ई-निविदेतील एकूण ०८ प्रकारचे प्रकाशन साहित्य छपाईसाठी व त्याकामी येणारा अंदाजे खर्च रुपये १,३५,३०,००७/- मात्रचे रक्कमेस मान्यता दिलेली होती. तथापि, माहे मार्च, २०२० पासून देशात तसेच राज्यात कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाचा मोठया प्रमाणावर प्रादुर्भाव झाल्याने व छपाई कामास झालेला विलंब लक्षात घेता, एकूण ०८ प्रकाशनांपैकी फक्त ०२ म्हणजेच श्री साई दैनंदिनी (१५०००० प्रती) व श्री साई दिनदर्शिका (५०००० प्रती) छपाईसाठी अनुक्रमे रुपये ८५,५०,०००/- व रुपये ७,२५,०००/- मात्र असे एकूण रुपये ९२,७५,०००/- मात्र प्रत्यक्ष खर्चाचे कार्यादेश देणेत आलेले असून, या ई-निविदा प्रक्रियेत सहभाग घेतलेल्या इतर ०४ उर्वरीत निविदाधारकांच्या बयाणा रक्कमा विहित पध्दतीने दिनांक १२ एप्रिल, २०२१ रोजीचे प्रशासकीय मान्यतेने परत करणेत आलेल्या आहेत. त्यामुळे सन २०२१ करीता छपाई करावयाचे दैनंदिनी व दिनदर्शिकांबाबतची कार्यवाही जवळजवळ संपुष्टात आलेली आहे.

(ब) सन २०२२ (दि.०१ जानेवारी, २०२२ ते दि. ३१/१२/२०२२) या कालावधीकरीता छपाई करावयाचे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांबाबत विवेचन -

(०१) श्री साईभक्तांना सन २०२२ या वर्षाच्या दैनंदिनी व दिनदर्शिका उपलब्ध व्हाव्यात म्हणून, छपाई कामकाजाची कार्यवाही सुरु करणेचे दृष्टीने सर्वप्रथम सन २०२१ मधील वस्तुस्थितीदर्शक विवेचन खालीलप्रमाणे –

तक्ता क्रमांक ०१

अ.क्र.	उप क्रमांक	तपशील	सन २०२१ करीता सुधारीत छपाई संख्या	सन २०२१ मंजूर छपाई दर / प्रती नग	सन २०२१ करीता छपाई करणेत आली किंवा नाही	सन २०२१ मध्ये पारित करणेत आलेल्या कार्यादेशाची रक्कम रु.
१	२	३	४	५	६	७
०१	--	श्री साई दैनंदिनी (डिलक्स)				
	०१	दैनंदिनी – मराठी	१,००,०००	५७.००	होय	८५,५०,०००/-
	०२	दैनंदिनी – हिंदी	०,१५,०००	५७.००	होय	
	०३	दैनंदिनी – इंग्रजी	०,१०,०००	५७.००	होय	
	०४	दैनंदिनी – तेलगू	०,२५,०००	५७.००	होय	
		अ.क्र. ०१ करीता एकूण	१,५०,०००	--	--	
०२	--	श्री साई दैनंदिनी (पॉकेट साईज)	०,०५,०००	२३.४०	नाही	--
०३	--	श्री साईबाबा दिनदर्शिका (१ पानी / मोठी)	०,५०,०००	१४.५०	होय	७,२५,०००/-
०४	--	श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस)	०,०५,०००	१४२.००	नाही	--
०५	--	श्री साईबाबा ग्रीडी डेस्क कॅलेंडर्स (७ पेजेस)	०,०५,०००	११०.००	नाही	--
०६	--	श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स (ऑफीस)	०,०५,०००	२१.५०	नाही	--
०७	--	श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स (घरगुती)	०,०५,०००	११.००	नाही	--
०८	--	श्री साईबाबा कार कॅलेंडर्स	०,०८,०००	०९.१५	नाही	--
					एकूण रक्कम रुपये -	९२,७५,०००/-

उपरोक्त तक्ता क्रमांक ०१ मधील बाबींबाबत विवेचन खालीलप्रमाणे -

०१. अ.नं. ०१ श्री साई दैनंदिनी (डिलक्स) – २०२१ करीता एकत्रित १,५०,००० प्रतींची मंजुरी होती, परंतु आहे त्याच मंजूर छपाई दरात प्रशासकीय मान्यतेने सदरची दैनंदिनी ०४ भाषेत छपाई करुन घेणेत आलेली आहे. अ. नं. ०३ श्री साईबाबा दिनदर्शिका २०२१ – मोठी / ०१ पानी मंजूर छपाई संख्या २,००,००० प्रती होती, परंतू प्रशासकीय मान्यतेने प्रत्यक्षात ५०,००० प्रती छपाई कार्यादेश देणेत आलेला आहे.

पान ३ वर .. ..

०२. उपरोक्त तक्त्यातील अ.क्र. २ व ४ ते ८ छपाईकरीता कार्यादेश पारित करणेत आलेले नाहीत.

०३. मा. तदर्थ समितीने दिनांक १९ जानेवारी, २०२१ व मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी ई-निविदेतील एकूण ०८ प्रकारचे प्रकाशन साहित्य छपाईसाठी व त्याकामी येणारा अंदाजे खर्च रुपये १,३५,३०,००७/- मात्रचे रक्कमेस मान्यता दिलेली होती. तथापि, देशात तसेच राज्यात कोव्हीड-१९ या संसर्गजन्य साथीच्या रोगाचा मोठया प्रमाणावर प्रादुर्भाव असल्याने व छपाई कार्यवाहीस झालेला विलंब लक्षात घेता, एकूण ०८ प्रकाशनांपैकी फक्त ०२ म्हणजेच श्री साई दैनंदिनी (१५०००० प्रती) व श्री साई दिनदर्शिका (५०००० प्रती) छपाईसाठी अनुक्रमे रुपये ८५,५०,०००/- व रुपये ७,२५,०००/- मात्र असे एकूण रुपये ९२,७५,०००/- मात्र प्रत्यक्ष खर्चाचे कार्यादेश पारित करणेत आले. तसेच ई-निविदा प्रक्रियेत सहभाग घेतलेल्या इतर ०४ उर्वरित निविदाधारकांच्या बयाणा रक्कमा विहित पध्दतीने दिनांक १२ एप्रिल, २०२१ रोजीचे प्रशासकीय मान्यतेने परत करणेत आलेल्या आहेत.

(क) विभागाचा अभिप्राय व प्रस्ताव -

(०१) सन २०२१ मध्ये कोव्हीड-१९ या संसर्गजन्य साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव असल्याने दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी करावयाचे कार्यवाहीस झालेला विलंब तसेच छपाई करणेत आलेल्या ०२ प्रकाशनांच्या विक्रीत झालेली मोठ्या प्रमाणावरील घट विचारात घेतां **आणि** सन २०२२ मध्येही सदरचा प्रस्ताव सादर करत असतांना, संपूर्ण देशात व राज्यात कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे सुरु असलेली अंशतः टाळेबंदी तसेच जागतिक स्तरावर यां रोगाच्या प्रादुर्भावाबाबत व्यक्त करणेत येणारे अंदाज विचारात घेतां, सन २०२२ चे उर्वरित कालावधीत जनजीवन / दर्शन व्यवस्था किती प्रमाणात सुरळीत होईल तसेच अशा परिस्थितीत विषयांकित प्रकाशने छपाईबाबतची कार्यवाही पूर्ण होणेस किती कालावधी लागेल याचा स्पष्ट अंदाज व्यक्त करता येणे शक्य नाही.

या बाबींचा विचार करतां, **सोबत,** सन २०२१ मध्ये दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईबाबत प्रत्यक्ष कार्यवाहीचे वेळेस परिस्थितीनुरुप जे बदल करणेत आले त्याचे विवेचन आणि सन २०२२ करीता प्रस्तावित करणेत आलेली छपाई संख्या व त्यासाठी येणारा अंदाजित खर्च याचा तपशील दर्शविणारा **तक्ता क्रमांक ०२ / (परिशिष्ट अ)** स्वतंत्ररित्या जोडला आहे, त्याचे अवलोकन होणेस विनंती आहे.

(०२) उपरोक्त परिच्छेद क (१) मध्ये नमुद केलेप्रमाणे, तक्ता क्रमांक ०२ मधील सविस्तर विवेचनास अनुसरुन, आता खालील तक्ता क्रमांक ०३ मध्ये, सन २०२२ करीता छपाई करावयाच्या विविध दैनंदिनी व दिनदर्शिका यांची माहिती, प्रस्तावित छपाई संख्या व त्यासाठी येणारा अंदाजित खर्च प्रस्तावित करणेत येत आहे -

तक्ता क्रमांक ०३

अ.क्र.	उप क्रमांक	तपशील	सन २०२१ छपाई संख्या	सन २०२१ मंजूर छपाई दर / प्रती नग	सन २०२२ करीता प्रस्तावित छपाई संख्या	सन २०२२ करीता अंदाजित छपाई दर / प्रती नग	सन २०२२ अंदाजित छपाई खर्च रक्कम रुपये
१	२	३	४	५	६	७	८
०१	--	श्री साई दैनंदिनी (डिलक्स)					
	०१	दैनंदिनी – मराठी	१,००,०००	५७.००	१,००,०००	७४.००	७४,००,०००/-
	०२	दैनंदिनी – हिंदी	०,१५,०००	५७.००	०,५०,०००	७४.००	२२,२०,०००/-
	०३	दैनंदिनी – इंग्रजी	०,१०,०००	५७.००	०,२५,०००	७४.००	२२,२०,०००/-
	०४	दैनंदिनी – तेलगू	०,२५,०००	५७.००	०,५०,०००	७४.००	२९,६०,०००/-
		अ.क्र. ०१ करीता एकूण	१,५०,०००	--	२,२५,०००	--	–
०२	--	श्री साई दैनंदिनी पॉकेट साईज	छपाई नाही	२३.४०	०,५०,०००	३१.००	१५,५०,०००/-
०३	--	श्री साई दिनदर्शिका (०१ पानी / मोठे)	५०,०००	१४.५०	२,००,०००	१९.००	३८,००,०००/-
०४	--	श्री साईबाबा डिलक्स वॉल कलेंडर (८ पेजेस)	छपाई नाही	१४२.००	१०,०००	१८५.००	१८,५०,०००/-
०५	--	श्री साईबाबा मेटपेट वॉल कलेंडर (७ पेजेस)	सन २०२१ चे निविदेत समावेश नसल्याने, छपाई नाही.		१०,०००	२२४.००	२२,४०,०००/-
०६	--	श्री साईबाबा श्री डी वॉल कलेंडर (०१ पानी)			३,०००	२३०.००	६,९०,०००/-
०७	--	श्री साईबाबा श्री डी डेस्क कॅलेंडर (०७ पानी)	छपाई नाही	११०.००	१०,०००	१४३.००	१४,३०,०००/-
०८	--	श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर (१४ पानी)	सन २०२१ चे निविदेत समावेश नसल्याने, छपाई नाही.		१०,०००	७०.००	७,००,०००/-
०९	--	श्री साईबाबा वॉल कॅलेंडर (कार्यालय / ०६ पानी)	छपाई नाही	२१.५०	१०,०००	२८.००	२,८०,०००/-
१०	--	श्री साईबाबा वॉल कॅलेंडर (घरगुती / ०६ पानी)	छपाई नाही	११.००	१०,०००	१५.००	१,५०,०००/-
११	--	श्री साईबाबा कार कॅलेंडर्स (०७ पानी)	छपाई नाही	९.१५	१५,०००	१२.००	१,८०,०००/-
						एकूण रक्कम रुपये -	२,९५,२०,०००/-

उपरोक्त तक्ता क्रमांक ०३ मधील रकाना क्रमांक ०५ मधील सन २०२१ चे न्यूनतम मंजूर छपाई दरांवर, सरासरी ३० टक्के वाढ गृहित धरुन, सन २०२२ करीता रकाना क्रमांक ०७ मधील अंदाजित छपाई दर नमूद करणेत आलेले आहेत. यामध्ये ई-निविदा प्रक्रिया पूर्ण झालेनंतर प्रत्यक्षात वाढ अथवा घट होऊ शकते तसेच छपाई संख्येचे प्रमाण कमी-अधिक झाल्यास त्यानुसार छपाई दरात वाढ अथवा घट होण्याची शक्यता असते.

पान ४ वर .. .. कृ. मा. प. ... ..

(०३) उपरोक्त तक्ता क्रमांक ०३ मधील अ.नं. ०१ ते ११ मध्ये नमूद केलेल्या सन २०२२ चे विविध दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईसाठी अंदाजित रक्कम रुपये २,९५,२०,०००/- मात्र (अक्षरी रुपये दोन कोटी पंच्यान्नव लाख वीस हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च प्रकाशने विभागाकडील सन २०२२ चे पुस्तके / फोटो / दैनंदिनी / दिनदर्शिका छपाईकामी करणेत आलेल्या अंदापत्रकीय तरतूद रक्कम रुपये १२ कोटी मात्रतून खर्च करता येईल, त्यास मान्यता असावी.

(०४) विषयांकित प्रकाशने छपाईकामी रक्कम रुपये ५० लाख मात्रपेक्षा जास्त खर्च असल्याने, मा. तदर्थ समितीचे मान्यतेने, सदर प्रस्तावास मान्यता मिळणेबाबतचा दिवाणी अर्ज मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडेस मान्यतेस्तव सादर करता येईल, त्यास मान्यता असावी.

(०५) विषयांकित प्रकाशने छपाईकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेकामी जनसंपर्क विभागामार्फत वृत्तपत्रातून जाहिरात प्रसिध्द करणे, माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणे व इतर अनुषंगिक कार्यवाहीस करणेस व त्याअनुषंगाने येणारे सर्वसमावेशक खर्चास मान्यता असावी.

(०६) मा. तदर्थ समितीचे मान्यतेनंतर, साईभक्तांना सन २०२२ च्या दैनंदिनी व दिनदर्शिका वेळेत उपलब्ध व्हाव्यात तसेच याकामी कालापव्यय होऊ नये म्हणून, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेस अधिन राहून विषयांकित प्रकाशने छपाई कामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करणेत आहे, त्यास मान्यता असावी.

उपरोक्त तक्ता क्रमांक ०३ मधील छपाई करावयाच्या दैनंदिनी व दिनदर्शिकांबाबत मा. उच्च न्यायालय ज्या पध्दतीने मान्यता देईल, त्यानुसार विषयांकित साहित्यांची छपाई करणेसाठी कार्यादेश देता येईल आणि याबाबत प्रसिध्द करावयाचे निविदेतील अटी-शर्ती मध्ये याबाबीचा सविस्तररित्या समावेश करता येईल. तसेच वर नमूद केलेल्या साहित्यांचा अंतिम छपाई कार्यादेश पारित करणेपूर्वी, त्या-त्या वेळेची वस्तुःस्थिती लक्षांत घेऊन, परिस्थितीनुरुप विषयांकित साहित्य छपाई करणेबाबत प्रशासकीय स्तरावर निर्णय घेता येईल, असे मत आहे.

(०७) तसेच, सन २०२२ करीता छपाई करावयाच्या दैनंदिनी व दिनदर्शिका यांचा मंजूर छपाई साठा संपुष्टात आल्यास व त्यानंतर विक्रीचे कालावधीचा अंदाज घेऊन आवश्यकता भासल्यास, सन २०२२ करीता मंजूर होणा-या दरानेच जादा २५ टक्के छपाई करुन घेणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करणेत येत आहे, त्यास मान्यता असावी.

उपरोक्त सविस्तर विवेचनास अनुसरुन, **परिच्छेद क** मध्ये नमूद केलेल्या **अ.नं. (०१) ते (०७)** बाबींस तसेच त्या अनुषंगाने करावयाचे कार्यवाहीस मान्यता मिळणेसाठी विषयांकित प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे समक्ष चक्रीय पध्दने निर्णयार्थ सादर.

कान्हूराज बगाटे (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

दिनांक - 13/07/2021.

निर्णय -

विषयाचा आतापर्यंत पाहता नियमित बैठकीत ठेवणे उचित होईल

(श्रीमती गीता बनकर) 13/07/2021
सदस्य, तदर्थ समिती -तथा-
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

विषयाला कायदा पाहता सदर विषय नियमीत बैठकीत ठेवणेत यावा असे मत आहे

(भानुदास पालवे) 13/7/2021
सदस्य, तदर्थ समिती -तथा-
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक

(कान्हूराज बगाटे, भाप्रसे)
सदस्य सचिव, तदर्थ समिती -तथा-
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

please put up in the meeting.
(सुधाकर यरलागड्डा) 13.7.2021
अध्यक्ष, तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर

तक्ता क्रमांक -०२ परिशिष्ट " अ "

विषय- सन-२०२२ मध्ये छपाई करावयाच्या प्रकाशन साहित्याचे विवेचन दर्शविणारा तक्ता-

अ.क्र.	उप क्रमांक	तपशील	सन-२०२१ मध्ये मूळ प्रस्तावीत केलेली छपाई संख्या	सन-२०२१ मध्ये सुधारीत केलेली प्रस्तावीत छपाई संख्या	सन-२०२१ मध्ये प्रत्यक्ष छपाई केलेली संख्या	सन-२०२१ मध्ये प्राप्त झालेले मंजूर छपाई दर	सन-२०२२ मध्ये प्रस्तावीत छपाई संख्या	सन- २०२२ करिता ३० % वाढ गृहीत धरून अंदाजित छपाई दर	एकूण खर्च
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
०१	--	श्री साई दैनंदिनी (डिलक्स)	२,२५,०००						
	०१	दैनंदिनी- मराठी		१,००,०००	१,००,०००	५७.००	१,००,०००	७४.००	७४,००,०००/-
	०२	दैनंदिनी- हिंदी		१५,०००	१५,०००	५७.००	५०,०००	७४.००	३७,००,०००/-
	०३	दैनंदिनी- इंग्रजी		१०,०००	१०,०००	५७.००	२५,०००	७४.००	१८,५०,०००/-
	०४	दैनंदिनी-तेलगू		२५,०००	२५,०००	५७.००	५०,०००	७४.००	३७,००,०००/-
		अ.क्र.१ करिता एकूण -		१,५०,०००	१,५०,०००	-	२,२५,०००	-	
०२	--	श्री साई दैनंदिनी पॉकेट साईज	१,००,०००	२५,०००	-	२३.४०	५०,०००	३१.००	१५,५०,०००/-
०३	--	श्री साई दिनदर्शिका (१ पानी मोठे डेटरसह)	३,२५,०००	२,००,०००	५०,०००	१४.५०	२,००,०००	१९.००	३८,००,०००/-
०४	--	श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स(८ पेजेस)	२०,०००	५,०००	-	१४२.००	१०,०००	१८५.००	१८,५०,०००/-
०५	--	श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स (७ पेजेस)	१५,०००	-	-	१७२.००	१०,०००	२२४.००	२२,४०,०००/-
०६	--	श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स (१ पानी)	३,०००	-	-	१७७.००	३,०००	२३०.००	६,९०,०००/-
०७	--	श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स (७ पानी)	१५,०००	५,०००	-	११०.००	१०,०००	१४३.००	१४,३०,०००/-
०८	--	श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर्स (१४ पानी)	१५,०००	-	-	५४.००	१०,०००	७०.००	७,००,०००/-
०९	--	श्री साईबाबा वॉल कॅलेंडर (कार्यालय- ६ पानी)	१०,०००	५,०००	-	२१.५०	१०,०००	२८.००	२,८०,०००/-
१०	--	श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स (घरगूती- ६ पानी)	१५,०००	५,०००	-	११.००	१०,०००	१५.००	१,५०,०००/-
११	--	श्री साईबाबा कार कॅलेंडर्स (७ पानी)	२५,०००	८,०००	-	९.१५	१५,०००	१२.००	१,८०,०००/-
								एकूण खर्च-	२,९५,२०,०००/-

विशेष टिपणी-

१) मागील वर्षी (सन-२०२१ साठी) सुरूवातीस मंजूरीसाठी एकूण ११ प्रकाशने (९ प्रकारच्या दिनदर्शिका व २ प्रकारच्या दैनंदिनी) छपाई कामी खर्चास मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

२) कोवीड-१९ च्या पहिल्या लाटेमध्ये मा.शासनाचे कडक निर्बंधामुळे साईभक्तांची साई दर्शनासाठी घटलेली गर्दी या गोष्टींचा सर्वांगाने विचार करून उपरोक्त तक्त्यातील अ.नं.०५) श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स (७ पेजेस), अ.नं.०६) श्री साईबाब थ्रीडी वॉल कॅलेंडर्स (१ पानी) व ०८) श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर्स (१४ पानी) या तीन दिनदर्शिका दि.१४.१२.२०२० रोजीचे प्रशासकीय मान्यतेने छपाई न करणेस मान्यता घेणेत आलेली होती. त्यामुळे सदरील दिनदर्शिका सन-२०२२ मध्ये छपा

विषय क्र.- 03

मा. तदर्थ समितीचे समोर निर्णयार्थ सादर. 43

सामान्य प्रशासन विभाग (आस्थापना)

विषय : श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे यांचे अधिकारी / कर्मचा-यांसाठी (प्रशासकीय / तांत्रिक) सेवाप्रवेश नियमास मान्यता मिळणेबाबत .....

टिपणी-

विषयाची पूर्वपीठीका -

अ) श्री साईबाबा संस्थान अधिनियम-२००४ च्या कलम १३ (४) मधील परंतुकातील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती यांच्या आस्थापनेवर आवश्यक असणा-या कर्मचा-यांच्या आकृतीबंधास महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचे शासन निर्णय क्रमांकः सासंवि-२००९ /४३३/ (३७/०९)/ का. १६, मंत्रालय मुंबई. दिनांक ०७ ऑगस्ट, २००९ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ४८२६ पदांचे आकृतीबंधास मान्यता देणेत आलेली असून त्यामध्ये खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूरी देणेत आलेले आहे. त्या खालीलप्रमाणे-

१) समितीने पदनिहाय सेवा प्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवा प्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

२) सेवा प्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्य ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवा प्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पस्टपणे उल्लेख असावा.

३) सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

४) सेवा प्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.

५) आकृतीबंधातील मंजुर पदांवर काम करणा-या कर्मचा-यांना शासनाप्रमाणे निवृतीवेतन लागू असणार नाही.

६) समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पदे भरती करता येणार नाही.

७) समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.

८) समितीने शक्यतो आकृतीबंधामधील पदें ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरून व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

९) आस्थापनेवरील खर्च सिमीत करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिका-यांची आकृतीबंधामध्ये निश्चित पदांवर प्रतीनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतूद ठेवावी.

१०) तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

११) आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचा-यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचा-याचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.

(ब) मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक २८ ऑक्टोबर, २०१३ व दिनांक ३० जानेवारी, २०१४ चे (संदर्भ क्र. ०१ व ०२) पत्रान्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरिल पदांचे कर्मचारी आकृतीबंधास अनुसरुन, संस्थानचे आस्थापनेवरील विविध संवर्ग, त्यांची शैक्षणिक पात्रता, नियुक्ती, वेतनश्रेणी व पदोन्नती इत्यादीबाबत छाननी करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या नियुक्ती व पदोन्नतीच्या विनियमाचे प्रारुप पदांच्या तपशिलांच्या परिशिष्टासह शासनास तातडीने सादर करणेबाबत कळविलेले होते.

मा. व्यवस्थापन समितीचे **दिनांक १२ जून, २०१४** रोजीचे सभेतील **निर्णय क्रमांक** ४९३ अन्वये (संदर्भ क्रमांक ०३), श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचा विनियम (सेवाप्रवेश नियम) मध्ये प्रस्तावित दुरुस्त्या करणेत येऊन, सदर सेवाप्रवेश नियमाचा प्रस्ताव परिशिष्टांसह मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस मान्यतेसाठी सादर करणेत यावा, असा निर्णय पारित करणेत आला.

पान २ वर. ..

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय क्रमांक ४९३ अन्वये मान्यता मिळालेनुसार, सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र क्रमांक १४७० / २०१४, दिनांक २६ जून, २०१४ (संदर्भ क्रमांक ०४) अन्वये, विविध विभागातील अ.नं.१ ते ११ पदांबाबत आवश्यक ते बदल करुन तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचा विनियम (सेवाप्रवेश नियम) मध्ये प्रस्तावीत दुरुस्त्या करणेत येऊन, प्रारुप सेवा प्रवेश नियमांचा प्रस्ताव परिशिष्टांसह मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत आला.

उपरोक्त दिनांक २६ जून, २०१४ रोजीचे सादर करणेत आलेल्या प्रस्तावाबाबत, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक ३०. जून, २०१५ (संदर्भ क्रमांक ०५) नुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम,२००४ च्या कलम २५(३) मधील तरतुदीनुसार सदर अधिनियमांतर्गत लागू करण्यात आलेल्या नियमांना पुर्व प्रसिद्धी देणे आवश्यक असुन त्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणी सदर नियमांना पुर्वप्रसिद्धी देण्यात आली आहे किंवा कसे हे स्पष्ट करावे, असे कळविले.

मा. शासनाचे उपरोक्त दिनांक ३० जून, २०१५ रोजीचे पत्रानुसार कार्यवाही करुन सेवाप्रवेश नियमाचा अंतिम मसुदा सादर करणेत येईल, असे सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र दिनांक ३१ जुलै, २०१५ (संदर्भ क्रमांक ०६) अन्वये कळविणेत आलेले आहे. मा. शासनाचे निर्देशानुसार, संस्थान प्रशासनामार्फत दिनांक १० ऑगष्ट, २०१५ रोजीचे परिपत्रकान्वये, सेवाप्रवेशाचे प्रारुप / सेवा प्रवेश नियमांचा मसुदा प्रसिध्द करणेत येऊन कर्मचा-यांच्या हरकती मागविणेत आल्या.

संस्थान आस्थापनेवरील कर्मचा-यांनी प्रारुप सेवाप्रवेश नियमाबाबत घेतलेल्या हरकतींवर दिनांक १४ जानेवारी, २०१६ व दिनांक २० फेब्रुवारी, २०१६ रोजी मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समितीपुढे कर्मचारीनिहाय सुनावणी घेणेत आलेली होती. त्यानुसार सर्व संबंधित कर्मचा-यांना हरकती निकाली काढलेबाबत / अंशतः मान्य केलेबाबत इकडील विभागाकडील दिनांक २९ मार्च, २०१७ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आलेले आहे.

(क) संदर्भ क्र.०७ अन्वये, श्री साईबाबा संस्थान आस्थापनेवर अधिकारी / कर्मचारी याचे सेवाप्रवेश नियम अंतिम न झाल्यामुळे त्यांच्या नियुक्ती व पदोन्नतीत अनियमितता होत असल्याच्या अनेक तक्रारी शासनस्तरावर प्राप्त होत आहेत. त्यामुळे सेवाप्रवेश नियम अंतिम करणे आवश्यक आहे. शासनाकडून या संदर्भात वारंवार पत्रव्यवहार करुनही सेवाप्रवेश नियम तयार करुन त्यांना पुर्वप्रसिद्धी देवुन त्याचे प्रारुप अद्यापही शासनास सादर करण्यात आलेले नाही. तरी संस्थान आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवाप्रवेश नियमांचे प्रारुप दि. ०४/०६/२०१८ पुर्वी शासनास सादर करावे असे शासनाने पत्राने कळविलेले आहे.

(ड) तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०२.२०१९ रोजीचे सभेत निर्णय क्र.१६५ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे कर्मचा-यांचा सुधारीत आकृतीबंध व सेवा प्रवेश नियम एक महिन्यात करणेकामी या क्षेत्रातील सेवानिवृत्त तज्ञ शासकीय अधिकारी / कर्मचारी यांची मानधनावर नेमणूक करणेस व याकामी येणा-या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ११ जून, २०१९ व दिनांक १३ जून, २०१९ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये, संस्थान आस्थापनेवरील विविध विभागांचे सुधारित आकृतीबंध आणि सेवाप्रवेश नियमांचे प्रारुप तयार करुन त्यास अंतिम स्वरुप देणे, मा. शासनाने सुधारित आकृतीबंध व सेवाप्रवेश नियमांस मान्यता दिलेनंतर बिंदू नामावली तयार करुन अद्यायवत करणे आदि अनुषंगिक आस्थापनाविषयक कामकाजासाठी सेवानिवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांची नामिका सुची / कार्यगट तयार करणेकामी विहित कार्यपध्दती अवलंबून खालील ०४ सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांची आस्थापना विषयक कामकाजासाठी नियुक्ती करणेत आलेली होती.

१) श्री. त्र्यंबक अंबादास खैरे
२) ॲड. डॉ. मधुकर दगडू गिरी
३) श्री. बाळासाहेब बापूराव भांडारकवठे
४) श्री. अशोक विठ्ठलराव शिंदे

त्यानुसार सदरचे अधिकारी / कर्मचारी यांचे कार्यगटाने **दिनांक ०३ सप्टेंबर, २०१९** पासून कामकाजास सुरवात केली असून वेळोवेळी त्यांनी संस्थानचे विविध विभागांमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून कामकाजचा आढावा घेतलेला आहे. त्यानुसार दिनांक १४/०८/२०२० रोजी सेवाप्रवेश नियमाचा प्रारुप मसुदा इकडील कार्यालयाकडे सादर केलेले होता. सदरचा प्रारुप मसुदा मा. तदार्थ समितीचे दिनांक २८/०८/२०२० रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. सदरचे प्रारुप मसुद्याबाबत सदरचे कार्यगटाने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार कार्यगटाने सदरचे प्रारुप सेवाप्रवेश नियमामध्ये सुधारण करुन प्रारुप सुधारित सेवा प्रवेश नियम व सुधारित आकृतीबंध दिनांक १८ सप्टेंबर, २०२० इकडील कार्यालयाकडे सादर केलेला आहे.

पान ३ वर...

इ) कार्यगटाने सादर केलेले प्रारुप सुधारित सेवाप्रवेश नियम मा. व्यवस्थापन सिमतीचे पुढील सभेपुढे सादर करणेकामी दिनांक २० ऑक्टोबर, २०२० रोजी कार्यालयीन टिपणी सादर केली असता, दि. २८/०८/२०२० रोजी तदर्थ समितच्या बैठकीत काय निर्णय झाला, तसेच सेवा प्रवेशनियम संदर्भात काणत्याही न्यायालयात याचिका प्रलंबित आहे काय याबाबत स्वंयस्पष्ट माहिती सादर करणेबाबत निर्देशित केलेले आहे.

दिनांक २८/०८/२०२० रोजीचे मा. तदर्थ समितीचे सभेतील निर्णय क्र.४४६ खालीलप्रमाणे झालेला आहे. " सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली, सदस्य सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबबत मा. उच्च न्यायालयाचे निर्णयाप्रमाणे पदोन्नती देण्यासाठी सेवाप्रवेश नियम आवश्यक आहेत. श्री साईबाबा संस्थानकडे सेवाप्रवेश नियमच नाहीत. त्यामुळे संस्थान प्रशासनात कुंठीतावस्था असून प्रशासकीय कार्यक्षमतेवर त्याचा परिणाम होत आहे. यासाठी सेवाप्रवेश नियम कमिटीने नियम तयार करुन दिलेले आहेत. त्याचे अवलोकन व्हावे.

सदरचा विषय सभेत मंजुर केल्यास अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती व प्रोत्साहन मिळून कार्यक्षमता वाढवण्यास मदत होईल. यावर मा. अध्यक्ष यांनी सेवा प्रवेशाबाबत झालेले निर्णयाचे संदर्भात औरंगाबाद खंडपीठात कुठली याचिका, जनहित याचिका प्रलंबीत आहे का? याबाबत श्री. बजाज, प्रभारी विभागप्रमुख यांना विचारणा केली असता त्यांना असे म्हटले की, एक याचिका होती पण त्याचे काय झाले हे मला माहीत नाही कारण मी तीन वर्षापुर्वीच या विभागत रुजू झालो त्यामुळे मला माहीत नाही, असे बेजबाबदारपणाचे उत्तर दिले, यावर अध्यक्षांनी सदस्य सचिवांना असे विषय मांडताना संपूर्ण अभ्यास करणे गरजेचे आहे असे दाखवून दिले व याविषयी माहिती घेण्यास सांगितले व सदरचा विषय परिपुर्ण सादर करण्याचे निर्देश दिले. "

त्यास अनुसरुन संदर्भ क्र. १२ अन्वये श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे विरुध्द दाखल केलेल्या याचिकांबाबतची सविस्तर माहिती व सद्यस्थिती मिळणेबाबत कळविणेत आलेले होते.

कामगार विभाग यांनी संदर्भ क्र. १३ चे पत्रानुसार कर्मचारी संघटना यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे विरोधात दाखल केलेल्या याचिकांचा तपशिल खालीलप्रमाणे-

श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे रिट पिटीशन क्र. ३४४३/ २०१३, ५४७८/२०१३, ५४७९/२०१३, ५६०४/२०१३ व ११२६/२०१५ दाखल केलेल्या आहेत. सदरचे याचिकांमध्ये याचिकाकर्ता यांनी खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

सेवा विनियम, मुकादम, उप अधिक्षक, सीसीटीव्ही ऑपरेटर या पदांचे पदोन्नती त्यांचे असलेले अनुभव, सेवाजेष्ठता यांचा विचार करुन त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने पदोन्नती देणेत यावेत. तसेच त्या पदांचे वेतन श्रेणी देखील देणेबाबत विनंती करणेत आलेली आहे.

१२ व २४ वर्षानंतर देणेत येणारे लाभ शासन निर्णयानुसार देणेबाबत. तारतंत्री यांचे शैक्षणीक पात्रतेबाबत, विद्युत पर्यवेक्षक यांचे पदोन्नतीबाबत व सेवाजेष्ठता यादीबाबत तक्रारी दाखल केलेल्या आहेत.

शासनाकडे एका पदावर किमान ३ वर्ष सेवा झाल्यावर त्यांना पदोन्नती देणेत येते त्यानुसार संस्थान कर्मचा-यांनाही पदोन्नती देणेत यावी.

शैक्षणीक पात्रते ऐवजी कर्मचा-यांचे अनुभवाचा विचार करुन त्यांना पदोन्नत्या देणेत याव्यात. सेवा विनियमाबाबत कर्मचा-यांचे मागण्यांबाबत निर्णय होईपर्यंत सेवा विनियम लागू करणेत येऊ नये. बदल्या व पदोन्नती अशा विविध विषयांबाबत मा. उच्च न्यायालाय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केलेल्या आहेत. सदरच्या याचिकां अद्यापपर्यंत प्रलंबीत आहेत.

ई) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सुधारित आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम, पदोन्नतीची साखळी, कार्यपध्दती एकल पदे तसेच आरक्षण नियमानुसार बिंदु नामावलीचे प्रस्ताव तयार करणेकामी नेमणेत आलेल्या कार्यगटाने सादर केलेले विभागनिहाय सेवाप्रवेश नियम दिनांक २८ ऑगस्ट, २०२० रोजीचे सभेत सादर करणेत आलेले होते. सदरचे प्रारुप मसुद्याबाबत सदरचे कार्यगटाने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार कार्यगटाने सदरचे प्रारुप सेवाप्रवेश नियमामध्ये सुधारण करुन प्रारुप सुधारित सेवा प्रवेश नियम दिनांक १८ सप्टेंबर, २०२० इकडील कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सदरचे प्रारुप सेवाप्रवेशबाबत दिनांक २० ऑक्टोबर, २०२० नुसार सादर करणेत आलेल्या टिपणीवरील निर्देशबाबत उपरोक्त परिच्छेद "इ" मध्यू नमूद केलेले आहे.

पान ४ वर...

त्यानुसार सुधारित प्रारुप सेवा प्रवेश नियम मा. तदर्थ समितीची सभेपुढे सादर करावे लागणार आहे. सदरचे सुधारित प्रारुप सेवाप्रवेश नियमांस मा. तदर्थ समितीची मान्याता मिळालेनंतर ते मा. शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावे लागणार आहे.

विभागाचा अभिप्राय –

१) आस्थापनाविषयक कार्यगटाने निश्चित करुन दिलेल्या सुधारित प्रारुप सेवाप्रवेश नियमावलीस मान्यता असावी.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडील सांप्रत आकृतीबंध, पदोन्नतीची साखळी, एकल पदे, तसेच आरक्षण नियमानुसार बिंदू नामावलीचे प्रस्ताव तयार करणेकामी नेमणेत आलेल्या कार्यगटाने विभागनिहाय सुधारित प्रारुप सेवाप्रवेश नियमांस मान्यता असावी.

३) सदरचे सुधारित प्रारुप सेवाप्रवेश नियमांस मा. तदर्थ समितीचे मान्यतेनंतर, मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे याचीका दाखल करणेच्या मान्यतेस्तव तसेच सदरचे सुधारित प्रारुप सेवाप्रवेश नियमांचा प्रारुप पूर्वप्रसिध्द करणेस मान्यता असावी.

४) मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी सदरचे सेवाप्रवेश नियमांस मान्यता दिलेनंतर ते मा. शासन मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता असावी.

तरी, उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव मा. तदर्थ समितीपुढे निर्णयार्थ सादर.

16/12/2020

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

GA-Meeting- 23-2020

विषय क्र.- 08

मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

(सामान्य प्रशासन विभाग)

47

विषय:- स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करणेबाबत...

टिपणी-

संस्थानमार्फत आय.ए.एस.अॅकेडमी सुरु करणेबाबत मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेले आहेत.

अ. नं.	मा.व्यवस्थापन समिती सभेचा विषय नं., निर्णय क्रमांक व विषयाचा तपशिल	झालेला निर्णय
०१	मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२२/१२/२०१६, आयत्या वेळेचा विषय नं.०२, निर्णय क्र.९४७ श्री.काशिनाथ गोविंद पाटील, कोपरी, ता.वसई-विरार (पूर्व) जिल्हा ठाणे यांची मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७,१७८, २८२/१, २८४ व २८८ मधील भुखंड क्रमांक १ मधील इमारत बी व डी विनामोबदला हस्तांतर करणे व त्याठिकाणी संसथानमार्फत आय.ए.एस.अॅकेंडमी सुरु करणेबाबत.	श्री.काशिनाथ गोविंद पाटील, कोपरी, ता.वसई-विरार (पूर्व) जिल्हा ठाणे यांची मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७,१७८, २८२/१, २८४ व २८८ मधील भुखंड क्रमांक १ इमारत बी व डी विनामोबदला संस्थानला देणगी स्वरुपात हस्तांतरण करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच या इमारतींमध्ये राज्यातील गोर-गरीब, आदिवासी, वंचित, दुर्बल विद्यार्थ्यांसाठी राज्य लोकसेवा आयोगाच्या परिक्षेची तयारी करुन घेणे व त्यांना प्रशासकी सेवेचा लाभ मिळवून देणेकामी निवृत्त राजपत्रीत अधिका-यांच्या मार्गदर्शनाखाली आय.ए.एस.अॅकॅडमी सुरु करणेचा अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.
०२	मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक २३-२४/०५/२०१७, आयत्या वेळेचा विषय नं.२८, निर्णय क्रमांक ४४८ आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये संस्थान व्यवस्थापनाच्या दृष्टीने मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.	श्री.काशिनाथ गोविंद पाटील, कोपरी, ता.वसई-विरार (पूर्व) जिल्हा ठाणे यांनी त्यांचे मालकीच्या मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७,१७८, २८२/१, २८४/२८८/६ मधील बी व डी इमारती देणगी स्वरुपात संसथानला दिलेल्या आहेत. आजसे सभेत ते उपस्थित होते व त्यांनी समिती सभेसमोर सदरहू इमारतीची ताबा पावती मा.अध्यक्ष महोदय यांना दिली, त्यांनतर सभेने त्यांचा व त्यांचे सहाका-यांचा शॉल, श्रीफळ व उदी देऊन सत्कार केला. या देणगी मिळालेल्या इमारतीमध्ये उपेक्षित, वंचित, अदिवासी तसेच खेडोपाल्यामधील शेतक-यांच्या मुलांसाठी आय.ए. एस. अॅकॅडमी सुरु करण्याचा यापुर्वीच समितीने निर्णय समंत केलेला होता. यावेळी मा. अध्यक्ष महोदय यांनी सभेस माहीती दिली की, सेवा निवृत्त जेष्ठ सनदी अधिकारी श्री सुधिर ठाकरे यांनी विनामोबदला या अॅकॅडमीच्या गव्हर्निंग कौन्सिलचे अध्यक्षपद स्विकारणेस समंती दिलेली आहे. श्री सुधीर ठाकरे हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे ३ वर्ष अध्यक्ष होते. दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ पासून श्रींचे समाधी शताब्दी महाउत्सवास प्रारंभ होत असून, त्याच दिवशी सदरहु आय.ए.एस.अॅकॅडमी सुरु करण्यात यावी. यासाठी श्री.सुधीर ठाकरे यांना याकामी नेमणूक पत्र देणेकामी व गव्हर्निंग कौन्सीलसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी तसेच आय.ए.एस.अॅकॅडमीसाठीची सविस्तर नियमावली तयार करणेत येऊन ती समिती सभेपुढे सादर करणेत यावी, असे ठरले.

पान नंबर ०२ वर

अ. नं.	मा.व्यवस्थापन समिती सभेचा विषय नं., निर्णय क्रमांक व विषयाचा तपशिल	झालेला निर्णय
०३	मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक १५/०६/२०१७, आयत्या वेळेचा विषय नं.२०, निर्णय क्रमांक ५११ मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७,१७८,२८२/१, २८४ व २८८ मधील देणगी मिळालेल्या इमारत बी व डी मध्ये आय.ए.एस.अॅकॅडमी सुरु करणेबाबत.	मौजे निघोज, ता.राहाता येथील देणगी मिळालेल्या बी व डी इमारतीमध्ये आय.ए.एस.अॅकॅडमी सुरु करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच या अॅकॅडमीच्या गर्व्हनर कौन्सीलमध्ये सदस्य म्हणून मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष यांचेबरोबरच मा.अॅड.मोहन जयकर, मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे व मा.श्री.प्रताप भोसले या समिती सदस्यांचा समावेश करणेत यावा, असे ठरले.
०४	मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०/०८/२०१७, विषय नं.१०, निर्णय क्र.६८५ श्री साईबाबा संस्थानमार्फत I.A.S.अॅकॅडमी सुरु करणेसंदर्भातील विविध विषयावर चर्चा करुन धोरणात्मक निर्णय घेणे.	श्री साईबाबा संस्थानमार्फत सुरु करावयाच्या I.A.S.अॅकॅडमीच्या गर्व्हनिंग कौन्सीलमध्ये मा.श्री.सुधीर ठाकरे, मा.श्री.सुरेश हावरे, मा.श्री.चंद्रशेखर कदम, मा.अॅड.मोहन जयकर, मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, मा.श्री.प्रताप भोसले, मा.श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश करणेत यावा. तसेच या गर्व्हनिंग कौन्सिलने I.A.S.अॅकॅडमी सुरु करणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या विषयावर मार्गदर्शन करावे, असे ठरले. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपजिल्हाधिकारी – २, उपकार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व कार्यकारी अभियंता यांचे कार्यकारी मंडळ (Executive Council) तयार करणेस मान्यता देण्यात आली. श्री.सुधीर ठाकरे यांची संस्थानच्या प्रस्तावीत आयएएस अॅकेडमीच्या गर्व्हनिंग कौन्सिलच्या अध्यक्षपदी निवड करणेत आलेली आहे. आयएसएस अॅकेडमीच्या कामकाजासाठी श्री.सुधीर ठाकरे यांना शिर्डी येथे जाणे येणेसाठी व शिर्डी येथे वाहन व्यवस्था, निवासव्यवस्था, भोजनव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात यावी. तसेच शिर्डी येथील वास्तव्याच्या कालावधीत एक सुरक्षा कर्मचारी पुर्णवेळ त्यांचेबरोबर देणेत यावा, असे ठरले.
०५	मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक १५/०६/२०१७, आयत्या वेळेचा विषय नं.०६, निर्णय क्रमांक ३३५ श्री साईबाबा प्रशासकीय प्रबोधिनी (SSIAC) सुरु करणेबाबत.	प्रस्तावास मान्यता देणेत आली.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत आलेल्या आय.ए.एस.अॅकेडमी सुरु करणेकामी शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची मान्यता घ्यावी लागेल असे प्रस्तावीत करणेत आले होते, त्यानुषंगाने विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील क्र.सासंवि-१०१७/ १९९२/प्र.क्र.२२५/ का.१६ दि.१२ ऑक्टोबर, २०१८ रोजीचे पत्रान्वये कांही मुद्यांबाबत अहवाल / अभिप्राय शासनास सादर करणेबाबत निर्देश देवुन, आय.ए.एस. अकॅडमी सुरु करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली होती.

उपरोक्त तक्त्यात नमुद करणेत आय.ए.एस.अॅकॅडमीचे संदर्भातील अ.नं.०१ ते ०५ मधील नमुद मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय निरस्त करणेकामी मा. तदर्थ समितीचे दि. ०९/०६/२०२० रोजीचे सभेमध्ये आयत्या वेळचा विषय नं. ०६ अन्वये सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर झालेल्या निर्णय क्र. ३५४ नुसार-

पान नंबर ०३ वर

' यावर सविस्तर चर्चा झाली, सदर निर्णय अस्तीत्वात आणणेसाठी संस्थानला दैनंदिन बाबींकडे लक्ष द्यावे लागणार आहे. असेही लक्षात आले की त्यासाठी expert staff उपलब्ध होणे अशक्यप्राय आहे. अशा परिस्थितीत सदर इमारत विनावापर ठेवणे योग्य नाही. करीता मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील देणगी मिळालेल्या इमारतीमध्ये आयएएस ॲकॅडमी सुरु करणेबाबत तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५११ दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६८५ व दि. ०२/०५/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३३५ निरस्त करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले '

उपरोक्त निर्णयास अनुसरुन संस्थान पॅनलवरील ॲडव्होकेट यांना दि.०३/०७/२०२० रोजी सिव्हील ॲप्लीकेशनचा मसुदा तयार करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. सिव्हील ॲप्लीकेशनचा मसुदा तयार करुन दि.११/०९/२०२० रोजी मा. उच्च न्यायालयात दाखल करुन मान्यता मिळणेकामी पॅनलवरील ॲडव्होकेट यांचेकडे पाठविण्यात आलेले आहे. परंतु सदरचे सिव्हील ॲप्लीकेशन अद्यापपर्यंत मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेले नाही.

दरम्यान आता, मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील देणगी मिळालेल्या इमारतीमध्ये महाराष्ट्र शासनाची अंगीकृत संस्था यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने उपेक्षित, वंचित, अदिवासी तसेच खेडोपाडयातील शेतक-यांचे मुलांसाठी स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करणेबाबत (मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेशी) चर्चा झाली असुन यशदा, पुणे यांनी तशी करण्याची तयारी दर्शविलेली आहे.

प्रस्ताव:-१) मा. तदर्थ समितीच्या दि. ०९/०६/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ३५४ निरस्त करण्यास मान्यता मिळावी.

२) मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील देणगी मिळालेल्या ईमारतीमध्ये महाराष्ट्र शासनाची अंगिकृत राज्य प्रशिक्षण संस्था " यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे " यांना स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यास मान्यता मिळावी.

३) सदर स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यासाठी यशदा यांचे मागणीप्रमाणे आवश्यक सुविधा उदा. प्रशिक्षण हॉल, अद्ययावत करणे, पाणी, विद्युत व्यवस्था इत्यादी उपलब्ध करुण देणे.

४) सदर स्पर्धा परिक्षा केंद्रासाठी संस्थान + यशदा + महाराष्ट्र शासन यांचेत याबाबत संयुक्त करार करण्यास मान्यता असावी.

उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव मा. तदर्थ समितीसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- ०५

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर
(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

50

विषय:- श्री.भाऊसाहेब एकनाथ अनाप,सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना गैरशिस्तवर्तनाबाबत ठेवणेत आलेला "ठपका" रद्द करणेकरीता मा.अध्यक्ष, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडेस केलेल्या दि.१५.०६.२०२० रोजीचे अपील अर्जाबाबत....

टिपणी

(A) विषयाची पुर्वपिठीका-

श्री.अनाप हे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सहा.शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. ते दि.१५.०२.२०२० रोजी कर्तव्यावर होते.दि.१८.०२.२०२० पासुन इ.१२ वी.च्या बोर्ड परिक्षा सुरु होणार असल्याने व सदर परिक्षेचे केंद्र आपल्या महाविद्यालयात असल्याने त्या संदर्भात नियोजन करण्यासाठी दि.१५.०२.२०२० रोजी सकाळी ११.०० वा.कनिष्ठ महाविद्यालयाकडील सर्व सहा.शिक्षकांची सभा आयोजीत करण्यात आलेली होती. सदर सभेमध्ये त्यांनी प्रत्येक विद्याशाखेनुसार उपकेंद्र नेमण्याची मागणी केली. मुळात बोर्डाच्या नियमानुसार महाविद्यालयाकडील सेवाजेष्ठ शिक्षकांची इ.१२ वी. परिक्षा केंद्राचे उपकेंद्र प्रमुख म्हणून नेमणूक करावी, असे संकेत आहेत असे असतांनाही त्यांनी विनाकारण त्या विषयावर वाद घालत बसले व सभेतील वातावरण खराब केले, तसेच वेळेचा अपव्यय केला.

तसेच इ.१२ वी.ची बोर्ड परिक्षा चालु असतांना इ.११ वी.च्या विद्यार्थ्यांना सुट्टी देणेबाबत नियमावलीमध्ये कोणतीही तरतुद नसतांना श्री.अनाप हे वारंवार इ.११ वी.च्या विद्यार्थ्यांना परिक्षेच्या काळात सुट्टी द्या अशी अवास्तव मागणी करुन वाद घालत राहिलेत.

सदरची सभा ही इ.१२ वी.च्या परिक्षा संदर्भात असतांना त्यांनी मध्येच गोपनीय अहवालाचा मुद्दा उपस्थित केला कि," गोपनीय अहवाल अधिकारी न लिहिता इतर व्यक्ती लिहितात" असा आरोप त्यांनी सर्वासमोर केला, त्यांची सदरची बाब हि गंभीर आहे. तसेच सुरक्षारक्षकांची बदली करा, सुरक्षा रक्षकांना प्रशासन पाठीशी घालतात. ते आम्हांला नियम शिकवतात वगैरे असे आवंतर मुद्दे त्यांनी उपस्थित करुन, सभेच्या पर्यायाने प्रशासकिय कामकाजात अडथळा निर्माण केला. तसेच पुर्ण सभेच्या कालावधीत ते अत्यंत चिथावणीखोर वर्तन करत होते. तसेच इतर शिक्षकांना प्रशासनाच्या विरुध्द भडकविण्याचा प्रयत्न करत असल्याचे निदर्शनास आले आहे.

श्री.अनाप हे नेहमीच प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाचे विरोधात वर्तन करत असतात, ते इतर शिक्षकांना भडकविणे, चिथावणीखोर वक्तव्य करुन प्रशासन व विभागाकडील वातावरण कलुषित करणे, बेजबाबदारपणाने वागणे असे कृत्य करत असतात. त्यांचे अशा वागण्यामुळे दैनंदिन शालेय व प्रशासकिय कामकाजात मोठया प्रमाणात अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

त्यांचे उपरोक्त गैरवर्तनांमुळे दि.१५.०२.२०२० चे सभेत मुळ विषयास बगल देऊन, इतर आवंतर विषयांवर चर्चा होऊ लागलेली होती.त्यामुळे इ.१२ वी.च्या अत्यंत महत्वाच्या बोर्ड परिक्षेच्या नियोजनाकरीता जादा वेळ खर्ची पडला. तसेच इतर शिक्षक देखील नियमामध्ये नसलेल्या गोष्टीची मागणी करु लागले व त्यांना श्री.अनाप यांचेमुळे प्रशासनाचे विरोधात विथावणी मिळाली.

असे त्यांचे विरुद्ध प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडून कर्मचारी गैरवर्तनाबाबत रिपोर्ट आलेला आहे. त्यांचे सदरचे कृत्य गंभिर गैरशिस्त वर्तनात मोडते.

श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना द्यावयाचे कारणे दाखवा नोटीसीबाबत इकडील दि.२६.०२.२०२० रोजीचे टिपणी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली होती. सदरचे टिपणीवर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी,"Call the Personally" असे निर्देश दिलेले होते.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशास अनुसरुन श्री.वरघुडे,प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना दि.०४.०३.२०२०, दि.१०.०३.२०२०, दि.११.०३.२०२० रोजी श्री.वरघुडे,प्राचार्य, श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना मुख्य कार्यकारी अधिकारी कक्ष येथे सकाळी १०.०० वा. हजर राहणेबाबत दुरध्वनीद्वारे कळविणेत आलेले होते.

पान नं.२ वर..

त्यास अनुसरुन दि.११.०३.२०२० रोजी सकाळी १०.०० वा.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षेत श्री.वरघुडे,प्राचार्य व श्री.अनाप हजर होते व श्री.संगमनेरे हे गैरहजर होते.

दि.२६.०२.२०२० रोजीचे टिपणीवर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी," १) अनाप हजर त्यांचे म्हणणे परत घेणे.अनाप यांना किरकोळ शिक्षा का करण्यात येऊ नये अशा आशयाची Show cause Notice काढा.२) संगमनेरे गैरहजर, पुर्वकल्पना न देता गैरहजर.श्री.संगमनेरे यांना निलंबीत का करण्यात येऊ नये अशी नोटीस काढा."असे निर्देश दिलेले होते.

उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत श्री.अनाप यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२८२६/२०२०, दि.१७-०३-२०२० अन्वये लेखी खुलासा मागविणेत आला होता. त्यास अनुसरुन त्यांनी दि.२३.०३.२०२० व दि.०३.०४.२०२० रोजीचे दोन खुलासे सादर केलेले आहेत.

त्यांना करावयाचे शिक्षेबाबत इकडील दि.०७.०५.२०२० रोजीची टिपणी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली होती. सदरचे टिपणीवर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, ठपका ठेवण्यात येत आहे, असे निर्देश दिलेले होते.

श्री.अनाप यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ (१) मध्ये नमूद केल्यानुसार, शिक्षा म्हणून त्यांचेवर "ठपका" ठेवणेत येतो की, यापुढे त्यांचेकडून उपरोक्त प्रमाणे गैरशिस्त वर्तन घडणार नाही याची दक्षता घ्यावी असे उपरोक्त संदर्भीय शिक्षेचे पत्र देण्यात आले.

(B) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी पारीत केलेल्या शिक्षेचा आदेश रद्द करणेचा अधिकार मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना आहे.

श्री.अनाप यांनी संदर्भ क्रं.०१ चा ठपका आदेश रद्द करणेबाबत मा.अध्यक्ष, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे दि.१५.०६.२०२० रोजीचा अपिल अर्ज केलेला आहे व सदर अर्जाची एकप्रत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडेस आवक विभागामार्फत सादर केलेली आहे.

श्री.अनाप यांनी दि.२५.०६.२०२० रोजी केलेल्या अपील अर्जात त्यांनी," अ) अपिलाची कारणे :-

१) माझ्या दि.२३/०३/२०२० रोजीचे खुलाशासोबतची कागदपत्रे कदाचित मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर झाली नासावीत. दिनांक २१/०५/२०२० रोजी प्राप्त झालेले संदर्भीय पत्राने माझ्यावर ठपका ठेवण्यात आला आहे की, दि.१५/०२/२०२० रोजी इयत्ता १२ वी च्या बोर्ड परीक्षा केंद्राचे कामाचे नियोजनासाठी सकाळी ११.०० वाजता सर्व सहाय्यक शिक्षकांची सभा आयोजित केली होती. तुम्ही प्रत्येक विद्या शाखेनुसार उप केंद्र प्रमुख नेमण्याची मागणी केली. बोर्डाच्या नियमानुसार सेवाजेष्ठ शिक्षकाची उपकेंद्र प्रमुख म्हणून नेमणूक करावी असे संकेत असतानाही तुम्ही अवास्तव मागणी करुन त्या विषयावर विनाकारण वाद घालून सभेचे वातावरण खराब केले. वेळेचा अपव्यय केला. सदर सभेत तुम्ही असा आरोप केला की, गोपनीय अहवाल अधिकारी न लिहिता इतर व्यक्ती लिहितात. तसेच सुरक्षारक्षकाची बदली करा, सुरक्षा रक्षकांना प्रशासन पाठीशी घालतात, असे मुद्दे उपस्थित करुन प्रशासकीय कामात अडथळा निर्माण केला. तुम्ही चिथावणी देऊन इतर शिक्षकांना भडकाविणे, चिथावणीखोर वक्तव्य करणे, वातावरण कलुषीत करणे, सदरचे कृत्य गंभीर व गैरशिस्त वर्तनात मोडते. असे संदर्भीय पत्रात असत्य निराधार कथने करुन माझ्यावर ठपका ठेवणेत आला आहे.

२) संदर्भीय पत्रापूर्वी याचकामी मला दि.१७/०३/२०२० रोजी कारणे दाखवा नोटीस बजावून माझा लेखी खुलासा मागविणेत आला होता. मी माझा दिनांक २३/०३/२०२० रोजीचा खुलासा सादर केला होता. त्यात मी माझी बाजू व्यवस्थित मांडलेली आहे. खुलाशासोबत मी आवश्यक ती कागदपत्रे सादर केलेली आहेत. परंतु संदर्भीय ठपका पत्रकाम मी खुलाशा सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचा उल्लेख नाही. यदाकदाचित खुलाशा सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन झालेले नसावे किंवा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर झालेले नसावे.

३) मा.मुख्याध्यापक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी माझ्या दिनांक २३/०३/२०२० रोजीचे खुलाशा बाबत दि.०४/०५/२०२० रोजीचा अहवाल सादर केलेला आहे. त्यात मुद्दा नं.१ मध्ये असे कथन केले आहे की, बोर्डाच्या संकेतानुसार श्री.शिवगजे व सौ.सावंत यांची उपकेंद्र प्रमुख म्हणून नेमणूक केलेली आहे. श्री.शिवगजे सर यांना मागील १५ वर्षापासून केंद्रप्रमुख पदाचा अनुभव आहे. वास्तविक सदरचे विधान धादांत खोटे आहे. कारण आपल्याला इयत्ता १२ वी केंद्राची

पान नं.३ वर..

मान्यता सन २००७ पासून मिळालेली आहे. त्यापैकी ८ वर्षे सौ.चव्हाणके मॅडम , मुख्याध्यापिका तर २ वर्षे श्रीमती मिरजकर मॅडम , मुख्याध्यापिका व २ वर्षे मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी केंद्र प्रमुख म्हणून काम केलेले आहे. दुसरे असे की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी केंद्र संचालक व पर्यवेक्षक यांच्यासाठी मार्गदर्शक सुचना पुस्तिकेत पान नं.१६ नियम २.२.४ मध्ये असे म्हटले आहे की, केंद्रास जोडलेल्या स्थानिक शाळांच्या / कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकातून उपप्राचार्यातून जेष्ठ शिक्षकतून सक्षम उपकेंद्र संचालकाची नियुक्ती करावी. आपल्या श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.वरगुडे सर आहेत. श्री.शिवगजे व श्री.सावंत हे सहाय्यक शिक्षक आहेत. त्यांची उपकेंद्र प्रमुख म्हणून केलेली नियुक्ती निसमबाहय आहे. याच मार्गदर्शक सूचना पुस्तिकेत पान नं.२१ वर असे म्हटले आहे की, (४:१-४.) प्रयोगशाळा सहाय्यक / प्रयोगशाळा परिचर व शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयाचे विद्यार्थी यांना पर्यवेक्षक म्हणून नेमण्यात येऊ नये. परंतु प्रत्यक्षात पर्यवेक्षक चार्टचे अवलोकन करता असे दिसते की, पर्यवेक्षक म्हणून प्रयोगशाळा सहाय्यक श्री.विलास आंबेकर व श्री.मिनीनाथ कोते यांची नियुक्ती करण्यात आली होती. थोडक्यात प्रत्येक वेळी निसमांचा भंग केला जातो.

अभिप्राय अहवालात मुद्दा क्र.१ मध्ये असेही म्हटले आहे की, श्री.शिवगजे सरांबाबत केलेले आरोप सन २०१७ मधील असून दोन प्रशासकीय अधिकारी समितीने चौकशी करुन अहवाल सादर केलेला आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, हा अहवाल प्रशासनासमोर आलेला नसून त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही.

अहवालात मुद्दा नं.२ बाबत मुख्याध्यापकांनी असे म्हटले आहे की, यावर्षी वरिष्ठ महाविद्यालयाची इमारत उपलब्ध असल्याने इयत्ता ११ वीचे वर्ग तिकडे भरविण्याबबात सुचना दिल्या. इतर शिक्षकांनी मान्य केले. मात्र अनाप सरांनी विरोध करत आम्ही इयंत्ता १२ वीचे कामकाज करावयाचे की इयत्ता ११ वीचे वर्ग पहायचे ? परीक्षेमध्ये काही अडचधी आल्यास त्यास मुख्याध्यापक जबाबदार राहतील, असे बोलून शिक्षकांना भडकावले. नियोजनाचे मिटींगमध्ये मी माझी अडचण मांडली. त्यावर मुख्याध्यापक या नात्याने त्यांचे मार्गदर्शन अपेक्षीत होते. ते त्यांनी केले नाही, मी शिक्षकांना भडकावले नाही.

मुद्दा नं.३ मध्ये असेही म्हटले आहे की, श्री.अनाप यांनी सर्व शिक्षकांसमोर अरेरावीने वागणूक गैरवर्तन केले आणि इतर शिक्षकांना चिथावणी दिली. मी अरेरावीने वागलो नाही, इतर शिक्षकांना चिथावणी दिली नाही.

मुद्दा क्र.४ मध्ये असे म्हटले आहे की, सभेमध्ये इयत्ता १२ वी परक्षिचे नियोजनाचे कामकाज सुरु असताना श्री.अनाप सर व श्री.संगमनेरे सर यांनी मध्येच उठून म्हटले की, तुम्ही गोपनीय अहवाल इतर व्यक्तीकडून लिहून घेता, ते श्रेणी देताना भेदभाव करतात. तसेच मागील वर्षी इयत्ता १२ वी परीक्षा सुरु असताना श्री.अनाप व इतर काही शिक्षकांनी संबंधित सुरक्षा रक्षकाशी विनाकारण वाद केले. सदरचे विधान खोटे आहे. मुख्याध्यापक यांनी इतर शिक्षक कोण ? याचा उल्लेख केलेला नाही. यावरुन संदिग्धता दिसून येते दिसून येते. मग त्या इतर शिक्षकाविरुध्द मुख्याध्यापक यांनी गैरवर्तन रिपोर्ट का सादर केला नाही, हा प्रश्न निर्माण होतो.

४) मुद्दा क्र.५ बाबत असे म्हटले की, दि.२६/०२/२०२० रोजीची टिपणी मी सादर केली नव्हती. सामान्य प्रशासन विभागाकडून दि.०४/०३/२०२० रोजी कळविण्यात आले की, मुख्याध्यापक श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समक्ष चर्चेसाठी बोलावले. त्यानंतर दि.१०/०३/२०२० रोजी पुन्हा निरोप आला की, दिनांक ११/०३/२०२० रोजी सकाळी १०.०० वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात हजर राहावे. कंत्राटी लिपीक श्रीसचिन कोपरे यांनी दि.१०/०३/२०२० रोजी रात्री ८.१९ वाजता श्री.अनाप यांना त्यांचे भ्रमणध्वनीव्दारे निरोप दिला. वास्तविक या बाबत दि.०४/०३/२०२० रोजी मला अवगत करणे आवश्यक होते.

मुद्दा क्र.६ बाबत श्री.अनाप अप्रत्यक्ष धमकी देत असतात. सहाय्यक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी श्री.अनाप यांच्या खुलाशा अभिप्रायावर सहया केलेल्या आहेत. हेच सहा.शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सभेमध्ये वाद घालत होते. मा.मुख्याध्यापकांचे सदरचे म्हणणे असत्य व निराधार आहे. जर हे सहा कर्मचारी सभेत वाद घालत होते तर मुख्याध्यापकांनी त्यांच्या विरुध्द गैरवर्तन रिपोर्ट का सादर केला नाही. फक्त माझे विरुध्द रिपोर्ट केल्याने मुख्याध्यापकांचा सापत्नतेचा भाव दिसून येतो.

पान नंबर ४ वर..

वस्तुसिथती अशी आहे की, सदरच्या सहा जणांनी असे लेखी निवेदन सादर केले आहे की, दि.१५/०२/२०२० रोजीचे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयातील सभेबाबत मा.मुख्याध्यापक यांनी श्रीअनाप सर यांच्याबाबत प्रशासनाला वाद नसून फक्त चर्चा झालेली होती. मा.मुख्याध्यापक यांनी कळविल्याप्रमाणे काहीही झालेले नाही. सदरच्या निवेदनाचा विचार झालेलर नाही. शिक्षक सभेच्या इतिवृत्तात फक्त चर्चा झाल्याची नोंद आहे.

मुद्दा नं.७ मध्ये म्हटले की, श्री.अनाप सेवाजेष्ठता यादीत १४ व्या क्रमांकावर आहे. त्यामुळे त्यांचे रेकॉर्ड खराब करण्याचा हेतू नसून गैरवर्तनाबाबत वरिष्ठांना अवगत करण्यात आले आहे. मुलतः मुख्याध्यापकांचे रिपोर्टनुसार काही गैरवर्तन माझ्याकडून झालेले नाही. सभेमध्ये मी केवळ अडचणी, समस्या याबाबत चर्चा केली की, ज्यासाठी सभा आयोजित केली होती.

श्री.शिवगजे सर यांच्या सांगण्यावरुन मुलांचे पैसे बॅकेत भरले, याबाबत माझ्या दिनांक ०३/०४/२०२० रोजीचे खुलाशाबाबत मा.मुख्याध्यापक यांनी असा अभिप्राय दिला आहे की, त्या प्रकरणाची संस्थान प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत चौकशी होऊन सदरचे प्रकरण सन २०१७ मध्ये संपलेले आहे. महोदय, मी आपले निदर्शनास आणुन देतो की, श्री.शिवगजे सर यांचे विरुध्दच्या तक्रारी व प्रकरणाचा चौकशीचा फार्स / नाटक करण्यात आलेले आहे. त्या प्रकरणाबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अंतिम निर्णय झालेले नाहीत. कदाचित त्यासाठी मुख्य मुख्य कार्यकारी अधिकारी समोर सादर झाली नसावीत.

मा.मुख्याध्यापक यांनी अभिप्राय अहवालात माझ्यांवर असा आरोप केला की, नोटीसीचा खुलासा परस्पर सादर केला. वस्तुस्थिती अशी आहे की, मी माझा खुलासा मुख्याध्यापकांना दाखवला होता. त्यांचे असे म्हणणे होते की, खुलाशातील काही विधाने वगळावीत, तरच ते खुलासा त्यांचेमार्फत पाठवतील. परंतु ती विधाने म्हणजे वस्तुस्थितीदर्शक व माझ्या बचावासाठी आवश्यक होती. त्यामुळे ती विधाने मजकूर मी वगळण्यास तयार नव्हतो तर त्याशिवाय मुख्याध्यापक माझ्या खुलाशावर स्वाक्षरी करणेस तयार नव्हते. परिणामी मला नाईलाजाने माझा खुलासा थेट सादर करावा लागला.

ब) अपिलाची पार्श्वभुमी :-

सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून इयत्त ११ वी कनिष्ठ महाविद्यालय सुरु झाले. श्री.वरगुडे सर यांनी दि.२७/०४/२०१८ पासून मुख्याध्यापक पदाचा कार्यभार स्विकारलेला आहे. त्यापूर्वीचा इतहिास व घटना या बाबत श्री.वरगुडे सर अनभिज्ञ आहे. जावक नं.वशी १-१८९२ दि.०४/०७/२००८ अन्वये कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग व प्रयोगशाळा जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीत स्थलांतरीत झाले. त्यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे दैनंदिन प्रशासन व नियंत्रण श्री.शिवगजे सर यांचेकडे सोपवण्यात आले. त्याचा गैरफायदा / गैरवापर श्री.शिवगजे यांनी घेतला आहे. प्राचार्य किंवा उपप्राचार्य पद मिळावे यासाठी संस्थान दरबारी खोटे, चुकीचे रेकॉर्ड तयार केले. संस्थान प्रशासन व व्यवस्थापन यांना श्री.शिवगजे सर यांनी खोटी, चुकीची, अपुर्ण, दिशाभूल करणारी माहिती सादर केली. त्याबाबतची माहिती ज्यांनी वरिष्ठांना देण्याचा प्रयत्न केला त्यांचे रेकॉर्ड खराब करण्याचा श्री.शिवगजे सरांनी प्रयत्न केलेला आहे. हे खालील घटनांवरुन आपले निदर्शनास येईल.

१) मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक ०३/०१/२००९, विषय नं.२९ चे अवलोकन करता असे दिसले की, श्री.शिवगजे सर यांनी त्यांना कनिष्ठ महाविद्यालयाचे उप प्राचार्य पद मिळावे यासाठी प्रस्ताव सादर केला होता. त्यावर असा निर्णय झाला की, उप प्राचार्य पदाची उपलब्धता, त्याचे निकष व शैक्षणिक पात्रता इ.बाबत मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडून पडताळणी करुन घेऊन, त्या पदासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत. याचाच अर्थ श्री.शिवगजे सर यांची उप प्राचार्य पदासाठीची पदोन्ती नाकारण्यात आली. या निर्णयाप्रमाणे कार्यवाही केल्यास आपली उप प्राचार्यपदी वर्णी लागणार नाही म्हणून श्री.शिवगजे सर यांनी या निर्णयामुळे कार्यवाही केली नाही. श्री.शिवगजे सर यांनी मा.व्यवस्थापनाच्या निर्णयाची अंमलबजावणी न करता केराची टोपली दाखविली.

पान नं.५ वर..

दि.१५/१२/२०१६ रोजी १२ सेवकांनी व दि.३०/०६/२०१७ रोजी ६ शिक्षकांनी श्री.शिवगजे सर यांचे विरोधात तक्रार अर्ज सादर केले होते. त्यात अशा तक्रारी केल्या की, श्री.शिवगजे सर अध्यापनाकरीता वर्गावर जात नाहीत. बाहेर जाताना मुव्हमेंट रजिस्टरवर नोंद करीत नाही, विहिती अभ्यासक्रम विहित वेळेत पुर्ण करीत नाहीत, श्री.शिवगजे सर यांनी इयत्ता १२ वीचे विद्यार्थ्यांची परीक्षा फीची रक्कम स्वतःचे वैयक्तिक बॅंक खात्यात जमा केली. विद्यार्थ्यांचे प्रॅक्टीकल घेत नाहीत, विद्यार्थ्यांना फी भरणाबाबत संस्थानची अधिकृत पावती न देता कॉम्प्युटर प्रिंट पावती देतात; विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर श्रीशिवगजे सर यांनी अनाधिकारे प्राचार्य म्हणून स्वाक्षरी केल्या, या व इतर अनेक तक्रारींबाबत तत्कालीन प्रशासकीय अधिकारी श्री.गमे साहेब यांचे समोर सुनावणी झाली. परंतु चौकशी अहवाल मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समोर सादर झाला नसावा. त्यामुळे त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही.

२) व्यवस्थापन समितीची सभा दि.०७/०८/२०१६, विषय नं.१९ प्रस्तावाचे अवलोकन करता असे आढळून येते की, मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचेशी कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी परस्पर (संदर्भ जा.क्र.एसएसएस-कन्या-कनिष्ठ/१०५३८ दि.०९/०९/२०१६) पत्रव्यवहार करुन शाळेच्या नावात बदल केला. संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार विभागाचे नावात बदल करावयाचा असल्यास त्याबाबत प्रथम व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन त्यानंतर प्रशासनामार्फत कार्यालयीन आदेश पारित करुन नावात बदल केला जातो. मात्र शाळेच्या नावात बदल करतेवेळी मा.व्यवस्थापन समितीची अथवा मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेतलेली नाही. यावर असा निर्णय झाला की, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर ऐवजी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय असा नावात केलेला बदल रद्द करणेत येऊन त्या ऐवजी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी असा बदल करणेस मान्यता देण्यात आली. महोदय, श्री.शिवगजे सर यांनी शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडे संच मान्यतेसाठी (कार्यभार निश्चिती व पट पडताळणी) सादर केलेल्या प्रस्तावावर अनाधिकारे शाळेचे नाव बदलून श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय ऐवजी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय अशी नोंद केली आहे. मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास न जुमानता सन २०१६-२०१७ च्या प्रस्तावात जुनेच नावाने (श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी) नोंद केली. तसेच प्राचार्य हे पद नसतांना श्री.शिवगजे सर यांनी अनाधिकारे सन २०१३-२०१४ च्या प्रस्तावात प्राचार्य म्हणून स्वाक्षरी केली आहे.

४) इयत्ता १० वी परीक्षेत सामान्य गणित हा विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी मध्ये गणित हा विषय अभ्यासता येत नाही, असा नियम आहे. तरी देखील श्री.शिवगजे सर यांनी अशा एका विद्यार्थ्याससन २०१५ मध्ये प्रवेश दिला. त्यामुळे विभागीय सचिव, पुणे, विभागीय मंडळ, पुणे यांनी त्यांचे पत्र जावक नं.६७५ दि.०३/०७/२०१७ अन्वये संस्थानला रु.१,०००/- (अक्षरी रुपये एक हजार मात्र) दंड केला. अशाप्रकारे श्री.शिवगजे सर यांनी नियमाची पायमल्ली केली आहे. संस्थानचे आर्थिक नुकसान झाले. संस्थानच्या इभ्रतीला धोका पोहचला.

५) श्री.विकास महादेव शिवगजे सर यांना आतापर्यंत गैरवर्तनाबद्दल खालीलप्रमाणे शिक्षा झाल्यात.

अ.नं.	जावक नं.	दिनांक	गैरवर्तनाचे स्वरुप	शिक्षा
१)	३१२६	१८/११/२०१५	दि.२९/०२/२०१५ रोजीचे बैठकीस उशिरा हजर झाले.	ठपका
२)	५४५	१८/०५/२०१६	वर्कशीट दि.२६/१०/२०१५ ते ३१/१०/२०१५ उशिरा सादर केले, शिक्षण सेवक व प्रयोगशाळा सहाय्यक वेतनश्रेणी प्रस्ताव उशिराने सादर केला.	ताकीद
३)	४०६७	१५/०२/२०१७	नोव्हेंबर २०१६ मध्ये एकही दैनंदिन अहवाल सादर केला नाही.	समज
४)	४४०२	२२/०३/२०१७	नाताळ सुट्टी दि.२९/१२/२०१६ ते दिनांक ०२/०१/२०१७ साईभक्त दर्शन लाईन नियोजनाचे काम व्यवस्थित केले नाही, नोटीसीचा खुलासा केला नाही.	ठपका

पान नं.६ वर..

अ.नं.	जावक नं.	दिनांक	गैरवर्तनाचे स्वरुप	शिक्षा
५)	२२७८	०४/०९/२०१७	विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याचे दाखल्यावर स्वाक्षरी करु नये, असे बजावले असतांनाही अनाधिकारे उप प्राचार्य म्हणून स्वाक्ष-या केल्या. कॉलेजच्या नावात बदल केलेला असतांनाही जुने नावानेच दाखल्याचे वाटप केले. खुलाशा सोबत राजकीय व्यक्तीचे शिफारस पत्र जोडून प्रशासनावर राजकीय दबाव आणला.	ठपका
६)	३४५३	०५/१२/२०१७	कर्तव्यात कसूर केला, नोटीसीचा खुलासा सादर केला नाही.	ठपका
७)	१९४८	०२/१०/२०१८	१) दि.०६/०१/२०१८ रोजी शिक्षक सुचना वही मुख्याध्यापिका मिरजकर यांचे टेबलावरुन विना परवाना घेऊन स्वतःकडे ठेवले, परत मागितली असता देणार नाही असे उध्दट उत्तर दिले. २) सन २०१७-१८ मध्ये इ.११ वी सायन्स तुकडी ब चे वर्ग शिक्षक असतांना एकाही महिन्यात विद्यार्थी हजेरी पत्रक तपासणी करुन पुर्ण केले नाही. लेखी तोंडी सुचना देऊनही पूर्तता न केल्याने संच मान्यता कामकाजात अडचणी आल्या. अशाप्रकारे कामात हलगर्जीपणा व बेजबाबदारपणा केला. याबाबतच्या नोटीसीचा देखील लेखी खुलासा सादर केला नाही.	ठपका
८)	१२७७	०२/०८/२०१८	दि.१६/०२/२०१८ रोजी दुपारी २.३० वाजता कंत्राटी महिला शिक्षिका श्रीमती शबाना सय्यद यांना शिपायामार्फत बोलावून घेतले व त्यांना जाब विचरला की, माझा टेबल का सरकावला, असा आगाऊपणा करु नका, असे म्हणून दम दिला. श्रीमती सय्यद यांनी सांगितले की, त्यांनी टेबल सरकावला नाही. त्यांचे ऐकून न घेता दम दिला. प्राचार्या मिरजकर यांनी समजावण्याचा प्रयत्न केला असता त्यांना म्हणाले की, तुम्ही शहाणपणा करु नका, कशाला मला खेटायला येता, तुम्ही सगळी घाण करुन ठेवली, कशाला इकडे झक मारायला येता, अशा असभ्य भाषेत महिला शिक्षिका व प्राचार्या यांना बोलले: घटनेचे वेळी घटनास्थळी बरेच विद्यार्थी, शिक्षक हजर होते. याबाबतच्या कारणे दाखवा नोटीसीचा लेखी खुलासा सादर केला नाही. श्री.शिवगजे सर यांचे तत्कालीन प्रशासकीय अधिकारी यांचेशी लागेबांधे असल्याने एवढे गंभीर गैरशिस्त वर्तन असतांनाही त्यांना किरकोळ शिक्षा झालेल्या आहेत.	ताकीद

६) कनिष्ठ महाविद्यालयातील एका शिक्षकाला मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी नेमणूक आदेश दिलेला आहे. त्या आदेशात श्री.शिवगजे सर यांनी परस्पर अनाधिकारे फेरफार व बदल करुन दुसरा नेमणूक आदेश त्याच जावक नंबर व तारखेचा दिला आहे.

अशाप्रकारे श्री.विकास महादेव शिवगजे सर उप प्राचार्य पद मिळविण्यासाठी चुकीची, बेकायदेशीर, नियमबाहय कृत्ये व गैरकृत्ये करतात. त्यास मी विरोध करतो व वरिष्ठ अधिकारी यांचे निदर्शनास आणुन देतो. त्याचा राग मनात धरुन श्री.शिवगजे सर माझे रेकॉर्ड खराब करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

पान नं.७ वर..

वरील कथनांच्या सत्यतेसाठी माझेकडे आधारभूत कागदपत्रे उपलब्ध आहेत. परंतु संस्थान व्यवस्थापन, प्रशासन, संस्थानचे शैक्षणिक संकुल यांची बदनामी होऊ नये, नावलौकीकास बाधा पोहचू नये म्हणून ती कागदपत्रे या अपिलासोबत सादर केलेली नाहीत. परंतु आपण परवानगी दिल्यास मी ती कागदपत्रे सुनावणीच्या वेळी आपल्या समोर सादर करणेस तयार आहे.

सबब, माझी नम्र प्रार्थना की,

१) संदर्भीय आदेशानुसार मला झालेली शिक्षा रद्द करावी.

२) वरील सर्व घटनांबाबत संबंधितांची विभागीय चौकशी करणेत यावी. "असे म्हटलेले आहे.

C) श्री.भाऊसाहेब एकनाथ अनाप, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत त्यांना संदर्भ क्रं.१ अन्वये ठपका हि शिक्षा करणेत आलेली होती.त्यांनी शिक्षा रद्द करणेकरीता दि.१५.०६.२०२० रोजी केलेल्या अपील अर्जात त्यांनी केलेले गैरशिस्तवर्तनाचा विषयास बगल देवुन, श्री.गंगाधर वरघुडे,प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी व श्री.विकास महादेव शिवगजे,सहा.शिक्षक यांचेबद्दल कथन केलेले असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

श्री.अनाप यांनी दि.१५.०६.२०२० रोजीचा अपील अर्ज मा.अध्यक्ष, महोदय, व्यवस्थापन समिती यांनी अग्रेषित केलेले व प्रत माहितीसाठी कार्यवाहीसाठी सविनय सादर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब अशा दोन प्रती इकडील आवक विभागास दिलेल्या आहेत.श्री.अनाप यांचा दि.१५.०६.२०२० रोजीचा अपील अर्ज प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे सोबतचे पत्रासोबत पाठविणेत येवुन त्यावर त्यांचा स्पष्ट अभिप्राय घेण्यात येवुन पुढील योग्य ती कारवाई करता येईल. तरी प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना दयावयाचे सोबतचे पत्रावर स्वाक्षरी होणेस विंनती याबाबत इकडील दि.०४.०७.२०२० रोजीची टिपणी सादर करणेत आलेली होती.दि.०४.०७.२०२० रोजीचे मंजुर टिपणीनुसार जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/४६९/२०२०, दि.१०-०७-२०२० रोजीचे पत्रासोबत प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांना श्री.अनाप यांचा दि.१५.०६.२०२० रोजीचा अपील अर्जाची छायांकित प्रत त्यांचे स्वयंस्पष्ट अहवालाकरीता पाठविणेत आलेली होती.

D) त्यास अनुसरुन प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी श्री.अनाप यांचे दि.१५.०६.२०२० रोजीचे अपील अर्जावर दि.२८.०७.२०२० रोजीचा स्वयंस्पष्ट अहवाल प्रशासकिय अधिकारी यांचेमार्फत इकडील कार्यालयास सादर केलेला आहे. त्यात त्यांनी," श्री.भाऊसाहेब एकनाथ अनाप, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी त्यांचे दि.१५.०६.२०२० रोजीचे पत्रान्वये त्यांचेबाबत व्यवस्थापन समिती यांचेकडेस करणेत आलेली शिक्षा रद्द करणेबाबत अपील अर्ज दाखल केलेला आहे. त्यावर माझी स्वाक्षरी व अभिप्राय नाही. त्यानुसार संदर्भीय पत्रान्वये श्री.अनाप यांनी दि.१५.०६.२०२० रोजीचा सादर केलेला अपील अर्जातील कथनाबाबत मुद्देनिहाय स्वयंस्पष्ट लेखी अभिप्राय प्रशासकीय अधिकारी यांचे मार्फत सादर करणेबाबत आदेशीत करण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

अ.क्र	अपिल अर्जातील मुद्दे	स्वयस्पष्ट अभिप्राय
०१.	माझ्या दि.२३/०३/२०२० रोजीचे खुलाशासोबतची कागदपत्रे कदाचित मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर झाली नसावीत. दिनांक २१/०५/२०२० रोजी प्राप्त झालेले सदर्भीय पत्राने माझ्यावर ठपका ठेवण्यात आला आहे की, दि.१५/०२/२०२० रोजी इयत्ता १२ वी च्या बोर्ड परीक्षा केंद्राचे कामाचे नियोजनासाठी सकाळी ११.०० वाजता सर्व सहाय्यक शिक्षकांची सभा आयोजित केली होती. तुम्ही प्रत्येक विद्या शाखेनुसार उपकेंद्र प्रमुख नेमण्याची मागणी केली. बोर्डाच्या नियमानुसार सेवाज्येष्ठ शिक्षकाची उपकेंद्र प्रमुख म्हणून नेमणूक करावी असे संकेत असतांनाही तुम्ही अवास्तव मागणी करून त्या विषयावर विनाकारण वाद घालून सभेचे वातावरण खराब केले, वेळेचा अपव्यय केला. सदर सभेत तुम्ही असा आरोप केला की, गोपनीय अहवाल अधिकारी न लिहिता इतर व्यक्ती लिहितात. तसेच सुरक्षा रक्षकाची बदली करा, सुरक्षा रक्षकांना प्रशासन पाठीशी घालतात, असे मुद्दे उपस्थित करून प्रशासकीय कामात अडथळा निर्माण केला.तुम्ही चिथावणी देऊन इतर शिक्षकांना प्रशासनाच्या विरोधात भडकाविण्याचा प्रयत्न करतात. तुम्ही प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाचे विरोध करतात, इतर शिक्षकांना भडकाविणे, चिथावणीखोर वक्तव्य करणे, वातावरण कलुषीत करणे, सदरचे कृत्य गंभीर व गैरशिस्त वर्तनात मोडते. असे संदर्भीय पत्रात असत्य निराधार कथने करून माझ्यावर ठपका ठेवणेत आला आहे.	श्री.अनाप यांनी खुलाशा सोबतचे कागदपत्रे कदाचित मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर झाली नसावीत, असा निराधार आरोप केलेला दिसून येत आहे. संस्थानचे प्रचलित पद्धतीने कारणे दाखवा नोटीसचा खुलासा व त्यासोबतचे कागदपत्रे हे वशी-शिस्त विभागामार्फत पदोसोपान पद्धतीने वरिष्ठांकडे अवलोक - नार्थ व निर्णयार्थ सादर करण्यात येत असतात. त्यानुसार अनाप यांचेवर संस्थानच्या प्रचलित पद्धतीने शिस्तभंगाची कारवाई झालेली आहे. मात्र श्री.अनाप यांनी सदर मुद्यानुसार सबंधीत विभागवर अप्रत्यक्षपणे निराधार आरोप केलेले दिसून येत आहे.

पान नं.८ वर..

अ.क्र.	अपिल अर्जातील मुद्दे	स्वयस्पष्ट अभिप्राय
०२.	संदर्भीय पत्रापूर्वी याचकामी मला दि.१७/०३/२०२० रोजी कारणे दाखवा नोटीस बजावून माझा लेखी खुलासा मागविणेत आला होता.मी माझा दिनांक २३/०३/२०२० रोजीचा खुलासा सादर केला होता. त्यात मी माझी बांजू व्यवस्थीत मांडलेली आहे. खुलाशा सोबत मी आवश्यक ती कागदपत्रे सादर केलेली आहेत. परंतु संदर्भीय ठपका पत्रकात मी खुलाशा सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचा उल्लेख नाही. यदाकदाचित खुलाशा सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन झालेले नसावे किंवा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर झालेले नसावे.	श्री.अनाप यांनी खुलाशासोबतचे कागदपत्रे कदाचित मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर झाली नसावीत, असा निराधार आरोप केलेला दिसून येत आहे. संस्थानचे प्रचलित पद्धतीने कारणे दाखवा नोटीसचा खुलासा व त्यासोबतचे कागदपत्रे हे वशी-शिस्त विभागामार्फत पदोसपोन, पद्धतीने वरिष्ठांकडे अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर करण्यात येत असतात. मात्र श्री.अनाप यांनी सदर मुद्यानुसार सबंधीत विभागावर अप्रत्यक्षपणे केलेले आरोप निराधार आहेत.
०३.	मा.मुख्याध्यापक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी माझ्या दिनांक २३/०३/२०२० रोजीचे खुलाशा बाबत दि.०४/०५/२०२० रोजीचा अहवाल सादर केलेला आहे. त्यात मुद्दा नं.१ मध्ये असे कथन केले आहे की, बोर्डाच्या संकेतानुसार श्री.शिवगजे व सौ.सावंत यांची उपकेंद्र प्रमुख म्हणून नेमणूक केलेली आहे. श्री.शिवगजे सर यांनी मागील १५ वर्षापासून केंद्रप्रमुख पदाचा अनुभव आहे. वास्तविक सदरचे विधान धादांत खोटे आहे. कारण आपल्याला इयत्ता १२ वी केंद्राची मान्यता सन २००७ पासून मिळालेली आहे. त्यापैकी ८ वर्षे सौ.चव्हाणके मॅडम, मुख्याध्यापिका तर २ वर्षे श्रीमती मिरजकर मॅडम, मुख्याध्यापिका व २ वर्षे मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी केंद्रप्रमुख म्हणून काम केलेले आहे. दुसरे असे की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी केंद्र संचालक व पर्यवेक्षक यांच्यासाठी मार्गदर्शक सूचना पुस्तिकेत पान नं.१६ नियम २.२.४ मध्ये असे म्हटले आहे की, केंद्रास जोडलेल्या स्थानिक शाळांच्या /कनिष्ठ महाविलयाच्या मुख्याध्यापकातून उपप्राचार्यातून ज्येष्ठ शिक्षकातून सक्षम उपकेंद्र संचालकाची नियुक्ती करावी. आपल्या श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर आहेत. श्री.शिवगजे व श्री.सावंत हे सहाय्यक शिक्षक आहेत. त्यांची उपकेंद्र प्रमुख म्हणून केलेली नियुक्ती नियमबाहय आहे. याच मार्गदर्शक सूचना पुस्तिकेत पान नं.२१ वर असे म्हटले आहे की, (४ :१-४.) प्रयोगशाळा सहाय्यक/प्रयोगशाळा परिचर व शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयाचे विद्यार्थी यांना पर्यवेक्षक म्हणून नेमण्यात येऊ नये. परंतु प्रत्यक्षात पर्यवेक्षक चार्टचे अवलोकन करता असे दिसते की, पर्यवेक्षक म्हणून प्रयोगशाळा सहाय्यक श्री.विलास आंबेकर व श्री.मिनीनाथ कोते यांची नीयुक्ती करण्यात आली होती. थोडक्यात प्रत्येक वेळी नियमांचा भंग केला जातो.	जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८२९/२००८ दि.०४ जुलै, २००८ रोजीचे आदेशान्वये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील वर्ग व प्रयोगशाळा जि.प.शाळेच्या नवीन इमारतीमध्ये स्थलांतरित करण्यात आलेमुळे श्रीमती चव्हाणके, प्राचार्या, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना ज्यू.कॉलेजचा दैनंदिन प्रशासन व नियंत्रण करणे शक्य नसल्याने त्यांचेकडील श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील दैनंदिन प्रशासन व नियंत्रणाचा कार्यभार पुढील आदेश होईपावेतो श्री.विकास महादेव शिवगजे यांचेकडे तांत्पुरता देण्यात आला आहे. सदर आदेशानुसार श्री.शिवगजे हे सन २००८ पासून कनिष्ठ महाविद्यालयाकडील कामकाज पाहत आहेत. श्री अनाप यांनी त्यांचे मुद्यामध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी केंद्र संचालक व पर्यवेक्षक यांच्यासाठी मार्गदर्शक सूचना पुस्तिकेत पान नं.१६ नियम २.२.४ मध्ये असे म्हटले आहे की, केंद्रास जोडलेल्या स्थानिक शाळांच्या /कनिष्ठ महाविलयाच्या मुख्याध्यापकातून, उपप्राचार्यातून, ज्येष्ठ शिक्षकातून सक्षम उपकेंद्र संचालकाची नियुक्ती करावी. असे निर्देश असल्याचे नमुद केलेले आहे. त्यानुसारच श्री.विकास शिवगजे व सौ.मंदाकिनी सांवत या सेवाज्येष्ठ शिक्षकांची उपकेंद्र संचालक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यामुळे ती नियमबाह्य नाही. इ.१२ वी.च्या केंद्र परिक्षेचेवेळी केंद्रावर परिस्थितीनीरुप निर्णय घेण्याचा अधिकार केंद्रप्रमुख यांना असतो. त्यानुसार अपवादात्मक परिस्थितीमध्ये पर्यवेक्षक संख्या कमी असल्यास शिक्षकेतर कर्मचारी (ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक) यांना दोन किंवा तीन वेळा पर्यवेक्षण दिलेले होते. त्याबाबत सबंधीतांची काहीही तक्रार नाही.

पान नं.९ वर..

अ.क्र.	अपिल अर्जातील मुद्दे	स्वयस्पष्ट अभिप्राय
०४.	अभिप्राय अहवालात मुद्दा क्र.१ मध्ये असेही म्हटले आहे की, श्री.शिवगजे सरांबाबत केलेले आरोप सन २०१७ मधील असून दोन प्रशासकीय अधिकारी समितीने चौकशी करून अहवाल सादर केलेला आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, हा अहवाल प्रशासनासमोर आलेला नसून त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही.	श्री.शिवगजे यांचेवर केलेल्या आरोपाबाबत श्री.एस.व्ही.गमे व श्री.डी.टी.उगले प्रशासकीय अधिकारी यांनी प्राथमिक चौकशी करुन दि.२३.०२.२०१५ रोजी निष्कर्ष अहवाल सादर केला आहे. त्यास अनसरुन कामगार विभागामार्फत दि.२१.०५.२०१५ चे मंजुर टिपणीन्वये जा.नं.एसएसएस/वशी-७बी/११३/२०१५ दि.११ जून, २०१५ अन्वये महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम, १९७७ चे कलम ३१ (१) (चार) नुसार श्री. शिवगजे यांची सन २०१५ मध्ये देय असलेली वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून ठेवण्यात आलेली होती. त्यामुळे श्री.अनाप यांनी त्यांचे अर्जात अतिशय निराधारपणे संस्थाने प्रशासनावर बेछुटपणे आरोप केलेले असल्याचे दिसून येते.
०५.	अहवालात मुद्दा नं.२ बाबत मुख्याध्यापकांनी असे म्हटले आहे की, यावर्षी वरिष्ठ महाविद्यालयाची इमारत उपलब्ध असल्याने इयत्ता ११ वीचे वर्ग तिकडे भरविण्याबाबत सुचना दिल्या. इतर शिक्षकांनी मान्य केले. मात्र अनाप सरांनी विरोध करत आम्ही इयत्ता १२ वीचे कामकाज करावयाचे की इयत्ता ११ वीचे वर्ग पहायचे ? परीक्षेमध्ये काही अडचणी आल्यास त्यास मुख्याध्यापक जबाबदार राहतील, असे बोलून शिक्षकांना भडकावले. नियोजनाचे मिटींगमध्ये मी माझी अडचण मांडली. त्यावर मुख्याध्यापक या नात्याने त्यांचे मार्गदर्शन अपेक्षित होते. ते त्यांनी केले नाही, मी शिक्षकांना भडकावले नाही.	मुख्याध्यापकांनी सर्व बाबींचा सर्वांगीण विचार करुनच इ.१२ वी.ची परिक्षा सुरु असतांना इ.११ वी. चे वर्ग वरिष्ठ महाविद्यालयाचे इमारतीमध्ये भरविणेबाबत सुचना केलेली होती. त्यामध्ये इतर कोणीही शिक्षकांनी काहीच आक्षेप घेतला नाही. मात्र फक्त श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांनीच मुद्दयात नमुद केलेप्रमाणे प्रश्नावली उपस्थितीत केली, हे त्यांनी त्यांचे मुद्यात मान्य केले आहे. मात्र त्यास ते आता मार्गदर्शन मागितले असे म्हणतात. तसेच त्यांनी इतर शिक्षकांनाही तुम्ही दोन दोन कामे करण्यास कसं काय तयार होत आहात असे बोलून भडकविण्याचे काम केलेले आहे.
०६.	मुद्दा नं.३ मध्ये असेही म्हटले आहे की, श्री.अनाप यांनी सर्व शिक्षकांसमोर अरेरावीने वागणूक गैरवर्तन केले आणि इतर शिक्षकांना चिथावणी दिली. मी अरेरावीने वागलो नाही, इतर शिक्षकांना चिथावणी दिली नाही.	याबाबत गैरवर्तन रिपोर्टमध्ये नमुद केलेले आहे.
०७.	मुद्दा नं.४ मध्ये असे म्हटले आहे की, सभेमध्ये इयत्ता १२ वी परीक्षेचे नियोजनाचे कामकाज सुरू असतांना श्री.अनाप सर व श्री.संगमनेरे सर यांनी मध्येच उठून म्हटले की, तुम्ही गोपनीय अहवाल इतर व्यक्तीकडून लिहून घेता, ते श्रेणी देतांना भेदभाव करतात. तसेच मागील वर्षी इयत्ता १२ वी परीक्षा सुरू असतांना श्री.अनाप व इतर काही शिक्षकांनी संबंधित सुरक्षा रक्षकाशी विनाकारण वाद केले. सदरचे विधान खोटे आहे. मुख्याध्यापक यांनी इतर शिक्षक कोण ? याचा उल्लेख केलेला नाही. यावरून संदिग्धता दिसून येते. मग त्या इतर शिक्षकाविरूध्द मुख्याध्यापक यांनी गैरवर्तन रिपोर्ट का सादर केला नाही, हा प्रश्न निर्माण होतो.	इ.१२ वी परिक्षेचे नियोजनाचे कामकाजाबाबत सभा आयोजित केली असतांना त्यामध्ये सुरक्षारक्षक बदला, ही मागणी प्रथम श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांनीच मांडली होती. तसेच मागील वर्षी इ.१२ वी च्या परिक्षेच्या वेळी श्री.अनाप व इतर काही शिक्षकांनी सुरक्षारक्षकाशी वाद घातला होता. सदरची बाब ही मागील वर्षातील असल्यामुळे त्या शिक्षकांविरुद्ध गैरवर्तन रिपोर्ट करण्याचा प्रश्नच उदभवत नाही. तसेच त्यावेळी सबंधीत सुरक्षारक्षक यांनी वाद घालणा-या शिक्षकांची तक्रार संरक्षण कार्यालयात केलेली होती. त्याबाबत सदर शिक्षकांना तत्कालीन प्रतिनियुक्त पोलीस उपअधिक्षक श्री.भोईट साहेब यांनी समक्ष बोलवून समज दिल्याचे समजते.

पान नं.१० वर..

-- पान नं.१० --

अ.क्र.	अपिल अर्जातील मुद्दे	स्वयस्पष्ट अभिप्राय
०८.	मुद्दा नं.५ बाबत असे म्हटले की, दि.२६/०२/२०२० रोजीची टिपणी मी सादर केली नव्हती. सामान्य प्रशासन विभागाकडून दि.०४/०३/२०२० रोजी कळविण्यात आले की, मुख्याध्यापक श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समक्ष चर्चेसाठी बोलावले. त्यानंतर दि.१०/०३/२०२० रोजी पुन्हा निरोप आला की, दिनांक ११/०३/२०२० रोजी सकाळी १०.०० वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात हजर राहावे. कंत्राटी लिपीक श्री.सचिन कोपरे यांनी दि.१०/०३/२०२० रोजी रात्री ८.१९ वाजता श्री.अनाप यांना त्याचे भ्रमणध्वनीद्वारे निरोप दिला. वास्तविक या बाबत दि.०४/०३/२०२० रोजी मला अवगत करणे आवश्यक होते.	श्री.अनाप, श्री.संगमनेरे व तुम्ही यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात समक्ष चर्चेसाठी बोलविले आहे. मात्र त्याबाबतची वार व वेळ नंतर कळविण्यात येईल, असा निरोप मला मला दि.०४.०३.२०२० रोजी भेटलेला होता. हा निरोप मी सबंधीत शिक्षकांना त्याच दिवशी दिलेला होता व वार व वेळ कळविल्यावर तुम्हास सांगतो असे सांगितलेले होते. त्यानंतर मला दि.१०.०३.२०२० रोजी निरोप भेटला की उद्या दि.११.०३.२०२० रोजी सकाळी ११.०० वा. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना घेऊन उपस्थित राहावे, त्यानुसार मी कनिष्ठ महाविद्यालयाकडील कंत्राटी लिपीक श्री.सचिन कोपरे यांना सबंधीत शिक्षकांना निरोप देण्याबाबत सुचना दिल्या. त्यानुसार श्री.कोपरे यांनी सबंधीत शिक्षकांना कळविलेले होते. त्यामुळे श्री.अनाप यांचा सदरचा मुद्दा अत्यंत चुकीचा व निराधार आहे.
०९.	मुद्दा नं.६ बाबत श्री.अनाप अप्रत्यक्ष धमकी देत असतात. सहाय्यक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी श्री.अनाप यांच्या खुलाशा अभिप्रायावर सहया केलेल्या आहेत. हेच सहा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सभेमध्ये वाद घालत होते. मा.मुख्याध्यापकांचे सदरचे म्हणणे असत्य व निराधार आहे. जर हे सहा कर्मचारी सभेत वाद घालत होते तर मुख्याध्यापकांनी त्यांच्या विरूध्द गैरवर्तन रिपोर्ट का सादर केला नाही. फक्त माझे विरूध्द रिपोर्ट केल्याने मुख्याध्यापकांचा सापत्नतेचा भाव दिसून येतो. वस्तुस्थिती अशी आहे की, सदरच्या सहा जणांनी असे लेखी निवेदन सादर केले आहे की, दि.१५/०२/२०२० रोजीचे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयातील सभेबाबत मा.मुख्याध्यापक यांनी श्री.अनाप सर यांच्याबाबत प्रशासनाला वाद विवाद व गैरवर्तन केल्याचे चुकीचे कळविलेले आहे. सदर सभेत वाद नसून फक्त चर्चा झालेली होती. मा.मुख्याध्यापक यांनी कळविल्याप्रमाणे काहीही झालेले नाही. सदरच्या निवेदनाचा विचार झालेला नाही. शिक्षक सभेच्या इतिवृत्तात फक्त चर्चा झाल्याची नोंद आहे.	श्री.अनाप यांनी स्वतःचा स्वतंत्र लेखी खुलासा सादर करणे आवश्य असतांना त्यांनी महाविद्यालयातील सर्व शिक्षकांना त्यांच्या लेखी खुलाशावर सह्या करणेबाबत अग्राह केला होता. श्री.अनाप यांचेकडून ज्या ठिकाणी गैरवर्तन झाले त्या ठिकाणी शिक्षक व शिक्षकेतर असे एकुण ३२ कर्मचारी उपस्थित होते. मात्र त्यांचे खुलाशावर फक्त सहाच कर्मचा-यांनी स्वाक्ष-या केलेल्या आहेत व हेच कर्मचारी वाद घालत होते. मात्र त्यांना समजावून सांगितल्यानंतर त्यांनी सभेमध्ये मुख्याध्यापक यांचे म्हणणे समजून घेतले होते, मात्र श्री.अनाप व श्री.संगमनेरे हे समजून घेण्याच्या मनस्थितीमध्ये नव्हते. त्यांनी सभेमध्ये मोठ्या प्रमाणावर वाद घातला त्यामुळे त्यांचा गैरवर्तन रिपोर्ट केलेला आहे. यामध्ये भेदभाव करणे किंवा इतरांचा रिपोर्ट न करणे असा काहीही प्रकार नाही. तसेच निवेदनाचा विचार झालेला नाही, असा मुद्दा उपस्थित करुन श्री.अनाप यांनी पुन्हा निराधारपणे संस्थाने प्रशासनावर व वरिष्ठांवर आरोप केलेले असल्याचे दिसून येते.
१०.	मुद्दा नं.७ मध्ये म्हटले की, श्री.अनाप सेवाज्येष्ठता यादीत १४ व्या क्रमांकावर आहे. त्यामुळे त्यांचे रेकॉर्ड खराब करण्याचा हेतू नसून गैरवर्तनाबाबत वरिष्ठांना अवगत करण्यात आले आहे. मुलतः मुख्याध्यापकांचे रिपोर्टनुसार काही गैरवर्तन माझ्याकडून झालेले नाही. सभेमध्ये मी केवळ अडचणी, समस्या याबाबत चर्चा केली की, ज्यासाठी सभा आयोजित केली होती.	याबाबत गैरवर्तन रिपोर्टमध्ये नमुद केलेले आहे.

पान नं.११ वर..

अ.क्र	अपिल अर्जातील मुद्दे	स्वयस्पष्ट अभिप्राय
	मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक ०३/०१/२००९, विषय नं.२९ चे अवलोकन करता असे दिसले की, श्री शिवगजे सर यांनी त्यांना कनिष्ठ महाविद्यालयाचे उप प्राचार्य पद मिळावे यासाठी प्रस्ताव सादर केला होता. त्यावर असा निर्णय झाला की, उप प्राचार्य पदाची उपलब्धता, त्याचे निकष व शैक्षणिक पात्रता इ.बाबत मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडुन पडताळणी करून घेऊन, त्या पदासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत. याचाच अर्थ श्री.शिवगजे सर यांची उप प्राचार्य पदासाठीची पदोन्नती नाकारण्यात आली. या निर्णयाप्रमाणे कार्यवाही केल्यास आपली उप प्राचार्यापदी वर्णी लागणार नाही म्हणून श्री.शिवगजे सर यांनी या निर्णयामुळे कार्यवाही केली नाही. श्री.शिवगजे सर यांनी मा.व्यवस्थापनाच्या निर्णयाची अंमलबजावणी न करता केराची टोपली दाखविली.	
१४.	दि.१५/१२/२०१६ रोजी १२ सेवकांनी व दि.३०/०६/२०१७ रोजी ६ शिक्षकांनी श्री.शिवगजे सर यांचे विरोधात तक्रार अर्ज सादर केले होते. त्यात अशा तक्रारी केल्या की, श्री.शिवगजे सर अध्यापनाकरीता वर्गावर जात नाहीत, बाहेर जाताना मुव्हमेंट रजिस्टरवर नोंद करीत नाही, विहीत अभ्यासक्रम विहीत वेळेत पुर्ण करीत नाहीत, श्री.शिवगजे सर यांनी इयत्ता-१२ वीचे विद्यार्थ्यांची परीक्षा फीची रक्कम स्वतःचे वैयक्तिक बँक खात्यात जमा केली. विद्यार्थ्यांचे प्रॅक्टीकल घेत नाहीत. विद्यार्थ्यांना फी भरणा बाबत संस्थानची अधिकृत पावती ने देता कॉम्प्युटर प्रिंट पावती देतात, विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर श्री.शिवगजे सर यांनी अनाधिकारे प्राचार्य म्हणून स्वाक्षरी केल्या, या व इतर अनेक तक्रारींबाबत तत्कालीन प्रशासकीय अधिकारी श्री.गमे साहेब यांचे समोर सुनावणी झाली. परंतु चौकशी अहवाल मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समोर सादर झाला नसावा. त्यामुळे त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही.	श्री.शिवगजे यांचेवर केलेल्या आरोपाबाबत श्री.एस.व्ही.गमे व श्री.डी.टी.उगले प्रशासकीय अधिकारी यांनी प्राथमिक चौकशी करुन दि.२३.०२.२०१५ रोजी निष्कर्ष अहवाल सादर केला आहे. त्यास अनसरुन कामगार विभागामार्फत दि.२१.०५.२०१५ चे मंजुर टिपणीन्वये जा.नं.एसएसएस/वशी-७बी/११३/२०१५ दि.११ जून, २०१५ अन्वये महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम, १९७७ चे कलम ३१ (१) (चार) नुसार श्री. शिवगजे यांची सन २०१५ मध्ये देय असलेली वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून ठेवण्यात आलेली होती. त्यामुळे श्री.अनाप यांनी त्यांचे अर्जात अतिशय निराधारपणे संस्थाने प्रशासनावर बेछुटपणे आरोप केलेले असल्याचे दिसून येते.
१५.	व्यवस्थापन समितीची सभा दि.०७/०८/२०१६, विषय नं.१९ प्रस्तावाचे अवलोकन करता असे आढळून येते की, मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचेशी कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी परस्पर (संदर्भ जा.क्रं.एसएसएस-कन्या-कनिष्ठ/१०५३८, दि.०९/०९/२०१६) पत्रव्यवहार करून शाळेच्या नावात बदल केला. संस्थानचे प्रचालित पध्दतीनुसार विभागाचे नावात बदल करावयाचा असल्यास त्याबाबत प्रथम व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन त्यानंतर प्रशासनामार्फत कार्यालयीन आदेश पारित करून नावात बदल केला जातो. मात्र शाळेच्या नावात बदल करतेवेळी मा.व्यवस्थापन समितीची अथवा मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेतलेली नाही. यावर असा निर्णय झाला की, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर ऐवजी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय असा नावात केलेला बदल रद्द करणेत येऊन त्या ऐवजी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी असा बदल करणेस मान्यता देण्यात आली.	श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे नावतील बदलाबाबतची कार्यवाही तत्कालीन मुख्याध्यापिका यांचे कार्याकाळातील असून, त्यानंतर पुन्हा नव्याने नावात बदलाबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत कार्यवाही झालेली आहे.

पान नं.१३ वर..

अ.क्र	अपिल अर्जातील मुद्दे	स्वयस्पष्ट अभिप्राय
११.	श्री.शिवगजे सर यांच्या सांगण्यावरून मुलांचे पैसे बॅंकेत भरले, याबाबत माझ्या दिनांक ०३/०४/२०२० रोजीचे खुलाशाबाबत मा.मुख्याध्यापक यांनी असा अभिप्राय दिला आहे की, त्या प्रकरणाची संस्थान प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत चौकशी होऊन सदरचे प्रकरण सन – २०१७ मध्ये संपलेले आहे. महोदय, मी आपले निदर्शनास आणुन देतो की, श्री.शिवगजे सर यांचे विरूध्दच्या तक्रारी व प्रकरणाचा चौकशीचा फार्स/नाटक करण्यात आलेले आहे. त्या प्रकरणाबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अंतिम निर्णय झालेले नाहीत. कदाचित त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी समोर सादर झाली नसावीत.	श्री.शिवगजे यांचेवर केलेल्या आरोपाबाबत श्री.एस.व्ही.गमे व श्री.डी.टी.उगले प्रशासकीय अधिकारी यांनी प्राथमिक चौकशी करुन दि.२३.०२.२०१५ रोजी निष्कर्ष अहवाल सादर केला आहे. त्यास अनसरुन कामगार विभागामार्फत दि.२१.०५.२०१५ चे मंजुर टिपणीन्वये जा.नं.एसएसएस/वशी-७बी/११३/२०१५ दि.११ जून, २०१५ अन्वये महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम, १९७७ चे कलम ३१ (१) (चार) नुसार श्री. शिवगजे यांची सन २०१५ मध्ये देय असलेली वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून ठेवण्यात आलेली होती. त्यामुळे श्री.अनाप यांनी त्यांचे अर्जात अतिशय निराधारपणे संस्थाने प्रशासनावर बेछुटपणे आरोप केलेले असल्याचे दिसून येते.
१२.	मा.मुख्याध्यापक यांनी अभिप्राय अहवालात माझ्यावर असा आरोप केली की, नोटीसीचा खुलासा परस्पर सादर केला. वस्तुस्थिती अशी आहे की, मी माझा खुलासा मुख्याध्यापकांना दाखवला होता.त्यांचे असे म्हणणे होते की, खुलाशातील काही विधाने वगळावीत, तरच ते खुलासा त्यांचेमार्फत पाठवतील. परंतु ती विधाने म्हणजे वस्तुस्थितीदर्शक व माझ्या बचावासाठी आवश्यक होती. त्यामुळे ती विधाने मजकूर मी वगळण्यास तयार नव्हतो तर त्या शिवाय मुख्याध्यापक माझ्या खुलाशावर स्वाक्षरी करणेस तयार नव्हते. परिणामी मला नाईलाजाने माझा खुलासा थेट सादर करावा लागला.	सदरचा आरोप अतिशय चुकीचा व बेछुट आहे. श्री.अनाप यांनी त्यांच खुलासा मला दाखविला नाही व माझा अभिप्राय न घेता परस्पर खुलासा सादर केलेला आहे. त्याची सत्यता पडताळणी करावयाची असल्यास त्यांनी सादर केलेल्या खुलाशामध्ये कुठेही मुख्याध्यापक यांचे मार्फत सादर असे म्हटलेले नाही, यावरुन सिद्ध होते की. श्री.अनाप हे अत्यंत खोटे कथन करुन प्रशासनाची व वरिष्ठांची दिशाभूल करत आहेत. तसेच आताही अपिल दाखल करतांनाही त्यांनी संस्थानचे प्रचलित पद्धतीने अर्ज करुन, प्रथम विभागप्रमुख यांचा अभिप्राय घेऊन अथवा त्यांचे मार्फत अपिल सादर करणे बंधनकारक असतांनाही त्यांनी पुन्हा वरिष्ठांचा अवमान करुन परस्पर अपिल दाखल केलेले आहे. व त्यामध्ये अत्यंत चुकीचे व खोटे कथन केलेले आहे.
१३.	सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता ११ वी कनिष्ठ महाविद्यालय सुरू झाले. श्री.वरघुडे सर यांनी दि.२७/०८/२०१८ पासून मुख्याध्यापक पदाचा कार्यभार स्विकारलेला आहे.त्यापूर्वीचा इतिहास व घटना या बाबत श्री.वरघुडे सर अनभिज्ञ आहे. जावक नं.वशी १-१८९२ दि.०४/०७/२००८ अन्वये कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग व प्रयोगशाळा जिल्हा परिषदेच्या शाळेच्या नवीन इमारतीत स्थलांतरीत झाले. त्यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे दैनंदिन प्रशासन व नियंत्रण श्री.शिवगजे सर यांचेकडे सोपवण्यात आले. त्याचाच गैरफायदा/गैरवापर श्री.शिवगजे यांनी घेतला आहे. प्राचार्य किंवा उपप्राचार्य पद मिळावे यासाठी संस्थान दरबारी खोटे, चुकीचे रेकॉर्ड तयार केले. संस्थान प्रशासन व व्यवस्थापन यांना श्री.शिवगजे सर यांनी खोटी,चुकीची,अपुर्ण, दिशाभुल करणारी माहिती सादर केली. त्याबाबतची माहिती ज्यांनी वरिष्ठांना देण्याचा प्रयत्न केला त्यांचे रेकॉर्ड खराब करण्याचा श्री.शिवगजे सरांनी प्रयत्न केलेला आहे. हे खालील घटनांवरून आपले निदर्शनास येईल.	श्री.अनाप यांनी केलेले गैरवर्तन व या मुद्यांचा काहीही सबंध नसतांना केवळ प्रशासनाची दिशाभूल करुन, विषयांतर करण्यासाठी श्री.अनाप यांनी खालील मुद्दे त्यांचे अपिलामध्ये समाविष्ठ केल्याचे दिसून येत आहे. श्री.शिवगजे यांना उपप्राचार्य पद देणे अथवा त्याचा प्रस्ताव ठेवेणे ही बाब सामान्य प्रशासन (आस्थापना विभाग) विभागाशी सबंधीत आहे. त्यामुळे याबाबत माझे स्पष्टीकरण देणे योग्य होणार नाही.

पान नं.१२ वर.

अ.क्र	अपिल अर्जातील मुद्दे	स्वयस्पष्ट अभिप्राय
१६.	महोदय,श्री शिवगजे सर यांनी शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडे संच मान्यतेसाठी (कार्यभार निश्चिती व पट पडताळणी) सादर केलेल्या प्रस्तावावर अनाधिकारे शाळेचे नाव बदलून श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय ऐवजी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय अशी नोंद केली आहे. मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास न जुमानता सन २०१६-२०१७ च्या प्रस्तावात जुनेच नावाने (श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय,शिर्डी) नोंद केली. तसेच प्राचार्य हे पद नसतांना श्री.शिवगजे सर यांनी अनाधिकारे सन २०१३-२०१४ च्या प्रस्तावात प्राचार्य म्हणून स्वाक्षरी केली आहे.	शाळेच्या नावातील बदलाबाबत उपरोक्त मुद्दा क्र.१५ मध्ये नमुद केलेले आहे. जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८२९/२००८ दि.०४ जुलै, २००८ रोजीचे आदेशान्वये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील वर्ग व प्रयोगशाळा जि.प.शाळेच्या नवीन इमारतीमध्ये स्थलांतरित करण्यात आलेमुळे श्रीमती चव्हाणके, प्राचार्या, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना ज्यू.कॉलेजचा दैनंदिन प्रशासन व नियंत्रण करणे शक्य नसल्याने त्यांचेकडील श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील दैनंदिन प्रशासन व नियंत्रणाचा कार्यभार पुढील आदेश होईपावेतो श्री.विकास महादेव शिवगजे यांचेकडे तात्पुरता देण्यात आला आहे. सदर आदेशानुसार श्री.शिवगजे हे सन २००८ पासून कनिष्ठ महाविद्यालयाकडील कामकाज पाहत होते. त्यानुसार त्यांनी प्राचार्य यांचे अनुपस्थितीत अथवा इतर तातडीची गरज म्हणून प्राचार्य म्हणून स्वाक्षरी केली असेल, मात्र त्याबाबत शिक्षण उपसंचालक अथवा शैक्षणिक विभागाने काहीही आक्षेप घेतलेले नाहीत,

उपरोक्त अ.क्र.०१ ते १५ मुद्यांचे स्पष्टीकरण पाहाता खालील बाबी प्रकर्षाने दिसून येत आहेत.

१. श्री.अनाप यांनी केलेल्या अपिलामध्ये त्यांनी अत्यंत असत्य, अर्धसत्य, खोटे व निराधार असे कथन केलेले आहे.

२. श्री.अनाप यांनी त्यांचे गैरवर्तन रिपोर्ट व त्याबाबत त्यांचेवर ठेवण्यात आलेला ठपका यासंदर्भात मुद्यांचे आधारे अपिल करणे गरजेचे असतांना त्यांनी प्रशासनाची व वरिष्ठांचे दिशाभूल करण्यासाठी ते मुद्दे दुर्लक्षित करुन, सबंधीत प्रकारणाशी काहीही सबंध नसलेले मुद्दे नमुद केलेले आहेत. ज्या मुद्याबाबांत सर्व चौकशा पुर्ण होऊन कार्यवाही संपलेली आहे.

३. तसेच त्यांनी त्यांचे अपिलामध्ये वारंवार मुख्याध्यापक, माजी मुख्याध्यापिका, संस्थानचे वशी-शिस्त विभाग व प्रशासनावर अत्यंत निराधार व बेछुटपणे आरोप केलेले दिसून येते. श्री.अनाप हे नेहमीच जाणीवपुर्वक खोटे, निराधार अथवा अपु-या माहितीच्या आधारे वरिष्ठांवर, प्रशासनावर अशा प्रकारे आरोप करत असतात.

४. सहा.शिक्षक यांचेवर विद्यार्थ्यांना शिकविण्याची जबाबदारी असतांना त्या गोष्टीकडे लक्ष न देता, ज्या गोष्टींशी त्यांचा काहीही सबंध नाही अशा संस्थानच्या प्रशासकीय कामकाजामध्ये लक्ष घालुन वरिष्ठांवर, प्रशासनावर नको ते आरोप करण्यात धन्यता मानतात.

५. तसेच त्यांनी सदरचे अपिल सादर करतांना मुख्याध्यापक यांचेमार्फत सादर न करता परस्पर सादर केलेले आहे, त्यामुळे तयांनी जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३११९/२०१४ दि.०२ ऑक्टो., २०१४ चे परिपत्रकाचा पुन्हा अवमान केलेला आहे. ते नेहमीच अशा पद्धतीने वरिष्ठांचे आदेशांचा अवमान करत असतात. "असे म्हटलेले आहे

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत:-

E) श्री.भाऊसाहेब एकनाथ अनाप, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत त्यांना संदर्भ क्रं.१ अन्वये ठपका हि शिक्षा करणेत आलेली होती.त्यांनी शिक्षा रद्द करणेकरीता दि.१५.०६.२०२० रोजी केलेल्या अपील अर्जात त्यांनी केलेले गैरशिस्तवर्तनाचा विषयास बगल देवुन, श्री.गंगाधर वरघुडे,प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी व श्री.विकास महादेव शिवगजे,सहा.शिक्षक यांचेबद्दल कथन केलेले असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

१. श्री.अनाप यांनी दि.१५.०६.२०२० रोजीचा अपील अर्ज मा.अध्यक्ष, महोदय, व्यवस्थापन समिती यांनी अग्रेषित केलेले व प्रत माहितीसाठी कार्यवाहीसाठी सविनय सादर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब अशा दोन प्रती इकडील आवक विभागास दिलेल्या आहेत.श्री.अनाप यांचा दि.१५.०६.२०२० रोजीचा अपील अर्ज प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना उपरोक्त संदर्भ क्रं.३ अन्वये पत्र पाठविणेत आलेले होते. त्यानुसार प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी दि.२८.०७.२०२० रोजीचा स्वयंस्पष्ट अहवाल इकडील कार्यालयास पाठविलेला आहे.त्यात त्यांनी," श्री.अनाप यांनी केलेल्या अपिलामध्ये त्यांनी अत्यंत असत्य, अर्धसत्य, खोटे व निराधार असे कथन केलेले आहे.

पान नं.१४ वर..

२. श्री.अनाप यांनी त्यांचे गैरवर्तन रिपोर्ट व त्याबाबत त्यांचेवर ठेवण्यात आलेला ठपका यासंदर्भात मुद्यांचे आधारे अपिल करणे गरजेचे असतांना त्यांनी प्रशासनाची व वरिष्ठांचे दिशाभूल करण्यासाठी ते मुद्दे दुर्लक्षित करुन, सबंधीत प्रकारणाशी काहीही सबंध नसलेले मुद्दे नमुद केलेले आहेत. ज्या मुद्याबाबांत सर्व चौकशा पुर्ण होऊन कार्यवाही संपलेली आहे..

३. तसेच त्यांनी त्यांचे अपिलामध्ये वारंवार मुख्याध्यापक, माजी मुख्याध्यापिका, संस्थानचे वशी-शिस्त विभाग व प्रशासनावर अत्यंत निराधार व बेछुटपणे आरोप केलेले दिसून येते. श्री.अनाप हे नेहमीच जाणीवपुर्वक खोटे, निराधार अथवा अपु-या माहितीच्या आधारे वरिष्ठांवर, प्रशासनावर अशा प्रकारे आरोप करत असतात.

४. सहा.शिक्षक यांचेवर विद्यार्थ्यांना शिकविण्याची जबाबदारी असतांना त्या गोष्टीकडे लक्ष न देता, ज्या गोष्टींशी त्यांचा काहीही संबंध नाही अशा संस्थानच्या प्रशासकीय कामकाजामध्ये लक्ष घालुन वरिष्ठांवर, प्रशासनावर नको ते आरोप करण्यात धन्यता मानतात.

५. तसेच त्यांनी सदरचे अपिल सादर करतांना मुख्याध्यापक यांचेमार्फत सादर न करता परस्पर सादर केलेले आहे, त्यामुळे तयांनी जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३११९/२०१४ दि.०२ ऑक्टो., २०१४ चे परिपत्रकाचा पुन्हा अवमान केलेला आहे. ते नेहमीच अशा पद्धतीने वरिष्ठांचे आदेशांचा अवमान करत असतात. "असे म्हटलेले आहे

सबब, श्री.अनाप यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ (१) मध्ये नमूद केल्यानुसार, शिक्षा म्हणून त्यांचेवर **"ठपका"** ठेवणेत येतो की, यापुढे त्यांचेकडून उपरोक्त प्रमाणे गैरशिस्त वर्तन घडणार नाही याची दक्षता घ्यावी असे उपरोक्त संदर्भ क्रं.१ चे शिक्षेचे पत्र देण्यात आले.

त्यानंतर श्री.अनाप यांनी उपरोक्त करणेत आलेली शिक्षा रद्द करणेकरीता दि.१५.०६.२०२० रोजीचा अपील अर्ज मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडेस केलेला होता.सदरचे अर्जातील कथनाबाबत प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांचा स्वयंस्पष्ट अहवाल मागविणेत आलेला आहे.

श्री.अनाप यांचे अपील अर्जातील कथनाबाबत प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांचे अहवालाचे अवलोकन करता त्यांना उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत करणेत आलेली **"ठपका"ही** शिक्षा कायम करावी, असे मत आहे.

तरी श्री.अनाप यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ (१) मध्ये नमूद केल्यानुसार,उपरोक्त गैरशिस्तवत्रनाबाबत करणेत आलेली शिक्षा म्हणून त्यांचेवर **"ठपका"**ठेवणेत आलेली शिक्षा रद्द करावी किंवा त्यांना करणेत आलेली शिक्षा कायम करावी याबाबत सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर निर्णयास्तव सादर करणेकरीता वरिष्ठांना समोर ठेवलेला होता.

सदरचे प्रस्तावावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी,"Dy.CEO – ना.से.नि.शिस्त व अपिल तरतुदी काय आहेत ? तपासून सादर करावे."असे निर्देश दिलेले होते.

दि.०१.०१.२०१५ पासुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा विनीयम लागु करणेत आलेले आहेत. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ प्रकरण ५ अपिले उपविनीयम १७ नुसार प्रत्येक अपील थेट समितीकडे दाखल करणे आवश्यक आहे. त्यानुसार श्री.अनाप यांनी उपरोक्त करणेत आलेली शिक्षा रद्द करणेकरीता दि.१५.०६.२०२० रोजीचा अपील अर्ज मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडेस केलेला होता. श्री.अनाप यांना **"ठपका"**ठेवणेत आलेली शिक्षा रद्द करावी किंवा त्यांना करणेत आलेली शिक्षा कायम करावी याबाबत सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर निर्णयास्तव सादर.

18/9/2020

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

GA-meeting-201-2020

11/9 11/9 11/9/2020 11/9/2020

MB-meeting-183-2021

विषय क्र.- ०६

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर 64
(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

विषय :- श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता (मेकॅनिकल),वाहन विभाग, सध्या मेकॅनिकल विभाग यांचे दिनांक १२.११.२०२० रोजीचे अपील अर्जाबाबत...

टिपणी

श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता (मेकॅनिकल),वाहन विभाग, सध्या मेकॅनिकल विभाग यांचे गैरशिस्त वर्तन खातेचौकशी अहवालात दोषी आढळुन आल्याने त्यांना जा.नं.एसएसएस /साप्रशा/वशी-शिस्त/१३८५/२०२० दि.०२.११.२०२० रोजीचे आदेशान्वये त्यांना खालील अ.नं.१,२,३ प्रमाणे शिक्षा करणेत आलेली आहे.

१) श्री.अमृत गंगाधर जगताप यांनी उपरोक्त अभिकथन पत्र व पुरवणी अभिकथन पत्रा प्रमाणे केलेल्या गैरशिस्तवर्तनाबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ५ (३) (त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.) अन्वये त्यांचेकडुन संस्थानचे RTO कार्यालयास दंडापोटी भरण्यात आलेली रक्कम रुपये १,४८,९०६/- मात्र त्यांचे मासिक वेतनातुन २४ (चोवीस) समान हफ्त्यात वसुल करणेत येत आहे.

२) श्री.अमृत जगताप यांचा दि.१२.०४.२०१७ ते दि.१२.०५.२०१७ अखेरचा कालावधी हा निलंबन कालावधी म्हणून गृहीत धरण्यात येत आहे.

३) श्री.अमृत जगताप यांना उपरोक्त अभिकथन पत्र व पुरवणी अभिकथन पत्रा प्रमाणे केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ५ (४) नुसार श्री.जगताप यांची सन २०२१ या एक वर्षांची वार्षीक वेतनवाढ कायम स्वरुपी करीता थांबविणे, हि शिक्षा देण्यात येत आहे. सन २०२१ ची वेतनवाढ रोखून धरण्याची शिक्षा भावी काळातील वेतनवाढीवर परीणामकारक होणार आहे. श्री.जगताप यांची सन २०२१ ची एक वेतनवाढ कायम स्वरुपी रोखुन धरलेच्या नोंदी त्यांचे सेवा पुस्तकात घेण्यात याव्यात.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे प्रकरण ५ अपिले कलम १७ नुसार मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे अपील अर्ज करण्याचा अधिकार असल्याने त्यांनी दि.१२.११.२०२० रोजीचा अपील अर्ज सादर केलेला आहे

श्री.जगताप यांनी सदरचे अपील अर्जात जा.नं.एसएसएस /साप्रशा/वशी-शिस्त/१३८५/२०२० दि.०२.११.२०२० रोजीचे आदेशान्वये त्यांना उपरोक्त अ.नं.१,२,३ प्रमाणे शिक्षा करणेत आलेली शिक्षा रद्द करणेबाबत विनंती केली आहे.

अ) श्री.अमृत जगताप यांचा दि.१२.११.२०२० रोजीचे अपील अर्जाबाबतचा प्रस्तावावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दि.०९.०१.२०२१ रोजी स्वाक्षरी झालेवर लगेच सभा कामकाज विभागाकडे दि.११.०१.२०२१ रोजी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे समोर निर्णय होणकरीता सादर करणेत आलेला होता. परंतू बराचा कालावधी होऊन गेला तरी देखील मा.तदर्थ समितीची सभेसमोर श्री.जगताप यांचे अर्जावर निर्णय झालेला नाही.

आ) तदनंतर वरिष्ठांचे निर्देशानुसार श्री. जगताप यांचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर चक्रीय पध्दतीने दि.१६.०३.२०२१ रोजी सादर करणेत आलेला होता.

सदरचे प्रस्तावर मा.अध्यक्ष महोदय, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे स्वाक्षरीने जा.नं. आस्था/१८३/२०२१ दि.२४.०५.२०२१ रोजीचे पत्रासोबत श्री.जगताप यांचा अपील अर्ज इकडील कार्यालयास पाठविलेला आहे. सदरचे पत्रात," अध्यक्ष या नात्याने या कार्यालयाकडे प्राप्त झालेली खालील नमुद प्रकरणे या समेत पाठवित आहे. सदरहू अपिल/अर्जावर निर्णय होण्याकरीता या प्रकरणांचे सर्व सबंधीत कागदपत्र तदर्थ समितीसमोर असणे आवश्यक आहेत. तसेच सेवानियम, नियमावली, चौकशी अहवाल, त्यातील निष्कर्ष यावर सविस्तर विचार विनिमय होणे आवश्यक आहे. तरी सदरहू अपिल/अर्ज तदर्थ समितीच्या पुढील नियमित बैठकीमध्ये संबंधीच्या सर्व कागदपत्रांसह, सेवा नियम, नियमावली, खातेचौकशीचे सर्व कागदपत्र (असल्यास) इत्यादीसह तदर्थ समितीच्या समोर ठेवण्यात यावेत. "
असे नमुद आहे.

श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता (मेकॅनिकल),वाहन विभाग, सध्या मेकॅनिकल विभाग यांना वरील १,२,३ अन्वये शिक्षा करण्यात आलेल्या आहेत. सदर शिक्षांबाबत श्री.अमृत जगताप यांनी केलेल्या अपिल अर्जानुसार निर्णय होणेसाठी प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

12/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

7/6 7/6 7/6

विषय क्र.- ०७

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर

(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

विषय विषय:- श्री.भारत एकनाथ सोनवणे,(सध्या सेवा निलंबीत) वर्ग-०४ कर्मचारी, श्री साई प्रसादालय विभाग यांचे दि.३०.११.२०२० रोजीचे खाते चौकशी अहवालाबाबत...

टिपणी

अ) विषयाची पुर्वपिठीका-

श्री. भारत एकनाथ सोनवणे, वर्ग-०४ कर्मचारी,श्री साई प्रसादालय विभाग यांनी खालीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन केलेले आहे.

श्री.सोनवणे हे श्री साई प्रसादालय विभागात वर्ग-०४ कर्मचारी.म्हणुन कार्यरत आहेत. त्यांचे गंभीर गैरशिस्तवर्तनाबाबत संदर्भ क्रं.०१ ची टिपणी सादर केलेली असुन, त्यात १) श्री.धोडीराम ठोंबरे,श्री.राजाराम सावळे, लिपीक टंकलेखक यांचा दि.२०.१२.२०१९ रोजीचा तक्रार अर्ज,२) श्री.सुशांत वाघ, कार्यालयीन स्थायी कर्मचारी यांचा दि.२०.१२.२०१९ रोजीचा तक्रार अर्ज,३) श्री.भैय्या शेख, श्री.निवृत्ती देवकर, हॉल मुकादम,४) श्री.दिनकर गायकवाड, श्री.संदीप निर्मळ, सुरक्षा रक्षक यांनी तक्रार अर्ज दिलेले आहेत.

त्यानुसार त्यांचेबाबत साई प्रसादालय विभागाने संदर्भ क्रं.०१ ची टिपणी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली आहे. सदरचे टिपणीवर प्रशासकिय अधिकारी यांनी, कडक समज देण्यात यावी असे निर्देश दिलेले आहेत. तसेच प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी,त्यांचेवर यापूर्वी केलेल्या कारवाईचा तपशिल सादर करा,असे निर्देश दिलेले होते.

त्यांची संस्थान सेवेत दि.०४.१२.२००६ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबतचा तपशिल खालीप्रमाणे आहे.

अ.नं.	आज अखेरपर्यंत दिलेल्या शिक्षा	किती वेळा
०१	लेखी समज	२
०२	ताकीद	५
०३	ठपका	४
	एकुण झालेल्या शिक्षेची संख्या	११

श्री.सोनवणे यांना यापुर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत एकुण ११ वेळा शिक्षा करणेत आलेली आहे.

श्री.सोनवणे यांचे गंभीर गैरशिस्त वर्तनाबद्दल संदर्भ क्रं.०३ अन्वये टिपणी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली होती.सदरचे टिपणीवर त्यांना निलंबनाची नोटीस बजवावी असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्देश दिलेले आहे.

श्री.सोनवणे यांनी श्री साई प्रसादालय विभागाकडील/२३०/२०१९ दि.२१.१२.२०१९ रोजीचे टिपणीत नमुद केलेप्रमाणे गंभीर स्वरुपाचे गैरशिस्तवर्तन केलेले आहे. त्यांना निलंबनाचे नोटीसीसोबत दि.२१.१२.२०१९ रोजीचे टिपणीची छायांकित प्रत पाठविणेत आलेली होती.

उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.सोनवणे यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२२२३ /२०२०, दि.०७.०१.२०२० अन्वये संस्थान सेवेतुन निलंबीत का करणेत येऊ नये अशा आशयची कारणे दाखवा नोटीस काढून,त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. श्री.सोनवणे यांना सदर कारणे दाखवा नोटीस दि.०७.०१.२०२० रोजी बजाविणेत आलेली होती.त्यास अनुसरुन त्यांनी दि.११.०१.२०२० रोजीचा लेखी खुलासा प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय यांचेमार्फत सादर न करता रजिष्टर पोष्ट ए.डी.ने सामान्य प्रशासनाचे आवक विभागास सादर केलेला आहे.श्री.सोनवणे यांचे गैरशिस्तवर्तनाचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

पान नंबर २ वर...

अ.नं.	गैरशिस्त वर्तनाचा तपशिल	श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा(वर्तणूक) विनियम, २०१३
०१.	प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानच्या कर्मचा-यांचे कर्तव्य :- (१) संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :- (i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल. (ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ; (iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.	कलम ३ (१)

श्री.भारत एकनाथ सोनवणे, वर्ग-०४ कर्मचारी,श्री साई प्रसादालय विभाग यांनी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा(वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ३ (१) प्रमाणे प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानाच्या कर्मचा-यांचे कर्तव्य तसेच संस्थान कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य न करणे इत्यांदीचे उल्लंघन केलेले आहे. श्री.सोनवणे यांच्या शिस्तभंगाचे गांभिर्य विचारात घेता, त्यांना यापुर्वी गैरशिस्तवर्तनाबाबत ११ वेळा शिक्षा करण्यात आलेल्या असुन त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने, त्यांना मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४.०३.२०२० रोजीचे निर्णय क्रं.१७४ नुसार तात्काळ संस्थानचे सेवेतुन जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६३/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे आदेशान्वये दि.०८.०६.२०२० पासुन **" सेवानिलंबीत"** करण्यात आलेले आहे.

श्री.भारत सोनवणे यांना सेवा निलंबन कालावधीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (पदग्रहन अवधी आणि निलंबन, सेवेतुन बडतर्फी आणि काढुन टाकणे या कालखंडातील प्रदाने) विनीयम, २०१३ चे कलम १७ (अ) अन्वये त्यांना निलंबन कालावधीत निम्या वेतनावर रजेवर असताना जेवढे रजा वेतन मिळाले असते तेवढे वेतन अधिक रजा वेतनावरील महागाई भत्ता इतका निर्वाह भत्ता देणेत येत आहे.

तसेच त्यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६४/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे त्यांना अभिकथनपत्र बजाविण्यात आलेले आहे. जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६५/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे आदेशान्वये श्री.ए.एम.देशमुख, खातेचौकशी अधिकारी, नाशिक यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.श्री.देशमुख यांनी दि.३०.११.२०२० रोजीचा खातेचौकशी अहवाल इकडील कार्यालयास सामान्य प्रशासन शाखा, आवक विभाग ८१८० दि.०७.१२.२०२० रोजी प्राप्त झालेला आहे.

ब) खातेचौकशी अहवाल-निर्णयासाठी मुद्दे, पुराव्याचे मूल्यमापन :-

श्री.ए.एम. देशमुख,नाशिक, चौकशी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे मुद्दे काढलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्या अधिनस्त असलेले श्री साई मंदिर हे भारतातीलच नव्हे तर जगभरातील साईभक्तांचे श्रध्दास्थान असल्याने येथे बाबांचे दर्शन घेण्यासाठी भक्तांची सतत गर्दी असते. मंदिर परिसर खूप मोठा असल्याने व भाविकांची खूप गर्दी असल्याने संस्थानने भक्तांसाठी येथे खूप सोयीसुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. संस्थान परिसरामध्ये एकाच वेळी हजारो अनेक भक्तांची साई दर्शनासाठी सतत रीघ लागलेली असते. दर्शनानंतर सर्व भक्ताना प्रसाद घ्यावयाचा असतो. त्यासाठीही संस्थानने प्रसादासाठी साई प्रसादालय नावाचे मोठे भोजनगृह बांधलेले आहे. यासाठी संस्थानचा एक स्वतंत्र विभाग कार्यरत असून या विभागात भोजन प्रसाद याची निर्मिती व भक्ताना तो वाढणे व अन्य अनुषंगिक सेवा अशी कामे केली जातात. अशा या साई प्रसादालय विभागात श्री भारत एकनाथ सोनवणे हे वर्ग ४ कर्मचारी म्हणून कार्यरत होते. येथे काम करीत असताना त्यांच्याकडे साई भक्ताना भोजन सेवा देण्याची डयूटी देण्यात आलेली होती. तेथे या डयूटीवर कार्यरत असताना त्यानी सोपविलेल्या जबाबदारीचे पालन केले नाही, असे कार्यालयाचे मत झालेले दिसते.

पान नंबर ३ वर...

ते प्रसादालयात काम करीत असताना त्यांचे सहकारी व वरिष्ठ यांनी त्यांचेबाबत प्रशासनाकडे लेखी तक्रार अर्ज दाखल केले व त्यामुळे साई प्रसादालय विभागाने प्रशासनास टिप्पणी सादर केली. त्यात, त्याना साईभक्ताना भोजन वाढण्याचे व तदनुषंगिक कामे दिलेली असताना त्यानी कधीही प्रामाणिकपणे काम केलेले नाही व ते त्यांचे सहका-याबरोबर व साईभक्तांबरोबर सुध्दा वाद घालत असतात असे म्हटले आहे. तसेच ते विनापरवना गैरहजर राहतात, आल्यावर कर्मचा-यांच्या अंगावर रजेचा अर्ज फेकतात व वरिष्ठांशी अरेरावी करतात. तसेच वाढपी कर्मचा-यानी दाढी, डोक्याचे केस व नखे काढणे, ॲप्रन घालणे व टोपी घालणे बंधनकारक असताना ते न घालता जाब विचारताच अरेरावीची उत्तरे दिलेली आहेत.

तसेच, या दोषारोपपत्रापूर्वीही त्याना सन २०१६ पासून एकुण ११ वेळा कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात येऊन तेवढयाचवेळा शिक्षा करण्यात आलेल्या आहेत. एवढया वेळा केलेल्या शिक्षेवरुन अपचारी यानी त्यातून कोणताही धडा घेतलेला नाही असे दिसते दोषारोपपत्रातील दोषारोपावरुन दिसून येते.

सदर विभागीय चौकशीमध्ये शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने बजावलेल्या दोषारोपपत्रावरुन त्यातील दोषारोपांची चौकशी पूर्ण करण्यात आली आहे. दोषारोप पत्रासोबतचे दस्तावेज, साक्षीदारांच्या साक्षी, सादरकर्ता अधिकारी यांचे अंतिम टाचण व अपचारी यांचे बचावाची व अंति निवेदने यांचा विचार केल्यानंतर निर्णयासाठी खालील मुद्यांचा उहापोह करण्यात येत आहे.

१) अपचारी हे वर्ग ४ कर्मचारी आहेत व मंदिर परिसरातील प्रसादालय येथे साई भक्तांना भोजन सेवा देणे व तदनुषंगिक कामे करणे हे त्यांचे प्रमुख काम आहे.

२) आपला बचाव करताना त्यानी असे म्हटले आहे की "त्यांचेविरुध्द ज्या कर्मचा-यानी लेखी तक्रारी केल्या आहेत, ते तक्रार अर्ज अभिकथनाच्या परिशिष्ट ब मध्ये समाविष्ट केलेले नाहीत. तसेच, त्याना यापुर्वी ज्या शिक्षा झालेल्या आहेत त्याबाबतचे आदेश परिशिष्ट ब मध्ये समाविष्ट केलेले आहेत ते चुकीचे आहे. कारण त्याबाबत त्याना त्या आदेशानूसार त्यावेळी शिक्षा झालेल्या असल्याने ते विषय त्याचवेळी संपलेले असताना आता पुन्हा त्या आदेशांचा शाबीत करण्याच्या कागदपत्रात समावेश करणे बरोबर नाही. त्यामुळे त्यांची काहीही चूक झालेली नसून आरोप त्याना मान्य नाहीत. तसेच हे तक्रार अर्ज चौकशीच्या कागदपत्रात समाविष्ट नसल्याने व साक्षीदारानीही हे कबूल केलेले असलेमुळे ती कागदपत्रे शाबीत झालेली नाहीत"

३) दोषारोपपत्राच्या परिशिष्ट ब मधील कागदपत्रे पाहिली असता असे दिसते की, त्यातील बरीचशी कागदपत्रे अपचारी याना केलेल्या शिक्षेच्या आदेशाच्या प्रती आहेत. अपचारी यांची नियुक्ती दि.०४/१२/२०१६ रोजी वर्ग ४ कर्मचारी म्हणून करण्यात आलेली आहे. त्यानंतर आजतागायत आपल्या सेवाकालात अनेकवेळा गैरवर्तन केल्याचे आढळून आलेले असून त्याना आतपर्यंत २ वेळा लेखी समज, ५ वेळा ताकीद व ४ वेळा ठपका अशी ११ वेळा शिक्षा करण्यात आलेली आहे.

येणेप्रमाणे अपचारी याना सन २०१६ पासून चार वर्षात एकुण ११ वेळेस शिक्षा झालेल्या दिसून येतात.

एवढया वेळेस गैरवर्तनाबाबत शिक्षा झालेल्या असताना व सन २०२० मध्ये, म्हणजे आता, त्यानी पुन्हा त्याच प्रकारचे गैरवर्तन केल्याचे दिसून येते व त्याबददल आता विभागीय चौकशी होत आहे ही गंभीर बाब आहे.

पान नंबर ४ वर...

४) अशा प्रकरणी अपचारी बचावाचा असा मुद्दा उपस्थित करतात की, एकदा शिक्षा झाल्यावर ती कागदपत्रे दुस-या आरोपासाठी वापरल्यास ती मान्य करण्यात येऊ नयेत. मात्र बचावाचा हा मुद्दा मान्य करता येत नाही. एकतर पुर्वी केलेल्या गैरवर्तनावरुन त्याना ज्या शिक्षा वेळोवेळी झाल्या त्यावेळी विभागीय/खाते चौकशी करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे अशी चौकशी करताना पुर्वी झालेल्या शिक्षेचा संदर्भ देणे हे उचित समजले जावे. प्रस्तुत प्रकरणातील गैरवर्तनाचे गांभीर्य हे पुर्वी केलेल्या शिक्षेच्या पार्श्वभुमीवर तपासून पाहणेही योग्यच आहे. न्यायालयात दाखल गुन्हे, वाहतुक नियमा संबंधीचे गुन्हे इ. गुन्हयांचे गांभीर्य ठरवताना पुर्वी कोणते गुन्हे केले व किती वेळा केले हे जाणून घेणे शिक्षा करणा-या अभिकरणास माहीत करुन घेणे जसे आवश्यक असते, तसेच, ते विभागीय/खाते चौकशीत सुध्दा गरजेचे आहे. त्यामुळे हा बचाव मान्य होऊ शकत नाही.

५) प्रस्तुत प्रकरणात तर अपचारी यानी बचाव करताना त्यानी त्यांचे सहकारी कर्मचारी असलेले साक्षीदार यांच्या उलट तपासणीत पुढील मुद्दे उपस्थित केलेले दिसून येतात.
काही बाबी अभिकथनपत्राच्या परिशिष्ट ब मध्ये समाविष्ट नाहीत. जसे, १) कर्मचा-यानी केलेल्या तक्रारी २) तक्रारदार कर्मचा-यानी केलेल्या तक्रारीबाबतचे तपशील व त्यासंबंधीचे कागदोपत्री पुरावे ३) तक्रार अर्जातील तक्रारीबाबत त्यांचे कथनाव्यतिरिक्त कोणताही पुरावा जोडलेला नाही.
याबाबत असे म्हणता येईलकी,
साक्षीदार यांनी उलटतपासणीत उत्तरे दिलेली आहेत की, या तक्रारी कार्यालयात आहेत. त्याचप्रमाणे सर्व साक्षीदारानी अभिकथनात वर्णन करण्यात आलेल्या व तक्रारीत समाविष्ट असलेल्या गैरवर्तनास दुजोरा देणा-या साक्षी दिलेल्या आहेत.
तसेच, वरिष्ठ व सहकारी कर्मचारी साक्षीदार यानी केलेल्या अपचारी यांच्याबाबत केलेल्या तक्रारीतील घटनांबाबत त्याना उलटतपासणीत प्रश्न विचारुन अपचारी याना बचाव करता येऊ शकला असता. मात्र अपचारी यानी या साक्षीदाराना त्यानी तक्रारीत वर्णन केलेल्या घटनांबाबत उलटतपासणीत कोणतेही प्रश्न विचालेले नाहीत. उलटतपासणीतील त्यांच्या प्रश्नांचा भर हा तक्रारींचे कागदोपत्री पुरावे आहेत का व ती कागदपत्रे अभिकथनाच्या परिशिष्टामध्ये समाविष्ट आहेत का यावरच होता. तसेच, बचावाच्या निवेदनातही याच मुद्यावर त्यानी भर दिलेला दिसून येतो. यावरुन अपचारी हे केवळ कथित तांत्रिक त्रुटीवर बोट ठेवून बचाव करीत आहेत असे दिसते.

६) अशाप्रकारे कथित तांत्रिक त्रुटीवर बोट ठेवून बचाव करीत असताना त्यांच्या सहकारी व वरिष्ठ साक्षीदारांनी त्यांच्या गैरवर्तनाबाबतच्या घटनाबाबत बचाव करताना अपचारी यानी या सर्व साक्षीदारांचे त्याचेबाबत काही पुर्व वैमनस्य आहे किंवा कसे व त्यानी त्याचा सूड उगविण्यासाठी त्यांचेविरुध्द कुभांड रचून तक्रारी दाखल केल्या आहेत किंवा कसे याबाबत अशा प्रकारचेही कुठले प्रतिपादन बचावात अपचारी यानी केलेले दिसून येत नाही.त्यामुळे अपचारी यांच्या बचावातून असा अर्थ निघतो की, "तक्रारी कदाचित ख-या असू शकतील पण त्या कागदपत्रत समाविष्ट नाहीत म्हणून त्या ग्राहय नाहीत."
पण त्या तक्रारी खोटया आहेत असे त्यावरुन सिध्द होऊ शकत नाही.

७) तसेच, अपचारी यानी आणखी एक असा आरेप केला आहे की, "सादरकर्ता अधिकारी यानी साक्षीदारांची केलेली सरतपासणी त्यांचे समोर केलेली नसून त्यानी त्यावर आमचेकडून नंतर सहया घेतलेल्या आहेत." यासाठी मात्र त्यांनी कोणताही पुरावा सादर केलेला नाही. अथवा त्याबाबत त्याच वेळी अर्ज करुन किंवा सही करण्यापुर्वी त्याच ठिकाणी ही बाब नोंदवता आली असती. मात्र त्यानी केलेले नाही. तसेच, समजा, ते म्हणतात ते खरे आहे असे जरी मानले , तरी त्या सरतपासणीतील जे प्रश्न व त्यांची उत्तरे त्याना आक्षेपार्ह वाटत असतील तर त्याबाबत उलटतपासणीत साक्षीदारानी प्रश्न विचारता आले असते. परंतु त्यानी तसेही काही केलेले नाही. किंबहुना सादरकर्ता अधिकारी यानी सरतपासणीत साक्षीदारानी विचारलेल्या बहुतेक प्रश्न व त्यांच्या उत्तराबाबत साक्षीदारांच्या अपचारी यानी घेतलेल्या उलटतपासणीत कोणतेही प्रश्न विचारलेले नाहीत. त्यामुळे त्यांचा हा बचाव मान्य करता येण्यासारखा नाही.

पान नंबर ५ वर...

८) वरील विवेचनावरुन असे म्हणता येईल की,
विभागीय चौकशीदरम्यान काही बाबी अभिकथनपत्राच्या परिशिष्ट ब मध्ये समाविष्ट नसणे जसे, कर्मचा-यांच्या तक्रारी याव अशा स्वरुपाच्या तांत्रिक त्रुटी असलेल्या मुद्यांचा अपचा-यास advantage देणे योग्य ठरणार नाही. याचे कारण असे की, विभागीय चौकशीत हे मुद्दे अगदी तावून सुलाखून सिध्द करवून घेणे आवश्यक नाही.
याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निकालामध्ये स्पष्ट म्हटले आहे की,
Standard of proof required in criminal case and that of Departmental enquiry are different. In criminal case, evidence has to be verified from various angels in order to prove a criminal case beyond doubt. Whereas in Departmental enquiry standard of proof has to be fixed based on Preponderence of Probability.

९) यावरुन असे स्पष्ट होते की, तक्रारदारानी केलेल्या तक्रार अर्जातील तक्रारी हया सकृत दर्शनी घडलेल्या आहेत अथवा नाही याची चौकशीच्या सुनावणीत शहानिशा करण्यात आली तर ती घटना/त्या घटना घडलेल्या आहेत असे गृहीत धरणे आवश्यक आहे. जर सर्व तक्रारदारानी केलेल्या तक्रारीतील तथ्ये खोटी पाडावयाची असतील तर ती संधी अपचारी यांना, बचाव निवेदनाचे वेळी, उलटतपासणीत तसेच अंतिम निवेदनात देण्यात आलेली आहे. मात्र अपचारी व त्याचे बचाव सहायक तक्रारदारानी केलेल्या तक्रारी प्रत्यक्षात घडलेल्या नाहीत हे सिध्द करण्याबाबत कोणतेही प्रतिपादन/बचाव केलेला दिसून येत नाही. केवळ तक्रार अर्ज चौकशीचे कागदपत्रात समाविष्ट नाहीत एवढयाच तांत्रिक कथित त्रुटीकडे ते लक्ष वेधतात. त्यामुळे तक्रारदारांनी केलेल्या तक्रारीतील घटना घडलेल्याच नाहीत असे कोठेही त्यानी दाखवून देण्याचा प्रयत्न केलेला नसल्याने व सर्व साक्षीदारानी त्याबाबत साक्षीत दुजोरा दिलेला असल्यामुळे त्या घटना घडलेल्या आहेत असे स्पष्ट होते.

१०) तसेच, अपचारी यांचेकडून प्रत्येक वेळी शिक्षा होताना चूक कबूल करुन अथवा नाकबूल करुन पुन्हा त्याचप्रकारचे गैरवर्तन होताना दिसत आहे. यावरुन त्यांची सेवा व त्या बजावताना त्यांचेकडून होत असलेले गैरवर्तन याबाबत ते अजिबात गंभीर नाहीत असे दिसून येते.

११) दरवर्षी गैरवर्तन करणे ही अत्यंत गंभीर बाब समजण्यात आली पाहिजे. प्रत्येकवेळी केलेली शिक्षा गुपचूप सहन करुन पुन्हा लगेचच गैरवर्तन करण्यास अपचारी निर्ढावलेले दिसून येतात.

१२) अपचारी यानी त्यांचे अंतिम निवेदनात म्हटले आहे की, "निलंबन कालावधीत दररोज कार्यालयात येऊन स्वाक्षरी करणे ही बाब अन्यायकारक आहे." याबाबत असे म्हणता येईल की, ही बाब विभागीय चौकशीच्या कक्षेतील नाही. त्यामुळे त्याबाबत काही मत व्यक्त करणे उचित होणार नाही.

१३) **निर्णय:**

वरील १ ते १२ मुद्दयांचा विचार करता चौकशी अधिकारी या निर्णयापर्यंत येऊन पोचले आहेत की, **दोषारोपत्राच्या परिशिष्ट अ मध्ये वर्णिलेले दोषारोप सिध्द होत आहेत.**

पान नंबर ६ वर...

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये **किरकोळ दंडात्मक कारवाया** अंतर्गत

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत:-

श्री.भारत एकनाथ सोनवणे, वर्ग-०४ कर्मचारी, श्री साई प्रसादालय विभाग यांचे गंभीर गैरशिस्तवर्तवतनाबाबतचा प्रस्ताव दि.०४.०३.२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समिती निर्णय क्रं.१७४ अन्वये त्यांना उपरोक्त क्रं.२ अन्वये तात्काळ संस्थान सेवेतुन निलंबीत करणेत आले. श्री.सोनवणे यांना उपरोक्त संदर्भ क्रं.३ अन्वये अभिकथनपत्र व संदर्भ क्रं.४ अन्वये खातेचौकशी अधिकारी यांना आदेश पारीत करणेत आलेला आहे.

श्री.सोनवणे यांना संदर्भ क्रं.२ अन्वये दि.०८.०६.२०२० पासुन सेवा निलंबीत करणेत आलेले असुन तीन महिन्यात खातेचौकशी पुर्ण होवुन अहवाल प्रशासनास प्राप्त होणे आवश्यक होते. सदरची मुदत दि.०७.०९.२०२० रोजी संपुष्टात आलेली आहे.परंतु श्री.ए.एम.देशमुख, खातेचौकशी अधिकारी, नाशिक यांना कोराणा संसर्ग या आजाराचे गांभीर्य विचारात घेता जिल्हाबंदी असल्याने ते शिर्डी – नाशिक येथे ये-जा करु शकलेले नाही. त्यामुळे खाते चौकशी आदेश प्राप्त होवुन देखील चौकशी तीन महिन्याचे आत पुर्ण होवु शकली नाही. तदनंतर जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१०७६/२०२० दि.०९.०९.२०२० रोजीचे आदेशान्वये दि.०७.०९.२०२० पासुन पुढे दोन महिने मुदतवाढ देणेत आलेली होती.

पान नंबर ७ वर...

श्री.ए.एम.देशमुख, नाशिक, चौकशी अधिकारी यांनी श्री.सोनवणे खातेचौकशी पुर्ण करुन दि.३०.११.२०२० रोजीचा खातेचौकशी अहवाल सादर केलेला असुन, त्यात त्यांनी,**" दोषारोपत्राच्या परिशिष्ट अ मध्ये वर्णिलेले दोषारोप श्री. सोनवणे यांचेवर सिध्द होत आहेत."** असे स्पष्ट नमुद केलेले आहे.

उपरोक्त अ चे अवलोकन करता श्री.सोनवणे हे उपरोक्त अभिकथनपत्रामध्ये नमुद केलेल्या आरोपात दोषी आढळून आलेले असल्याने व त्यांचे सेवेचा पुर्वइतिहास तसेच गैरवर्तनाचे स्वरुप पहाता त्यांना यापुर्वी ११ वेळा शिक्षा करण्यात आलेल्या आहेत.

१) श्री.सोनवणे यांचा दि.०८.०६.२०२० तें कामावर हजर/रुजु करुन घेणेपर्यंतचा कालावधी निलंबन कालावधी गृहीत धरता येईल.

२) श्री.भारत एकनाथ सोनवणे,वर्ग-०४ कर्मचारी (सध्या सेवा निलंबीत),श्री साईप्रसादालय विभाग यांना उपरोक्त अ प्रमाणे केलेल्या गैरशिस्तवर्तनाबाबत त्यांना कामावर हजर/रुजु करुन घेऊन,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ५ (४) अन्वये त्यांची एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याची शिक्षा त्यांना देता येईल, असे मत आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर निर्णयास्तव सादर.

16/12/2020

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

16/12/2020

meeting - 344/2020

विषय क्र.- ०८

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर

(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

विषय:- श्री.संजय रामदास राऊत, (सध्या सेवा निलंबीत) वर्ग-०४ कर्मचारी, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग दि.३०.११.२०२० रोजीचे खाते चौकशी अहवालाबाबत...

टिपणी

(अ) विषयाची पुर्वपिठीका-

१) श्री.राऊत यांची दि.०५.०२.२०२० रोजी सकाळी १० वा. ते सायं. ६ वा. पर्यंत जनरल डयुटी द्वारावती भक्तनिवास येथे लाडु प्रसाद वितरण काऊंटर येथे नेमण्यात आली होती.ते डयुटीवर असतांना दुपारी ३.३० वा.परस्पर कोणासही पुर्वकल्पना न देता अथवा कार्यालयातील हालचाल रजिष्टरला नोंद न करता डयुटीवरुन निघुन गेलांत. त्यामुळे सदरचे कालावधीत मिडीया/वार्ताहर यांनी सदर काऊंटर बंद असल्याची व्हीडीओ शुटींग काढुन त्यांचे स्तरावरुन श्री.राऊत यांना विचारणा केली आहे. तसेच द्वारावती येथे वास्तव्यास असलेल्या साईभक्तांनी सदरचे कालावधीत लाडु प्रसाद न मिळाल्याने त्यांनी प्र. अधिक्षक, लाडु व बर्फी प्रसाद निर्मीती विभाग यांचेकडे तक्रार केली आहे.लाडु प्रसाद वितरण काऊंटर कर्मचारी नसलेबाबत द्वारावती विभागातील कर्मचारी यांनी दुरध्वनी मार्फत संपर्क करुन लाडु व बर्फी प्रसाद निर्मीती विभागास कळविले आहे. त्यानुसार त्यांना दुपारी ४.२० वा.दुरध्वनीवर संपर्क केला असता त्यांनी उडवा-उडवीचे उत्तर देवुन फोन बंद करुन संपर्क खंडीत केलेला आहे.

श्री.राऊत यांचे हलगर्जीपणामुळे लाडु प्रसाद उपलब्ध असुन साईभक्तांना मिळण्यास उशिर झाला,त्यामुळे साईभक्तांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच संस्थानची मिडीयाद्वारेही बदनामी झाली आहे. तसेच ते वारंवार गैरवर्तन करत आहेत याबाबत त्यांचे रिपोर्टही केलेले आहे.

२) श्री.राऊत हे दैनंदीन डयुटीवर आल्यावर फींगर प्रिंट पंचीग करत नाही.याबाबत अहवाल दरमहा सादर केला जातो.

३) श्री.राऊत हे डयुटीवर असुन देखील हजेरी मस्टरला ३-४ दिवस स्वाक्षरी करत नाहीत, त्यांना स्वाक्षरी करणेबाबत लेखी/तोंडी सुचना देवुनही स्वाक्षरी करत नाही.

४) श्री.राऊत हे अचानक रजा घेतात वा रजा उपभोगुन आल्यानंतर रजा अर्ज मागणी केल्यानंतर अर्ज भरुन देतात. असे त्यांचे विरुध्द प्र. अधिक्षक, लाडु व बर्फी प्रसाद निर्मीती विभाग यांचे निवेदन आलेले आहे. श्री.राऊत यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशीर असून, गंभीर स्वरुपाचे वर्तनात मोडते.

उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत श्री.राऊत यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२५३१/२०२० दि.११-०२-२०२० अन्वये-कारणे दाखवा नोटीस काढून, त्याचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. तथापी, श्री.राऊत यांना सदर कारणे दाखवा नोटीस दि.१५.०२.२०२० रोजी प्राप्त होवुन देखिल,त्यांनी लेखी खुलासा सादर केलेला नाही. यावरुन सदर गैरशिस्त वर्तन केल्याचे त्यांना मान्य आहे असे दिसुन येते.

तदनंतर श्री.राऊत यांनी उशिराने दि.२५.०२.२०२० रोजीचा लेखी खुलासा सात दिवसात सादर करणेऐवजी सात दिवसाचे नंतर (१० दिवस) उशिराने दि.०३.०३.२०२० रोजी प्र.अधिक्षक, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती यांचेकडे सादर केलेला आहे.

प्र.अधिक्षक, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती यांनी सदरचे लेखी खुलाशासी मी सहमत नाही.सदर खुलासा पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर असा अभिप्राय नोंदविला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) २०१३ चे कलम ३(१) अन्वये संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :-

(i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल.

(ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ;

(iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.

पान नं. २ वर...

श्री.संजय रामदास राऊत, वर्ग-०४ कर्मचारी, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग यांनी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा(वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ३ (१) प्रमाणे प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानाच्या कर्मचा-यांचे कर्तव्य तसेच संस्थान कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य न करणे इत्यांदीचे उल्लंघन केलेले आहे. श्री.राऊत यांच्या शिस्तभंगाचे गांभिर्य विचारात घेता, त्यांना यापुर्वी गैरशिस्तवर्तनाबाबत १९ वेळा शिक्षा करण्यात आलेल्या असुन त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने, त्यांना मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४.०३.२०२० रोजीचे निर्णय क्रं.१७५ नुसार तात्काळ संस्थानचे सेवेतुन जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६०/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे आदेशान्वये दि.०८.०६.२०२० पासुन **" सेवानिलंबीत"** करण्यात आलेले आहे.

श्री. संजय राऊत यांना सेवा निलंबन कालावधीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (पदग्रहन अवधी आणि निलंबन, सेवेतुन बडतर्फी आणि काढुन टाकणे या कालखंडातील प्रदाने) विनीयम, २०१३ चे कलम १७ (अ) अन्वये त्यांना निलंबन कालावधीत निम्या वेतनावर रजेवर असताना जेवढे रजा वेतन मिळाले असते तेवढे वेतन अधिक रजा वेतनावरील महागाई भत्ता इतका निर्वाह भत्ता देणेत येत आहे.

तसेच उपरोक्त जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६१/२०२०, दि.०८.०६.२०२० अन्वये त्यांना अभिकथनपत्र बजाविण्यात आलेले आहे. जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६२/२०२०, दि.०८.०६.२०२० अन्वये श्री.ए.एम.देशमुख, खातेचौकशी अधिकारी, नाशिक यांची नेमणुक करण्यात आलेली आहे. श्री.देशमुख यांनी दि.३०.११.२०२० रोजीचा श्री.राऊत यांचा खातेचौकशी अहवाल इकडील कार्यालयास सामान्य प्रशासन शाखा, आवक विभाग ८१६१ दि.०७.१२.२०२० रोजी प्राप्त झालेला आहे.

श्री.राऊत यांची संस्थान सेवेत दि.०७.१२.२००६ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबतचा तपशिल खालीप्रमाणे आहे.

अ.नं.	आज अखेरपर्यंत दिलेल्या शिक्षा	किती वेळा .
०१	एक दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत	०१
०२	ताकीद	०९
०३	सक्त ताकीद	०४
०४	सुचना	०१
०५	लेखी समज	०१
०६	ठपका	०३
	एकुण झालेल्या शिक्षेची संख्या	१९

श्री.राऊत यांना यापुर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत एकुण १९ वेळा शिक्षा करणेत आलेली आहे.

ब) खातेचौकशी अहवाल-निर्णयासाठी मुद्दे, पुराव्याचे मूल्यमापन :-

श्री.ए.एम. देशमुख,नाशिक, चौकशी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे मुद्दे काढलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्या अधिनस्त असलेले श्री साई मंदिर हे भारतातीलच नव्हे तर जगभरातील साईभक्तांचे श्रध्दास्थान असल्याने येथे बाबांचे दर्शन घेण्यासाठी भक्तांची सतत गर्दी असते. मंदिर परिसर खूप मोठा असल्याने व भाविकांची खूप गर्दी असल्याने संस्थानने भक्तांसाठी येथे खूप सोयी सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. संस्थान परिसरामध्ये एकाच वेळी हजारो अनेक भक्तांची साई दर्शनासाठी सतत रीघ लागलेली असते. दर्शनानंतर सर्व भक्ताना प्रसाद घ्यावयाचा असतो. त्यासाठीही संस्थानने प्रसादासाठी साई प्रसादालय नावाचे मोठे भोजनगृह बांधलेले आहे. तसेच लाडू व बर्फी प्रसाद घ्यावयाचा असतो.त्यासाठीही संस्थानने प्रसादासाठी भोजनगृह बांधलेले आहे. तसेच लाडू व बर्फी प्रसाद आकर्षक पॅकिंगमध्ये वाजवी किमत घेऊन जाऊ शकतात.यासाठी संस्थानचा एक स्वतंत्र विभाग कार्यरत असून या विभागात लाडू व प्रसादाची निर्मिती व वितरण अशी दुहेरी कामे आहेत. वितरण व्यवस्थेसाठी संस्थान परिसरातच काही काऊंटर ठेवलेले आहेत. भक्तांच्या दर्शन कालावधीत ती काऊंटर्स सतत उघडी ठेवण्यात येतात, जेणेकरुन भक्ताना प्रसाद मिळावा.

पान नं. ३ वर...

अशा या लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागात श्री.संजय रामदास राऊत हे मदतनीस म्हणून कार्यरत होते. येथे काम करीत असताना त्यांच्याकडे लाडू व बर्फी प्रसाद वितरण काऊंटरवर डयूटी देण्यात आलेली होती. तेथे या डयूटीवर असताना त्यानी सोपविलेल्या जबाबदारीचे पालन केले नाही. ते काऊंटरवर दि.०५.०२.२०२० रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंतच्या डयूटीवर असताना दुपारी ३.३० च्या दरम्यान काऊंटर बंद करुन कुणासही न सांगता अथवा हालचाल रजिष्टरवर नोंद न करता निघून गेले. त्यामुळे साई भक्तांची लाडू व प्रसाद न मिळाल्याने गैरसोय झाली व तशा तक्रारी त्या विभागाकडे साई भक्तानी केल्या. तसेच, मीडियाने बंद काऊंटरचे फोटो घेऊन कळविले. त्यामुळे त्यांच्यावर दोषारोप ठेवण्यात आले आहेत.

सदर विभागीय चौकशीमध्ये शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने बजावलेल्या दोषारोपपत्रावरुन त्यातील दोषारोपांची चौकशी पूर्ण करण्यात आली आहे. दोषारोपपत्रासोबतचे दस्तावेज, साक्षीदारांच्या साक्षी, सादरकर्ता अधिकारी यांचे अंतिम टाचण व अपचारी यांचे बचावाची व अंतिम निवेदने यांचा विचार केल्यानंतर निर्णयासाठी खाली मुद्यांचा उहापोह करण्यात येत आहे.

१) अपचारी हे मदतनीस आहेत व मंदीर परिसरातील लाडू व बर्फी प्रसाद काऊंटरवर डयूटीवर असताना साईभक्तांना लाडू व बर्फी प्रसाद पुरविणे व त्यासाठी आलेला निधी हाताळणे/जमा करणे हे त्यांचे प्रमुख काम आहे.

२) आपला बचाव करताना त्यानी असे म्हटले आहे की "ते त्यांची डयूटी सोडून काऊंटर बंद करुन गेले होते व शेजारच्या कर्मचा-यास सांगून गेले होते व त्यात त्यांची काहीही चूक झालेली नसून हा आरोप त्याना मान्य नाही."

३) दोषारोपपत्राच्या परिशिष्ट ब मधील अ.क्र.४ ते २२ ही कागदपत्रे पाहिली असता असे दिसते की, ही कागदपत्रे अपचारी याना केलेल्या शिक्षेच्या आदेशाच्या प्रती आहेत. पहिले कागदपत्र दि.१०.०९.२००७ चे असून ती सह त्याना खालीलप्रमाणे शिक्षा झालेल्या दिसून येतात,
सन २००७ मध्ये २ वेळा,
सन २००८ मध्ये ४ वेळा,
सन २००९ मध्ये ४ वेळा,
सन २०१० मध्ये २ वेळा,
सन २०१२ मध्ये ३ वेळा,
सन २०१७ मध्ये १ वेळा,
सन २०१८ मध्ये ३ वेळा,
येणेप्रमाणे अपचारी याना सन २००७ पासून एकुण १९ वेळेस शिक्षा झालेल्या दिसून येतात. एवढया वेळेस गैरवर्तनाबाबत शिक्षा झालेल्या असताना व सन २०२० मध्ये, म्हणजे आता त्यानी पुन्हा त्याच प्रकारचे गैरवर्तन केल्याचे दिसून येते. व त्याबददल आता विभागीय चौकशी होत आहे, ही गंभीर बाब आहे.

४) अपचारी आपल्या बचाव व अंतिम निवेदनात बचावाचा असा मुद्दा उपस्थित करतात की, "एकदा शिक्षा झाल्यावर ती कागदपत्रे दुस-या आरोपासाठी वापरल्यास ती मान्य करण्यात येऊ नयेत." मात्र बचावाचा हा मुद्दा मान्य करता येत नाही. एकतर पुर्वी केलेल्या गैरवर्तनावरुन त्याना ज्या शिक्षा वेळोवेळी झाल्या त्यावेळी विभागीय/खाते चौकशी करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे अशी चौकशी करताना पुर्वी झालेल्या शिक्षेचा संदर्भ देणे हे उचित समजले जावे. प्रस्तुत प्रकरणातील गैरवर्तनाचे गांभीर्य ठरवताना पुर्वी कोणते गुन्हे केले व किती वेळा केले हे जाणून घेणे शिक्षा करणा-या न्यायालयास/अभिकरणास माहीत करुन घेणे जसे आवश्यक असते, तसेच, ते विभागीय/खाते चौकशीत सुध्दा गरजेचे आहे. त्यामुळै हा बचाव मान्य होऊ शकत नाही.

पान नं. ४ वर...

तसेच अपचारी यानी आपल्या अंतिम निवेदनात असे म्हटले आहे की,"एकदा एका गुन्हयाबाबत शिक्षा झाली असेल तर पुन्हा त्याच गुन्हयासाठी दुस-यांदा शिक्षा करणे हे नैसर्गिक न्यायतत्वाच्या विरुध्द आहे " हे त्यांचे प्रतिपादन जरी बरोबर असले तरी प्रस्तुत प्रकरणी शिक्षा करणारे अभिकरण पूर्वी झालेल्या शिखेचा प्रस्तुत प्रकरणी झालेल्या गैरवर्तनाशी संबंध जोडण्यासाठी शिक्षेचे आदेशाच्या प्रती अभिकथनाच्या परिशिष्टमध्ये समाविष्ट केल्या आहेत आहे व ते उचित आहे, असे मत व्यक्त करण्यात येते.

५) प्रस्तुत प्रकरणात तर अपचारी यानी, "लाडू व बर्फी प्रसाद काऊंटर सोडून गेल्याबददल आपली कोणतीही चूक झालेली नाही" असे प्रतिपादन केलेले आहे व त्याचे कारण, "ते काऊंटर बंद करुन शेजारच्या कोणा कर्मचा-यास सांगून संडासला गेले होते" असे दिले आहे. यात दोन बाबी महत्वाच्या आहेत. एक तर संडासला जास्तीत जास्त अर्धा तास लागेल असे गृहीत धरले तर जाऊन आल्यानंतर ते काऊंटर अपचारी यानी पुन्हा उघडले का? कारण ही घटना दुपारी ३.३० वाजता घडल्यानंतर ४ वाजल्यापासून त्यानी पुढे २ तास ते काऊंटर उघडे ठेवले होते का ? तर या बाबत त्यानी आपल्या बचावात, उलट तपासणीत कोठेही काहीही प्रतिपादन केलेले नाही. तसेच, काऊंटर बंद करण्यापुर्वी ज्या कर्मचा-याचा ते हवाला देत आहेत त्या कर्मचा-याबाबत त्यांनी काहीही तपशील दिलेला नाही, अगर त्यास स्वतःचे बचावाचा साक्षीदार म्हणूनही समोर आणलेले नाही. यावरुन, त्यांचा हा बचाव मान्य करता येत नाही.

६) याखेरीज, अपचारी जेव्हा काऊंटर सोडून गेले तेव्हा भक्तानी तक्रार करुन व अन्य कर्मचा-यानी फोनवरुन विभाग प्रमुखास सांगितल्यानंतर अपचारी याना फोनवरुन संपर्क केला असता त्यानी ते दवाखान्यात गेले आहेत असे सांगितले होते, असे विभाग प्रमुख व साक्षीदार श्री शेकडे यानी आपल्या साक्षीच्या प्रश्नातील उत्तरात सांगितले आहे. अपचारी हे जर संडसला गेले होते तर साक्षीदार श्री शेकडे यांचे म्हणणे की ते दवाखान्यात गेले आहेत हे अपचारी यानी उलटतपासणीत खोडून काढणे आवश्यक होते. परंतु अपचारी यानी याबाबत कोणतेही प्रश्न विचारले नाहीत. याचा अर्थ ते संडासला गेले होते हा बचाव मान्य करता येत नाही.

७) साक्षीदार श्री. शेकडे हे कार्यालय अधीक्षक असून अपचारी श्री राऊत यांचे वरिष्ठ आहेत.त्यांच्या उलट तपासणीत त्यानी पुढील मुद्दे उपस्थित केलेले दिसून येतात.

१) काही बाबी अभिकथनपत्राच्या परिशिष्अ ब मध्ये समाविष्ट नाहीत. जसे, साई भक्तानी केलेली तक्रार, २) फिंगर प्रिंट अहवाल व त्याचा तपशील, जसे कोणत्या तारखेस फिंगर प्रिंटींग केलेले नाही व त्या दिवशीचे त्याना वेतन देण्यात आले किंवा नाही३) मस्टरवर नंतर सही करणे४) रजा उपभोगून आल्यावर रजेचा अर्ज देणे इ.

याबाबत साक्षीदार यानी उत्तरे दिलेली आहेत की साई भक्तानी केलेली तक्रार कार्यालयात नाही. तसेच, फिंगर प्रिंट न करणे, मस्टरवर नंतर सही करणे, रजा उपभोगून आल्यावर रजेचा अर्ज देणे इ.बाबत तपशील देता येत नसला तरी असे अनेकवेळा घडलेले आहे. तसेच, उलटतपासणीत हालचाल रजिष्टर काऊंटर पासून लांब १ कि.मी. अंतरावर असणे, काऊंटरवर अपचारी हे एकटेच कर्मचारी असणे, रिलीव्हर न देणे, रोख रक्कम हाताळणेसाठी भत्ता नसणे याबाबी बचावासाठी स्पष्ट करुन घेतल्या आहेत.

पान नं. ५ वर...

76

८) याबाबत असे म्हणता येईल की,

विभागीय चौकशी दरम्यान "काही बाबी अभिकथन पत्राच्या परिशिष्ट ब मध्ये समाविष्ट नसणे जसे, साई भक्तांची तक्रार, फिंगर प्रिंट अहवाल व त्याचा तपशील, जसे कोणत्या तारखेस फिंगर प्रिंट केलेले नाही व त्या दिवशीचे त्रूना वेतन देण्यात आले किंवा नाही, मस्टरवर नंतर सही करणेचा तपशील, रजा उपभोगून आल्यावर रजेचा अर्ज देणे चा पुरावा इ. " या वअशा सवरुपाच्या तांत्रिक त्रुटी असलेल्या मुद्यांचा अपचा-यास advantage देणे योग्य ठरणार नाही. याचे कारण असे की, विभागीय चौकशीत हे मुद्दे अगदी तावून सूलाखून सिध्द करवून घेणे आवश्यक नाही.

याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निकालामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, Standard of proof required in criminal case and that of Departmental enquiry are different. In criminal case, evidence has to be verified from various angles in order to prove a criminal case beyond doubt. Whereas in Departmental enquiry standard of proof has to be fixed based on Preponderence of Probability.

त्यामुळे केवळ अपचारी यांच्या बचावातील मुद्दे हे केवळ कथित तांत्रिक स्वरुपाच्या त्रुटी दर्शविणारे आहेत.त्यावरुन अपचारी यानी प्रस्तुत प्रकरणात केलेले गैरवर्तन हे केलेलेच नाही असे सिध्द होऊ शकत नाही. तसेच, सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निकालामध्ये स्पष्ट असलेली Preponderence of Probability, म्हणजेच गैरवर्तन घडले असण्याची शक्यता आहे किंवा नाही ही बाब तपासणे हाच खाते/विभागीय चौकशीचे प्रमुख उद्देश आहे.त्यामुळे उपलब्ध पुराव्यांच्या आधारे ते गैरवर्तन घडलेले आहे असे मत व्यक्त करण्यात येते.

९) अपचारी यांचेकडून प्रत्येक वेळी शिक्ष होताना चूक कबूल करुन बथवा नाकबून करुन पुन्हा त्याचप्रकारचे गैरवर्तन होताना दिसत आहे. यावरुन त्यांची सेवा व त्या बजावताना त्यांचेकडून होत असलेले गैरवर्तन याबाबत ते अजिंबात गंभीर नाहीत असे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणातही अपचारी यानी त्यांच्या अंतिम निवेदनात त्यांचे हातून चूक झालेली आहे हे कबूल केले आहे. मात्र घडलेले गैरवर्तन हे फारसे गंभीर स्वरुपाचे नाही व त्रूासाठी खाते चौकशी करण्याची आवश्यकता नाही असा बचाव केला आहे. त्यावरुन त्यानी आपले गैरवर्तन कबूल केले आहे असे दिसून येते.

१०) प्रस्तुत प्रकरणातील गेरवर्तनाबाबत अपचारी यानी ते फारसे गंभीर नाही हा मुद्दा त्यानी यापुर्वी १९ वेळा केलेल्या गैरवर्तनाच्या पार्श्वभूमीवर तपासून पाहून शिस्तभंग विषयक प्राधिकरणाने या प्रकरणातील गैरवर्तनाबाबत खाते चौकशी सुरु केली आहे ही बाब महत्वाची म्हणून नोंदविण्यात येत आहे.

११) जवळ जवळ दरवर्षी शिक्षा होण्याएवढी गैरवर्तन करणे ही अत्यंत गंभीर बाब समजण्यात आली पाहिजे. प्रत्येकवेळी केलेली शिक्षा गुपचूप सहन करुन पुन्हा लगेचच गैरवर्तन करण्यास अपचारी निर्ढावलेले दिसून येतात.

निर्णय:

वरील १ ते ११ या मुद्दयांचा विचार करता चौकशी अधिकारी या निर्णयापर्यंत येऊन पोचले आहेत की,आरोपपत्राच्या परिशिष्ट अ मध्ये वर्णिलेले दोषारोप सिध्द होत आहेत.

पान नं. ६ वर...

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये **किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(१) ठपका ठेवणे, (२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत

(७) सक्तीची सेवा निवृत्ती, (८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत:-

श्री.संजय रामदास राऊत, सध्या सेवा निलंबीत, मदतनीस, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग यांचे गंभीर गैरशिस्तवर्तवतनाबाबतचा प्रस्ताव दि.०४.०३.२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमार सादर करणेत आलेला होता. त्याबाबत निर्णय क्रं.१७५ अन्वये त्यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६०/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे आदेशान्वये तात्काळ संस्थान सेवेतुन निलंबीत करणेत आले. श्री.राऊत यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६१/२०२०, दि.०८.०६.२०२० अन्वये अभिकथनपत्र व जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६२/२०२०, दि.०८.०६.२०२० अन्वये खातेचौकशी अधिकारी यांना आदेश पारीत करणेत आलेला आहे.

श्री.राऊत यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६०/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे आदेशान्वय दि.०८.०६.२०२० पासुन सेवा निलंबीत करणेत आलेले असुन तीन महिन्यात खातेचौकशी पुर्ण होवुन अहवाल प्रशासनास प्राप्त होणे आवश्यक होते. सदरची मुदत दि.०७.०९.२०२० रोजी संपुष्टात आलेली होती.परंतु श्री.ए.एम.देशमुख, खातेचौकशी अधिकारी, नाशिक यांना कोराणा संसर्ग या आजाराचे गांभीर्य विचारात घेता जिल्हाबंदी असल्याने ते शिर्डी – नाशिक येथे ये-जा करु शकलेले नाही. त्यामुळे खाते चौकशी आदेश प्राप्त होवुन देखील चौकशी तीन महिन्याचे आत पुर्ण होवु शकली नाही. तदनंतर जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१०७६/२०२० दि.०९.०९.२०२० रोजीचे आदेशान्वये दि.०७.०९.२०२० पासुन पुढे दोन महिने मुदतवाढ देणेत आलेली होती.

श्री.ए.एम.देशमुख, नाशिक, चौकशी अधिकारी यांनी श्री.राऊत खातेचौकशी पुर्ण करुन दि.३०.११.२०२० रोजीचा खातेचौकशी अहवाल सादर केलेला असुन, त्यात त्यांनी,“ **दोषारोपत्राच्या परिशिष्ट अ मध्ये वर्णिलेले दोषारोप श्री.राऊत यांचेवर सिध्द होत आहेत.**” असे स्पष्ट नमुद केलेले आहे.

पान नंबर ७ वर...

उपरोक्त अ चे अवलोकन करता श्री.राऊत हे उपरोक्त अभिकथनपत्रामध्ये नमुद केलेल्या आरोपात दोषी आढळून आलेले असल्याने व त्यांचे सेवेचा पुर्वइतिहास तसेच गैरवर्तनाचे स्वरुप पहाता त्यांना यापुर्वी १९ वेळा शिक्षा करण्यात आलेल्या आहेत.

१) श्री.राऊत यांचा दि.०८.०६.२०२० ते कामावर हजर/रुजु करुन घेणेपर्यंतचा कालावधी निलंबन कालावधी गृहीत धरता येईल.

२) श्री.संजय रामदास राऊत, सध्या सेवा निलंबीत, मदतनीस, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग यांना उपरोक्त अ प्रमाणे केलेल्या गैरशिस्तवर्तनाबाबत त्यांना कामावर हजर/रुजु करुन घेऊन,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ५ (४) अन्वये त्यांची एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याची शिक्षा त्यांना देता येईल, असे मत आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर निर्णयास्तव सादर.

6/11/2020

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

LAB - meeting - 364 - 2020

विषय क्र.- ०e

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर
(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

विषय :- श्री.रंगनाथ बन्शी सोनवणे, (सध्या सेवा निलंबीत) सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे दि.३०.११.२०२० रोजीचे खाते चौकशी अहवालाबाबत...

टिपणी

विषयाची पुर्वपिठीका-

श्री.रंगनाथ बन्शी सोनवणे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांनी खालीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन केलेले आहे.

श्री.सोनवणे हे दि.१६.०१.२०२० ते दि.१९.०१.२०२० अखेर ०४ दिवस या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहिले आहे. त्यामुळे कामाची गैरसोय झाली.

उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.सोनवणे यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२५२५/२०२० दि.११-०२-२०२० अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आलेला होता.तथापी, श्री.सोनवणे यांना सदर कारणे दाखवा नोटीस दि.१४-०२-२०२० रोजी प्राप्त होवुन देखिल,त्यांनी लेखी खुलासा सादर केलेला नाही. यावरुन सदर गैरशिस्त वर्तन केल्याचे त्यांना मान्य आहे असे दिसुन आलेले आहे.सदर गैरशिस्तवर्तनाचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) २०१३ चे कलम ३(१) अन्वये संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :-

(i) **संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल.**

(ii) **सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ;**

(iii) **संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.**

श्री.रंगनाथ बन्शी सोनवणे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांनी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा(वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ३ (१) प्रमाणे प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानाच्या कर्मचा-यांचे कर्तव्य तसेच संस्थान कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य न करणे इत्यांदीचे उल्लंघन केलेले आहे. श्री.सोनवणे यांच्या शिस्तभंगाचे गांभिर्य विचारात घेता, त्यांना यापुर्वी गैरशिस्तवर्तनाबाबत २१ वेळा शिक्षा करण्यात आलेल्या असुन त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने, त्यांना मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभा दि.०४.०३.२०२० निर्णय क्रं.१७६ नुसार त्यांना जा.नं. एसएसएस/ वशी-शिस्त/२६६/२०२०, दि.०८-०८-२०२०७ रोजीचे आदेशान्वये तात्काळ संस्थानचे सेवेतुन **" सेवानिलंबीत "** करण्यात आलेले आहे.

श्री.रंगनाथ सोनवणे यांना सेवा निलंबन कालावधीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (पदग्रहन अवधी आणि निलंबन, सेवेतुन बडतर्फी आणि काढुन टाकणे या कालखंडातील प्रदाने) विनीयम, २०१३ चे कलम १७ (अ) अन्वये त्यांना निलंबन कालावधीत निम्या वेतनावर रजेवर असताना जेवढे रजा वेतन मिळाले असते तेवढे वेतन अधिक रजा वेतनावरील महागाई भत्ता इतका निर्वाह भत्ता देणेत येत आहे.

तसेच त्यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६७/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे त्यांना अभिकथनपत्र बजाविण्यात आलेले आहे. जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६८/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे आदेशान्वये श्री.ए.एम.देशमुख, खातेचौकशी अधिकारी, नाशिक यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.श्री.देशमुख यांनी दि.३०.११.२०२० रोजीचा श्री.सोनवणे यांचा खातेचौकशी अहवाल इकडील कार्यालयास सामान्य प्रशासन शाखा, आवक विभाग ८१८२ दि.०७.१२.२०२० रोजी प्राप्त झालेला आहे.

पान नं. २ वर...

श्री.सोनवणे यांची संस्थान सेवेत दि.०४.१२.२००६ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबतचा तपशिल खालीप्रमाणे आहे.

अ.नं.	आज अखेरपर्यंत दिलेल्या शिक्षा	किती वेळा
०१	सक्त ताकीद	०३
०२	लेखी समज	०१
०३	ठपका	१५
०४	वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखणे	०२
	एकुण झालेल्या शिक्षेची संख्या	२१

श्री.सोनवणे यांना यापुर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत एकुण २१ वेळा शिक्षा करणेत आलेली आहे.

ब) खातेचौकशी अहवाल-निर्णयासाठी मुद्दे, पुराव्याचे मूल्यमापन :-

श्री.ए.एम. देशमुख,नाशिक, चौकशी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे मुद्दे काढलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्या अधिनस्त असलेले श्री साई मंदिर हे भारतातीलच नव्हे तर जगभरातील साईभक्तांचे श्रध्दास्थान असल्याने येथे बाबांचे दर्शन घेण्यासाठी भक्तांची सतत गर्दी असते. मंदिर परिसर खूप मोठा असल्याने व भाविकांची खूप गर्दी असल्याने संस्थानने भक्तांसाठी येथे खूप सोयीसुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. संस्थान परिसरामध्ये एकाच वेळी हजारो अनेक भक्तांची साई दर्शनासाठी सतत रीघ लागलेली असल्याने मंदीर परिसर तसेच संस्थानचे सर्व विभाग यामध्ये पराकोटीची स्वच्छता ठेवण्याची संस्थान नेहमीच काळजी घेते. या आरोग्य सुविधेवर आरोग्य विभागाच्या वरिष्ठाकडून सतत नियंत्रण ठेवले जाते.

अशा या मंदिरात अपचारी श्री.रंगनाथ बन्शी सोनवणे हे सफाई कामगार असून ते आरोग्य विभागात कार्यरत होते. येथे काम करीत असताना त्यांच्याकडे सोपविलेल्या जबाबदारीचे त्यानी पालन केले नाही. ते सफाई काम करीत असताना त्यांनी त्यांचे काम सोडून विनापरवाना गैरहजर राहत असल्याबाबत त्यांच्यावर दोषारोप ठेवण्यात आले आहेत. यापुर्वीही सन २०१९ मध्ये त्यांची विभागीय चौकशी अशाच प्रकारच्या गैरवर्तनाबाबत करण्यात आलेली होती व त्यात त्याना दोषी ठरविण्यात आलेले होते. असे असतानाही पुन्हा तशाच प्रकारचे गैरवर्तन अपचारी यांचेकडून सन २०२० या वर्षातही दिसून आल्याबाबत त्यांचे वरिष्ठानी गैरवर्तन रिपोर्ट सादर केल्यामुळे असे मत बनले असावे की, अपचारी यांचेवर शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात यावी असे शिस्तभंगविषयक प्राधिकरणाचे मत बनलेले दिसते.

त्यामुळे शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने बजावलेल्या दोषारोपपत्रावरुन त्यातील दोषारोपांची चौकशी पूर्ण करण्यात आली आहे. दोषारोपपत्रासोबतचे दस्तावेज, साक्षीदारांच्या साक्षी,सादरकर्ता अधिकारी यांचे अंतिम टाचण व अपचारी यांचे बचावाची व अंतिम निवेदने यांचा विचार केल्यानंतर निर्णयासाठी खाली मुद्यांचा उहापोह करण्यात येत आहे.

१) अपचारी हे सफाई कामगार आहेत व मंदीर परिसरात स्वच्छता राखणे हे त्यांचे प्रमुख काम आहे.

२) आपला बचाव करताना त्यानी असे म्हटले आहे की "ते त्यांची डयूटी सोडून अनधिकृतरित्या काही अपरिहार्य कारणास्तव गैरहजर राहिले होते व ती त्यांची चूक झालेली असून ती त्याना मान्य आहे ."

३) याच निवेदनात त्यानी असे म्हटले आहे की, "त्याना परिशिष्ट ब मधील अ.क्र.३ ते २८ कागदपत्रे मान्य नाहीत.कारण ती कागदपत्रे त्यानी पुर्वी केलेल्या गैरवर्तनाबाबतची असून त्यावेळी त्याना शिक्षा झालेली आहे. "

४) परिशिष्ट ब मधील अ.क्र.३ ते २८ ही कागदपत्रे पाहिली असता असे दिसते की, ही कागदपत्रे अपचारी याना केलेल्या शिक्षेच्या आदेशाच्या प्रती आहेत. पहिले कागदपत्र दि.०१-०१-२०११ चे असून त्यानंतर खालीलप्रमाणे शिक्षा झालेल्या दिसून येतात.

पान नं. ३ वर...

सन २०१३ मध्ये १ वेळा,
सन २०१४ मध्ये १ वेळा,
सन २०१५ मध्ये ३ वेळा,
सन २०१६ मध्ये ७ वेळा,
सन २०१७ मध्ये २ वेळा,
सन २०१८ मध्ये ७ वेळा,
सन २०१९ मध्ये ३ वेळा,
सन २०२० मध्ये १ वेळा,

येणेप्रमाणे अपचारी याना सन २०११पासून एकुण २५ वेळेस शिक्षा झालेल्या दिसून येतात. त्यातील सन २०१६ मध्ये ७ वेळा व सन २०१८ मध्येही पुन्हा ७ वेळा शिक्षा झालेल्या दिसून येत आहेत.एवढया वेळेस गैरवर्तनाबाबत शिक्षा झालेल्या असताना व सन २०१९ मध्ये त्यांची विभागीय चौकशी होऊन त्याना दोषी ठरविलेले असतानाही त्यानी पुन्हा त्याच प्रकारचे गैरवर्तन केल्याचे दिसून येते. याबाबत गंभीर दखल घेण्यात येते.

५) तसेच, प्रत्येक वेळी शिक्षा करताना ते चूक कबूल करुन पुन्हा असे करणार नाही असे आश्वासन देत असले तरी त्यावर विश्वास ठेवता येत नाही. तसेच, यावेळच्या अंतीम निवेदनात तर त्यानी तेही आश्वासन दिलेले दिसून येत नाही. यावरुन त्यांची सेवा व त्या बजावताना त्यांचेकडून होत असलेले गैरवर्तन याबाबत ते अजिबात गंभीर नाहीत असे दिसून येते.

६) दि.०६ ऑक्टोबर रोजी त्यानी दिलेल्या अर्जात त्यानी तीन प्रकारे बचाव केलेला दिसतो,
अ)दोषारोपपत्रातील कागदपत्रापैकी क्र.१ व २ या पत्राप्रमाणे मी गैरहजर राहिलो होतो. परंतु त्यावेळी माझी मनःस्थिती बरोबर नव्हती.
ब) माझे घरगुती अडचणीमुळे गैरहजर होतो.
क) मी गैरहजेरीबाबत माझी चूक झालेली आहे. तरी "एक वेळ " मला माफ करावे.
वरील तीन प्रकारचे बचाव पाहता त्यात विसंगती दिसून येते. एक वेळेस "मनःस्थिती ठीक नव्हती " असा बचाव केला आहे. तर त्यास नक्की कोणत्या कारणामुळे "मनःस्थिती ठीक नव्हती " हे सांगणे आवश्यक होते. यापैकी काहीही त्यानी केलेले नाही. केवळ मोघमपणे "मनःस्थिती ठीक नव्हती "यासारख्या प्रतिपादनामुळे त्यांचा बचाव मान्य करता येत नाही. तसेच "मनःस्थिती ठीक नव्हती " या प्रतिपादनानंतर लगेच " घरगुती अडचणीमुळे गैरहजर" ही बचावाची दोन्ही प्रतिपादने परस्पर विरोधी आहेत. त्यामुळे हा त्यानी केलेला बचाव एक मोघम व Casual पध्दतीने केलेला बचाव असून तो अमान्य करण्यात येत आहे.

७) याप्रकरणी बचावाचे निवेदन देताना त्यानी परिशिष्ट ब मधील उपरोक्त शिक्षेच्या आदेशाच्या कागदपत्रे मान्य नाहीत असे म्हटले आहे. हे मान्य करता येत नाही. कारण त्याना एकुण २५ वेळा शिक्षा झालेल्या असताना त्या शिक्षेच्या आदेशापुर्वी त्यांची कोणतीही विभागीय चौकशी करण्यात आलेली नव्हती.

८) दरवर्षी गैरवर्तन करणे ही अत्यंत गंभीर बाब समजण्यात आली पाहिजे. प्रत्येकवेळी केलेली शिक्षा गुपचूप सहन करुन पुन्हा लगेचच गैरवर्तन करण्यास अपचारी निर्ढावलेले दिसून येतात.

९) त्यामुळे बचाव निवेदनातील त्यांचे प्रतिपादन की, "मला एक वेळ माफ करण्यात यावी " हे पटू शकणारे नाही.

पान नं. ४ वर...

निर्णय:-

वरील १ ते ९ या मुद्यांचा विचार करता चौकशी अधिकारी या निर्णयापर्यंत येऊन पोचले आहेत की, आरोपत्राच्या परिशिष्ट अ मध्ये वर्णिलेले दोषारोप सिध्द होत आहेत.

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये **किरकोळ दंडात्मक कारवाया** अंतर्गत

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत:-

श्री.रंगनाथ बन्शी सोनवणे, सध्या सेवा निलंबीत, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गंभीर गैरशिस्तवर्तवतनाबाबतचा प्रस्ताव दि.०४.०३.२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमार सादर करणेत आलेला होता. त्याबाबत निर्णय क्रं.१७६ अन्वये त्यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६६/२०२०, दि.०८.०६.२०२० रोजीचे आदेशान्वये तात्काळ संस्थान सेवेतुन निलंबीत करणेत आले. श्री.सोनवणे यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६७/२०२०, दि.०८.०६.२०२० अन्वये अभिकथनपत्र व जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६८/२०२०, दि.०८.०६.२०२० अन्वये खातेचौकशी अधिकारी यांना आदेश पारीत करणेत आलेला आहे.

श्री.सोनवणे यांना संदर्भ क्रं.२ अन्वये दि.०८.०६.२०२० पासुन सेवा निलंबीत करणेत आलेले असुन तीन महिन्यात खातेचौकशी पुर्ण होवुन अहवाल प्रशासनास प्राप्त होणे आवश्यक होते. सदरची मुदत दि.०७.०९.२०२० रोजी संपुष्टात आलेली होती.परंतु श्री.ए.एम.देशमुख, खातेचौकशी अधिकारी, नाशिक यांना कोराणा संसर्ग या आजाराचे गांभीर्य विचारात घेता जिल्हाबंदी असल्याने ते शिर्डी – नाशिक येथे ये-जा करु शकलेले नाही. त्यामुळे खाते चौकशी आदेश प्राप्त होवुन देखील चौकशी तीन महिन्याचे आत पुर्ण होवु शकली नाही. तदनंतर जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१०७६/२०२० दि.०९.०९.२०२० रोजीचे आदेशान्वये दि.०७.०९.२०२० पासुन पुढे दोन महिने मुदतवाढ देणेत आलेली होती.

पान नंबर ५ वर...

श्री.ए.एम.देशमुख, नाशिक, चौकशी अधिकारी यांनी श्री.सोनवणे खातेचौकशी पुर्ण करुन दि.३०.११.२०२० रोजीचा खातेचौकशी अहवाल सादर केलेला असुन, त्यात त्यांनी,“ **दोषारोपत्राच्या परिशिष्ट अ मध्ये वर्णिलेले दोषारोप श्री. सोनवणे यांचेवर सिध्द होत आहेत.**” असे स्पष्ट नमुद केलेले आहे.

उपरोक्त अ चे अवलोकन करता श्री.सोनवणे हे उपरोक्त अभिकथनपत्रामध्ये नमुद केलेल्या आरोपात दोषी आढळून आलेले असल्याने व त्यांचे सेवेचा पुर्वइतिहास तसेच गैरवर्तनाचे स्वरुप पहाता त्यांना यापुर्वी २१ वेळा शिक्षा करण्यात आलेल्या आहेत.

१) श्री.सोनवणे यांचा दि.०८.०६.२०२० ते कामावर हजर/रुजु करुन घेणेपर्यंतचा कालावधी निलंबन कालावधी गृहीत धरता येईल.

२) श्री.रंगनाथ बन्शी सोनवणे, सध्या सेवा निलंबीत, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांना उपरोक्त अ प्रमाणे केलेल्या गैरशिस्तवर्तनाबाबत त्यांना कामावर हजर/रुजु करुन घेऊन,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ५ (४) अन्वये त्यांची एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याची शिक्षा त्यांना देता येईल, असे मत आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर निर्णयास्तव सादर.

23/12/2020

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

Meeting-354/2020

विषय क्र.- 90

मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

(सामान्य प्रशासन विभाग)

84

विषय - श्री मिनीनाथ भाऊसाहेब कोते व श्री विलास अशोक आंबेकर, प्रयोगशाळा सहाय्यक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांना पुर्वलक्षी प्रभावाने वेतनश्रेणी लागू करणेबाबत...

टिपणी-

पुर्वपिठीका- अ) श्री मिनीनाथ भाऊसाहेब कोते व श्री विलास अशोक आंबेकर, प्रयोगशाळा सहाय्यक यांची श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकरीता दिनांक-०२/०६/२००८ रोजीच्या वृत्तपत्रात जाहीरात देऊन दि.०३/०८/२००८ रोजीच्या मुलाखतीमधुन सन २००८ पासून परिविक्षाधीन काळासाठी (४ सप्टेंबर, २००८ ते ३० एप्रिल, २०११) नियुक्ती केलेली आहे. दरम्यानच्या काळात शासनाप्रमाणे तसेच मा. व्यवस्थापन समितीव्दारे पगारवाढ तसेच इतर सेवा सुविधा देण्यात आलेल्या आहेत. परिविक्षाधीन कालावधी संपल्यावर मा. व्यवस्थापन समिती निर्णयाव्दारे संस्थान सेवेत कायम केलेले आहे.

उपरोक्त विषयास अनुसरुन प्रयोगशाळा सहाय्यक यांनी त्यांचे दि.२२.०२.२०१८ रोजीचे अर्जान्वये शासन निर्णयाप्रमाणे प्रयोगशाळा सहाय्यक कालावधीच्या प्रथम नेमणुक दिनांकपासून पुर्वलक्षी प्रभावाने नियमित प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून वेतनश्रेणी लागू होणेबाबत विनंती अर्ज केलेले आहेत. त्याबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे –

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत संचालित सर्व शाळा (श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल) या विना अनुदानीत तत्त्वावर चालविण्यात येतात.

२) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.एसएसएन-१०९९/(३४०/९९)/माशि-२, दि.२७, एप्रिल, २००० अन्वये राज्यातील सर्व मान्यताप्राप्त खाजगी माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांत/कनिष्ठ महाविद्यालयात आणि अध्यापक विद्यालयात शिक्षणसेवक योजना कार्यान्वित करुन, मंजुर असलेल्या शिक्षकांच्या पदांवर शिक्षणसेवक नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

३) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.एसएसएन-१०९९/(३४०/९९)/माशि-२, दि.१३ ऑक्टोबर, २००० माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षणसेवक योजना सुरु करण्यासंदर्भात शासन निर्णय समक्रमांक दि.२७ एप्रिल, २००० अन्वये दिलेला आदेश रद्द करण्यात येत असून, राज्यातील सर्व मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळात/कनिष्ठ महाविद्यालयात आणि अध्यापक विद्यालयात तसेच विद्यानिकेतन व सैनिक शाळांत सुधारीत शिक्षणसेवक योजना कार्यान्वित करुन, शिक्षणसेवक नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

४) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.एसएसएन १०००/(३६४/०१)/माशि-२,दि.२६ जुलै, २००१ अन्वये सुधारीत शिक्षणसेवक योजना विनाअनुदानित शाळांना लागु नाही. विनाअनुदानित शाळांनी शिक्षकांची भरती शिक्षणसेवक म्हणून करु नये. जर विनाअनुदानित शाळांनी शिक्षणसेवकांची नियुक्ती केल्यास तो या योजनेतील तरतुदींचा भंग होईल व अशा शाळां विरुद्ध शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचेकडून कारवाई करण्यात येईल.

५) मा.व्य.समितीचे दि.१८-१९/०८/२००१ चे सभेतील निर्णय क्र.४०३ मधील (२) शिक्षण सेवक योजना विना अनुदानित शाळांना लागू नसलेबाबत महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.एसएसएन १०००/(३६४/०१)/माशि-२, दि.२६ जुलै, २००१ अन्वये निर्णय झालेला आहे. सदरहू निर्णय हा माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरांवरील शिक्षण सेवकांबाबत आहे. सबब शासन निर्णयानुसार माध्यामिक व उच्च माध्यामिक स्तरांवरील शिक्षण सेवकांना सहाय्यक शिक्षक या पदावी वेतनश्रेणी लागू करणेत यावी. तसेच (४) शासन निर्णयात जरी माध्यमिक/उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षणं सेवकांचा उल्लेख असला तरी संस्थानकडील प्राथमिक/पुर्व प्राथमिक विभागाकडील शिक्षण सेवकांनाही अनुज्ञेय वेतनश्रेणीत दोन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीवर नेमणे न्यायोचित होईल. एकाच शाळेतील पुर्व प्राथमिक/प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षण सेवकांना देय वेतनश्रेणी देण्याचे बाबतीत भेदभाव न करता एकाच तत्त्वानुसार वागणूक देण्यात यावी. परिणामत: प्राथमिक विभागातील शिक्षण सेवकांनाही त्यांचे पदनाम बदलून अनुज्ञेय वेतनश्रेणी देणेत यावी. असा निर्णय झालेला आहे.

६) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन पूरकपत्र एसएसएन १०९९/(३४०/९९) माशि-२, दि.१०.०६.२००५ अन्वये शिक्षण सेवक ही योजना मान्यताप्राप्त अनुदानित मा ध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये, अध्यापक विद्यालये, सैनिकी शाळा यामधून सुरु करण्यात आलेली आहे. म्हणजेच जी शाळा ज्या शैक्षणिक वर्षी अनुदानाच्या ज्या टप्प्यावर पात्र ठरते त्या शैक्षणिक वर्षापासून त्या शाळेस शिक्षणसेवक योजना लागू होईल. विना अनुदान तत्वावरील शाळेत करण्यात आलेली सेवा शिक्षणसेवक म्हणून ग्राह्य धरण्यात येणार नाही.

७) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.एसएसएन १०९९/(३४०/९९)/माशि-२, दि.२६ एप्रिल, २००६ अन्वये शिक्षणसेवक ही योजना मान्यताप्राप्त १०० टक्के अनुदानित शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये/अध्यापक विद्यालये व सैनिकी शाळा यामध्ये सुरु करण्यात आली आहे. विनाअनुदान तत्त्वावर परवानगी देण्यात आलेल्या किंवा अशंत: अनुदानित शाळांना ही योजना लागू नाही. या शाळांमधील सहशिक्षण पदावरील नियुक्त्या नियमित स्वरुपातील राहतील.

पान नं. ०२ वर

उपरोक्त अ.क्र.१ ते ७ चे अवलोकन करता श्री साईबाबा संस्थानचे शैक्षणिक संकुलाकडील सर्व शाळेंची मान्यता ही विना अनुदानित आहे. उपरोक्त सर्व शासन निर्णयानुसार विना अनुदानित शाळांना शिक्षण सेवक योजना लागू नाही.

त्याबाबत मा.व्य.समितीचे दि.१८-१९/०८/२००१ चे सभेतील निर्णय क्र.४०३ नुसार संस्थानचे शैक्षणिक संकुलाकडील पुर्व प्राथमिक/प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक सर्व विभागातील सर्व शिक्षणसेवक यांना शासन निर्णयानुसार अनुज्ञेय वेतनश्रेणी देणेबाबत निर्णय झालेला आहे.

उपरोक्त अर्जदार यांनी वेळोवेळी पारित झालेले शासन निर्णय व मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-१९/०८/२००१ चे सभेतील निर्णय क्र.४०३ नुसार नेमणूक दिनांकापासून पुर्वलक्षी प्रभावाने सहा.शिक्षकाची / प्रयोगशाळा सहाय्यकांची वेतनश्रेणी लागू करणेबाबत मागणी केलेली आहे.

सदर विनंती अर्जानुसार इकडील कार्यालयाकडील दि.२९.१२.२०१५ रोजीचे टिपणीमध्ये सविस्तरपणे नमुद केलेले होती. सदर टिपणीवरील मंजुरी नुसार शिक्षण सेवकांना शासन निर्णयानुसार नेमणूक दिनांकापासून पुर्वलक्षी प्रभावाने नियमित सहा.शिक्षकाची वेतनश्रेणी लागू करावी अगर कसे? याबाबत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड.अशोकराव पाटील यांना इकडील जा.क्र.एसएसएस /साप्रशा/आस्था/५५१९/२०१६ दि.०५ जानेवारी, २०१६ रोजीचे पत्रान्वये मार्गदर्शन मिळणेबाबत विनंती केलेली होती. उपरोक्त पत्राबाबत ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी त्यांचेकडील दि.२५ एप्रिल, २०१६ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

I have gone through the office note with detail events regarding the appointment of Shikshan Sevak by various Govt. resolutions and concerned officer of the sansthan has shown me the appointment orders of similar terms and conditions stated therein. I have seen the Govt. resolutions pertaining to appointment of Shikshan Sevak which is clearly not applicable to non aided secondary school and junior college (GR dated 26-7-2001). The appointments of Assistant Teachers and Lab assistant are made thereafter. All the concerned teaching and non teaching staff has accepted the terms and conditions of their appointment. I have been told that, all those staff is regularized after period of three year. In such situation a legal questions arises as to whether Govt. Regulations would prevail over the terms and conditions of the appointed are not? Therefore, in my opinion we should take the advice from our high court panel advocate.

वरील अभिप्रायामध्ये ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी उपरोक्त प्रकरणी संस्थानचे उच्च न्यायालयाचे वकिलांचा अभिप्राय घेणेस सुचित केलेले होते.

त्यानुसार इकडील जा.क्र.एसएसएस/वशी-०१/६१९/२०१६ दि.११मे,२०१६ चे पत्रान्वये शिक्षणसेवकांना शासन निर्णया नुसार पुर्वलक्षी प्रभावाने नेमणूक दिनांकापासून नियमित सहा.शिक्षकांची/प्रयोगशाळा सहाय्यकांची वेतनश्रेणी लागू करणेबाबत संस्थानचे उच्च न्यायालयाचे कायदेशीर सल्लागार ॲड.संजय आर.चौकीदार यांचा अभिप्राय मागविण्यात आलेला होता.

ॲड.संजय आर.चौकीदार यांनी त्यांचेकडील दि.२६.०५.२०१६ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

1 Shikshan Sevaks Scheme was not made applicable to unaided schools and hence, Assistant Teacher or Laboratory Assistants having been appointed as Shikshan Sevak and paid salary as Shikshan Sevak at a fixed rate applicable at the relevant time are entitled for payment of salary applicable to the post of Assistant Teacher and also post of Laboratory Attendant. The relevant clarifications have been issued by the State of Maharashtra vide Govt. Resolution dated 26th July, 2001.

The Shikshan Sevaks scheme was not made applicable to primary as well as secondary unaided schools.

2 In the aforesaid premises, there is no legal impediment in extending the benefits of retrospective application of pay-scale applicable and payable to the post of Assistant Teacher and Laboratory Attendant/Laboratory Assistant since the date of their appointment. Hence this opinion

उपरोक्त अभिप्रायाचे अवलोकन करता शैक्षणिक संकुलाकडील शिक्षणसेवकांना शासन निर्णयानुसार पुर्वलक्षी प्रभावाने नेमणूक दिनांकापासून नियमित सहा.शिक्षक/प्रयोगशाळा सहाय्यकांची वेतनश्रेणी लागू करणेस कोणताही कायदेशीर अडथळा नाही, असे नमुद केलेले आहे.

त्यानुसार इकडील कार्यालयाकडील दि.२८.०६.२०१६ रोजीच्या टिपणीवरील निर्देशानुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा – आस्था/२५८९/२०१६ दि.२४ ऑगस्ट, २०१६ रोजी व स्मरण पत्र दि.१९/०३/२०१८ चे पत्रान्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना पत्र देऊन शिक्षणसेवकांना शासन निर्णयानुसार पुर्वलक्षी प्रभावाने नेमणूक दिनांकापासून नियमित सहाय्यक शिक्षकांची/ प्रयोगशाळा सहाय्यकांची वेतनश्रेणी लागू करणेबाबत मार्गदर्शन मागविलेले आहे.

उपरोक्त दिनांक २९ जुन, २०१८ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र शासन यांनी नमुद केले आहे की, " श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत संचलित शाळा हया १०० % विनाअनुदानित तत्वावर चालविण्यात येत असल्याने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय दि. २६ जुलै, २००१ हा विनाअनुदानित शाळांना लागू होत नाही. "

पान नं. ०३ वर

सध्यस्थिती:- ब) तदनंतर मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे श्री. मिनिनाथ भाऊसाहेब कोते व श्री विलास अशोक आंबेकर, प्रयोगशाळा सहाय्यक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी " सेवेत रुजु दिनांका पासून / नियुक्ती दिनांकापासून वेतनश्रेणी मिळावी " अशी मागणीबाबतची याचिका दाखल केलेली होती. या न्यायालयीन याचिकेत / दाव्यात मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी आणि मुख्याध्यापक, श्री कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांना प्रतिवादी करणेत आलेले होते.

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी सदर याचिकेवर दि.१०/१०/२०१९ रोजी निकाल (सुनावणी) झालेली असून मा. उच्च न्यायालय, मंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी सदरच्या याचिकेवर पुढीलप्रमाणे आदेशित केले आहे.

1. The learned council for petitioners submits that the representation has been given by petitioners for fixation of the pay scale. The same is not yet decided by the respondents.
2. Mr. Bhavar, learned council for respondent nos. 1 and 2 submits that, in case, petitioners have made representation, then respondents would decide it on its own merits, preferable within a period of two months.
3. In view of the said statement, no further orders are necessary.
4. Writ petitions are disposed of, No. costs.

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी उपरोक्त आदेशाची कारवाई दोन महीन्यात करणेचे आदेशित केले असल्याने श्री आंबेकर व श्री कोते यांना नियुक्तीचे दिनांकापासून वेतनश्रेणी लागू करणेत यावी / कसे याबाबत मा. उपसंचालक (शिक्षण) माध्यमिक विभाग, पुणे आणि मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडे मार्गदर्शन / अभिप्रायासाठी पत्र देण्यात आलेले होते.

त्यैकी, मा. उपसंचालक (शिक्षण) माध्यमिक विभाग, पुणे यांचे जा. क्र. शिउसं/उमाशि-४०२/मार्गदर्शन /पुवि/१९/८२०८ दि. १९ नोव्हेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

" श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री. साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी जि. अहमदनगर यांस शासनाने कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिलेली आहे. कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयांना सेवक योजना लागू नाही. त्यामुळे संबधित श्री मिनीनाथ भाऊसाहेब कोते आणि श्री. विलास अशोक आंबेकर यांच्या प्रयोगशाळा सहाय्यक पदावर दि. ०४/०९/२००८ ते ३०/०४/२०११ या कालावधीत प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून रु. २५००/- (मानधन) वर केलेली नियुक्ती ही पुर्णपणे नियमबाहय पध्दतीने केलेली आहे. संबधितांच्या नेमणूकीबाबत संस्थामार्फत किंवा संबधित शाळेच्या / कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य मार्फत मान्यतेचा प्रस्ताव सादर झालेला नाही.

कायम विनाअनुदानित तत्वावरील नियुक्त्या या पुर्णपणे शासन मान्यता प्राप्त वेतनश्रेणीत देणे आवश्यक आहे. त्यामुळे संबधित श्री मिनीनाथ भाऊसाहेब कोते आणि श्री विलास अशोक आंबेकर यांच्या प्रयोगशाळा सहाय्यक नियुक्तीबाबत तत्कालीन वेतनश्रेणीत नियुक्ती दयावी लागेल. संबधितांच्या नियुक्त्या कायम विनाअनुदानित तत्वावर असल्यामुळे त्यांच्या वेतनाची सर्व जबाबदारी ही श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची राहील. "

दरम्यान विधी विभागाने दि. १४/०९/२०२० रोजीच्या पत्रान्वये (मंजुरीन्वये) श्री कोते व श्री आंबेकर यांचे न्यायालयीन दाव्याबाबत मा.कोर्टाचे आदेशाचा अवमान होऊन नोटीस प्राप्त झालेचे कळविले होते.

दिनांक २६/०६/२०२० रोजीच्या मंजूरी अन्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांच्या दिनांक-१०/१०/२०१९ रोजी निकालातील मुदतीस मुदतवाढ घेणेकामी न्यायालयात दिवाणी अर्ज दाखल केला असता मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिनांक- ०५ ऑगस्ट, २०२० रोजी आदेशात पुढीलप्रमाणे नमुद केले आहे.

" The Hon'ble, Lordships are pleased to reject your Circulation Note as there is no urgency with liberty to move afresh only after normal Court functioning is restored."

क) आता महाराष्ट्र शासनाचे मा. विधी व न्याय विभागाकडील पत्र क्र. सासंवि-१०१९/९८५/प्र.क्र.२००/का.१६, दिनांक-११ नोव्हेंबर, २०२० रोजीचे पत्रान्वये दिलेला अभिप्राय-

" कामय विनाअनुदानित तत्वावरील नियुक्त्या या पूर्णपणे शासन मान्यताप्राप्त वेतनश्रेणीत देणे आवश्यक आहे. त्यामुळे श्री. मिनीनाथ भाऊसाहेब कोते व श्री. विलास अशोक आंबेकर यांच्या प्रयोगशाळा सहाय्यक नियुक्तीबाबत तत्कालीन वेतनश्रेणीत नियुक्ती द्यावी लागेल. २.बंधितांच्या नियुक्त्या या कायम विनाअनुदानित तत्वावर असल्याने त्यांच्या वेतनाची जबाबदारी ही श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्यावर राहील. श्री. मिनीनाथ कोते व श्री. विलास आंबेकर, प्रयोगशाळा सहाय्यक यांना पूर्वलक्षी प्रभावाने वेतनश्रेणी लागू करण्यास हरकत नाही. "

प्रस्ताव:- श्री मिनीनाथ कोते व विलास आंबेकर, प्रयोगशाळा सहाय्यक यांना त्यांची प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून एकत्रित मानधनावर नेमणूक झाल्याच्या दिनांकापासून म्हणजे दि. ०४ सप्टेंबर, २००८ पासुन पुर्वलक्षी प्रभावाने शासन मान्यता प्राप्त वेतनश्रेणी लागू करणे व त्यानुसार वेतननिश्चिती करणे.

२) उपरोक्त वेतनश्रेणी लागू करतांना येणा-या देय फरकाची रक्कम आदा करणेबाबत निर्णय घेणे.

उपरोक्त निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मा. तदर्थ समितीसमोर निर्णयार्थ सविनय सादर

(कानूराज बगाटे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- 19

मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ

(सामान्य प्रशासन विभाग)

विषय – श्री बापुसाहेब बाबुराव गायके, मदतनीस, श्री साईप्रसादालय विभाग यांचा खातेनिहाय चौकशी दरम्यान न मिळालेल्या (वंचित) वेतनवाढी, वार्षिक वेतनवाढ, लाभ व भत्ते पुर्वलक्षी प्रभावाने मिळणेस तसेच मला सन २०१२ व २०१३ मध्ये करण्यात आलेल्या सेवानिलंबन शिक्षा रद्द करून, त्या कालावधीतील लाभ पुर्ववत मिळणेबाबतचा अपील अर्ज...

टिपणी-

अ) विषयाची पुर्वपिठीका-

श्री बापुसाहेब बाबुराव गायके, मदतनिस, श्री साईप्रसादालय विभाग यांनी दि.२८.०८.२०१९, दि.२९.०८.२०१९ व दि.२३.१०.२०१९ रोजीच्या अर्जान्वये अशी विनंती केलेली आहे की,

१) दिं.१६.०८.२०१४ रोजी श्रींचे समाधी मंदिर येथे घडलेल्या गैरशिस्तवर्तनान्वये, मला सेवानिलंबीत करण्यात आले होते. त्यानुसार, ॲड.श्री बी.वाय.काळवाघे, संस्थान नियुक्त खातेचौकशी अधिकारी यांचेमार्फत खातेचौकशी पर्णु करून खातेनिहाय चौकशीचा अंतिम निष्कर्ष अहवाल संस्थानकडे सादर केलेला आहे. सदर निष्कर्ष अहवालामध्ये माझेवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द झालेले नसुन, मला निर्दोष ठरविण्यात आलेले आहे. खातेनिहाय चौकशी दरम्यान माझे तात्पुरते स्वरूपात केलेल्या सेवा निलंबन (दि.११.१०.२०१४ ते दि.१७.०६.२०१५ अखेर एकुण ०८ महिने, ०६ दिवस) कालावधीतील वेतनवाढी, वार्षिक वेतनवाढी, सेवा निलंबीत कालावधीतील पगार, भत्ते व इतर लाभांपासुन मला आजपर्यत वंचित ठेवण्यात आलेले आहे. तसेच मला दि.१८.०६.२०१५ पासुन पुर्नस्थापना करून, कामावर रूजु करून घेण्यात आलेले आहे. सदर बाबही माझ्यावर अन्यायकारक असुन, माझी सेवा पुर्नस्थापीत न करता नियमित करून, मला सदर कालावधीतील सर्व लाभ (नियमित) इतर स्थायी कर्मचा-याप्रमाणे पुर्वलक्षी प्रभावाने लागु करावेत, अशी मागणी केलेली आहे.

२) मी माझे आईचे आजारपणामुळे, कौटुंबीक अडचणीमुळे मी सन २०१२ व २०१३ साली नियमित कामावर येवु शकलेलो नव्हतो. सदर कालावधीत मी संस्थानचे नियमांप्रमाणे किरकोळ रजा, अर्जित रजा, सार्वजनिक रजा विहीत कालावधीत अर्ज भरून उपभोगलेल्या होत्या. परंतु सदर रजा/सुट्टया संपल्यामुळे मी नियमाप्रमाणे विनावेतन रजा घेतलेल्या असुन, त्यानंतर माझ्या विनावेतन रजा संपुष्टात आलेल्या असल्याने, पर्यायाने मी उर्वरीत रजा ना काम ना वेतन या तत्वावर विहीत नमुन्यातील रजा अर्ज सादर करून घेतलेल्या होत्या. परंतु प्रशासनाने विशेष बाब म्हणुन इतर स्थायी कर्मचा-यांप्रमाणे माझ्या रजा अर्जांचा सहानभुतीपुर्वक विचार न करता, मला ३९ दिवस, ८१ दिवस, १४६ दिवस असे एकुण २६६ दिवसांच्या रजा विनापरवानगी (अनाधिकृत) धरून, मला तिनवेळेस ०४ दिवस संस्थान सेवेतुन तात्पुरते सेवा निलंबीत केलेले होते. त्यामुळे माझी सेवा खंडीत झालेली असुन, मला पगाराचे आर्थिक लाभापासुन वंचित रहावे लागलेले आहे.

तरी, मी रितसर अर्ज भरूनही प्रशासनाने माझे सदरहु रजा अर्ज नामंजुर करून, मला तिनवेळेस ०४ दिवस सेवानिलंबीत केलेले होते. तरी त्या कालावधीतील माझे रजा अर्ज मंजुर करून, माझी सेवा पुर्वलक्षी प्रभावाने (स्थायी कर्मचा-याप्रमाणे) नियमित करावी अशी मागणी केलेली होती.

त्यासअनुसरून, सामान्य प्रशासन विभागामार्फत दि.२१ नोव्हेंबर, २०१९ रोजी सविस्तर टिपणी सादर करणेत आलेली होती. त्यावर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे निर्देश दिलेले आहेत की, " शिक्षा आदेश रद्द करण्याचे अधिकार मा.अध्यक्षांना आहेत संबंधीतांना अपील करणेस कळवावे." सदर निर्देशाच्या अनुषंगाने, श्री गायके यांना सामान्य प्रशासन विभागामार्फत जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/२४७६/२०२०, दि.०७ फेब्रुवारी, २०२० अन्वये, पत्र देण्यात आलेले आहे.

आता, श्री गायके यांनी दि.२८.०७.२०२० रोजी मा. अध्यक्ष साहेब यांचेकडे खातेनिहाय चौकशी दरम्यान मला न मिळालेल्या (वंचित) वेतनवाढी, वार्षिक वेतनवाढ, लाभ व भत्ते पुर्वलक्षी प्रभावाने मिळणेस तसेच मला सन २०१२ व २०१३ मध्ये करण्यात आलेल्या सेवानिलंबन शिक्षा रद्द करून, त्या कालावधीतील लाभ पुर्ववत मिळणेबाबतचा विनंती अर्ज/अपील अर्ज केलेला आहे.

सेवाविनियमातील अपिल करणेबाबतची तरतूद-

मा.शासनाने मंजूर केलेले सेवाविनियम संस्थानला दि.०१ जानेवारी, २०१५ पासून लागू करण्यात आलेले आहेत. त्यामधील **प्रकरण ५ अपिले** मध्ये पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे-

...२) जर कार्यकारी अधिका-यांनी दंडात्मक कार्यवाही लादली तर विनियम ६ मधील तरतुदींच्या अधिन राहुन संस्थानाचा कर्मचारी समितीकडे अपील दाखल करण्याचा पर्याय निवडु शकतो.

पान नं.०२ वर...कृ.मा.प...

तसेच **कलम १४ (१)** मध्ये तात्पुरत्या लागू असलेल्या कायद्यातील तरतुदींच्या अधिन राहुन, संस्थानाचा कर्मचारी, त्यामध्ये सेवा समाप्तीच्या लगेच अगोदर कोणत्याही वर्गात असलेल्या व्यक्तीचा समावेश होतो, कार्यकारी अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाविरूध्द समितीकडे अपील दाखल करू शकतो.

तसेच **कलम १५-** कोणतेही अपील अपीलदाराला ज्या आदेशाविरूध्द अपील दाखल करावयाचे आहे त्या आदेशाची प्रत प्राप्त झाल्यापासून तिस दिवसाच्या आत दाखल केले पाहिजे, अन्यथा ते स्विकारले जाणार नाही.

त्यासअनुसरून, श्री गायके यांचे विनंती अपील अर्जाबाबत वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे-

ब) वस्तुस्थिती-

श्री गायके यांची जा.क्र.एसएसएस-वशी-१-२५९३-२००३, दि.२० ऑक्टोबर, २००३ रोजी वर्ग ४ चे कर्मचारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली होती. ते दि.२१.१०.२००३ रोजी कॅन्टीन विभागात हजर झालेले आहेत. श्री गायके यांना सन २००३ ते सन २०११ पर्यंत नियमित वार्षिक वेतनवाढ लागू करण्यात आलेली आहे.

सन २०१२ चे वेतनवाढीबाबत -

श्री गायके हे सन २०१२ चा वार्षिक वेतनवाढ कालावधी दि.०१.०७.२०११ ते दि.३०.०६.२०१२ दरम्यान **२८६ दिवस विनावेतन/खाडे** गैरहजर आहेत. त्यांना सदर कालावधीत देण्यात आलेल्या गैरशिस्तवर्तन शिक्षेचा तक्ता खालीलप्रमाणे-

अ.क्र.	विनावेतन/खाडे गैरहजर दिनांक	शिक्षा
०१	दि.०७.६.२०११, दि.०८.०६.२०११ ते दि.३१.१०.२०११	श्री गायके यांना सदर गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा म्हणुन जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४८३०/२०१३, दि. ११ मार्च, २०१३ अन्वये, संस्थानचे सेवेतुन दि.१४.०३.२०१३ ते दि.१७.०३.२०१३ पर्यंत **चार दिवस सेवा निलंबीत** करणेत आले आहे.
०२	दि.१०.१२.२०११ ते दि.१३.१२.२०११	श्री गायके यांना सदर गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा म्हणुन जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४३५८/२०११, दि. २५ डिसेंबर, २०११ अन्वये, दि.१०.१२.२०११ ते दि.१३.१२.२०११ एकुण **०४ दिवस विनावेतन खाडे व लेखी समज** देण्यात आलेली आहे.
०३	दि.१५.१२.२०११ ते दि.२६.१२.२०११ दि.२९.१२.२०११ ते दि.०६.०३.२०१२	श्री गायके यांना सदर गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा म्हणुन जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३९५८/२०१३, दि. ०२ जानेवारी, २०१३ अन्वये, संस्थानचे सेवेतुन दि.०४.०१.२०१३ ते दि.०७.०१.२०१३ पर्यंत **चार दिवस सेवा निलंबीत** करणेत आले आहे.
०४	दि.०७.०३.२०१२ ते दि.०४.०४.२०१२ दि.०६.०४.२०१२ ते दि.१४.०४.२०१२	श्री गायके यांना सदर गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा म्हणुन जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१०६९/२०१२, दि. १२ जुन, २०१२ अन्वये, संस्थानचे सेवेतुन दि.१४.०६.२०१२ ते दि.१७.०६.२०१२ पर्यंत **चार दिवस सेवा निलंबीत** करणेत आले आहे.

क) श्री गायके यांचे सन २०१५ चे वार्षिक वेतनवाढीबाबत –

श्री गायके यांना सन २०१३ व सन २०१४ ची वार्षिक वेतनवाढ लागू करणेत आलेली आहे. दि.१.७.२०१४ ते ३०.६.२०१५ या कालावधीत श्री गायके हे तात्पुरते सेवानिलंबीत असल्याने ते २४९ दिवस कामावर गैरहजर होते. त्यामुळे त्यांना सन २०१५ ची वार्षिक वेतनवाढ लागू करणेत आलेली नाही. त्याविषयीचा तपशिल खालीलप्रमाणे-

१. श्री गायके यांचे दिं.१६.०८.२०१४ रोजीच्या श्री साईबाबा मंदिर गाभा-यात साईभक्तांचे फोटो काढणे या गैरशिस्तवर्तनाबाबत जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३२४१/२०१४, दि.११.१०.२०१४ रोजीच्या आदेशान्वये **तात्पुरते सेवानिलंबीत** करण्यात आले होते.

२. श्री गायके यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३५५५/२०१४, दि.२९.१०.२०१४ अन्वये आरोपपत्र देण्यात येऊन खातेचौकशी करण्यात आली.

पान नं.०३ वर....

३. श्री गायके यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/११३०/२०१५, दि.१७.०६.२०१५ रोजीच्या आदेशान्वये खातेचौकशी कामकाजात सहकार्य करण्याच्या अटीवर दि.१८.०६.२०१५ पासुन पुर्नस्थापना करण्यात येऊन कामावर हजर करून घेण्यात आले.

४. ॲड.बी वाय काळवाघे, खातेचौकशी अधिकारी यांनी श्री गायके यांचा खातेचौकशी अहवाल दि.२३.०२.२०१६ रोजी सादर केलेला होता, त्यात त्यांनी पुढीलप्रमाणे निष्कर्ष अहवाल सादर केलेला आहे.

१) श्री बापु बाबुराव गायके, मदतनीस, श्री साई प्रसादालय दोषी नाहीत.

२) श्री गायके यांनी द इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅन्डींग ऑर्डर) सन १९४६ खालील स्थायी आदेश कलम २४(ए) व २४ (एल) नुसार गैरशिस्तवर्तन केलेले नाही, असे नमुद आहे.

५. ॲड.बी वाय काळवाघे, खातेचौकशी अधिकारी यांनी सादर केलेला निष्कर्ष अहवाल कामगार विभागाच्या दि.१४.०४.२०१६ रोजी टिपणी सादर करणेत आलेली होती. सदर टिपणीचे अवलोकन करता, त्यावर तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी श्री बाजीराव शिंदे सो. यांनी पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत-

१) दि.१९/०५/२०१६ रोजी श्री गमे सो.चर्चा करावी.

२) तत्कालीन प्रशासकीय अधिकारी श्री गमे सो. यांनी, क.कामगार अधिकारी " कृपया मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे निर्देशाप्रमाणे तात्काळ ०३ महिन्यांचे आंत फेरचौकशी करून अहवाल सादर करणेत यावा. " असे निर्देश दिलेले आहेत.

६. त्यावर दि.१६/०६/२०१६ रोजी चर्चा होऊन तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांनी फेर सादर करावे असे निर्देश दिलेले आहेत. सोबत दि.१४.४.२०१६ रोजीची टिपणी अवलोकनार्थ सादर केलेली आहे.

७. कामगार विभागामार्फत दि.११.०८.२०१६ रोजी टिपणी फेरसादर करणेत आलेली होती. सदर टिपणीच्या मंजूरीअन्वये, श्री गायके यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२६७६/२०१६, दि.१८.१०.२०१६ रोजीच्या आदेशान्वये गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा म्हणुन **ताकीद** देण्यात आलेली आहे. परंतु, सदर आदेशात निलंबन कालावधीबाबत कुठलेही निर्देश देण्यात आलेले नसल्याने श्री गायके यांना सन २०१५ ची वार्षिक वेतनवाढ देण्यात आलेली नाही.

सोबत, **परिशिष्ट अ** मध्ये श्री गायके यांचे सेवापुस्तकात असलेल्या नोंदी व त्यांचे वैयक्तिक नस्तीमध्ये उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार, त्यांना आजपावेतो देणेत आलेल्या वेतनाबाबतचा सविस्तर अहवाल जोडला आहे व श्री गायके यांचा गैरशिस्तवर्तन शिक्षेचा तक्ता **परिशिष्ठ ब** म्हणून जोडलेला आहे. कृपया त्याचे अवलोकन होणेस विनंती .

ड) <u>विभागाचा अभिप्राय व प्रस्ताव-</u>

१. सेवाविनिमयातील कलम नं.१५ अन्वये, कोणतेही अपील अपीलदाराला ज्या आदेशाविरूध्द अपील दाखल करावयाचे आहे त्या आदेशाची प्रत प्राप्त झाल्यापासून तिस दिवसाच्या आत दाखल केले पाहिजे, अन्यथा ते स्विकारले जाणार नाही. अशी तरतूद आहे. श्री गायके यांनी वेतनवाढ व इतर लाभ मिळणेसंदर्भात केलेला अपील अर्ज हा आदेश पारीत झालेनंतर तीन महिन्यांनंतरचा आहे. त्यामुळे सेवाविनियमातील तरतुदीन्वये श्री गायके यांचा अर्ज फेटाळता येईल.

२. वार्षिक वेतनवाढ देणसंदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ कलम १० अन्वये, सर्व कर्मचा-यांना दरवर्षी दिनांक १ जुलै या एकाच दिनांकास वार्षिक वेतन वाढ मंजुर करण्यात येईल. दिनांक १ जुलै रोजी ज्या कर्मचा-यांची सुधारित वेतन संरचनेमध्ये ६ महिने किंवा त्यापेक्षा आधिक सेवा पुर्ण होईल ते कर्मचारी दिनांक १ जुलै रोजी वेतनवाढ मिळण्यास पात्र राहतील. असे नमुद आहे.

३. सन २०१२ मध्ये श्री गायके हे दि.०१.०७.२०११ ते दि.३०.०६.२०१२ दरम्यान एकुण २८६ दिवस गैरहजर असल्यामुळे त्यांना सदरहु २०१२ ची वार्षिक वेतनवाढ देय्य होत नाही.

४. सन २०१५ च्या वार्षिक वेतनवाढीसंदर्भात-

श्री गायके यांच्या गैरशिस्तवर्तन प्रकरणामध्ये ॲड.श्री. बी. वाय. काळवाघे, संस्थान नियुक्त खातेचौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या चौकशीअंती अहवाल व निष्कर्ष पुढीलप्रमाणे –

अ) श्री बापु बाबुराव गायके, मदतनिस, श्री साई प्रसादालय दोषी नाहीत.

ब) श्री गायके यांनी द इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅन्डींग ऑर्डर्स) ॲक्ट १९४६ खालील स्थायी आदेश कलम २४(ए) व २४ (एल) नुसार गैरशिस्तवर्तन केलेले नाही.

पान नं.०४ वर...कृ.मा.प...

५. श्री गायके यांना कामगार विभागाने पारीत केलेल्या दि.१८ ऑक्टोबर, २०२० रोजीचे आदेशाद्वारे उपरोक्त खातेचौकशी अधिकारी ॲड.श्री बी.वाय.काळवाघे यांच्या निष्कर्ष अहवालानूसार ताकीद ही शिक्षा देण्यात आलेली आहे.

६. श्री गायके हे सन २०१४- २०१५ मध्ये २४९ दिवस तात्पुरते सेवानिलंबीत होते. सदर निलंबन कालावधीबाबत कुठलेही आदेश पारीत करणेत आलेले नसल्याचे निर्देशनास येते.

७. श्री साईबाबा विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा विनियम प्रकरण ४ निलंबन बडतर्फी आणि कामावरून काढुन टाकणे या कालाखंडातील वेतने मधील कलम नं.१९ (२) मध्ये, **जेव्हा संस्थानाच्या कर्मचा-यांला सेवेत पुनःस्थापित करण्यास सक्षम असलेल्या प्राधिका-यांचे असे मत असेल की बडतर्फ झालेला, सेवेतुन काढून टाकण्यात आलेला किंवा सक्तीने निवृत्त झालेला संस्थानाचा कर्मचारी पुर्णपणे दोषमुक्त झाला आहे, तेव्हा उपनिमियम (६) मधील तरतुदींच्या अधिन राहुन संस्थानाच्या कर्मचा-याला तो प्राप्त करण्यास पात्र असलेले संपुर्ण वेतन आणि भत्ते प्रदान करण्यात येतील आणि जर तो कामावरून बडतर्फ झाला नसता किंवा त्याला कामावरून काढून टाकण्यात आले नसते किंवा सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले नसते तर अशा बडतर्फीपुर्वी कामावरून काढुन टाकण्यापुर्वी किंवा सक्तीच्या सेवानिवृत्ती पुर्वी बडतर्फी पुर्वी, कामावरून काढुन टाकण्यापुर्वी किंवा सक्तीच्या सेवानिवृत्ती पुर्वी तो जे वेतन आणि भत्ते प्राप्त करण्यास पात्र असेल तेवढे वेतन आणि भत्ते प्रदान केले जातील. असे नमुद आहे.**

८. श्री बापुसाहेब बाबुराव गायके हे खाते चौकशी मध्ये निर्दोष सिध्द झालेले असल्याने त्यांचा निलंबन कालावधी हा कामावर आहे असा समजणेत येऊन त्यांना सन २०१५ ची वेतनवाढ व त्याकालावधीतील वेतनाचा फरक व इतर अनुज्ञेय भत्ते संस्थान नियमाप्रमाणे देण्यास हरकत नाही, असे मत आहे.

उपरोक्त प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

18/9/2020

(कान्हूराज बगाटे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

परिशिष्ट– अ

(वैयक्तिक नस्ती व सेवापुस्तकावरील नोंदीवरून)

दि.१७ ऑगस्ट, २०२०

कर्मचा-याचे नाव- श्री बापुसाहेब बाबुराव गायके

प्रथम नियुक्ती दिनांक – २०/१०/२००३ **पदनाम- वर्ग – ४**

कर्मचारी

नियत वेतन प्रथम वर्ष रू.२०००/- दरमहा (२००३)

नियत वेतन प्रथम वर्ष रू.२५००/- दरमहा (२००४)

वेतनश्रेणी – २५५०-५५-२६६०-६०-३२००

दिनांक २२/१०/२००५ मुळवेतन रूपये २५५०/-+ अनुज्ञेय महागाई भत्ता+अंतरिम वाढ

दिनांक ३०/१०/२००६ रोजी वार्षिक पगारवाढीसह मुळवेतन रू २६०५/- वेतनवाढ दिनांक १/१०/२००६

दिनांक २३/१०/२००७ रोजी वार्षिक पगारवाढीसह मुळवेतन रू २६६०/- वेतनवाढ दिनांक १/१०/२००७

दिनांक २८/११/२००८ रोजी वार्षिक पगारवाढीसह मुळवेतन रू २७२०/- वेतनवाढ दिनांक १/११/२००८

दिनांक ०१/०१/२००६ पासुन सहावा वेतनआयोग लागु करणेत आला.

वेतनबॅंड ४४४०-७४४० ग्रेड वेतन रूपये १३००

दिनांक १४/०८/२००९ रोजी वार्षिक पगारवाढीसह मुळवेतन रू ५५३०/- वेतनवाढ दिनांक १/०७/२००९

दिनांक ०६/०८/२०१० रोजी वार्षिक पगारवाढीसह मुळवेतन रू ५७४०/- वेतनवाढ दिनांक १/०७/२०१०

दिनांक ०५/०८/२०११ रोजी वार्षिक पगारवाढीसह मुळवेतन रू ५९६०/- वेतनवाढ दिनांक १/०७/२०११

सन २०१२ मध्ये २८६ दिवस गैरहजर राहिल्यामुळे दि.०१/०७/२०१२ ची वार्षिक वेतनवाढ देण्यात आली नाही.

दिनांक ०१/०८/२०१३ रोजी वार्षिक पगारवाढीसह मुळवेतन रू ६१८०/- वेतनवाढ दिनांक १/०७/२०१३

दिनांक १/०७/२०१४ पासुन वार्षिक पगारवाढीसह मुळवेतन रू ६४१०/- वेतनवाढ, दिनांक १/०७/२०१४

सन २०१५ मध्ये २४९ दिवस तात्पुरते सेवानिलंबीत होते. दि.०१/०७/२०१५ वेतनवाढ नाही.

जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४०८०/२०१६, दि.२८ जानेवारी, २०१६ नुसार गट क व ड मधील कर्मचा-यांना १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर दिनांक २१/१०/२०१५ पासुन वरिष्ठ वेतनश्रेणी लागु करण्यात आली.

सन २०१६- **दि.०९.०७.२०१६** पासुन वार्षिक पगारवाढीसह मुळवेतन रू.६९००/- वेतनवाढ.

सन २०१७- दि.०१.०७.२०१७ पासुन वार्षिक पगार वाढीसह मुळवेतन रू.७१६०/- वेतनवाढ.

सन २०१८- दि.०१.०७.२०१८ पासुन वार्षिक पगार वाढीसह मुळवेतन रू.७४३०/- वेतनवाढ.

सन २०१९- दि.०१.०७.२०१९ पासुन वार्षिक पगार वाढीसह मुळवेतन रू.२४,३००/- वेतनवाढ..

परिशिष्ठ ब

कर्मचारी गैरवर्तन माहिती तक्ता

कर्मचा-याचे नाव – श्री बापुसाहेब बाबुराव गायके, मदतनिस, श्री साई प्रसादालय विभाग

अ. क्र.	गैरवर्तनाचे स्वरूप	झालेले शासन	आदेश क्र. व दिनांक
०१	कॅन्टिन विभागात डयुटीला असतांना दि.०२.०४.२००५, दि.०६.०५.२००५, दि.०८.०८.२००५ या तारखांना विक्री केलेल्या बिस्किीटांचा कमी भरणा करणेत आलेला होता.	एक दिवसाचे मुळ वेतनाइतका दंड करणेत आला आहे.	जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२२४२/२००६, दि.१८.०८.२००६
०२	दि.२१.०३.२००८ ते दि.१७.०४.२००८ अखेर विनापरवानगी गैरहजर	सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजरी धरणेत येवून ताकीद दणेत आले.	जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१३५८/२००८, दि.१६.०५.२००८
०३	दि.२१.०३.२००८ ते दि.२७.०३.२००८ अखेर विनापरवानगी गैरहजर	सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजरी धरणेत येवून ताकीद दणेत आले.	जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१५४७/२००८, दि.३०.०५.२००८
०४	दि.१८.०८.२००८ ते दि.२०.०८.२००८ अखेर विनापरवानगी गैरहजर	सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजरी धरणेत येवून सक्त ताकीद दणेत आले.	जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३४७१/२००८, दि.२०.११.२००८
०५	दि.२१.११.२००८ ते दि.२६.११.२००८ अखेर विनापरवानगी गैरहजर	सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजरी धरणेत येवून सक्त ताकीद दणेत आले.	जा.नं.एसएसएस/वशी-७ए/७४५/२००९, दि.२८.०२.२००९
०६	दि.२१.०२.२०१० ते दि.२०.०३.२०१० या कालावधीत फिंगर प्रिंन्ट पंचीग करत नसलेबाबत	फिंगर प्रिंन्ट पंचीग करणेबाबत सुचना देण्यात आली.	जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१४१४/२०१०, दि.२४.०४.२०१०
०७	दि.२१.०४.२०१० ते दि.२०.०५.२०१० या कालावधीत फिंगर प्रिंन्ट पंचीग करत नसलेबाबत	फिंगर प्रिंन्ट पंचीग करणेबाबत सुचना देण्यात आली.	जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३२१३/२०१०, दि.०८.०६.२०१०
०८	दि.०२.०१.२०११ रोजी पंचीग न केलेबाबत	सदर गैरशिस्त वर्तनाबाबत शिक्षा म्हणून ताकीद दणेत आले.	जा.नं.एसएसएस/वशी-७ए/७६११/२०११, दि.१९.०३.२०११
०९	दि.०७.०६.२०११ ते दि.३१.१०.२०११ अखेर (१४६ दिवस) अनाधिकृत गैरहजर	दि.१४.०३.२०१३ ते दि.१७.०३.२०१३ अखेर **चार दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत** करण्यात आले	जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४८३०/२०१३, दि.११.०३.२०१३
०९	दि.१०.१२.२०११ ते दि.१३.१२.२०११ विनावेतन रजा घेतल्याबाबत	दि.१०.१२.२०११ ते दि.१३.१२.२०११ एकुण ०४ दिवस विनावेतन खाडे व लेखी समज देण्यात आली	जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४३५८/२०११, दि.२५.१२.२०११
१०	दि.१५.१२.२०११ ते दि.२६.१२.२०११, दि.२९.१२.२०११ ते दि.०६.०३.२०१२ अखेर (८१ दिवस) अनाधिकृत गैरहजर	दि.०४.०१.२०१३ ते दि.०७.०१.२०१३ अखेर **चार दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत** करण्यात आले	जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३९५८/२०१३, दि.०२.०१.२०१३
११	दि.०७.०३.२०१२ ते ०४.०४.२०१२ व दि.०६.०४.२०१२ ते १४.०४.२०१२ अखेर (३९ दिवस) अनाधिकृत गैरहजर	दि.१४.०६.२०१२ ते दि.१७.०६.२०१२ अखेर **चार दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत** करण्यात आले	जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१०६९/२०१२, दि.१२.०६.२०१२
१२	दि.०८.०१.२०१३ रोजी अनाधिकृत गैरहजर	सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजरी धरणेत येवून ताकीद दणेत आले.	जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४३६६/२०१३, दि.३१.०१.२०१३
१३	दि.१६.०८.२०१४ रोजीच्या गैरशिस्तवर्तन	दि.११ ऑक्टोबर, २०१४ रोजीच्या आदेशान्वये सेवानिलंबीत करण्यात आले.	जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३२४१/२०१४, दि.११.१०.२०१४
१४	दि.१६.०८.२०१४ रोजीच्या गैरशिस्तवर्तन	दि.१८.१०.२०१६ रोजीच्या आदेशान्वये ताकीद देण्यात आली आहे.	जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२६७६/२०१६, दि.१८.१०.२०१६

GA-MEETING-154-2020

विषय क्र.- 22

मा. तदर्थ समिती सभेपुढील विषय
(सामान्य प्रशासन विभाग)

94

विषय:- सुनिल जोसेफ गायकवाड यांचे दिनांक-०१/०७/२०२० चे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा सदस्य, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डी यांना दिलेले तसेच सामान्य प्रशासनकडे दिनांक १४/०७/२०२० रोजी प्राप्त पत्र.

टिपणी-

(अ) मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा सदस्य, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डी यांचे दिनांक-१३/०७/२०२० रोजीच्या पत्रात पुढील प्रमाणे:-

१. ***सुनिल जोसेफ गायकवाड यांचे दिनांक ०१/०७/२०२० चे श्री श्री. साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीच्या सामान्य प्रशासन विभागातील प्रभारी सामान्य प्रशासन अधिकारी श्री. बजाज साहेब बेकायदेशीर गुन्हे करणा-याला पाठीशी घालत असल्याबाबत असा विषय असलेले पत्र ...***

" श्री आपल्याकडे अर्ज करतो की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या सामान्य प्रशासन विभागातील प्रभारी सामान्य प्रशासन अधिकारी श्री बजाज साहेब आपल्या संस्थानच्या श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे सहाय्यक शिक्षक श्री विकास महादेव शिवगजे यांनी केलेल्या बेकायदेशीर गुन्हयाला आजतागायत पाठीशी घातल आहेत.

आतापर्यंत शिवगजे यांनी केलेल्या बेकायदेशीर गुन्हयाबाबत अनेक अर्ज केलेले आहेत. त्या अर्जावर कारवाई होण्याबाबत आपल्या उच्च स्तरावरुन अनेक शेरे मारण्यात आलेले असतांना प्रभारी सामान्य प्रशासन अधिकारी श्री बजाज साहेब माझ्या अनेक अर्जावर कारवाई न करता संगनमताने अर्ज दाबुन ठेवणे, कारवाईबाब टाळाटाळ करीत असतात. श्री त्यांना अनेकवेळा माझ्या अर्जाबाबत कारवाई करण्याबाबत विनंत्या केल्या परंतू श्री बजाज साहेबांनी उडवाउडवीचे उत्तर देऊन शिवगजे यांच्याबाबतचे सर्व अर्ज आजतागायत विनाकारण दाबुन ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

आजही श्री बजाज साहेब शिवगजे यांच्या सांगण्यावरुन शालेय प्रशासनाबाबत चुकीचे निर्णय घेत आहे. श्री बजाज साहेब शिवगजे यांच्या सांगण्यावरुन शालेय प्रशासनाचे काम पाहात असल्यामुळे श्री साईबाबा संस्थानला फार मोठया गुन्हेगाराला पोसण्याची वेळ आली आहे.

माझी मेहरबान साहेबांना कळकळीची विंनती आहे. जर बजाज साहेब शिवगजे यांच्या सांगण्यावरुन व दोघाच्या संगनमताने शालेय प्रशासन चालवित असतील तर शिवगजे यांची गुन्हेगार प्रवृत्ती अजून वाढत जाईल तरी साहेबांनी यात तत्काळ लक्ष घालून श्री बजाज साहेबांची तत्काळ या पदावरुन हकालपट्टी करावी, ही नम्र विनंती. ."

विभागाचे विवेचन:- श्री विकास महादेव शिवगजे, हे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडे सहाय्यक शिक्षक म्हणून कार्यरत असून श्री बजाज हे सामान्य प्रशासन शाखेकडे प्र. अधिक्षक म्हणून कार्यरत आहे. प्रत्यक्षात दोनही कामाचे स्वरुप वेगवेगळे असून त्यांचा परस्परांशी कोणताही संबंध येत नाही. श्री सुनिल जोसेफ गायकवाड, मु.पो. माळवाडगांव यांनी केवळ निरर्थक आरोप केले आहेत. तसेच या आरोपांबाबत कुठले ही पुरावे अगर त्याचे पृष्ठयर्थ कोणती ही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. केवळ नैराश्याच्या भावनेतून सदरचे आरोप केल्याचे दिसून येते.

२. ***सुनिल जोसेफ गायकवाड यांचे दिनांक-०१/०७/२०२० चे सुनिल जोसेफ गायकवाड यांचे पत्र- श्री विकास महादेव शिवगजे, सहाय्यक शिक्षक श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी, मु.पो. शिर्डी यांनी पात्रता नसतांना संबंधीत विभाग प्रमुख व प्रशासनातील अधिकरी यांना हाताशी धरुन गैरमार्गाने पदाचा गैरवापर करुन फायदे मिळवले म्हणून त्यांच्यावर बडतर्फीची कारवाई करुन घेतलेल्या वेतनाचे पैसे वसूल करुन सदरच्या गैरकृत्यात मदत करणा-या संबंधीत अधिका-यांवरही फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करुन त्यांनाही सेवेतून निलंबीत करणेबाबत असा विषय असलेले पत्र...***

" श्री विकास महादेव शिवगजे हे पात्रता नसतांनाही आज सहा. शिक्षक म्हणून श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी, मु.पो. शिर्डी, ता. राहाता, जि. अहमदनगर येथे सहाय्यक शिक्षक म्हणून पदाचा उपभोग घेत असतांना त्यांनी संबंधीत विभागप्रमुख व प्रशासनातील अधिकारी यांना हाताशी धरुन गैरमार्गाने पदाचा गैरवापर करुन फायदे मिळविले. तसेच त्यांनी शाळा संहिता नियमाचा भंग करुन अनेक प्रकारचे गैरकारभार केले असल्यामुळे त्यांच्यावर बडतर्फाची कारवाई करुन घेतलेल्या वेतनासहीत पैसा वसुल करुन सदरच्या गैरकृत्यात मदत करणा-या संबधीत अधिका-यावरही फौजदारी स्वरुपाची कारवाई करुन त्यांनाही सेवेतून निलंबीत करावे.

श्री विकास महादेव शिवगजे, सहा. शिक्षक म्हणून पदाचा उपभोग घेत असतांना त्यांनी संबंधीत विभागप्रमुख व प्रशासनातील अधिकारी यांना हाताशी धरुन गैरमार्गाने पदाचा गैरवापर करुन फायदे मिळविले. तसेच त्यांनी संहिता नियमाचा भंग करुन अनेक प्रकारचे गैरकारभार केले असल्यामुळे त्यांच्यावर बडतर्फाची कारवाई करुन घेतलेल्या वेतनासहित पैसा वसुल करून सदरच्या गैरकृत्यात मदत करणा-या संबंधीत अधिका-यावरही फौजदारी स्वरुपाची कारवाई करुन त्यांनाही सेवेतून निलंबीत करावे.

त्याविषयी माझ्या सोबतच्या निवेदनामध्ये मुद्दा क्र. १ ते २५ नुसार लेखी पुराव्यासहित ते शिक्षक म्हणून कसे पात्र नाहीत. या संदर्भात कायदेशीर लेखी दस्तऐवज जोडले आहे. तरी सदरचे निवेदन मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत श्री विकास महादेव शिवगजे यांनां सेवेतून त्वरीत बडतर्फ करण्यात यावे व त्यांनी पात्रता नसतांनाही घेतलेले वेतन त्यांच्याकडून १८ टक्के व्याजासहित वसुल करण्यात यावे".

खरे पहाता श्री साईबाबांची शिर्डी नगरी हे जागतीक दर्जाचे पवित्र देवस्थान आहे. त्यामुळे प्रत्येक सामान्य माणसाचा त्याकडे बघण्याचा हेतू हा पवित्ररुपी आहे. परंतू मला इच्छा नसतांनाही श्री विकास महादेव शिवगजे यांच्या सारखे लोक पात्रता नसतांनाही तेथे पदाचा गैरउपयोग करतात व त्यामुळे त्यांच्या अशा गैरकृत्यामुळे शैक्षणिक क्षेत्राचे पावित्र्य राहात नाही. म्हणून या निवेदनाव्दारे आपण एक जबाबदार अधिकारी म्हणून स्वत: माझ्या निवेदनातील १ ते २५ मुद्दे व त्या प्रत्येक मुद्याला कायदेशीर मार्गाने असणारे पुरावे मी जोडत आहे व आपला अधिकवेळ वाया जावू नये म्हणून प्रत्येक मुद्याला अनुसरुन योग्य त्या ठिकाणी मार्कींग करुन देत आहे. त्यामुळे आपण प्रत्येक जबाबदार अधिका-यांनी शिर्डी सारख्या पवित्र ठिकाणी व तेही शैक्षणिक संस्थेमध्ये घडलेले गैरप्रकार गांभिर्याने लक्षात घेवुंन टाळाटाळ न करता १५ दिवसामध्ये योग्य ती कार्यवाही कराल अशी आशा बाळगतो." असे अर्जात नमुद केले आहे.

विभागाचे विवेचनः- श्री गायकवाड यांनी श्री शिवगजे कसे शिक्षक म्हणून पात्र नाहीत याबाबत परिशिष्ट जोडून १ ते २५ मुद्दे नमुद केले आहेत.

१ ते २५ मुद्यांबाबत विभागाकडे उपलब्ध कागदपत्रावरुन तयार केलेली माहीती खालीलप्रमाणे-

अ.नं.	अर्जदार यांचे अर्जातील तपशिलवार दस्तएवेज व उपस्थित मुद्दे	स्पष्टीकरण
०१.	सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम ३–महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम, १९७७ च्या अधिनियम ने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर शिर्डी शाळा १९९३ साली विनामान्यता सुरु झाल्यावर सहा. शिक्षक विकास महादेव शिवगजे व मुख्याध्यापिका सौ. चव्हाणके निता मॅडम यांनी कर्मचारी म्हणून काम करतांना, व्यवस्थापनास हाताशी धरुन बेजबाबदार काम करुन शिक्षणाचा दर्जा कसा खालावेल याचा विघातक प्रयत्न करून, सार्वजनिक हिताचा विचार न करता गैरप्रकारे कर्मचारी म्हणून कर्तव्य व कार्य अनिष्ठ प्रकारे पारपाडल्याबद्दल त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा.	----------
०२.	श्री साईबाबा संस्थान शिर्डी नं ९ सप्टेंबर १९९३ ला दिलेली नियुक्तीपत्र- त्यांची शैक्षणिक पात्रता नसतांना कुठल्याही प्रकारची पदाची जाहीरात वृत्तपत्रात न देता त्यांन परस्पर शिक्षक पदाची नियुक्ती दिली ती पुर्णपणे चुकीची आहे.	दि.३१.१२.२०१५ रोजी संस्थानचे आस्थापना विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्यासेवाजेष्ठता यादीमध्ये श्री. शिवगजे यांची प्रथम नेमणूक दि.०७.०१.१९९६ अशी करण्यात आलेली असून, त्यांनी त्याबाबत कोणत्याही प्रकारची हरकत घेतलेली नाही. तसेच सन १९९३-९४, १९९४-९५ व सन १९९५-९६ या कालावधीत श्री.शिवगजे यांना तात्पुरते नेमणूक आदेश देण्यात आलेले होते.
	श्री साईबाबा संस्थान शिर्डी नं २३ जून १९९४ ला दिलेले एक वर्षाच्या कालवधीसाठीचे नियुक्ती पत्र- श्री साईबाबा इंग्लिश मिडीयमकडून श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरकडे शैक्षणिक पात्रता नसतांना शिवगजे यांना सहा. शिक्षकाची नियुक्ती दिली ती पूर्णपणे चुकीची आहे. त्यांची श्री साईबाबा इंग्लिश मिडीयमकडे सेवा खंडीत झाली असे असतांनाही ते सेवाजेष्ठता धरतांना ते १९९३ पासून धरतात.	श्री.शिवगजे यांची सेवाज्येष्ठता यादीमध्ये त्यांची प्रथम नेमणूक दिनांक ही ०७/०१/१९९६ अशी नमुद करण्यात आलेली असून, कनिष्ठ महाविद्यालयाकडील नेमणूक दिनांक ०७/०१/२००१ नमुद करण्यात आलेली आहे, त्यामुळे त्यांची सेवाज्येष्ठता १९९३ पासून धरतात सदरचा मुद्दा हा चुकीचा आहे.
०३	श्री साईबाबा संस्थान शिर्डी नं १२ जून १९९५ ला दिलेले एक वर्षाच्या कालवधीसाठीचे नियुक्ती पत्र – १९९५ या कालावधीत त्यांनी बहीस्थ बी.एड. केले. बी.एड. ची पात्रता घ्यायाची असेल तर त्या संस्थाच्या शाळेला मान्यता असणे आवश्यक आहे. त्यामुळे शिवगजे यांनी मिळविलेली बी.एड. पात्रता मान्यता प्राप्त शाळेचे नसल्यामुळे ते पुर्णतः बोगस आहे. त्यांनी ही फसवणूक केलेली आहे. त्यामुळे त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल व्हायला पाहीजे.	शाळा संहितेनुसारउच्च किंवा अधिक अर्हता प्राप्त करण्यासाठी सेवेमध्ये असणा-या मुख्याध्यापका व्यतिरिक्त अन्य कर्मचा-याला मुख्याध्यापकाची पुर्व परवानगी मिळवावी लागते. सदर परवानगीशिवाय विद्यापीठ बहिस्थ बी.एड.साठी प्रवेश देत नाही. तसेच श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागास सन १९९७ मध्ये मान्यता मिळालेली आहे. श्री.शिवगजे यांना सन १९९४-९५ व १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात तात्पुरत्या स्वरुपाचे नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करण्यासाठी संस्थानची अथवा तत्कालीन मुख्याध्यापिका यांची लेखी परवानगी घेतल्याचे कोणतेही दस्ताऐवज उपलब्ध नाही. तसेच श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. साठी प्रवेश मिळविला त्यावेळेस कन्या शाळेस मान्यता नव्हती. अशी वस्तुस्थिती असतानांही आण्णामलई विद्यापीठ, चेन्नई यांनी श्री.शिवगजे यांना बी.एड. करण्यासाठी प्रवेश दिलेला आहे. सदर मुद्यांबाबत अर्जदार यांनी यापुर्वी देखील तक्रार केलेली होती. त्यास अनुसरुन संस्थानमार्फत आण्णामलई विद्यापीठ, आण्णामलईनगर यांचेशी पत्रव्यवहार करुन, श्री.शिवगजे यांचे बी.एड. प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात आलेली असून, **आण्णामलई विद्यापीठाने दि.२२.०३.२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री.शिवगजेयांचे बी.एड. प्रमाणपत्र पात्र असलेबाबत कळविलेले आहे.**
	विकास महादेव शिवगजे यांचे दि.०३/०४/१९९६ रोजी आण्णामलाई युनिव्हर्सिटी आण्णामलाईनगर येथून पारीत झालेले बी.एड. सर्टिफिकेट- शिवगजे यांच्या बी.एड. पदवी प्रमाणपत्रात May-९५- असा उल्लेख केलेला आढळतो. खरे पहाता देशभरात बहीस्थ बी.एड. पदवी पुर्ण करण्यासाठी २ वर्षाचा कालावधी ग्राहय धरला जातो. त्यांनी हे बहिस्थ बी.एड. दैनंदिन हजेरी रजिष्टरला त्यांच्या सहया असतांना एका वर्षात पुर्ण केल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांचे बी.एड.पात्रता ही बनावट असल्यामुळे त्यांनी सर्वांची फसवणूक केलेली आहे.	
	बहिस्थः बी.एड. प्रवेशासंदर्भात माहीती- बहिस्थ बी.एड. शिक्षण क्रमासंबंधी अशी नियमावली आहे की, १९९१ पासून बहीस्थ बी.एड. चा कालावधी दोन वर्षाचा आहे. तो शिवगजे यांनी पुर्ण केला नाही. १९९४-९५ या शैक्षणिक वर्षात त्यांनी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर शिकविण्याचे काम केले व १९९५ ला लगेच ते बी.एड. झाले हे पुर्णतः चुकीचे आहे. कारण बहिस्थ बी.एड. करण्यासाठी त्यांच्याकडे दोन वर्षाचा सलग सेवेचा अनुभव नसल्याने त्यांचे बी.एड. चुकीचे आहे.	
	दि. १७/१२/२०१४ माहीती अधिकार अधिनियम २००५ चे माहितीबाबत पत्र- सेवेत असतांना बहीस्थ बी.एड. करण्यासाठी संस्थेची, शिक्षण अधिकारी यांची पुर्वपरवानगी घ्यावी लागते. तसा पुर्वपरवानगीचा दाखला असल्याशिवाय बी.एड. पदवी मिळविता येत नाही. संस्थेला शिक्षणाधिकारी यांना गाफील ठेवून परस्पर केलेले बी.एड. गाहय धरले जाणार नाही. पुर्व परवानगी न घेता तसा प्रकारचा दाखला दप्तरी उपलब्ध	

	नाही. याचा अर्थ त्यांनी पुर्व परवानगी न घेता परस्पर बी.एड. करणे ही फसवणूक होय. त्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा. शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करण्यासाठी संस्थेची, शिक्षणाधिकारी यांच्या पुर्वपरवानगीचा दाखला माहीतीच्या अधिकारात श्री साईबाबा संस्थानला मागीतला असता विभागप्रमुख किंवा प्राचार्य नसतांनाही शिवगजे आपल्या सहिनिशी पदाचा गैरवापर करुन खोटी माहिती माहितीच्या अधिकारात माहिती अधिकार अर्जदाराला देवून संस्थानची मोठी फसवणूक करीत आहे. तसेच माहीती देतांना निपक्षपातीपणे माहिती न देता आपण केलेले गैरप्रकार उघडकीस येऊ नये म्हणून प्रयत्न करतात. हे सगळे बनवाबनवीचे असल्या कारणाने ते संस्थानची फसवणूक करीत आहेत.	
	दि. १४/०२/२०१४ चे माहिती अधिकार माहितीपत्र-	
	दि. १६ फेब्रु. २०१५ माहितीचा अधिकार अधिनियम चे पत्र दि.१६/०२/२०१५ माहितीचा अधिकार अधिनियम २०१५ चे दुसरे पत्र- माहीतीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये बहिस्थ बी.एड. पदवी घेण्यासाठी संस्थानच्या पुर्व परवानगीचा दाखला मिळण्याबाबत अर्ज केला असता प्राचार्या सौ. निता चव्हाणके व प्रशासन अधिकारी यांना हाताशी धरुन माहीतीच्या अधिकारात विचारलेली माहीती निरंक देवून हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न शिवगजे व प्रशासन अधिकारी करत असल्याने यात शिवगजे सह प्रशासन अधिकारी यांना हाताशी धरुन हे प्रकरण दडपण्याचा गैरप्रकार केल्यामुळे शिवगजेसह प्रशासन अधिका-यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा.	श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करण्यासाठी संस्थानची अथवा तत्कालीन मुख्याध्यापिका यांची लेखी परवानगी घेतल्याचे कोणतेही दस्ताऐवज उपलब्ध नाही. त्यामुळे सदरची माहिती निरंक देण्यात आलेली आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारे माहिती दडपविण्याचा प्रयत्न केलेला नाही.
	महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार ज्या शिक्षकांनी १९९० पर्यंत राज्याबाहेरील बी.एड. पात्रता पदवी घेतलेली आहे. अशाच शिक्षकाची बी.एड. पदवी पात्रता शिक्षक पदासाठी ग्राहय धरलेली जाते. शिवगजे यांनी संस्थेची शासनाची फसवणूक करुन १९९५ ला चुकीच्या पध्दतीने बी.एड. केले. शिवगजे यांनी केलेले बी.एड. १९९० च्या नंतरचे असल्याने ते पुर्णतः शिक्षण पध्दतीला लागु नसलेले असल्याने त्यांच्यावर फौजदारीचा गुन्हा दाखल व्हावा.	----------
०४	दि. १८ जुन १९९६ रोजी श्री विकास महादेव शिवगजे यांना दिलेली नियुक्तीपत्र जेष्ठ शिक्षणविस्तार अधिकारी (पं.स. कोपरगांव) यांचा ११/०७/१९९६ चा शेरा- दि. १८ जुन १९९६ देखील शाळेला मान्यता नसतांना शिवगजे यांनी सहाय्यक शिक्षकाची नियुक्ती वेतनश्रेणीवर घेऊन त्यांनी संस्थानची व शासनाची फसवनुक केली आहे. जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती कोपरगांव यांनी दि.११/०७/१९९६ च्या शेराबुक पुस्तकात यांनी सदर संस्थेस शासन मान्यता वर्गासाठी व शिक्षकासाठी त्वरीत मान्यता घेण्यात यावी असा मा. गट शिक्षणाधिकारी कोपरगांव यांचे दि. १०/०७/१९९६ चे आदेशानुसार चौकशी केली असता दि. १०/०७/१९९६ च्या आदेशान्वये मान्यता नसल्याचे दिसून येत असतांना शिवगजे यांनी शाळेला मान्यता नसतांना बी.एड. केल्यामुळे ते पुर्णपणे खोटे व चुकीचे आहे. तसेच मान्यता नसलेल्या शाळेचे बहिस्थ बी.एड. करुन शिक्षक पदाची वेतनश्रेणी घेतल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.	शाळा संहितेनुसारउच्च किंवा अधिक अर्हता प्राप्त करण्यासाठी सेवेमध्ये असणा-या मुख्याध्यापका व्यतिरिक्त अन्य कर्मचा-याला मुख्याध्यापकाची पुर्व परवानगी मिळवावी लागते. सदर परवानगीशिवाय विद्यापीठ बहिस्थ बी.एड.साठी प्रवेश देत नाही. तसेच श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागास सन १९९७ मध्ये मान्यता मिळालेली आहे. श्री.शिवगजे यांना सन १९९४-९५ व १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात तात्पुरत्या स्वरुपाचे नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करण्यासाठी संस्थानची अथवा तत्कालीन मुख्याध्यापिका यांची लेखी परवानगी घेतल्याचे कोणतेही दस्ताऐवज उपलब्ध नाही. तसेच श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. साठी प्रवेश मिळविला त्यावेळेस कन्या शाळेस मान्यता नव्हती. अशी वस्तुस्थिती असतानांही आण्णामलई विद्यापीठ, चेन्नई यांनी श्री.शिवगजे यांना बी.एड. करण्यासाठी प्रवेश दिलेला आहे. सदर मुद्यांबाबत अर्जदार यांनी यापुर्वी देखील तक्रार केलेली होती. त्यास अनुसरुन संस्थानमार्फत आण्णामलई विद्यापीठ, आण्णामलईनगर यांचेशी पत्रव्यवहार करुन, श्री.शिवगजे यांचे बी.एड. प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात आलेली असून, **आण्णामलई विद्यापीठाने दि.२२.०३.२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री.शिवगजेयांचे बी.एड. प्रमाणपत्र पात्र असलेबाबत कळविलेले आहे.**
	दि. ५ फेब्रुवारी १९९७ दि.१७ एप्रिल १९९७, ३० मे १९९७ चे शिक्षण उपसंचालक पुणे यांचे सन १९९६-९७ शैक्षणिक वर्षात नवीन शाळेला परवानगी देण्याबाबत पत्र- श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या शाळेला शिक्षण उपसंचालक पुणे यांनी सन १९९६-९७ ला शाळेला परवानगी दिली. परंतू शिवगजे यांनी शाळेला मान्यता नसतांना खोटेनाटे करुन बहिस्थ बी.एड. ला संस्थेची व शासानाची फसवणूक करुन भरमसाठ	शाळा संहितेनुसारउच्च किंवा अधिक अर्हता प्राप्त करण्यासाठी सेवेमध्ये असणा-या मुख्याध्यापका व्यतिरिक्त अन्य कर्मचा-याला मुख्याध्यापकाची पुर्व परवानगी मिळवावी लागते. सदर परवानगीशिवाय विद्यापीठ बहिस्थ बी.एड.साठी प्रवेश देत नाही. तसेच श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागास सन

	पगार चुकीच्या मार्गाने घेतला आहे. मान्यता नसतांना बहिस्थ बी.एड. करणे चुकीचे आहे. व मान्यता नसतांना शासन नियमानुसार पगार घेणे गैर असल्याने त्यांच्यावर संस्थानची व शासनाची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल व्हावा.	१९९७ मध्ये मान्यता मिळालेली आहे. श्री.शिवगजे यांना सन १९९४-९५ व १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात तात्पुरत्या स्वरुपाचे नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करण्यासाठी संस्थानची अथवा तत्कालीन मुख्याध्यापिका यांची लेखी परवानगी घेतल्याचे कोणतेही दस्ताऐवज उपलब्ध नाही. तसेच श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. साठी प्रवेश मिळविला त्यावेळेस कन्या शाळेस मान्यता नव्हती. अशी वस्तुस्थिती असतानांही आण्णामलई विद्यापीठ, चेन्नई यांनी श्री.शिवगजे यांना बी.एड. करण्यासाठी प्रवेश दिलेला आहे. सदर मुद्यांबाबत अर्जदार यांनी यापुर्वी देखील तक्रार केलेली होती. त्यास अनुसरुन संस्थानमार्फत आण्णामलई विद्यापीठ, आण्णामलईनगर यांचेशी पत्रव्यवहार करुन, श्री.शिवगजे यांचे बी.एड. प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात आलेली असून, **आण्णामलई विद्यापीठाने दि.२२.०३.२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री.शिवगजेयांचे बी.एड. प्रमाणपत्र पात्र असलेबाबत कळविलेले आहे.**
	माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार दि.१४/०२/२०१४ चे पत्र – उपरोक्त माहिती मिळण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अर्ज केले असता शिवगजे प्राचार्य नसतांना खोटी माहिती देऊन त्या उपरोक्त विषयाची माहिती दडपण्याचा प्रयत्न शिवगजे यांनी केला आहे. स्वतःची माहिती स्वतःच देवुन ते संस्थेची व शासनाची फसवणूक केल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करण्यासाठी संस्थानची अथवा तत्कालीन मुख्याध्यापिका यांची लेखी परवानगी घेतल्याचे कोणतेही दस्ताऐवज उपलब्ध नाही. त्यामुळे सदरची माहिती निरंक देण्यात आलेली आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारे माहिती दडपविण्याचा प्रयत्न केलेला नाही.
	माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार दि.१६/०२/२०१५ चे पत्र- प्रशासकीय अधिकारी यांनी दिलेल्या उपरोक्त माहितीबाबत विकास महादेव शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करत असतांना संस्थान परवानगीच्या दाखल्याची सत्यप्रत माहिती निरंक असल्याचे माहिती दिल्यामुळे शिवगजे यांचे बी.एड. पुर्णतः खोटे असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे गुन्हा दाखल व्हावा.	शाळा संहितेनुसारउच्च किंवा अधिक अर्हता प्राप्त करण्यासाठी सेवेमध्ये असणा-या मुख्याध्यापका व्यतिरिक्त अन्य कर्मचा-याला मुख्याध्यापकाची पुर्व परवानगी मिळवावी लागते. सदर परवानगीशिवाय विद्यापीठ बहिस्थ बी.एड.साठी प्रवेश देत नाही. तसेच श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागास सन १९९७ मध्ये मान्यता मिळालेली आहे. श्री.शिवगजे यांना सन १९९४-९५ व १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात तात्पुरत्या स्वरुपाचे नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करण्यासाठी संस्थानची अथवा तत्कालीन मुख्याध्यापिका यांची लेखी परवानगी घेतल्याचे कोणतेही दस्ताऐवज उपलब्ध नाही. तसेच श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. साठी प्रवेश मिळविला त्यावेळेस कन्या शाळेस मान्यता नव्हती. अशी वस्तुस्थिती असतानांही आण्णामलई विद्यापीठ, चेन्नई यांनी श्री.शिवगजे यांना बी.एड. करण्यासाठी प्रवेश दिलेला आहे. सदर मुद्यांबाबत अर्जदार यांनी यापुर्वी देखील तक्रार केलेली होती. त्यास अनुसरुन संस्थानमार्फत आण्णामलई विद्यापीठ, आण्णामलईनगर यांचेशी पत्रव्यवहार करुन, श्री.शिवगजे यांचे बी.एड. प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात आलेली असून, **आण्णामलई विद्यापीठाने दि.२२.०३.२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री.शिवगजेयांचे बी.एड. प्रमाणपत्र पात्र असलेबाबत कळविलेले आहे.**
	माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार दि.१६/०२/२०१५ रोजीचे माहिती व प्रशासकीय अधिकारी यांचे पत्र- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार अर्ज केला असता माहिती तथा प्रशासकीय अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीच्या दि. १६/०२/२०१५ च्या पत्रानुसार विकास महादेव शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करतांना संस्थानमध्ये सेवा करत असतांना संस्थान सेवेच्या पुर्व परवानगीचा दाखल / पत्र न घेता चुकीच्या मार्गाने बी.एड. केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	शाळा संहितेनुसारउच्च किंवा अधिक अर्हता प्राप्त करण्यासाठी सेवेमध्ये असणा-या मुख्याध्यापका व्यतिरिक्त अन्य कर्मचा-याला मुख्याध्यापकाची पुर्व परवानगी मिळवावी लागते. सदर परवानगीशिवाय विद्यापीठ बहिस्थ बी.एड.साठी प्रवेश देत नाही. तसेच श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागास सन १९९७ मध्ये मान्यता मिळालेली आहे. श्री.शिवगजे यांना सन १९९४-९५ व १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात तात्पुरत्या स्वरुपाचे नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. करण्यासाठी

		संस्थानची अथवा तत्कालीन मुख्याध्यापिका यांची लेखी परवानगी घेतल्याचे कोणतेही दस्ताऐवज उपलब्ध नाही. तसेच श्री.शिवगजे यांनी बहिस्थ बी.एड. साठी प्रवेश मिळविला त्यावेळेस कन्या शाळेस मान्यता नव्हती. अशी वस्तुस्थिती असतानांही आण्णामलई विद्यापीठ, चेन्नई यांनी श्री.शिवगजे यांना बी.एड. करण्यासाठी प्रवेश दिलेला आहे. सदर मुद्यांबाबत अर्जदार यांनी यापुर्वी देखील तक्रार केलेली होती. त्यास अनुसरुन संस्थानमार्फत आण्णामलई विद्यापीठ, आण्णामलईनगर यांचेशी पत्रव्यवहार करुन, श्री.शिवगजे यांचे बी.एड. प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात आलेली असून, **आण्णामलई विद्यापीठाने दि.२२.०३.२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री.शिवगजेयांचे बी.एड. प्रमाणपत्र पात्र असलेबाबत कळविलेले आहे.**
०५	विकास महादेव शिवगजे यांची जुन १९९७ ला दिलेली नियुक्ती ऑर्डर – सन १९९६-९७ ला श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर शाळेला मान्यता मिळालेनंतर १९९७ पासून शिवगजे यांना सहा. शिक्षकांची वेतनश्रेणीनुसार नियुक्ती देण्यात आली. त्यांचे बी.एड. पुर्णत चुकीच्या पध्दतीने केले असल्यामुळे त्यांची नियुक्ती खंडीत होते. तसेच १९९७ ला शाळेला मान्यता असतांना त्यांनी १९९३ पासून सेवा शर्तीनुसार सेवा जेष्ठता सर्व पगारातील फरक रक्कमा इंटरनल रिलिफ D.A. व HRA व महाराष्ट्र शासन नियमाप्रमाणे इतर फायदे व सवलती चुकीच्या पध्दतीने घेतल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	दि. ३१.१२.२०१५ रोजी संस्थानचे आस्थापना विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्यासेवाजेष्ठता यादीमध्ये श्री.शिवगजे यांची प्रथम नेमणूक दि.०७.०१.१९९६ अशी करण्यात आलेली असून, त्यांनी त्याबाबत कोणत्याही प्रकारची हरकत घेतलेली नाही. तसेच सन १९९३-९४, १९९४-९५ व सन १९९५-९६ या कालावधीत श्री.शिवगजे यांना तात्पुरते नेमणूक आदेश देण्यात आलेले होते.
	२४) प्रशिक्षीत शिक्षक पदाचे वेतनश्रेणी मिळाल्याबाबत श्री वसंतकुमार किसन वाणी, सहा. शिक्षक यांच्या अर्जाबाबत टिपणी / आदेशपत्र- शिवगजे यांची नियुक्ती शाळेला मान्यता मिळाल्यानंतर १९९६-९७ पासून ग्राहय न धरता १९९३ पासून ते अनाधिकृतपणे बी.एड. नसतांना शिक्षक म्हणून सेवेत दाखल झाल्यापासून सर्व सेवाशर्तीनुसार नियुक्त्या व वेतनश्रेणी घेतल्यामुळे शिवगजे यांच्यावर फसवणूकीचा गुन्हा दाखल व्हावा. संबंधीत आदेशपत्रात शिवगजे यांचीच नियुक्ती बोगस व खोटया पध्दतीने झाली असल्याने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई व्हावी.	दि. ३१.१२.२०१५ रोजी संस्थानचे आस्थापना विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्यासेवाजेष्ठता यादीमध्ये श्री.शिवगजे यांची प्रथम नेमणूक दि.०७.०१.१९९६ अशी करण्यात आलेली असून, त्यांनी त्याबाबत कोणत्याही प्रकारची हरकत घेतलेली नाही. तसेच सन १९९३-९४, १९९४-९५ व सन १९९५-९६ या कालावधीत श्री.शिवगजे यांना तात्पुरते नेमणूक आदेश देण्यात आलेले होते.
०६	श्री आर.डी. थोरात विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ पुणे यांचा शेरा प्रत दि.०७/०९/१९९८- श्री आर.डी. थोरात, विभागीय सचिव पुणे, विभागीय मंडळ पुणे यांनी दि. ०७/०९/१९९८ च्या शेराबुकातील अभिप्रायात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासाठी अहोरात्र झटले पाहीजे, वर्गात जाण्यापुर्वी पुर्वतयारी शिक्षकांनी केली पाहीजे. विद्यार्थ्यांना कॉप्यापासून परावृत्त केले पाहीजे असे अनेक शेरे शिक्षण सचिव शिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी यांनी त्यावेळेच्या मुख्याध्यापिका चव्हाणके मॅडम यांना देवुनही मुख्या. चव्हाणके मॅडम व सहा.शिक्षक विकास शिवगजे यांनी १९९३ पासून शाळा अनाधिकृतपणे सुरु झाल्यापासून शाळेचा दर्जा उंचविण्यासाठी प्रयत्न न करता विद्यार्थ्यांना कॉप्या पुरविणे. परिक्षा केंद्रात जाऊन परिक्षा केंद्र ताब्यात घेऊन विद्यार्थीनीना कॉप्या पुरविणे जे काम करुन अनिष्ठ पध्दतीने शाळेचे कामकाज १९९३ पासून करत असल्याने त्यांच्यावर कारवाई व्हावी.	विभागीय सचिव पुणे यांनी शेराबुकात नमुद केलेल्या अभिप्रायानुसार तत्कालिन मुख्याध्यापिका व इतर सर्व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी प्रयत्न केलेले असून, त्यामुळेच सन १९९८ मध्ये श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरामध्ये विद्यार्थी संख्या ३०९ इतकी होती, तर सन २०१८ मध्ये तीच संख्या ७६६ इतकी आहे. तसेच शाळेचा दर्जा उत्तम असल्याने ग्रामस्थांनी व पालकांनी कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्याची मागणी केली, त्यानुसार संस्थानने सन २००० मध्ये कनिष्ठ महाविद्यालय सुरु केलेले आहे. तेथेही विद्यार्थ्यांच्या सर्वांगिन विकासासाठी प्रयत्न केला जातो, त्यामुळेच विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ यांनी संस्थानमार्फत वरिष्ठ महाविद्यालय सुरु करण्याबाबत मागणी केली, सदर मागणीनुसार संस्थानने सन २०१८ मध्ये वरिष्ठ महाविद्यालय सुरु केलेले आहे. तसेच सदरच्या मुद्याबाबत अर्जदार यांनी कोणतेही परिस्थितीजन्य पुरावे सादर केलेले नसुन सदरचा आरोप त्यांनी केवळ वैयक्तिक द्वेषातून व संस्थानला बदनाम करण्याच्या हेतूने केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.
०७	दि. २६-२७/०८/२००० रोजी विषय क्र. ३३ निर्णय क्र. ३४६ नुसार कनिष्ठ महाविलय सुरु करण्याबाबत - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीने दि. २६-२७/ऑक्टो/२००० रोजी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरला संलग्नित कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्यात आले. दि.०१ ऑक्टो. २००१ चे शिक्षण उपसंचालक पुणे विभाग-पुणे यांचे मान्यता पत्र- दि. १ ऑक्टोबर २००१ चे शिक्षण उपसंचालक यांनी मान्यतेबाबत शासन नियम व अटी (अटी-७) नुसार कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्यात आले.	शासन नियमाप्रमाणे (परिपत्रक क्र.एच.एस.सी.१५९८/ ३०९१३/१२, एच.एस.पुणे दि.१८.०८.१९९९) खाजगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-याच्या नेमणूक माध्यमिककडून उच्च माध्यमिककडे न करण्याबाबतचा शासन निर्णय उपलब्ध आहे.

	परिपत्रक - परिशिष्ट २६ क्र. एचएससी १५९८/३०९१३/१२, एच.एस.पुणे दि. १७/०८/१९९९ विषयः- खाजगी शाळांतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या नेमणूका माध्यमिम शिक्षकांच्या नेमणूका उच्च माध्यमिकडे न करणबाबत – परिपत्रक परिशिष्ट २६ क्र. एच.एस.सी. १५९८/३०९१३/१८, एच.एस. पुणे दि.१८/०८/१९९९ चा विषय- खाजगी शाळातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या नेमणूका माध्यमिक शिक्षकांच्या नेमणूका उच्च माध्यमिकडे न करण्याबाबत शासन परिपत्रक असतांनाह सहा. शिक्षक विकास महादेव शिवगजे यांनी प्राचार्या चव्हाणके मॅडम यांना हाताशी धरुन चुकीच्या मार्गाने गैरप्रकार आपली नियुक्ती उच्च माध्य.(कनिष्ठ महाविद्यालयाकडे) प्रशासनातील अधिका-यांना पैसे देवुन करुन घेतली. शिवगजे यांची नियुक्ती शासन निर्णयाचे उल्लघंन करुन केल्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी. त्यावेळेच्या प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्यावर देखील गुन्हा दाखल करुन दोघांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.	मात्र तत्कालीन मा.व्य.समितीचे दि.३०.०३.२००२ चे सभेतील निर्णय क्र.१८२ नुसार श्री.विकास महादेव शिवगजे, यांची दि.०१.०७.२००१ पासून उच्च माध्यमिक विभागाकडे सहा.शिक्षक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.
	सहा. शिक्षण संचालक पुणे विभाग-पुणे १ यांचे पत्र- शासन निर्णय दि. २७/०७/१९९९ नुसार उच्च माध्यमिककडे / कनिष्ठ महाविद्यालयाकडे नियुक्त्या या महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ मधील नियम क्र. ९ (२,३ व ४) नुसार केल्या जातात. माध्यमिक शाखेकडून उच्च माध्यमिक शाखेकडे बदली, पदोन्नती करता येत नाही असा नियम असतांना प्राचार्या चव्हाणके मॅडम व शिवगजे यांनी नियमाचा भंग करुन माध्यमिककडून उच्च माध्यमिक बदली करुन घेऊन चुकीच्या मार्गाने गैरप्रकार पदाचा दुरुपयोग करुन नियुक्ती केल्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांची उच्च माध्यमिककडील नियुक्ती रद्द करण्यात यावी. इतरही काही शिक्षकांच्या अशाच चुकीच्या नियुक्त्या करण्यात आल्या. त्यादेखिल रद्द करण्यात याव्यात.	
०८	शिक्षक सेवक योजना माध्यमिक / उच्च माध्यमिक शासन निर्णय क्र. एसएसएन १०००/(३६४/०१ मशि-२ मंत्रालय विस्तारभवन मुंबई ४०००३२ दि.२६ जुलै २००१ – सन २००० ला शिक्षण सेवक योजना कार्यान्वित झाली. दिनांक २६ जुलै २००१ च्या शासननिर्ण शिक्षण सेवक येजना लागू असतोना शिवगजे यांनी माध्यमिक कडून उच्च माध्यमिककडे गैरमार्गाने नियुक्ती करुन धेतली. परंतू वरील दिनांक २६ जुलै २००१ च्या शासन निर्णयानुसार ही शिक्षण सेवक योजना आपणांस लागु हे दाखवुन प्राचार्या निता चव्हाणके मॅडम यांच्या सहकार्याने कनिष्ठ महाविद्यालयाची वेतनश्रेणी लागू करुन धेतली. चुकीच्या मार्गाने नियुक्त्या व वेतनश्रेणी घेल्याबद्दल शिवगज यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल होऊन नियुक्त्या रद्द करुन घेतलेला पगार वसुल करावा.	शासन नियमाप्रमाणे (परिपत्रक क्र.एच.एस.सी.१५९८/ ३०९१३/१२, एच.एस.पुणे दि.१८.०८.१९९९) खाजगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-याच्या नेमणूक माध्यमिककडून उच्च माध्यमिककडे न करण्याबाबतचा शासन निर्णय उपलब्ध आहे. मात्र तत्कालीन मा.व्य.समितीचे दि.३०.०३.२००२ चे सभेतील निर्णय क्र.१८२ नुसार श्री.विकास महादेव शिवगजे, यांची दि.०१.०७.२००१ पासून उच्च माध्यमिक विभागाकडे सहा.शिक्षक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.
	४ ऑक्टो. २००१ चे कार्यकारी अधिकारी यांचे पत्र- शिवगजे यांनी चुकीच्या पध्दतीने कनिष्ठ महाविद्यालयाकडे बदली करुन घेण्यात आली.	
	आस्थाना विभाग दि.३१/१२/२००१ चे पत्र – आस्थापना विभागातील अधिका-यांना हाताशी धरुन या पत्रान्वये कार्यवाही करुन शिवगजे यांनी कनिष्ठ महाविद्यालयाची चुकीची वेतनश्रेणी घेतल्याबददल शिवगजे यांच्यावर कायदेशिर कारवाई व्हावी.	
०९	प्रोसडींग दि. २५-२६/१०/२००१ च्या सभेतील निर्णय विषय क्र. ३७, निर्णय क्र ०६ सेवा जेष्ठता यादीस मान्यता देणेबाबत:- सन २००१ ला प्राचार्या चव्हाणके मॅडम व आस्थापना विभागातील अधिकारी यांना हाताशी धरुन अर्ज करुन प्रोसिंडींग दि.२५-२६/१०/२००१ च्या सभेतील निर्णय क्र. ३७, निर्णय क्र. ०६ नुसार शिवगजे यांनी सेवाजेष्ठता यादीत १९९३ पासून सेवाजेष्ठ असल्याचे दाखवून प्राचार्य असल्याचे भासवून अनेक शैक्षणिक दस्तऐवज खोटे बनवुन त्यावर प्राचार्य म्हणून सहया करुन सेवाजेष्ठता यादीचा दुरुपयोग केला आहे. सेवाजेष्ठता यादीत चुकीच्या पध्दतीने समावेश करुन संस्थानची व शासनाची फसवणूक केल्यामुळे शिवगजे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा.	दि.३१.१२.२०१५ रोजी संस्थानचे आस्थापना विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्यासेवाजेष्ठता यादीमध्ये श्री. शिवगजे यांची प्रथम नेमणूक दि.०७.०१.१९९६ अशी करण्यात आलेली असून, त्यांनी त्याबाबत कोणत्याही प्रकारची हरकत घेतलेली नाही. तसेच सन १९९३-९४, १९९४-९५ व सन १९९५-९६ या कालावधीत श्री.शिवगजे यांना तात्पुरते नेमणूक आदेश देण्यात आलेले होते.
	शिक्षक माहितीपत्रक -०१, सेवा जेष्ठता यादी-०१, सेवा जेष्ठता यादी-०१, सेवा जेष्ठता यादी-०१ (२०१२-१३) – सन १९९३ शिवगजे शै. पात्रता नसतांना श्री साईबाबा इंग्लिश मिडीयमकडे शिक्षक म्हणून काम करत होते. सन १९९३ ला त्यांची सेवा खंडीत होऊन त्यांची श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरकडे नियुक्ती करण्यात आली. त्यावेळी	

	१९९४ ला ते बी.एड. नव्हते व शाळेला मान्यता नव्हती. त्यामुळे सेवाजेष्ठता यादीत त्यांची नियुक्ती अव्वलस्थानी दाखवुन त्यांनी संस्थाची व शासनाची फसवणूक केलेली आहे. शिक्षकांच्या माहितीच्या याद्या तयार करतांना प्रत्येक यादीत आपण १९९३ पासून जेष्ठ शिक्षक असल्याचे दाखवुन संस्थानची व शासनाची फसवणूक केली आहे. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होऊन त्यांच्यावर फेरबद्दल केल्याबाबत गुन्हा दाखल करावा.	
१९	दि. १५ सप्टेंबर २००१ चे नियुक्तीपत्र जा.नं. एसएसएस / वशी १ /१९२८८/२००३ जा. नं. एसएसएस/ वशी ०१/ ३४११/ २००८ दि. १३ नोव्हेंबर २००५ चे नमेणूक पत्र दि.०३/०१/२००९ च्या सभेतील निर्णय क्र. ३(२७) – माध्यमिक कडून उच्च माध्यमिकडे न जाण्याचा शासन निर्णय असतांना शिवगजे यांनी प्राचार्या चव्हाणके मॅडम यांना हाताशी धरुन सौ. वैशाली नंदकिशोर देशमुख यांची श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर कडून कनिष्ठ महाविद्यालयाकडे नियुक्ती देऊन चुकीच्या पध्दतीने देऊन शाहा संहितेच्या नियमाचा भंग केल्यामुळे शिवगजेसह दोषींवर कारवाई करुन त्यांच्या नियुक्त्या रद्द करुन कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात यावा.	श्रीमती वैशाली नंदकिशोर देशमुख (साळुंखे) यांना तत्कालिन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, माध्यमिक विभागाकडे प्रथम शिक्षणसेवक म्हणून (दि.०१.११.२००० ते दि.३०.०४.२००३) व त्यानंतर दि.०१.०७.२००१ पासून रु.५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीत दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीकरिता नेमणूक देण्यात आली. सदरचे नेमणूक आदेश त्यांनी अटी व शर्तींसह स्विकारलेले आहेत. तसेच जा.नं.एसएसएस/वशी-१/१९२७/२००३ दि.१४ ऑगस्ट, २००३ अन्वये श्रीमती वैशाली नंदकिशोर देशमुख (साळुंखे) यांना श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर माध्यमिक विभागाकडे रु.५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीत संस्थान सेवेत कायम करण्यात आले. त्यानंतर त्यांनी स्वतः केलेल्या अर्जानुसार मा.आस्थापना उपसमितीचे दि.१८.१०.२००८ रोजीचे सभेतील निर्णयानुसार त्यांची श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे रु.७२२५-२२५-११०५० या वेतनश्रेणीत सहा.शिक्षक (गणित) पुर्णवेळ या पदावर दि.१५.०६.२००७ पासून नेमणूक करण्यात आली, सदरचा नेमणूक आदेशही त्यांनी अटी व शर्तींसह स्विकारलेला आहे.
	दि. २६ जुन १९९५ चे नियुक्ती पत्र ०१/०७/१९९६ चे नियुक्ती पत्र दि. १३ नोव्हेंबर २००८ चे नेमणूक पत्र दि. ०३/०१/२००९ चे सभेतील विषय नं. ०३ निर्णय क्र. ०३ – माध्यमिक कडून उच्च माध्यमिककडे न जाण्याचा शासन निर्णय असतांना श्री घोडके यांची नियुक्ती १९९५ पासून माध्यमिक विभागाकडे असतांना शिवगजे यांनी प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्या संगनमताने या शिक्षकाकडून पैसे घेऊन त्याची माध्यमिककडून उच्च माध्यमिकडे नियुक्ती देऊन गैरकारभार करुन भ्रष्टाचार केल्यामुळे शिवगजेसह दोषीवर कारवाई होऊन सर्व शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द करुन त्यांनी लाटलेल्या वेतनश्रेणीच्या रकमा वसुल करुन त्यांच्यावर शाळा संहितानियमाचा भंग केल्यामुळे गुन्हा दाखल व्हावा.	श्री.घोडके यांनी वेळोवेळी कनिष्ठ महाविद्यालयाकडे काम करण्याची संधी मिळावी म्हणून प्रशासनाकडे विनंती अर्ज केले होते, त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.०१.२००९ चे सभेतील निर्णय क्र.०३ (२१) नुसार जा.क्र. एसएसएस/वशी-०१/३४१२/२००८ दि.१३ नोव्हेंबर, २००८ अन्वये श्री.अरुण बाबुराव घोडके यांची दि.१४.११.२००८ पासून कनिष्ठ महाविद्यालयाकडे विहीत वेतनश्रेणी देऊन सहा.शिक्षक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच प्राचार्या चव्हाणके मॅडम व श्री.शिवगजे यांनी पैसे घेतलेबाबत अथवा त्यांनी बळजबरीने नियुक्ती दिलेबाबत श्री.घोडके यांनी अथवा इतर कोणत्याही शिक्षकांनी यापुर्वी तक्रार केलेली नाही, तसेच अर्जदार यांनी केवळ तक्रार केलेली आहे.
	विषय नं. ७९ (१८) – कनिष्ठ महाविद्यालयाकडे अध्यापन करणा-या शिक्षकाची पात्रता ही एम.ए.बी.एड. (II) व्दितीय श्रेणी असावी असा शासन नियम असतांना शिवगजे यांनी प्राचार्या चव्हाणके मॅडम यांना हाताशी धरुन श्री दिलीप शंकरराव शेळके या शिक्षकाची कनिष्ठ महाविद्यालयाकडे शिकविण्याची किमान एम.ए.बी. एड. व्दितीय श्रेणी ही पात्रता नसतांना या शिक्षकाकडून अमाप पैसा घेऊन यांची नियुक्ती कनिष्ठ महाविद्यालयाकडे पात्रता नसतांना केल्यामुळे शिवगजेसह प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी शिक्षकाची पद भरतांना शासनाच्या नियमावली नुसार न भरता आपल्या जवळच्या शिक्षकांच्या नियुक्त्या गैरप्रकारे करुन शासनाची व संस्थानची गैरप्रकारे फसवणूक केल्याप्रकरणी शिवगजेसह दोषीवर कारवाई करुन दिलीप शंकरराव शेळके या शिक्षकाची नियुक्ती रद्द करुन त्यांनी लाटलेला पगार संस्थानने वसुल करुन शिवगजेसह दोषीवर गुन्हा दाखल करावा.	श्री.दिलीप शंकरराव शेळके यांनी वर्तमानपत्रातील जाहिरातीस अनुससरुन शिक्षणसेवक (इंग्रजी) या पदासाठी अर्ज केलेला होता. जाहिरातीमध्ये सदर पदाची पात्रता एम.ए.(द्वितीय क्षेणी) व बी.एड.अशी नमुद केलेली होती. मात्र श्री.शेळके यांची शैक्षणिक पात्रता एम.ए.(तृतीय श्रेणी) व बी.एड. अशी होती. श्री.शेळके यांचे एम.ए.तृतीय श्रेणीमध्ये असल्यामुळे विशेष बाब म्हणून त्यांना मुलाखत पत्र देण्यात आलेले होते. मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर मुलाखत होऊन, श्री.शेळके यांची कनिष्ठ महाविद्यालयाकडे तासिका तत्तवावर नेमणूक करण्यात आली. त्यानंतर त्यांचे विषयाचा कार्यभार पुर्ण झाल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ चे सभेतील निर्णय क्र.५१५ (६) नुसार त्यांना दि.१६.०६.२००८ पासून ५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीत कनिष्ठ महाविद्यालयाकडे सहाय्यक शिक्षक (इंग्रजी) या पदावर नेमणूक करण्यात आली. श्री.शेळके यांचेकडे अपुर्ण पात्रता असल्याने त्यांना माध्यमिक सहा.शिक्षकाची वेतनश्रेणी देण्यात आलेली होती. उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांच्या अर्हता नियमावलीमध्ये पुर्णकालिक शिक्षका यांचे पात्रतेमध्ये सांविधी विद्यापीठाची स्नातक पदवी

		(दोन) पदवी तृतीय वर्गातील (पास क्लास) असल्यास इ.८ वी ते इ.१० वी अगर इ.११ वी ला शिकविण्याचा किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे. श्री.शेळके यांचेकडे सदरचा अनुभव असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७.०५.२००९ चे सभेतील निर्णय क्र.४५७ नुसार श्री.शेळके यांची अपुर्ण पात्रता असली तरी अनुभव विचारात घेऊन त्यांना ७२२५-२२५-११०५० ही कनिष्ठ महाविद्यालयाची वेतनश्रेणी दि.१८.०५.२००९ पासून देण्यात आलेली आहे. उपरोक्त सर्व कार्यवाही तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने करण्यात आलेली आहे. यामध्ये श्रीमती चव्हाणके व श्री.शिवगजे यांना कोणताही अधिकार नव्हता. तसेच अर्जदार यांनी अर्जात केवळ तक्रार केलेली आहे, मात्र याबाबत कोणतेही परिस्थितीजन्य पुरावे जोडलेले नाहीत.
	दि. ०२/०६/२००८ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ची शिक्षक पदाची जाहीरात – कायम विनाअनुदानीत शाळेला शिक्षण सेवक योजना लागु नाही या तत्वानुसार सन २००१ पासुन शिक्षकाची पद भरती केली असतांना शिवगजे यांनी प्राचार्याच्या मदतीने पुन्हा सन २००८ पासून कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण सेवकांची जाहीरात काढून अनेक शिक्षकांची आपल्या मनमानी व सत्तापिपासू वृत्तीमुळे फसवणूक करुन त्याची चुकीच्या मार्गाने नियुक्त्या देऊन फसवणूक केल्याप्रकरणी शिवगजसह दोषीवर गुन्हा दाखल करावा.	शैक्षणिक संकुलाकडील सर्वच शिक्षकांना सन २००१ पासून नियुक्ती देतांना शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेली होती. सदर शिक्षकांनी नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी मिळणेबाबत सामुहिकरित्या अर्ज केल्यानंतर शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेल्या सर्व शिक्षकांना नेमणूक दिनाकांपासून वेतनश्रेणी देणेबाबतचा विषयाची टिपणी सादर करण्यात आलेली असून, सदरबाबत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा अभिप्राय घेऊन, सदरचा प्रस्ताव जा.क्र.एसएसएस/साप्रशा /आस्था/२५८९/ २०१६ दि.२४.०८.२०१६ रोजी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आलेला होता. आता सदर प्रस्तावाबाबत मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून अभिप्राय प्राप्त झालेले असून, त्याबाबत अलहिदा सविस्तर टिपणी सादर करण्यात येत आहे.
	दि. १२/१०/२०१२ श्री डी.के. राऊत शिक्षण विस्तार अधिकारी जि.प. अहमदनगर यांचा तपासणी बुकातील शेरा – शाळा विनाअनुदानीत असल्याने सर्व शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता व संच मान्यता घेणे प्रशासकीय दृष्टीने योग्य असल्याचे असतांना शिवगजे यांची शैक्षणिक पात्रता बोगस असल्याने व त्यांच्या नियुक्त्या चुकीच्या पध्दतीने झाल्यामुळे तसेच शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम अनेक शिक्षकांच्या नियुक्त्या शाहा संहितेच्या नियमांचा भंग करुन केल्यामुळे तसेच अने अपात्र शिक्षकांच्या नियुक्त्या पैस घेऊन केल्यामुळे शिक्षण विस्तार अधिका-यांनी शेरे देऊनही आजपर्यंत शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता व बोगस संच मान्यता दाखवुन शासनाची व संस्थानची फसवणूक केली आहे. आणि करत आहे त्यामुळे शिवगजेसह दोषीवर कारवाई व गुन्हा दाखल व्हावा.	शैक्षणिक संकुलाकडील कोणत्याही शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता घेण्यात आलेल्या नाहीत ही बाब सत्य आहे. मात्र शैक्षणिक संकुलाकडील सर्व शाळांच्या संच मान्यता या दरवर्षी वेळोवेळी घेण्यात आलेल्या आहेत. तसेच अर्जदार यांनी अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे बोगस संच मान्यतेच्या विषयाबाबत श्रीमती मिरजकर, तत्कालीन मुख्याध्यापिका यांची खाते चौकशी सुरु आहे.
	दि. २८/०७/२०१४ श्री पोले, शिक्षणाधिकारी (माध्य.) सोलापूर यांचा तपासणी पुस्तकातील शेरा – कोणत्याही संस्थेच्या माध्य. व उच्च माध्यमिक विभागात पदे भरतांना रोस्टर तपासणी करुन आरक्षणानुसार पदे भरती करण्याचा शासन निर्णय, शिक्षणाधिकारी यांचा आदेश असतांना शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी कटकारस्थान करुन, खोटेनाटे करुन अल्पसंख्यांक शाळेचे नियम वापरुन १९९४ पासून फक्त मराठा (ओपन) समाजाच्या शिक्षकांना श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडे नेमणूका देण्यात आल्या आहेत. वशिलेबाजी व पैशाचा व्यवहार करुन शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी चुकीच्या मार्गाने शासन निर्णय, शिक्षणाधिकारी यांचे म्हणणे डावलून मनमानी नियुक्त्या करुन मोठा गैरकारभार करुन शासनाची फसवणूक केल्यामुळे शिवगजेसह सर्व दोषीवर फौजदारी गुन्हा दाखल करावा. तसेच आरक्षण व रोष्टर प्रमाणे श्री साईबाबा संस्थानने पद न भरल्यामुळे शिक्षकांची पदे रद्द करुन शाळेची मान्यता काढून घेण्याचा आदेश शिक्षण उपसंचालक पुणे यांना द्यावा.	श्री साईबाबा संस्थानचे कर्मचा-यांना (शैक्षणिक संकुलासह) सन २००४ चे महाराष्ट्र अधिनियम क्र.८ नुसार मागस वर्गातील कर्मचा-यांना संस्थान सेवेत आरक्षण देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.१२.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१७० नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. मात्र तांत्रिक कारणास्तव त्याबाबतची अमंलबजावणी अद्याप झालेली नाही. संस्थान सेवाप्रवेश नियमाबाबतची कार्यवाही अद्याप चालु आहे. त्यामुळे अद्याप १०० बिंदुनामावलीनुसार शिक्षक भरती अथवा इतर विभागातील कर्मचारी भरती करण्यात आलेली नाही. खाजगी शिक्षण संस्थानचे कामकाज हे खाजगी शाळा सहिंतेनुसार चालते त्यानुसार शिक्षकांच्या आवश्यक पदसंख्येची निश्चिती (संच मान्यता) शिक्षण विभागाकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार

		शिक्षण विभागाने संच मान्यता घेतली आहे. संच मान्यतेनंतर बिंदुनामावली चेक करुन घेणे व त्यानुसार जाहीरात,नियमानुसार पद भरती व शिक्षकांच्या वैयक्तीक मान्यता घेणे अशी प्रक्रिया आहे. मात्र यापुर्वी बिंदुनामावली व वैयक्तीक मान्यता घेण्यात आलेल्या नाही. मात्र तत्कालीन व्यवस्थापन समितीने पद भरतीस मान्यता दिल्याचे दिसते.
२०	दि. १३/११/२०१४ माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार माहिती- शिक्षण उपसंचालकांनी विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क आकारणे बंधनकारक आहे असे मान्यता पत्रात म्हटलेले आहे. त्याकामी शासनाने पुर्व परवानगीने निश्चित केलेले शुल्क व्यवतिरीक्त मुले ३३० रु. मुली शुल्क नाही असे तोतया प्राचार्य शिवगजे यांनी दिलेली माहिती पुर्णपणे खोटी व दिशाभुल करणारी आहे. शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी संगनमत करुन शिक्षण विभागाने निश्चित केलेल्या व्यतिरीक्त अनेक प्रकारचे शुल्क आकारुन गरीब विद्यार्थ्यांचे शोषण करुन भरमसाठ पैसा कमाविला आहे. त्यामुळे त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.	श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ मधील तरतुद क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील अशी तरतूद करण्यात आलेली आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही धर्मादाय संस्था असून, याठिकाणी गरजू, वंचित व आर्थिकदृष्टया मागसलेल्या विद्यार्थ्यांना उच्च प्रतीचे शिक्षण देण्याचा मानस आहे, त्यामुळे अत्यंत माफक शैक्षणिक शुल्क आकारणी करुन, विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. त्याबाबत मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे.
	दि. २०/०८/२०१४ चा कु. रणमाळे सायली मधूकर या विद्यार्थीनीचा अर्ज दि. २०/०८/२०१७ चा सय्यद सिजया हसन हिचा अर्ज- शासनाने आकारले परिक्षा शुल्क आकारणे बंधनकारक असतांना तोतया प्राचार्य शिवगजे यांनी आपल्या सहीनिशी विद्यार्थीनीकडून ११ वी गुणपत्रकाचे प्रत्येकी १०० रु. शुल्क आकारुन शासनाची व संस्थानची फसवणूक करुन मोठा गैरकारभार व भ्रष्टाचार केल्यामुळे शिवगजे यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेल्या श्री.शिवगजे यांचे विरुद्ध भ्रष्टाचार व फसवणुकीच्या प्रकरणांबाबत यापुर्वीही इतर अर्जदारांचे तक्रार अर्ज प्राप्त झालेले होते. सदर अर्जांबाबत श्री.डी.टी.उगले प्रशासकीय अधिकारी यांचे मार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आलेली आहे. त्यानंतर श्री.शिवगजे यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचा लेखी खुलासा घेण्यात आलेला आहे. श्री.शिवगजे यांचे लेखी खुलाशावर श्री.एस.व्ही.गमे व श्री.डी.टी.उगले प्रशासकीय अधिकारी यांनी प्राथमिक चौकशी करुन दि.२३.०२.२०१५ रोजी निष्कर्ष अहवाल सादर केला आहे. त्यास अनसरुन कामगार विभागामार्फत दि.३१.०५.२०१५ चे मंजुर टिपणीन्वये जा.नं.एसएसएस/वशी-७बी/११३/ २०१५दि.११ जुन, २०१५अन्वये महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम, १९७७चे कलम ३१ (१) (चार) नुसार श्री. शिवगजे यांची सन २०१५मध्ये देय असलेली वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून ठेवण्यात आलेली आहे.
	दि. १३/११/२०१४ माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार माहिती चे पत्र – तोतया प्राचार्य शिवगजे यांनी दिलेल्या माहितीवरुन श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय शिर्डी मार्कशिटचे डुप्लीकेट अथवा मुळप्रत मिळण्यासाठी कोणतेही शुल्क घेतले जात नाही व कोणतेही दंड वसुल कले जात नाही. तरी वरील उपरोक्त विद्यर्थीनी कडून प्रत्येकी १०० रु. प्रमाणे निकाल पत्रकाचे पैसे घेऊन शिवगजे यांनी आपल्या सहीनिशी गैरप्रकार केल्याचे उघडकीस आल्याने त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.	
	दि. १३/११/१४ चे पत्र	
	दि. १९/११/२०१४ ची विद्यार्थ्यांची परिक्षा फी भरल्याची वर्गशिक्षकांनी दिलेली पावती – १) ऋतुजा सुभाष ओहोळ,२) खरात गणेश पांडूरंग, ३) पटेल आरजूबाना अब्दूलमुक्तदिर, ४) गायकवाड अशोक शंकर, ५) मयुरी बबन कुलधरण - शासनाने ठरवुन दिलेले बोर्डाची परिक्षा फी प्रत्येकी ३२५ रु. एवढी असतांना शिवगजे तोतया प्राचार्य पदाचा गैरवापर करुन विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी सराव फी १२० रु. सराव परिक्षा ॲडमिशन चार्ज १० रु. अन्यायकारकपणे प्रत्येक विद्यार्थ्योमागे आकारुन विद्यार्थ्यांची फसवणूक करुन अर्थिक शोषन केल्याबद्दल शिवगजे यांच्यावर भ्रष्टाचार व फसवणूकीचे सर्व गुन्हे दाखल व्हावे..	
	दि. ११/१२/२०१४ चा सागर त्र्यंबक बिडगर विद्यार्थ्याचा अर्ज – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिवगजेसह प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दिलेल्या माहितीमध्ये आम्ही कोणतेही दंड वसुल करत नाही असे लेखी म्हटले असता या विद्यार्थ्याकडून आकरावी नापासाची पुर्वपरिक्षा नावाखाली ५०० रु. शैक्षणिक शुल्क नियमबाहयारित्या आकारुन आर्थिक शोषन करुन या विद्यार्थांची फसवणूक करुन दंड स्वरुपात रक्कम / शुल्क आकारुन भ्रष्टाचार केल्यामुळे शिवगजे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.	
	महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे, पुणे विभागीय मंडळ, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा, परिक्षा शुल्काचे विवरणपत्र विविध दंड आकारल्याचे विवरणपत्र, विकास शिवगजे यांचे बँकेत पैसे जमा केल्याचे बँक पावती / रिसीट – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाचे परिक्षा शुल्काचे विवरणपत्र नावाखाली शिवगजे यांनी स्वतःचे बोगस परिक्षा शुल्काचे विवरणपत्र	

	तयार करुन एकूण २३९१९५/- रु. व इतर जाचक परिक्षा शुल्क, आयकार्ड फी, मोबाईल दंड, रकमा संस्थेला अकौंट विभागाला किवा शाळेच्या बॅंक अकाउटंवर जमा न करता स्वतःच्याखात्यावर जमा करुन फक्त ३२५ रु. प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याचे परिक्षा शुल्क नियमबाहय पध्दतीने बोर्डाला पाठवून इतर उरलेले पैसे आपल्याच खात्यावर ठेऊन भ्रष्टाचार केला आहे. भ्रष्टाचार उघडकीस आल्यानंतर शिवगजे यांनी विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी रकमा डोनेशन (देणगी) म्हणून संस्थानच्या अकाऊंट विभाग (लेखाशाखेला) जमा केलेल्या आहेत. विद्यार्थ्यांची फि डोनेशन (देणगी) म्हणून स्विकारणे हे कायद्याने गुन्हा असल्याने शिवगजे यांच्यावर फौजदारी गुन्हा श्री साईबाबा संस्थानने दाखल करणे गरजेचे असतांनाही श्री साईबाबा संस्थानने शिवगजे यां प्रकरणात दोषी असतांनाही कुठलीही कारवाई न करता हे प्रकरण पडपण्याचा प्रयत्न केल्यामुळे गरीब विद्यार्थ्यांचे नाहक शोषन झाले आहे. अनेक प्रकारे भ्रष्टाचारात दोषी असलेल्या शिवगजे यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	
	दि. ११ नोव्हेंबर २०१४ चा पालक व प्रतिष्ठित नागरीकांनी केलेला अर्ज व स्वाक्षरी प्रत.- श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात शिवगजे तोतया प्राचार्य वाढीव परिक्षा शुल्क व विविध दंड आकारुन गरीब विद्यार्थ्यांचे शोषन करत असल्याबाबत पालक व शिर्डीचे प्रतिष्ठित नागरीकांनी केलेल्या अर्जावर श्री साईबाबा संस्थानने थातुर-मातुर कारवाई करुन अर्ज निकाली काढण्याचा किळसवाणा प्रयत्न श्री साईबाबा संस्थान प्रशासनाने केला आहे. विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे परिक्षाशुल्क व दंड आकारुन त्यांचे आर्थिक शोषन करुन भ्रष्टाचार करणा-या शिवगजे व हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करणा-या प्रशासकीय अधिका-यावर गुन्हे दाखल व्हावेत.	
२१	श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ची दि. २/०८/२०१४ ची शिक्षक पदाची जाहिरात – दि.२८/०८/२०१४ ची शिक्षक पदाची जाहिरात परत शिवगजे व प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्या सांगण्यावरुन सहा. शिक्षक (परिवीक्षाधिन) असा व्यक्तीसापेक्ष नियमात बदल करुन शिवगजेसह प्राचार्या चव्हाणके मॅडम यांनी जवळच्या शिक्षकांना सहा. शिक्षक तर जे मागासवर्गीय शिक्षक आणि त्यांच्या जवळचे नसलेले शिखक असा भेद करुन व्यक्तिसापेक्ष नियमाचा वापर करुन अनेक शिक्षकाचे शोषन करुन फसवणूक केल्याबद्दल शिवगजे यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा.	शैक्षणिक संकुलाकडील सर्वच शिक्षकांना सन २००१ पासून नियुक्ती देतांना शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेली होती. सदर शिक्षकांनी नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी मिळणेबाबत सामुहिकरित्या अर्ज केल्यानंतर शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेल्या सर्व शिक्षकांना नेमणूक दिनाकांपासून वेतनश्रेणी देणेबाबतचा विषयाची टिपणी सादर करण्यात आलेली असून, सदरबाबत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा अभिप्राय घेऊन, सदरचा प्रस्ताव जा.क्र.एसएसएस/साप्रशा /आस्था/२५८९/ २०१६ दि.२४.०८.२०१६ रोजी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आलेला होता. आता सदर प्रस्तावाबाबत मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून अभिप्राय प्राप्त झालेले असून, त्याबाबत अलहिदा सविस्तर टिपणी सादर करण्यात येत आहे.
२२	वृत्तपत्राचे कात्रण- श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील विविध उपक्रमाची माहिती श्री साईबाबा संस्थान प्रशासनाला न देता परस्पर पत्रकारांना हाताशी धरुन प्राचार्य असल्याचे खोटे सांगुन वृत्तपत्रामध्ये माहती देतांना प्राचार्य असल्याचे खोटे सांगून पत्रकांराना प्राचार्य असल्याची खोटी माहिती देऊन प्राचार्य या पदाचा गैरवापर करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्त शिर्डी सारख्या संस्थेची बदनामी केली आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन कायदेशीर कारवाई करावी.	जा.नं.एसएसएस/ वशी-०१/१८९२/२००८ दि.०४ जुलै, २००८ रोजीचे आदेशान्वये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील दैनंदिन प्रशासन व नियंत्रणाचा कार्यभार पुढील आदेश होईपावेतो श्री.विकास महादेव शिवगजे यांचेकडे तात्पुरता देण्यात आलेला होता. श्री.शिवगजे यांना प्र.प्राचार्य अथवा प्र.उपप्राचार्य असा कोणताही पदभार अथवा पदनाम दिलेले नाही. असे असतांनाही श्री.शिवगजे हे वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावयाच्या बातम्या अथवा जाहिराती तसेच इतर कागदपत्रांवर (कार्या.टिपण्या, व इतर) स्वतःचा नामोल्लेख प्राचार्य म्हणून करतात. त्यामुळे यापुढे श्री.शिवगजे यांना सर्व पत्रव्यवहार अथवा दैनंदिन कामकाज हे सहा.शिक्षक या नावाने करण्याबाबत समज देता येईल.
२३	कु. दाणगे आरती अशोक, कु. तुरकणे माहेश्वरी कैलास यांचा शाळा सोडल्याचे दाखले. – शाळा संहिता नियमानुसार विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर नियुक्त मुख्याध्यापकाचीच सही असणे आवश्यक असतांना शिवगजे यांनी सहा. शिक्षक असतांना विद्यार्थ्यांच्या दाखल्यावर बोगस प्राचार्य म्हणून बोगस सहया केल्याचे उघडकीस आले आहे. शालेय दस्तऐवजावर अधिकार नसतांना पदाचा गैरवापर करुन शिवगजे यांनी शासनाची, संस्थानची व विद्यार्थ्यांची फसवणूक केल्यामुळे मुळ दस्तऐवजावर अधिकार नसतांना सहया केल्यामुळे शिवगजे यांच्यावर गुन्हा दाखल करणे ऐवजी श्री साईबाबा संस्थानने हे प्रकरण पडपण्याचा प्रयत्न करुन शिवगजे यांना वाचविण्याचा प्रयत्न केला आहे. सहयांचा अधिकार नसतांना विद्यार्थ्यांच्या दाखल्यावर सहा करणे हा गंभीर गुन्हा असल्याने शिवगजे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा.	

२४	दि. १८ जुन २०१७ सकाळ वृत्तपत्राचे कात्रण बातमी दि. १९/०७/२०१७ पुढारी वृत्तपत्राचे कात्रण बातमी – अधिकार नसतांना प्राचार्य पदाचा गैरवापर करुन साईसंस्थानच्या सहाय्यक शिक्षक विकास महादेव शिवगजे यांनी विद्यार्थ्यांच्या दाखल्यावर सहया व शाळेचे नावही परस्पर बदलल्याचे दैनिक वृत्तपत्रामध्ये येऊन तसेच त्याबाबत शिवगजे यांना संस्थानने नोटीसही काढून त्यावर कोणतीही कारवाई अगर गुन्हा दाखल न करता परस्पर हे प्रकरण शिवगजे यांनी संस्थान अधिक-यांना पैसा देऊन मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. शिवगजे यांच्याकडून या वा अनेक जबरी गुन्ह शालेय कामकाजाच्या बाबतीत झाले असल्याने त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करावा.	
२५	दि. १२/०५/२०१५ रोजीचा तक्रार अर्ज, दि.२७/०५/२०१५ रोजीचे अपर सचिव महाराष्ट्र शासन यांचे पत्र. , दि. ०५/०९/२०१५ रोजीचा अर्ज, दि. १६/०९/२०१५ रोजीचा अर्ज, दि.०८/१२/२०१५ रोजीचा अर्ज, दि. ११/०१/२०१६ रोजीचा अर्ज, दि. २८/०७/२०१६ रोजीचा अर्ज, दि. ०८/१०/२०१६ रोजीचा अर्ज, दि. ११/०३/२०१७ रोजीचा अर्ज, दि. २०/०३/२०१७ रोजीचा अर्ज दि. १५ सप्टेंबर २०१५ रोजीचे इतर शिक्षकांचे अर्ज व इतर अनेक तक्रार अर्ज--,-- श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयातील शिवगजे या सहा. शिक्षकाने १९९३-९४ पासुन शिक्षक पदावर काम करत असतांना पदाचा गैरवापर करुन खोट-नाटे करुन, माझ्या सारख्या प्रमाणिक व मागासवर्गीय शिक्षकाची फसवणूक तर केलीच परंतू शिवगजे चव्हाणके मॅडम यांना हाताशी धरुन खोटे-नाटे दस्तऐवज तयार करणे, त्यावर सहया करणे, शासन निर्णयाचा भंग करणे, शासन नियमाचा व्यक्तिसापेक्ष वापर करणे, प्राचार्य पदाचा गैरवापर करणे, शासनाची व संस्थानची दिशाभुल करणे, गोपनीय अहवाल तयार करणे, खोटी माहिती पुरवुन दिशाभुल करणे, मा. शिक्षणाधिकारी अहमदनगर, मा. शिक्षण संचालक, पुणे शासनाची तसेचविधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांची फसवणूक गैरकारभार करुन भ्रष्टाचार केला आहे.शिक्षकांना त्रास देणे, मागासवर्गीय शिक्षक व विद्यार्थ्यांना त्रास देणे, संस्थान सेवत असतांना राजकारण करुन शिक्षकांवर मारेकरी घालणे, प्राचार्या चव्हाणके मॅडम यांच्याशी संगनमत व कटकारस्थान करुन शिक्षक- शिक्षकांमध्ये भांडणे लाऊन मारहाण करण्याच्या धमक्या देणे, गरिब व मागास विद्यार्थ्यांचे शोषन करणे, परिक्षा फी मध्ये भ्रष्टाचार केला आहे. वृत्तपत्रामध्ये प्राचार्य असल्याच्या खोटया बातम्या देऊन पदाचा गैरवापर केला आहे. विद्यार्थ्यांच्या दाखल्यावर बोगस प्राचार्य म्हणून सहया केल्या आहेत. या व अशा कारणाने व कृत्यांनी सहा. शिक्षक विकास महादेव शिवगजे दोषी ठरले आहेत. त्यांच्या बाबत अनेक तक्रार अर्ज दाखल झाले आहे. परंतू विद्यमान श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व प्रशासकीय अधिकारी हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करुन शिवगजे यांना सेवेत वाचविण्याचा प्रयत्न करत आहे. शिवगजे यांच्या बाबतीत अनेक तक्रार अर्जाच्यावर सहानुभुतीपुर्वक कारवाई होऊन शिवगजेसह दोषींवर कारवाई होऊन गुन्हे दाखल व्हावेत.	अर्जदार श्री.गायकवाड यांनी यापुर्वी वेळोवेळी तत्कालीन प्राचार्या श्रीमती चव्हाणके व सहा.शिक्षक श्री.शिवगजे यांचे विरुद्ध अनेक तक्रार अर्ज दाखल केलेले आहेत. तसेच माहिती अधिकारान्वये अनेक कागदपत्रांची मागणी केलेली आहे. त्यानुषंगाने त्यांनी वेळोवेळी केलेल्या तक्रार अर्जानुसार वरिष्ठांकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत. तसेच त्यांनी माहिती अधिकारात मागविलेल्या माहितीबाबत त्यांना आवश्यक ती सर्व माहिती पुरविण्यात आलेली आहे. तसेच त्यांचे तक्रार अर्जानुसार श्री.शिवगजे यांची खाते चौकशी करण्यात येऊन, काही प्रकरणांमध्ये श्री.शिवगजे यांचेकडून अनियमितता आढळल्याने त्यांची एक वर्षाची वेतनवाढ रोखून ठेवण्यात आलेली होती. मात्र अर्जदार श्री.गायकवाड हे तरीही वेळोवेळी सदरचे अर्ज करत असल्याचे निर्देशानास येत आहे.

तरी, सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समिती सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

(सचिन ठाकरे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी -तथा-
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

7/8 7/8/2020

GAD - meeting - 159 - 2019

विषय क्र.- 93

115

मा. तदर्थ समितीचे सभेपूढील विषय

(सामान्य प्रशासन विभाग)

विषय: सन २००९ पासून प्रतिक्षासुचीवर असलेल्या पात्र अनुकंपा उमेदवारांना गट क व गट ड चे पदांवर नेमणूका देणेबाबत...

टिपणी,

अ) **विषयाची पूर्वपिठीका:** संस्थान सेवेत असतांना मृत पावणा-या कर्मचा-यांच्या कुटुंबातील एका पात्र नातेवाईकास वेळोवेळी पारीत होणा-या शासन निर्णयातील अनुकंपा तरतुदीचे अधिन राहून मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने दि.०७/०८/२००९ पुर्वीपर्यंत संस्थान सेवेत स्थायी पदांवर गड क व गट ड मधील सरळ सेवेच्या पदांवर सामावून घेण्यात आलेले आहेत.

दि.०७/०८/२००९ रोजी मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून श्री साईबाबा संस्थानचे विविध पदांचे आकृतीबंधास मंजुरी मिळालेली असून, मंजुर आकृतीबंधानुसार संस्थान आस्थापनेवर त्यावेळी कार्यरत असलेल्या वर्ग ०४ कर्मचा-यांची संख्या मंजुर पदांपेक्षा जास्त होती. मंजुर आकृतीबंधामध्ये,**'समितीला आकृतीबंधा बाहेर जाऊन पदभरती करता येणार नाही.'** अशी अट असल्याने दि.०७/०८/२००९ नंतर अनुकंपा कारणास्तव नोकरी मिळणेसाठी अर्ज केलेल्या संबधीत नातेवाईकांना प्रतिक्षायादीवर ठेवण्यात आलेले आहे.

मध्यंतरीच्या कालावधीत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.७६५ (१) अन्वये अनुकंपा उमेदवारांना ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने तूर्त किमान वेतनदरावर कामावर घेणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानंतर वेळोवेळी मा.व्यवस्थापन समितीचे विविध सभेतील निर्णयानुसार मयत कर्मचा-यांच्या वारसांना माहे - डिसेंबर, २०१६ अखेरपर्यंत (एकूण ३१ वारसांना) तूर्त कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे. त्यानंतर माहे जानेवारी, २०१७ पासून आज अखेर उर्वरीत कर्मचा-यांच्या वारसांना कंत्राटी पध्दतीने कामावर घेणेत आलेले नाही.

त्यामुळे, दि.०७/०८/२००९ ते ३१ ऑगस्ट, २०२० अखेर **एकूण ६८** अनुकंपा उमेदवार प्रतिक्षासुचीवर असून, त्यांना संस्थान सेवेत सामावून घेणे प्रलंबीत आहे.

(ब) **दरम्यान,** मा. शासन निर्णय क्रमांक, अंकपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ/ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक - २१ सप्टेंबर, २०१७ अन्वये अनुकंपा तत्त्वावर शासन सेवेत नियुक्ती देण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय / परिपत्रक यांचे एकत्रिकरण करुन सर्वसमावेशक आदेश पारित केलेला आहे.

तथापी, मा. शासनाने पारित केलेल्या अनुकंपा नियुक्ती योजनेसंदर्भातील तरतुदी ह्या केवळ शासकीय कर्मचा-यांपूरत्याच सीमीत आहेत. सदर तरतुदी ह्या जिल्हा परिषदा / नगरपालिका / महामंडळे / प्राधिकरणे / व्यापारी उपक्रम व इतर तत्सम आस्थापनावरील कर्मचा-यांना थेट लागू होणार नाहीत. त्यासाठी संबधीत प्रशासकीय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील, असे नमूद केलेले आहे.

त्यामुळे, अनुकंपा कारणास्तव नियुक्ती विषयक सदर शासन तरतुदी संस्थान व्यवस्थापनासाठी थेट लागु न करता, त्यासाठी अनुकंपा कारणास्तव नियुक्ती विषयक संस्थानचे धोरण व त्याकरीता संस्थान व्यवस्थापनासाठी स्वतंत्र तरतुदी लागू करणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२०९ अन्वये खालीलप्रमाणे पारीत करणेत आलेला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होऊन,... शासनाने लागु केलेल्या दि.२१ सप्टेंबर, २०१७ च्या अनुकंपा नेमणूकीबाबतचे धोरणामध्ये / निर्णयात, सदर अनुकंपा धोरण स्वतंत्ररित्या राबविणेस प्रशासकीय संस्था त्यांचे स्तरावर स्वतंत्र आहेत, असे नमूद केलेले आहे. त्यास अनुसरुन संस्थान व्यवस्थापनामार्फत अनुकंपा धोरण राबविणेस व त्याअनुषंगाने संस्थान प्रशासनामार्फत स्वतंत्ररित्या नियमावली तयार करणेस मान्यता देण्यात आली. सदरचे धोरणात्मक नियमावलीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन, मा. शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेत यावी," असे ठरले.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, अनुकंपा नियुक्ती संदर्भात (मा. शासनाचे अनुकंपा धोरणानुसार/ त्यांचे धर्तीवर) संस्थान व्यवस्थापनासाठी स्वतंत्रपणे लागू करावयाच्या नियमावली तयार करुन त्यास मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ रोजीचे सभेत निर्णय क्र.३८८ अन्वये मान्यता घेणेत आली असून, याबाबत खालील प्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

" ..... संस्थानमध्ये अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेसंबंधी शासनाचे अनुकंपा धोरणानुसार / त्यांचे धर्तीवर तयार करणेत आलेल्या उपरोक्त नियमावलीस मान्यता देण्यात आली. तसेच सदरची नियमावली शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेत यावी," असे ठरले.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, इकडील जा.नं.एसएसएस/साप्रशा-आस्था/१८७३/२०१९ दि.१६/०८/२०१९ अन्वये अनुकंपा नेमणूकी संदर्भात संस्थान व्यवस्थापनासाठी लागू करावयाच्या स्वतंत्र नियमावलीस मा.शासनाची मान्यता घेणेबाबतचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणेत आला होता.

पुढील पानावर.... कृ.मा.प.

क) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ रोजीचे सभेत निर्णय क्र.३८८ अन्वये झालेल्या निर्णयानुसार संस्थान व्यवस्थापनासाठी लागू करावयाच्या अनुकंपा नियुक्तीबाबतचे तरतुदीस महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र.सासंवि-१०१९/८१३/प्र.क्र.१५३/का.१६ दि.२७ ऑगस्ट, २०२० अन्वये शासन मान्यता देणेत आलेली असून, त्यातील सर्वसाधारण अटी - शर्ती खालीलप्रमाणे आहे.

अट क्र. १ - अनुकंपा नियुक्ती योजनेचा लाभ संस्थानाच्या स्थायी अधिकारी / कर्मचा-यांच्या पात्र कुटुंबियांना अनुज्ञेय राहील.

अट क्र. २ - संस्थान सेवेत असताना दिवंगत झालेल्या अधिकारी / कर्मचा-यांच्या पात्र कुटुंबियांना पात्रतेनुसार गट-क व गट-ड संवर्गात अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती अनुज्ञेय राहील.

अट क्र. ३ संस्थानांतर्गत कोणत्याही गट-क व गट-ड मधील सरळ सेवेच्या पदांवर त्या पदाची सेवाप्रवेश नियमातील विहित शैक्षणिक अर्हता असल्यास अशी नियुक्ती देता येईल.

अट क्र. ४ - अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र कुटूंबिय: अनुकंपा नियुक्तीसाठी खालील नातेवाईक पात्र राहतील व त्यापैकी एका पात्र नातेवाईकास नियुक्ती अनुज्ञेय राहील:-

१. पती / पत्नी २. मुलगा / मुलगी (अविवाहीत / विवाहीत) मुत्यूपूर्वी कायदेशीररित्या दत्तक घेतलेला मुलगा / मुलगी (अविवाहीत / विवाहीत) ३. दिवंगत संस्थान अधिकारी / कर्मचा-याचा मुलगा हयात नसेल किंवा तो नियुक्तीसाठी पात्र नसेल तर त्याची सुन ४. घटस्फोटीत मुलगी किंवा बहिण, परित्यक्ता मुलगी किंवा बहीण, विधवा मुलगी किंवा बहीण ५. केवळ दिवंगत अविवाहित संस्थान अधिकारी / कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांच्यावर सर्वस्वी अवलंबून असणारा भाऊ किंवा अविवाहित बहीण.

अट क्र. ६ - दि.३१/१२/२००१ नंतर तिसरे अपत्य झालेल्या कर्मचा-यांच्या कुटूंबियास अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीसाठी पात्र समजले जाणार नाही.

अट क्र. १० - अर्ज करण्यासाठी मुदत:-

(अ) अनुकंपा नियुक्तीसाठी दिवंगत संस्थान अधिका-यांच्या / कर्मचा-यांच्या कुटुंबातील पात्र नातेवाईकाने संस्थान अधिकारी / कर्मचारी दिवंगत झाल्याच्या दिनांकापासून १ वर्षाच्या मुदतीत संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे विहीत नमुन्यात परिपूर्ण अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

(आ) सेवेत असतांना दिवंगत संस्थान अधिका-यांच्या / कर्मचा-यांच्या कुटूंबातील अज्ञान वारसदारांपैकी कोणत्याही एकाने सज्ञान म्हणजे १८ वर्षाचा झाल्यावर एक वर्षाच्या आत अनुकंपा नियुक्तीसाठी परिपूर्ण अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

(इ) पात्र वारसदारासह विहीत १ वर्षाच्या मुदतीनंतर २ वर्षे इतक्या कालावधीपर्यंत (मृत्यूच्या दिनांकापासून ३ वर्षापर्यंत) तसेच दिवंगत संस्थान अधिका-यांच्या / कर्मचा-यांच्या अज्ञान वारसदाराच्या बाबतीत तो उमेदवार सज्ञान झाल्यानंतर विहीत १ वर्षाच्या मुदतीनंतर २ वर्षापर्यंत (सज्ञान झाल्यानंतर ३ वर्षापर्यंत) अर्ज सादर करण्यास विलंब झाल्यास असा विलंब क्षमापित करण्याचे अधिकार संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत.

अट क्र.११ -अनुकंपा नियुक्तीसाठी वयोमर्यादा:

(अ) किमान वयोमर्यादा - १८ वर्ष.

(आ) कमाल वयोमर्यादा - वयाच्या ४५ वर्षापर्यंतच्याच उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय असेल. त्यामुळे प्रतिक्षासूचीतील उमेदवारांना वयाच्या ४५ वर्षापर्यंत नियुक्ती न मिळाल्यास त्यांची नावे वयाची ४५ वर्ष पूर्ण होताच आवश्यक ती नोंद घेऊन प्रतिक्षासूचीतून काढून टाकण्यात यावीत.

अट क्र. १२ -अनुकंपा नियुक्तीसाठी शैक्षणिक अर्हता:-

(अ) पात्र नातेवाईकाची शैक्षणिक अर्हता व निम्न वयोमर्यादेनुसार त्याला गट "क" किंवा गट "ड" मधील पदावर अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय राहील.

(आ) संबंधित पदांसाठी विहीत शैक्षणिक पात्रता आणि निम्न वयोमर्यादा याबाबतच्या अटी या नेमणूकांसाठी कटाक्षाने पाळण्यात येतील.

(इ) तथापी, दिवंगत संस्थान कर्मचा-याची पत्नी शैक्षणिक पात्रतेव्यतिरिक्त इतर अटी पूर्ण करीत असल्यास तिच्या बाबतीत गट -ड मध्ये नेमणूकीसाठी शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करण्याचे अधिकार संबंधित नियुक्ती प्राधिका-याला असतील.

अट क्र. १८ - अनुकंपा नियुक्तीसाठी विहित पदांची मर्यादा:-

अनुकंपा नियुक्तीसाठी गट "क" व गट "ड" मध्ये प्रती वर्षी रिक्त होणा-या पदांच्या १० टक्के पदे ही अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावी.

पुढील पानावर.... कृ.मा.प.

अट क्र. २२ - अनुकंपा नियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती शिथिल करण्याबाबत:-

अनुकंपा नियुक्तीसाठी संस्थान कर्मचा-यांच्या विधवांना केवळ गट "ड" मधील पदांवर नियुक्ती करावयाची असल्यास शैक्षणिक अर्हता शिथिल करण्याबाबत तरतुद राहील.

ड) महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सासंवि-१०१९/८१३/प्र.क्र.१५३/का.१६ दि.२७ ऑगस्ट, २०२० अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी विहित केलेल्या अटी- शर्तीनुसार सन २००९ पासून दि. ३१ ऑगस्ट, २०२० अखेरची मुळ प्रतिक्षा यादी सोबत जोडली असून, त्यातील **एकूण ६८,उमदेवारांनी** अनुकंपा अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांची प्राथमिक स्तरावर पडताळणी इकडील विभागामार्फत करणेत आली असून, पडताळणी अहवाल सोबत अवलोकनार्थ सादर केला आहे.

सदर पडताळणी अहवालानुसार प्रतिक्षायादीतील पात्र/ अपात्र उमेदवाराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र.१ (पात्र / अपात्र)

अ.नं.	तपशिल	पात्र / अपात्र	एकूण	शेरा
०१	अनुकंपा नियुक्तीच्या अटी /शर्ती पूर्ण करीत असलेले उमेदवार	पात्र	२४	याबाबत सोबत **परिशिष्ट 'अ'** जोडले आहे.
०२	विहीत मुदतीत अर्ज सादर न केल्याचे कारणास्तव	अपात्र	०१	याबाबत सोबत **परिशिष्ट 'ब'** जोडले आहे. अनुकंपा प्रतिक्षायादी क्र.४८ वरील अनुकंपा उमेदवार श्री. शिवाजी आप्पासाहेब गायके अर्ज सादर करणेच्या विहीत १ वर्षाच्या मुदतीनंतर म्हणजेच १ वर्ष ५ महिने कालावधीनंतर अर्ज सादर केला असून, अनुकंपा नियमावलीतील अटी – शर्ती क्र. १० (इ) नुसार पात्र वारसदारास विहीत १ वर्षाच्या मुदतीनंतर २ वर्षे इतक्या कालावधीपर्यंत (मृत्युच्या दिनांकापासून ३ वर्षापर्यंत) अर्ज सादर करण्यास विलंब झाल्यास असा **विलंब क्षमापित करण्याचे अधिकार संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहे.**
०३	**अ)** अनुकंपा नियुक्तीसाठी सेवाप्रवेश नियमात विहीत केलेली शैक्षणिक अर्हता नाही. याकारणास्तव.	अपात्र	०८	याबाबत सोबत **परिशिष्ट 'क'** जोडले आहे. अनुकंपा नियमावलीतील अटी – शर्ती क्र. १२ (इ) नुसार दिवंगत संस्थान कर्मचा-याची पत्नी शैक्षणिक पात्रतेव्यतिरिक्त इतर अटी पूर्ण करीत असल्यास तिच्या बाबतीत गट ड मध्ये नेमणूकीसाठी शैक्षणिक अर्हतेची अट **शिथील करण्याचे अधिकार संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याला आहे.**
	ब) अनुकंपा नियुक्तीसाठी सेवाप्रवेश नियमात विहीत केलेली शैक्षणिक अर्हता नाही. याकारणास्तव.	अपात्र	१७	याबाबत सोबत **परिशिष्ट 'ड'** जोडले आहे. संस्थानासाठीचे सेवाप्रवेश नियम अद्याप अंतिम नसून, त्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - (अ) नुसार दि.०६ जानेवारी, २०१८ मध्ये प्रसिध्द करणेत आलेल्या अधिसूचना खंड (ग) (एक) नुसार सेवाप्रवेश नियम शासन राजपत्रात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापुर्वी अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठीच्या प्रतिक्षायादीतील अंतर्भूत असलेल्या उमेदवारांसाठी, प्राथमिक शाळेमधून **चौथ्या इयत्तेची परिक्षा उत्तीर्ण असल्याची शैक्षणिक अर्हता लागू राहील, अशी तरतुद आहे.** (दोन) हे सेवाप्रवेश नियम शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकास व त्यानंतर अनुकंपा तत्वाद्वारे नियुक्तीसाठी प्रतिक्षायादीत नाव नोंदविण्याकरीता खंड (ख) च्या उप खंड (दोन) मध्ये विहीत केलेली शैक्षणिक अर्हता आवश्यक राहील.
०४	दि.३१/१२/२००१ नंतर तिसरे अपत्य झालेल्या कर्मचा-यांच्या कुटूंबियास अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र समजले जाणार नाही या कारणास्तव.	अपात्र	०९	याबाबत सोबत **परिशिष्ट 'इ'** जोडले आहे.
०५	अनुकंपा नियुक्तीसाठी कमाल वय ४५ वर्षापेक्षा जास्त याकारणास्तव	अपात्र	०९	याबाबत सोबत **परिशिष्ट 'ई'** जोडले आहे.

पुढील पानावर.... कृ.मा.प.

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे अ.नं. २ ते ३ चे उमेदवारांबाबतीत खालीलप्रमाणे शिथीलता देणेची तरतुदी आहे.

१. अनुकंपा नियमावलीतील अटी – शर्ती क्र. १० (इ) नुसार पात्र अनुकंपा उमेदवाराच्या बाबतीत अर्ज सादर करण्यास विलंब झाल्यास असा **विलंब क्षमापित करण्याचे अधिकार संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहे.**

२. **तसेच,** अट क्र. १२ (इ) नुसार दिवंगत संस्थान कर्मचा-याची पत्नी शैक्षणिक पात्रतेव्यतिरिक्त इतर अटी पूर्ण करीत असल्यास तिच्या बाबतीत गट - ड मध्ये नेमणूकीसाठी शैक्षणिक अर्हतेची अट शिथिल करण्याचे अधिकार संबंधित नियुक्ती प्राधिका-याला असतील.

३. **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - (अ)** नुसार दि.०६ जानेवारी, २०१८ मध्ये प्रसिध्द करणेत आलेल्या अधिसूचना खंड (ग) (एक) नुसार सेवाप्रवेश नियम शासन राजपत्रात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापुर्वी अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठीच्या प्रतिक्षायादीतील अंतर्भूत असलेल्या उमेदवारांसाठी, प्राथमिक शाळेमधून **चौथ्या इयत्तेची परिक्षा उत्तीर्ण असल्याची शैक्षणिक अर्हता लागू राहील, अशी तरतुद आहे.**

(इ) मा. शासनाने अनुकंपा नियुक्ती संदर्भात मान्यता दिलेल्या नियमावलीतील अट क्र.३ नुसार संस्थानांतर्गत गट क व गट ड चे पदांवर त्या पदाची सेवाप्रवेश नियमातील विहीत शैक्षणिक अर्हता असल्यास अशी नियुक्ती देता येईल, अशी तरतुद आहे.

अनुकंपा उमेदवारासंदर्भात संस्थानसाठीचे सेवाप्रवेश नियमाचे प्रारुप आराखडयामध्ये गट क चे पदासाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता प्रस्तावीत करणेत आलेली आहे.

तक्ता क्र.०२ (वर्ग क संर्वगासाठी प्रारुप आराखडयामध्ये नमूद शैक्षणिक अर्हता)

अं.क्र	पदनाम	वेतनश्रेणी	प्रस्तावीत पात्रता Proposed Qualification
०१	वर्ग क (लिपीक टंकलेखक)	3050-4590 Pay Band 5200-20200 Grade pay 1900 (सातवा वेतन आयोगानुसार वेतन स्तर S-6)	मान्यता प्राप्त विद्यापिठाचा पदवीधर, एमएस-सीआयटी संगणक कोर्स व शासन मान्य टायपिंग मराठी ३०, इंग्लिश ४० प्र.श.मि.
०२	टेक्नीकल पदासाठी		इयत्ता १२ वी किंवा पदवीधर व विशिष्ट विषयात कमीत कमी ३ वर्ष कालावधीचा डिग्री /डिप्लोमा कोर्स व एमएस - सीआयटी संगणक प्रशिक्षण.

त्यानुसार सध्या वर्ग क चे पदांपैकी लिपीक - टंकलेखन या पदाचे एकूण मंजूर पदे, सध्या भरलेली पदे व रिक्त पदे याबाबतची माहीती खालील प्रमाणे आहे.

तक्ता क्र.०३ (वर्ग क संर्वगातील रिक्त पदाचा तपशिल.)

अ.नं.	तपशिल	आकृतीबंधानुसार मंजूर पदे	सध्या भरलेली पदे	रिक्त पदे
०१	वर्ग क चे पदांपैकी लिपीक - टंकलेखक (ग्रेडवेतन १९००)	२७०	१५१	११९
०२	टेक्नीकल पदासाठी - प्रतिक्षायादीवरील अनुकंपा उमेदवाराच्या शैक्षणिक अर्हतेनुसार सदरहू अनुकंपा वारसदार वर्ग ३ चे टेक्नीकल पदावर नियुक्तीस पात्र होत असल्यास त्याच्याबाबतीत संबंधीत विभागातील मंजूर आकृतीबंधानुसार सदर पदाचे एकूण मंजूर पदे व त्यानुसार एकूण रिक्त पदाच्या १० टक्के पदे अनुकंपा नियुक्तीच्या अटी - शर्तीनुसार भरणेबाबत उचित कार्यवाही करता येईल.	...	...	...

मा. शासनाचे निर्णय क्र.सासंवि-१०१९/८१३/प्र.क्र.१५३/का.१६ दि.२७ ऑगस्ट, २०२० अन्वये **संस्थान अनुकंपा नियुक्तीसाठी मान्यता दिलेल्या नियमावलीतील अटी शर्ती क्र. १८ नुसार** गट "क" व गट "ड" मध्ये प्रती वर्षी रिक्त होणा-या पदांच्या १० टक्के पदे ही अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावी, अशी तरतुद आहे.

उपरोक्त तक्यात नमूद केलेप्रमाणे सध्या वर्ग क (लिपीक – टंकलेखक) ची **११९** पदे रिक्त असून पद भरतीचे शासन तरतुदीनुसार एकूण **१२ पदे** वर्ग क संवर्गात अनुकंपा नियुक्तीने भरता येतील.

पुढील पानावर.... कृ.मा.प.

(ई) **महाराष्ट्र शासनाचे गट 'ड' पदांचे सेवाप्रवेश (सुधारणा) नियम २०१८ दि.०६ जानेवारी, २०१८** रोजी प्रसिध्द करणेत आलेल्या ३ 'ग' खालील प्रमाणे नमूद आहे.

(एक) हे सेवाप्रवेश नियम शासन राजपत्रात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापुर्वी अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठीच्या प्रतिक्षायादीतील अंतर्भूत असलेल्या उमेदवारांसाठी, प्राथमिक शाळेमधून **चौथ्या इयत्तेची** परिक्षा उत्तीर्ण असल्याची शैक्षणिक अर्हता लागू राहील.

(दोन) हे सेवाप्रवेश नियम शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकास व त्यानंतर अनुकंपा तत्वाद्वारे नियुक्तीसाठी प्रतिक्षायादीत नाव नोंदविण्याकरीता खंड (ख) च्या उप खंड (दोन) मध्ये विहीत केलेली शैक्षणिक अर्हता आवश्यक राहील, असे नमूद केलेले आहे.

संस्थानसाठी सेवाप्रवेश नियम अद्याप अंतिम झालेले नसून, याबाबत सध्या संस्थानची बिंदू नामावली, सेवा प्रवेश नियम, शैक्षणिक व इतर अर्हता, पदोन्नती साखळी, सरळसेवा, पदोन्नतीचे प्रमाण व एकाकी पदे निश्चित करणेसाठी याबाबत प्रारुप आराखडा तयार करणेची कार्यवाही चालू आहे.

संस्थानचे प्रारुप सेवाप्रवेश नियमामध्ये गट ड करीता मा. शासनाचे धोरणानुसार / तरतुदीनुसार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उतीर्ण (**इ.१० वी)** ही शैक्षणिक अर्हता नमूद करणेत आलेली आहे.

तथापी, उपरोक्त शासन तरतुदीनुसार जोपर्यंत संस्थानसाठीचे सेवाप्रवेश नियम अंतिम होऊन शासन राजपत्रात प्रसिध्द होत नाही तोपर्यत शासनाचे उपरोक्त (एक) नुसार वर्ग ड चे पदावर नेमणूक देणेकामी प्रतिक्षायादीतील अनुकंपा उमेदवारांच्या बाबतीत प्राथमिक शाळेमधून **चौथ्या इयत्तेची परिक्षा उत्तीर्ण** असल्याची शैक्षणिक अर्हता लागू करता येईल, अशी तरतुद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३३१ नुसार मंजूर आकृतीबंधातील १२३२ गट-ड कर्मचा-यांचे पदांचे एकूण ०५ संवर्ग (सफाई कामगार, सुरक्षा रक्षक, वॉर्डबॉय, आया, शिपाई / मदतनिस) विभाजन करण्यात आलेले आहे. त्यानुसार सध्याच्या आकडेवारीनुसार गट ड सवर्गातील खालील पदे रिक्त आहेत.

तक्ता क्र.०४ (वर्ग ड संवर्गातील रिक्त पदे)

अं.क्र	पदनाम	मंजूर पदसंख्या	दि.३१/०८/२०२० अखेरीची संख्या	दि.३१/०८/२०२० अखेर रिक्त पदे
०१	मदतनिस / शिपाई	७९४	८८०	- ८६
०२	सफाई कामगार	१७३	१६	१५७
०३	सुरक्षा रक्षक	१६१	१३९	२२
०४	वार्डबॉय	५८	२२	३६
०५	आया	४५	१९	२६
०६	**व्यायामशाळा प्रशिक्षक**	०१	००	०१
	एकूण	१२३२	१०७६	१५६

शासन तरतुदीनुसार अनुकंपा नियुक्तीबाबतचे अटी- शर्ती पूर्ण करीत असलेल्या अनुकंपा उमेदवारांना शासनाचे पद भरतीचे मर्यादेनुसार प्रतिवर्षी रिक्त होणा-या एकूण पदाचे १०% पदे अनुकंपा नियुक्तीने भरता येतील. सध्या वर्ग ड ची **१५६ पदे** रिक्त असून, शासन तरतुदीनुसार **१६ उमेदवारांना** शैक्षणिक अर्हता व इतर अटी - शर्ती पुर्ण करीत असल्यास प्रतिक्षायातील अनुक्रमानुसार नियुक्ती देता येईल, असे मत आहे.

(उ) शासन निर्णयानुसार माहे डिसेंबर, २०२० अखेर प्रतिक्षायादीतील **एकूण ६८** अनुकंपा उमेदवारांपैकी जे उमेदवार शैक्षणिक अर्हता व अनुकंपा नियुक्तीसाठी विहीत केलेल्या अटी-शर्ती पूर्ण करीत असल्यास तसेच काही अनुकंपा उमेदवारांच्या बाबतीत उपलब्ध तरतुदीनुसार शैक्षणिक अहतेमध्ये शिथिलता दिल्यास त्यानुसार पात्र होणा-या अनुकंपा उमेदवारांना पद भरतीच्या मर्यादेनुसार (एकूण रिक्त पदाचे १०%) प्रतिक्षायादीतील उमेदवारांना प्रथम प्राधान्य क्रमाने संस्थान सेवेत सामावून घेता येईल, असे मत आहे.

याबाबत, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ अनुषंगाने दि.०१ जानेवारी, २०१५ रोजी प्रसिध्द करणेत आलेल्या, सर्वसाधारण सेवा अटी विनियम, २०१३ मधील प्रकरण ४ (१) (११) नियुक्त्या या शिर्षाखाली, नियुक्ती प्राधिकारी म्हणून मा. व्यवस्थापन समितीस अधिकार आहेत.

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने पात्र होत असलेल्या अनुकंपा उमेदवारांची यादी सोबतचे **परिशिष्ट 'अ', ते 'ड'** म्हणून सादर केलेली आहे. तसेच अनुकंपा नियुक्ती संदर्भातील अटी - शर्ती पुर्ण करीत नसलेले अनुकंपा उमेदवारांचे संदर्भात **परिशिष्ट 'इ' व 'ई'** म्हणून सोबत जोडले असून शासन तरतुदीच्या अनुषंगाने सदर प्रस्तावावर प्रामुख्याने निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने मान्यतेसाठी सादर करणेत येत आहे.

पुढील पानावर.... कृ.मा.प.

विभागाचा अभिप्राय:-

१) महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सासंवि-१०१९/८१३/प्र.क्र.१५३/का.१६ दि.२७ ऑगस्ट, २०२० अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी विहित केलेल्या अटी- शर्तींनुसार अनुकंपा नियुक्तीबाबतचे सर्व अटी- शर्ती पूर्ण करीत असलेल्या अनुकंपा उमेदवारांना **गट "क"** मध्ये प्रती वर्षी रिक्त होणा-या पदांच्या १० टक्के पदे ही अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावीत, अशी तरतुद आहे.

गट क पदापैकी लिपीक - टंकलेखक या पदाचे आकृतीबंधामध्ये एकूण २७० पदे मंजूर असून त्यापदांपैकी सध्या १५१ पदे भरलेली असून ११९ पदे रिक्त आहेत. उपरोक्त शासन तरतुदीनुसार (पद भरतीचे १०% मर्यादेनुसार) एकूण १२ पदे वर्ग क मध्ये अनुकंपा नियुक्तीने भरता येतील.

अनुकंपा उमेदवारांचे नेमणूकीसंदर्भातील संस्थानासाठी लागू करणेत आलेल्या तरतुदीनुसार माहे - ऑगस्ट, २०२० अखेर प्रतिक्षायादीवरील एकूण ६८ अनुकंपा वारसांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केली असून पडताळणीबाबत तपशिल उपरोक्त **परिच्छेद 'ड' तक्ता क्र.१ मध्ये** नमूद केले आहे.

त्यानुसार अनुकंपा उमेदवारांचे मुळ प्रतिक्षायादीतील ६८ वारसांपैकी प्रधान्यक्रमानुसार सोबतचे **परिशिष्ट अ** मधील १२ अनुकंपा उमेदवार गट क चे पदावर नियुक्तीसाठी पात्र ठरतात. त्यांना प्रधान्यक्रमानुसार खालीलप्रमाणे गट क पदावर नियुक्ती देता येईल.

अ.नं.	प्रतिक्षा यादी क्रमांक	अनुकंपा वारसाचे नाव	मयत कर्मचा -याशी नाते	धारण केलेली शैक्षणिक अर्हता	नियुक्तीस पात्र गट	सेवा प्रवेश विनियमात प्रस्तावीत केलेली शैक्षणिक अर्हता.
१	५	श्री. राकेश कैलास गवळी	मुलगा	इ.१० वी., ड्रायव्हींग लायसेन्स व बस बॅच नं.५८०६	गट क (ड्रायव्हर)	१) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उतीर्ण (इ.१०वी) २) वाहन चालविण्याचा परवाना. ३) स्वच्छ अभिलेख इ.
२	२७	श्री. सचिन भाऊसाहेब जाधव	मुलगा	इ.१२ वी पास, ITI Electrician (तारतंत्री प्रमाणपत्र) टायपिंग मराठी ३० व इंग्रजी ३०,४० प्र.श.मि	गट क (तारतंत्री)	१) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उतीर्ण (इ.१०वी) २) शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे तारतंत्री अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. ३) तारतंत्री म्हणून काम करण्याचा परवाना आवश्यक. ४) एमएस – सीआयटी
३.	२९	श्री.स्वप्नील भाऊसाहेब पठारे,	मुलगा	- डिप्लोमा इन सिव्हील इंजिनिअर, (DCE) मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि, इंग्रजी टंकलेखन ३०, ४० श.प्र.मि, एम.एस.सी.-आय.टी	गट क (लिपीक टंकलेखक)	१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक. २) टायपींग मराठी ३० व इंग्रजी ४० ३) एमएस –सीआयटी
४.	३१	श्री. अक्षय मिलींद कराडे,	मुलगा	बी.ई (Computer) एमएस-सीआयटी	गट क (लिपीक टंकलेखक)	१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक. २) टायपींग मराठी ३० व इंग्रजी ४० ३) एमएस –सीआयटी
५.	४८	श्री. शिवाजी आप्पासाहेब गायके	मुलगा	इ. १२ वी. एल.एल.बी.	गट क (लिपीक टंकलेखक)	१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक. २) टायपींग मराठी ३० व इंग्रजी ४० ३) एमएस –सीआयटी
६.	४९	श्री.विजय पोपट राक्षे	मुलगा	एम.ए.बी.एड. कोपा, (कॉम्पूटर ऑपरेटर), एमएससी-आय.टी, टायपींग मराठी ३० प्र.श.प्र.मि., इंग्रजी ४० प्र.श.प्र.मि.	गट क (लिपीक टंकलेखक)	१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक. २) टायपींग मराठी ३० व इंग्रजी ४० ३) एमएस –सीआयटी

पुढील पानावर.... कृ.मा.प.

अ.नं.	प्रतिक्षा यादी क्रमांक	अनुकंपा वारसाचे नाव	मयत कर्मचा -याशी नाते	धारण केलेली शैक्षणिक अर्हता	नियुक्ती स पात्र गट	सेवा प्रवेश विनियमात प्रस्तावीत केलेली शैक्षणिक अर्हता.
७.	५२	श्री.सचिन माधव घारे,	मुलगा	इ.१२ वी. जनरल नर्सिंग, जी.एन.एम	गट क (लिपीक - टंकलेखक)	1) B.Sc Nursing recognized by the Indian Nursing Council OR R.G.N.M. / G.N.M. registered with Maharashtra Nursing Council, 2) MS-CIT
८	५४	श्री. गोविंद सुर्यकांत वाणी,	मुलगा	१२ वी., B.B.A., MBA, एमएससी-आयटी, टायपींग मराठी ३० प्र.श.प्र.मि., इंग्रजी ४० प्र.श.प्र.मि.	गट क (लिपीक टंकलेखक)	१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक. २) टायपींग मराठी ३० व इंग्रजी ४० ३) एमएस –सीआयटी
९	५५	कु. पुजा सुभाष पोतदार,	मुलगी	बी एस्सी, एमएस-सीआयटी, मराठी टायपींग३० व इंग्रजी टायपींग ४० प्रशमि., Financial Accounting (Tally)	गट क (लिपीक टंकलेखक)	१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक. २) टायपींग मराठी ३० व इंग्रजी ४० ३) एमएस –सीआयटी
१०	६०	श्री. संदिप अशोक बनकर,	मुलगा	एम-एससी, (कॉम्प्युटर सायन्स), एमएस-सीआयटी, टायपिंग मराठी ३० व इंग्लिश ४० प्र.श.मी.	गट क (लिपीक टंकलेखक)	१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक. २) टायपींग मराठी ३० व इंग्रजी ४० ३) एमएस –सीआयटी
११	६७	श्रीमती वर्षा मिलींद पवार,	पत्नी	बी.ए.पास, टायपींग मराठी ३०, इंग्रजी ४०	गट क (लिपीक टंकलेखक)	१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक. २) टायपींग मराठी ३० व इंग्रजी ४० ३) एमएस –सीआयटी
१२	६८	श्री. सचिन संजय कुंभार,	मुलगा	एम एसस्सी (Chemistry) Set Exam. Qualified	गट क (लिपीक टंकलेखक)	१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक. २) टायपींग मराठी ३० व इंग्रजी ४० ३) एमएस –सीआयटी

उपरोक्त अनुकंपा वारसांच्या बाबतीत खालीलप्रमाणे निर्णय होणे आवश्यक आहे.

i) जे अनुकंपा वारसदार लिपीक - टंकलेखक या पदावर नियुक्तीसाठी पात्र होत आहे. अशा अनुकंपा वारसांकडे पदवीधर व्यतिरिक्त आवश्यक असलेली इतर शैक्षणिक पात्रता उदा. टायपिंग मराठी ३० व इंग्रजी ४०प्र. श.मि. तसेच एमएस - सीआयटी इ. शैक्षणिक पात्रता नसल्यास शासन तरतुदीनुसार विशिष्ट कालावधीमध्ये सदर शैक्षणिक पात्रता पूर्ण करणेचे अटीवर संबंधितांना गट क (लिपीक – टंकलेखक) चे पदावर नियुक्ती देता येईल.

ii) प्रतिक्षायादी क्र.२७ चे अनुकंपा वारसदार तारतंत्री या वर्ग ३ चे पदावर नियुक्तीस पात्र होत असून, इतर अनुषंगीक पात्रता पुर्ण करुन घेऊन संबंधीतास वर्ग क चे (तारतंत्री) चे पदावर सेवेत सामावून घेता येईल.

iii) तसेच प्रतिक्षायादी क्र. ५२ चे वारसाबाबत सेवा प्रवेश विनियमात B.Sc Nursing RGNM / GNM, With Registration Indian Nursing Council / Maharashtra Nursing Council, MS-CIT याप्रमाणे शैक्षणिक अर्हता प्रस्तावीत करणेत आलेली आहे. प्रत्येक्षात उमेदवाराने इ.१२ वी. जनरल नर्सिंग, (जी.एन.एम) ही शैक्षणिक अर्हता धारण केलेली आहे.

परंतु, संस्थानचे सेवाप्रवेश नियमात **स्टाफ नर्स** हे पद **गट 'ब'** संवर्गातील असून, अनुकंपा नियुक्तीच्या धोरणानुसार अनुकंपा उमेदवारांना **गट क व गट ड** चे पदावर सेवेत सामावून घेणेबाबत तरतुद आहे. त्यानुसार संबंधित अनुकंपा वारसाने धारण केलेली शैक्षणिक अर्हता व अनुकंपा नियुक्तीच्या उपलब्ध तरतुदी यानुसार संबंधीत अनुकंपा वारसास **गट क चे लिपीक - टंकलेखक** या पदावर सेवेत सामावून घेता येईल. त्यासाठी इतर शैक्षणिक अर्हता संबंधीत वारसाकडून अनुकंपा नियुक्तीच्या धोरणानुसार विहीत केलेल्या २ वर्ष मुदतीच्या कालावधीत पूर्ण करुन घेता येईल, असे मत आहे.

पुढील पानावर.... कृ.मा.प.

२. महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सासंवि-१०१९/८१३/प्र.क्र.१५३/का.१६ दि.२७ ऑगस्ट, २०२० अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी विहित केलेल्या अटी- शर्तींनुसार अनुकंपा नियुक्तीबाबतचे सर्व अटी- शर्ती पूर्ण करीत असलेल्या अनुकंपा उमेदवारांना **गट "ड"** मध्ये प्रती वर्षी रिक्त होणा-या पदांच्या १० टक्के पदे ही अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावीत, अशी तरतुद आहे.

गट ड चे पदापैकी सफाई कामगार, सुरक्षा रक्षक, वॉर्डबॉय, आया, शिपाई / मदतनिस या पदांचे आकृतीबंधामध्ये एकूण १२३२ पदे मंजूर असून माहे- ऑगस्ट, २०२० पर्यंत १०७६ पदे भरलेली असून १५६ पदे रिक्त आहेत. उपरोक्त शासन तरतुदीनुसार (पद भरतीचे १०% चे मर्यादेनुसार) एकूण १६ पदे गट ड मध्ये अनुकंपा नियुक्तीने भरता येतील.

त्यानुसार अनुकंपा उमेदवारांचे मुळ प्रतिक्षायादीतील प्रधान्यक्रमानुसार सोबतचे **परिशिष्ट अ मधील ०३, परिशिष्ट क** मधील ०५ व **परिशिष्ट ड मधील ०८ असे एकूण १६** अनुकंपा वारसांना खालीलप्रमाणे गट ड चे पदावर नियुक्ती देता येईल.

अ.नं.	प्रतिक्षा यादीतील क्रमांक	अनुकंपा वारसाचे नाव	मयत कर्मचा-याशी नाते	धारण केलेली शैक्षणिक अर्हता	नियुक्तीस पात्र गट
१	१	श्री.अंकुश चांगदेव बारहाते	मुलगा	इ.०८ वी पास.	गट ड
२	२	श्रीमती लता श्रीरंग गव्हाळे	पत्नी	इ.०३ री पास	गट ड
३	४	श्री ज्ञानेश्वर बाळू (भाऊसाहेब) मोकळ,	मुलगा	इ.०६ वी पास	गट ड
४	६	श्री विठ्ठल बाळासाहेब कोते	मुलगा	इ.९ वी.	गट ड
५	७	श्री गौरव भाऊसाहेब सुरसे	मुलगा	इ.०८ वी पास.	गट ड
६	८	श्री.साईअमृत बाळासाहेब डांगे	मुलगा	इ.९ वी पास.	गट ड
७	१०	श्रीमती रंजना मोहन देशपांडे	पत्नी	इ.०५ वी पास	गट ड
८	११	श्रीमती सुनिता रतन सोळसे	पत्नी	इ.०२ री पास	गट ड
९	१३	श्रीमती कविता शशिकांत कोरडे,	पत्नी	इ.०७ वी.पास	गट ड
१०	१५	श्री मंगेश रामदास पाटणकर,	मुलगा	इ.११ वी पास	गट ड
११	१७	श्री दिपक दत्तात्रय सोमवंशी,	मुलगा	इं.०८ वी पास.	गट ड
१२	१९	श्रीमती मंगल कानिफनाथ पवार,	पत्नी	इ.०१ली	गट ड
१३	२१	श्री आनंद शरद ताकवाले,	मुलगा	इ.१२ वी	गट ड
१४	२२	श्री प्रविण भगवान पाईक,	मुलगा	इ.०७ वी पास	गट ड
१५	२३	कु.सरला बाळगीर गोसावी,	मुलगी	१२ वी पास	गट ड
१६	२८	श्री. किरण प्रकाश कोते	मुलगा	इ.५ वी पास	गट ड

उपरोक्त पैकी प्रतिक्षायादी क्र.१५, २१ व २३ हे अनुकंपा उमेदवार वर्ग ड चे पदावर नियुक्ती बाबतच्या अटी शर्ती पूर्ण करीत आहे.

प्रतिक्षायादी क्र.२, १०,११,१३ व १९ हे अनुकंपा उमेदवार दिवंगत कर्मचा-यांची पत्नी असून, अनुकंपा नियुक्ती संदर्भातील अट क्र. १२ (इ) नुसार दिवंगत संस्थान कर्मचा-याची पत्नी शैक्षणिक पात्रतेव्यतिरिक्त इतर अटी पूर्ण करीत असल्यास तिच्या बाबतीत गट ड मध्ये नेमणूकीसाठी शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करण्याचे अधिकार संबंधित नियुक्ती प्राधिका-याला आहे. त्यानुसार त्यांना शैक्षणिक अर्हतेत सुट द्यावी लागेल.

तसेच, प्रतिक्षायादी क्र. १, ४, ६, ७, ८, १७, २२, २८ या अनुकंपा उमेदवारांच्या बाबतीत **महाराष्ट्र शासनाचे गट 'ड' पदांचे सेवाप्रवेश (सुधारणा) नियम २०१८ दि.०६ जानेवारी, २०१८** रोजी प्रसिध्द करणेत आलेल्या ३ 'ग' मधील (एक) नुसार प्राथमिक शाळेमधून **चौथ्या इयत्तेची** परिक्षा उत्तीर्ण असल्याची शैक्षणिक अर्हता लागू राहील अशी तरतुद आहे. सदरहू उमेदवारांना त्यानुसार शैक्षणिक अर्हतेमध्ये शिथिलता दिल्यास **गट ड** चे पदावर नियुक्ती देता येईल.

३) महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सासंवि-१०१९/८१३/प्र.क्र.१५३/का.१६ दि.२७ ऑगस्ट, २०२० अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी विहित केलेल्या अटी- शर्ती क्र. १९ नुसार मागासवर्गीयांचा अनुशेष (बिंदु नामावली इत्यादी) बाबत अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देतांना करावयाच्या कार्यवाहीबाबतः सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि.२१ सप्टेंबर,२०१७ व त्यानंतर यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे संस्थानने कार्यवाही करावी, असे नमूद केलेले आहे.

मात्र, सध्या संस्थानासाठी सेवाप्रवेश नियम आकृतीबंधाची कार्यवाही चालू आहे. ती पूर्ण झाल्यानंतर बिंदु नामावली निश्चीत करतांना या नियुक्तीमधील बिंदुचा विचार करुन बिंदुनामावली निश्चीत करण्यात येईल.

पुढील पानावर.... कृ.मा.प.

तसेच, उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने विवेचन असे की, यापूर्वी वेळोवेळी त्या - त्या वेळेस कार्यरत असणारे तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळ / मा. व्यवस्थापन समिती यांचे मान्यतेने... अनकंपा तत्त्वावर नेमणूक देतांना कुठल्याही प्रकारच्या अटी-शर्ती लागू न करतां, नैसर्गिक न्याय तत्वावर व मानवतेच्या दृष्टीकोनातुन अनुकंपा वारसांना नेमणूका देणेत आलेल्या आहेत.

तरी, उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने खालील बाबींवर प्रामुख्याने निर्णय होणे गरजेचे आहे.

१. अनुकंपा नियुक्तीच्या धोरणानुसार व शासनाचे अनुकंपा नियुक्ती संदर्भात सध्या उपलब्ध असलेल्या तरतुदीनुसार शासनाचे पद भरतीचे १०% चे मर्यादेनुसार सन २००९ ते माहे ऑगस्ट, २०२० अखेर पर्यंत रिक्त असलेल्या एकूण पदाचे १०% पदे अनुकंपा नियुक्तीने भरणेकामी उपरोक्त परिच्छेद ड मध्ये तक्ता क्र.१ मध्ये नमूद केलेप्रमाणे अ.नं.१ ते ५ पैकी आवश्यक तेथे शिथिलता देऊन गट क व गट ड चे पदावर नियुक्तीसाठी पात्र होत असलेल्या अनुकंपा वारसांना प्रतिक्षायादीतील प्रथम प्राधान्यक्रमानुसार अनुकंपा नियुक्ती देणेस मान्यता असावी.

२. अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र वारसाकडून इतर अनुषंगीक शैक्षणिक पात्रता उदा. टायपिंग मराठी ३० व इंग्रजी ४०प्र. श.मि. तसेंच एमएस - सीआयटी इ. शैक्षणिक पात्रता नसल्यास अनुकंपा नियुक्तीच्या धोरणानुसार २ वर्षाच्या कालावधीमध्ये सदर शैक्षणिक पात्रता पूर्ण करणेचे अटीवर संबंधितांना गट क व गट ड चे पदावर नियुक्ती देणेस मान्यता असावी.

१४	४४	श्री. हेमंत भानुदास शिरसाठ मु.पो. राहाता	मुलगा	इ.७ वी, ड्रायव्हींग लायसेन्स व बस बॅच क्र. B006613 319	वर्ग ड	सेवाप्रवेश नियमात प्रस्तावीत केलेप्रमाणे शैक्षणिक पात्रता नाही. तथापी, गट ड चे पदावर नियुक्तीसाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील दि.०६ जानेवारी, २०१८ चे शासन राजपत्रात प्रसिध्द करणेत आलेल्या अधिसूचना खंड (ग) (एक) नुसार सेवाप्रवेश नियम शासन राजपत्रात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापुर्वी अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठीच्या प्रतिक्षायादीतील अंतर्भूत असलेल्या उमेदवारांसाठी, प्राथमिक शाळेमधून चौथ्या इयत्तेची परिक्षा उत्तीर्ण असल्याची शैक्षणिक अर्हता लागू राहील अशी तरतुद असुन, त्यानुसार कार्यवाही करता येईल.
१५	४७	श्री.चंद्रकांत रामभाऊ खरात, मु.पो.शिर्डी ता.राहाता.	मुलगा	इ.०४ थी पास	वर्ग ड	सेवाप्रवेश नियमात प्रस्तावीत केलेप्रमाणे शैक्षणिक पात्रता नाही. तथापी, गट ड चे पदावर नियुक्तीसाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील दि.०६ जानेवारी, २०१८ चे शासन राजपत्रात प्रसिध्द करणेत आलेल्या अधिसूचना खंड (ग) (एक) नुसार सेवाप्रवेश नियम शासन राजपत्रात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापुर्वी अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठीच्या प्रतिक्षायादीतील अंतर्भूत असलेल्या उमेदवारांसाठी, प्राथमिक शाळेमधून चौथ्या इयत्तेची परिक्षा उत्तीर्ण असल्याची शैक्षणिक अर्हता लागू राहील अशी तरतुद असुन, त्यानुसार कार्यवाही करता येईल.
१६	५८	श्री. सुरेश लक्ष्मण पवार, मु.पो. शिर्डी ता. राहाता, जि. अहमदनगर	मुलगा	इ.०७ वी.	वर्ग ड	सेवाप्रवेश नियमात प्रस्तावीत केलेप्रमाणे शैक्षणिक पात्रता नाही. तथापी, गट ड चे पदावर नियुक्तीसाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील दि.०६ जानेवारी, २०१८ चे शासन राजपत्रात प्रसिध्द करणेत आलेल्या अधिसूचना खंड (ग) (एक) नुसार सेवाप्रवेश नियम शासन राजपत्रात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापुर्वी अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठीच्या प्रतिक्षायादीतील अंतर्भूत असलेल्या उमेदवारांसाठी, प्राथमिक शाळेमधून चौथ्या इयत्तेची परिक्षा उत्तीर्ण असल्याची शैक्षणिक अर्हता लागू राहील अशी तरतुद असुन, त्यानुसार कार्यवाही करता येईल.
१७	६५	श्री. शाहरुक हमिद शेख, पो. शिर्डी ता. राहाता, जि. अ. नगर	मुलगा	इ. ९ वी.	वर्ग ड	सेवाप्रवेश नियमात प्रस्तावीत केलेप्रमाणे शैक्षणिक पात्रता नाही. तथापी, गट ड चे पदावर नियुक्तीसाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील दि.०६ जानेवारी, २०१८ चे शासन राजपत्रात प्रसिध्द करणेत आलेल्या अधिसूचना खंड (ग) (एक) नुसार सेवाप्रवेश नियम शासन राजपत्रात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापुर्वी अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठीच्या प्रतिक्षायादीतील अंतर्भूत असलेल्या उमेदवारांसाठी, प्राथमिक शाळेमधून चौथ्या इयत्तेची परिक्षा उतृतीर्ण असल्याची शैक्षणिक अर्हता लागू राहील अशी तरतुद असुन, त्यानुसार कार्यवाही करता येईल.

परिशिष्ट 'इ'

मा. शासनाने मान्यता दिलेल्या अनुकंपा नियमावलीतील अट क्र.०६ नुसार दि.३१/१२/२००१ नंतर तिसरे अपत्य झालेल्या कर्मचा-यांच्या कुटूंबियास अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीसाठी पात्र समजले जाणार नाही, अशी अट आहे.

त्यानुसार प्रतिक्षायादीवरील उमेदवारांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.नं.	प्रतिक्षा यादीतील क्रमांक	अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी अर्ज केलेल्या वारसाचे नाव व पत्ता.	नाते	नियुक्तीस पात्र गट	शेरा
१	१२	श्रीमती रेहाना अजिज शेख, आंबेडकर नगर, वार्ड क्र.०९ मु.पो. शिर्डी ता.राहाता. जि.अहमदनगर	पत्नी	अपात्र	शासन निर्णय अट क्र.०६ नुसार दि.३१/१२/२००१ नंतर मयतास तिसरे अपत्य आहे.
२	१४	श्री.आशु अजय पंजाबी, मु.पो.शिर्डी, ता.राहाता,जि.अहमदनगर	मुलगा	अपात्र	शासन निर्णय अट क्र.०६ नुसार दि.३१/१२/२००१ नंतर तिसरे अपत्य आहे.
३	२६	श्रीमती भाग्यश्री अजय पांडे, मु.पो.पुणतांबा, ता.राहाता,जि.अहमदनगर	पत्नी	अपात्र	शासन निर्णय अट क्र.०६ नुसार दि.३१/१२/२००१ नंतर तिसरे अपत्य आहे.
४	३२	श्रीमती सुमित्रा शंकर व-हे, मु.पो.कोकमठाण, ता.कोपरगाव,जि.अहमदनगर.	पत्नी	अपात्र	शासन निर्णय अट क्र.०६ नुसार दि.३१/१२/२००१ नंतर तिसरे अपत्य आहे.
५	५०	श्री.संभाजी शिवाजी दुशिंग, मु.पो.शिंगवे ता.राहाता	मुलगा	अपात्र	शासन निर्णय अट क्र.०६ नुसार दि.३१/१२/२००१ नंतरचे तिसरे अपत्य आहे.
६	५१	श्रीमती सुनिता बाबासाहेब थेटे, मु.पो.कनकुरी ता.राहाता	पत्नी	अपात्र	शासन निर्णय अट क्र.०६ नुसार दि.३१/१२/२००१ नंतरचे तिसरे अपत्य आहे.
७	५३	श्रीमती संगिता भिमराज आरणे, मु.पो. रुई, ता. राहाता, जि. अहमदनगर.	पत्नी	अपात्र	शासन निर्णय अट क्र.०६ नुसार मयतास दि.३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य आहे.
८	५९	श्रीमती मंदा बाळासाहेब आरणे मु.पो.ता. राहाता जि. अहमदनगर	पत्नी	अपात्र	शासन निर्णय अट क्र.०६ नुसार दि.३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य.
९	६१	श्रीमती सविता पोपट गोसावी, मु.पो.वाळकी, ता. राहाता, जि.अ.नगर	पत्नी	अपात्र	शासन निर्णय अट क्र.६ नुसार दि.३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य आहे.

परिशिष्ट 'ई'

अनुकंपा नियुक्तीसाठी वयोमर्यादा:- किमान वयोमर्यादा - १८ वर्ष व कमाल वयोमर्यादा - वयाच्या ४५ वर्षापर्यंतच्याच उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय असेल तसेच प्रतिक्षासूचीतील उमेदवारांना वयाच्या ४५ वर्षापर्यंत नियुक्ती न मिळाल्यास त्यांची नावे वयाची ४५ वर्ष पूर्ण होताच आवश्यक ती नोंद घेऊन प्रतिक्षासूचीतून काढन टाकण्यात यावीत अशी अट आहे.

त्यानुसार प्रतिक्षासुचीवरील उमेदवारांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. नं.	प्रतिक्षा यादीतील क्रमांक	अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी अर्ज केलेल्या वारसाचे नाव व पत्ता.	नाते	सध्याचे वय (दि.३१/०८/२०२० अखेर)	नियुक्तीस पात्र गट	शेरा
१	३	श्री सुभाष संपत ससाणे, मु.पो.शिर्डी ता.राहाता. जि.अहमदनगर	मुलगा	४६ वर्षे ८ महिने	अपात्र	शासन निर्णय अट क्र.११ नुसार कमाल वय ४५ वर्षापेक्षा जास्त आहे.
२	९	श्रीमती मंगल कृष्णदास चौकटे, मु.पो.शिर्डी, ता.राहाता. जि.अहमदनगर	पत्नी	५७ वर्षे १ महिना	अपात्र	शासन निर्णय अट क्र.११ नुसार कमाल वय ४५ वर्षापेक्षा जास्त आहे.
३	१६	श्रीमती निर्मला सुभाष सोनवणे, माऊलीनगर, शिर्डी ता.राहाता. जि.अहमदनगर	पत्नी	४८ वर्षे १ महिना	अपात्र	शासन निर्णय अट क्र.११ नुसार कमाल वय ४५ वर्षापेक्षा जास्त आहे.
४	१८	श्रीमती मनिषा कैलास शेज्वळ, भिमनगर,मु.पो.शिर्डी ता.राहाता.जि.अहदमनगर	पत्नी	४५ वर्षे १ महिना	अपात्र	शासन निर्णय अट क्र.११ नुसार कमाल वय ४५ वर्षापेक्षा जास्त आहे.
५	२०	श्रीमती शिला बबन कहांडळ, मु.पो.शिर्डी, ता.राहाता.जि.अहमदनगर	पत्नी	५० वर्षे ६ महिने	अपात्र	शासन निर्णय अट क्र.११ नुसार कमाल वय ४५ वर्षापेक्षा जास्त आहे.
६	२४	श्री दिपक सुर्यभान नेहे, मु.पो.निमगांव ता.राहाता.जि.अहमदनगर	पती	४७ वर्षे	अपात्र	शासन निर्णय अट क्र.११ नुसार कमाल वय ४५ वर्षापेक्षा जास्त आहे.
७	२५	श्रीमती सुजाता संजय तांबे, मु.पो.चिंचपुर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर.	पत्नी	५० वर्षे ६ महिने	अपात्र	शासन निर्णय अट क्र.११ नुसार कमाल वय ४५ वर्षापेक्षा जास्त आहे.
८	५६	श्री.मोहन चोखाजी कोळे, मु.नांदुर्खी बु. ता. राहाता	मुलगा	४५ वर्षे १ महिना	अपात्र	शासन निर्णय अट क्र.११ नुसार कमाल वय ४५ वर्षापेक्षा जास्त आहे.
९	६४	श्री. किशोर सोपानराव डांगे मु. पो. दहिगांव (को.) ता. राहाता, जि. अहमदनगर.	भाऊ	४५ वर्षे १ महिना	अपात्र	शासन निर्णय अट क्र.११ नुसार कमाल वय ४५ वर्षापेक्षा जास्त आहे.

LAB - Meeting - २२५ - २०२१

विषय क्र.- 9४

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर
(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

विषय :- श्री.किशोर साहेबराव गवळी, प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग यांचे खातेचौकशीचे दि.०७.०५.२०२१ रोजीचे अपील अर्जाबाबत...

टिपणी

अ) विषयाची पुर्वपिठीका -

श्री.गवळी हे सीसीटीव्ही विभागाचे प्र. सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

१) श्री.गवळी यांनी सीसीटीव्ही विभागामार्फत कॅमेरा केबल व पॉवर केबल पुरवठा करणेबाबत दरपत्रके मागविणेत आलेली होती. त्यामध्ये न्यूनतम दरधारकांस पुरवठा आदेश देणे आवश्यक होते. परंतु सदर पुरवठाधारकाने नमूद मालाच्या पुरवठा करणेस असमर्थता दर्शविली. या संदर्भात दरपत्रकात नमूद न्यूनतम दरधारक जर पुरवठा करण्यास तयार नसल्यास खरेदी नियमावली प्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित होते परंतु त्यांनी तशी कार्यवाही केली नाही. वास्तविक पाहाता खरेदी नियमावली कलम ४.४.४.१ मधील मार्गदर्शक सुचनेमध्ये L1 व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्ती बरोबर वाटाघाटी करु नये असे स्पष्ट केलेले असतांना सुध्दा त्यांनी वरिष्ठांकडे सादर केलेल्या टिपणीत L2 निविदाधारक हे L1 चे दरामध्ये पुरवठा करणेस तयार असून त्यांना पुरवठा आदेश देता येईल असे नमुद केलेले आहे. वास्तविक,खरेदीची नियमावलीनुसार पुन्हा दरपत्रके मागविणे आवश्यक होते. परंतु श्री.गवळी यांनी नियमांचा भंग करुन, वरिष्ठांची दिशाभूल करुन, टिपणी सादर करुन मंजुरी घेण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट होते.

२) दि.३१.१२.२०२० व दि.०१.०१.२०२१ चे रात्रौ दर्शन रांग चालु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यास अनुसरुन दर्शन रांग व हॉल्स साफ सफाई करण्यासाठी दर्शन रांग बंद करण्यात आली होती. तथापी, दि.३१.१२.२०२० च्या रात्री गतवर्षीचा अनुभव पाहता काही निवडक भक्तगण हटवादी भूमिका घेवुन हॉलमध्येच थांबत असतांत. ही बाब विचारात घेवून अशा हटवादी भक्तगणांकडून अरेरावी करत असल्याच्या पार्श्वभूमिवर एकुण १० कॅमेरे लावुन जर असे काही प्रसंग घडले तर त्याचे सीसी फुटेज पाहून आक्षेपार्ह बाबी असल्यास त्याच्याबाबत पोलीसात तात्काळ फिर्याद दाखल करण्याबाबत निर्देश दिले होते. सदर रात्री संस्थानचे अधिकारी व काही निवडक गांवकरी यांनी अनाधिकाराने मंदिर प्रक्षेत्रात प्रवेश करुन दर्शन रांगेत घुसून श्रींचे दर्शनाकरीता जाणेवरुन वाद-विवाद झाला. सदरचे सीसीटीव्ही फुटेज पाहून आक्षेपार्ह सीसीटीव्ही फुटेज इ-मेलने तात्काळ शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांचेकडे देणेबाबत वरिष्ठांनी सुचना दिलेली असतांना श्री.गवळी यांनी ही कार्यवाही केलेली नाही. याबाबत श्री.रविंद्र ठाकरे,उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पाठपुरावा केल्यानंतरच सदरचे फुटेज दि.०१.०१.२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेनंतर शिर्डी पोलीस स्टेशनला उशिराने पाठविलेले आहे.वास्तविक, त्यांनी याबाबत स्वत:हून कार्यवाही करणे अपेक्षित असतांना श्री.गवळी यांनी नेमुन दिलेल्या कामात जाणीवपूर्वक टाळाटाळ केलेली असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

वरिल मुद्दयावरुन असे स्पष्ट होते की, श्री.गवळी यांनी त्यांचे कामात अक्षम्य दुर्लक्ष व दिरंगाई केलेली आहे व कामात कर्तव्यपरायणता ठेवलेली नाही. ही बाब अतिशय गंभीर आहे.

उपरोक्त नमुद केलेल्या बाबींबाबत / कारणास्तव त्यांनी त्यांचा लेखी खुलासा जा.नं.एसएसएस /साप्रशा/वशी-शिस्त/१८५८/२०२१ दि.०२-०१-२०२१ अन्वये ही नोटीस मिळालेपासुन ०२ दिवसांचे आंत त्यांचे विभागाचे प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत थेट मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडेस सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास एकतर्फी निर्णय घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी. अशा आशयाची नोटीस त्यांना दिली होती.

उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांनी जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१८५८/२०२१ दि.०२-०१-२०२१ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आलेला होता. त्यास अनुसरुन त्यांनी दि.०४.०१.२०२१ रोजीचा लेखी खुलासा प्रशासकिय अधिकारी, सीसीटीव्ही कंट्रोल सेल यांचेमार्फत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेकडे सादर केलेला आहे. सदरचे खुलाशावर, प्र.अ.सादर करावे, असे वरिष्ठांनी निर्देश दिलेले होते.

दि.२४.०३.२०२१ रोजीचे शिस्त-भंग/शास्ती उप समिती सभेत वरील गैरशिस्तवर्तनबाबत निर्णया करीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

पान नंबर ०२ वर...

दि.२४.०३.२०२१ रोजीचे शिस्त–भंग/शास्ती उप समिती सभेतील निर्णयानुसार ," खुलासा नोटीसीच्या मुद्दयास अनुसरुन नाही. खुलासा अमान्य करणेत येत आहे. सदर गैरशिस्तवर्तनाबाबत विभागीय चौकशी करणेत यावी." असा निर्णय समंत झालेला आहे.

दि.२४.०३.२०२१ रोजीचे शिस्त–भंग/शास्ती उप समिती सभेतील निर्णयानुसार,विभागीय चौकशी प्रस्तावीत करणेत येत आहे.

श्री.गवळी यांना यापुर्वी गैरशिस्तवर्तनाबाबत करणेत आलेल्या शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.नं.	आज अखेरपर्यंत दिलेल्या शिक्षा	किती वेळा
०१	समज	५
०२	ताकीद	१
०३	श्रींच्या ०५ दिवस चारही आरत्या करणे.	१
	एकुण झालेल्या शिक्षेची संख्या	०७

श्री.गवळी यांचे सेवेचा पुर्व इतिहास पहाता त्यांना गैरशिस्तवर्तनाबाबत एकुण ०७ वेळा शिक्षा करणेत आलेल्या आहेत. तरी देखील त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याचे निदर्शनास येत आहे.

श्री.किशोर साहेबराव गवळी, प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग यांनी केलेल्या गैरशिस्तवर्तनाचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

अ.नं.	गैरशिस्त वर्तनाचा तपशिल	श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३
०१.	प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानच्या कर्मचा-यांचे कर्तव्य :- (१) संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :- (i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल . (ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ; (iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.	कलम ३ (१)
०२.	पर्यवेक्षी पद धारण करणारे संस्थानाचा प्रत्येक कर्मचारी तात्पुरते त्याचे नियंत्रणाखाली आणि प्राधीकाराखाली असलेल्या संस्थानच्या सर्व कर्मचा-यांचा प्रामाणीकपणा आणि सेवेशी एकनिष्ठता कायम राहिल याची काळजी घेण्यासाठी शक्य त्या सर्व उपाय योजना अमलात आणेल.	कलम ३ (२)

त्यास अनसुरुन श्री.गवळी यांनी उपरोक्तप्रमाणे, प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानाच्या कर्मचा-यांचे कर्तव्य तसेच संस्थान कर्मचा-यांला साजेसे नसणारे कृत्य न करणे व पर्यवेक्षी पद धारण करणारे संस्थानाचा प्रत्येक कर्मचारी तात्पुरते त्यांचे नियंत्रणाखाली आणि प्राधीकाराखाली असलेल्या संस्थानाच्या सर्व कर्मचा-यांचा प्रामाणिकपणा आणि सेवेशी एकनिष्ठता कायम राहिल याची काळजी घेण्यासाठी शक्य त्या सर्व उपाय योजना अमलात आणेल इत्यांदींचे उल्लंघन केलेले आहे.

उपरोक्त आरोपांबाबत त्यांचे विरुद्ध कडक कारवाई का करणेत येऊ नये ? याबाबतचे लेखी निवेदन तसेच त्यांना बचावासाठी काही लेखी अगर तोंडी पुरावे सादर करावयाचे असल्यास साक्षीदारांची व पुराव्यांची यादी या प्रकरणांचे खाते चौकशीकामी नेमलेले खाते चौकशी अधिकारी श्री.पा.म.ताकटे, नाशिक यांचेकडे हे दोषारोप पत्र त्यांना मिळालेपासून सात दिवसांचे आत सादर करावे. अन्यथा त्यांचेवर ठेवलेले दोषारोप त्यांना मान्य आहेत असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. त्यांना बचावासाठी काही कागदपत्रे पहावयाची असल्यास अगर माहिती पाहीजे असल्यास खातेचौकशी अधिकारी यांचेकडे वेळीच लेखी मागणी केल्यास उपलब्ध होतील.

उपरोक्त दोषारोप ज्या घटनांवर आधारीत आहेत त्या घटनांचे तपशिल दर्शविणारे घटना पत्रक, शाबीत करावयाच्या कागदपत्रांची यादी, साक्षीदारांची यादी (परिशिष्ट अ,ब,क), तसेच संबंधीत कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती या सोबत जोडल्या आहेत.

पान नंबर ३ वर...

आपण या चौकशीत आपला बचाव संस्थानच्या दुस-या कर्मचा-याची किंवा शासकिय सेवकाची किंवा संस्थानच्या सेवानिवृत्त कर्मचारी यांचेमार्फत करु शकता. आपणांस खाते चौकशीमध्ये नैसर्गिक न्यायतत्वानुसार व नियमानुसार सर्व प्रकारे बचावाची संधी दिली जाईल. आपण खातेचौकशीस हजर राहीला नाही तर आपले अपरोक्ष चौकशी पुर्ण केली जाईल व त्यानंतर आपली कोणतीही तक्रार व सबब ऐकून घेतली जाणार नाही.

चौकशीकामी चौकशी अधिकारी आपणांस कळवतील त्या तारखेस त्या ठिकाणी व वेळेत आपण साक्षी पुराव्यांसह उपस्थित रहावे.

ब) खातेचौकशी अभिकथनपत्र, खातेचौकशी आदेश

श्री.गवळी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ कलम ३ (१) (२)चे उल्लंघन केले असलेबाबत, जा.नं.एसएसएस /साप्रशा/वशी-शिस्त/८७/२०२१ दि.१०-०४-२०२१ अन्वये अभिकथनपत्र देण्यात आलेले होते. श्री.पा.म.ताकटे, खातेचौकशी अधिकारी, नाशिक यांची जा.नं.एसएसएस /साप्रशा/वशी-शिस्त/८६/२०२१ दि.१०-०४-२०२१ या आदेशानुसार याकामी खातेचौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

श्री.ताकटे यांनी श्री.गवळी यांची दि.०४.०६.२०२१ रोजी प्राथमिक सुनावणी घेतलेली आहे.दि.०४.०६.२०२१ रोजी खातेचौकशीकामी कागदपत्रांची मागणी केलेली आहे. दि.१८.०६.२०२१ रोजी खातेचौकशी करणेत आलेली आहे. पुढील खातेचौकशीची तारीख **दि.०२.०७.२०२१** रोजी नेमण्यात आलेली आहे.

खातेचौकशीमध्ये श्री.गवळी यांना त्यांची बाजू मांडण्याची व त्यांचा बचाव करण्याची पूर्णपणे संधी देण्यात येत आहे, त्यांनी खातेचौकशीचे कामकाजामध्ये प्रत्यक्ष सहभाग घेतलेला असल्याने, सदरची खातेचौकशी पूर्णत: नैसर्गिक न्यायतत्वानुसार त्यांचे समोर करणेत येत आहे.

(क) मा.अध्यक्ष महोदय, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे श्री.गवळी यांनी उपरोक्तप्रमाणे खातेचौकशीकामी देण्यात आलेले अभिकथनपत्र/दोषारोप पत्र रद्द करणेबाबतचा दि.०७.०५.२०२१ रोजीचा अपील अर्ज.

मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे श्री.गवळी यांनी उपरोक्त शिक्षा रद्द करणेबाबतचा दि.०७.०५.२०२१ रोजीचा अपील अर्ज सादर केलेला आहे.

त्यात त्यांनी," विधाने व मजकुर यांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून यापूर्वी जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१८५८/२०२१, दि.०२/०१/२०२१ या कारणे दाखवा नोटीसला मी दिलेला दि.०४/०१/२०२१ रोजीचा खुलासा या अपिलाचा भाग म्हणून वाचणेत यावा, ही नम्र विनंती. त्याची प्रत आपले अवलोकनार्थ सोबत सादर करत आहे. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.५ (पान क्र.१३ ते १४)*

१) <u>कार्यकक्षा</u> – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनीयम २०१३ मधील नियम क्र.१४ नुसार मी सदरचे अपिल करत आहे. या नियमात अशी तरतुद आहे की, तात्पुरत्या लागू असलेल्या कायद्यातील तरतुदीच्या अधिन राहून संस्थान कर्मचारी, त्यामध्ये सेवा समाप्तीच्या लगेच अगोदर कोणत्याही वर्गात असलेल्या व्यक्तीचा समावेश होतो, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशाविरुद्ध समितीकडे अपिल दाखल करु शकतो.

(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.६ (पान क्र.४३)

<u>अपिलाची कालावधी मर्यादा</u> – सेवा विनियम २०१३ मधील नियम क्र.१५ मध्ये अशी तरतुद आहे की, कोणतेही अपिल अपिलदाराला ज्या आदेशाविरुद्ध अपिल दाखल करावयाचे आहे, त्या आदेशाची प्रत प्राप्त झालेपासून तीस दिवसांचे आत दाखल केले पाहिजे अन्यथा अपिल स्वीकारले जाणार नाही. मला संदर्भिय आदेशाची प्रत दि.१०/०४/२०२१ रोजी सायं.१५.४५ वा.प्राप्त झालेली आहे. त्यामुळे सदरचे अपिल मुदतीत आहे. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.६ (पान क्र.४३)*

२) <u>अपिलाची कारणे</u> –

१) मा.प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी माझ्या दि.०४/०१/२०२१ रोजीच्या खुलाशाचा मन:पूर्वक विचार केलेला नाही. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.५ (पान क्र.१३ ते १४)*

२) मी माझ्या दि.०४/०१/२०२१ रोजीच्या खुलाशात उपस्थित केलेले मुद्दे विचारात न घेता मा.प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी संदर्भीय आदेश पारीत केलेला आहे.

३) दि.०२/०१/२०२१ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसमध्ये असे नमुद आहे की, " सदर रात्री संस्थानचे अधिकारी व काही निवडक गावकरी यांनी अनाधिकाराने मंदिर प्रक्षेत्रात प्रवेश करुन दर्शन रांगेत घुसून श्रीं चे दर्शनाकरीता जाणेवरुन वाद विवाद झाला " महोदय, मी नम्रपणे आपल्या निदर्शनास आणुन देऊ इच्छितो की, सदरच्या संस्थान अधिका-यांवर प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिस्तभंग कारवाई किंवा कोणतीही कारवाई केलेली नाही. यावरुन प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा सापत्नतेचा भाव दिसून येतो.

पान नंबर ४ वर...

४)

४) खातेचौकशी काळात शिस्तभंग कारवाई खाली असलेल्या कर्मचा-यास आर्थिक, मानसिक, कौटुंबिक व सामाजिक आणि इतर हानीला तोंड द्यावे लागते. त्याच्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन विनाकारण बदलतो त्यामुळे तो मानसिक तणावाखाली असतो.

५) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनीयम २०१३ मधील नियम क्र.७ नुसार शिस्तभंग कारवाई चालू करण्याचा अधिकार समिती किंवा समितीने अधिकार प्रदान केलेले कोणतेही अधिकारी यांना आहे. तसे समितीने अधिकार प्रदान केलेले नसलेने प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी, उप कार्यकारी अधिकारी यांना शिस्तभंग कारवाई करणेचा अधिकारी नाही. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.६ (पान क्र.४२)*

६) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था; (शिर्डी) (सुधारणा) अधिनियम २००४ मधील नियम क्र.१४(२) (क) नुसार समितीच्या कोणत्याही अन्य अधिका-याविरुद्ध किंवा कर्मचा-याविरुद्ध शिस्तभंग कारवाई करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनाच आहे. या नियमानुसार उप मुख्य कार्यकारी अधिकारी, प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना शिस्तभंग कारवाई करणेचा अधिकार नाही. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं. ७ (पान क्र.४४)*

४) <u>घटनेची पार्श्वभूमी</u> –

मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१८५८/२०२१, दि.०२/०१/२०२१ अन्वये माझ्यावर कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. सदर नोटीसीमध्ये माझ्यावर खालील दोषारोप ठेवलेले आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.*(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.४ (पान क्र.८ ते १२)*

१) सीसीटीव्ही विभागामार्फत कॅमेरा व पॉवर केबल पुरवठा करणेबाबत दरपत्रके मागविणेत आलेली होती. त्यामध्ये न्यूनतम दरधारकास पुरवठा आदेश देणे आवश्यक होते. परंतु, सदर पुरवठाधारकाने नमूद मालाचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविली. या संदर्भात दरपत्रकात नमुद न्युनतम दरधारक जर पुरवठा करण्यास तयार नसेल खरेदी नियमावलीप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित होते, आपण तशी कार्यवाही केली नाही. वास्तविक पाहाता खरेदी नियामावली कलम ४.४.४.१ मधील मार्गदर्शक सूचनेमध्ये **L1** व्यतिरीक्त कोणत्याही व्यक्तीबरोबर वाटाघाटी करु नये, असे स्पष्ट केलेले असताना सुद्धा आपण वरिष्ठांकडे सादर केलेल्या टिपणीत **L2** निविदाधारक हे **L1** च्या दरामध्ये पुरवठा करणेस तयार असून त्यांना पुरवठा आदेश देता येईल, असे नमुद केलेले आहे. वास्तविक खरेदीच्या नियमावलीनुसार पुन्हा दरपत्रके मागविणे आवश्यक होते. परंतु, आपण नियमाचा भंग करुन, वरिष्ठांची दिशाभूल करुन, टिपणी सादर करुन मंजूरी घेण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट होते.

२) दि.३१/१२/२०२० व दि.०१/०१/२०२१ चे रोजी दर्शन रांग चालु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता . त्यास अनुसरुन, दर्शनरांग व हॉल साफ-सफाई करण्यासाठी दर्शनरांग बंद करण्यात आली होती. तथापी, दि.३१/१२/२०२० च्या रात्री गतवर्षीचा अनुभव पहाता काही निवडक भक्तगण हटवादी भूमिका घेवुन हॉलमध्येच थांबत असतात. ही बाब विचारात घेवुन अशा हटवादी भक्तांकडुन अरेरावी करत असल्याच्या पार्श्वभुमीवर एकुण १० कॅमेरे लावुन जर असे काही प्रसंग घडले तर त्याचे सीसीटीव्ही फुटेज पाहुन आक्षेपार्ह बाबी असल्यास त्यांचेबाबत पोलिसात तात्काळ फिर्याद दाखल करणेबाबत निर्देश दिले होते. सदर रात्री संस्थानचे अधिकारी व काही निवडक गावकरी यांनी अनाधिकाराने मंदिर प्रक्षेत्रात प्रवेश करुन दर्शनरांगेत घुसून श्रीं चे दर्शनरांगेत जाणेवरुन वाद विवाद झाला. सदरचे सीसीटीव्ही फुटेज पाहुन आक्षेपार्ह सीसीटीव्ही फुटेज ई-मेलने तात्काळशिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी यांचेकडे देणेबाबत वरिष्ठांनी सुचना दिलेल्या असताना आपण ही कार्यवाही केली नाही. याबाबत श्री रविंद्र ठाकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पाठपुरावा केल्यानंतरच सदरचे फुटेज दि.०१/०१/२०२१ रोजी सायं. ५.०० वाजेनंतर शिर्डी पोलिस स्टेशनला उशीराने पाठविले आहे. वास्तविक याबाबत आपण स्वत:हुन कार्यवाही करणे अपेक्षित असताना आपण नेमुन दिलेल्या कामात जाणीवपूर्वक टाळाटाळ केलेली असल्याचे निदर्शनास आलेले आहे. याच आरोपासाठी प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माझेवर संदर्भीय आरोपपत्र बजावले असुन खातेचौकशी करणेचा आदेश पारीत केलेला आहे.

५) <u>युक्तीवाद</u> -

महोदय, मी सविनयपणे आपले निदर्शनास आणुन देवु इच्छितो की, सदरचे कारणे दाखवा नोटीस उप मुख्य कार्यकारी अधिकारी मा. रविंद्र ठाकरे साहेब यांनी माझ्यावर बजावलेली आहे. सध्या प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा कार्यभार श्री रविंद्र ठाकरे साहेब, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे आहे. त्यांनीच संदर्भीय आदेश पारित केलेले आहे. त्यानुसार माझेवर आरोपपत्र बजावुन खातेचौकशी करणेचा आदेश केला आहे.

पान नंबर ५ वर...

माझेवर संस्थानचे दोन स्वतंत्र विभागांचा प्र.विभागप्रमुख पदाचा पदभार सोपविलेला आहे. परंतु, मला विभागप्रमुख पदाची वेतनश्रेणी आजतागायत देण्यात आलेली नाही. तसेच अतिरीक्त विभागाचे पदभारासाठी नियमानुसार देय असलेला कुठलाही अतिरीक्त भत्ता/अलौंस मला देण्यात येत नाही.

जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/८४२/२०१६, दि. ०३/०६/२०१६ रोजीचे आदेशान्वये माझी बदली प्र.इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीयर, ध्वनीक्षेपण व टेलिफोन विभाग या पदावर करण्यात आलेली आहे.

(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं. ८ (पान क्र.१५)

तदनंतर जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/४९९/२०१८ दि. २१/०५/२०१८ रोजीचे आदेशान्वये माझेकडे सीसीटीव्ही कंट्रोल सेलचे दैनंदिन प्रशासकीय नियंत्रणाचे **अतिरीक्त कामकाज** सोपविण्यात आलेले आहे.

(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.९ (पान क्र.१६)

परंतु, सदर विभागाचा अतिरीक्त पदभार माझेवर विना आकृतीबंध, विना तांत्रिक कर्मचारी तसेच कायम लिपीक-टंकलेखकाशिवाय देणेत आलेला आहे. सदर संवेदनशील अशा तांत्रिक विभागाचे कामकाज हे सर्व मदतनीस कर्मचा-यांकडुन विनातक्रार व प्रामाणिकपणे करुन घेणेत येत आहे. अशा परीस्थितीत देखील माझेवर सोपविण्यात आलेले विभागाचे अतिरीक्त प्रशासकीय नियंत्रणाचे कामकाज मी करीत असून, मला दैनंदिन कामामध्ये ब-याच अडचणी निर्माण होत आहेत. परंतु, आजपावेतो त्याची प्रशासनाकडुन कोणतीही दखल घेणेत आलेली नाही. तथापी, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी मला नोटीस देणेपुर्वी समक्ष सांगीतले होते की, आपणांस मी मैत्रीपुर्ण नोटीस देणार आहे. अशाप्रकारे माझ्याकडे नेहमीच अतिरीक्त कार्यभार हा विना मोबदला, वेतनश्रेणी शिवाय सोपविला जातो. तरी देखील मी विना तक्रार, प्रामाणिकपणे काम केले आहे व करीत आहे. महोदय, सदरहु विभागाचा अतिरीक्त पदभार काढुन घेणेत यावा यासाठी मी यापुर्वी दि.२२/०९/२०१५ आणि दि.२३/०१/२०२१ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेकडे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं. १० (पान क्र.४५ ते ४६)

मुद्दा क्र. (१) चा खुलासा - मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी दिलेल्या आदेशान्वये सीसीटीव्ही विभागाचे दि.१७/०६/२०२० रोजीची टिपणीन्वये, *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१५ (पान क्र.४८)*" श्रीं " चे व्दारकामाई मंदिराचे परिसरात श्री साईभक्तांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेकामी करणेत आलेली सीसीटीव्ही कॅमे-यांचीवायरींग ही Over-head असल्याने ती भूमीगत करणे गरजेचे असल्याने सदरकामी आवश्यक ते साहित्यखरेदी करणेकामी येणा-या एकत्रित अंदाजे रक्कम रु.२५,०६५/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे. त्यास अनुसरुन सदरकामी संस्थानचे अधिकृतसंकेतस्थळावर दि.०१/०७/२०२० ते दि.०७/०७/२०२० अखेर जाहिरात प्रसिद्ध करुन विविध पुरवठाधारकांकडुन सदरकामी कोटेशन्स मागविण्यात आले होते. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.११ (पान क्र.४७)*त्यानुसार प्राप्त कोटेशनातील निम्नतम दरांचा तुलनात्मक तक्ता वरिष्ठांचे मान्यतेस्तव सादर करणेत येवुन त्यातील प्राप्त निम्नतम पुरवठाधारकांना सदर साहित्य पुरवठा करणेकामी दि.२७/०७/२०२० रोजीचे टिपणीन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१५ (पान क्र.२०)*प्राप्त कोटेशनातील निम्नतम दरधारकांचा तपशील खालीलप्रमाणे असून त्यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने दि.०१/०८/२०२० रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहे.

अ.नं.	वस्तुचा तपशील	पुरवठाधारकाचे नाव	दरपत्रकातील दर रु .
१.	2" HDEP पाईप 6Kg (31 Mtr)	जैन कॉम्प्युटर्स, राहाता	२,७९०(सर्व करांसहीत) -/
२.	2" ग्रुपबेड GI 4)–नग (	न्यु साईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी	८५० (सर्व करांसहीत) -/
३.	2" Core 2.5 mm armoured Cable (100 mtr (	रिद्धी एंटरप्रायजेस, नाशिक	१५,०००(सर्व करांसहीत) -/
4.	D-link -Cat-6 Cable (305 mtr)	साईसेवा सर्व्हिसेस, शिर्डी	६,२०० (सर्व करांसहीत) -/

सबब,उपरोक्त तपशीलात नमूद केलेनुसार, व्दारकामाई मंदिराचे परिसरातील सीसीटीव्ही कॅमे-यांची वायरींग भूमीगत करणेकामी आवश्यक असणारे 2" HDEP पाईप 6Kg (31 Mtr) पुरवठा करणेकामी उपरोक्त तपशीलातील अ.नं.१ मधील पुरवठाधारक जैन कॉम्प्युटर्स, राहाता यांना जा.नं.एसएसएसटी/सीसीटीव्हीसेल/८८४/२०२०, दि.०१/०८/२०२० अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१२ (पान क्र.२१)

परंतु, पुरवठाधारक जैन कॉम्प्युटर्स, राहाता यांनी "***कोरोना महामारीमुळे मार्केट मध्ये खूप रेट वाढलेले आहेत त्यामुळे मी मटेरीयल आपणांस देवु शकत नाही व मला ते परवडत नाही. तरी, माझ्या नांवे निघालेली ऑर्डर कॅन्सल करणेत यावी***" असे दि.२१/०८/२०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे.

(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१३ (पान क्र.२२)

पान नंबर ६ वर...

तथापी, सदर 2" HDEP पाईप 6 Kg (31 Mtr) खरेदी करणेकामी द्वितीय निम्नतम पुरवठाधारक न्युसाईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी यांचे दर रक्कम रु.२,८५३/- मात्र (सर्व करांसहीत) प्राप्त झालेले होते. त्या अनुषंगाने सदर 2" HDEP पाईप रु.२,७९०/- मात्र (सर्व करासंहीत) दरानुसार पुरवठा करण्यास तयार आहे काय ? याबाबत द्वितीय निम्नतम पुरवठधारक न्यु साईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी यांना दुरध्वनीद्वारे विचारणा केली असता, त्यांनी " *2" HDEP पाईप 6 Kg (31 Mtr) मी श्री साईबाबा संस्थानला रक्कम रु.२,७९०/- मात्र (सर्व करांसह) पुरविणेस तयार असलेबाबत* " न्यु साईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी यांनी दि.१०/०९/२०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे.
(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१४ (पान क्र.२४)

त्यास अनुसरुन, सदर "2" HDEP पाईप 6Kg (31 Mtr) पुरवठाधारक न्यु साईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी यांनी दि.१०/०९/२०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेनुसार त्यांचेकडुन रक्कम रु.२,७९०/- मात्र (सर्व करांसहीत) दराने खरेदी करणेस तसेच त्यांना सदरकामी पुरवठा आदेश देणेच्या मान्यतेस्तव दि.०४/११/२०२० रोजी *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१५ (पान क्र.२५)*टिपणी सादर करण्यात आली होती. सदर टिपणीवर " १) 'अ' बाबत प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख यांचा लेखी खुलासा सादर करावा २) कायदेशीर बाबींची पूर्तता होत नाही तरीं प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख यांनी नस्ती सादर केली आहे तरी त्यांचा खुलासा मागवावा, असे नम्र मत आहे " तसेच " 'अ' प्रमाणे " सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

उपरोक्त निर्देशास अनुसरुन सदर "2" HDEP पाईप 6 Kg (31 Mtr) L1 पुरवठाधारक जैन कॉम्प्युटर्स, राहाता हे कोरोना महामारीमुळे मार्केट मध्ये खुप रेट वाढलेले असल्याने पुरवठा करण्यास असमर्थ होते. सदरचे "2" HDEP पाईप 6 Kg (31 Mtr) L2 पुरवठाधारक न्यु साईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी हे L1 पुरवठाधारक यांनी नमुद केलेल्या रक्कम रु.२,७९०/- मात्र (सर्व करांसहीत) दराने पुरवठा करण्यास तयार असल्याने L2 पुरवठाधारक न्यु साईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी यांचेकडुन सदर "2" HDEP पाईप 6 Kg (31 Mtr) खरेदी करणेकामी कामाची निकड व तातडीचे काम विचारात घेता दि.०४/११/२०२० रोजी टिपणी सादर करण्यात आली होती. तसेच खरेदी नियमावलीत L1 पुरवठाधारक वस्तु/साहित्य पुरवठा करण्यास असमर्थ असल्यास L2 पुरवठाधारक यांचेकडुन सदर वस्तु/साहित्य खरेदी करणेबाबत खरेदी नियमावलीत कुठलाही Clause नाही. परंतु, सदरचे पाईप खरेदी ही किरकोळ स्वरुपाची असल्याने तसेच सदर पाईप सोबत इतर किरकोळ वस्तु देखील खरेदी करणे आवश्यक असल्याने सदरकामी संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करुन कोटेशन मागविण्यात आलेले होते. **तसेच L1 पुरवठाधारक जैन कॉम्प्युटर्स, राहाता यांनी कळविलेनुसार, कोरोना महामारीमुळे मार्केट मध्ये खुप रेट वाढलेले असल्याने सदरकामी पुनःश्च कोटेशन मागवावयाचे झाल्यास संस्थानचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही,** असे नमुद करुन, दि.०५/१२/२०२० रोजी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर केलेला होता. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१५ (पान क्र.१७)*

सदर प्रस्तावावरील प्राप्त निर्देशाबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेशी समक्ष चर्चा करणेत येवुन, त्यांनी श्रींचे द्वारकामाई मंदिर परिसरातील सीसीटीव्ही कॅमे-यांची वायरींग भुमीगत करणेकरीता2" HDEP पाईप 6K (31 Mtr) खरेदीकामी पुनःश्च दरपत्रके मागविणेबाबत निर्देश दिलेले होते. त्यास अनुसरुन, सदरकामी दि.०८/१२/२०२० रोजीचे मंजूर टिपणीन्वये *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१५ (पान क्र.२६)*दि.०९/१२/२०२० ते दि.१८/१२/२०२० अखेर संस्थानचे संकेतस्थळावर फेर जाहिरात प्रसिद्ध करुन दरपत्रके मागविण्यात आले होते. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१६ (पान क्र.२७)* तथापी, सदरकामी पुरवठाधारकांचा प्रतिसाद मिळत नसुन फक्त एकच पुरवठाधारक यांचे दरपत्रक प्राप्त झालेले आहे. सबब, सदरकामी पाणी पुरवठा विभागाशी संपर्क साधला असता, पाणी पुरवठा विभागाकडे ४ इंची PVC पाईप उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तरी, "श्रीं" चे द्वारकामाई मंदिर परिसरातील सीसीटीव्ही कॅमे-यांची वायरींग भूमीगत करणेकामी ४ इंची PVC पाईप पाणी पुरवठा विभागाकडुन उपलब्ध करुन घेणेस तसेच सदर पाईपचे खोदकाम करुन पाईप भूमीगत करण्याचे काम बांधकाम विभागामार्फत करुन घेणेकामी प्रस्ताव दि.२४/१२/२०२० रोजीचे टिपणीन्वये सादर करणेत आलेला आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येवुन ठेकेदारावर प्रथम कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले आहे. त्यानुसार, ठेकेदारावर दि.२२/०२/२०२१ रोजीचे मंजुर टिपणीन्वये त्यांना दि.०१ /०३/२०२१ रोजीचे पत्रान्वये पुढील तीन वर्षाकरीता Black Listed करणेत आलेले आहे. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१७ (पान क्र.५४ ते ५५)*

सबब, उपरोक्तप्रमाणे सर्व कार्यवाही ही संस्थानचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेशी समक्ष चर्चा करुन, त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करुन, त्यांचे मान्यतेने कार्यवाही करणेत आलेली आहे. तरी, देखील मला कारणे दाखवा नोटीस देवुन, मुद्दा क्र. १ मध्ये नमुद केलेनुसार आपण नियमांचा भंग करुन, वरीष्ठांची दिशाभुल करुन, टिपणी सादर करुन, मंजुरी घेण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट होते, असे नमुद केलेले आहे.

खरेदी नियमावली, नियम क्र. ३.२.२ नुसार रू. ५,०००/- पर्यंत च्या वस्तूंची खरेदी साठी निविदा काढण्याची गरज नाही. दरपत्रके/निविदा न मागविता थेट जागेवर खरेदी करता येईल. या संदर्भातील खरेदी नियमावली परिच्छेद ३.२.२ आपले अवलोकनार्थ जोडलेले आहेत.*(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१८ (पान क्र.५१)*

पान नंबर ७ वर...

तसेच भारत सरकारच्या **GFR 2017 Rule 154,** नियमावलीनुसार **Purchase of goods without quotation:- "Purchase of goods upto the value of Rs.25,000.00(Rupees twenty five thousand)only on eachoccasion may be made without inviting quotations or bids on the basis of a certificate to be recorded by the competetent authority in the following format."I,am personally satisfied that these goods purchased are the requisite quality and specification and have been purchased from a reliable supplier of a reasonable price"अशी तरतूद आहे. या संदर्भातील नियमावली परिच्छेद** GFR 2017 Rule 154 **आपले अवलोकनार्थ जोडलेले आहेत.***(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.२१ (पान क्र.५२)*

महोदय, मी आपले लक्ष खरेदी नियमावलीकडे वेधू इच्छितो, खरेदी नियमावलीमधील नियम क्र.४.४.४.१ वाटाघाटासाठी मार्गदर्शक सुचना यात अशी सूचित केले आहे की, **L1** निवीदाधारकाबरोबर जर काही भागांच्याकिंमती असमर्थनीय असतील किंवा बाजारभावापेक्षा जास्त असतील तर वाटाघाटी करता येतील. वाटाघाटीसाठी शिफारस करणा-या प्राधिका-याने खात्री पटेल अशी कारणे नमुद करणे आवश्यक आहे. *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१८ (पान क्र.५०)*

सदर प्रकरणात खरेदी ही किरकोळ स्वरुपाची रु.२,७९०/- ची होती. खरेदी नियमावलीचे मार्गदर्शक सुचनेनुसार किंमत असमर्थनीय असलेने **L1** यांनी नकार दिल्यानंतर वरिष्ठांच्या सुचनेनुसार मी दि.०४/११/२०२० रोजीचा प्रस्ताव सादर केला होता. त्यात संस्थानचा काहीही आर्थिक तोटा झालेला नाही. संस्थानचे आर्थिक नुकसान होऊ नये, काल अपव्यय होऊ नये या शुद्ध हेतुने वरिष्ठांच्या सुचनेनुसार प्रस्ताव सादर केलेला होता व त्यास वरिष्ठांनी मान्यता देखील दिलेली आहे. या कामी नियमाचा भंग केलेला नाही. मी वरिष्ठांची कुठल्याही प्रकारची दिशाभूल केलेली नाही.

तरी उपरोक्त नमूद केलेल्या मुद्दा क्र. (१) चे खुलाशातील विवेचनास अनुसरून, महोदय, संस्थानचे सदरकामी आर्थिक नुकसान होऊ नये याकरीता मी वेळोवेळी वरीष्ठांशी समक्ष चर्चा करुनच प्रस्ताव मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेस्तव सादर करणेत येवुन, त्यास वरीष्ठांनी देखील प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे मी वरीष्ठांची दिशाभूल केली असे म्हणणे उचित होणार नाही. हे कथन खरे नाही. सदर साहित्य खरेदी केलेले नाही. मी खरेदी नियमावलीचा भंग केलेला नाही.

मुद्दा क्र. (२) चा खुलासा -दि.३१/१२/२०२० रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी रात्रौ १.१५ वाजता सरंजाम बागेजवळ सर्व सीसीटीव्ही कर्मचा-यांचे समक्ष सदर दिवशी घडलेल्या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज व व्हीडीओ कॅमे-याचे शुटींग जतन करुन ठेवणेबाबत सांगून, योग्य त्यावेळी पुढील सुचनेनुसार कार्यवाही करावी, असे तोंडी सांगीतले होते. तदनंतर दि.०१/०१/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी शिर्डीतील काही स्थानिक ग्रामस्थ यांनी दि.३१/१२/२०२० रोजी रात्रौ.२३.३० ते २३.३१ वाजेच्या दरम्यान गेट नं.-५ मधुन तसेच पी.आर.ओ. गेट या ठिकाणाहुन रात्रौ. २२.३५ ते २३.०० वाजे दरम्यान काही शिर्डी ग्रामस्थ यांनी अनाधिकाराने प्रवेश केलेला असल्याने शिर्डी ग्रामस्थांनी शासकीय कामांत अडथळा निर्माण केलेला असून, त्यांचेवर सीसीटीव्ही फुटेजचे तसेच व्हीडीओ कॅमे-याचे शुटींगचे अवलोकन करुन, संबंधितांवर नियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई करणेबाबत सांगीतले. सदरकामी शिर्डी पोलीस स्टेशनला द्यावयाच्या पत्रात नमुद करावयाचा मसुदा दुपारी १.१२ मिनिटांनी मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दूरध्वनीव्दारे सांगून, त्यांनी सदर पत्र मा. उप विभागीय पोलीस अधिकारी व मा. पोलीस निरीक्षक सो., शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी. यांना देणेबाबत सांगितले होते. वास्तविक, महोदय माझी जबाबदारी फक्त तांत्रिक कामापुरती मर्यादित आहे. श्री साईभक्तांची सुरक्षेकरीता संरक्षण विभाग व कायदेशीर बाबींकरीता विधी विभाग असे दोन स्वतंत्र विभाग संस्थानमध्ये कार्यरत असुन त्यांचेकडुन कार्यवाही होणे अपेक्षित होते व आहे. परंतु वरिष्ठांचे वेळोवेळी सदरकामी प्राप्त होणा-या सूचनेनुसार मी कार्यवाही तत्परतेने विनाविलंब पूर्ण केलेली आहे.

महोदय, संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार संस्थानचे बाहेरील इतर विभागांशी करावयाचे पत्रव्यवहार हे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे मान्यतेने होत असल्याने, मी त्वरीत सदर दिवशी दुपारी ३.३० वाजता मा. उप विभागीय पोलीस अधिकारी व मा. पोलीस निरीक्षक सो.,शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी. यांना पत्र देणेबाबतचा प्रस्ताव दि.०१/०१/२०२१ रोजीचे टिपणीन्वये *(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.१९ (पान क्र.२९)*प्रशासकीय अधिकारी यांची मान्यता घेवुन, मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेकडे स्वाक्षरीकरीता समक्ष सादर केला असता, त्यांनी स्वाक्षरी न करता सदर पत्र हे आपले स्वाक्षरीने देणेत येवुन, सदर प्रस्ताव अवलोकनार्थ तथा माहीतीस्तव सादर करणेबाबत निर्देश दिलेले होते. त्यानुसार मी मा. उप विभागीय पोलीस अधिकारी व मा. पोलीस निरीक्षक सो.,शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी. यांना देणेबाबतचा पत्रातील नमुद आशयाचा मसुदा मी मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांना समक्ष दाखवुन, सदर पत्र व दि.३१/१२/२०२० रोजीच्या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज तसेच व्हीडीओ कॅमे-याचे शुटींग डी.व्ही.डी.मध्ये तातडीने मा. उप विभागीय पोलीस अधिकारी व मा. पोलीस निरीक्षक सो., शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी. यांना जा.क्र.एसएसएसटी/सीसीटीव्ही/२९१८/२०२१, दि.०१/०१/२०२१ रोजी समक्ष सायं.१७.०५ वाजता देण्यात आलेले आहे.*(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.२० (पान क्र.३०)*

पान नंबर ८ वर...

तसेच सदर पत्र दिलेनंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय, मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय, प्रशासकीय अधिकारी महोदय यांना व्हॉटसअपव्दारे अवगत करणेत येवुन, प्रस्ताव दि.०१/०१/२०२१ रोजी माहीती तथा अवलोकनार्थ सादर करणेत आलेला आहे.

महोदय, उपरोक्त सर्व घटनाक्रमांचे अवलोकन करता, सदरकामी वरीष्ठांकडुन वेळोवेळी प्राप्त झालेले निर्देश, पत्रात नमुद करावयाच्या आशयाच्या मसुद्याबाबतचा प्राप्त संदेश तसेच तांत्रिक बाब विचारात घेता, संबंधित सीसीटीव्ही कॅमे-यांचे फुटेज तपासुन ते एकत्रित संकलन करुन, साईज प्रमाणे डेटा कनव्हर्ट करुन, सदर सर्व डेटा डी.व्ही.डी.मध्ये एकत्रित कॉपी करणेकामीची कार्यवाही मी माझे स्तरावर अचुकतेने व विनाविलंब अवघ्या काही तासातच पूर्ण करुन, वरीष्ठांचे निर्देशांनुसार शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी येथे सायंकाळी १६.०० वाजता स्वतः जावुन, तेथे वरीष्ठ पोलीस अधिकारी यांची भेट घेवुन, त्यांनी सदर पत्र व डी.व्ही.डी. मधील डेटाची प्रत्यक्ष तपासणी करुन,सायंकाळी १७.०५ वाजता मला पत्राची पोहोच दिलेली आहे. तदनंतर सदर प्रस्ताव तात्काळ पत्रासह मी दि.०१/०१/२०२१ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेकडे माहीती तथा अवलोकनार्थ सादर केलेला होता.

महोदय, उपरोक्त तपशीलातील नमुद घटनांचा सारासार विचार करता, माझेकडील अशा या संवेदनशील व तांत्रिक दृष्टया महत्वपूर्ण विभागांचा अतिरीक्त पदभार हा विना आकृतीबंध, विना तांत्रिक कर्मचारी, लिपीक-टंकलेखक नसुनही, मी मदतनीस कर्मचा-यांच्या सहकार्याने सदर कामे करुन घेतलेली आहे व घेत आहे, अशी या विभागाची परीस्थिती असतांनाही दि.०२/०१/२०२१ रोजीचे नोटीस पत्रात (पान क्र.८) नमुद केल्याप्रमाणे मी वरीष्ठांचे निर्देशांनुसार त्वरीत कार्यवाही पूर्ण केलेली असून देखील मी कामात जाणीवपूर्वक टाळाटाळ व दिरंगाई केलेली असल्याचे नमुद केलेले आहे.

तरी, महोदय, मी नम्रपणे आपले निर्दशनास आणुन देऊ इच्छितो की, माझेकडुन सदर कामांमध्ये कुठलीही दिरंगाई अथवा टाळाटाळ झालेली नसुन, मी वरीष्ठांचे निर्देशांनुसार प्रामाणिकपणे व एकनिष्ठेने सर्व कामे त्वरीत केलेली आहेत.

महोदय, दि.०२/०१/२०२१ रोजीच्या नोटीसमध्ये असे कथन केले आहे की, सीसीटीव्ही फुटेज पहाणे आक्षेपार्ह बाबी असल्यास त्याच्याबाबत पोलिसात तात्काळ फिर्याद दाखल करणेबाबत निर्देश दिले होते. परंतु, आक्षेपार्ह बाब कोणती आहे हे ठरविण्याचे अधिकार मला नाही. दूसरे असे कि सदर घटना मंदिर प्रक्षेत्रात दर्शनरांगेत घडलेली आहे. या घटनेबाबत मंदिर विभाग, संरक्षण विभाग व मंदिर परिसरातील कार्यरत असलेला पोलिस विभाग यांचा थेट संबंध होता व आहे.

तथापी, दि.०१/०६/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये *" संस्थानमधील सीसीटीव्ही विभागाचे प्रस्तावात नमुद " अ " नुसार उपलब्ध असलेले सीसीटीव्ही फुटेज पोलिस यंत्रणा, केंद्र व राज्य शासनाच्या गुप्तचर विभाग यांना तपासाकामी त्यांच्या मागणीप्रमाणे देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच विभागाच्या प्रस्तावात " ब " प्रमाणे माहिती अधिकार कायदा २००५मधील कलम ८(१).मधील " छ "व " ज " मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार खाजगी अर्जदारास सीसीटीव्ही फुटेज देण्याचे नाकारण्यात यावे "* असे ठरले.*(सोबतचे अनुक्रमणिकेतील अ.नं.२२ (पान क्र.५३)*

महोदय, मी आपले निदर्शनास आणुन देवु इच्छितो की, उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरुन, सदर घटनेचे सीसीटीव्ही फुटेज तपासाकामी मिळणेबाबतची मागणी पोलीस विभागाने केलेनंतर सदरचे घटनेचे सीसीटीव्ही फुटेज पोलिस विभागास तपासाकामी देणे अपेक्षित होते व आहे. परंतु, पोलिस विभागाने सदर घटनेचे सीसीटीव्ही फुटेज मिळणेबाबत मागणी केलेली नसतानाही सदरचे फुटेज मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे सुचनेनुसार पोलिस विभागास पुढील कारवाईसाठी देणेत आलेले आहे.

तसेच दि.१७/०४/२०२१ रोजीचे माझ्या खुलाशात नमुद केल्याप्रमाणे मला निर्गमीत नोटीस मला दि.१०/०४/२०२१ मधील सर्व आरोप असत्य, निराधार, कपोल कल्पित, संदिग्ध व बनावट असुन असेच बनावट आरोप करुन कागदपत्रे पुरावा परिशिष्ट "क" (पान क्र.६) मधील अनुक्रमांक ४ ते १० दि.३०/०९/२०११, दि.२२/११/२०१४, दि.२४/०२/२०१६, दि.१९/०५/२०१६, दि.०९/११/२०१६, दि.०१/०२/२०१८व दि.२८/११/२०२० चे कागदपत्र बनविण्यात आलेले आहेत. सदर परिशिष्ट "क" मधील कागद क्रमांक ४ ते १० हे सर्व संबंधीत खुलासा समाधानकारक असुन देखील केवळ पूर्वग्रह दूषित ठेवुन लिहिल्या गेलेले आहेत. परिशिष्ट "क" मधील कागद क्रमांक ४ ते १० हे प्रस्तुत अपिलातील परिच्छेद क्र.३ मधील मुद्दा क्र.५ व ६ प्रमाणे अधिकारनसताना निगर्मीत केलेले आदेश असल्याने ते सर्व आदेश रद्द व्हावे, ही नम्र विनंती.

महोदय, मी तांत्रिक विभागातील कर्मचारी असून मला प्रशासनाचे व आर्थिक बाबींचे अत्यल्प ज्ञान असून देखील मी माझ्यावर सोपविलेली जबाबदारी इमाने इतबारे कोणत्याही नियमांचे उल्लंघन न करता शुद्ध हेतूने बाबांच्या आशीर्वादाने पार पाडत आहे.

उपरोक्त सर्व मुद्दे विचारात घेता हे स्पष्ट होते की, मी साहित्य खरेदी केलेले नाही. मी संस्थानचे आर्थिक नुकसान केलेले नाही. मी संस्थानचे आर्थिक नुकसान टाळले तसेच कालापव्यय देखील होणार नव्हता व सदरहु बाब ही स्वयंस्पष्ट प्रस्तावात नमुद करुन प्रस्ताव मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे मान्यतेस्तव सादर केला होता. त्यामुळे मी खरेदी नियामावलीचा भंग केलेला नाही. तथापी, सीसीटीव्ही फुटेजमधील आक्षेपार्ह बाबी कोणत्या हे ठरविण्याचे अधिकार मला नव्हते व नाही. त्याबाबत वरिष्ठांनी निर्णय घेतलेनंतर त्यांचे आदेशानुसार मी सीसीटीव्ही फुटेज शिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी यांना अचुक वेळेत सुपूर्द केले. माझ्यावरील करण्यात आलेले आरोप हे असत्य, निराधार व कपोल कल्पित आहेत. त्यामुळे ते मला मान्य नाहीत.

तरी, मा.प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी केलेले संदर्भीय आदेश व अभिकथन पत्र रद्द व्हावे, ही आपणांस नम्र विनंती." असे म्हटलेले आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत-

१) श्री.किशोर साहेबराव गवळी, प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग यांना देणेत आलेले अभिकथनपत्र व आदेश रद्द होणेबाबत मा.अध्यक्ष महोदय, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडेस दि.०७.०५.२०२१ रोजी अपिल अर्ज केलेला आहे.

श्री. गवळी यांचे उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत विभागीय खातेचौकशी प्रस्तावीत केलेली आहे.

२) सदरची खातेचौकशी रद्द करणेकरीता श्री.गवळी यांनी दिलेल्या अपील अर्जाबाबत मा.अध्यक्ष महोदय, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा मा.तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे स्वाक्षरीने जा.नं.स्वीस/२६/२०२१ दि.१७.०६.२०२१ रोजीचे पत्रासोबत श्री.गवळी यांचा दि.०७.०५.२०२१ रोजीचा अपील अर्ज इकडील कार्यालयास पाठविलेला आहे.

सदरचे पत्रात," (१) अध्यक्ष या नात्याने या कार्यालयाकडे प्राप्त झालेली खालील नमुद दोन प्रकरणे या समेत पाठवित आहे. सदरहू अपिल/अर्जावर निर्णय होण्याकरीता या प्रकरणांचे सर्व सबंधीत कागदपत्र तदर्थ समितीसमोर असणे आवश्यक आहेत. तसेच सेवानियम, नियमावली, चौकशी अहवाल (असल्यास), त्यांतील निष्कर्ष यावर सविस्तर विचार विनिमय होणे आवश्यक आहे. तरी सदरहू अपिल/अर्ज तदर्थ समितीच्या पुढील नियमित बैठकीमध्ये संबंधीच्यां सर्व कागदपत्रांसह, सेवा नियम, नियमावली, खातेचौकशीचे सर्व कागदपत्र (असल्यास) इत्यादीसह तदर्थ समितीच्या समोर ठेवण्यात यावेत.

अ.नं.	अपीलकत्याचे नाव	दिनांक
१)	श्री.किशोर साहेबराव गवळी, प्रभारी ध्वनीक्षेपन व टेलीफोन विभाग प्रमुख, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी	२८.०५.२०२१
२)	श्री. विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग -०४ कर्मचारी, श्री साईआश्रम भक्त निवासस्थान सध्या आरोग्य विभाग, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी	१६.०६.२०२१

(२) आज दि.१७ जुन २०२१ रोजी श्री.साईनाथ रुग्णालय, शिर्डी या विभागामार्फत चक्रीय पध्दतीने आणलेले दोन विषय (१) श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोबर २०२० ते मार्च २०२१ अखेर वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३,२७,१२,८९५/- व (२) श्री साईबाबा संस्थान मार्फत श्री साईनाथ रुग्णालय येथे डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर सुरु करणेबाबत हे विषय चक्रीय पध्दतीने सादर करण्याची कुठलीही तातडी भासत नाही व या विषयावर तदर्थ समितीच्या नियमित बैठकीत सखोल चर्चा होणे आवश्यक दिसते करीता हे दोन्ही विषय परत पाठवत आहे ते तदर्थ समितीच्या पुढील नियमित बैठकीत ठेवण्यात यावेत." असे नमुद आहे.

सदरचा अपील अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दि.१७.०६.२०२१ रोजी सादर करणेत आलेला आहे.

सबब, श्री.किशोर साहेबराव गवळी, प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग यांना उपरोक्त दोषारोपासबंधी सुरु करणेत आलेली खातेचौकशीची सद्यस्थिती प्रस्तावातील 'ब' मध्ये नमुद करणेत आलेली आहे. श्री.गवळी यांना देण्यात आलेले दोषारोप पत्राबाबत त्यांची सुरु असलेली खातेचौकशी पुर्ण करणेत येवून, त्यांचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल प्राप्त झालेनंतर मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे समोर अवलोकनार्थ सादर करणेत येवून, मा.तदर्थ समितीचे निर्णयानुसार पुढील कार्यवाही करता येईल. तरी श्री.गवळी यांचे दि.१७.०६.२०२१ अपिल अर्जाबाबत विभागाचे असे मत आहे. अर्जाचे प्रकरण निकाली काढणेकरीताचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करता येईल, असे मत आहे.

प्रस्ताव-

श्री.गवळी यांचे विरुध्द उपरोक्त 'अ' मध्ये नमुद केल्याप्रमाणे दोषारोप ठेवण्यात आलेले असून, त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे. सदर विभागीय चौकशी विरुध्द श्री.गवळी यांनी मा.तदर्थ समितीकडे दि.१७.०६.२०२१ रोजी अपील दाखल केले आहे. तरी विभागाचा अभिप्राय विचारात घेवून, निर्णय घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

21/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

LAB - Meeting - 169 - 2021

विषय क्र.- ९५

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर 152
(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

विषय :- श्री.विकास महादेव शिवगजे, सहा.शिक्षक,श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांचे दिनांक ०१.१२.२०२० रोजीचे अपील अर्जाबाबत...

विषयाची पुर्वपिठीका :-

(अ) श्री.शिवगजे हे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सहा.शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डी चे स्थायी प्राचार्य पद भरण्याची कार्यवाही सुरु असुन, सदरचे स्थायी प्राचार्य पद भरेपर्यंत अथवा पुढील आदेश होईपावेतो श्री साईबाबा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य पदाचा कार्यभार कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रशासकिय कामकाज सांभाळुन त्यांचेकडे दिलेला आहे.

त्यांचेबद्दल प्रशासकिय अधिकारी कक्ष यांचेकडील दि.०५.०८.२०२० रोजीचा संदर्भांकित अहवाल आणि विशेषत: सहायक कुलसचिव, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडील दि.१९.०६.२०२० रोजीचे संदर्भीय पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे. प्रशासकिय अधिकारी कक्ष यांचेकडील संदर्भांकित अहवाल व विशेषत: पुणे विद्यापीठ यांचेकडील पत्रात खालीलप्रमाणे नमुद आहे.:-

" शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वर्षाकरीता बेसिस शिक्षक मान्यतेबाबत.

स्थानीक निवड समितीद्वारे केलेल्या प्रक्रियेतुन शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता काही महाविद्यालयास शिक्षकी पदांना एका शैक्षणिक वर्षाकरीता (ॲडहॉक) मान्यता देण्यात आल्या होत्या. परंतु कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर टाळेबंदी व संचारबंदीमुळे विहीत प्रक्रिया अद्याप पुर्ण न होऊ शकल्यामुळे अशा हंगामी शिक्षकांना मुदतवाढ देण्याबाबत महाविद्यालयांनी केलेली विनंती विचाराधीन होती.

या संदर्भात प्राप्त आदेशानुसार असे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील एका शैक्षणिक वर्षाकरीता शिक्षक मान्यता प्राप्त शिक्षकांची मान्यता महाविद्यालयाच्या विनंती वरुन शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या कालावधी अथवा विहीत प्रक्रियेद्वारे नियमित पद भरती होई पर्यंत यापैकी जे आधी होईल तो पर्यंत मुदतवाढ (Continution) देण्याचा धोरणात्मक निर्णय कोव्हिड-१९ च्या पार्श्वभुमीवर विशेष बाब म्हणून घेण्यात आलेला आहे.

ज्या पात्र शिक्षकांनी शैक्षणिक अर्हता पुर्ण केलेली असुन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता शिक्षक मान्यता प्राप्त केलेली आहे.अशा मान्यताप्राप्त शिक्षकांच्या सन २०२०-२१ या एका शैक्षणिक वर्षाकरीता नव्याने नियुक्ती दिलेले आदेश व रुजू अहवाल व संस्थेच्या सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता शिक्षक मान्यतेची मुदतवाढ घेण्यासाठी केलेल्या ठरावासह आणि शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता दिलेले विद्यापीठ मान्यतापत्रासह पाठविल्यास अशाच शिक्षकांना विशेष बाब म्हणून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ यासाठी नियुक्तीच्या मान्यतेस मुदतवाढ देण्यात येईल. वरील निर्णय ३१ जुलै २०२० पर्यंत विद्यापीठास प्राप्त होणा-या प्रस्तावांना लागु राहिल.

यापुढे असेही कळविणेत येते की, ज्या पदांना विद्यापीठाची शिक्षकिय मान्यता शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी घेतलेली नाही असे पदे भरतांना संस्थेने / महाविद्यालयाने शिक्षकिय पद भरण्यासाठी विहीत प्रक्रियेचा अवलंब करणे बंधनकारक राहिल. "

सन १९१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षक मान्यता मिळविण्यासाठी त्यांनी प्रयत्न करुन ती प्राप्त करुन घेणे आवश्यक असतांना त्यांनी ती प्राप्त करुन घेतली नाही. यावरुन श्री.शिवगजे हे अत्यंत बेजबाबदारपणे वरिष्ठ महाविद्यालयाचे कामकाज करत असल्याचे दिसते.

तदनंतर वरीलप्रमाणे परिस्थिती असतांना सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षाकरीता श्री साईबाबा महाविद्यालय यांना शिक्षक मान्यता मिळाली कि नाही याबाबत श्री.शिवगजे यांनी वरिष्ठांना माहिती दिली नाही. तसेच संदर्भीय पत्रान्वये पुणे विद्यापीठाने कळवूनही त्यांनी मागील शैक्षणिक वर्षाकरीता भरती केलेल्या शिक्षकांना मुदतवाढीचा प्रस्ताव तदर्थ समिती पुढे सादर करतांना श्री साईबाबा विद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० करीता शिक्षकीय मान्यतेबाबत समितीला अवगत केलेले नाही.

सदर बाबत श्री.शिवगजे यांनी मा.वरिष्ठांना तात्काळ अवगत करुन उचित कार्यवाही न केल्याचे तसेच यामुळे श्री साईबाबा महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी अध्यापन करणेकरीता प्राध्यापकांचे पदांबाबत विद्यापीठ व शासन स्तरावर तांत्रीक अडचण निर्माण झाल्याचे निदर्शनास येत आहे. प्रशासकिय अधिकारी (शैक्षणिक संकुल) यांनी दि.०५.०८.२०२० रोजी अहवाल सादर केला असुन, श्री.शिवगजे यांचेकडुन झालेल्या दिरंगाईबाबत कारणे दाखवा नोटीस बजावून लेखी खुलासा मागविणेबाबत प्रस्तावित केले आहे.

उपरोक्त संदर्भांकित पत्र व त्या अनुषंगाने सादर करणेत आलेल्या अहवालाचे अवलोकन केले असता, त्यांना नेमुन देणेत आलेल्या कामात हलगर्जीपणा व टाळाटाळ केल्याचे प्रकर्षाने दिसुन येत आहे.

पान नंबर २ वर...

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ चे कलम ३(१) अन्वये संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :-

(i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल.

(ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ;

(iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.

श्री.शिवगजे यांनी उपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ चे कलम ३(१) चे उल्लंघन केलेले आहे.

सदर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.शिवगजे यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/७६०/२०२० दि.०६-०८-२०२० अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आलेला होता. त्यास अनुसरुन श्री.शिवगजे यांनी दि.१४.०८.२०२० रोजी लेखी खुलासा सादर केलेला आहे.

श्री.शिवगजे यांचा सेवेतील पुर्वइतिहास पहाता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ (४) नुसार त्यांना उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा म्हणुन त्यांची सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखुन धरणेत येत आहे. वेतनवाढ रोखून धरण्याची शिक्षा भावी काळातील वेतनवाढीवर परीणामकारक होणार नाही. श्री.शिवगजे यांची सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखुन धरलेच्या नोंदी त्यांचे सेवा पुस्तकात घेण्यात येईल.

श्री.शिवगजे यांना जा.नं./एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त /१२८१/२०२० दि.१४.१०.२०२१ रोजीचे आदेशान्वये उपरोक्तप्रमाणे शिक्षा करणेत आलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे प्रकरण ५ अपिले कलम १७ नुसार मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे अपील अर्ज करण्याचा अधिकार असल्याने त्यांनी दि.०२.१२.२०२० रोजीचा अपील अर्ज सादर केलेला आहे.

(ब) मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे श्री.शिवगजे यांनी उपरोक्त शिक्षा रद्द करणेबाबतचा दि.१२.११.२०२० रोजीचा अपील अर्ज दि.०१.१२.२०२० रोजी मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे स्वीय सहाय्यक यांचेकडे दि.०१.१२.२०२० रोजी सादर केलेला आहे.

मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचीकडे श्री.शिवगजे यांनी उपरोक्त शिक्षा रद्द करणेबाबतचा दि.१२.११.२०२० रोजीचा अपील अर्ज सादर केलेला आहे.

त्यात त्यांनी,"

संदर्भ- ०१.जा.क्र.एसएसएस/वरिष्ठ महाविद्यालय/१२०८/२०१८ दि.२६ जुलै २०१८

०२. जा.क्र.एसएसएस/वरिष्ठ महाविद्यालय/२३५६/२०२० दि.२५ जानेवारी २०२०

०३. जा.नं./एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/७६०/२०२० दि.०६.०८.२०२०

०४. दि.१४.०८.२०२० रोजीचा केलेला खुलासा.

०५.जा.नं./एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१२८१/२०२० दि.१४.१०.२०२० रोजीचा आदेश

०६.संस्थान सेवा विनिमय-सेवा (शिस्त आणि अपिल) विनिमय, २०१३ मधील तरतूद

मी अर्जदार विकास महादेव शिवगजे, सहाय्यक शिक्षक, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी तथा प्रभारी प्राचार्य श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डी कारणे विनंतीपूर्वक अपिल अर्ज करतो की, मी सन १९९३ पासून श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागात व सन २००० पासून श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात सहा.शिक्षक म्हणून कार्यरत आहे.

वरील संदर्भ क्र.०१ व ०२ अन्वये माझ्याकडे श्री साईबाबा महाविद्यालयाचे प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. वरिष्ठांचे निर्देशानुसार मी माझ्या मूळ पदाचे (श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाचे) कामकाज पाहून, माझ्याकडे सोपविलेल्या वरिष्ठ महाविद्यालयाच्या कामाचा अतिरिक्त कार्यभार पाहात आहे.

संदर्भ क्र.३ चे कारणे दाखवा नोटीसद्वारे, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वर्षाकरिता ॲडहॉक Ad-hoc बेसिस शिक्षक मान्यतेबाबत-"स्थानिक निवड समितीद्वारे केलेल्या प्रक्रियेतून शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता काही महाविद्यालयास शिक्षकी पदांना एका शैक्षणिक वर्षाकरिता (ॲडहॉक) मान्यता देण्यात आल्या होत्या. परंतू कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर टाळेबंदी व संचारबंदीमुळे विहीत प्रक्रिया अद्याप पूर्ण न होऊ शकल्यामुळे अशा हंगामी शिक्षकांना मुदतवाढ देण्याबाबत महाविद्यालयांनी केलेली विनंती विचारधीन होती. यासंदर्भात प्राप्त आदेशानुसार असे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील एका शैक्षणिक वर्षाकरिता मान्यताप्राप्त शिक्षकांची मान्यता महाविद्यालयाच्या विनंतीवरुन शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या कालावधी अथवा विहित प्रक्रियेद्वारे नियमित पद भरती होईपर्यंत यापैकी जे आधी होईल तोपर्यंत मुदतवाढ (Continuation) देण्याचा धोरणात्मक निर्णय कोव्हीड-१९ च्या पार्श्वभूमीवर विशेष बाब म्हणून घेण्यात आलेला आहे. ज्या पात्र शिक्षकांनी शैक्षणिक अर्हता पुर्ण केलेली असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची

पान नंबर ३ वर...

शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता शिक्षक मान्यता प्राप्त केलेली आहे. अशा मान्यताप्राप्त शिक्षकांच्या सन २०२०-२१ या एका शैक्षणिक वर्षाकरिता शिक्षक मान्यतेची मुदतवाढ घेण्यासाठी केलेल्या ठरावासह आणि शैक्षणिक वर्ष २०१९२० करिता दिलेले विद्यापीठ मान्यता पत्रासह पाठविल्यास अशाच शिक्षकांना विशेषबाब म्हणून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ यासाठी नियुक्तीच्या मान्यतेसह मुदतवाढ देण्यात येईल, वरील निर्णय दि.३१ जुलै, २०२० पर्यंत विद्यापीठास प्राप्त होणा-या प्रस्तावांना लागू राहील. यापुढे असेही कळविण्यात येते की, ज्या पदांना विद्यापीठाची शिक्षकिय मान्यता शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी घेतलेली नाही, असे पदे भरताना संस्थेने /महाविद्यालयाने शिक्षकीय पद भरण्यासाठी विहित प्रक्रियेचा अवलंब करणे बंधनकारक राहील." सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षक मान्यता मिळविण्यासाठी आपण प्रयत्न करुन ती प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना आपण ती प्राप्त करुन घेतली नाही, यावरुन आपण अत्यंत बेजबाबदारपणे वरिष्ठ महाविद्यालयाचे कामकाज करत असल्याचे दिसते.

तदनंतर वरीलप्रमाणे परिस्थिती असताना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरिता श्री साईबाबा महाविद्यालय यांना शिक्षक मान्यता मिळाली की नाही याबाबत आपण वरिष्ठांना माहिती दिली नाही. तसेच संदर्भीय पत्रान्वये पुणे विद्यापीठाने कळवूनही आपण मागील शैक्षणिक वर्षाकरिता भरती केलेल्या शिक्षकांना मुदतवाढीचा प्रस्ताव तदर्थ समितीपुढे सादर करतांना श्री साईबाबा महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता शिक्षकीय मान्यतेबाबत समितीला अवगत केलेले नाही.

सदरबाबत आपण मा.वरिष्ठांना तात्काळ अवगत करुन उचित कार्यवाही न केल्याचे तसेच यामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी अध्यापन करणेकरिता प्राध्यापकांचे पदांबाबत विद्यापीठ व शासन स्तरावर तांत्रिक अडचण निर्माण झाल्याचे निर्देशनास येत आहे. प्रशासकीय अधिकारी (शैक्षणिक संकुल) यांनी दि.०५.०८.२०२० रोजी अहवाल सादर केला असून, आपणाकडून झालेल्या दिरंगाईबाबत कारणे दाखवा नोटीस बजावून लेखी खुलासा मागविणेबाबत प्रस्तावित केले आहे. उपरोक्त संदर्भांकित पत्र व त्यानुषंगाने सादर करणेत आलेल्या कामात हलगर्जीपणा व टाळाटाळ केल्याचे प्रकर्षाने दिसुन येत आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था , शिर्डी सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ चे कलम ३ (१) चे उल्लंघन केलेले आहे. तरी ही नोटीसचा खुलासा प्रशासकीय अधिकारी, शैक्षणिक संकुल यांचेमार्फत इकडील कार्यालयास सादर करणेत यावा, असे कळविलेले होते. त्यानुसार मी दि.१४.०८.२०२० रोजी माझा सविस्तर लेखी खुलासा मा.प्रशासकीय अधिकारी शैक्षणिक संकुल यांचेमार्फत सबळ पुराव्यानिशी सादर केलेला आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे.

सविस्तर खुलासा खालीलप्रमाणे-

मुद्दा क्र.१ सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षक मान्यता मिळविण्यासाठी आपण प्रयत्न करुन ती प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना आपण ती प्राप्त करुन घेतली नाही, यावरुन आपण अत्यंत बेजबाबदारपणे वरिष्ठ महाविद्यालयाचे कामकाज करत असल्याचे दिसते, तदनंतर वरीलप्रमाणे परिस्थिती असताना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरिता श्री साईबाबा महाविद्यालय यांना शिक्षक मान्यता मिळाली की नाही याबाबत आपण वरिष्ठांना माहिती दिली नाही, असे नमुद केलेले आहे.

खुलासा - सन २०१९-२० मध्ये प्राध्यापक पदासाठी झालेल्या मुलाखतीचा अहवाल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे सादर करण्यासाठी गेलो असता, सदर पदभरतीची जाहिरात चुकीची असल्याने शिक्षकीय पदांना मान्यता मिळणार नाही, याबाबत श्री साईबाबा महाविद्यालयाच्या कार्यालयाकडील दि.२७.०७.२०१९ रोजीचे टिपणीअन्वये वरिष्ठांना सविस्तरपणे अवगत केलेले होते. (सदर टिपणीची छायांकित प्रत सोबत परिशिष्ट अ-१ म्हणून जोडलेले आहे.) तसेच त्यावर्षी शिक्षक मान्यता मिळविण्यासाठी प्रथम केलेली भरती प्रक्रिया रद्द करुन, पुन्हा नव्याने वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, प्राध्यापक भरती प्रक्रिया राबवावी लागणार होती, याबाबत वरिष्ठांना समक्ष भेटून सांगितले असता, सदरची बाब टिपणीमध्ये नमुद न करणेबाबत वरिष्ठांनी मौखिक निर्देश दिलेले होते.

मुद्दा क्र.२ संदर्भीय पत्रान्वये पुणे विद्यापीठाने कळवूनही आपण मागील शैक्षणिक वर्षाकरिता भरती केलेल्या शिक्षकांना मुदतवाढीचा प्रस्ताव तदर्थ समितीपुढे सादर करताना श्री साईबाबा महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता शिक्षकीय मान्यतेबाबत समितीला अवगत केलेले नाही असे नमुद केलेले आहे.

खुलासा - कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर नवीन पदे न भरता, तसेच जाहिरात काढून नव्याने प्राध्यापक भरती न भरता, तसेच जाहिरात काढून नव्याने प्राध्यापक भरती न करता, मागील वर्षातील प्राध्यापकांना मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव सादर करावा, असे मौखिक निर्देश तत्कालीन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे साहेब यांनी दिलेले होते. त्यानुसार सन २०१९-२० मध्ये कार्यरत असलेल्या प्राध्यापकांना सन २०२०-२१ करिता मुदतवाढ देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यावेळी श्री साईबाबा महाविद्यालय कार्यालयाकडील दि.०४.०५.२०२० दि०९.०५.२०२० तसेच मा.तदर्थ समितीचे सभेत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये अद्याप शिक्षक मान्यता/पदनिश्चिती मिळालेली नसल्याबाबत नमुद केलेले होते. (सदर टिपण्यांची छायांकित प्रत सोबत परिशिष्ट अ-२ म्हणून जोडलेले आहे.)

पान नंबर ४ वर...

मुद्दा क्र.३ सदरबाबत आपण मा.वरिष्ठांना तात्काळ अवगत करुन उचित कार्यवाही न केल्याने तसेच यामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी अध्यापन करणेकरिता प्राध्यापकांचे पदांबाबत विद्यापीठ व शासन स्तरावर तांत्रिक अडचण निर्माण झाल्याचे निर्देशनास येत आहे असे नमुद केलेले आहे.

खुलासा - सन २०१९-२० मध्ये कार्यरत असलेल्या सहाय्यक प्राध्यापक यांना सन २०२०-२१ मध्ये मुदतवाढ देण्याचा विषय दि.०९.०५.२०२० रोजी सादर करण्यात आलेला होता, तसेच सदरबाबत मा.तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० रोजीचे सभेत निर्णय क्र.३०२ नुसार सदर प्राध्यापकांना मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आलेली होती, मा.तदर्थ समितीचे मान्यतेनंतर मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेकामी CA दाखल करण्यात आलेला होता. मा.उच्च न्यायालयात CA दाखल झाल्यानंतर सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाकडील दि.१९.०६.२०२० रोजीचे संदर्भीय पत्र प्राप्त झालेले होते. त्यामुळे सदरचे पत्र वरिष्ठांकडे Whats App व email द्वारे पाठविले होते. त्यानंतर सदरचे पत्र समक्ष नेऊन, त्यावर काय कार्यवाही करावयाची याबाबत विचारणा केली असता, वरिष्ठांनी सदरचे पत्र संस्थानचे विधी विभागाकडे देण्यात आले. विधी विभागामार्फत पुढील कार्यवाही होऊन, सदर पत्राचा उल्लेख मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या CA मध्ये करण्यात आलेला आहे. त्यामुळे संदर्भीय पत्राबाबत वरिष्ठांना अवगत केले नाही, हे म्हणणे अत्यंत चुकीचे आहे. (मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या CA ची छायांकित प्रत परिशिष्ट अ-३ म्हणून जोडलेले आहे.) तसेच सदर शिक्षकीय पदांना विद्यापीठाची मान्यता नसल्याबाबत मा.उच्च न्यायालयाचे दि.१७ जुलै २०२० रोजीच्या निर्णयात देखील नमुद आहे. (सदरचा निर्णय परिशिष्ठ अ-४ म्हणून जोडलेले आहे.)

उपरोक्त अ.क्र.१ ते ३ चे अवलोकन करता, सन २०१९-२० मध्ये झालेल्या प्राध्यापक भरतीची कार्यवाही वेळेत करुन, त्यावेळी आलेल्या अडचणींबाबत वरिष्ठांना तात्काळ अवगत केले होते. तसेच सन २०१९-२० मध्ये कार्यरत असलेल्या प्राध्यापकांना २०२०२१ मध्ये मुदतवाढ देण्याबाबतचा विषय हा दि.११.०५.२०२० रोजीचे मा.तदर्थ समितीचे सभेत मान्य झालेला असून, विद्यापीठाकडून संदर्भीय पत्र हे दि.१९.०६.२०२० रोजी विद्यापीठाचे वेबसाईटवर टाकण्यात आले. त्यामुळे सदर पत्राचा उल्लेख मा.तदर्थ समितीचे सभेतील प्रस्तावामध्ये नाही. तसेच विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या पत्राबाबत वरिष्ठांना Whats App व email व समक्ष अवगत केलेले होते (परिशिष्अ अ-५) व त्यांचेच सुचनेनुसार सदरचे पत्र संस्थानच्या विधी विभागाकडे देण्यात आले. सदर पत्राचा उल्लेख मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या CA मध्ये व मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये झालेला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी माझ्याकडून कुठल्याही प्रकारचा बेजबाबदारपणा , दिरंगाई अथवा गैरवर्तन झालेले नाही. झालेली सर्व कार्यवाही ही वरिष्ठांच्या निर्देशानुसार व मौखिक सुचनेनुसार झालेली आहे. तरी सदरची कारणे दाखवा नोटीस दप्तरी दाखल व्हावी, अशी विनंती केलेली होती.

मात्र मी सादर केलेला खुलासा किंवा त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा विचार न करता संदर्भ क्र.५ चे आदेशान्वये मला गैरशिस्तवर्तनाबाबत दंडात्मक कारवाई म्हणून माझी सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून धरणेत आली आहे.

त्यामुळे सदर अपिल अर्जानुसार आपणांस विनंतीपूर्वक मागणी करतो, की खालील कारणांमुळे सदरची सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून ठेवण्याच्या दंडात्मक कारवाईचा आदेश रद्द करण्यात यावा, ही विनंती.

(१) श्री साईबाबा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य पदाचे कामकाजाबाबत प्रशासनाने मला बजावलेल्या कारणे दाखवा नोटीसचा खुलासा, सबळ पुराव्यानिशी आवश्यक त्या कागदपत्रांसह मी सादर केलेला आहे. मी सादर केलेला खुलासा अथवा स्पष्टीकरण तत्कालिन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नाकारलेले नाही. याउलट माहितीच्या अधिकारात मला प्राप्त झालेल्या दस्तऐवजानुसार सादरकर्ते अधिकारी (अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग) यांनी प्रशासकीय अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) यांचेमार्फत मला बजावलेली कारणे दाखवा नोटीस, मी दिलेल्या खुलाशाचे अवलोकन करुन दप्तरी दाखल करण्याचा प्रस्ताव त्यांच्या दि.३/९/२०२० रोजी सादर केलेला आहे, असे आढळून येत आहे. (परिशिष्ट अ-६)

(२) मा.तदर्थ सिमतीच्या समोर दि.७ ऑगस्ट २०२० रोजी चक्रीय पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाच्या निर्णयामध्ये मा.तदर्थ समितीने मुद्दा क्र.०६ व ७ मध्ये नमुद केलेली वस्तुस्थिती या सर्व बाबींचा पुनःविचार /पुनर्वलोकन व्हावे. यामध्ये मी प्रशासनाला प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत प्रशासनास दि.२५/०७/२०१९ रोजी अहवाल दिलेला असल्याची माझ्या नावानीशी नोंद आहे. (परिशिष्ट-अ-७ व अ-८) त्यामुळे प्रशासनाने बजावलेली कारणे दाखवा नोटीस अवैध ठरते आणि त्यानुसार झालेली कारवाई अवैध आहे.

पान नंबर ५ वर...

(३) मा उच्च न्यायालयात दाखल करावयाच्या सिव्हील ॲप्लिकेशन (याचिका) मध्ये सदर शिक्षकांना मान्यता नसल्याचे मा.प्रशासकीय अधिकारी यांचे स्वाक्षरीने विधी विभागास दुरुस्ती कळविली होती. (परिशिष्ट अ-९) त्यामुळे त्यांना अवगत केले नाही हे चुकीचे आहे व त्यांनी केलेली तक्रार /रिपोर्ट चुकीचा ठरतो.(परिशिष्ट -अ-१०) त्यामुळे त्या आधारावर केलेली दंडात्मक कारवाई अवैध आहे.

(४) श्री साईबाबा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य पद माझ्या पदोन्ती साखळीत नाही. मात्र माझी शैक्षणिक पात्रता M.Sc.,M.Ed.,SET,NET अशी असल्याने तत्कालिन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माझी मागणी नसतांना मला दिलेल्या आदेशानुसार मी वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य म्हणून कामकाज पाहिलेले आहे आणि पाहत आहे. जुलै २०१८ ते आजपर्यंत या तीन शैक्षणिक वर्षाच्या काळात श्री साईबाबा महाविद्यालय नवीन असून सुध्दा विद्यार्थ्यांसाठी नामांकित महाविद्यालयात असलेल्या योजना व उपक्रम यामध्ये 'कमवा आणि शिका योजना' राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ, बहिशाल केंद्र श्री साईबाबा महाविद्यालयात सुरु केले. तसेच विद्यार्थ्यांसाठी सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती योजना सुरु केल्या असून, त्याचा फायदा महाविद्यालयातील बहुतांशी विद्यार्थ्यांना घेत आहेत. विद्यापीठात व परिसरात श्री साईबाबा महाविद्यालयाचे नावलौकिक वाढलेले आहे. त्यामुळेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कोविड-१९ आजाराच्या पार्श्वभूमीवर सप्टेंबर -२०२० मध्ये होत असलेल्या ऑफलाईन परीक्षेसाठी राहाता तालुक्यासाठी आपल्या श्री साईबाबा महाविद्यालयात परिक्षा केंद्र मंजुर केले, ही बाब महाविद्यालयासाठी तसेच संस्थानसाठी अभिमानास्पद आहे. श्री साईबाबा महाविद्यालयात ६३८ विद्यार्थी शिक्षण घेत आहे. त्यामुळे महाविद्यालयाचे कामकाज मी बेजबाबदार पध्दतीने पाहत आहे हे म्हणणे चुकीचे आहे.

(५) श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डीच्या प्रभारी प्राचार्य पदाचे अतिरिक्त कामकाज पाहण्यासाठी शासन नियमांनुसार देय असलेले अतिरिक्त कामकाजाचे अतिरिक्त विशेष वेतन मला दिलेले नाही तसेच अद्याप दिले जात नाही.

(६) श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डीच्या प्रभारी प्राचार्य पदाचे अतिरिक्त कामकाज पाहण्यासाठी मला माझ्या अध्यापकीय कामकाजातून सूट/सवलत दिलेली नाही व अद्याप जात नाही. (मला माझ्या Physics विषयाच्या पूर्णवेळ शिक्षक पदाचे अध्यापकीय कामकाज तसेच माझ्या Physics विषयाच्या रिक्तत असलेल्या आणखी एका शिक्षक पदाचे अतिरिक्त अध्यापकीय कामकाज मी विभागून करतो आहे.)

(७) श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डीच्या प्रभारी प्राचार्य पदाचे अतिरिक्त कार्यभार माझ्याकडे दिल्यापासून मी माझ्या मुळ पदासाठी असलेल्या दिर्घ मुदतीचा सुटटया अथवा इतर कोणत्याही सुटटया उपभोगलेल्या नाहीत. याउलट मी पुर्णवेळ श्री साईबाबा महाविद्यालयाचे कामकाज अत्यंत निष्ठेने व जबाबदारपणे करत आहे.तरीही माझ्यावर मी न केलेल्या चुकीसाठी आर्थिक दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

(८) सदरची दंडात्मक कारवाई माझ्या मूळ शिक्षक पदाच्या कामकाजाबाबत नसून तर अतिरिक्त कार्यभार असलेल्या प्रभारी प्राचार्य पदाचे कामकाजाबाबत आहे, की ज्याचे मला वेतन/मानधन मिळत नाही किंवा या कामकाजासाठी मला माझ्या शिक्षक पदाच्या कामातून सूट /सवलत नाही आणि अशा या कामाबददल बेजबाबदार असल्याचा सिध्द न झालेला खोटा आरोप ठेवून बळजबरीने केलेली आर्थिक स्वरुपाची दंडात्मक कारवाई अवैध ठरत आहे.

वर नमुद केलेली वस्तुस्थिती तथा वरील सर्व बाबींचा विचार केल्यास, मी दोषीच ठरत नसल्याने, माझ्यावर सन २०२१ ची वेतनवाढ रोखून धरणेबाबत केलेली दंडात्मक कारवाई अन्यायकारक ,ठरत आहे.त्यामुळे सदरची कारवाई रद्द करण्यात यावी आणि मला न्याय द्यावा, ही नम्र विनंती. " असे म्हटलेले आहे.

श्री.शिवगजे यांनी सदरचे अपील अर्जात जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१२८१/२०२० दि.१४.१०.२०२० रोजीचे आदेशान्वये त्यांना उपरोक्त प्रमाणे करणेत आलेली शिक्षा रद्द करणेबाबत विनंती केली आहे.

सदरचे श्री.शिवगजे यांचे अपील अर्जावर मा.अध्यक्ष महोदय, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती यांचे स्वाक्षरीने जा.नं.आस्था/१८३/२०२१ दि.२४ मे २०२१ रोजीचे पाठविलेल्या पत्रासोबत श्री.शिवगजे यांचा अपील अर्ज इकडील कार्यालयास पाठविलेला आहे

सदरचे पत्रात," अध्यक्ष या नात्याने या कार्यालयाकडे प्राप्त झालेली खालील नमुद प्रकरणे या समेत पाठवित आहे. सदरहू अपिल/अर्जावर निर्णय होण्याकरीता या प्रकरणांचे सर्व सबंधीत कागदपत्र तदर्थ समितीसमोर असणे आवश्यक आहेत. तसेच सेवानियम, नियमावली, चौकशी अहवाल, त्यांतील निष्कर्ष यावर सविस्तर विचार विनिमय होणे आवश्यक आहे. तरी सदरहू अपिल/अर्ज तदर्थ समितीच्या पुढील नियमित बैठकीमध्ये संबंधीच्या सर्व कागदपत्रांसह, सेवा नियम, नियमावली, खातेचौकशीचे सर्व कागदपत्र (असल्यास) इत्यादीसह तदर्थ समितीच्या समोर ठेवण्यात यावेत. " असे नमुद आहे.

पान नंबर ६वर...

सदरचे अर्ज मा.अध्यक्ष महोदय, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी दि.२४.०५.२०२१ रोजीचे पाठविलेले पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करणेत आलेले आहे. सदरचे अपील अर्जावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.२७.०५.२०२१ रोजी To much delayed असा अभिप्राय नोंदविलेला आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत:-

मा.अध्यक्ष महोदय, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी श्री.शिवगजे यांचे अपिल अर्जावर सेवानियम, नियमावली, चौकशी अहवाल, त्यातील निष्कर्ष यावर सविस्तर विचार विनिमय होणे आवश्यक आहे. नियमित बैठकीमध्ये संबंधीच्या सर्व कागदपत्रांसह, सेवा नियम, नियमावली, खातेचौकशीचे सर्व कागदपत्र (असल्यास) इत्यादीसह तदर्थ समितीच्या समोर ठेवण्यात यावेत. असे नमुद आहे.

श्री.शिवगजे यांना उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत कारणे दाखवा नोटीस देणेत येऊन, त्यास अनसरुन त्यांनी लेखी खुलासा सादर केलेला आहे. सदरचा त्यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा विनिमयातील किरकोळ दंडात्मक कार्यवाही अतर्गत त्यांना शिक्षा करणेत आलेली आहे. त्यांची याकरीता विभागीय चौकशी करणेत आलेली नसल्याने, त्यांचा चौकशी अहवाल/निष्कर्ष अहवाल नाही.

श्री.शिवगजे यांनी केलेल्या गैरशिस्तवर्तनाबाबत त्यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ५ (४) नुसार त्यांची सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखुन धरणेची शिक्षा त्यांना करणेत आलेली आहे. वेतनवाढ रोखुन धरण्याची शिक्षा भावी काळातील वेतनवाढीवर परिणामकारक होणार नाही. श्री.शिवगजे यांची सन २०२१ ची एक वेतनवाढ एक वर्ष रोखुन धरलेच्या नोंदी त्यांचे सेवा पुस्तकात घेण्यात याव्यात. असे आदेशात नमुद आहे.

श्री.विकास महादेव शिवगजे, सहा.शिक्षक,श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांचे दिनांक ०१.१२.२०२० रोजीचे अपील अर्जात त्यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१२८१/२०२० दि.१४.१०.२०२० रोजीचे आदेशान्वये करणेत आलेली शिक्षा रद्द करणेची विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे प्रकरण ५ अपिले कलम १७ नुसार मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे अपील अर्ज करण्याचा अधिकार असल्याने त्यांनी दि.०१.१२.२०२० रोजीचा अपील अर्ज सादर केलेला आहे

सबब, श्री.विकास महादेव शिवगजे, सहा.शिक्षक,श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी त्यांना करणेत आलेल्या शिक्षेबाबत केलेल्या अपिल अर्जावर निर्णय होण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

11/6/21

(काकूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

LAB - Meeting - 228 - 2021

विषय क्र.- ९६

158

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर
(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

विषय :- श्री.विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग-०४ कर्मचारी, श्री साईआश्रम भक्तनिवास सध्या आरोग्य विभाग यांचे दिनांक १५.०६.२०२१ रोजीचे अपील अर्जाबाबत...

विषयाची पुर्वपिठीका :-

(अ) श्री.पवार हे श्री साईआश्रम भक्तनिवास विभागामध्ये वर्ग-०४ कर्मचारी या पदावर कार्यरत होते. त्यांनी खालीलप्रमाणे गैरशिस्तवर्तन केल्याचे निदर्शनास आलेले आहे.

श्री.पवार यांनी शिर्डी येथे असलेल्या S-9 या चॅनलला खालीलप्रमाणे माहिती दिलेली आहे. त्यांनी इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे समोर बोलतांनी प्रशासनाची पुर्व परवानगी घेतलेली नाही.

श्री साई संस्थानमधील कामगार हे कोरोणाबाधीत कर्मचा-यांच्या सुरु असलेल्या मालीकेपुढे भयभीत झालेले असून रुग्णालय विभाग वगळता श्री साई संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या कुठल्याही कर्मचा-यांचे आणि त्याचे परिवाराचे लसीकरण अद्यापही संस्थानने केले नसुन, श्री साईबाबा संस्थान कर्मचा-याला साईबाबा कोव्हिड रुग्णालयामध्ये राखीव खाटा उपलब्ध करुन देण्यात याव्यात, अशी मागणी श्री साई एम्प्लॉईज क्रेडीट सोसा.चे संचालक श्री.विठ्ठल पवार यांनी केली आहे.असे म्हटलेले आहे.

श्री साईबाबा संस्थानमध्ये या कोरोणा महामारीमुळे कामगार भयभीत झालेला असून, लसीकरणाच्या बाबतीत प्रशासनाला वेळोवेळी निवेदन देण्यात आले. परंतु अद्यापपर्यंत कर्मच्या-यांना रुग्णालय विभाग वगळता लसीकरण करण्यात आलेले नाही. त्या कर्मचा-यांवर अवलंबून असणा-या कुटूंबातील पत्नी,आई-वडील व मुले यांनाही लसीकरण करणे गरजेचे आहे. तसेच श्री साईबाबा संस्थानमधील कर्मचा-यांना रुग्णालयामध्ये ॲडमीट करतांना राखीव खाटा उपलब्ध होत नाही आणि त्यामुळे अनेक कर्मचा-यांनी बाहेरील रुग्णालयाकडे उपचार घेतलेले असून, त्याची वैद्यकिय बीलेही अद्यापपर्यंत अदा करण्यात आलेले नाही. प्रशासनाचे बाबतीमध्ये कागदोपत्री घोडे नाचविण्याचे काम केल जात असून कामगारांना दिलासा देण्याचे काम मात्र केलं जात नाही आणि कामगार एक भयभीत अशा दडपणाखाली काम करत असून संरक्षण विभाग असेल, प्रसादालयील वाढपी असतील, कॅन्टीन विभाग असेल, वाहन विभाग असेल आणि भक्तनिवास असेल, रुग्णालय विभागातील काही कर्मचारी असतील त्यांना तीथे औषधे उपलब्ध होत नाही. तसेच खाटाही उपलब्ध होत नसल्यामुळे या कर्मचा-यांमध्ये प्रशासनाचे विरोधामध्ये अत्यंत नाराजी आहे. प्रशासनाने त्यांची गंभीर स्वरुपात दखल घ्यावी.आम्ही १८ मार्च रोजी एक निवेदन दिले, ०३ मे ला एक निवेदन दिले कि कर्मचा-यांचा नैसर्गिक विमा उतरविणे गरजेचे आहे. या महामारीमध्ये दररोज एक ते दोन कर्मचारी मयत असून, आतापर्यंत कर्मचा-यांचे रोजही मालीकाच चालू झालेली आहे. त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर त्वरीत कामावर घ्यावे आणि कामगार कल्यान निधी जो संस्थानकडे राखीव आहे या निधीतून तात्काळ कर्मचा-यांना विमा सरंक्षण मिळावं आणि नैसर्गिक विमा उतरविल्यानंतर त्या कर्मचा-याच्या कुटूंबाला अर्थिक स्थैर्यता लाभेल. तसेच ज्या कामगारांच्या बाबतीमध्ये प्रशासनाने ठोस अशा स्वरुपाचे निर्णय घेवून, सॅनिटायझर वगळता आणि मास्क वगळता साई संस्थानमधील कर्मचा-यांना कोविडचे काळात फार अशा काही वैद्यकिय सुविधा दिल्या जात नाही. त्यामुळे कर्मचा-यामध्ये नाराजीचा सुर आहे. या मयत झालेल्या कर्मचा-यांची मालीका थांबविण्याचे काम तात्काळ रुग्णालय प्रशासनाने करावे. कर्मचा-यांना खाटा उपलब्ध करुन दयावा व नैसर्गिक विम्या संदर्भात प्रशासनाने तात्काळ निर्णय घ्यावा अशी आमची प्रशासनाकडे मागणी आहे. व संस्थानच्या कायम, इनसोर्स तसेच आऊटसोर्स तसेच सर्व एकत्र मिळून जवळ जवळ १०० ते १५० कर्मचा-यांनी उपचार घेतलेले आहेत. त्यातील काही बरे झाले परंतु सध्या एक मालीका चालु झालेली आहे आणि कर्मचारी मयत होऊ राहिले आहे. त्या संदर्भामध्ये जवळजवळ २० ते २५ कर्मचारी मयत झाले असून, त्या रुग्णालयाच्या जे डॉक्टर्स आहेत हे एम.डी.फिजीशियन डॉक्टरची खरोखर तेथे आवश्यकता असतांना जर साई संस्थान आर एम ओ डॉक्टरांवर जर उपचार देत असाल तर त्या डॉक्टरांमुळे साई संस्थानच्या कामगारांचे बळी गेलेले आहे ही पोकळी न भरुन निघणारी आहे. त्या कुटूंबावरची आजची परिस्थिती पहाता प्रशासनाने त्या साई संस्थानमधील डॉक्टरांच्या बाबतीत योग्य तो निर्णय घेवुन कर्मचा-यांना तात्काळ वैद्यकिय सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात. प्रशासनाने राखीव स्वरुपाच्या खाटा उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत.कर्मचारी बेडसाठी वणवण करीत हिंडतात. असे म्हटलेले आहे.

श्री.पवार यांनी S-9 टी व्ही चॅनलला मुलाखत देतांना प्रशासनाची कोणतीही परवानगी घेतलेली नाही. श्री.पवार यांनी संस्थान प्रशासनावर S-9 टी व्ही चॅनलला मुलाखत देऊन चुकिचे व बेछुट आरोप केलेले आहे. सद्यस्थितीत श्री.पवार यांची नेमणूक साईआश्रम भक्तनिवास येथे असून त्यांचा साईबाबा व साईनाथ हॉस्पिटलला काहीही संबध नाही, असे असतांनाही त्यांनी हॉस्पिटल व संस्थान प्रशासनावर चुकीचे आरोप करुन श्री साईबाबा संस्थान व संस्थान हॉस्पिटल यांची बदनामी केली.

पान नंबर २ वर...

उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.पवार यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२४१/२०२१ दि.१२-०५-२०२१ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. त्यास अनुसरुन श्री.पवार यांनी दि.१७.०५.२०२१ रोजीचा सादर केलेला खुलासा अमान्य करण्यात येत आहे.

सबब, श्री.विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग-०४ कर्मचारी, श्री साईआश्रम भक्तनिवास, सध्या आरोग्य विभाग यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ (४) नुसार त्यांना उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा म्हणुन त्यांची सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखुन धरणेत येत आहे. वेतनवाढ रोखून धरण्याची शिक्षा भावी काळातील वेतनवाढीवर परीणामकारक होणार नाही. श्री.पवार यांची सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखुन धरलेच्या नोंदी त्यांचे सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

श्री.पवार यांना जा.नं./एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२९१/२०२१ दि.२१.०५.२०२१ रोजीचे आदेशान्वये उपरोक्तप्रमाणे शिक्षा करणेत आलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे प्रकरण ५ अपिले कलम १७ नुसार मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे अपील अर्ज करण्याचा अधिकार असल्याने त्यांनी दि.१५.०६.२०२१ रोजीचे अर्जान्वये अपील सादर केलेले आहे.

(ब) मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे श्री.पवार यांनी उपरोक्त शिक्षा रद्द करणेबाबतचा दि.१५.०५.२०२१ रोजीचा अपील अर्ज दि.१६.०५.२०२१ रोजी मा.अध्यक्ष महोदय, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना अग्रेषित केलेला स्वीय सहाय्यक यांचेकडे दि.१६.०५.२०२१ रोजी सादर केलेला आहे.

मा.अध्यक्ष महोदय, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचीकडे श्री.पवार यांनी उपरोक्त शिक्षा रद्द करणेबाबतचा दि.१५.०५.२०२१ रोजीचा अपील अर्ज सादर केलेला आहे.

त्यात त्यांनी," विधाने व मजकूर यांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून मी यापुर्वी जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२४१/२०२१, दि.१२/०५/२०२१ रोजी कारणे दाखवा नोटीसला दिलेला दि.१७/०५/२०२१ रोजीचा खुलासा या अपिलाचा भाग म्हणून वाचण्यात यावा. ही विनंती तसेच त्याची प्रत आपले अवलोकनार्थ या अपिलासोबत सादर करत आहे.

कार्यकक्षा:-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम-२०१३ (येथून पुढे याबाबत **सेवा विनियम** असा उल्लेख केला जाईल.) मधील नियम क्र.१४ नुसार मी सदरचे अपील करत आहे. या नियमात अशी तरतुद आहे की, तात्पुरत्या लागू असलेल्या कायद्यातील तरतुदीच्या आधीन राहून संस्थान कर्मचारी त्यामध्ये सेवा समाप्तीच्या लगेच अगोदर कोणत्याही वर्गात असलेल्या व्यक्तीचा समावेश होतो. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पारीत केलेला आदेशा विरुध्द समितीकडे अपील दाखल करु शकतो.

अपिलाची कालावधी मर्यादा:-

सेवा विनयम मधील नियम क्र.१५ मध्ये अशी तरतूद आहे की, कोणतेही अपील अपिलदाराला ज्या आदेशाविरुध्द अपील करावयाचे आहे त्या आदेशाची प्रत प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत दाखल केले पाहिजे. अन्यथा ते स्वीकारले जाणार नाही. संदर्भिय आदेश दि.२१/०५/२०२१ रोजीचा आहे.त्यामुळे अपील मुदतीत आहे.

अपिलाची कारणे:-

१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी माझ्या दि.१७/०५/२०२१ रोजीच्या खुलाशाचा मनःपूर्वक विचार केलेला नसून मला नैसर्गिक न्याय तत्वानुसार न्याय दिलेला नाही.

२) मी माझ्या दि.१७/०५/२०२१ रोजीच्या खुलाशात उपस्थित केलेले मुद्दे विचारात न घेता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी संदर्भिय आदेश पारीत केलेला आहे.

३) सेवा विनियम मधील नियम क्र.१० (२) मध्ये अशी तरतुद आहे की, कोणत्याही कालखंडासाठी संचयी परिणामसहीत वेतनवाढ रोखणे किंवा वेतनवाढ रद्द करणे प्रस्तावित करणेत आले असेल तर विनियम ८ उपविनियम (२) आणि (२७) मध्ये विशद केलेल्या पध्दतीने अशा प्रकारची दंडात्मक कारवाई संस्थानच्या कर्मचा-यांवर लादण्यापूर्वी, चौकशी केली जाईल.

महोदय, सदरच्या निर्णयानुसार संदर्भिय आदेश पारीत करण्यापुर्वी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी केलेली नाही. म्हणजेच या सेवा विनयमातील या नियमांचा भंग करण्यात आलेला आहे.

४) मी संस्थान कर्मचा-यावर होणा-या अन्यायाला, झालेल्या अन्यायाला तसेच न्याय हक्काच्या सनदशीर व कायदेशीर मार्गाने वाचा फोडली व फोडत आहे. मी साईबाबा संस्थान एम्प्लॉईज सोसायटी (कर्मचारी सोसायटी) संचालक असून, कामगार नेता आहे. याचा राग मनात धरुन संदर्भिय आदेशाने मला शिक्षा करण्यात आलेली आहे. तसेच मी साईआश्रम भक्तनिवास विभागात शिफ्ट सुपरवायझर म्हणून काम करत असतांना संदर्भ २ अन्वये माझी आरोग्य विभागात स्वच्छता कामगार पदी तडकाफडकी बदली केली आहे.

पान नंबर ३ वर...

घटनेची पार्श्वभूमी:-

१) मी दि.१८/०३/२०२१ रोजीचे निवेदन आपणासमोर व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर केलेले आहे. त्यात प्रामुख्याने पुढील मागण्या कर्मचारी हितासाठी केलेल्या आहेत. संस्थान कर्मचा-यांना कोरोना (कोव्हीड-१९) बाबत विमा उतरविणेत यावा. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकिर्ण२०२०/प्र.क्र.४/व्यय/९/दि.१४/०५/२०२१ नुसार संस्थान कर्मचा-यांना आर्थिक सहारय्य मिळावे, संस्थान कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांना कोरोना बाबतचे संपूर्ण उपचार मोफत करणेत यावेत, संस्थान रुग्णालयात बेड शिल्लक नसल्याने ज्या कर्मचारी व त्यांचे अवलंबीत कुटुंबातील सदस्य यांनी तातडीने खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत त्यांची बिले अदा करावीत.

२) मी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर दि.०३/०५/२०२१ रोजीचे निवेदन सादर केलेले असून, त्यामध्ये पुढीलप्रमाणे मागण्या केलेल्या आहेत. संस्थानचे विविध विभागात सेवा देत असताना २० ते २५ कर्मचारी जीव गमवावा लागला त्यांच्या कुटुंबांना शासन निर्णयाप्रमाणे आर्थिक मदत मिळावी, तसेच संस्थान कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांना संस्थानमार्फत मोफत लसीकरण करणेत यावे, संस्थान कर्मचारी व कुटुंबीय यांना कोरोना रोगाच्या उपचारासाठी राखीव बेड असावेत, कोरोनामुळे मयत झालेल्या कर्मचा-यांचे वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी मिळावी हया प्रामाणिक हेतूस्तव विनंती केलेली होती.

३) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२४१/२०२१ दि.१२/०५/२०२१ रोजी कारणे दाखवा नोटीस माझ्यावर बजावली. त्यात माझ्यावर असे आरोप ठेवणेत आला की, आपण शिर्डी येथील स्थानिक एस-९ टीव्ही चॅनेलला प्रशासनाच्या पूर्व परवानगी शिवाय पुढील प्रमाणे माहिती दिली. कोरोना रोगाच्या महामारीमुळे संस्थान कर्मचारी भयभीत झालेले आहेत. रुग्णालय विभाग वगळता इतर कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांचे लसीकरण संस्थानने केलेले नाही. कोरोना बाधित कर्मचा-यांस संस्थान रुग्णालयात खाटा उपलब्ध होत नाही. खाजगी उपचार घेतल्यास वैद्यकीय बीले अदा केली जात नाही.कर्मचा-यांना विमा उतरविणे गरजेचे आहे. संस्थान रुग्णालयात ऐनवेळेस एम.डी. डॉक्टर उपलब्ध नसतात. संस्थानने योग्य तो निर्णय घेऊन संस्थान कर्मचा-यांना वैद्यकीय सुविधा व बेड तात्काळ उपलब्ध करुन दयावेत. याप्रमाणे आपण हॉस्पीटल व प्रशासन यांचेवर चुकीचे बेछुट आरोप करुन बदनामी केलेली आहे.

४) मी वरील कारणे दाखवा नोटीस बाबत माझा दि.१७/०५/२०२१ रोजीचा खुलासा सादर केलेला आहे. त्यात मी स्पष्ट नमूद केले आहे की, मी चुकीचे आरोप करुन संस्थानची बदनामी केलेली नाही. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.०५/०५/२०२१ रोजी व दि.१३/०५/२०२१ रोजी प्रसार माध्यमांना जी माहिती दिली. त्याचाच आधार घेऊन मी वस्तुस्थिती मांडलेली आहे. तथापी सदर न्यूज चॅनेलने स्थानिक सामाजिक कार्यकर्ते श्री.सचिन चौगुले यांचीही प्रतिक्रीया घेऊन त्यांची बाईट नंतर सदरचे बातमीमध्ये माझी प्रतिक्रीया दाखविल्याने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मला कारणे दाखवा नोटीस बजावली मी कामगार हितासाठी मूलभूत हक्कांसाठी उचित न्याय मिळावा यासाठी प्रतिकीया व्यक्त केली असून त्यामध्ये कुठेही संस्थानची बदनामी केलेली नाही.

५) माझ्या खुलाशाचा योग्य तो विचार न करता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी आदेश जा.क्र.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२९१/२०२१ दि.२१/०५/२०२१ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून माझी सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून धरलेली आहे.

६) मी दि.२०/०५/२०२१ रोजी दि.२१/०५/२०२१ ते दि.०१/०६/२०२१ या कालावधीसाठी अर्जित रजेचा अर्ज सादर केला होता. त्यास अनुसरुन माझी सदरची अर्जित रजा प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास व निवासस्थाने प्रशासकीय अधिकारी यांनी मंजुर केलेली होती. परंतु अचानक प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास यांनी दि.२७/०५/२०२१ रोजीचे पत्राने मला असे कळविले की आपण दि.२१/०५/२०२१ ते दि.०१/०६/२०२१ पर्यंत अर्जित रजा मिळणेबाबत अर्ज दिलेला होता.परंतु कोव्हीड -१९ चे पार्श्वभूमीवर कामाचे अडचणीमुळे तुमची दि.२१/०५/२०२१ ते दि. २४/०५/२०२१ पर्यंत रजा मंजुर करणेत आली असून, पढील रजा मंजुर करता येणार नाही. याबाबत व त्वरीत डयुटीवर हजर व्हावे अशा आशयाचा एसएमएस भ्रमणध्वनीद्वारे कळविलेले आहे. परंतु आपण अदयापपर्यंत कामावर हजर झालेला नाहीत. सदरचे पत्र मी घरी नसतांना माझ्या घरावर चिकटविण्यात आले. माझे मुंबई येथील साडूबंधू यांचे कोरोनामुळे दु:खद निधन झालेले असल्याकारणामुळे मी त्यांचे कुटुंबीयांना भेटण्यासाठी मुंबई येथे गेलेलो असल्याने मी निवासस्थानी नसल्याने मी उदया आपणाकडून पत्र घेतो असे प्र.अधिक्षक यांना सांगितले तथापी त्यांनी माझ्या निवासस्थानी गावांतील लोकांसमोर नोटीस/पत्र चिटकविले. माझी दि.२१/०५/२०२१ ते दि.०१/०६/२०२१ या कालावधीची अर्जित रजा मंजुर झालेची नोंद हजेरी अभिलेखावर घेण्यात आली होती. माझी

कसल्याही प्रकरची कोव्हीड रुग्णांचया सेवेसाठी डयुटी नेमण्यात आलेली नसतांना माझी अर्जित रजा अचानक रद्द केली. याबाबत मी माझा दि.२८/०५/२०२१ रोजीचा सविस्तर पत्र प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास व निवासस्थाने प्रशासकीय अधिकारी यांना ई-मेलद्वारे सादर केलेले आहे. परंतु त्याचा विचार न करता याकामी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/३७२/२०२१ दि.०३/०६/२०२१ अन्वये माझेवर पुन्हा कारणे दाखवा नोटीस बजावली असून , त्यास अनुसरुन मी माझा दि.०७/०६/२०२१ रोजीचा खुलासा सादर केलेला आहे. त्याचा अदयाप पर्यंत विचार करण्यात आलेला नाही.

पान नंबर ४ वर...

७) माझी एस-९ चॅनलने घेतलेल्या प्रतिक्रीया व त्यानंतर मी सादर केलेल्या खुलाशानंतर मी साईआश्रम भक्तनिवास या विभागात शिफट सुरपवायझर म्हणून काम करीत असतांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माझया शैक्षणिक आर्हतेचा विचार न करता केवळ आकस व सूड बुध्दीने माझी आरोग्य विभागात स्वच्छता कामगार म्हणून बदली केलेली आहे. आदेशाचा अवमान होऊ नये मी आरोग्य विभागात रुजू झालेलो आहे. मी पदवीधर असून, मी सन २०१३ पासून लिपीक पदाचे कामकाज करीत आहे. तसेच माझे मराठी व इंग्रजी टायपिंगचा कोर्स पूर्ण केलेला असून, एमएससीआयटी संगणक कोर्स झालेले आहे.

८) माझी आई आजारी असल्याने त्यांचे उपचारासाठी मी दि.०६/०६/२०२१ रोजी रजा अर्जाद्वारे दि.१०/०६/२०२१ ते दि.१२/०६/२०२१ अखेर ०३ दिवस रजेची मागणी केली होती. परंतु दि.१०/०६/२०२१ रोजी संस्थान दूरध्वनीवरुन मला असे कळविणेत आले की, रजा नामंजुर करणेत आली. तुम्ही कामावर हजर व्हावे. वास्तविक रजा नामंजुर करणेस विशेष कारण नसतांना केवळ हेतू हाच आहे की मला वारंवार त्रास देणे, अडचणीत आणणे, मानसिक छळ करणे हाच प्रशासनाचा हेतू दिसत आहे.

युक्तीवाद:-

१) मी कर्मचारी हितासाठी प्रशासनास दि.१८/०३/२०२१ व दि.०३/०५/२०२१ रोजी निवेदन सादर केलेली आहेत. माहे मे-२०२१ अखेर २० ते २५ संस्थान कर्मचा-यांचा कोरोना (कोव्हीड-१९) आजाराने दुःखद निधन झालेले आहे. कोरोना रोगाचे प्राद्रुर्भावामुळे संस्थान कर्मचारी भयभीत झालेले आहेतण् अनेक कर्मचारी व त्यांचे कुटूंबातील सदस्य यांचे निधन झालेले असून, संस्थान रुग्णालयातील मदतीसाठी एक कामगार प्रतिनिधी त्यांच्या कुटुंबातील सदस्य या भावनेने मला त्यांनी भ्रमणध्वनीद्वारे मदतीसाठी याचना आर्त हाक दिलेली असून, प्रसंगानूसार मी त्यांना मदत केलेली आहे. संस्थान कर्मचारी यांनी मला साईबाबा संस्थान एम्प्लॉईज सोसायटीच्या माध्यमातून संचालक म्हणून निवडून दिलेले आहे. ते मला आपला प्रतिनिधी मानतात. अनेक कर्मचारी यांनी मदतीसाठी माझ्याशी संपर्क केला आहे व करत आहे.

२) कोरोना काळात संस्थान रुग्णालयाकडून संस्थान कर्मचा-यांना योग्य व आवश्यक त्या वैद्यकीय सुविधा, उपचार मिळत नाही. कामगारांचे लसीकरण नाही. कर्मचारी व त्यांचे अवलंबीत कुटुंबातील सदस्य यांना खाटा उपलब्ध नसतात. कर्मचा-यांचे विमा कवच नाही या व अशा अनेक कारणांमुळे संस्थान कर्मचारी यांचा कोव्हीड काळात मृत्यु झालेला असल्याने ही बाब स्थानिक ज्युन चॅनेलचे प्रतिनिधी याच्या लक्षात आली असता त्यांनी कर्मचारी सोसायटी संचालक व कामगार प्रतिनिधी या नात्याने माझ्याशी संपर्क साधला असता मी त्याचेसमोर वरीलप्रमाणे वस्तुस्थिती मांडली संस्थान रुग्णालय, प्रशासन यांची बदनामी करणेचा माझा हेतू नव्हता व नाही. सर्व कर्मचा-यांचे हितासाठी व त्यांचे मुलभुत हक्कांसाठी मी एस-९ चॅनेलकडे भावना/प्रतिक्रिया व्यक्त केली. मी संस्थान प्रशासन व व्यवस्थापन यांची बदनामी केलेली नाही. यापुर्वी अनेक संस्थान कर्मचारी यांनी मुलाखती दिलेल्या आहेत. त्यांनी संस्थानची पूर्व परवानगी घेतलेली नाही. त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करणेत आलेली नाही. परंतु संदर्भिय आदेशाने मला शिक्षा करण्यात आलेली आहे. याकामी प्रशासनाची पूर्व परवानगी घ्यावी लागते याबाबत मी अनभिज्ञ आहे. वास्तविक पाहता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कर्मचारी यांचेकरिता संस्थान वैद्यकीय सुविधांबाबत संवेदनशीलपणे कोरोना आपत्कालीन परिस्थिती योग्य प्रकारे हाताळली असती तर निश्चितपणे संस्थान कर्मचारी यांचा मृत्यु दर कमी असता, जे कर्मचारी कोरोना रोगामुळे मृत्युमुखी पडलेले आहेत अशा कुटुंबाला निदान सांत्वन/आधार देण्याची कुटुंब प्रमुख म्हणून मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची जबाबदारी आहे.

३) माझी दि.२१/०५/२०२१ ते दि.०१/०६/२०२१ या कालावधीसाठी अर्जित रजा मंजुर असताना अचानक दि.२५/०५/२०२१ पासूनची रजा नामंजुर केलेली आहे. वास्तविक रजा नामंजुर करणेसाठी खास विशेष कारण नव्हते व नाही. केवळ मला त्रास देणेचा काही वरिष्ठांचा दूषित हेतू आहे.

४) मी साईआश्रम भक्तनिवास विभागात शिफ्ट सुपरवायझर म्हणून काम करत असताना माझे काम उत्कृष्ट असताना माझे विरुध्द कोणाची तक्रार नसतांना केवळ मी कर्मचा-यांचे हितासाठी लढतो म्हणून सूड व आकस मनात ठेवून मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आरोग्य विभागात स्वच्छता कामगार म्हणून बदली केलेली आहे. आदेशाचा अवमान होऊ नये म्हणून मी आरोग्य विभागात रुजु झालेलो आहे.

५) मी दि.०६/०६/२०२१ रोजी ७० वर्षीय वयस्कर आईस वैद्यकीय उपचारासाठी दि.१०/०६/२०२१ ते दि.१२/०६/२०२१ या कालावधीसाठी रजा मागणी केली असता, काहीही विशेष कारण, अडचण नसताना माझी रजा ऐनवेळी नामंजुर केली आहे.

अशा प्रकारे मी केवळ कामगार हितासाठी आवाज उठवितो त्यांचे प्रश्नांसाठी लढतो म्हणून माझी ऐनवेळी रजा नामंजुर करणे, माझी आरोग्य विभागात स्वच्छता विभागात तडकाफडकी बदली, मला नोटीसा देणे ही मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित विभागप्रमुख यांची कृत्य म्हणजे केवळ मला शारीरीक मानसिक, आर्थिक त्रास देणे अडचणीत आणणे तसेच सामाजिक मानहानी करणे . हा दूषीत हेतू होता व आहे.

तरी माझी महोदय आपणांस नम्र प्रार्थना की वरील सर्व बाबींचा सहानुभुती पूर्वक विचार करुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे संदर्भिय दोन्ही आदेश रद्द करणेत यावी ही विनंती. " असे म्हटलेले आहे.

पान नंबर ५ वर...

श्री.पवार यांनी सदरचे अपील अर्जात जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२९१/२०२१ दि.२१.०५.२०२१ रोजीचे आदेशान्वये त्यांना उपरोक्त प्रमाणे करणेत आलेली शिक्षा रद्द करणेबाबत विनंती केली आहे.

श्री.पवार यांचे अपील अर्जावर मा.अध्यक्ष महोदय, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती यांचे स्वाक्षरीने जा.नं.स्वीय/२६/२०२१ दि.१७ जुन २०२१ रोजीचे पाठविलेल्या पत्रासोबत श्री.पवार यांचा अपील अर्ज इकडील कार्यालयास पाठविलेला आहे.

सदरचे पत्रात," सदरचे पत्रात," (१) अध्यक्ष या नात्याने या कार्यालयाकडे प्राप्त झालेली खालील नमुद दोन प्रकरणे या समेत पाठवित आहे. सदरहू अपिल/अर्जावर निर्णय होण्याकरीता या प्रकरणांचे सर्व सबंधीत कागदपत्र तदर्थ समितीसमोर असणे आवश्यक आहेत. तसेच सेवानियम, नियमावली, चौकशी अहवाल (असल्यास), त्यातील निष्कर्ष यावर सविस्तर विचार विनिमय होणे आवश्यक आहे. तरी सदरहू अपिल/अर्ज तदर्थ समितीच्या पुढील नियमित बैठकीमध्ये संबंधीच्या सर्व कागदपत्रांसह, सेवा नियम, नियमावली, खातेचौकशीचे सर्व कागदपत्र (असल्यास) इत्यादीसह तदर्थ समितीच्या समोर ठेवण्यात यावेत.

अ.नं.	अपीलकत्याचे नाव	दिनांक
१)	श्री.किशोर साहेबराव गवळी, प्रभारी ध्वनीक्षेपन व टेलीफोन विभाग प्रमुख, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी	२८.०५.२०२१
२)	श्री. विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग -०४ कर्मचारी, श्री साईआश्रम भक्त निवासस्थान सध्या आरोग्य विभाग, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी	१६.०६.२०२१

(२) आज दि.१७ जुन २०२१ रोजी श्री.साईनाथ रुग्णालय, शिर्डी या विभागामार्फत चक्रीय पध्दतीने आणलेले दोन विषय (१) श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोबर २०२० ते मार्च २०२१ अखेर वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३,२७,१२,८९५/- व (२) श्री साईबाबा संस्थान मार्फत श्री साईनाथ रुग्णालय येथे डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर सुरु करणेबाबत हे विषय चक्रीय पध्दतीने सादर करण्याची कुठलीही तातडी भासत नाही व या विषयावर तदर्थ समितीच्या नियमित बैठकीत सखोल चर्चा होणे आवश्यक दिसते करीता हे दोन्ही विषय परत पाठवत आहे ते तदर्थ समितीच्या पुढील नियमित बैठकीत ठेवण्यात यावेत." असे नमुद आहे." असे नमुद आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत:-

मा.अध्यक्ष महोदय, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी श्री.पवार यांचे अपिल अर्जावर सेवानियम, नियमावली, चौकशी अहवाल, त्यातील निष्कर्ष यावर सविस्तर विचार विनिमय होणे आवश्यक आहे. नियमित बैठकीमध्ये संबंधीच्या सर्व कागदपत्रांसह, सेवा नियम, नियमावली, खातेचौकशीचे सर्व कागदपत्र (असल्यास) इत्यादीसह तदर्थ समितीच्या नियमीत बैठकीत ठेवण्यात यावेत. असे नमुद आहे.

श्री.पवार यांना उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत कारणे दाखवा नोटीस देणेत येऊन, त्यास अनुसरुन त्यांनी दि.१७.०५.२०२१ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला आहे. त्यांनी दिलेला खुलासा अमान्य करण्यात आलेला आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ (४) नुसार सेवा विनिमयातील किरकोळ दंडात्मक कार्यवाही अंतर्गत त्यांना शिक्षा करणेत आलेली आहे.

श्री.पवार यांनी केलेल्या गैरशिस्तवर्तनाबाबत त्यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ५ (४) नुसार त्यांची सन २०२१ ची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखुन धरणेची शिक्षा करणेत आलेली आहे. वेतनवाढ रोखुन धरण्याची शिक्षा भावी काळातील वेतनवाढीवर परिणामकारक होणार नाही. श्री.पवार यांची सन २०२१ ची एक वेतनवाढ एक वर्ष रोखुन धरलेच्या नोंदी त्यांचे सेवा पुस्तकात घेण्यात याव्यात. असे आदेशात नमुद आहे.

श्री. विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग -०४ कर्मचारी, श्री साईआश्रम भक्त निवासस्थान सध्या आरोग्य विभाग यांचे दिनांक १५.०६.२०२१ रोजीचे अपील अर्जात त्यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२९१/२०२१ दि.२१.०५.२०२१ रोजीचे आदेशान्वये करणेत आलेली शिक्षा रद्द करणेची विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे प्रकरण ५ अपिले कलम १७ नुसार मा.अध्यक्ष महोदय, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे अपील अर्ज करण्याचा अधिकार असल्याने त्यांनी दि.१५.०६.२०२१ रोजीचा अपील अर्ज सादर केलेला आहे

प्रस्ताव-

श्री. विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग -०४ कर्मचारी, श्री साईआश्रम भक्त निवासस्थान सध्या आरोग्य विभाग यांना करणेत आलेल्या शिक्षेबाबत त्यांनी दि.१५.०६.२०२१ रोजी केलेल्या अपिलावर निर्णय होण्यासाठी सदरचा मा.तदर्थ समितीसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ९७

मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर

सामान्य प्रशासन शाखा (आस्थापना)

विषय: डॉ. आकाश रामहरी किसवे, नायब तहसीलदार यांचे प्रशासकीय अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तवयवस्था, शिर्डी या प्रतिनियुक्तीचे पदावरील मुदतवाढीबाबत.... .... .

टिपणी –

मान्यतेस्तव सविनय सादर,

डॉ. आकाश रामहरी किसवे, नायब तहसीलदार, ता. नांदुरा, जि. बुलढाणा यांची महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा व निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ३९ व ४० आणि सदर नियमांच्या परिशिष्ट–दोन मध्ये नमूदकेलेल्या अटी व शर्ती यांच्या अधीन राहून प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवसथा, शिर्डी, या पदावर महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन आदेश क्र.सांसवि-१०१८/६९४/ प्र.क्र.७८/का. सोळा, दि. २५ जून २०१८ नुसार दिनांक २५/०६/२०१८ पासून प्रथमतः एक वर्षासाठी किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार डॉ. आकाश रामहरी किसवे, हे प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या पदावर **दि. २५/०९/२०१८ रोजी मध्यान्हपूर्व हजर झाले आहेत.**

उपरोक्त संदर्भ क्र. २ नुसार जा.क्र. एसएसएस/ साप्रशा / आस्था/ १४६४/ २०१९ दि. १९/०७/२०२९ नुसार डॉ. आकाश रामहरी किसवे, हे प्रशासकीय अधिकारी यांचे प्रतिनियुक्तीस पुढील दोन वर्षाकरीता मुदतवाढ मिळणेसाठी मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र. ३ नुसार विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र. सासंवि-१०१८/६९४/ प्र.क्र.७८/ का. १६, दिनांक २२ ऑगस्ट, २०१९ नुसार डॉ. आकाश रामहरी किसवे, हे प्रशासकीय अधिकारी यांचे प्रशासकीय अधिकारी या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नियुक्तीस पुढील दोन वर्षासाठी किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत या पैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

डॉ. आकाश रामहरी किसवे, यांचेबाबत महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन आदेश क्र.सांसवि-१०१८/६९४/ प्र.क्र.७८/का. सोळा, मंत्रालय मुंबई-४००.०३२, दि. २५ जून २०१८ पासून नेमणूक करणेत आलेली असल्यामुळे त्यांचे नेमणूक दिनांक २४ जून, २०२१ रोजी तिन वर्षाचा कालावधी पूर्ण होत आहे.

त्यानुसार डॉ. आकाश रामहरी किसवे, प्रशासकीय अधिकारी यांनी दिनांक ०७/०७/२०२१ रोजीचे अर्जान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे प्रशासकीय अधिकारी या पदावरील प्रतिनियुक्तीस पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्यानुसार डॉ. आकाश रामहरी किसवे, यांचे प्रतिनियुक्तीस पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीन निर्णयार्थ सादर करणेत आला होता.

त्यावर मा. न्या. सुधाकर वें यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा मा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्देशीत केलेले आहे-

It seems that 5 post of Administrative Officer are sanctioned in Staffing Pattern. Out of them, two post are reserved for appointment on deputation. Then three posts are to be filled in byu appointment. So explain, (1) whether these three post are appointed or not? And (2) If extension to Shri Kisve is not sought, which functions will be affected?

मा. श्रीमती गीता प्र. बनकर, सहायक धर्मादाय आयुक्त–तथा- सदस्य तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्देशीत केलेले आहे-

प्रस्ताव वाचला प्रस्तावावरुन डॉ. आकाश रामहरी किसवे यांच्या ३ वर्षाचा कालावधी २४ जून, २०२१ रोजी पूर्ण झालेला आहे. संस्थानमध्ये ५ प्रशासकीय अधिकारी यांची मंजूरी आहे. त्या पैकी २ पदे ह्या प्रतिनियुक्तीनी भरल्या जातात. त्या अनुषंगाने ३ पदे भरणेचे आहेत. परंतू या प्रस्तावावरुन हे तीन पदे नियुक्त केलेले आहेत किंवा कसे हे अवगत होत नाही. तसेच डॉ. आकाश रामहरी किसवे यांना मुदतवाढ दिली नाही तर त्या अनुषंगाने सविस्तर सादर करावे.

विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक सासंवि २००९ / ४३३ /(३७ /०९) /का. १६, दिनांक ०७ ऑगस्ट, २००९८ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचा आकृतीबंधास मान्यता देणेत आलेली आहे. मंजूर आकृतीबंधानुसार प्रशासकीय अधिकारी या संर्वगाची एकूण ०५ पदे मंजूर आहेत. शक्यतो संस्थानच्या मंजूर आकृतीबंधातील अधिकतम अधिकारी शासनाकडून प्रतिनियुक्तीवर घ्यावीत, असे नमूद केलेले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८/०७/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६३३ खालीलप्रमाणे झालेला आहे-

पान २ वर. कृ.म.प...

" संस्थानचा दिवसेंदिवस वाढता व्याप व नवीन संगणकीय माहिती तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी विचारात घेता सध्या रिक्त असणा-या प्रशासकीय अधिकारी या पदांच्या ५०% पदांवर शासनाकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेमार्फत निवड करण्यात आलेल्या तहसिलदार संवर्गातील व अन्य संवर्गातील अधिका-यांना प्रतिनियुक्तीवर घेण्यात यावे व उर्वरित ५०% पदे संस्थान सेवेतील कर्मचा-यांमधून पदोन्नतीने घेणेत यावे आणि एक प्रशासकीय अधिकारी पद तांत्रिक दृष्टया संस्थानचे कामाचे स्वरुप पहाता संस्थाननरे ठरविलेल्या आवश्यक शैक्षणिक पात्रता व कामाचा अनुभव असलेल्या संवर्गातील घेणेबाबत प्रस्ताव सादर करावा. "

सद्यस्थितीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मंजूर आकृतीबंधानुसार प्रशासकीय अधिकारी या संवर्गाचे मंजूर ०५ पदांपैकी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १५ मार्च, २०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २११ नुसार नेमणूक करणेत आलेल्या ०४ प्रशासकीय अधिकारी यांचेपैकी तीन प्रशासकीय अधिकारी सेवानिवृत्त झालेले असून सध्या श्री. दिलीप त्र्यंबकराव उगले, हे एकच प्रशासकीय अधिकारी कार्यरत आहे. श्री. दिलीप त्र्यंबकराव उगले, यांना तात्कालिक आधारावर (on Ad-hoc Basis promation) पदोन्नती नेमणूक देण्यात आलेली आहे.

तसेच डॉ. आकाश रामहरी किसवे यांच्या प्रतिनियुक्तीने प्रशासकीय अधिकारी या पदावर नेमणूक करणेत आलेली आहे. उर्वरीत तीन पदांवर कुठल्याही प्रकारची नेमणूक अथवा पदोन्नती देणेत आलेली नाही. तथापि प्रशासकीय कामकाजाचे सोईसाठी मुख्य लेखाधिकारी- प्रतिनियुक्ती, प्रभारी कार्यकारी अभियंता, प्रभारी पाणी पुरवठा विभाग प्रमुख व लेखाधिकारी यांचेकडे जा.क्र.एसएसएस / साप्रशा /आस्था /६३१/ २०२१ दिनांक २२ जून, २०२१ नुसार त्यांचे मुळ पदाचे कामकाज सांभाळून प्रशासकीय अधिकारी पदाचे अतिरिक्त काम तदर्थ स्वरुपात सोपविणेत आलेले आहे. श्री किसवे हे वगळले तर ०५ पैकी एकाच पदावर नियमीत प्रशासकीय अधिकारी आहे. उर्वरीत प्रशासकीय अधिकारी यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. त्यामुळे त्यांचेवर अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे.

डॉ. आकाश रामहरी किसवे, हे प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या पदावर दि. २५/०९/२०१८ रोजी मध्यान्हपूर्व हजर झालेले असल्याने त्यांचा प्रतिनियुक्ती कालावधी कोणत्या तारखेस समाप्त होईल याबाबत मार्गदर्शन मिळणेकामी मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना जा.क्र. एसएसएस/साप्रशा / आस्था / ११७८/ २०२१ दिनांक ०७/०७/२०२१ नुसार विनंती करणेत आलेली होती.

त्यास अनुसरुन विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन क्रं.सासंवि- १०१८/ ६९४/ प्र.क्र.७८/ का.१६ दिनांक १९/०७/२०२१ रोजीचे पत्रान्वये डॉ. आकाश रामहरी किसवे, प्रशासकीय अधिकारी, यांचा प्रतिनियुक्ती कालावधी दि. २१/०८/२०२१ (म.नं.) समाप्त होईल असे कळविलेले आहे.

डॉ. आकाश रामहरी किसवे, प्रशासकीय अधिकारी प्रतिनियुक्ती कालावधी दिनांक २१/०८/२०२१ रोजी समाप्त होत असल्याने. डॉ. किसवे यांचेनंतर संस्थानकडे फक्त एकच पूर्ण वेळ प्रशासकीय अधिकारी राहतील संस्थानचे कामकाज सुरळीत राहणे कामी डॉ. आकाश रामहरी किसवे, प्रशासकीय अधिकारी यांचे प्रतिनियुक्तीस मुदतवाढ मिळणे आवश्यक आहे.

सबब डॉ. आकाश रामहरी किसवे, प्रशासकीय अधिकारी, यांचे प्रतिनियुक्तीस पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

विभागाचा अभिप्राय: डॉ. आकाश रामहरी किसवे, प्रशासकीय अधिकारी, यांचे प्रतिनियुक्तीस दिनांक २१/०८/२०२१ पासून पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ मिळणेबाबतचे निर्णयार्थ सदरचा प्रस्तवा मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सविनय सादर

29/07/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

LAB-meeting-170-2021

1858

1243 CEO

विषय क्र.- ९८

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर 165

(कामगार विभाग)

विषय:- मा.कामगार/औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे श्री साईबाबा संस्थानचे अॅडव्होकेट/ सल्लागार पॅनल नेमणूकीस मान्यता मिळणेबाबत...

टिपणी-

कामगार विभागामार्फत मा.कामगार न्यायालय व औद्योगीक न्यायालय येथे कामगारांच्या संदर्भातील दाव्यांचे कामकाज चालते. संस्थानचे वतीने सध्या अॅड. अशोकराव पाटील, अहमदनगर हे कामकाज पहातात. सध्या संस्थानचे कामगार / औद्यागीक न्यायालय यांचे पॅनलवर एक मात्र सल्लागार आहेत. मा.कामगार व औद्योगीक न्यायालय यांचेकडे सध्या २० केसेस चालू आहेत. न्यायालयीन कामकाज वेळेवर होणे अपेक्षित असल्याने व अॅड.अशोकराव पाटील यांचेकडे न्यायालयीन कामकाजाचा व्याप पहाता, संस्थानचे काम वेळेवर होणेसाठी मा.कामगार न्यायालय व औद्योगीक न्यायालय येथे,कामकाजासाठी नव्याने संस्थानचे अॅडव्होकेट/सल्लागार यांचे पॅनल असणे गरजेचे आहे.

मा.कामगार न्यायालय व औद्योगीक न्यायालय, अहमदनगर येथे संस्थानचे न्यायालयीन, पॅनलवर कामकाज पहाणेसाठी इच्छुक अॅडव्होकेट यांचे कडून त्यांची आवश्यक शैक्षणिक पात्रता /अर्हता, इतर कागदपत्रेबाबत संस्थानचे ई-मेलवर अर्ज मागवीता येईल. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात देऊन प्रसिध्द करता येईल.

संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाच्या जाहीरातीचा मसुद्यात खालील प्रमाणे अटी व शर्ती नमुद करता येईल.

१. मा.कामगार न्यायालय व औद्योगीक न्यायालयातील संस्थानचे कामकाज पहाण्यासाठी इच्छुक अर्जदारांचा मा.कामगार न्यायालय व औद्योगीक न्यायालयातील कामकाजाचा १० वर्षाचा नियमित सराव असावा.
२. अर्जदार किंवा फर्म यांची मा.कामगार न्यायालय व औद्योगीक न्यायालय, अहमदनगर / बार कौन्सील महाराष्ट्र आणि गोवा येथे नोंदणी झालेली असावी.
३. अर्जदारावर कोणत्याही स्वरुपाचा फौजदारी गुन्हा कुठल्याही न्यायालयात दाखल झालेला नसावा किंवा प्रलंबीत नसावा. तसेच कुठल्याही पोलीस स्टेशनला त्यांचे विरुध्द फौजदारी तक्रार दाखल झालेली नसावी किंवा प्रलंबीत नसावी. व याबाबत त्यांनी सक्षम प्राधिका-यांसमोर केलेले शपथपत्र दाखल करणे आवश्यक आहे.
४. विनामुल्य सेवा देणा-या अर्जदारांना प्राधान्य देण्यात येईल. तथापी जे विधिज्ञ फी स्विकारु इच्छितात त्यांनी मा.कामगार न्यायालय व औद्योगीक न्यायालयातील संस्थानच्या प्रकरणाची एकुण फी किती आकारणार संस्थानने एखाद्या विषयाचे बाबतीत आपले कायदेशीर मत मागवल्यास अशा प्रकरणात किती फी आकारणार व इतर तत्सम गोष्टींसाठी किती फी आकारणार, अशा रितीने आपणास संस्थानकडून किती मानधनाची / फी ची अपेक्षा आहे, याबाबतचा स्पष्ट उल्लेख अर्जामध्ये करावा.
५. अर्जदार यांनी यापुर्वी मा.कामगार न्यायालय व औद्योगीक न्यायालयात संस्थानच्या विरोधात काम केलेले नसावे. तसेच सध्याही अर्जदार संस्थानचे विरोधात काम करत नसावा व संस्थानचे पॅनलवर नेमणूक झाल्यास संस्थानचे हिताचे विरोधात काम करणार नाही, अशी लेखी हमी अर्जदारास द्यावी लागेल.
६. संस्थानचे पॅनलवर नेमणूक केलेल्या अॅडव्होकेटची / कायदा सल्लागाराची नेमणूक ही तात्पुरत्या स्वरुपाची असून सर्व अॅडव्होकेट्स चा कालावधी नेमणूक तारखेपासून पुढील आदेश होई पावेतो राहील. तसेच संस्थान पॅनलवर नेमलेल्या अॅडव्होकेटला संस्थानच्या सेवेत नोकरीवर हक्क सांगता येणार नाही.
७. पॅनलवरील अॅडव्होकेटच्या संख्येचे बंधन राहणार नाही.
८. संस्थानचे पॅनलवर नियुक्ती झाल्यानंतर अर्जदाराने दिलेली माहिती चुकीची आढळून आल्यास किंवा पॅनलवरील नियुक्तीनंतर अर्जदाराच्या काही आक्षेपार्ह गोष्टी संस्थानचे हिताचे विरोधात आढळून आल्यास त्यांना विना नोटीस संस्थानचे पॅनलवरुन कमी केले जाईल. व सदर अर्जदार विधिज्ञा विरुध्द त्यांचेशी संबंधीत बार कौन्सीलकडे / बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांचेकडे तक्रार करण्याचा अधिकार संस्थानकडे राखून ठेवत आहे.

पान नं. ०२ वर ... ..

९. मा.कामगार न्यायालय व मा. औद्योगीक न्यायालयात काम पहाणा-या ॲडव्होकेटने सामान्यपणे आकलन होईल अशी सर्व माहिती व सल्ला संस्थानला द्यावा लागेल.

१०. संस्थान पॅनलवर नेमणूक होणेसाठी अर्जदार – ॲडव्होकेट श्री साईबाबांचा भक्त असावा.

११. संस्थान पॅनलवर नेमणूक केलेल्या ॲडव्होकेटची नेमणूक कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार संस्थानला राहील. व तशी नेमणूक रद्द केल्यावर संबंधीत वकीलाने काम न पहाणे व सुपूर्त केलेले कागदपत्र संस्थानला परत देणे बंधनकारक राहील.

विभागाचा अभिप्राय-

मा.कामगार न्यायालय, मा.औद्योगीक न्यायालयात ॲडव्होकेट पॅनल तयार करणेकामी जाहिरात मसूद्यातील अटी व शर्तीप्रमाणे सदरची जाहिरात माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करुन इच्छुक उमेदवारांना त्यांचे अर्ज saibaba@sai.org.in व labour@sai.org.in या ई-मेल वर आवश्यक कागदपत्रांसह मागविता येईल, प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन पात्र झालेल्या ॲडव्होकेट यांचा पॅनल तयार करणेकामीचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

11/6/21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

LAB-Meeting-172-2021

विषय क्र.- 9@

मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर
(कामगार विभाग)

विषय- श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के,सेवानिवृत्त जनसंपर्क अधिकारी, यांचे रुपये १७,५०,०००/-रक्कमे बाबत...

टिपणी-

श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के हे दि.२१-०४-१९९२ पासून ते दि.२०-०४-१९९४ अखेर पर्यंत या परिविक्षाधिन कालावधीत जनसंपर्क अधिकारी म्हणून संस्थान सेवेत कार्यरत होते.तथापी मुळ व वाढीव परिविक्षाधीन कालावधीमध्ये श्री.म्हस्के यांचे काम समाधानकारक आढळुन न आल्यामुळे **दि.२०-०४-१९९४** रोजी त्यांची सेवा संपुष्टात आणण्यात आली.सदर सेवा समाप्ती संदर्भात श्री.म्हस्के यांनी मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे संस्थान विरुध्द **तक्रार (यु.एल.पी.) क्र.४१/१९९४** हि कोर्ट केस दाखल केली होती. त्यामध्ये मा.कामगार न्यायालयाने श्री.म्हस्के यांना सलग सेवा धरुन, मागील काळातील बॅक वेजेस सेवा समाप्ती तारखेपासून देवुन (माहे जुलै-१९९६ ते माहे नोव्हेंबर २००२ हा कालावधी वगळून) पुर्ववत कामावर हजर करुन घ्यावे असा **आदेश दि.०५-०१-२००६** रोजी श्री.म्हस्के यांचे बाजूने दिला होता.

मा.कामगार न्यायालयाचा दि.०५-०१-२००६ रोजीचा आदेश बेकायदेशीर ठरवून, रद्द होवून मिळावा याकरीता संस्थानने श्री.म्हस्के यांचे विरुध्द मा.औदयोगीक न्यायालय, अहमदनगर येथे **रिव्हिजन (युएलपी) क्र.११/२००६** व श्री.म्हस्के यांनी माहे जुलै ९६ ते माहे नोव्हेंबर २००२ या कालावधीतील बॅक वेजेससह कामावर रुजू करुन घ्यावे या मागणीसाठी संस्थान विरुध्द **रिव्हिजन (युएलपी) क्रं.१९/२००६** दाखल केले होते.सदर दोन्हीही रिव्हिजन संदर्भात मा.औदयोगीक न्यायालय, अहमदनगर यांनी **दि.०३-०७-२००८** रोजी श्री.म्हस्के यांना पुर्ववत कामावर न घेता, व बॅक वेजेस न देता **नुकसान भरपाई पोटी रु.७०,०००/- आदा** करणेत यावे.असा आदेश देवून रिव्हिजन (युएलपी) क्रं.११/२००६ पार्टली अलाऊड केले व रिव्हीजन (युएलपी) क्रं.१९/२००६ डिसमिस करुन निकाली काढले.**सदर आदेशास अनुसरुन श्री.म्हस्के यांना रु.७०,०००/- दि.२४-०७-२००८ रोजीचे डिमांड ड्राफ्ट अन्वये अदा करणेत आले.**

त्यानंतर श्री.म्हस्के यांनी मा.औदयोगीक न्यायालय, अहमदनगर यांचे **दि.०३-०७-२००८** रोजीचे आदेशा संदर्भात संस्थान विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्रं.५६२०/२००८ दाखल केले.त्यामध्ये मा.सिंगल जज्ज, उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी **दि.१५-०१-२०१०** रोजी आदेश करुन सदर रिट पिटीशन ॲडमीट करुन, मा.औदयौगीक न्यायालयाचे दि.०३-०७-२००८ रोजीचे आदेशास स्थगिती (स्टे) दिला होता.सदर दि.१५-०१-२०१० रोजीचा आदेश रद्द होवून मिळावा म्हणून संस्थानने श्री.म्हस्के यांचे विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथील डिव्हिजनल बेंच समोर **लेटर्स पेटंन्ट अपिल क्रं.५९/२०१० दाखल केले होते** त्यामध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी **दि.०८-०८-२०११ रोजी "रेसपॉन्डन्ट** श्री.म्हस्के यांनी दि.०५-०९-२०११ पासून पुर्ववत डयुटीवर हजर व्हावे.त्यांना कायदयाप्रमाणे प्रत्येक महिन्यास वेतन देण्यात यावे.कामगार न्यायालयाने दिलेल्या बॅक वेजेसला स्थगिती देण्यात आली" असा आदेश दिला आहे.

सदर आदेशास अनुसरुन श्री.म्हस्के हे दि.०५-०९-२०११ पासून संस्थानचे प्रकाशने विभागात जनसंपर्क अधिकारी म्हणून पुर्ववत सेवेत रुजू झाले आहे.तथापी श्री.म्हस्के हे दि. ०५-१०-२०११ पासून कामावरुन गैरहजर आहे.दरम्यानचे काळात श्री.म्हस्के यांचे प्रकरणां संदर्भात मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०९-२०११ रोजीचे सभेमध्ये चर्चा होवून **"मा.औरंगाबाद खंडपीठाने लेटर्स पेटंन्ट अपील क्रं.५९/२०१० मध्ये दि.०८-०८-२०११ रोजी केलेला आदेश हा अंतरिम आदेश आहे.श्री.म्हस्के यांचे संबधीत मुळ रिट पिटीशन न्याय प्रविष्ठ असून, प्रलंबीत आहे.त्यात श्री.म्हस्के यांनी दि.२०-०४-१९९४ पासून जनसंपर्क अधिकारी पदावर सलग सेवा धरुन, त्यानुसार सर्व आर्थीक लाभ मिळावेत अशी मागणी केलेली आहे.ही बाब विचारात घेवुन,श्री.म्हस्के यांनी त्यांची पुढील उर्वरित संस्थान सेवा सोडुन दयावी व चालु असलेल्या कोर्ट केसेस विना अट मागे घ्याव्यात या अटीवर तडजोडीने त्यांना रु.१७,५०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख पन्नास हजार) मात्र देण्यात यावेत.**

(पा.नं.२ वर..)

मात्र कोर्ट केस काढून घेतल्यानंतर व उर्वरित संस्थान सेवा सोडण्याबाबतचा तडजोडनामा मंजुर झाल्यानंतर त्यांना रक्कम आदा करावी."असा आयत्या वेळेचा निर्णय क्रं.७६०(०९) संमत झालेला आहे.

सदर निर्णयास अनुसरुन श्री ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांना इकडील जा.नं.एसएसएस /वशी-७ए/५११५/२०११ दिनांक १२/०१/२०१२ रोजीचे पत्रान्वये मा.उच्च न्यायालय,खंडपीठ , औरंगाबाद येथे चालु असलेल्या कोर्ट केसेस विना अट काढुन (विड्रान करुन) घेणेबाबत तडजोड नामा करुन देणेबाबत लेखी कळविणेत आलेले होते.

त्यास अनुसरुन श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांनी जनसंपर्क अधिकारी या पदाचा राजीनामा मंजुर करणेबाबत दि.२८-०३-२०१२ रोजीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "मा.व्यवस्थापन मंडळ, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांच्या बरोबर तडजोड होवून, दि.२४-०९-२०११ च्या व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय क्रं.१८ व निर्णय क्रं.७६० नुसार हायकोर्टातील प्रलंबीत मुळ दावा काढुन घ्यायचा व संस्थान सेवा सोडून दयायची.या अटीवर रु.१७,५०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख पन्नास हजार) देण्याचा निर्णय विश्वस्तमंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मंजूर झाला.या निर्णयाला अधिन राहून मी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाकडे प्रलंबित असलेली याचीका क्रं.५६२०/२००८ काढुन घेण्यासाठी केलेल्या अर्जावर सुनावणी होवुन हा अर्ज मा.न्यायमुर्ती चंदीवालसाहेब यांच्या खंडपीठाने २९ फेब्रुवारी २०१२ मध्ये मंजुर केला आहे.सोबत त्याची प्रत जोडली आहे तसेच याच अर्जाद्वारे आपणाला कळवु इच्छितो की, जनसंपर्क अधिकारी या पदाचा मी राजीनामा देत असून तो तात्काळ मंजुर करावा ही विनंती.

संस्थानचे जा.क्रं.एसएसएस/वशी-७ए/५११५/२०१२ दि.१२ जानेवारी २०१२ च्या पत्रान्वये मी सर्व अटीची पुर्तता केलेली आहे.माहे सप्टेंबर २०११ या महिन्याचे देय वेतन व तडजोडीपोटी मंजुर केलेली रक्कम रु.१७,५०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख पन्नास हजार) कुठलीही कपात न करता तात्काळ मिळावी "असे म्हटलेले आहे.

तथापि, श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांनी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे दि.१२.०१.२०१२ पासुन ते दि.२३.०६.२०१९ अखेर पर्यंत रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर तडजोड नामा (अंडरटेकिंग) करुन दिलेला नाही.त्यामुळे त्यांना रु.१७,५०,०००/- रक्कम अदा करणेत आलेली नाही.

त्यानंतर श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांनी दि.१५-०९-२०१२ रोजीचा विनंती अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " श्री साईबाबा संस्थानने घातलेल्या सर्व अटींची पुर्तता केलेली आहे. राजीनामा पत्र पाठवून साडेपाच महिने उलटून गेले तरी मला संस्थानकडून अद्यापही रक्कम मिळालेली नाही. यासंदर्भात मी अनेकदा मा.कार्यकारी अधिकारी यांना समक्ष भेटून मागणी केलेली आहे. माझी आर्थीक स्थिती चांगली नसल्याने मला पैशाची अत्यंत गरज आहे. तरी माझे देय्य पैसे त्वरीत देणेत यावे " असे म्हटलेले आहे.

श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के, जनसंपर्क अधिकारी, प्रकाशने विभाग यांनी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०९-२०११ रोजीचे सभेमध्ये झालेल्या तडजोडीस अनुसरुन मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ व प्रलंबीत असलेले रिट पिटीशन क्रं.५६२०/२००८ हि कोर्ट केस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे पुरसीस दाखल करुन, सदर कोर्ट केस काढुन (विड्रॉन) करुन घेतली आहे. तसा मा.जस्टीज श्री.के.यु.चंदीवाल सो.यांनी दि.२९ फेब्रुवारी २०१२ रोजी रिट पिटीशन क्रं.५६२०/२००८ संदर्भात "१) Heard.On instructions,the petitioner withdrawn the petition.A pursis for withdrawal of petition is filed, same is taken on record. २) Writ Petition is disposed of as withdrawn Rule discharged.No Costs."**असा आदेश करुन सदर रिट पिटीशन ५६२०/२००८ निकाली काढले आहे. तसे संस्थान हायकोर्ट ॲडव्होकेट, श्री.आर.एन.धोर्डे, औरंगाबाद यांनी दि.०१-०३-२०१२ रोजीचे पत्रान्वये संस्थानला लेखी कळविलेले आहे.** व मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील रिटपिटीशन क्र.५६२०/२००८ संदर्भातील दि.२९-०२-२०१२ रोजीचे आदेशाची प्रत देखील संस्थानला प्राप्त झालेली आहे.

(पा.नं.३ वर..)

तथापी श्री.ताराचंद म्हस्के यांनी स्वंतत्रपणे विनाअट राजीनामा अर्ज, तडजोडीमध्ये ठरल्या प्रमाणे उर्वरित संस्थान सेवा सोडण्याबाबतचा तडजोडनामा (अंडरटेकींग) रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करुन दिलेला नाही.

त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०९-२०११ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्रं.७६०(०९) व श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांचे दि.२८ मार्च २०१२ रोजीचे अर्जास अनुसरुन, तडजोडीत ठरले प्रमाणे श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के,जनसंपर्क अधिकारी, प्रकाशने विभाग यांनी संस्थान सेवा सोडणे कामी स्वतंत्र राजीनामा अर्ज व तडजोडीत ठरलेप्रमाणे रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर उर्वरित संस्थान सेवा सोडून दिलेबाबतचा तडजोडनामा (अंडरटेकींग) इत्यादी कागदपत्रांची पुर्तता करुन दिलेनंतर तडजोडीत ठरलेप्रमाणे त्यांना एकुण रक्कम रु.१७,५०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख पन्नास हजार) मात्र संस्थानचे लेखाशाखेमार्फत चेक (धनादेश) द्वारे आदा करणे संदर्भात निर्णय होणे कामी मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.०८.१०.२०१२ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८.१०.२०१२ निर्णय क्रं.८४५ अन्वये,"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांचे संदर्भात, उपरोक्त प्रकरणी, संस्थान कामगार कायदे सल्लागार ॲड.अशोकराव पाटील यांनी मा.अध्यक्ष महोदय यांचेबरोबर चर्चा करावी व चर्चेत ठरेल त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी," असे ठरले. असा निर्णय पारीत झालेला आहे.

उपरोक्त ठरावास अनुसरुन संस्थान कामगार कायदे सल्लागार ॲड.अशोकराव पाटील यांनी मा.अध्यक्ष महोदय यांचेबरोबर चर्चा करणेकामी व चर्चेत ठरेल त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३८८०/२०१२ दि.२७.११.२०१२ रोजीचे पत्र देण्यात येवुन, श्री.म्हस्के यांचेशी तडजोडीत ठरलेप्रमाणे रुपये १७,५०,०००/- अदा करणे संदर्भात मा.अध्यक्ष महोदय यांचेशी चर्चेत ठरल्याप्रमाणे त्यांचा लेखी अभिप्राय मिळणेकरीता पत्र देण्यात आले होते. त्याचप्रमाणे ॲडव्होकेट श्री.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी तत्कालीन मा.अध्यक्ष महोदय यांचेशी चर्चा केली होती.तथापी, त्याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. अथवा ॲडव्होकेट श्री.अशोक पाटील, अहमदनगर यांनी लेखी अभिप्राय दिलेला नाही.

श्री.ताराचंद म्हस्के यांनी दि.२३.०५.२०१९ रोजीचे अर्जान्वये वेतनापोटी तडजोडीने मंजूर झालेली देय रक्कम व्याजासह मिळणेबाबत व दि.२८.०३.२०१२ ते आज अखेर पर्यंत राष्ट्रीयकृत बँकेच्या सध्या सुरु असलेल्या प्रचलित व्याज दरानुसार वेतनापोटी तडजोडीने मंजूर असलेली देय रक्कम तातडीने देण्यात यावी ही विनंती.माझी अर्थिक स्थिती चांगली नसल्याने मला पैशांची अत्यंत गरज आहे.असे म्हटलेले आहे.

त्यानंतर , श्री.म्हस्के यांनी दि.२४.०६.२०१९ रोजीचा तडजोडनामा रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटरी करुन दिलेला आहे. त्यात त्यांनी, "मी, ताराचंद विठठलराव म्हस्के, जनसंपर्क अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी या संस्थेमध्ये दि.२१-०४-१९९२ पासुन नोकरीस होतो. व्यवस्थापनाने दि.२०-०४-१९९४ रोजी पासुन माझी सेवा संपुष्ठात आणली होती. म्हणुन मी मा.कामगार न्यायालय अहमदनगर येथे संस्थान विरुध्द तक्रार (यु.एल.पी) क्र.४१/१९९४ ही कार्ट केस दाखल केली होती. त्यातील मा.कामगार न्यायालय,अहमदनगर यांनी दि.०५-०१-२००६ रोजीचे आदेशा संदर्भात मा.औद्योगिक न्यायालय ,अहमदनगर येथे संस्थानचे वतीने माझ्या विरुध्द रिव्हीजन (यु.एल.पी) क्र.११/२००६ व मी संस्थान विरुध्द रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.१९/२००६ दाखल केले होते.सदर दोन्हीही रिव्हीजन मा.औद्योगिक न्यायालय,अहमदनगर यांनी दि.०३-०७-२००८ रोजी दिलेल्या आदेशा संदर्भात मी संस्थान विरुध्द मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.५६२०/२००८ दाखल केले आहे. त्यातील सिंगल बेंच यांचे दि.१५-०१-२०१० रोजीचे अंतरिम आदेशा संदर्भात संस्थाने माझे विरुध्द मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे लेटर्स पेटेन्ट अपील क्र.५९/२०१० दाखल केले होते. त्यातील मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.०८/-०८-२०११ रोजीचे आदेशास अनुसरुन संस्थाने मला दि.०५-०९-२०११ पासुन पुन्हा पुर्ववत 'जनसंपर्क अधिकारी' (पी.आर.ओ) म्हणुन सेवेत हजर/रुजू करुन घेतले आहे. व सध्या मी संस्थान विरुध्द दाखल केलेले रिट पिटीशन क्र.५६२०/२००८ ही कोर्ट केस मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ / प्रलंबीत होती.

(पा.नं.४ वर..)

सदरच्या रिट पिटीशन क्र.५६२०/२००८ हया कोर्ट केस वादाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०९-२०११ रोजीचे सभेमध्ये उभयपक्षात चर्चा होऊन त्यामध्ये 'मी माझी पुढील उर्वरीत संस्थान सेवा सोडून द्यावी. व चालु असलेल्या कोर्ट केसेस विना अट मागे घ्याव्यात या अटीवर तडजोडीने मला रुपये १७,५०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख पन्नास हजार) मात्र देणेत यावेत. तसेच कोर्ट केस काढुन घेतलेनंतर व उर्वरीत संस्थान सेवा सोडणेबाबतचा तडजोडनामा मंजूर झाल्यानंतर मला सदर रक्कम अदा करावी .' अशी तडजोड झालेली आहे.

उपरोक्त तडजोडीच्या सर्व अटी व शर्ती मी समजून घेतलेल्या आहेत. व त्या मला मान्य असुन, त्यांच्या सत्यतेसाठी मी आज रोजी शिर्डी येथे या तडजोडनामा पत्राखाली सही केली आहे. त्या तडजोडीतील अटी व शर्ती संदर्भात व वरील रिट पिटीशनमधील असलेल्या वादाविषयी मी येथुन पुढे कोणतेही मागणी अथवा तक्रार संस्थानकडे करणार नाही. तसेच तडजोडीत ठरलेप्रमाणे मी माझी यापुढील संस्थान सेवा / नोकरी सोडून दिली असुन मा. उच्च न्यायालय , खंडपीठ , औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ / प्रलंबीत असलेले रिट पिटीशन क्र.५६२०/२००८ ही कोर्ट केस दि.२९-०२-२०१२ रोजी मा.उच्च न्यायालय ,खंडपीठ औरंगाबाद येथुन विनाअट काढुन घेतली (विड्रॉन केली) आहे. यापुढील काळात मी पुन्हा मी उर्वरीत संस्थानमधील सेवेचा /नोकरीचा हक्क सांगणार नाही याची मी आज रोजी संस्थानला हमी देत आहेत. जर माझेकडून याबाबत काही वाद/ प्रश्न उपस्थित झाल्यास अथवा तडजोडनाम्यातील अटी व शर्तीचा भंग झाल्यास, संस्थान माझे विरुध्द जी कायदेशीर कारवाई करील ती मला मान्य राहील. त्याचप्रमाणे यापुढे उपरोक्त कोर्ट केस मधील वादा संदर्भात व मागील कालावधीतील तसेच या पुढील उर्वरीत सोडून दिलेल्या सेवेसंदर्भात मी कोणत्याही न्यायालय पुन्हा वाद उपस्थित करणार नाही. व संस्थानला कोणत्याही प्रकारची आर्थिक व इतर तोषीस/ झळ लागु देणार नाही याची मी संस्थानला हमी देतो.

'उपरोक्त तडजोडनामा पत्र' मी आज दि.२४/०६/२०१९ रोजी मौजे-शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना राजीखुशीने व स्वखुशने लिहुन दिलेले असुन त्यादाखल मी याखाली स्वाक्षरी केली आहे."असे म्हटलेले आहे.

आता, श्री.ताराचंद म्हस्के यांनी दि.२३.०८.२०१९ रोजीचे अर्जात कळविले आहे की, मुलीचे लग्न आणि मुलाचे उच्च शिक्षण याकामी मला पैशाची अत्यंत गरज आहे. कृपया माझे नावे मंजुर असलेली रक्कम व्याजासह १५ दिवसात देण्याची व्यवस्था करावी ही विनंती.

श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के,जनसंपर्क अधिकारी, प्रकाशने विभाग यांनी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०९.२०११ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्रं.७६० (०९) यास अनुसरुन श्री.ताराचंद म्हस्के यांनी त्यांची चालु असलेली कोर्ट केस मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथुन दि.२९.०२.२०१२ रोजी काढुन (विड्रान करुन) घेतली आहे तसे त्यांनी दि.२८.०३.२०१२ रोजीचे अर्जान्वये कळविले आहे.सदर अर्जात त्यांनी जनसंपर्क अधिकारी या पदाचा मी राजीनामा देत असुन तो तात्काळ मंजुर करावा असे नमुद केले आहे.

तथापी, मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णया प्रमाणे व दि.१२.०१.२०१२ रोजीचे पत्रान्वये कळविलेप्रमाणे श्री.ताराचंद म्हस्के यांनी तडजोडीमध्ये ठरल्याप्रमाणे उर्वरित संस्थान सेवा सोडल्याबाबतचा तडजोड नामा (अंडर टेंकिग) रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दिनांक २३.०६.२०१९ पर्यंत करुन दिलेला नाही. त्यामुळे त्यांना दि.२३.०६.२०१९ अखेर पर्यंत रु.१७,५०,०००/- रक्कम आदा करणेत आलेली नाही. म्हणुन श्री.म्हस्के यांना दि.२८.०३.२०१२ पासुन ते आतापर्यंत सदर रक्कमेवर व्याज मागणेचा अधिकार नाही. श्री.ताराचंद म्हस्के हे संस्थान सेवेतुन विहीत वयोमानानुसार दि.३१.०५.२०१९ रोजी सेवा निवृत्त झालेले आहे.तसे त्यांना संस्थान तर्फे लेखी पत्रान्वये कळविणेत आलेले आहे. **आता श्री.म्हस्के यांनी दि.२४.०६.२०१९ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत झालेल्या निर्णयाप्रमाणे तडजोड नामा (अंडर टेंकिग) रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करुन दिलेला आहे.** श्री.म्हस्के यांनी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे सर्व पुर्तता करुन दिलेली आहे.

श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांना त्यांचे दि.२२.०५.२०१९,दि. २३.०८.२०१९ व दि.२८.०९.२०२० रोजीचे विनंती अर्जास अनुसरुन **मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०९.२०११ रोजीचे सभेतील आयत्या**

(पा.नं.५ वर..)

वेळेचा निर्णय क्रं. ७६० (०९)"मा.औरंगाबाद खंडपीठाने लेटर्स पेटन्ट अपील क्र.५९/ २०१० मध्ये दि.०८.०८.२०११ रोजी केलेला आदेश हा अंतरिम आदेश आहे. श्री म्हस्के यांचे संबंधीत मुळ रिट पिटीशन न्यायप्रविष्ठच असुन, ते दि.२०.०४.१९९४ पासून त्यांना जनसंपर्क अधिकारी पदावर सलग सेवा धरुन त्यानुसार त्यांना त्या पदाचे सर्व आर्थिक लाभ मिळावेत या कारणासाठीचे आहे. हे विचारात घेऊन, श्री म्हस्के यांनी त्यांची पुढील उर्वरित सेवा सोडून द्यावी व चालू असलेल्या कोर्ट केसेस विनाअट मागे घ्याव्यात या अटीवर तडजोडीने त्यांना रु.१७,५०,०००/- (अक्षरी रु. सतरा लाख पन्नास हजार) मात्र देण्यात यावेत. मात्र **कोर्ट केस काढून घेतल्यानंतर व उर्वरीत संस्थान सेवा सोडण्या बाबतचा तडजोडनामा मंजूर झाल्यानंतर त्यांना रक्कम आदा करावी,**"असा पारित झालेला आहे.

श्री म्हस्के यांनी रु. १००/-स्टॅम्प पेपरवर तडजोडनामा दि.२३.०६.२०१९ पर्यंत संस्थानकडे सादर केलेला नाहीत. ते दि.३१.०५.२०१९ रोजी संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांनी दि. २४.०६.२०१९ रोजी तडजोडनामा संस्थानकडे सादर केलेला आहे.

सद्यस्थिती

१. श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांचे बाबत. मा.व्य.समितीचे दि.२४.०९.२०११ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्र ७६०(०९) यास अनुसरुन रु.१७,५०,०००/- मात्र देण्यात यावेत,मात्र कोर्ट केस काढून घेतल्यानंतर व उर्वरित संस्थान सेवा सोडण्या बाबतचा तडजोडनामा मंजुर झाल्यानंतर त्यांना रक्कम आदा करावी.असे नमुद आहे.

२.जा.न.एसएसएस/वर्शी-७ए/५११५/२०११.दि.१२.०१.२०१२ रोजीचे मा.उच्च न्यायालय,खंडपीठ, औरंगाबाद येथे चालू असलेल्या कोर्ट केसेस विना अट काढून घेणेबाबत तडजोडनामा करुन देणेबाबत श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांना पत्र देण्यात आले.

३.श्री.ताराचंद वि.म्हस्के दि.३१.०५.२०१९ रोजी संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त करण्यात आले.

४.श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांनी रु.१००/-स्टॅम्प पेपरवर तडजोडनामा दि.२३.०६.२०१९ पर्यंत संस्थानकडे सादर केलेला नाही. श्री म्हस्के यांनी माहे- जानेवारी २०१२ ते माहे-जून-२०१९ या अंदाजे ७ वर्षानंतर त्यांना सेवेतून सेवानिवृत्त केलेनंतर त्यांनी दि.२४.०६.२०१९ रोजी तडजोडनामापत्र संस्थानकडे सादर केलेला आहे.

कामगार विभागा मार्फत उपरोक्त विषयाकिंत दि.२१.१०.२०२० रोजी टिपणी सादर करण्यात आलेली होती.सदर टिपणीवर मुख्य लेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांनी खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत. यावर विभागाचा अभिप्राय पुढील प्रमाणे.

अ.न.	मुद्दा	विभागाचा अभिप्राय
१.	ताराचंद म्हस्के यांनी जनसंर्पक अधिकारी पदाचा दिलेला राजीनामा मंजुर झाला आहे काय	नाही, श्री. ताराचंद म्हस्के यांनी दि.२८.०३.२०१२ रोजी जनसंपर्क अधिकारी या पदाचा राजीनामा संस्थानकडे दिलेला आहे. परंतु, सदरचा राजीनामा मंजुर झाल्याचे दिसुन येत नाही.
२.	राजीनामा मंजुर झाला नसेल तर जनसंपर्क अधिकारी पदावर कायमस्वरुपी नेमणुक करता येत नाही.इतर कर्मचा-यांची या पदावर कायमस्वरुपी नियुक्ती केली काय	श्री. ताराचंद म्हस्के यांचा राजीनामा मंजुर झाल्याचे दिसुन येत नाही. तथापि,मोहन यादव यांची प्र.जनसंपर्क अधिकारी म्हणून दि २७.०८.२००४ पासून नियुक्ती करण्यात आलेली होती.
३.	राजीनामा मंजुर झाला नसेल तर ताराचंद म्हस्के नियतवयोमाना नुसार सेवानिवृत्त झाले असते म्हणजे दि.३१.०५.२०१९ पर्यंत संस्थान सेवेत होते काये	श्री. ताराचंद म्हस्के हे दि.३१.०५.२०१९ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत.प्रत्यक्षात ते कामावर हजर नव्हते.
४.	संस्थानने त्यांना राजीनामा मंजुर झाला नसल्याचे कळविले आहे का	श्री.म्हस्के यांनी दिलेला राजीनामा मंजुर झालेले नसलेबाबत त्यांना कळविण्यात आलेले दिसुन येत नाही.
५.	तडजोडनामा मसुदा मा. व्यवस्थापन समितीने मान्य केला आहे काय	नाही, श्री ताराचंद म्हस्के हे दि.३१.०५.२०१९ रोजी सेवानिवृत्त झाले,यांनी दि.२४.०६.२०१९ रोजी तडजोडनामा संस्थानकडे सादर केलेला आहे. तडजोडनामा मसुदा हा मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्य केलेबाबत दिसुन येत नाही.

(पा.नं.६ वर..)

६.	९ वर्षापुर्वीच्या मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार आता तडजोडनामा करावयाचा आहे. त्यामुळे उपरोक्त १ ते ५ बाबत विभागाने खुलासा करणे व मुद्दा क्र.६ बाबत व्यवस्थापन समितीचे तत्कालीन निर्णयाचे अमंलबजावणी बाबत विधिज्ञांचा सल्ला घ्यावा असे मत आहे.	९ वर्षापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार आता तडजोडनामा करावयाचा आहे.मा. व्यवस्थापन समितीचे तत्कालीन निर्णयांची अंमलबजावणी करणेबाबत विधीज्ञ. ॲड. अशोकराव पाटील, अ.नगर यांचा अभिप्राय घेणेकामी पत्र देता येईल.

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत :-

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४.०९.२०११ सभेतील निर्णयानुसार श्री. ताराचंद म्हस्के यांनी मा. उच्च न्यायालयातील रिट पीटीशन काढून घ्यायची व संस्थान सेवा सोडून दयायची या अटीवर रु.१७,५०,०००/- श्री म्हस्के यांना देणे व तसा तडजोडनामा करणे आवश्यक होते.

२) श्री.ताराचंद म्हस्के यांचा राजीनामा मंजुर झाल्याचे दिसत नाही. तथापि,त्या पदावर इतर अधिका-यांची नेमणूक मात्र संस्थानने केलेली होती.

३) श्री ताराचंद म्हस्के यांना दि.११ मार्च २०१९ च्या आदेशान्वये दि.३१.०५.२०१९ पासून संस्थान सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यात आलेले आहे. त्यांनी सेवानिवृत्ती नंतर एक महिन्याने दि.२४.०६.२०१९ रोजी तडजोडनामा सादर केलेला आहे.

४) श्री ताराचंद म्हस्के यांनी दि.२४.०९.२०११ (मा.व्यवस्थापन समितीचे ठराव) पासून दि.३१.०५.२०१९ पर्यंत म्हणजे ते सेवानिवृत होईपर्यंत तडजोडनामा सादर केलेला नाही.श्री म्हस्के यांनी ते सेवानिवृत्त झाल्यानंतर ०१ महिन्याने दि.२४.०६.२०१९ रोजी तडजोडनामा सादर केलेला आहे.सदर तडजोडनामा हा सेवानिवृत्त झालेनंतर केलेला असल्यामुळे तो स्वीकाराता येणार नाही.

५) मा. व्यवस्थापन समितीच्या दि.१४.०९.२०११ च्या निर्णयानुसार श्री ताराचंद म्हस्के यांनी सेवा सोडून दिल्याचे दिसत नाही. ते सेवा निवृत्त होईपर्यंत त्यांनी तडजोडनामा सादर केलेला नाही.त्यामुळे मा.व्यवस्थापन समितीने सेवा सोडून देण्याची ठेवलेली अट पुर्ण होत नाही.तसेच त्यांनी प्रदीर्घ ०९ वर्षाच्या विलंबानंतर तसेच त्यांना सेवानिवृत्त केल्यानंतर तडजोडनामा सादर केलेला असल्याने तो तडजोडनामा स्वीकारता येणार नाही.

६)सदर प्रकरण ९ वर्षापुर्वीचे आहे.त्यामुळे वरील ते सेवानिवृत्त झालेनंतर सादर केलेला तडजोडनामा स्वीकारता येणार नाही.श्री ताराचंद म्हस्के यांचे मागणीनुसार रक्कम रु.१७,५०,०००/- जी तत्कालीन व्यवस्थापन समितीने ठरविली होती. ती देणेबाबत, ठरावाची अमंलबजावणी करणेबाबत तांत्रिक व कायदेशीर मुद्दे उपस्थित होतात.

७) श्री ताराचंद म्हस्के यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र ४९७६/२०२१ अन्वये संस्थानचे विरुध्द दावा दाखल केलेला आहे. या दाव्यात त्यांनी संस्थानकडे माझी वेतनापेटी देय असलेली रक्कम रु.१७,५०,०००/-व्याजासह मिळणेबाबत मागणी केलेली आहे.या संदर्भात मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागणार आहे.

श्री ताराचंद म्हस्के, तत्कालीन जनसंपर्क अधिकारी यांचे सेवे संदर्भात तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीने घेतलेले निर्णय व श्री.म्हस्के यांनी आता मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र ४९७६/२०२१ अन्वये संस्थानचे विरुध्द दाखल केलेला दावा तसेच सदर प्रकरणाची वस्तुस्थिती यांचे अवलोकन होऊन,श्री ताराचंद म्हस्के यांचे रु.१७,५०,०००/- मागणीबाबत निर्णय होण्यासाठी व त्यानुसार श्री. ताराचंद म्हस्के यांनी संस्थान विरुध्द रिट पिटीशन क्र.४९७६/२०२१ नुसार मा. उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव दि.२८.०५.२०२१ रोजी मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आला होता.

त्यावर मा. प्रधान व जिल्हा सत्र न्यायाधिश, अ.नगर , अध्यक्ष तदर्थ समिती व अपर महसुल आयुक्त, नाशिक सदस्य तदर्थ समिती यांनी - **प्रतिज्ञापत्र तदर्थ समिती समोर दाखल करावे,त्यानंतर निर्णय घेता येईल.** असा निर्णय दिलेला आहे.

(पा.नं.७ वर..)

मात्र श्री ताराचंद म्हस्के यांनी सादर केलेला तडजोडणामा मंजूर किंवा नामंजूर करणे व ताराचंद म्हस्के यांना तत्कालिन व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार रु.१७,५०,०००/- देणेबाबत मा.तदर्थ समितीने अगोदर निर्णय घेणे आवश्यक आहे. निर्णय झालेनंतर त्यानुसार प्रतिज्ञापत्र तयार करता येईल. त्यानुसार प्रस्ताव पुनश्च निर्णयास्तव सादर करणेत येत आहे.

प्रस्ताव-

०१) मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१४.०९.२०११ च्या निर्णय क्र.७६०(०९) नुसार श्री ताराचंद म्हस्के यांनी सेवा सोडून दिलेली नाही. श्री ताराचंद म्हस्के नियतवयोमानुसार दि.३१.०५.२०१९ रोजी सेवानिवृत्त झालेले आहे.दि.०५.१०.२०११ पासून दि.३१.०५.२०१९ या कालावधीत ते अनधिकृत गैरहजर होते. त्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त ठरावाप्रमाणे श्री.म्हस्के यांनी कार्यवाही केलेली नाही. श्री ताराचंद म्हस्के यांनी प्रदीर्घ विलंबानंतर म्हणजे मा.व्यवस्थापन समितीच्या ठरावाच्या ०९ वर्षानंतर तसेच नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीनंतर एक महिन्याने तडजोडनामा सादर केला आहे.तरी तडजोडनामा मंजूर किंवा नामंजूर या बाबत निर्णय घेणे.

०२) श्री ताराचंद म्हस्के यांनी मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र ४९७६/२०२१ नुसार संस्थानचे विरुध्द दावा दाखल केला आहे. सदर दाव्या मध्ये त्यांनी रु.१७,५०,०००/- दि.२८.०३.२०१२ पासून व्याजासह मिळावे अशी मागणी केली आहे. त्यासाठी मा. उच्च न्यायालयात संस्थानला प्रतिज्ञापत्र दाखल करावयाचे आहे.त्यासाठी उपरोक्त प्रस्ताव क्र.०१ मध्ये नमुद मुदयावर उचीत निर्णय झालेनंतर त्यानंतर त्यानुसार प्रतिज्ञापत्रात अंतर्भूत करुन मा. उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करता येईल. त्यास मान्यता मिळावी

तरी, उपरोक्त प्रस्तावात नमूद मुद्दा क्र.०१ व ०२ नुसार निर्णय होणेसाठी प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

11/6/21

(कान्हुराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

11/6

विषय क्र.- २७

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर

(कामगार विभाग)

विषय:- मंदिर विभागास पुजारी पदाचे प्रशिक्षण घेतलेले व संबंधीत कामाचा अनुभव असलेले कर्मचारी कंत्राटी पध्दतीने सहाय्यक पुजारी म्हणून नेमणूक करणेबाबत...

टिपणी -

उपरोक्त विषयाकिंत व संदर्भीय सामान्य प्रशासन शाखा यांचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असून त्यांत त्यांनी मंदिर विभागास पुजारी पदाचे प्रशिक्षण घेतलेले व संबधीत कामाचा अनुभव असलेले कर्मचारी मिळणेबाबत कळविल्याने दि.२६.०२.२०२१ रोजीचे टिपणी अनव्ये पुजारी, सहा.पुजारी व गवई या पदाची शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेला संस्थान मधील कायम कर्मचारी, कायम कंत्राटी कर्मचारी व इनसोर्स मधील कंत्राटी कर्मचारी यांचे कडून अर्ज मागविणेकामी जा.क्र एसएसएस/साप्रशा/आस्था/२३२२/२०२१ दि.०८.०३.२०२१ रोजीचे परिपत्रक पारित करण्यात आले होते. त्यानुसार सद्यस्थितीत संस्थान मधील कायम कर्मचारी यांचे मधून कोणाचाही अर्ज प्राप्त झालेला नाही. तरी मंदिर विभागास आवश्यक असलेल्या पुजारी यांचे पदे कंत्राटदारामार्फत जाहिरात देवून किंवा थेट संस्थान मार्फत ११ महिने मानधनावर घेण्यासाठी जाहिरात देवून पदे भरणेकामी पुढील कार्यवाही कामगार विभागाकडून होणेकामी सदर प्रस्ताव इकडील कार्यालयास वर्ग करण्यात आलेला आहे.

प्रस्तावना-

श्रींचे समाधी मंदिरात चालणारे दैनदिन पूजा,अर्चा, श्री साई सत्यव्रत पूजा, भक्त अभिषेक पुजा, वाहन पूजा तसेच श्रीची चावडीमंदिर, व्दारकामाई मंदिर, श्री हनुमान मंदिर, गणपती मंदिर, शनिमंदिर, श्री महादेव मंदिर, श्री दत्त मंदिर येथे पुजा-या कडून दैनदिन विधीवत पूजा–अर्चाचे तसेच नैवद्य दाखविण्याचे काम करुन घेतले जाते त्याच बरोबर श्रावण महिण्यातील श्री साई सतच्चरीत पारायण, वाढीव सत्यनारायण पूजा, मा. व्यवस्थापन समिती सभा तसेच संस्थानचे इतर विभागामार्फत होणारे कार्यक्रमांचे वेळी पूजा करणेसाठी पुजारी पाठवावे लागतात.

सध्या, मंदिर आस्थापनेवरील ०६ पुजारी व सहाय्यक पुजारी पदावरील ०३ असे एकुण ०९ पुजारी विहीत वयोमान पुर्ण झाल्याने सेवानिवृत्त झाले आहे. सध्या मंजुर आकृतीबंधानुसार पुजारी, सहाय्यक पुजारी व गवई पदावरील कायम १५ व कंत्राटी ०२ असे एकुण १७ पदे रिक्त आहे. तथापि, सदर रिक्त पदांवर मंदिर विभागाकडील ०२ कायम मदतनीस पुजारी कामाचे प्रशिक्षण घेतलेले असल्याने, सद्यस्थितीत ते पुजारी पदाचे काम करत आहेत. त्यामुळे पुजारी १३ व सहाय्यक पुजारी ०२ असे एकूण १५ पदे रिक्त आहेत.

दि.०७.०८.२००९ चे मंजुर आकृतीबंधानुसार पुजारी, सहाय्यक पुजारी व गवई या रिक्त पदांची माहिती खालील प्रमाणे.

अ.न	पदनाम	मंजुर पदे		भरलेली पदे		रिक्त पदे	
		कायम	कंत्राटी	कायम	कंत्राटी	कायम	कंत्राटी
०१.	पुजारी	१३	००	०८	००	०५	००
०२.	सहाय्यक पुजारी	०६	१०	००	०८	०६	०२
०३	गवई	०४	००	००	००	०४	००
एकुण		२३	१०	०८	०८	१५	०२

अ) सहाय्यक पुजारी या पदाकरीता प्रस्तावित सेवाप्रवेश नियमात नमूद शैक्षणिक अर्हता/ शैक्षणिक पात्रता खालील प्रमाणे राहील –

१)अगोदरच संस्थान सेवेत असलेल्या उमेदवाराखेरीज करुन ज्यांचे कमाल वय महाराष्ट्र शासनाचे प्रचलित नियम व त्या अनुषंगाने वेळोवेळी काढण्यात आलेले शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे असावे.

२)सांविधित विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी धारण करीत असावा.

३)शासनमान्य वेद पाठशाळेतील पुजारी पदाचा ०५ वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

४)सार्वजनीक न्यास नोंदणी विभागाकडे नोंदणीकृत असलेल्या देवस्थानकडे किमान ३ वर्षे पूजाविधी केल्याचा अनुभव आवश्यक आहे.

करीता, सदर रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही आस्थापना विभागामार्फत होणे कामी मंदिर विभागाने दि.०७.१२.२०२० व दि.२३.०२.२०२१ रोजीचे प्रस्ताव आस्थापना विभागाकडे वर्ग करण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने पुजारी, सहाय्यक पुजारी व गवई या पदाची शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेला संस्थानमधील कायम कर्मचारी, कायम कंत्राटी कर्मचारी व इनसोर्स मधील कंत्राटी कर्मचारी यांचे कडून अर्ज मागविणेत आले होते. तथापि सद्यस्थितीत संस्थान मधील कायम कर्मचारी यांचे मधून कोणाचाही अर्ज प्राप्त झालेला नाही.

परंतु सहाय्यक पुजारी पदासाठी सध्या कंत्राटदारामार्फत काम करीत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यापैकी इनसोर्स-०२ व आऊटसोर्स-०१ असे एकुण -०३ अर्ज कंत्राटी कर्मचारी यांचे अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहेत.

ब) संस्थान सेवेतील/बाह्ययंत्रणेमार्फत कार्यरत कामगारांमधून मागविण्यात आलेल्या अर्जांबाबत वस्तूस्थिती -

सदर इनसोर्स व आऊटसोर्स मध्ये काम करत असलेल्या ०३ कर्मचारी यांची सहाय्यक पुजारी पदाची शैक्षणिक अर्हता / पात्रता तपासून मिळणेबाबत सदर कर्मचा-यांचे अर्ज मंदिर विभागाकडे उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये पाठविणेत आलेले होते.

त्यावर उपरोक्त संदर्भ क्र. ०४ अन्वये मंदिर विभागामार्फत सदर कर्मचा-यांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत आलेले आहे.

१) **श्री धर्मराज ज्ञानोबा उपाडे, इनसोर्स कंत्राटी कर्मचारी – गवई पदाकरीता** – आकृतीबंधात नमूद शैक्षणिक पात्रतेनुसार पुजारी पदाचा तसेच संगीत विशारद पदाचा अभ्यासक्रम पुर्ण केलेला दिसून येत नाही. परंतू, सदर कर्मचारी याने तबला, गायन व किर्तन यामध्ये शिक्षण घेतलेले असून, संगीत शिक्षक म्हणून अनुभव आहे.

२) **श्री.रितेश सखाराम रामदासी, इनसोर्स कंत्राटी कर्मचारी – सहाय्यक पुजारी पदाकरीता** - आकृतीबंधात नमूद शैक्षणिक पात्रतेनुसार पुजारी पदाचा तसेच संगीत विशारद पदाचा अभ्यासक्रम पुर्ण केलेला दिसून येत नाही. परंतू, सदर कर्मचारी याने याज्ञिकी व पौराहित्य यामध्ये शिक्षण घेतलेले असून, सहाय्यक पुजारी पदाचा अनुभव आहे. सध्या ते मंदिर विभागात सहा. पुजारी म्हणून कार्यरत आहे.

३) **श्री सचिन विजय दिवाकर, आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी – सहाय्यक पुजारी पदाकरीता** – आकृतीबंधात नमूद शैक्षणिक पात्रतेनुसार पुजारी पदाची पदवी धारण केलेली दिसून येत नाही. परंतू सदर कर्मचारी याने याज्ञिकी तथा वेद कर्मकाण्डस्य शिक्षण वर्ग हा १ वर्षाचा कोर्स केलेला दिसून येतो.

विभागाचा अभिप्राय –

अ) उपरोक्त नमूद ०३ अर्जदार यांचेकडे सहाय्यक पुजारी या पदाकरीता प्रस्तावित सेवा प्रवेश नियमात नमूद शैक्षणिक अर्हता नसल्याने त्यांचे सहाय्यक पुजारी, गवई पदाचे अर्जाचा विचार करता येणार नाही.

ब) सध्या मंदिर विभागाचे मंजुर आकृतीबंधानुसार कायम पुजारी-५, सहाय्यक पुजारी-कायम ०६ व कायम गवई-०४ असे एकूण कायम १५ व कंत्राटी ०२ असे १७ पदे रिक्त आहेत.

क) सविस्तर प्रस्ताव:-

सध्यस्थिती:-

१)सविस्तर विषय:-

सध्या मंजूर आकृतीबंधानुसार कायम आस्थापनेवरील पुजारी -०५, सहाय्यक पुजारी – ०६ व कंत्राटी सहाय्यक पुजारी – ०२ अशी एकूण १३ पदे रिक्त आहेत. तसेच गवई पदाची कायम आस्थापनेवरील ०४ पदे रिक्त आहेत, असे एकूण १७ पदे रिक्त आहेत. मात्र मंदिर विभागाचे दि.०७.१२.२०२० रोजीचे मंजूर टिपणीनुसार १३ सहाय्यक पुजा-याची पदे रिक्त दिसतात पैकी दोन पदावर कायम मदतनीस काम करतात, त्यामुळे एकूण ११ पदे रिक्त आहेत. मंदिर विभागाने गवई पदाची मागणी केलेली नाही.

संस्थानचे सेवाप्रवेश नियम अंतिम होवून, शासन मान्यता मिळालेनंतर, सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार कायम पदावरील भरती प्रक्रिया राबविता येईल.

मात्र, मंदिरातील धार्मिक विधी व पुजा अर्चा हे अत्यावश्यक उपक्रम असल्याने, त्यामध्ये खंड करता येत नाही. त्यामुळे त्याठिकाणी पुरेसे मन्युष्यबळ उपलब्ध असणे आवश्यक आहे.

याबाबींचा विचार करता संस्थानचे कायम आस्थापनेवरील पुजारी – ०५, सहाय्यक पुजारी – ०६ व कंत्राटी सहाय्यक पुजारी – ०२ असे एकूण १३ पदांपैकी ११ पदे ही बाह्ययंत्रणेमार्फत कंत्राटी सहाय्यक पुजारी म्हणून भरता येतील.

२)भरती प्रक्रिया:-

संस्थानला मनुष्यबळ पुरविणेसाठी संस्थानने ठेकेदारांची नेमणूक केलेली आहे. सद्यस्थितीत मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे व मे.सुमित फॅसेलिटीज लिमिटेड, पुणे या ठेकेदार कंपनीमार्फत अकुशल, कुशल कंत्राटी कामगार कामावर घेण्यात येतात. सदर ठेकेदार कंपन्यांचा सेवा आकार ०.०००१% इतका आहे. संस्थानचे प्रस्तावीत सेवाप्रवेश नियमात सहाय्यक पुजारी या पदासाठीची शैक्षणिक पात्रता व वया संबंधीची मर्यादा ''अ'' मध्ये नमूद केलेली आहे.

कंत्राटी कामगार पुरविणारे ठेकेदारामार्फत ११ कंत्राटी सहाय्यक पुजारी विहीत शैक्षणिक पात्रता व वयोमर्यादा धारण करणा-या उमेदवारामधून कुशल कंत्राटी कामगारांचे किमान वेतन दरानुसार भरती करता येतील.

ठेकेदार कंपनीमार्फत उपरोक्त कंत्राटी पदांसाठी जाहिरात देवून अर्ज मागविता येतील. ठेकेदाराकडे प्राप्त झालेले अर्ज अगोदर, ठेकेदाराचे स्तरावर शैक्षणिक पात्रता व वयोमर्यादा या निकषावर तपासणी करता येतील. ठेकेदाराकडे आलेले सर्व अर्ज पुन्हा संस्थानमार्फत शैक्षणिक व वयोमर्यादा या निकषानुसार तपासणी करता येतील.

पात्र उमेदवारांना धार्मिक विधी, पुजा अर्चा या संबंधीचे ज्ञान याबाबत पडताळणी करणेसाठी ठेकेदारामार्फत उमेदवारांच्या मुलाखती घेता येतील. सदर मुलाखतीचे पॅनलमध्ये मा.तदर्थ समितीचे सदस्य / त्यांनी प्राधिकृत केलेले सदस्य यांचा समावेश असेल. सदर पॅनलने अंतीम केलेले सहाय्यक पुजारी यांना कामावर घेणेबाबत कंत्राटदार यांना कळविणेत येईल. त्याप्रमाणे सद्याच्या करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे व कंत्राटी पध्दतीने त्यांना कामावर घेता येईल.

पान नं. ०३ वर ...

३)वेतन व भत्ते:-

किमान वेतन दरानुसार कुशल कंत्राटी कामगारांप्रमाणे वेतन, सानुग्रह अनुदान, शैक्षणिक फी परतावा, वैद्यकीय सुविधा व सुट्टया इत्यादि देता येईल.

प्रस्ताव:-

उपरोक्त विषयात नमूद केलेप्रमाणे बाह्ययंत्रणेमार्फत ११ कंत्राटी सहाय्यक पुजारी यांची नेमणूक करण्यास व त्यांना इतर कुशल कर्मचा-यांप्रमाणे किमान वेतन, भत्ते व इतर सुविधा अदा करणेस मान्यता मिळणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

10/6/21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

- - - -

LAB-Meeting-224-2021

विषय क्र.- 29

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर 177

कामगार विभाग

विषय:- माहे एप्रिल-२०१९ ते मार्च-२०२० अखेर लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणेबाबत...

टिपणी -

संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत पुरविण्यात आलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कामगारांचा प्रतिदिन व श्रमदिन संख्येचे विभागनिहाय तपशिलवार तक्ते प्रत्येक महिन्यास मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेसाठी सादर करणेत यावेत व आर्थिक वर्षाचे शेवटी उपरोक्त विषयांचा एकत्रित अहवाल मा.व्यवस्थापन समिती समोर नोंद घेण्यासाठी सादर करणेत यावा बाबत मा.विश्वस्तांचे सूचने नुसार उपरोक्त संदर्भीय ठरावान्वये मान्यता मिळालेली आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२१.०८.२०१९ निर्णय क्र ४५५ अन्वये संस्थानला सन २०१९-२०२० मध्ये दि. ०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२० अखेर अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांना ८९२ प्रतिदिन कंत्राटी कर्मचारी पुरविणे तसेच मे.मॉडर्न फॅसेलिटीज मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांना ८९२ असे **एकूण १७८४** कंत्राटी अकुशल / कुशल कर्मचारी पुरविणेचे विभागून कार्यादेश देण्यात आलेले होते. तसेच तदनंतर सन २०२०-२१ करीता मा.तदर्थ समिती सभा दि.२०.११.२०२० रोजीचे मान्यतेनुसार दि.०१.०१.२०२१ ते दि.३१.१२.२०२१ अखेर मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांना ६६७ व मे.सुमित फॅसेलिटीज लिमिटेड, पुणे यांना प्रतिदिन ६६४ असे **एकूण १३३१** अकुशल / कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेचे विभागून कार्यादेश देण्यात आलेले आहे.

तसेच, मा.तदर्थ समिती सभा दि.०६.०२.२०२० निर्णय क्र.७४ अन्वये दि.०१.०३.२०२० ते दि.२८.०२.२०२१ अखेर संस्थानला मे.ईगल हंटर सोल्युशन लि.दिल्ली यांना ३४१ सुरक्षा कर्मचारी व मे.मॉडर्न वीर रेज सिक्युरिटी , पुणे यांना ३४३ असे **एकूण ६९४** सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेचे विभागून कार्यादेश देण्यात आलेले असून, आता सदर ठेकेदारांना निविदा प्रक्रिया पूर्ण होई पावेतो दि.३०.०६.२०२१ अखेर मुदतवाढ देणेत आलेली आहे. त्यानुसार त्यांनी मागणीप्रमाणे प्रतिदिनी कंत्राटी कर्मचारी पुरविलेले आहे.

उपरोक्त मा.विश्वस्तांचे सूचनेनुसार **माहे एप्रिल-२०२० ते माहे मार्च-२०२१ अखेर** या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत पुरविण्यात आलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कामगारांचा पटावरील संख्या व श्रमदिन संख्येचा तपशिल खालीलप्रमाणे देत आहोत.

अ.नं	कालावधी	तपशील	अकुशल		कुशल		एकूण	
			पटावरील संख्या	श्रमदिन संख्या	पटावरील संख्या	श्रमदिन संख्या	पटावरील संख्या	श्रमदिन संख्या
०१	एप्रिल- २०२०	लेबर	६९२	१८६०२	५४४	१५११२	१२३६	३३७१४
		सिक्युरीटी	६३४	१७६३२	७१	१९०५	७०५	१९५३७
०२	मे-२०२०	लेबर	६९६	२११७८	५५०	१६३७७	१२४६	३७५५५
		सिक्युरीटी	६२८	१९२४७	७१	२०८८	६९९	२१३३५
०३	जून- २०२०	लेबर	६९६	१९२११	५५०	१५१४५	१२४६	३४३५६
		सिक्युरीटी	६२०	१७५७५	६७	१८५३	६८७	१९४२८
०४	जूलै- २०२०	लेबर	६९२	१८७१२	५४८	१५९३५	१२४०	३४६४७
		सिक्युरीटी	६३४	१८२२३	७१	१८७०	७०५	२००९३
०५	ऑगष्ट- २०२०	लेबर	६९३	१८८८३	५४७	१५४४०	१२४०	३४३२३
		सिक्युरीटी	६२९	१८६०३	६७	१९६४	६९६	२०५६७
०६	सप्टेंबर- २०२०	लेबर	६७८	१८३३९	५४१	१४६२३	१२१९	३२९६२
		सिक्युरीटी	६२७	१७९२८	६६	१८५६	६९३	१९७८४
०७	ऑक्टोबर- २०२०	लेबर	६७२	१८८८७	५४२	१५४५०	१२१४	३४३३७
		सिक्युरीटी	६२६	१८५०३	६६	१८९१	६९२	२०३९४
०८	नोव्हेंबर- २०२०	लेबर	६८२	१६३५२	५४१	१४००८	१२२३	३०३६०
		सिक्युरीटी	६३१	१७५२२	६७	१७७९	६९८	१९३०१
०९	डिसेंबर- २०२०	लेबर	६८५	१७८९७	५३६	१४५४६	१२२१	३२४४३
		सिक्युरीटी	६२९	१७५४८	६९	१८४८	६९८	१९३९६

पान नं. ०२ वर ...

अ.नं	कालावधी	तपशील	अकुशल		कुशल		एकूण	
			पटावरील संख्या	श्रमदिन संख्या	पटावरील संख्या	श्रमदिन संख्या	पटावरील संख्या	श्रमदिन संख्या
१०	जानेवारी-२०२१	लेबर	६९३	१८११४	५३८	१४२१४	१२३१	३२३२८
		सिक्युरीटी	६१९	१७००६	६९	१८६१	६८८	१८८६७
११	फेब्रूवारी-२०२१	लेबर	६९४	१६२९४	५३६	१२९२७	१२३०	२९२२१
		सिक्युरीटी	६१६	१५४३४	७१	१६७२	६८७	१७१०६
१२	मार्च-२०२१	लेबर	६८८	१८४११	५३६	१४४७२	१२२४	३२८८३
		सिक्युरीटी	६१६	१७१३०	७२	१८८७	६८८	१९०१७
	एकूण संख्या -		१५७७०	४३३२३१	७३३६	२००७२३	२३१०६	६३३९५४

उपरोक्त नमूद केले प्रमाणे **माहे एप्रिल-२०२० ते माहे मार्च-२०२१** अखेर या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत कुशल, अकुशल व सुरक्षा कामगार आवश्यकतेप्रमाणे लावणेत आलेले आहे.

तरी सदरचे विषयावर नोंद घेणेकामी तसेच मान्यतेकामी सविनय सादर.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

२०/४/२१

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

२४/४

विषय क्र.- 22

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर

(कामगार विभाग)

विषय:- संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणारे ठेकेदार यांचेकडील कंत्राटी कर्मचा-यांचे मुदतवाढीचे कालावधीतील विमा पॉलिसी रक्कमेबाबत...

टिपणी-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दि.०१.०३.२०२० ते दि.२८.०२.२०२१ अखेर १ वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी ०२ एजन्सींची नेमणूक करण्यात आलेली असून, त्यात मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी प्रा.लि.पुणे व मे.ईगल हंटर सोल्युशन लि. दिल्ली यांना सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविण्याचे कार्यादेश देण्यात आलेले होते. सदर कामाची मुदत दि.२८.०२.२०२१ अखेर रोजी संपुष्टात आलेली होती.

त्यावर त्यांना मा.तदर्थ समिती सभेचे चक्रिय पध्दतीचे निर्णयानुसार दि.०१.०३.२०२१ ते दि.३०.०४.२०२१ अखेर ०२ महिने कालावधीसाठी सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी मुदतवाढ देणेत आलेली होती. सदर कामाची मुदत दि.३०.०४.२०२१ रोजी संपुष्टात आलेली आहे.

१) तसेच संस्थानला सन २०२१-२२ करीता कंत्राटी पध्दतीने सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेबाबत चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे दाखल करण्यात आलेल्या सिव्हील ॲप्लीकेशनचे अधिन राहून मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. पुणे व मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम्स, पुणे यांचे दर ०.०००१% L-1 व समान असल्याने त्यांना दि.०१.०५.२०२१ ते दि.३०.०४.२०२२ अखेर संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविण्याचे कार्यादेश विभागून देणेबाबतचे प्रस्तावावर चक्रिय पध्दतीने निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव दि.२०.०४.२०२१ रोजी चक्रिय पध्दतीने सादर करणेत आलेला होता. तथापि, दाखल करण्यात आलेल्या सिव्हील ॲप्लीकेशनवर निर्णय न झालेने आहे त्या ठेकेदारांना ०२ महिने मुदतवाढ देणेबाबत निर्णय झालेने, दि.०१.०५.२०२१ ते दि.३०.०६.२०२१ अखेर पावेतो निविदेतील, करारनाम्यातील व कार्यादेशातील आहे त्याच अटी व शर्तींस व दरपत्रकास अधिन राहून तसेच दरम्यानचे काळात मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लीकेशनला मान्यता मिळाल्यास झालेल्या निर्णयानुसार नविन ठेकेदार यांना आदेश पारीत करण्यात येईल व आपणास देण्यात आलेली मुदतवाढ आपोआप संपुष्टात येईल. याबाबत आपणास कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही. या अटी व शर्तींस अधिन राहून मे.मॉडर्न विर रेज सिक्युरिटी फोर्स, पुणे व मे.ईगल हंटर सिक्युरिटी सोल्युशन लि, नवी दिल्ली यांना मुदतवाढ देण्यात आली आहे. सदरची मुदतवाढ दि.३०.०६.२०२१ रोजी संपुष्टात आलेली आहे.

२) तसेच उपरोक्त संदर्भ क्र.०८ अन्वये मा.तदर्थ समिती सभेपुढे सध्याचे ठेकेदार यांना मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लीकेशनवर निर्णय होईपावेतो मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावावर दि.२३.०६.२०२१ रोजी पुर्वीचे ठेकेदार मे.मॉडर्न विर रेज सिक्युरिटी फोर्स, पुणे व मे.ईगल हंटर सिक्युरिटी सोल्युशन लि, नवी दिल्ली यांना ५०५ सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी पुढील दि.३१ जुलै २०२१ अखेर ०१ महिना आहे त्याच अटी व शर्तींवर मुदतवाढ देणेस मान्यता मिळालेली असल्याने, उपरोक्त संदर्भ क्र.०९ अन्वये मे.मॉडर्न विर रेज सिक्युरिटी फोर्स, पुणे व मे.ईगल हंटर सिक्युरिटी सोल्युशन लि, नवी दिल्ली यांना दि.०१.०७.२०२१ ते दि.३१.०७.२०२१ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

३) आता, उपरोक्त संदर्भ क्र.१० अन्वये मे.मॉडर्न वीर रेज सिक्युरिटी फोर्स, पुणे यांचे पत्र इकडिल कार्यालयास प्राप्त झाले असून, त्यात तयांनी, आमच्या एजन्सीला दि.०१.०३.२०२१ ते दि.२८.०२.२०२१ या कालावधीसाठी श्री साईबाबा संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविण्याचे काम मिळालेले होते. त्यानुसार आमच्या एजन्सीला दिलेल्या कार्यादेशातील अट क्र.२५ नुसार आमचे एजन्सीकडील सर्व कंत्राटी कर्मचारी यांची प्रत्येकी रु.१० लाख रक्कमेची अपघात विमा पॉलिसी काढलेली असून त्याची सत्यप्रत कामगार विभागास सादर केलेली आहे. संदर्भिय पत्रानुसार आमच्या एजन्सीला दि.०१.०७.२०२१ ते दि.३१.०७.२०२१ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी अट क्र.२५ नुसार काढलेल्या अपघात विमा पॉलिसीची मुदत दि.१३.०४.२०२१ रोजी संपुष्टात आली आहे. तथापि, कमी कालावधीकरीता अपघात विमा पॉलिसी निघत नसल्याने मुदतवाढ अखेर दरम्यानचे काळात (दि.०१.०७.२०२१ ते दि.३१.०७.२०२१ पर्यंत) सुरक्षा कामगारांसंदर्भात काही दुर्घटना झाल्यास त्याची जबाबदारी आमची एजन्सीकडे राहणार नाही., असे नमूद केलेले आहे.

पान नं. ०२ वर ...

180

प्रस्तावना:-

मे.मॉडर्न विर रेज सिक्युरिटी फोर्स, पुणे व मे.ईगल हंटर सोल्युशन लि, नवी दिल्ली यांची कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी मुदत दि.२८.०२.२०२१ रोजी संपूष्टात आलेली होती. त्यानंतर त्यांना दि.०१.०३.२०२१ ते दि.३०.०४.२०२१ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यानंतर दि.०१.०५.२०२१ ते दि.३०.०६.२०२१ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली होती, सदरची मुदतवाढ दि.३०.०६.२०२१ अखेर संपुष्टात आल्याने त्यांना दि.०१.०७.२०२१ ते दि.३१.०७.२०२१ अखेर अल्प मुदतवाढ दिल्याने त्यांचे पत्रात नमूदप्रमाणे त्यांनी सदर कालावधीत कंत्राटी कर्मचारी विमा पॉलिसी उतरविणेची जबाबदारी आमचे कंपनीची नसलेबाबत नमूद केलेले असल्याने, सदर मुदतवाढीचे कालावधीत एखादा कंत्राटी कर्मचारी मयत झाला तर सदर कर्मचा-यांचे वारसास विमा रक्कम मिळणार नाही. अशा कर्मचा-यांचे अचानक निधन झाल्यामुळे मयताचे कुटुंबास आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो व पर्यायाने सदर कुटुंब आर्थिक अडचणीत सापडते. करीता, सदर कंत्राटी कर्मचा-याने संस्थानमध्ये सेवा दिलेली असल्याने कंत्राटदाराचे मुदतीनंतर एखादा कंत्राटी कर्मचारी मयत झाल्यास सदर कर्मचा-याचे वारसास आर्थिक मदत भेटत नाही.

विभागाचा अभिप्राय:-

कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नेमण्यात आलेल्या ठेकेदारांना देण्यात येणा-या कार्यादेशामध्ये १० लाख रक्कमेचा विमा व वर्कमॅन कॉम्पेनसेशन अंतर्गत विमा पॉलिसी उतरविणेबाबत तरतूद करण्यात आलेली असते. त्यानुसार कंत्राटदारामार्फत कंत्राटी कर्मचा-यांचा कार्यादेशामध्ये नमूद केलेल्या कालावधीचा विमा उतरविण्यात येतो. सदर विम्याचे प्रीमीयम संस्थानमार्फत कंत्राटदारांना अदा करण्यात येते.

१.मे.मॉडर्न वीर रेज सिक्युरिटी, पुणे यांनी दि.०१.०३.२०२० ते दि.२८.०२.२०२१ अखेर त्यांचे ३८० कंत्राटी सुरक्षा रक्षक कर्मचा-यांचा विमा उतरविलेला होता. त्यांना याकामी रक्कम रु.२,४२,६७७/- मात्र खर्च आलेला आहे.

२.मे.ईगल हंटर सोल्युशन लि.दिल्ली यांनी दि.०१.०३.२०२० ते दि.२८.०२.२०२१ अखेर त्यांचे ३२७ कंत्राटी सुरक्षा रक्षकांचा विमा उतरविलेला होता. त्यांना याकामी रक्कम रु.१,०५,१७१/- मात्र खर्च आलेला आहे.

करीता, दोन्ही एजन्सीमिळून सुरक्षा रक्षकांचा विमा उतरविणेकामी एकूण रक्कम रु.३,४७,८४८/- खर्च आलेला आहे.

दि.३०.०६.२०२१ रोजी संबंधित दोन्ही ठेकेदारांची मुदत संपुष्टात आल्याने, त्यांना दि.०१.०७.२०२१ ते दि.३१.०७.२०२१ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली आहे. कंत्राटदारास ०१ महिने अल्प मुदतवाढ देण्यात आलेली असल्याने, अशा कमी कालावधीत कोणतीही विमा कंपनी विमा उतरवित नाही.

प्रस्ताव:-

संस्थानला सन २०२१-२२ करीता कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नविन ठेकेदारांची नेमणूक करणेकामी दाखल केलेले सिव्हील ॲप्लीकेशन नं.४६७४/२०२१ बाबत मा.रजिस्टार यांनी '' The Hon'ble Lordships are pleased to reject your circulation note.The liberty is granted to move afresh Only. after physical hearing is restored.This rejesction shall not be suppressed if praecipe is moved again, otherwise,cost will be imposed.'' अशी ऑर्डर केलेली असून, सदर ॲप्लीकेशन मंजूर झालेले नाही. सबब, सध्या आहे त्याच ठेकेदारांना आहे त्याच अटी शर्तींवर मुदतवाढ देण्यात येत आहे व येथून पुढेही मुदतवाढ देणे गरजेचे आहे. तथापि, मुदतवाढीचे कालावधीत सध्याचे ठेकेदार कंत्राटी कर्मचा-यांची अल्पमुदतीत विमा पॉलिसी उतरवित नसल्याने, दि.०१.०७.२०२१ ते दि.३१.०७.२०२१ अखेरचे मुदतवाढीचे कालावधीत तसेच येथून पुढेही मुदतवाढीचे कालावधीत एखादा कंत्राटी सुरक्षा कर्मचारी मयत झाल्यास विशेषबाब म्हणून त्यांचे वारसास आर्थिक मदत देणेकामी संस्थानमार्फत ठरावीक रक्कम ठेकेदारामार्फत सदर कर्मचा-याचे वारसास देता येईल, तरी सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर

(कामगार विभाग)

विषय:- सन- २०२१ -२२ करीता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी व नविन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक होईपावेतो आहे त्या ठेकेदारांना मुदतवाढ देणेकामी मान्यता मिळणेबाबत...

टिपणी -

सन २०२१-२२ करीता संस्थानला सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नविन ठेकेदारांची नेमूणक करणेकामी निविदा मागविणे तसेच निविदा प्रक्रिया पूर्ण होईपावेतो आहे त्याच ठेकेदारांना मुदतवाढ देणेकामी दि.०१.०३.२०२१ रोजी मा.तदर्थ समिती सभेसमोर खालीलप्रमाणे फेरप्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

अ) संस्थानकडे कायम व कंत्राटी म्हणून वर्ग केलेले १४५ सुरक्षा रक्षक वगळता उर्वरीत ६९४ सुरक्षा कामगार पुरविणेसाठी संध्याचे ठेकेदार यांना दि.०१.०३.२०२१ ते निविदा प्रक्रिया पूर्ण होवून नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत मुदतवाढ मिळावी.

ब) बाह्ययंत्रणेमार्फत ६९४ सुरक्षा रक्षक पुरविणेसाठी ई-निविदा मागविण्यास मान्यता असावी.

तथापि, त्यावर सदर ''परिस्थितीत ३३४ जादा पदे वाढवून देता येणार नसल्याने सद्या दिलेल्या प्रस्तावातील ८३९ पदांपैकी ३३४ पदे वगळून इतर ५०५ पदांकरिता पुढील दोन महिन्यांसाठी म्हणजेच दिनांक ३० एप्रिल, २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात माझी हरकत नाही.या दरम्यान वरील ५०५ कामगार पुरवण्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या परवानगीने ई-निविदा मागविता येईल. त्यासाठी संस्थानप्रशासनाने मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करावे. असे निर्देश दिलेले आहेत. तसेच, सदर प्रस्तावावर मा.श्रीमती गीता प्र.बनकर, सहाय्यक धर्मदाय आयुक्त, यांनी मा.अध्यक्ष, तदर्थ समिती यांचे निर्णयाशी सहमती दर्शविलेली आहे.

तथापि, मा.श्री भानुदास ह.पालवे, अपर आयुक्त, नाशिक सदस्य, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी यांनी याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

''दिनांक १४/०१/२०२० रोजीचे तदर्थ समितीच्या बैठकीमध्ये एकूण ८१३ सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी मंजूरी मिळाली होती. त्यामुळे सद्यस्थितीत एकूण कार्यरत ८३९ मधून १४५ वजा जाता ६९४ सुरक्षा कर्मचारी यांना ३० एप्रिल २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात हरकत नाही. यादरम्यान ६९४ कामगार पुरविण्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे परवानगीने ई-निविदा मागविता येईल त्यासाठी संस्थान प्रशासनाने मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे.'' असा निर्णय झालेला असल्याने, सध्याचे कार्यरत सुरक्षा ठेकेदार यांना दि.०१.०३.२०२१ ते दि.३०.०४.२०२१ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली होती.

त्यावर मा.तदर्थ (Ad-hoc) समिती दि.०१.०३.२०२१ रोजीचे चक्रिय पध्दतीने मिळालेल्या मान्यतेअन्वये सन २०२१-२२ कालावधीसाठी संस्थानला कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेकामी व निविदा मागविणेस तसेच जाहिरात प्रसिध्द करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार www.mahatenders.gov.in, व संस्थानचे वेबसाईटवर, वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली होती.

सदर ई-निविदेमध्ये ०४ निविदा धारकांनी भाग घेतला होता. प्राप्त निविदा (तांत्रिक निविदा) दि.१६.०४.२०२१ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आले असून याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या ०४ निविदाधारकांच्या कमर्शिअल (वाणिज्यीक) निविदा दि.१९.०४.२०२१ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडल्या असता, सदर निविदामध्ये मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. पुणे व मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम्स, पुणे यांचे दर ०.०००१% असे L-1 आलेले असल्याने,

दि.२०.०४.२०२१ रोजी, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे दाखल करण्यात आलेल्या सिव्हील ॲप्लीकेशनचे अधिन राहून मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. पुणे व मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम्स, पुणे यांचे दर ०.०००१% L-1 व समान असल्याने त्यांना दि.०१.०५.२०२१ ते दि.३०.०४.२०२२ अखेर संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविण्याचे कार्यादेश विभागून देणेबाबत चक्रिय पध्दतीने निर्णय होणेकरीता प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

पान नं. ०२ वर ...

त्यावर, दि.२०.०४.२०२१ रोजी मा.अध्यक्ष, तदर्थ समिती यांनी, ''पूर्वी संस्थान प्रशासनाला ५०५ पदांकरिता दि.३०.०४.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. ती मुदतवाढ त्याच अटी व शर्तींवर माझेतर्फे ३० जून २०२१ पर्यंत देण्यात हरकत नाही.'' असे निर्देश दिलेले आहेत. तसेच उवरीत तदर्थ समिती सदस्य यांनी देखील ३० जून २०२१ अखेर मुदतवाढ देण्यास सहमती दर्शविल्याने, सध्याचे ठेकेदारांना दि.०१.०५.२०२१ ते दि.३०.०६.२०२१ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सदरची मुदतवाढ दि.३०.०६.२०२१ रोजी संपुष्टात आलेली असल्याने त्यावर मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन मंजूर होईपावेतो आहे त्याच ठेकेदारांना मुदतवाढ मिळणेबाबत दि.२३.०६.२०२१ रोजी मा.तदर्थ समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यावर मा.तदर्थ समितीने ''१)संपूर्ण विषयाचा अभ्यास केला. दि.२५.०२.२०२१ तसेच दि.०१.०३.२०२१ रोजी झालेल्या निर्णयाप्रमाणे समितीच्या सदस्यांमध्ये २ X २ अशी मते विभागली गेली. सदस्य सचिव तसेच समितीचे दुसरे सदस्य श्री पालवे यांनी ६९४ कर्मचा-यांसाठी निविदा काढण्यास परवानगी दिली मात्र समितीचे अध्यक्ष तसेच दुस-या सदस्या श्रीमती बनकर यांनी ५०५ पदांसाठी निविदा काढण्यासाठी परवानगी दिली, अशी परवानगी देतांना मा.उच्च न्यायालयासमक्ष सर्व बाबी स्पष्ट करण्यात याव्यात, असे संस्थान प्रशासनास दि.२५.०२.२०२१ व ०१.०३.२०२१ च्या ठरावाप्रमाणे निर्देशित करण्यात आले होते. २)अभिलेखावरुन असे दिसते की, संस्थान प्रशासनाने मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन नं.४६७४/२०२१ दाखल केलेले आहे व ते प्रलंबित आहे. ३)अभिलेखावरुन हे स्पष्ट होते की, मूलतः सदरील ६९४ पदांकरिता काढलेली निविदा हीच तदर्थ समितीच्या निर्णयास अनुसरुन काढलेली नाही. मा.उच्च न्यायालयाने संस्थान प्रशासनाला ६९४ कर्मचा-यांसाठी निविदा काढावी, असे स्पष्ट आदेश दिलेले नाही. ४)संस्थान प्रशासनाला फक्त ५०५ पदांकरिता दि.३०.०६.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती, ती मुदतवाढ त्याच अटी व शर्तींवर मा.उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून माझेतर्फे ३१ जुलै २०२१ पर्यंत देण्यास हरकत नाही.'' असा निर्णय दिलेला आहे. त्यावर आहे त्या ठेकेदारांना दि.३१.०७.२०२१ अखेर आहे त्याच अटी शर्तींवर मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तथापि, याबाबत, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानला सन २०२१-२२ करीता कंत्राटी पध्दतीने सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेबाबत सिव्हील ॲप्लीकेशन नं.४६७४/२०२१ दाखल करण्यात आलेले होते. सदर ॲप्लीकेशनबाबत मा. रजिष्ट्रार यांनी खालील प्रमाणे आदेश केला आहे.

'' The Hon'ble Lordships are pleased to reject your circulation note.The liberty is granted to move afresh Only .after physical hearing is restored.This rejesction shall not be suppressed if praecipe is moved again, otherwise,cost will be imposed.'' अशी ऑर्डर केलेली आहे.

प्रस्तावना:-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दि.०१.०३.२०२० ते दि.२८.०२.२०२१ अखेर कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी (१)मे.मॉडर्न विर रेज सिक्युरिटी फोर्स, पुणे यांना ३५३ कंत्राटी सुरक्षा रक्षक व (२)मे.ईगल हंटर सोल्युशन, लि. नवी दिल्ली यांना ३४१ कंत्राटी सुरक्षा रक्षक असे एकूण दोन्ही एजन्सी मिळून ६९४ कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरविण्याचे कार्यादेश देण्यात आलेले असून, त्यानुसार ते कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरवित आहेत. तथापि, सदर सुरक्षा ठेकेदार यांची मुदत दि.२८.०२.२०२१ रोजी संपुष्टात आलेली आहे. सध्याचे ठेकेदार यांना ६९४ कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरविण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

तथापि,प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधिश, मा.अध्यक्ष, तदर्थ समिती व मा.सहाय्यक धर्मदाय आयुक्त,सदस्या, तदर्थ समिती यांनी दि.०१.०३.२०२१ रोजीच्या निर्णयानुसार ५०५ पदांकरीता दोन महिने मुदतवाढ व ५०५ पदांकरीता निविदा मागविणेकामी मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेस परवानगी दिलेली आहे.

विषय: मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १२४ मधील संस्थानचे भांडार परिसरात वेयरहाउस पद्धतीचे गोडाउन बांधणेसाठी आर्कीटेक्ट बिनेश सुकुमार, कोची यांनी सादर केलेले आराखडे व रु.३.०३ कोटी खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत..

टिपणी.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद : अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :

1. **नि.क्र.२१ दि.०६/०४/२०१२** -*"..यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीच्या स.नं.१२४ पैकी मधील सध्याचे मध्यवर्ती भांडार इमारती लगत मोकळ्या असलेल्या जागेत तळमजला अधिक दोन मजले असलेल्या नविन मध्यवर्ती भांडार इमारतीचे बांधकाम करण्यात यावे. याकामी मा.कार्यकारी अधिकारी यांनी या क्षेत्रातील विशेषत: स्टोअर मॅनेजमेंट क्षेत्रातील अनुभवी वास्तू विशारदांची नेमणूक करावी. सदर वास्तू विशारदांकडून प्रथमत: प्राथमिक बांधकाम आराखडे व बांधकाम खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात यावे व ते मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोनार्थ सादर करण्यात यावे, असें ठरलें."*
2. **नि.क्र.६५१ दि.२८/१२/२०१५** – (मा. त्रीसदस्य समिती) - "..नवीन भांडार इमारतीचे बांधकाम करणेस तत्वत: मान्यता देण्यात आली. याकामी प्रथमत: टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स यांची आर्किटेक्ट नेमणूक करणेत येऊन, भांडारासाठीची जागा निश्चिती करावी व संस्थानमधिल सर्व भांडारगृहांचे त्या ठिकाणी बांधकाम करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा."
3. **नि.क्र.२१ दि.०८/०१/२०१८** -*"..मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १२४ मध्ये नवीन भांडार इमारत बांधकामासाठी येणा-या अंदाजे रु.१३,७१,२६,८२३/- मात्रचे खर्चास व त्याकामी विहीत पद्धतीने आर्किटेक्टची नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली."*
4. **नि.क्र.२१ दि.३०/०६/२०१८** -*"..मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १२४ मध्ये नवीन भांडार इमारत बांधकामासाठी प्रकल्प सल्लागार नेमणूक करणेकामी Binesh Sukumar Architects and Planners, Kochi यांनी प्रकल्पाची अंदाजित रक्कम रु.१३,७१,२६,८२३/- मात्र या रकमेवर चर्चेअंती देवू केलेली १% प्रकल्प सल्लागार फी रक्कम रु.१३,७१,२६८.२३ मात्र स्विकारण्यात येवुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता देण्यात आली."*
5. **नि.क्र.४३ दि.३०/०१/२०१९**-".. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष संपले असल्याने संस्थानला प्रशस्त स्वरूपाच्या मोठया भांडारची आवश्यकता नाही. त्याकरीता वेयरहाउस पद्धतीचे दोन मोठे गोडाउन बांधण्यात यावेत. त्यासाठी सुधारीत प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा असे ठरले."

प्रस्तावना : स.नं.१२४ मधील संस्थानचे जागेत १८५२ चौ. मी. क्षेत्रफळाची मध्यवर्ती भांडार इमारत सन २००२ मध्ये बांधण्यात आली आहे. तसेच साईनिवास इमारतीचे तळमजल्याचा वापर भांडारसाठी केला जात आहे. भांडार विभागाने दि.१२/०१/२०१२चे पत्रान्वये अन्नधान्य, किराणा माल तसेच संस्थान प्रकाशित पुस्तके / फोटो ठेवणेकामी नविन भांडार इमारत बांधकाम करणेबाबत कळविले. त्यानुसार स.नं.१२४ मधील उर्वरीत जागेत तळमजला अधिक दोन मजले इमारत बांधणेचा प्रस्ताव दि.०६ एप्रिल, २०१२ रोजीचे सभेत सादर केला असता त्यावर उपरोक्तप्रमाणे निर्णय झाला आहे. दि.२१/०७/२०१३ रोजी सदरहु कामासाठी आर्कीटेक्ट काबरे चौधरी नाशिक यांचेकडून आर्कीटेक्चरल सेवा घेणेकामी प्रस्तावीत करणेत आले होते. त्यावर तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी यांनी *"N.A. झालेनंतर Architect नेमावे व पूढील कार्यवाहीसाठी सादर करावे"* असे निर्देश दिले.

२..

• श्रींचे समाधी शताब्दीवर्षानिमित्तचे आराखडयात या कामाचा समावेश असल्याने रु.८,५०,५०,०००/- खर्चाचे प्रस्तावावर दि.२८/१२/२०१५ रोजीचे मा. त्रीसदस्य समितीचे सभेत "..प्रथमतः टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स यांची आर्किटेक्ट नेमणूक करणेत येऊन, भांडारासाठीची जागा निश्चिती करावी व संस्थानमधिल सर्व भांडारगृहांचे त्या ठिकाणी बांधकाम करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा" असा निर्णय झाला.

• त्यानुसार टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स यांना कळविण्यात येवून श्रींचे समाधी शताब्दी वर्षानिमित्त करावयाचे कामाचे DPR मध्ये या कामाचा समावेश करणेत आला.मात्र टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स यांनी दि. २९/०२/२०१६ रोजीचे ई-मेलद्वारे *'As per TOR document, detailed drawings and estimate is not a part of the present scope of works.'* असे कळवून सदरहु कामाचे सविस्तर अंदाजपत्रक व आराखडे सादर केले नाहीत व काम करणेबाबत सहमती कळविली नाही.

• दरम्यान मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ मधील क्षेत्र विकासास तहसिलदार, राहाता यांनी दि. २८/०१/२०१६ अन्वये ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेतील नि. क्र.२१ अन्वये रु.१३.७१ कोटी खर्चास व याकामी आर्किटेक्ट नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार ई-प्रस्ताव मागवून प्रकल्प किंमतीच्या १% फी दराने आर्कीटेक्ट बिनेश सुकुमार, कोची यांची इकडील दि.०४/०८/२०१८ अन्वये प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

उ) प्रकल्प सल्लागार यांनी या कामाचे प्राथमिक आराखडे व रु.२२,३७,००,०००/- मात्र रकमेचे ढोबळ अंदाजपत्रक सादर केले होते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

Sl.No.	Description	Area in sft	Amount in lakhs Rs.	
	STORAGE BUILDING			
1	FOUNDATION (Raft)	-	175.00	Lakhs
2	BASEMENT FLOOR (Parking only)	17216.00	254.00	"
3	GROUND FLOOR (Office &Store)	17216.00	313.00	"
4	1st FLOOR (Store)	17216.00	320.00	"
5	2nd FLOOR (store)	17216.00	341.00	"
6	3rd FLOOR(store)	17216.00	357.00	"
7	TERRACE FLOOR(stair & lift cabins)	1200.00	21.00	"
8	EXTERNAL SERVICES		456.00	"
	TOTAL	**87280.00**	**2237.00**	**Lakhs**

उपरोक्त **बेसमेंट +तळमजला + ३ मजले** इमारतींचे क्षेत्रफळ व सुविधांचा तपशिल खालीप्रमाणे आहे.

बेसमेंट - एक कार लिफ्ट व रॅम्पसह एकूण ३६ वाहनांची पार्कींगव्यवस्था (१२,७८२ चौ.फुट), इलेक्ट्रीकल जनरेटर रुम (१६०५चौ. फुट)

तळमजला- ऑफीस (९६२ चौ.फुट x१) - स्टोरेज (२३६४ चौ.फुट x२)+ (१००२x१), कोल्ड स्टोरेज (२५४६ चौ. फुट x१) व लोडींग अनलोडींग प्लॅटफॉर्म, ट्रक बे, लेडीज व जेन्ट्स चेंजिंग रुम्स, टॉयलेट, डायनिग, पॅन्ट्री लॉबी ४.१० मी. कॉरीडोअर इ.

पहिला मजला-स्टोरेज (२३६४ चौ.फुट x२)+(१६०५ चौ.फुट x१) (१३०२ चौ.फुट x१),(४१६४ चौ.फुटx१) लेडीज व जेन्ट्स चेंजिंग रुम्स, टॉयलेट, लॉबी ४.१० मी. कॉरीडोअर इ.

दूसरा मजला- स्टोरेज (२३६४ चौ.फुट x२)+ (१६०५चौ.फुट x१)(१३०२ चौ.फुट x१),(४१६४ चौ. फुट x१) लेडीज व जेन्ट्स चेंजिंग रुम्स, टॉयलेट, लॉबी ४.१० मी. कॉरीडोअर इ.

तिसरा मजला- स्टोरेज (२३६४ चौ.फुट x२)+ (१६०५चौ.फुट x१)(१३०२ चौ.फुट x१),(४१६४ चौ.फुट x१) लेडीज व जेन्ट्स चेंजिंग रुम्स, टॉयलेट, लॉबी ४.१० मी. कॉरीडोअर इ.

इतर सुविधा- एक मेन स्टेयरकेस व एक फायर स्टेयरकेस, एक २० पॅसेंजर क्षमतेची लिफ्ट, एक कार लिफ्ट, दोन गुड्स लिफ्ट, ओव्हरहेड वॉटर टॅंक ६५००० लि., रेनवॉटर हार्वेस्टींग, सोलर प्लॅंट सीसी टीव्ही, फायर फायटींग, गेट, सिक्युरिटी केबिन, कोल्ड स्टोरेज- वॉल व सिलींग PUF पॅनेलींग, इलेक्ट्रीकल जनरेटर, लॅंडस्केपिंग, फ्रेश ऐयर सप्लाय सिस्टीम, पेस्ट कंट्रोल, साईनेज, वॉटर सप्लाय सॅनिटरी इ.

३..

- मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील उपरोक्त नि.क्र.४३ अन्वये "..श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष संपले असल्याने संस्थानला प्रशस्त स्वरूपाच्या मोठया भांडारची आवश्यकता नाही. त्याकरीता वेयरहाउस पद्धतीचे दोन मोठे गोडाउन बांधण्यात यावेत." असे ठरले. त्यानुसार सल्लागार यांना दि.०७/०३/२०१९ चे पत्रान्वये वेयरहाउस पद्धतीचे दोन मोठे गोडाउन बांधण्यासाठी प्लॅन-एस्टीमेट सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.

- सल्लागार यांनी दि.०४/१२/२०१९ अन्वये एकूण १८६७.०८ चौरस मिटर (२००९० चौ.फुट) क्षेत्रफळाच्या दोन आर. सी. सी. सिंगलस्टोरीड इमारतीचे आराखडे व रु.३,०२,८१,०००/- रकमेचे प्राथमिक अंदाजपत्रक सादर केले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

BLOCK ESTIMATE Summary-					
Sl. No.	Description	Area in sft	Amount in lakhs Rs.		
CENTRAL STORE BUILDING					
A	GODOWN -1	8770.00	Rs.	132.93	Lakhs
B	GODOWN -2	10829.00	Rs.	162.47	Lakhs
C	STAIR & LIFT	491.00	Rs.	7.41	Lakhs
	TOTAL	20090.00	Rs.	302.81	Lakhs

उपरोक्त सिंगलस्टोरीड इमारतींचे क्षेत्रफळ व सुविधांचा तपशिल खालीप्रमाणे आहे.

गोडाउन नं.०१ – ८१५.१० चौ.मी. (८७७०चौ.फुट)	**गोडाउन नं.०२ – १००६.३९ चौ.मी.** (१०८२९चौ.फुट)
• ट्रान्सफॉर्मर रुम(२७३ चौ.फुट), जनरेटर रुम (२५२ चौ. फुट) व इलेक्ट्रीक रुम (१९४ चौ.फुट) व प्रसाधन गृह. • बकेट,मग,ब्रशेस,झाडु,वॉशिंग-सोप पावडर इ. (११०३ चौ. फुट) • बेड्स व पिलोज - (१३२३ चौ.फुट) • वॉटर बॉटल्स - (१३२३ चौ.फुट) • इलेक्ट्रीक साहित्य (१७६५ चौ.फुट) • प्लंबिंग व सॅनिटरी साहित्य (१७६५चौ. फुट) • दोन इमारतींमध्ये ६ मी.रुंदीचा पॅसेज	• ड्रायफ्रुट व किराणा माल (२२३० चौ.फुट) • प्रकाशने (१०२४ चौ.फुट) • रंगमटेरियल व हाडवेयर - (११३८ चौ.फुट) • फुड ॲटेम्स- (११३८ चौ.फुट) • क्लॉथ्स (१४७९ चौ.फुट) • फर्निचर साहित्य (१५४८ चौ.फुट) • देणगी साहित्य (११५८ चौ.फुट) • जनरेटर रुम (२५६चौ.फुट) व इलेक्ट्रीक रुम (२६३ चौ.फुट) • जिना व लिफ्ट– ४५.५९चौ.मी.
एकूण ०५ हॉल्स, ट्रान्सफॉर्मर रुम, जनरेटररुम व विद्यूतकक्ष	एकूण ०७ हॉल्स, जिना, लिफ्ट, जनरेटर व विद्यूतकक्ष
पार्कींग – क्षमता - ०७ सायकल्स ०७ मोटर सायकल्स व ०७ कार्स	

मा. व्यवस्थापन समितीचे नि.क्र.४३ दि.३०/०१/२०१९ अन्वये "श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष संपले असल्याने संस्थानला प्रशस्त स्वरूपाच्या मोठया भांडारची आवश्यकता नाही. त्याकरीता वेयरहाउस पद्धतीचे दोन मोठे गोडाउन बांधण्यात यावेत. त्यासाठी सुधारीत प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा असे ठरले." त्यानुसार सल्लागार यांनी एकूण १८६७.०८ चौरस मिटर (२००९० चौ. फुट) क्षेत्रफळाच्या दोन आर.सी.सी. सिंगलस्टोरीड इमारतीचे आराखडे व रु.३,०२,८१,०००/- रकमेचे प्राथमिक अंदाजपत्रक सादर केले आहे. उपरोक्तप्रमाणे इमारतीचे आराखडे व रु.३,०२,८१,०००/- रकमेचे प्राथमिक अंदाजपत्रक खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांचेकडे चक्रीय पध्दतीने सादर करणेत आला होता.

४..

याबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी दि.१०/०५/२०२१ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

"..सोबत दिलेल्या सुचित नमूद असलेले विषय हे एकतर तात्काळ करण्यासारखे नाहीत किंवा त्यावर सविस्तर चर्चा/विचार विनिमय होणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत ते विषय परत पाठविलेले आहेत.."

प्रस्ताव- तरी शिर्डी येथील सर्व्हे न.१२४ मधील वेयरहाउस टाईप भांडार इमारतीचे आर्कीटेक्ट बिनेश सुकुमार, कोची यांनी सादर केलेले आराखडे व रु.३.०३ कोटी खर्चाचे ब्लॉक एस्टीमेटला मान्यता मिळणेबाबतचे उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

21.5.21

कान्हूराज बगाटे (भा.प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

15/5 BR 15/05

विषय क्र.- 2e

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय

207

बांधकाम विभाग

विषय : मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१४८ मधील श्री साईनाथ रुग्णालय व द्वारावती भक्तनिवासचे वाढीव इलेक्ट्रीक लोडकरिता सबस्टेशन व जनरेटर इमारत बांधकामासाठी आर्कीटेक्ट इनजिनियस स्टुडिओ प्रा. लि., गुरगाव यांचे अंदाजपत्रकानुसार रु.७१,१०,४४४/- खर्चास मान्यता मिळणेबाबत..

टिपणी-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद : अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क)अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र.:

१ दि.२६/०७/२०१९ (विद्यूत विभाग)-*"..यावर सविस्तर चर्चा होवुन, श्री साईनाथ हॉस्पीटल तसेच द्वारावती भक्तनिवास इमारतीचे वाढीव लोडकरीता ट्रान्सफॉर्मर, जनरेटर, क्युबिकल, इलक्ट्रीकल पॅनेल व केबल खरेदी करून बसविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रू.३,७४,००,३२५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. १०१० केव्हीए जनसेट-०२ नग व २५०० केव्हीए सबस्टेशन, जनरेटर रूम व पॅनेल रुमचे बांधकामासाठी येणा-या अपेक्षित खर्चाचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा, व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर एकत्रित खर्चाचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविण्यात यावा असे ठरले. "*

२. मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभा नि. क्र.०६ दि.१४/०१/२०२०-*'.. श्री साईनाथ रुग्णालय व द्वारावती भक्तनिवासचे वाढीव इलेक्ट्रीक लोडकरीता सबस्टेशन व जनरेटरसाठी इमारतीचे बांधकाम करणेकामी आर्कीटेक्ट म्हणून (Structural Design सह) श्री साईनाथ रुग्णालयाचे टॉयलेट नूतनीकरण करणे कामासाठी नियुक्त करण्यात आलेले आर्कीटेक्ट इनजिनियस स्टुडिओ प्रा.लि., गुरगाव यांची प्रकल्प किंमतीच्या ०.५०% या मंजूर फी दराने नियुक्ती करण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.'*

प्रस्तावना : मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ चे सभेतील नि. क्र.४२१ अन्वये उपरोक्त सबस्टेशन व जनरेटर रुमचे विद्यूतविषयक कामासाठी रू.३,७४,००,३२५/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली आहे. विद्यूत विभागाने बांधकाम व विद्यूत विषयक खर्चास मा. व्यवस्थापन समितीची एकत्रित मान्यता घेणे आवश्यक होते. तथापी उपकार्यकारी अभियंता-विद्यूत यांनी सदरच्या सबस्टेशन, जनरेटर रुम व पॅनेल रुमचे बांधकामाचे इस्टीमेटचा खर्च विचारात घेतला नसल्याने त्यांनी इमारत बांधकामाचे इस्टीमेटबाबत बांधकाम विभागास कळविले होते. इकडील विभागामार्फत आर्कीटेक्ट इनजिनियस स्टुडिओ प्रा.लि.,गुरगाव यांचेकडून सबस्टेशन व जनरेटर रुमचे बांधकामासाठी प्लॅन व इस्टिमेट मागविण्यात आलेअसून त्यांनी या कामाचे रु.७१,१०,४४४/- रकमेचे अंदाजपत्रक सादर केले आहे. सदर बांधकामाचे प्लॅन व इस्टिमेटबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. प्लॅनबाबतचा तपशिल-

अ.क्र.	तपशिल	माहिती
१	बांधकामाचे प्रस्तावीत ठिकाण	मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१४८ मधील श्री साईनाथ रुग्णालय व द्वारावती भक्तनिवासचे सध्याचे जनरेटर रुमसमोरील पुर्व बाजूचे मोकळया जागेत सदर बांधकाम प्रस्तावीत आहे.
२	बांधकामाचे क्षेत्रफळ	३६६.९९ चौ.मी. (३९४८.८१ चौ.फुट)
३	**कामाचे स्वरूप -** (बांधकामाची मोजमापे-२५.३१मी. x १४.५० मी. उंची-६.०० मी.)	• आर.सी.सी. फ्रेम्ड स्ट्रक्चर. • प्रेस्ड स्टील डोअर फ्रेम, ॲल्युमिनियम विंडो व रोलींग शटर • डी.जी. सेट फौंडेशन व केबल ट्रेंच • पॉलीश्ड कोटा फ्लोरींग • आतील बाजूने ऑईलपेंटने रंगकाम • बाहेल बाजूने एक्स्टेरीयर वेदर शिल्ड पेंटने रंगकाम

२. इस्टिमेटबाबतचा तपशिल-

Sr. No.	Description	Amount Rs.
1	Excavation	1,18,224.44
2	Plain Cement Concrete	4,72,189.07
3	Reinforced Cement Concrete	32,29,523.60
4	Brick Masonry	5,49,701.68
5	Water Proofing	3,42,520.23
6	Plastering and Pointing	2,54,364.77
7	Paving Flooring and dado	3,55,266.24
8	Coloring	1,22,501.87
9	Doors and Windows	2,67,750.00
10	M. s. steel work	1,16,190.72
11	Plumbing , Electrical Work	-
	TOTAL	58,28,232.62
	Add 18% GST	10,49,081.87
	Add 4% Contingencies	2,33,129.30
	Grand Total Rs.	71,10,443.80

विभागाचा अभिप्राय - मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ चे सभेतील नि. क्र.४२१ अन्वये मान्यता देण्यात आलेल्या रु.३,७४,००,३२५/- या रकमेत सबस्टेशन व जनरेटर रुमचे सिव्हील कामासाठी अपेक्षित खर्चाचा समावेश नाही. दि.२६/११/२०२०चे टिपणीवर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदयांनी" *'A' Electric काम आहे. Architect -? Electrical Advisor बाबत अभिप्राय नोंदवावेत*" असे निर्देश दिले आहेत. त्यानुसार विद्यूत विभागामार्फत आर्कीटेक्ट इनजिनियस स्टुडिओ प्रा. लि.,गुरगाव यांचेकडून मागविण्यात आलेनुसार आर्कीटेक्ट यांनी दि.२२/०१/२०२१ रोजीचे इ-मेलद्वारे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

"...We have reviewed the BOQ for additional electrical load (Transformer, Generator and cabling for electrical panel) as per CSR 2018-19 looks fine."

तसेच आर्कीटेक्ट यांनी या कामाचे रु.७१,१०,४४४/- रकमेचे अंदाजपत्रक सदर केले आहे. प्रस्तुत प्रकरणी करणेत आलेल्या कार्यवाहीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ चे सभेतील नि. क्र.४२१ अन्वये उपरोक्त सबस्टेशन व जनरेटर रुमचे विद्युतविषयक कामासाठी रू.३,७४,००,३२५/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली आहे. या रकमेत विद्युत विभागाने बांधकामाचा खर्च विचारात घेतलेला नाही. त्यामुळे सदर सबस्टेशन व जनरेटरसाठी इमारतीचे बांधकामासाठी आर्कीटेक्ट म्हणून इनजिनियस स्टुडिओ प्रा. लि., गुरगाव यांची दि.०७/०२/२०२० अन्वये नेमणूक करणेत आली आहे. आर्कीटेक्ट यांनी या कामाचे रु. ७१,१०,४४४/- रकमेचे अंदाजपत्रक सदर केले आहे.
2. इकडील दि.२४/०२/२०२१ रोजीचे टिपणीवरील मान्यतेनुसार सबस्टेशन व जनरेटर रुमचे सिव्हील कामासाठी रु.७१,१०,४४४/- मात्र खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ **(Ad-hoc)** समिती यांचेकडे चक्रीय पध्दतीने सादर करणेत आला होता.
3. याबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी दि.१०/०५/२०२१ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

"..सोबत दिलेल्या सुचित नमूद असलेले विषय हे एकतर तात्काळ करण्यासारखे नाहीत किंवा त्यावर सविस्तर चर्चा/विचार विनिमय होणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत ते विषय परत पाठविलेले आहेत.."

प्रस्ताव- तरी सर्व्हे नं.१४८ मधील प्रस्तावीत सबस्टेशन व जनरेटर रुमचे सिव्हील कामासाठी रु.७१,१०,४४४/- मात्र खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

21.5.21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारीअधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- 30

मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर

बांधकाम विभाग

विषय - श्री साईबाबा मंदिर परीसरातील देणगी काऊंटर नं.०२ व व्हि.आय.पी प्रतिक्षा कक्ष (पारायण हॉल) चे पाठीमागील (पश्चिम) बाजूस साईभक्तांचे ऊन व पावसापासून संरक्षण होणेसाठी कॉरीडॉरचे बांधकाम करणेसाठी येणारे रू.१९,५५,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास व याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत...

टिपणी -

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद - अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनांसाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

प्रस्तावना - श्री साईबाबा मंदिर परीसरात उन्हाळा व पावसाळ्याचे कालावधीत साईभक्तांचे ऊन व पावसापासून संरक्षण होणेकरीता वॉटरप्रुफ छताचे मंडप उभारणेत येतात. सध्या दर्शन घेतल्यानंतर साईभक्त देणगी काऊंटर नं.२ व पुढे दत्त मंदिर या मार्गाने गेट नं.४ अथवा गेट नं.५ मधून बाहेर पडतात. त्यामुळे देणगी काऊंटर नं.२ व्ही.आय.पी प्रतिक्षा कक्ष (पारायण हॉल) चे पश्चिम बाजूस बुकस्टॉल समोर असलेल्या मोकळ्या जागेत साईभक्तांची नेहमी वर्दळ असते.

याबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.१२/०३/२०२१ रोजी मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. प्रशासकिय अधिकारी तथा मुख्य लेखाधिकारी, मा. श्री. किसवे, प्रशासकिय अधिकारी, उप अभियंता यांचे समवेत वरील जागेची पाहणी केली. सदर पाहणीचे वेळी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांनी सदर ठिकाणी दक्षिणेस बुक स्टॉल, पूर्वेस देणगी काऊंटर नं.२ व प्रतिक्षालय व उत्तरेस नवीन दर्शन रांग कॉरीडॉर या दत्त मंदिराचे पाठिमागील भागामध्ये आर.सी.सी स्लॅब टाकून कॉरीडॉरचे बांधकाम करणेसाठी प्रस्ताव सादर करण्याची सूचना केली आहे. त्यानुसार या प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो., दिल्ली यांचेकडून याकामाचे नकाशे व सविस्तर अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. सदर अंदाजपत्रकानुसार वरीलप्रमाणे नियोजीत कॉरीडॉरचे बांधकामाकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

CONSTRUCTION OF RCC CORRIDOR BEHIND DONATION OFFICE AND WAITING HALL NEAR DATTA MANDIR

RECAPITULATION SHEET (SSR 2020 - 21)

S.NO.	DESCRIPTION	AMOUNT (RS.)
A	CIVIL AND ALLIED WORKS	
1	EXCAVATION & DISMANTLING WORK	25,948.78
2	PLAIN CEMENT CONCRETE WORK	66,015.59
3	REINFORCEMENT CEMENT CONCRETE	608,873.01
4	BRICK / BLOCK WORK	28,373.64
5	PLASTERING AND POINTING WORK	42,269.41
6	FLOORING WORK	257,308.59
7	COLOUR, WHITE WASHING, DISTEMPERING	12,755.16
8	WATERPROOFING WORK	99,103.20
9	MISCELLANEOUS WORKS	319,737.18
	TOTAL (A) :	**1,460,384.56**
B	ELECTRICAL WORKS	91,836.87
	TOTAL (B) :	**91,836.87**
	TOTAL AMOUNT (A+B) :	**1,552,221.43**
	GST @ 18% ON (A):	**262,870.00**
	ADD CONTINGENCIES @ 4% :	**62,089.00**
	ADD CENTAGE CHARGES @ 5% :	**77,611.07**
	TOTAL PROJECT COST (A+B):	**1,954,791.50**
	TOTAL PROJECT COST R/O:	**1,955,000.00**

पान क्र.०२ वर...

विभागाचा अभिप्राय - श्री साईबाबा मंदिर परीसरातील देणगी कार्यालय व प्रतिक्षा कक्षाचे पाठीमागील (पश्चिम) बाजूस साईभक्तांचे ऊन व पावसापासून संरक्षण होणेकरीता आर.सी.सी कॉरीडॉरचे बांधकाम करणेसाठी आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो., नवि दिल्ली यांचेमार्फत सादर करणेत आलेल्या अंदाजपत्रकानुसार एकूण रक्कम रु.१९,५५,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर कामासाठी आर्किटेक्ट यांचेमार्फत सविस्तर नकाशे तयार करुन त्यास शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची बांधकाम परवानगी घ्यावी लागेल. तसेच याकामी आर्किटेक्ट यांचेकडून आर्किटेक्टचरल वर्किंग ड्रॉईंग, आर.सी.सी. डिझाईन व ई-निविदा प्रपत्रे तयार करुन मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेने वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे ई-निविदा मागविता येतील.

प्रस्ताव - तरी श्री साईबाबा मंदिर परीसरातील देणगी कार्यालय व प्रतिक्षा कक्षाचे पाठीमागील (पश्चिम) बाजूस दत्त मंदिराजवळ साईभक्तांचे ऊन व पावसापासून संरक्षण होणेकरीता आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो., नवि दिल्ली यांनी सादर केलेल्या नकाशानुसार आर.सी.सी कॉरीडॉरचे बांधकाम करणेसाठी येणारे रक्कम रु.१९,५५,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास, तसेच याकामी सदरहू आर्किटेक्ट यांचेकडून आर्किटेक्चरल वर्किंग ड्रॉईंग, आर.सी.सी. डिझाईन व ई-निविदा प्रपत्रे तयार करुन घेणेस, तसेच सदर बांधकामासाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची बांधकाम परवानगी घेऊन याकामी वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे ई-निविदा मागविणेसाठी सदर प्रस्तावास मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत मान्यता मिळणेस विनंती.

21/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- 39

मा. तदर्थ (Ad hoc) समितीचे सभेपुढील विषय

बांधकाम विभाग

विषय:- मंदिर परिसरात श्री गणेश मंदिरालगत दक्षिण बाजूस वस्तुसंग्रहालयात ठेवलेल्या श्रीराम, सिता, लक्ष्मण व हनुमान या मुर्त्या स्थापित करणेसाठी मंदिर बांधकामास येणारे रक्कम रु. ९,५१,०००/- मात्रचे खर्चास व याकामी दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत...

टिपणी-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :-

१) अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम कलम २१ (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

२) अधिनियमाचे कलम १४ पोटकलम (२) च्या खंड (ख) अन्वये, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना बांधकामासाठी किंवा मालाच्या पुरवठयासाठी निविदा मागविण्याचे आणि जेव्हा अशा निविदेची रक्कम अथवा मुल्य पाच लाख रुपयांहून अधिक नसेल तेव्हा त्या निविदा स्विकारण्याचे अधिकारी असतील, अशी तरतूद आहे.

प्रस्तावना:- शिर्डी ग्रामस्थानी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रेशित केलेल्या दि.०७/०६/२०२१ रोजीचे पत्रान्वये वस्तु संग्रहालयात ठेवलेल्या श्रीराम, सिता, लक्ष्मण, हनुमान व श्रीकृष्ण मुर्त्यांचे मंदिराबाबत पुढील प्रमाणे नमूद केले आहे. *"बुट्टीवाड्यात साईचा पवित्र देह समाधीस्त करण्यात आलेला आहे. बाबांच्या हयातीत त्यांचे नागपुरचे श्रीमंत भक्त गोपाळराव बुटी यांनी वास्तव्यासाठी हा वाडा बांधला होता. साईबाबांच्या पुढाकारातून शिर्डीत श्रीरामनवमी व गोकुळाष्टमी उत्सव सुरु झाल्याने बुटी यांनी या वाड्यात बाबांच्या अनुमतीने श्रीराम, सिता, लक्ष्मण, हनुमान व श्रीकृष्णाच्या मुर्त्या स्थापित करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी मुर्त्याही आणून ठेवण्यात आल्या होत्या. पण मध्येच कारागिर गावी गेल्याने काम बंद पडले व दरम्यान बाबा आजारी पडून त्यांचेही निवार्ण झाले. मला वाड्यात घेऊन चला या बाबांच्या अंतीम इच्छेचा आदर ठेवून तत्कालीन भक्तांनी सर्वानुमते बाबांचा देह वाड्यात समाधीस्त केला. जेथे या मुर्त्या बसविण्यात येणार होत्या तेथे साईची समाधी झाली. त्यामुळे मुर्त्या तशाच स्थापना विरहीत राहिल्या. मात्र ज्या मुर्त्यांनी बाबांना आपले स्थान दिले त्याचे नैसर्गिक न्यायानुसार योग्य पुनर्वसन होणे गरजेचे होते. कदाचित बाबांवरही हे ऋण असु शकेल. त्यामुळे या मुर्त्यांचे दहा बाय दहा आकारात जुन्या धाटणीचे छोटेखानी व आकर्षक मंदिर उभारावे अशी शिर्डीकर व बुटी परिवाराची इच्छा आहे. बुटी परिवाराने त्यासाठी संस्थानशी पत्रव्यवहार करुन मंदिर उभारणीसाठी निधीही देण्याची तयारी दर्शविलेली आहे. शिर्डीकरही त्यासाठी हातभार लावणार आहेत. संस्थानला आर्थिक तोशीस लागु दिली जाणार नाही. हे मंदिर लेंडीबागेत किंवा महाव्दार क्र. ०१ एक समोरील मोफत सर्व्हे नंबर मध्ये उभारण्यात येणा-या बगीचात नगरपंचायतीची अनुमती घेऊन उभारत येईल. त्यामुळे भाविकांना दर्शनासाठी आणखी एक ठिकाण उपलब्ध होईल, हे मंदिर समाधी मंदिरापासून काही अंतरावर असल्याने गर्दीचेही विकेंद्रीकरण होईल. तरी बाबांच्या काळापासून रखडलेल्या या मुर्त्यांसाठी मंदिर उभारणी करुन त्यांची विधिवत स्थापना करुन बुटी परिवार, शिर्डीकर व तमाम साईभक्तांच्या भावनेचा सन्मान करावा अशी अपेक्षा आहे."*

संस्थान मंदिर पुजारी श्री बाळासाहेब जोशी यांनी याबाबत दिलेल्या माहितीत पुढीलप्रमाणे नमूद केले आहे, *"श्री साईबाबांचे समाधी मंदिर (बुट्टीवाडा) निर्माण करतेवेळी श्री. गोपाळराव बुट्टी यांना मुरलीधर मंदिर बांधण्याची स्फुर्ती झाली व कालांतराने मुर्तीसाठी चौथरा तयार झाला परंतु बाबांचे देहावसन झाले. नंतर त्याच ठिकाणी बाबांचा देह ठेवण्यात आला व बाबांचे समाधी मंदिर तयार झाले. याबाबत श्री साई चरित्रात खालीलप्रमाणे उल्लेख आढळतो.*

ऐसे काम होता होता । स्फुरण झाले बुट्टींच्या चित्ता ।
यांतची एक गाभारा धरिता । मुरलीधर स्थापिता येईल ॥
कल्पनेचा झाला उदय । परी न पुसतां बाबांचा मनोदय ।
बुट्टी न आरंभित काहीही कार्य । विना गुरुवर्य आज्ञापन ॥
बाबा फेरीवर असता । वाडियाच्यां सन्निध येता ।
व्दारानिकट स्वारी पावंता । काय पुसतात शामराव ॥
देवा बापुसाहेब वदती । दालनाच्या दोन्ही भिंती ।
पाडूनी तेथे स्थापु प्रीती । कृष्णमुर्ती मुरलीधरा ॥
ऐसे बापुसाहेब योजिती । परि पाहिजे आपूली अनूमती ।
देऊळ, वाडा दोन्ही येरीती । हातोहाती होतील ॥
असो पुढे झाला गाभारा । मुरलीधर देवाचा चौथरा ।
मुर्तिही एका कारागिरा । सोपविली की करावया ॥

या सच्चरितातील दाखल्यावरुन मुरलीधर स्थापनेचा मानस राहून गेला आणि बाबांच्या अखेरच्या शब्दानुसार "वाडियात पडो हे शरीर" अंती बाबांचे जे उदगार । तोचि शेवटी ठरला विचार । जाहले मुरलीधर बाबाचि ॥ (४४/३६) बाबांचा देह नियोजित मुरलिधराचे चौथ-यावर ठेवण्यात आला. मुरलीधराची मुर्ती कारागिराकडून करुन घेतली त्यावेळेसच राम पंचायतनाच्या मुर्ती करुन घेतल्या असाव्यात परंतु राम मर्तीचा उल्लेख साईसच्चरितामध्ये नाही."

पान ०२ वर

याबाबत मंदिर विभागाने दि. २२/०६/२०२१ रोजीचे मंजूर टिपणीन्वये शिर्डी ग्रामस्थांनी केलेल्या विनंती अर्जानुसार मारुती मंदिरात पुर्वीप्रमाणे आणखी एक मुर्ती दर्शनार्थ ठेवणे तसेच गुरुस्थान मंदिराचे पुर्नजिवन करणे व वस्तु संग्रहालयातील श्रीराम, सीता, लक्ष्मण व हनुमान मुर्ती गणपती मंदिरालग दक्षिणेस व श्रीकृष्णाच्या मुर्तीसाठी समाधी मंदिर स्टेजवर मंदिर निर्माणाबाबत संस्थानचे मंदिर परिसरात समक्ष जागेची पाहणी करुन मंदिरांचा आराखडा तयार करणे इ. कामी पुढील कार्यवाही बांधकाम विभागामार्फत करणेस मान्यता घेतलेली आहे. सोबत सदर टिपणी अवलोकनार्थ जोडली आहे.

समाधी मंदिर परिसरात श्री गणेश, श्री शनिदेव, व श्री महादेव मंदिरे असून श्री गणेश मंदिराचे दक्षिण बाजूस प्रसाद तयार करणेचे रुम व गणेश मंदिर यामध्ये मोकळी जागा आहे. सदरहू जागेत श्रीराम, सितामाई व लक्ष्मण ह्या मुर्तींची स्थापना करणेसाठी श्री गणेश मंदिराप्रमाणे मंदिर उभारणेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समक्ष पाहणीचे वेळी निर्देश दिले आहेत. याकामी आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे, नवि दिल्ली यांचेकडून आराखडा व अंदाजपत्रक तयार करुन घेतले असून याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

Sr.No.	Description	Amount
1	Excavation & Dismantling work	27,337.59
2	Plain cement Concrete work	10,500.58
3	Remforcement Cement Concrete	1,56,657.22
4	Brick/Block work	58,979.51
5	Plastering & Pointing work	21,317.44
6	Marble Flooring & Dado work	63,653.00
7	Painting work	2226.56
8	Water Proofing work	19,725.05
9	Stone works & miscellaneous	68,774.00
10	Polymer mortor for Kalas Moulding, carving work	3,50,155.00
	Total-	7,79,326.34
	GST 18%-	1,40,278.74
	Add Contengencies 4%-	31,173.05
	Grand Total -	9,50,778.14
	R/o -	**9,51,000.00**

उपरोक्त प्रमाणे मंदिर परिसरात श्री गणेश मंदिरालगत दक्षिण बाजूकडील मोकळया श्रीराम सितामाई, लक्ष्मण व हनुमान यांच्या मुर्ती स्थापन करणेकरीता मंदिराचे बांधकाम करणेसाठी रक्कम रु.९,५१,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. याकामी मा. तदर्थ समितीची मान्यता घेऊन मंदिराचे बांधकामासाठी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांची बांधकाम परवानगी घ्यावी लागेल. सदरचे काम अशा प्रकारचे काम करणारे ठेकेदारांकडून विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेता येईल.

प्रस्ताव- तरी समाधी मंदिर परिसरातील श्रीगणेश मंदिराचे लगत दक्षिण बाजूस श्रीराम सितामाई, लक्ष्मण व हनुमान या देवतांच्या मुर्त्या स्थापन करणेसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची परवानगी घेऊन मंदिराचे बांधकाम करणेस व त्यासाठी येणारे रक्कम रु.९,५१,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

(कान्हूराज बगाटे, भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- 32

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय

बांधकाम विभाग

213

विषय:- मौजे निमगांव को. येथिल संस्थानचे श्री साई प्रसादालय परिसरातील अंतर्गत रस्त्याचे मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टेनन्स ब्लॉक या लांबीचे डांबरीकरण करणे व मेन्टेनन्स ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लांट या लांबीतील रस्त्याचे खडीकरण करणे कामासाठी प्राप्त झालेल्या ई-निवीदेतील निम्नतम दराचे निविदाधारका समवेत चर्चा वाटाघाटी करून निर्णय होणेबाबत...

टिपणी-

१)	कामाचे नाव	श्री साई प्रसादालय परिसरातील अंतर्गत रस्त्याचे मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टेनन्स ब्लॉक या लांबीचे डांबरीकरण करणे व मेन्टेनन्स ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लांट या लांबीतील रस्त्याचे खडीकरण करणे.
२)	प्रशासकिय मान्यता	मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील नि.क्र.४८३
३)	अंदाजपत्रकीय रक्कम	रु.१९,४५,०००/-
४)	प्रस्तावित कामाबाबत माहिती	• मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टेनन्स ब्लॉक या लांबीतील रस्त्याचे खड्डे भरण्यासाठी Modified Penetration Macadam (MPM) या बाबीची तरतूद करणेत आलेली आहे. त्यावर संपुर्ण रस्त्याचे लांबीमध्ये 20mm thick Open Graded Premix Surfacing (OGPS) and Bituminus Type A liquid seal coat ही तरतूद आवश्यक असल्याने गृहीत धरण्यात आली आहे. • मेन्टेनन्स ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लांट या लांबीतील रस्त्यास 150mm thick GSB, 150mm thick WBM Grade I व 75mm thick WBM Grade II ही तरतूद आवश्यक असल्याने गृहीत धरण्यात आली आहे.
५)	निवीदा तपशील	दि.१३/०५/२०२११ रोजी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई – निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. सदरहू कामासाठी दि.२२/०५/२०२११ पर्यंत निवीदा जमा करणेस अंतिम मुदत देणेत आली होती. सदरचे अंतिम मुदतीत ०२ निवीदाधारकांनी ई-निवीदा जमा केल्या होत्या. दि.०७/०६/२०२१ रोजीचे खरेदी समितीचे सभेत तांत्रिक निवीदा उघडणेत आल्या असून दोनही निविदाधारक हे पात्र झाले आहेत. पात्र निविदांचा वाणिज्यीक लिफाफा दि.२८/०६/२०२११ रोजीच्या मा.खरेदी समितीच्या सभेपुढे उघडणेत आला आहे.

अ)	निविदा कालावधी	दि.१३/०५/२०२११ ते दि.२२/०५/२०२११
ब)	तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक व वेळ	दि.०७/०६/२०२० सकाळी ११.०० वाजता.
क)	निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या	०२ (दोन), त्यापैकी पात्र निवीदाधारक ०२
ड)	सर्व निविदाधारकांनी संकेतस्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय?	होय, जमा केले आहेत.
इ)	सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (ईएमडी) जमा केली आहेत काय?	होय. रु.१९,५००/- मात्र
ई)	निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम	रु.१९,४५,०००/-

तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यीक देकाराचा तपशिल:

अ.नं.	ठेकेदारचे नांव	निविदा रक्कम	शेरा
१.	**जगताप इन्फ्राव्हेंचर्स इंडीया प्रा. ली., कोल्हार**	**रु. १८,४४,७००/-**	**निम्नतम**
२.	मे. एस. के. येवले अॅण्ड कंपनी, संगमनेर	रु. २०,३६,४७७/-	

७)	निम्नतम निविदा धारकाचा तपशिल -	
अ)	ठेकेदाराचे नांव	जगताप इन्फ्राव्हेंचर्स इंडीया प्रा. ली., कोल्हार
ब)	निविदा रक्कम	रु. १८,४४,७००/-
क)	निविदा टक्केवारी कमी / अधिक	५.१५६८% कमी
८)	श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार	मा. तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

पान क्र.०२ वर...

सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासनाचे दि.२९/०१/२०१९ रोजीचे शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

"दि.२७/०९/२०१८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४.३ व परिच्छेद ४.४ मधील तरतूदींबाबत विसंगती दूर करण्यात येत असून परिच्छेद ४.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास, नियमानुसार लिफाफा क्र.२ (आर्थिक देकार) उघडून पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी. प्रथम बोलीवेळी प्राप्त निविंदामध्ये तीन पात्र निवीदा असण्याची आवश्यकता नाही."

उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदीस अनुसरून विषयांकित कामासाठी प्रथम मागणीअंती प्राप्त झालेल्या दोन ई-निविदांचे आर्थिक देकार मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले आहेत. तसेच याकामाठी प्राप्त झालेले निम्नतम दर हे अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ५.१५६८% कमी आहेत.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, निर्णय क्र.सीएटी २०१७/प्रक्र८/इमा-२ दि.२७/०९/२०१८ मधील शर्त क्र ४.६.२ नुसार १० टक्क्यांपेक्षा कमी दराच्या निविदेला निविदाधीन रक्कमेच्या १% एवढया किंमतीची बॅकेची प्रतीपुर्ती हमी / तेवढ्याच रकमेचा डिमांड ड्राफ्ट परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून जमा करणेबाबत तरतूद नमूद आहे. त्यानूसार अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा निविदाधीन रक्कम ५.१५६८% कमी असल्याने १०% पर्यंत १% नूसार होणारी रक्कम रु.१८,४७७/- मात्र या रक्कमेपोटी बॅकेची प्रतिपुर्ती हमी / डिमांड ड्राफ्ट जमा करून घेता येईल.

तरी वर नमूद तपशिलानूसार श्री साई प्रसादालय परिसरातील अंतर्गत रस्त्याचे मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टेनन्स ब्लॉक या लांबीचे डांबरीकरण करणे व मेन्टेनन्स ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लांट या लांबीतील रस्त्याचे खडीकरण करणे कामाकरीता पात्र निविंदापैकी निम्नतम दराचे ठेकेदार **जगताप इन्फ्राव्हेंचर्स इंडीया प्रा. ली., कोल्हार** यांचे दर रू. **१८,४४,७००/-** मात्रची निम्नतम निविदा स्विकारणेकामी त्यांचेशी मा.तदर्थ समितीचे सभेमध्ये चर्चा-वाटाघाटी होऊन निर्णय होणेस विनंती.

6/7/21

(**कान्हूराज बगाटे**, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

5.7 3/07

विषय क्र.- 3.3

मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर

बांधकाम विभाग

विषय : श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीचे बांधकाम ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी काम पूर्ण करणेसाठी नोव्हेंबर-२०२१ अखेर केलेल्या मूदतवाढीचे विनंतीबाबत...

टिपणी -

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद - अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

शासन निर्णय -

१) शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१३१३/प्र.क्र.१३३/का.१६, दि.१६/०२/२०१८ रोजीचे निर्णयान्वये, शिर्डी सर्व्हे नं.२/४, ३/१ व ३/७ मधिल संस्थान मालकीच्या क्षेत्रावर नविन दर्शनरांग प्रकल्प उभारणीसाठी येणा-या रू.११२,४०,९०,०५९/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

२) शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१३१३/प्र.क्र.१३३/का.१६, दि.१६/०८/२०१९ रोजीचे पत्रान्वये, शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी संस्थानने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली असून सदर पत्रात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

"२. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मे. भानू कन्स्ट्रक्शन मुंबई या भागीदारी पेढीस श्रीम भानु कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई कंपनीने विधिवत Take Over केले आहे करिता श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारत बांधकाम प्रकल्पासंबंधी येथून पुढील सर्व व्यवहार तसेच कर कपात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे श्रीम भानु कन्स्ट्रक्शन प्रा.लि. मुंबई यांच्या नावाने करण्यास मान्यता देण्यात येत आहे."

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय -

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०६ अन्वये, श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारत बांधकामाकरीता निम्नतम निविदाधारक ठेकेदार भानु कन्स्ट्रक्शन, मुंबई यांना जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे.

२) ठेकेदार यांना मुदतवाढ देणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४३० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे,

".. .. यावर सविस्तर चर्चा होवून, ठेकेदार यांना ESS, UGT व STP चे बांधकामासाठी अद्याप संस्थानकडून जागा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामूळे प्रकल्पाचे सर्व काम पूर्ण करणेसाठी या जागा उपलब्ध करणेत आल्यानंतर तेथून पुढे चार महिन्यांची मूदतवाढ निविदेतील पृष्ठ क्रं.०५ वरील अ.नं.०७ ची Incentive अदा करणेबाबतची शर्त रद्द करण्याचे अटीवर देण्यास मान्यता देण्यात आली".

प्रस्तावना - श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे बांधकाम श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचेमार्फत सुरु आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम सध्या निविदेप्रमाणे G+2 असून त्यामध्ये खालीलप्रमाणे सोई सुविधा करणेत येत आहे.

- **तळमजला** - नियोजित दर्शरांग इमारतीमध्ये ०३ भव्य प्रवेश हॉल आहेत, त्यामध्ये भक्तांना मोबाईल व चप्पल लॉकर्स, बायोमेट्रीक पास काऊंटर -४८, पेड पास काउंटर -२०, लाडू काउंटर - १०, उदी व कापडकोठी काऊंटर -१०, बुक स्टॉल, डोनेशन ऑफिस,चहा / कॉफी काउंटर, सिक्युरिटी चेक एकाच ठिकाणी व एकाच वेळी - ४० व्यक्तींची, जीने --११, लेडीज व जेन्टस टॉयलेट व्यवस्था इ.
- **पहिला व दुसरा मजला** - भक्तांकरीता बसण्याची व्यवस्था असेलेले एकूण १२ मोठे हॉल (एक हॉल साईज - १५.१० मी. X ३१.१५ मी.), चहा / कॉफी काउंटर, विदयुतीकरण व्यवस्था जनरेटर बॅकअपसह, वायुविजन व्यवस्था, उदवाहक / लिफ्ट व्यवस्था - १०, जीने - ११, लेडीज व जेन्टस टॉयलेट व्यवस्था, आर.ओ. प्रक्रियेव्दारे शुध्द पिण्याचे पाण्याची व्यवस्था, फायर फायटींग व्यवस्था इ.

या व्यतिरिक्त या प्रकल्पात सांडपाणी प्रक्रिया संयंत्र, रॅम्प, प्रथमोपचार केंद्र, संपूर्ण इंटेरीअर वर्क, सायनेजेस, अंतर्गत रस्ते, स्ट्रीट लाईट, इलेक्ट्रीकल सबस्टेशन, जनरेटर व्यवस्था, वायुविजन व्यवस्था, लॅण्डस्केपींग, रेनवॉटर हार्वेस्टिंग, पिंपळवाडी रस्त्यावरुन मंदिर परिसरातील जुन्या दर्शनरांगेला जोडण्यासाठी कनेक्टींग ब्रिज, संरक्षण भिंत इत्यादी सुविधांचा समावेश करणेत आला आहे.

पान क्र.०२ वर...

सदरहू प्रकल्पाचा ठळक तपशिल व बांधकामाच्या प्रगतीची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नाव	श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणे.
आर्किटेक्ट	माथूर ॲण्ड काप्रे असो. नवी दिल्ली.
ठेकेदार	श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई.
कार्यादेश	१) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८. २) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१९९९/२०१९, दि.२२/०८/२०१९.
मंजूर निविदा रक्कम	रु.१०९.५० कोटी!
भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांचेशी केलेल्या करारनाम्याचा दिनांक	दि.२२/१०/२०१८.
श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचेशी केलेल्या करारनाम्याचा दिनांक	दि.२२/०८/२०१९.
कामाचा कालावधी	१२ महिने (दि.१९/१०/२०१८ ते दि.१८/१०/२०१९).
मूदतवाढ	मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ चे सभेतील नि.क्र.४३० खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे. *"..यावर सविस्तर चर्चा होऊन, ठेकेदार यांना ESS, UGT व STP चे बांधकामासाठी अद्याप संस्थानकडून जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रकल्पाचे सर्व काम पूर्ण करण्यासाठी या जागा उपलब्ध करणेत आल्यानंतर तेथुन पुढे चार महिन्यांची मूदतवाढ निविदेतील पृष्ठ क्रं.०५ वरील अ.नं.०७ ची Incentive अदा करणेबाबतची शर्त रद्द करण्याचे अटीवर देण्यास मान्यता देण्यात आली".*
एकूण बांधकाम क्षेत्रफळ	निविदेत नमूद एकूण बांधकाम क्षेत्रफळ – २२२१४.०० चौ. मी. (FSI Area.)
कामाची सद्यस्थिती	• **मुख्य इमारत -** **तळमजला** - आर.सी.सी काम पूर्ण, बांधकाम पूर्ण, प्लास्टर पूर्ण, ग्रेनाईट फ्लोरींग व डॅडोचे काम प्रगतीत, विंडो सिल व जॅम्बला ग्रीन मार्बल तसेच जॅम्बला रेड आग्रा स्टोन बसविणे प्रगतीत, प्लंबींगचे काम प्रगतीत, एच.व्ही.ए.सी चे काम प्रगतीत, फायर फायटींगचे काम प्रगतीत, इलेक्ट्रीकल कन्डयूटींग व वायरींगचे काम प्रगतीत, टॉयलेट वॉटरप्रुफिंगचे काम प्रगतीत. **पहिला मजला** - आर.सी.सी काम पूर्ण, बांधकाम पूर्ण, प्लास्टर पूर्ण, ग्रेनाईट फ्लोरींग व डॅडोचे काम प्रगतीत, विंडो सिल व जॅम्बला ग्रीन मार्बल तसेच रेड आग्रा स्टोन बसविणे प्रगतीत, एच.व्ही.ए.सी चे काम प्रगतीत, प्लंबींगचे काम प्रगतीत, फायर फायटींगचे काम प्रगतीत, इलेक्ट्रीकल कन्डयूटींग व वायरींगचे काम प्रगतीत, टॉयलेट वॉटरप्रुफिंगचे काम प्रगतीत, अंतर्गत रंगकाम प्रगतीत आहे. **दुसरा मजला** - आर.सी.सी काम पूर्ण, बांधकाम अंतिम टप्प्यात, प्लास्टर अंतिम टप्प्यात, ग्रेनाईट फ्लोरींग व डॅडोचे काम प्रगतीत, विंडो सिल व जॅम्बला ग्रीन मार्बल तसेच रेड आग्रा स्टोन बसविणे प्रगतीत, एच.व्ही.ए.सी चे काम प्रगतीत, फायर फायटींगचे काम प्रगतीत, इलेक्ट्रीकल कन्डयूटींग व वायरींगचे काम प्रगतीत. **टेरेस** - प्रस्तावित तिसरा मजल्याचे निर्णयामुळे उत्तर व दक्षिण बाजूचे रॅम्पचे स्लॅब कास्टींग, पॅरापेट बांधकाम, टेरेस वॉटरप्रुफिंग, ओव्हर हेड टॅंक, ममटी रूम, लिफ्ट रूम, पाईपींग, एच.व्ही.ए.सी आउटडोअर युनिट इ. कामे प्रलंबित आहे. • **कनेक्टींग कॉरीडॉर** - कनेक्टींग कॉरीडॉरपैकी मंदिर परिसरातील पी.आर.ओ चे समोरील पूर्वी कारंजा असलेल्या भागातील आर.सी.सी. काम, बांधकाम, प्लास्टर, स्टोन क्लॅडींगचे काम पूर्ण झाले आहे. एच.व्ही.ए.सी, फायर फायटींग, ग्रेनाईट फ्लोरींग, मार्बल डॅडो व टेरेस वॉटरप्रुफिंगचे काम प्रगतीत आहे. • नियोजीत दर्शनरांग प्रकल्पातील Connecting Corridor above Pimpalwadi Road (From Proposed Main Building to Mandir Complex) चे काम प्रगतीत आहे. • **इतर कामे** – परीसर विकास कामे, स्टॉर्म वॉटर लाईन, सिव्हरेज लाईन, फायर हायड्रंट लाईन, इलेक्ट्रीकल केबलकरीता पाईपलाईन व इले. केबल ट्रेंचचे बांधकाम, चेंबर बांधकाम, पिण्याचे पाण्याची पाईपलाईन, रस्त्याचे कॉन्क्रीटींग इ. कामे प्रगतीत आहेत. • स्टोन क्लॅडींगचे काम प्रगतीत आहे. • ESS व UGT चे काम प्रगतीत आहे. • STP चे कामास सुरूवात करणेत येत आहे.

पान क्र.०३ वर...

श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे बांधकामास करारनाम्यानुसार काम पुर्ण करण्यासाठी १२ महिने दि.१९/१०/२०१८ ते दि.१८/१०/२०१९ असा कालावधी देणेत आलेला होता. तदनंतर ठेकेदार यांना कामात आलेल्या अडचणींचा विचार करता मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४३० अन्वये मुदतवाढ देणेत आली आहे. सदरहू निर्णय क्र.४३० खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

*".. .. यावर सविस्तर चर्चा होवून, ठेकेदार यांना **ESS, UGT** व **STP** चे बांधकामासाठी अद्याप संस्थानकडून जागा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामूळे प्रकल्पाचे सर्व काम पुर्ण करण्यासाठी या जागा उपलब्ध करणेत आल्यानंतर तेथुन पुढे चार महिन्यांची मुदतवाढ निविदेतील पृष्ठ क्र.०५ वरील अ.नं.०७ ची **Incentive** अदा करणेबाबतची शर्त रद्द करण्याचे अटीवर देण्यास मान्यता देण्यात आली आहे."*

सदर प्रकल्पाचे उर्वरीत काम पूर्ण करणेसाठी ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी दि.०५/०२/२०२१ व दि.१४/०६/२०२१ रोजीचे पत्राव्दारे नोव्हेंबर-२०२१ अखेर मूदतवाढ मिळणेसाठी विनंती केली आहे. त्यासाठी सदरहू पत्रात ठेकेदार यांनी नमूद केलेले मुद्दे व त्याबाबतची वस्तूस्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	मुद्दा	वस्तूस्थिती / विलंबाचे कारण
०१.	**Part Connecting Corridor Handover –** The Connecting Corridor site was not fully handed over to us until 05th Feb 2021due to availability of Existing Transformer in that area which was to be shifted for Civil Works. Part-1 Connecting Corridor area from Grid 64-14A was pending due to existing Transformer. After the shifting of Transformer and carrying out excavation, old existing sump well was found. We then submitted a Letter no. SBHANU/SP/21/125 for Extra Item of Approval for Sump well Raft foundation on 06th Feb 2021. After communicating with SSST Representative and architect, we were verbally instructed to go ahead with the tender drawing. Again due to the Lockdown imposed all over the Maharashtra, we faced problem of shortage of Manpower & material which further added the delay in completing the Part Connecting Corridor.	**कनेक्टींग कॉरीडॉर (Connecting Corridor – From Main Building to Temple Premises) -** • पिंपळवाडी रस्त्यावरील कनेक्टींग कॉरीडॉरचे कामास ठेकेदार यांचेमार्फत ऑगस्ट-२०२० मध्ये लॉकडाउनचे काळात मंदिर बंद असलेने सुरूवात करणेत आली आहे. • पिंपळवाडी रस्त्याचे भागातील तसेच जनसंपर्क कार्यालयाचे व्ही.आय.पी कक्षाचे खोली क्र. ०३ व ०४ मागील बाजूस असलेले आर.सी.सी. फुटींग, कॉलमचे व स्लॅबचे कामास अंशत: उपलब्ध जागेत कामास सुरूवात करण्यात आली. सदर ठिकाणी कॉरीडॉरचे आर.सी.सी. फुटींगचे खोदाईचेवेळी लेंडी नाल्याची ९०० एमएम व्यासाची पाण्याचा प्रवाह सुरू असलेली पाईपलाईन काढावी लागली. पावसाळयाचे दिवस असल्याने त्यामधून पाण्याचा प्रवाह सुरू होता. त्यामूळे तेथील फुटींग, कॉलम व इतर कामे करणेस व सदर ड्रेनेज दुरूस्ती करणेस जवळपास ०४ महिने कालवाधी लागलेला आहे. • पिंपळवाडी रस्ता ते प्रस्तावित दर्शनरांग मुख्य इमारतीस जोडणा-या कनेक्टींग कॉरीडॉरचे खोदाईचे कामात (सध्याचे पॅनल रूम शेजारी) जूनी सम्पवेल निघाली होती. त्यामध्ये फार प्रमाणात गाळ साठलेला होता. सदर सम्पवेलबाबत आर्किटेक्ट व स्ट्रक्चरल कन्सल्टंट यांचा अभिप्राय घेवून कामास सुरूवात करणेत आली. त्यामूळे त्याठिकाणी कॉरीडॉरचे बांधकामाचे येणा-या ०६ आर.सी.सी. फुटींग करणेस विलंब झालेला आहे. • तसेच त्याच ठिकाणी असलेले संस्थानचे कार्यान्वित असलेले विद्यूत रोहित्र मंदिर परीसरास कनेक्ट असलेने ते स्थलांतरीत करणेस काही अवधी लागलेला आहे. त्यामूळे ठेकेदार यांना सदर कॉरीडॉरचे उर्वरीत कामास विहीत वेळेत सुरूवात करता आलेली नाही. आता सदरचे विद्यूत रोहित्र संस्थानचे विद्यूत विभागामार्फत दि.१८/०१/२०२१ रोजी स्थलांतरीत केलेले असलेने कनेक्टींग कॉरीडॉर मुख्य इमारतीस जोडण्याचे पुढील उर्वरीत कामास सुरूवात करणेत आलेली असून, सदर काम प्रगतीत आहे.
०२.	**ESS Handover -** As per the letter received from your side no.SSST/CONST/18/2020, dtd.04/04/2020, starting the ESS work at lockdown time was practically impossible. We started the activity of Layout immediately on 02nd May 2020 after receiving permission from your side. But unfortunately due to the changes in layout & drawings of footing, plinth beams & lintel beams the work came to stoppage & was delayed further.	**इलेक्ट्रीकल सबस्टेशन (ESS) -** • मंजूर रेखांकनातील अॅमेनिटी स्पेसचे जागेमध्ये दर्शनरांग प्रकल्पाचे इलेक्ट्रीकल सबस्टेशन (ESS) इमारतीचे बांधकाम प्रस्तावित आहे. • तथापी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०२/२०१९ व दि.०६/०६/२०१९ चे सभेतील निर्णय क्र.१६३ व ३७२ अन्वये सदर ESS ची जागा प्रस्थापीत १०१ दुकानदारांचे शॉपींग कॉम्पलेक्स बांधकामासाठी देण्याचे ठरले होते. त्यामूळे सदर ठिकाणी असलेले ESS बांधकाम हाती घेणे शक्य झाले नाही. तदनंतर वर नमूद निर्णय मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ चे सभेत रद्द करणेत आला.

पान क्र.०४ वर...

अ.क्र.	मुद्दा	वस्तूस्थिती / विलंबाचे कारण
	We have already given letter No.BHANU/SP/2020/74,dtd.13/05/2020 regarding this problem and also next letter No. BHANU/SP/2020/77, dtd.20/05/2020 mentioning, the same. Moreover, ESS was partly handed over to us between grids C-E/1-7on which we have almost completed our structural activities. The existing Transformer Room & DG Room are now needed to be demolished for carrying out further civil activities & only after the removal of these Room, we will be able to start further activities which again is causing the delay for further works.	• तदनंतर सदर इलेक्ट्रीकल सबस्टेशनचे (ESS) जागेबाबतचा निर्णय मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४/०३/२०२० चे सभेतील नि.क्र.१६६ अन्वये संमत झालेनंतर सदरहू जागा इलेक्ट्रीकल सबस्टेशनचे (ESS) बांधकामासाठी ठेकेदार यांना इकडील कार्यालयाचे दि.०४/०४/२०२० चे पत्रान्वये उपलब्ध करून देण्यात आलेली होती. • तथापी त्यावेळी कोरोना प्रादूर्भावामूळे संपूर्ण देशात लॉकडाऊन लागू झालेला असलेने सदर कामास त्यावेळी सुरूवात करता आली नाही. • तसेच याकामाचे ESS ची इमारत बांधकामास त्याठिकाणी असलेले शेख व शेलार यांचे घरांमूळे अडचण येत होती. त्यामूळे सदर ठिकाणी असलेले ESS चे Orientation बदलून त्यास शिर्डी नगरपंचायत यांची सुधारीत मंजूरी घेण्यात आली व तदनंतर दि.१०/०७/२०२० पासून कामास सुरूवात करणेत आली. या सर्व कार्यवाहीस अवधी लागलेला होता व त्यामूळे सदर कामास विलंब झालेला आहे. • सदर ठिकाणी इलेक्ट्रीकल सबस्टेशनचे काम सध्या प्रगतीत आहे. तथापी अद्याप प्रस्तावित ESS इमारतीचे काही भागात संस्थानचे विद्यूत विभागाचे सध्याचे पॅनल रूम व विद्यूत जनित्र कक्ष असलेने तेथिल नविन इलेक्ट्रीकल सबस्टेशनचे (ESS) उर्वरीत बांधकाम पूर्ण करणेस अडचण येत आहे. • सदर प्रस्तावित ESS इमारतीत निविदेतील स्कोपमधिल ७५० के.व्ही.ए चे ०३ जेनसेट ऐवजी २००० के.व्ही.ए चे ०२ जेनसेट बसविणे प्रस्तावित आहे. त्यासाठी मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत येत आहे. या कार्यवाहीस काही अवधी लागणे अपेक्षित आहे. • सदर प्रस्तावित ESS इमारतीचा काही भाग पूर्ण झालेवर सध्या चालू असलेले पॅनल रूम व विद्यूत जनित्र कक्ष त्याठिकाणी स्थलांतरीत करून नंतर सध्याचे पॅनल रूम व जनित्र कक्षाचे जुने बांधकाम पाडून त्याठिकाणी नविन इलेक्ट्रीकल सबस्टेशनचे (ESS) उर्वरीत काम पूर्ण करता येईल.
०३.	**Proposed 3rd Floor –** As we have already submitted letter dtd.29/08/2019 regarding dowels for future extension of third floor and also we are waiting from dt.31/05/2019 to start the execution above terrace level. We received your verbal instructions at that time &we agreed for maintaining professional relationship & by keeping good faith in SSST. Several times we have asked you to give the decision for third floor because our shuttering work was completed and was ideal at site but you instructed to hold the particular portion and we did stopped the work & followed your instructions.	**प्रस्तावित तिसरा मजला (Proposed 3rd Floor) –** *प्रस्तावित तिसरा मजला बांधकामाचे निर्णयामूळे सध्या बांधकाम चालू असलेल्या इमारतीचे (G+2) टेरेस लेव्हलवरील ममटी रुम बांधकाम, लिफ्ट मशीन रुम बांधकाम, पॅरापेट वॉल बांधकाम, स्टोन क्लॅडींग, टेरेस वॉटरप्रुफींग, ओव्हर हेड वॉटर टॅंक, फायर फायटींग पाईपलाईन, वॉटरसप्लाय पाईपलाईन, उत्तर व दक्षिण बाजूकडील रॅम्प एरियावरील स्लॅब, लिफ्ट बसविणे तसेच लिफ्टची इलेक्ट्रोमेकॅनिकल उपकरणे बसविणे, एचव्हीएसी व त्याचे आउटडोअर युनिट टेरेसवर बसविणे, विद्युतीकरणाची काही कामे इ. कामे प्रस्तावित तिसरा मजला बांधकामामुळे सध्या ठेकेदार यांनी बंद ठेवलेले आहे.* • प्रस्तावित तिस-या मजल्याचे वाढीव बांधकामास शासनाची प्रशासकिय मान्यता घेणे, सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता घेणे, बांधकामाचे सामासिक अंतरात शिथिलता घेणे, बांधकाम परवानगी घेणे इ. कार्यवाहीस ३ ते ४ महिन्याचा कालावधी लागणेची शक्यता आहे. तसेच ठेकेदारही आता विलंब झालेल्या कामांसाठी चालू राज्य दरसुचीनुसार भाववाढ मागणी करत आहे. त्यामुळे यावर निर्णय होणे गरजेचे होते. • त्यानुसार याबाबत श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकामासाठी एकूण रू.१५७.४०५ कोटी मात्रचे सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देणे तसेच सदर वाढीव बांधकामासाठी ई-निविदा मागविण्यात याव्यात अथवा सदर वाढीव बांधकाम ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचेकडून सध्या प्रगतीत असलेल्या (G+2) इमारत बांधकामासाठीचे निविदादराने तसेच करारातील अटी व शर्तींनुसार काम करून घेणे यावर निर्णय होणेबाबतचा सुधारीत प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे दि.२२/०३/२०२१ रोजी चक्रिय पध्दतीने सादर करणेत आला.

पान क्र.०५ वर...

अ.क्र.	मुद्दा	वस्तूस्थिती / विलंबाचे कारण
	Also we have stopped all the internal activity at 2nd floor level due to the back propping of 3rd floor slab because it is a PT slab. This pending decision for the 3rd floor from your side has hampered our further terrace level activities like Mumty, North side & South side Ramp/Corridor Slab & Chajja, Terrace Waterproofing, HVAC, Plumbing, & Electrical works which is badly affecting our cash flow and causing us a great deal of Monetary losses. Due to expansion joints in main building we are unable to procced for finishing activities like Gypsum plaster & Painting. Also all the MEP activities related to terrace are interrelated with handing over of our entire project.	त्यावर मा. अध्यक्ष व मा. सदस्य यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे. "..... २) *सदरचा प्रस्ताव पुन्हा काही बाबी नमूद करुन आणलेला आहे. मुळातच या विषयावर सखोल चर्चा होणे गरजेचे आहे व त्यासाठी हा विषय चक्रीय पध्दतीने घेणे केवळ अशक्य आहे.* *३) संबंधीत विभागाचे श्री. संजय जोरी, उप अभियंता यांनी असे सांगितले की, सदरचे बांधकाम सदर विषयाच्या निर्णयावर अवलंबून आहे. मुळातच असे म्हणणे अयोग्य आहे, कारण जी बाब विचाराधीन आहे त्यासाठी पूर्वी झालेल्या बांधकामाचा निर्णय व बांधकामाची प्रगती थांबविणे संस्थानचे हिताचे नाही. अशा परिस्थितीत संस्थान प्रशासनाने पूर्वीप्रमाणे बांधकाम सुरु ठेवावे व पूर्ण करावे. या विषयाचा बांधकाम पूर्णत्वाशी कुठलाही संबंध नाही. भविष्यात या विषयावर कुठलाही निर्णय झालातरी त्यावेळी झालेल्या बांधकामाबाबत निर्णय घेता येईल.* *४) मांडलेला विषय मंजूर होणार आहे किंवा मंजूरच करावा अशा पध्दतीने विचार करुन बांधकाम थांबवणे सर्वथा अयोग्य आहे. हे भक्तांच्या व संस्थानच्या हिताचे नाही*". असा निर्णय दिलेला आहे.
उपरोक्त प्रमाणे समाधि मंदिरातील स्टेनलेस स्टील रेलिंग काढून त्याठिकाणी सागवान लाकडाची डिझाईन मधिल रेलिंग करणेकामी येणारे रक्कम रु.१,६९,३१,०००/- मात्रचे खर्चास मा.तदर्थ समितीची मान्यता मिळणेसाठी चर्किय पध्दतीने दि.२२/०२/२०२१ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (ad-hoc) समितीव्दारे ०१ विरुध्द ०३ असा नामंजूर करणेत आलेला आहे.

दि.१९/०६/२०२१ रोजी झालेल्या मा. तदर्थ(Ad-hoc) समितीचे सभेत सदरहु विषयाबाबत *" निर्णय क्र.१ अन्वये चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या १ ते १७१ विषयांचे प्रस्ताव व त्यावर घेण्यात आलेले निर्णय सोबत परीशिष्ट 'अ' म्हणून जोडले आहेत. आजचे सभेत त्याचे अवलोकन करण्यात येऊन नोंद घेण्यात आली"* असा निर्णय झाला आहे.

तथापी सागवान लाकडाचे डिझाईन मधील रेलिंगमुळे समाधी मंदिरातील दर्शनरांगा आकर्षक दिसणार असून समाधी मंदिराचे पुरातन सौदंर्यात वाढ होईल व साईभक्तांनाही आल्हाददायक वाटेल.

सदरहु विषयाची उपयुक्तता विचारात घेऊन हा विषय पुन्हा मा. तदर्थ समितीचे सभेत उपरोक्त प्रस्ताव फेर प्रस्ताव सादर करता येईल.

प्रस्ताव:-

तरी समाधी मंदिरातील अंडरपास पॅसेज जवळील जिन्यापासून व्दारकामाईकडे जाणारी दर्शनरांग तसेच व्दारकामाई मंदिरापासून ते श्रींचे समाधी पर्यंतचे ५०० फुट लांबीचे स्टेनलेस स्टील रेलींग काढून त्याठिकाणी सागवान लाकडाचे डेकोरेटिव्ह डिझाईनमध्ये रेलींग उभारणेचे काम करणेसाठी उपरोक्त प्रमाणे येणारे रक्कम रु.१,६९,३१,०००/- मात्रचे खर्चास तसेच सदरचे काम देणगीदार साईभक्त यांचेकडून देणगीदाखल करुन घेणेस अथवा देणगीदार साईभक्त उपलब्ध न झाल्यास सदरचे काम संस्थान निधीतून करुन घेणेकामी तसेच त्यासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

20/07/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

19.7 19/07

विषय क्र.- 31

मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषय
बांधकाम विभाग

विषय:- संस्थानचे वस्तुसंग्रहालयात ठेवलेली भगवान श्रीकृष्णाची मुर्ती श्री साईबाबा समाधी मंदिराचे सभामंडपातील स्टेजवर स्थापीत करणेस तत्वत: मान्यता मिळणेबाबत..

टिपणी-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :-

१. अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम कलम २१ (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

२. अधिनियमाचे कलम १४ पोटकलम (२) च्या खंड (ख) अन्वये, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना बांधकामासाठी किंवा मालाच्या पुरवठयासाठी निविदा मागविण्याचे आणि जेव्हा अशा निविदेची रक्कम अथवा मुल्य पाच लाख रुपयांहून अधिक नसेल तेव्हा त्या निविदा स्विकारण्याचे अधिकारी असतील, अशी तरतूद आहे.

प्रस्तावना:-

शिर्डी ग्रामंस्थानी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रेशित केलेल्या दि.०७/०६/२०२१ रोजीचे पत्रात, साईबाबांच्या काळातील श्रीराम, सिता, लक्ष्मण, हनुमान व श्रीकृष्ण मुर्त्यांचे मंदिराबाबत पुढील प्रमाणे नमूद केले आहे. *"बुट्टीवाड्यात साईचा पवित्र देह समाधीस्त करण्यात आलेला आहे. बाबांच्या हयातीत त्यांचे नागपुरचे श्रीमंत भक्त गोपाळराव बुटी यांनी वास्तव्यासाठी हा वाडा बांधला होता. साईबाबांच्या पुढाकारातून शिर्डीत श्रीरामनवमी व गोकुळाष्टमी उत्सव सुरु झाल्याने बुटी यांनी या वाड्यात बाबांच्या अनुमतीने श्रीराम, सिता, लक्ष्मण, हनुमान व श्रीकृष्णाच्या मुर्त्या स्थापित करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी मुर्त्याही आणून ठेवण्यात आल्या होत्या. पण मध्येच कारागिर गावी गेल्याने काम बंद पडले व दरम्यान बाबा आजारी पडून त्यांचेही निवार्ण झाले. मला वाड्यात घेऊन चला या बाबांच्या अंतीम इच्छेचा आदर ठेवून तत्कालीन भक्तांनी सर्वानुमते बाबांचा देह वाड्यात समाधीस्त केला. जेथे या मुर्त्या बसविण्यात येणार होत्या तेथे साईची समाधी झाली. त्यामुळे मुर्त्या तशाच स्थापना विरहीत राहिल्या. मात्र ज्या मुर्त्यांनी बाबांना आपले स्थान दिले त्याचे नैसर्गिक न्यायानुसार योग्य पुनर्वसन होणे गरजेचे होते. कदाचित बाबांवरही हे ऋण असु शकेल. त्यामुळे या मुर्त्यांचे दहा बाय दहा आकारात जुन्या धाटणीचे छोटेखानी व आकर्षक मंदिर उभारावे अशी शिर्डीकर व बुटी परिवाराची इच्छा आहे. बुटी परिवाराने त्यासाठी संस्थानशी पत्रव्यवहार करुन मंदिर उभारणीसाठी निधीही देण्याची तयारी दर्शविलेली आहे. शिर्डीकरही त्यासाठी हातभार लावणार आहेत. संस्थानला आर्थिक तोशीस लागु दिली जाणार नाही. हे मंदिर लेंडीबागेत किंवा महाव्दार क्र. ०१ एक समोरील मोफत सर्व्हे नंबर मध्ये उभारण्यात येणा-या बगीचात नगरपंचायतीची अनुमती घेऊन उभारत येईल. त्यामुळे भाविकांना दर्शनासाठी आणखी एक ठिकाण उपलब्ध होईल, हे मंदिर समाधी मंदिरापासून काही अंतरावर असल्याने गर्दीचेही विकेंद्रीकरण होईल. तरी बाबांच्या काळापासून रखडलेल्या या मुर्त्यांसाठी मंदिर उभारणी करुन त्यांची विधिवत स्थापना करुन बुटी परिवार, शिर्डीकर व तमाम साईभक्तांच्या भावनेचा सन्मान करावा अशी अपेक्षा आहे."*

संस्थान मंदिर पुजारी श्री बाळासाहेब जोशी यांनी याबाबत दिलेल्या माहितीत पुढीलप्रमाणे नमूद केले आहे, *"श्री साईबाबांचे समाधी मंदिर (बुट्टीवाडा) निर्माण करतेवेळी श्री. गोपाळराव बुट्टी यांना मुरलीधर मंदिर बांधण्याची स्फुर्ती झाली व कालांतराने मुर्तीसाठी चौथरा तयार झाला परंतु बाबांचे देहावसन झाले. नंतर त्याच ठिकाणी बाबांचा देह ठेवण्यात आला व बाबांचे समाधी मंदिर तयार झाले. याबाबत श्री साई चरित्रात खालीलप्रमाणे उल्लेख आढळतो.*

ऐसे काम होता होता । स्फुरण झाले बुट्टींच्या चित्ता ।
यांतची एक गाभारा धरिता । मुरलीधर स्थापिता येईल ॥
कल्पनेचा झाला उदय । परी न पुसतां बाबांचा मनोदय ।
बुट्टी न आरंभित काहीही कार्य । विना गुरुवर्य आज्ञापन ॥
बाबा फेरीवर असता । वाडियाच्या सन्निध येता ।
व्दारानिकट स्वारी पावंता । काय पुसतात शामराव ॥
देवा बापुसाहेब वदती । दालनाच्या दोन्ही भिंती ।
पाडूनी तेथे स्थापु प्रीती । कृष्णमुर्ती मुरलीधरा ॥
ऐसे बापुसाहेब योजिती । परि पाहिजे आपूली अनूमती ।
देऊळ, वाडा दोन्ही येरीती । हातोहाती होतील ॥
असो पुढे झाला गाभारा । मुरलीधर देवाचा चौथरा ।
मुर्तिही एका कारागिरा । सोपविली की करावया ॥

या सच्चरितातील दाखल्यावरुन मुरलीधर स्थापनेचा मानस राहून गेला आणि बाबांच्या अखेरच्या शब्दानुसार "वाडियात पडो हे शरीर" अंती बाबांचे जे उदगार । तोचि शेवटी ठरला विचार । जाहले मुरलीधर बाबाचि ॥ (४४/३६) बाबांचा देह नियोजित मुरलिधराचे चौथ-यावर ठेवण्यात आला. मुरलीधराची मुर्ती कारागिराकडून करुन घेतली असे स्पष्ट होते."

पान ०२ वर

याबाबत मंदिर विभागाने दि.२२/०६/२०२१ रोजीचे मंजूर टिपणीन्वये शिर्डी ग्रामस्थांनी केलेल्या विनंती अर्जानुसार मारुती मंदिरात पुर्वीप्रमाणे आणखी एक मुर्ती दर्शनार्थ ठेवणे तसेच गुरुस्थान मंदिराचे पुर्नजिवन करणे व वस्तु संग्रहालयातील श्रीराम, सीता, लक्ष्मण व हनुमान मुर्ती गणपती मंदिरालग दक्षिणेस व श्रीकृष्णाच्या मुर्तीसाठी समाधी मंदिर स्टेजवर मंदिर निर्माणाबाबत संस्थानचे मंदिर परिसरात समक्ष जागेची पाहणी करुन मंदिरांचा आराखडा तयार करणे इ. कामी पुढील कार्यवाही बांधकाम विभागामार्फत करणेस मान्यता घेतलेली आहे.

त्यानूसार भगवान श्रीकृष्णाची मुर्ती श्री साईबाबा समाधी मंदिराचे सभामंडपातील स्टेजवर स्थापीत करणेकामी स्टेजची उंची कमी करणे व त्यावर व्हाईट मार्बलचे मंदीर बसविणेकामी अंदाजे ३.२७ लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदरहू खर्च मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे मान्यतेने विहीत पध्दतीने कोटेशन मागवून अथवा देणगीदार साईभक्तांमार्फत करुन घेता येईल.

प्रस्ताव – तरी संस्थानचे वस्तुसंग्रहालयात ठेवलेली भगवान श्रीकृष्णाची मुर्ती श्री साईबाबा समाधी मंदिराचे सभामंडपातील स्टेजवर स्थापीत करणेस तत्वतः मान्यता मिळणेस विनंती.

20/07/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

19.7 19/07

विषय क्र.- 3C

मा. तदर्थ (Ad hoc) समितीचे सभेपुढील विषय 237
बांधकाम विभाग

विषय : श्यामसुंदर हॉल व उदी रुम छताची ऊंची वाढविणे, जुने व खराब झालेले पत्रे बदलून नवीन पत्रे व त्यावर कौले बसविणे ही कामे देणगीदाखल करणेस अथवा संस्थान निधीतून करणेकामी येणारे रक्कम रु.६,८५,०००/- मात्रचे खर्चास मा तदर्थ (Ad-hoc) समितीची मान्यता मिळणेबाबत..

टिपणी-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम कलम २१ (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचा निर्णय: दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.४९० खालील प्रमाणे संमत झालेल आहे. *" यावर सविस्तर चर्चा होऊन, श्यामसुंदर हॉल छताचे जुने व खराब झालेले पत्रे बदलुन नविन कलर कोटेड पत्रे बसविणेकामी कोटेशन मागविणेस व त्याकामी येणारे रक्कम रु.५९,०००/- मात्र इतके अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देण्यात आली."*

प्रस्तावना: उदी पाकीट भरण्याचे खोलीत कडक उन्हाळयात उष्णतेमुळे कर्मचा-यांना काम करणे जिकरीचे होते. त्याकरीता उष्णतारोधक शिटसह प्लायवूड फॉल्स सिलींग करणे आवश्यक आहे. श्यामसुंदर हॉलचे छताकरीता जुने जी.आय पन्हाळी पत्र बदलून नवीन कलर कोटेड मेटल शिट्स (कौलारु रंगाचे) बसविणेकामी दरपत्रक मागविणेस व त्याकामी येणरे रक्कम रु.५९,०००/- मात्र इतके अंदाजपत्रकीय खर्चास मा.तदर्थ समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.४९० अन्वये मान्यता देणेत आली आहे. तसेच श्यामसुंदर हॉल व उदी रुम छताचे नवीन पत्रे बसविणे व फॉल्ससिलींग करणेचे काम देणगीदार साईभक्त श्री.रमेशभाई सेहेटा, मुंबई यांनी देणगीदाखल करण्याची इच्छा व्यक्त केलेली असून याकामी अंदाजे रु.३.५० लक्ष मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम श्री.रमेशभाई सेहेटा, मुंबई यांचेकडून देणगीदाखल करुन घेणेकामी इकडील विभागाचे दि.१२/०४/२०२१ रोजीचे टिपणीन्वये मान्यता घेणेत आलेली आहे. त्यानुसार देणगीदार साईभक्त श्री रमेश सेहेटा यांनी सदर कामासाठी आवश्यक प्लायवूड, पत्रे व एसएस पाईप हे मटेरिअल खरेदी करुन साईटवर आणले आहे.

याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी प्र. कार्यकारी अभियंता श्री. संजय जोरी, प्र. उप कार्यकारी अभियंता श्री. डि. एम. देसाई, प्र. प्रशासकिय अधिकारी श्री राजेंद्र जगताप, मेकॅनिकल विभाग प्रमुख श्री अतुल वाघ, मंदिर विभाग प्रमुख श्री. रमेश चौधरी यांचे समवेत दि.१०/०६/२०२१ रोजी व्दारकामाई, उदी व गोवरी रुम येथे पाहणी केली. त्यावेळी उदी/गोवरी रुम व व्दारकामाई यांचे छत एका लेव्हलला केल्यास बाहेरील बाजूने आकर्षक दिसेल. तसेच उदी रुमची उंची वाढून आतिल भागाचे तापमान कमी होईल, अशी चर्चा झाली. तसेच त्यासाठी श्यामसुंदर हॉल व उदी रुमचे छताची उंची वाढवून ते व्दारकामाईचे छताचे लेव्हलला करणेत यावे व त्यावर नविन पत्रे व त्यावर कौले बसविण्यात यावेत असे निर्देश देणेत आले आहेत. याकामी स्टील स्ट्रक्चरचे डिझाईन श्री. आर. आर. कुलकर्णी, पुणे स्ट्रक्चरल कन्सल्टंट यांचेकडून तयार करुन घेणेत आले होते.

श्री व्दारकामाई मंदिर व श्यामसुंदर हॉलचे दि.०५/०७/२०२१ रोजीचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांचे समवेत समक्ष पाहणी करण्यात आली. त्यावेळी मंदिर परिसरातील दर्शन रांगेसाठी एस.एस. स्ट्रक्चर फ्रेमवर्कचे काम करणारे श्री सुधाकर शेळके हे उपस्थित होते. सदर पाहणी दरम्यान व्दारकामाई मंदिराचे छताकरीता वापरण्यात आलेल्या कैच्याप्रमाणे शामसुंदर हॉलचे कैच्या तयार करणेबाबत तसेच तीन कैच्या ऐवजी दोन कैच्या करण्याची चर्चा झाली. त्यानुसार स्ट्रक्चरल स्टील, जीआय पत्रे बसविणे, त्यावर कौले बसविणे व इतर सिव्हील कामे करणेसाठी अंदाजे रक्कम रु. ६,८५,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. प्रत्यक्ष काम करतांना स्ट्रक्चरल कन्सल्टंट श्री. आर. आर. कुलकर्णी यांचेकडून डिझाईन तपासणी करुन घेता येईल.

पान ०२ वर

विभागाचा अभिप्राय: यापुर्वी मा. तदर्थ समितीचे दि. ११/१२/२०२० रोजीचे सभेत शाससुंदर हॉलचे पत्रे बदलणेकामी मान्यता घेणेत आलेली आहे. शामसुंदर हॉल हि वास्तु जुनी असून सदरहू वास्तूचे स्ट्रक्चरमध्ये बदल करणेकामी मा. तदर्थ समितीची मान्यता घ्यावी लागेल. तसेच सदरचे काम देणगीदार साईभक्त श्री. रमेशभाई सेहेटा, मुंबई यांनी देणगीदाखल करणेस सहमती दर्शविल्यास त्यांचेकडून करुन घेता येईल अथवा संस्थान निधीतून करता येईल, असे मत आहे.

प्रस्ताव: तरी श्यामसुंदर हॉल व उदी रुमचे छताची उंची वाढविणे व जुने पत्रे बदलून नवीन पत्रे बसविणे व त्यावर कौल बसविणे ही कामे देणगीदार साईभक्त श्री.रमेशभाई सेहेटा, मुंबई यांनी देणगीदाखल करणेस सहमती दर्शविल्यास त्यांचेकडून करुन घेणेस

अथवा

संस्थान निधीतून करुन घेणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु.६,८५,०००/- मात्रचे खर्चास व याकामी कोटेशन्स मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

11/07/2021

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

19/7 19/07

विषय क्र.- ४०

मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषय
बांधकाम विभाग

विषय – श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळ्यानिमित्त कोपरगाव- कोल्हार रस्ता (प्र. रा. मा. ०८) यावर तात्पुरत्या स्वरुपात उभारलेली स्वागत कमान काढून घेणेबाबत....

टिपणी –

श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्त ०१ ऑक्टोबर २०१७ ते १९ ऑक्टोबर २०१९ या कालावधीत संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव साजरा करणेत आला. या निमीत्त शिर्डी शहराचे उत्तर बाजूस कोपरगाव कोल्हार रस्ता प्रामा ०८ यावर कि.मी.९१/५०० या साखळी क्रमांकामध्ये कायमस्वरुपी स्वागत कमान उभारणे प्रस्तावीत होते.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची सांगता मा. पंतप्रधान महोदय यांचे कार्यक्रमाने दि.१९/१०/२०१८ रोजी होणार होती. सदरहू कार्यक्रमास अत्यंत कमी कालावधी शिल्लक राहील्याने कायमस्वरुपी आर.सी.सी. कमान उभारणे ऐवजी देणगीदार साईभक्ता मार्फत कोपरगाव-कोल्हार रस्ता (प्र.रा.मा.८) यावर शिर्डी शहराचे उत्तर बाजुस चारी क्र.११ व शासकीय विश्रामगृहाचे मधील जागेत (चेनेज ९१/५००) स्ट्रक्चरल स्टीलमध्ये फायबर क्लॅडींग वापरून सुशोभित स्वागत कमान उभारणेबाबत ठरले. त्यास कार्यकारी अभियंता, जा.बॅंक. प्रकल्प (सा.बां) विभाग, अहमदनगर यांनी दि.२१/०६/२०१८ रोजीच्या पत्राने ना-हरकत दाखला दिला होता. त्यामधे खालीलप्रमाणे अटी नमूद केल्या होत्या.

१) स्वागत कमानीची Structural Stability व Safety ची जबाबदारी श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांची राहील.
२) भविष्यात सदर रस्त्याचे रुंदीकरण झाल्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी स्वखर्चाने कमानीचे रुंदीकरण करतील अथवा कमान काढुन घेतील.
३) स्वागत कमानीचे बांधकाम करतेवेळी रस्ता वाहतूकीस अडथळा होणार नाही तसेच अपघात होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची राहील.
४) स्वागत कमानीची देखभाल दुरूस्ती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत करण्यात येईल.

स्वागत कमान उभारणी करीता साईभक्त डॉ. सुमनजी, चेअरमन साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांनी दि.०४/०७/२०१८ रोजीचे पत्राने देणगीदाखल स्वागत कमान उभारणेबाबत इच्छा प्रगट केली होती. त्यानुसार त्यांना देणगीदाखल कमानीचे काम सुरु करणेसाठी दि.११/०७/२०१८ रोजीचे पत्राने कळविण्यात आले होते. साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांचेमार्फत सदरहू कमानीचे कामातील सिव्हील व फॅब्रीकेशनचे काम करणेसाठी अरिहंत इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांना रु.१० लक्ष + १८ % जीएसटी या दराने काम दिलेले होते. तसेच दरवर्षी रामनवमी उत्सवात भव्य देखावे उभारणारे श्री अमन विधाते व विलास महाडिक, व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेमार्फत स्वागत कमानीवर एफ.आर.पी. शिटमध्ये सजावट करणेचे काम करण्यात आले आहे.

तथापि साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांचेमार्फत झालेल्या कामाचे बिल अदा केले जात नसल्याने व शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमापुर्वी स्वागत कमान उभारणे आवश्यक असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ६३१ अन्वये खालील प्रमाणे निर्णय पारीत झालेला आहे.

"संस्थान मार्फत नगर – मनमाड हायवेवर देणगीदारामार्फत तात्पुरत्या स्वागत कमानी तयार करण्याचे काम चालु आहे. सदर कमानी उभारणेकामी देणगीदाराने रक्कम न दिल्यास ती संस्थानमार्फत अदा करणेस मान्यता देण्यात आली."

त्यानुसार ठेकेदार अरिहंत इंजिनिअरींग वर्क्स यांचेमार्फत स्वागत कमानीचे काम पूर्ण करुन घेण्यात आले. ठेकेदार यांनी त्यांचे दि.२४/१०/२०१८ रोजीचे पत्रान्वये साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांचेमार्फत बिल अदा करणेत येत नसल्यामुळे संस्थानमार्फत बिल अदा होणेबाबत विनंती केली होती. संस्थानमार्फत साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांना ठेकेदार यांचे उर्वरीत बिलाची रक्कम अदा करणेबाबत विनंती करणेत आली. तथापि साईधाम फाऊंडेशन यांनी सदरची रक्कम न दिल्यामुळे मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७१९ अन्वये ठेकेदार यांना देय रक्कम संस्थानमार्फत अदा करणेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार ठेकेदार अरिहंत इंजिनिअरींग वर्क्स यांना रक्कम रु.८,८०,०००/- मात्र रक्कम अदा करणेत आली.

अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांचे दि.२१/०२/२०१९ रोजीचे पत्राव्दारे तात्पुरत्या स्वरुपात उभारणेत आलेली स्वागत कमान काढुन घेणेबाबत कळविले होते. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला असता, सदर प्रस्तावावर निर्णय क्रं.१९२ खालील प्रमाणे पारीत झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, शताब्दी सोहळ्यानिमित्त कोपरगाव कोल्हार रस्ता प्रामा ०८ वर तात्पुरत्या स्वरुपात उभारणेत आलेल्या स्वागत कमान बांधकामाचे तीन खाजगी सक्षम एजन्सी कडून Structural Stability ची तपासणी करुन प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्यानुसार स्वागत कमान आहे त्याच ठिकाणी राहू देणेबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविणेत यावा, असे ठरले."

उपरोक्त निर्णयानुसार स्वागत कमान बांधकामाची तीन खाजगी सक्षम एजन्सी कडून Structural Stability ची तपासणी करुन घेणेसाठी १) श्री.आर. आर. कुलकर्णी, पूणे २) श्री. मधूकर डि. बाल्टे, अहमदनगर ३)श्री. मिलींद राठी, जळगाव या ०३ सल्लागारांना दि.२९/०६/२०१९ रोजीचे पत्राने कळविणेत आले होते. याबाबत तिनही एजन्सीने दिलेले अभिप्राय मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आले. सदरहू सभेतील निर्णय क्रं.४०८ अन्वये कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प, अहमदनगर यांची मान्यता घेऊन कमानीची दुरुस्ती करणेसाठी आवश्यक ती कार्यवाही करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

पान ०२ वर

कमानीचे सदृढीकरणाचे काम करणेस मान्यता मिळणेकामी कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प, अहमदनगर यांचेकडे नकाशा सादर करणेत आला होता. त्यांचेकडील जा.क्र/रेषा/२१२८/२०१९ दि.२१/०९/२०१९ रोजीचे पत्राने, कमानीचे सदृढीकरणासाठी दिलेला नकाशा प्रमाणे कमानीचे सदृढीकरण करण्यात येऊन Structural Stability प्रमाणपत्र सादर करणेबाबत कळविले होते. त्यानुसार कमानीचे सदृढीकरण करणेसाठी मेकॅनिकल विभागामार्फत फॅब्रीकेशन कामाची दुरुस्ती करणेत आलेली असून बांधकाम विभागामार्फत सल्लागार श्री.बाल्टे यांनी दिलेल्या नकाशाप्रमाणे फाऊंडेशनचे सदृढीकरणाचे काम करणेत आले आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प, अहमदनगर यांना सल्लागार श्री.बाल्टे यांनी दिलेले Structural Stability प्रमाणपत्र सादर करणेत आले आहे.

कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प, अहमदनगर यांचेकडील जा.क्र.रेषा/साईबाबा संस्थान / २०५१/सन-२०२०/ दि.०४/११/२०२० रोजीचे पत्राने खालील अटी-शर्तींच्या अधिन राहून स्वागत कमानीचे कामास ना-हरकत दाखला दिलेला आहे.

१) रस्त्यावरील कमानीकरीता शासनाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमीत केलेल्या निर्णयांचे अनुपालन करण्याची जबाबदारी ही सर्वस्वी आपली राहील.

२) उक्त कमीनीचे प्रतीवर्षी Structural Stability Certificate प्रत्यक्ष पहाणीअंती आपल्यामार्फत सादर करणे आपले मार्फत सादर करणे बंधणकारक राहील.

३) उक्त कमानीमुळे रस्ता वाहतूकीस कोणत्याही प्रकारे अडथळा होणार नाही याबाबत आपण खबरदारी घ्यावी.

४) सदर कमानीमुळे कोणत्याही अपघात किंवा वादविवाद झाल्यास / उद्भवल्यास त्याबाबतची सर्व जबाबदारी (सामाजिक, कायदेशीर, प्रशासकीय व इ.) ही सर्वस्वी आपलीच राहिल.

शताब्दी महोत्सवानिमीत्त संस्थान मार्फत तात्पुरत्या स्वरुपात उभारलेल्या उपरोक्त कमानीची फॅब्रीकेशन व सिव्हील विषयक कामे करुन सदृढीकरण करणेत आले आहे.

तथापी कमान उभारुन अंदाजे ०२ वर्ष ०४ महीन्यांचा कालावधी झालेला आहे. कमानीचे बाहेरील बाजूस असलेले सजावटीचे फायबर क्लॅडींगचे काही भाग निघालेलें आहेत. त्यामुळे कमानीचे फायबर क्लॅडींग कामाचे देखभाल दुरुस्ती / नुतनीकरण करणे गरजेचे आहे.

साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांचेमार्फत कमानीचे फायबर क्लॅडींगचे काम करणारे ठेकेदार पॉईंट ब्लॅक, मुंबई यांचे कडून कमानीचे फायबर क्लॅडींगचे दुरुस्तीचे कामासाठी अपेक्षित खर्चाचा तपशिल मागविलेला होता. त्यानुसार पॉईंट ब्लॅक, मुंबई यांनी दि.२२/०२/२०२१ रोजीचे ई-मेल व्दारे खालील प्रमाणे खर्च कळविला आहे.

Sr.No.	Description	Qty	Unit	Rate	Amount
1	Renovation of decorative FRP sheets of Welcome Gate on Kopargaon- Kolhar Road near Government Rest House, Shirdi. Including fiber patch work at structural steel and decorative FRP sheet for strengthening. Repairing or replacing of external damaged sheets and colouring in attractive sheds. Including all labour, material, loading and unloading of material, transportation, with necessary staging and scaffolding etc. complete.	3,504	Sqft	215	7,53,360.00
				Total Amount Rs.:	**7,53,360.00**
				Add GST 18% Extra Rs.:	1,35,605.00
				Total Estimated Cost of Work Rs.:	**8,88,965.00**
				Say R/o Rs.:	**8,89,000.00**

श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळ्यानिमित्त कोपरगाव- कोल्हार रस्ता (प्र. रा. मा. ०८) यावर तात्पुरत्या स्वरुपात उभारलेल्या स्वागत कमानीचे फायबर क्लॅडींग दुरुस्ती / नुतनीकरणाचे कामासाठी येणा-या अंदाजे रक्कम रु.८,८९,०००/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यतेसाठी प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेसाठी सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर मा. श्री. श्रीकांत एल आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती व श्रीमती गीता बनकर, सहा. धर्मदाय आयुक्त तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी, खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"...सदर कमान देगणीदारामार्फत केलेली आहे व त्याच वेळी संस्थान कमानीची दुरुस्ती करेल किंवा कमान काढून घेईल असेही ठरलेले आहे. मुळातच कमानीचा उद्देश हा संपुष्टात आलेला आहे. सदर कमान ही तात्पुरत्या स्वरुपाची आहे. त्यासाठी शिर्डी नगर परिषदेची परवानगी असल्याबाबत कुठेही अभिलेख नाही किंवा नमूदही नाही. अशा सर्व परिस्थितीत सदर तात्पुरत्या कमानीच्या दुरुस्तीकरीता सुमारे नऊ लाख रुपये खर्च हा अनाठायी आहे. करीता सदर प्रस्ताव नामंजूर करणेत येत आहे."

सदरहू स्वागत कमानीचे रोडचे मध्यावरील स्ट्रक्चरल कॉलमला दि.२२/०६/२०२१ रोजी अज्ञात वाहनाने धडक दिल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे कमानीचे स्ट्रक्चरल कॉलम वाकला आहे व त्या ठिकाणचे डेकोरेटिव्ह फायबर क्लॅडींग तुटलेले आहे. तसेच उर्वरीत भागाचे फायबर क्लॅडींग देखील खराब अवस्थेत आहे. कमानीचे झालेल्या नुकसानीबाबत अज्ञात वाहनावर गुन्हा दाखल करुन पुढील कायदेशीर कारवाई करणेसाठी पोलीस निरिक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांना दि.०७/०७/२०२१ रोजीच्या पत्राने कळविणेत आले होते.

पान ०३ वर

पोलीस निरीक्षक कार्यालय, शहर वाहतूक नियंत्रण शाखा शिर्डी यांनी त्यांचे दि.०७/०७/२०२१ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे कळविले आहे.

"श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष निमित्ताने देशमुख चारी (शासकीय विश्रामगृहाजवळ) नगर-मनमाड रोडवर भावीकांना आकर्षणासाठी प्लास्टर ऑफ पॅरीसची भव्य कमान तात्पुरती उभारण्यात आलेली आहे. परंतू सदर कमानीस वाहनाचा धक्का लागुन, कमानीचे आवरण व आतील सांगाडा मोकळे झाल्याचे दिसून येत आहे. सदर कमान प्लास्टर ऑफ पॅरीसची असल्याने तिचे आवरण देखील तिन वर्षात झिज होऊन मोडकळीस आलेले आहे. तरी भविष्यात एखादे वाहनाचे धडकेने किंव्हा ऊन- वारा- पाऊसामुळे नमूद कमान पदचारी/ भाविक अथवा वाहनांवर कोसळून जिवीतहाणी होण्याची शक्यता नाकारात येत नाही. तरी सदर कमान तात्काळ काढून घेणेबाबत आपले अखत्यारीत असलेल्या सबंधीतांना आदेश होणेस विनंती आहे. "

विभागाचा अभिप्राय:- शताब्दी महोत्सवानिमित्त तात्पुरत्या स्वरुपात उभारलेल्या कमानीचे फॅब्रीकेशन व सिव्हील विषयक कामे करुन सुदृढीकरण करणेत आलेले आहे. तथापी बाहेरील बाजुने सुशोभिकरणासाठी लावलेले फायबर क्लॅडींग वातावरणाच्या परिणामामुळे खराब झालेले आहे. तसेच सदरहू कमानीस अज्ञात वाहनाने धडक दिल्याने खिळखिळा झालेला क्लॅडींगचा काही भाग रस्त्यावर पडल्यास अपघात होण्याची शक्यता आहे. सदरहू स्वागत कमान ही श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त तात्पुरत्या स्वरुपात उभारलेली होती. परंतु आता भविष्यात काही अनुचित प्रकार घडू नये याकरीता सदरहू कमान काढून घेणे योग्य होईल, असे मत आहे. सदरहू कमान काढून घेऊन त्याचे निघणारे सर्व मटेरिअल घेऊन जाणे व त्याबदल्यात संस्थानला मोबदला देणे या तत्त्वावर दरपत्रके मागवून सदरचे काम करुन घेता येईल.

प्रस्ताव:- तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त कोपरगाव – कोल्हार रस्ता (प्र. रा. मा. ०८) यावर तात्पुरत्या स्वरुपात उभारलेली स्वागत कमान काढून घेणेस व त्यासाठी सदरहू कमान काढून घेऊन त्याचे निघणारे सर्व मटेरिअल घेऊन जाणे व त्याबदल्यात संस्थानला मोबदला देणे या तत्त्वावर दरपत्रके मागविणेचे प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

१०/७/२१

(कान्हूराज बगाटे, भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

19.7 | 19/07

विषय क्र.- ४९

मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय
बांधकाम विभाग

विषय : मौजे निमगाव-कोऱ्हाळे येथील गट नं. १८३ पै. मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक कॉम्पलेक्सचे बांधकाम करणे कामाचे ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट प्रा.लि.,पुणे यांचे रनिंग बिलातून कपात केलेली रु.५,४५,००,०००/- मात्र सिक्युरीटी डिपॉझीट रक्कम परत करणेबाबत...

टिपणी -

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद : अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट कलम (१) च्या खंड (ढ) अन्वये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना दईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे व अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

प्रस्तावना : मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४ नुसार ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट प्रा.लि.,पुणे यांना कार्यादेश देण्यात आला असुन सदरहू कामाचा तपशिल व दि.०७/०७/२०२१ पर्यंत ठेकेदार यांनी केलेल्या कामाची सद्यस्थिती खालील प्रमाणे –

१	कामाचे नांव	मौजे निमगाव को-हाळे गट नं.१८३ मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्प उभारणे.
२.	ठेकेदार	मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट प्रा.लि.,पुणे
३.	मंजूर निविदा रक्कम	रु.२१८/- कोटी.
४.	कार्यादेश क्र. व दिनांक	१) जा.नं.५६३६/२०१९ दि.०८/०३/२०१९ २) जा.नं.१६९०/२०१९ दि.०३/०८/२०१९
५.	करारनाम्यानुसार काम सुरु करण्याचा	दिनांक २३/०३/२००९.
६.	काम पूर्ण करण्याचा कालावधी	१८ महिने (दि.२२/०९/२०२० अखेर)
७.	प्रथम मुदतवाढ	०६ महिने (दि.२२/०३/२०२१ अखेर) मा. तदर्थ समितीचे दि.११/१२/२०२१ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४९३
७.	कामाची सद्यस्थिती	**इंग्लिश मेडियम स्कूल इमारत**– आर.सी.सी, बांधकाम, प्लास्टर, फ्लोरींग, डॅडो, बाहेरील रंगकाम १००% पूर्ण, आतील रंगकाम ७५% पूर्ण, ॲल्युमिनीयम विंडो- ४०% पूर्ण, खिडक्यांचे ग्रिल व रेलींग बसविणेचे काम- ९५% पूर्ण. बाहेरील बाजूने वायरकट ब्रिक क्लॅडींगचे काम – ६०% पूर्ण झाले असून उर्वरीत कामे सुरु आहे. **कन्या विद्या मंदिर इमारत, स्पोर्ट कॉम्पलॅक्स-** आर.सी.सी, बांधकाम, प्लास्टर, फ्लोरींग, डॅडो, बाहेरील रंगकाम, वायरकट ब्रिक क्लॅडींगचे काम, ॲल्युमिनीयम विंडो व खिडक्यांचे ग्रिल बसविण्याचे काम १००% पूर्ण, आतील रंगकाम ७५% पूर्ण, रेलींग बसविणेचे काम- ९५% पूर्ण असून उर्वरीत कामे सुरु आहे. **कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय** - आर.सी.सी, बांधकाम, प्लास्टर, फ्लोरींग, डॅडो, बाहेरील रंगकाम, ॲल्युमिनीयम विंडो व खिडक्यांचे ग्रिल बसविण्याचे काम १००% पूर्ण, आतील रंगकाम ७५% पूर्ण, रेलींग बसविणेचे काम- ९५% पूर्ण. बाहेरील बाजूने वायरकट ब्रिक क्लॅडींगचे काम – ९०% पूर्ण झाले असून उर्वरीत कामे सुरु आहे. **ऑडिटोरीयम-** आर.सी.सी, बांधकाम, आतील व बाहेरील प्लास्टर १००% पूर्ण, फ्लोरींग वर्क ९५% पूर्ण, वॉलपुट्टीचे काम प्रगतीत, बाहेरील बाजूने वायरकट ब्रिक क्लॅडींग व ऑडिटोरीयम रुफिंगचे काम सुरु आहे. **स्विमिंग पुल-** आर.सी.सी, बांधकाम, प्लास्टर चे काम १००% पूर्ण, फ्लोरींग वर्क ९०% पूर्ण, वॉलपुट्टीचे काम प्रगतीत, बाहेरील बाजूने वायरकट ब्रिक क्लॅडींगचे काम सुरु आहे. **परिसर विकास-** भूमिगत पाण्याच्या टाकीचे काम १००%पूर्ण, कम्पाऊंड भिंतीचे काम ९५% पूर्ण, डिजीरुम व गेट कमानी चे काम १००% पूर्ण, एसटीपीचे काम ७०% पूर्ण, अंतर्गत रस्ते तयार करणेचे काम १००% पूर्ण झाले असून प्लिंथ प्रोटेक्शनचे काम प्रगतीत.

पान क्र.०२ वर...

ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट प्रा.लि.,पुणे यांनी त्यांचे दि.०५/०८/२०२० रोजीचे पत्राने मध्ये महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचे दि.२९/०७/२०२० रोजीचे शासन निर्णयास अनुसरुन त्यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम परत मिळणेबाबत खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

"With reference to your work Order No.SSST/Const/ 5936/2019, dated.08/03/2019 Clause No.5 Total Security Deposit shall be 5% of Contract sum. Initially we have Deposited 50% security Deposit amounting Rs.5,45,00,000/- including EMD of Rs.1,26,99,200/- Deposited by e-procurement Ref. no.6382301966890, bank UTR No. CPL9107232 State bank of India on Dt.29/12/2018 and Demand Draft of Rs.4,18,00,800/- HDFC Bank DD No.-02359, Dt.12/03/2019.

As per above mention GR clause No.3.1 kindly release 50% security deposit amounting Rs.2,72,50,000/- against bank guarantee.

Also from our RA Bills retention money @5% Amounting Rs.6,92,23,720/- is deducted. As per above GR Clause no.2.2 B Only 1% retention money shall be recovered in the form of Bank Guaranty. Kindly release our total retention money Rs.6,92,23,720/- accordingly.

महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाचे दि.२९/०७/२०२० रोजीचे शासन निर्णयामध्ये केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील शासनाची कामे करणा-या कंत्राटदाराना चालू कंत्राटाबाबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणीं संदर्भात उपाययोजना व सहाय्य करणे विषयी खालील प्रमाणे नमूद आहे.

"१) ज्या कामांमध्ये सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit) चालू देयकांमधून (RA Bills) मधून करण्यात येते, अशा प्रकरणी प्रत्येक चालू देयकातून करावयाची वजावट यांचे प्रमाण कमी करुन आणि / अथवा वजावटीचा कालावधी अधिक देयकांकरीता वाढविण्यात येईल. तथापि, संपूर्ण सुरक्षा अनामत रक्कम वसूल करण्यात येईल. याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

२.२) मात्र ज्या कंत्राटांमध्ये मुळ सुरक्षा अनामत (Security Deposit) निवीदा रकमेच्या २ टक्क्यापेक्षा अधिक आहे, (RA Bill मधून वसूल करावयाची रक्कम निवीदा रकमेच्या १% पेक्षा जास्त आहे.)

(ब) जर वजावट रक्कम निविदा रकमेच्या १% वर वसुली झाली असेल तर ती रक्कम कंत्राटदाराला एकूण वसूल करावयाची रक्कम (निविदा प्रमाणे RA Bill मधून वसूल करावयाची रक्कम) विनाशर्त बॅंक गॅरंटीच्या (दोष दायित्व निवारण कालावधीपर्यंत) बदल्यास मुक्त करावी.

*५) वर परिच्छेत १ ते ४ मध्ये नमूद केलेल्या सवलतींचा लाभ घेण्यास इच्छुकता दर्शविल्यानंतर कंत्राटदारास दैवी आपत्ती (**Force Majeure Clause**) संबंधातील कंत्राटातील अथवा सर्वसाधारण तरतूद लागू करण्याबाबत विनंती करता येणार नाही.*

९) शासकीय कंपन्या, शासकीय उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, निमशासकीय संस्था या सदर मार्गदर्शक सूचना योग्य त्या फेरफारांसह लागू करु शकतील."

निवीदेतील अटी व शर्तीनूसार ठेकेदार यांचेमार्फत संस्थानकडे जमा केलेल्या बॅंक गॅरंटीचा व EMD व ISD पोटी जमा केलेल्या डिपॉझीटचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

A)	Performance Security Deposit:	Bank Guarantee No.:007GT02190740003. Valid up to date 15/12/2020 Drawn on HDFC Bank, Pune	**109,000,800.00**

B)	**Details of Security Deposit**		**Amount Rs.**
1	EMD Deposited:	Through E-procurement Ref. No. 6382301966890, UTR No. CPL9107232, State Bank of India on dtd.29/12/2018.	1,26,99,200.00
2	ISD Deposited:	Through D.D. No.023597, dtd.12/03/2019. (Sansthan Receipt No.CHQ-18-327, dtd.26/03/2019)	4,18,00,800.00
		50% Amount of Security Deposit Rs.:	**5,45,00,000.00**

पान क्र.०३ वर...

निवीदेतील अटी व शर्तींनूसार ठेकेदार यांचे रनिंग बिलामधून खालीलप्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम जमा / कपात करणेत आलेली आहे.

B)	Remaining 50% Security Deposit Recovered from RA Bills		
1	Security deposit to be recovered from bills @ 5% of gross value of the bill.	RA Bill No.1	43,60,000.00
2		RA Bill No.2	1,61,86,500.00
3		RA Bill No.3	45,78,000.00
4		RA Bill No.4	44,96,250.00
5		RA Bill No.5	44,96,250.00
6		RA Bill No.6	43,60,000.00
7		RA Bill No.7	58,58,750.00
8		RA Bill No.8	34,33,500.00
9		RA Bill No.9	36,78,750.00
10		RA Bill No.10	19,62,000.00
11		RA Bill No.11	54,50,000.00
12		RA Bill No.12	23,98,000.00
13		RA Bill No.13	64,47,350.00
14		RA Bill No.14	15,18,370.00
		Total deposit recovered from RA Bills Rs.:	**6,92,23,720.00**

ठेकेदार यांचे संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit) परत करणेबाबत निवीदेत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

Page No. 20, Clause No.11 (Appendix A to Detail Tender Notice)
Return of Security Deposit (5%): 50% with settlement of final bill and 50% on successful completion of defects liability period.

Page No. 73, Clause No.154
The **balance 50% amount of Retention Money may be returned by the Employer to the Contractor after satisfactory expiry of the defect liability period**, if there is nothing outstanding against the Contractor and provided that all defects pointed out by the Architect and the Executive Engineer have been made good accordingly to the true intent and meaning and certified by the Architect and Executive Engineer and also provided that there was no case of fraud, dishonest or fraudulent concealment relating to works or materials or any matter dealt with in the completion certificate and in case of any defects and insufficiencies in the work or materials which on reasonable examination would not have disclosed and provided always that the Contractor shall have been paid the final bill after he has rendered a 'No Claim Certificate' and also contractor has submitted a "No Dues Certificate" from the Authorities from where water and electricity etc. were obtained by him for construction of work under this Contract.

ठेकेदार यांचे मागणीबाबत मा. तदर्थ समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर केला होता. सदरहू सभेतील निर्णय क्र.४९२ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"....यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१८३ पै.मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक कॉम्प्लेक्सचे बांधकाम अद्याप पुर्ण झालेले नसल्याने सदर कामाचे ठेकेदार मे.न्याती इंजिनिअर्स अॅण्ड कन्सल्टंट प्रा.लि., पुणे यांचे सिक्युरिटी डिपॉझीट रक्कम परत करणेची मागणी अमान्य करण्यात आली."

श्री साईबाबा दर्शन रांग प्रकल्पाचे ठेकेदार श्रीम भानु कन्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचे सदरहू कामाचे सुरक्षा अनामत रक्कम परत करणेचे मागणी बाबत मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.१९/०६/२०२१ चे सभेतील निर्णय क्र.३४ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

".... यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्रं. संकिर्ण-१०२०/प्र.क्रं.१००/२०२०/व्यय-१२, मुंबई, दि.२९/०७/२०२० नुसार दर्शनरांग प्रकल्पाचे ठेकेदार श्रीम भानु कन्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांना त्यांचे रनिंग बिलातून कपात केलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.२,२४,८५,९३६/- मात्र परत करण्यास तसेच यापुढील त्यांचे रनिंग बिलातून सुरक्षा अनामत रक्कम वसूल न करता एकूण निविदा रकमेसाठी सुरक्षा अनामत म्हणून रनिंग बिलातून वसूल करावयाच्या रकमेएवढी म्हणजे रु.२,७३,७५,०००/- एवढया रकमेची विनाशर्त बॅक गॅरंटी (दोष दायित्वत निवारण कालावधीपर्यंत) घेण्यास मान्यता देण्यात आली."

पान क्र.०४ वर...

प्रकल्पाचे आर्किटेक्ट डी. ओ. निकम, पुणे यांनी दि.०८/०७/२०२१ रोजीचे पत्राने ठेकेदार यांचे सुरक्षा अनामत रक्कम परत करणेचे मागणीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

"With reference to the above subject and reference letter serial no.: 1, contractor has requested for releasing the security deposit and the retention money in accordance with the **महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्र. १०२०/प्र. क्र.१००/२०२०/व्यय १२, दिनांक: २९ जुलै, २०२०.**

1) **Security Deposit.**

a) Nyati Engineers & Consultants Private Limited, Pune. Requested for refund of 50% security deposit. NECPL deposited Rs.5,45,00,000.00 at the time of award of the work. Therefore Rs.2,72,50,000.00 amount has been demanded as per clause 3.1

b) As per GR महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्र. १०२०/प्र. क्र.१००/२०२०/व्यय १२,दिनांक: २९ जुलै,२०२०. Clause 3) State that ज्याप्रकरणी निविदा रकमेहून कमी रकमेचा देकार प्राप्त होतो म्हणून अतिरिक्त सुरक्षा अनामत (Additional Security Deposit) रक्कम बँक हमी/डी.डी. घेतली जाते, त्याप्रकरणी-

c) As per above stated clause no. 03 sub clause 3.1 is not applicable for our tender so same amount is not payable.

2) **Retention Money from R.A. Bills.**

a) Nyati Engineers & Consultants Private Limited, Pune. Requested for refund of retention money deducted from RA bills amounting Rs.6,92,23,720.00 (Rs. Six crores Ninety Two lakhs Twenty Tree Thousand Seven Hundred Twenty only.)

b) As per GR महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्र. १०२०/प्र. क्र.१००/२०२०/व्यय १२, दिनांक: २९ जुलै, २०२०. Clause2.2 B, stipulates that the amount may be released against a bank guarantee. Hence 2.5% retention amount Rs.5,45,00,000/- deducted from RA Bills may please be released against bank guarantee."

विभागाचा अभिप्राय : महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाचे दि.२९/०७/२०२० रोजीचे शासन निर्णयातील शर्त क्र.२.२ (ब) नूसार रनिंग बिलातून कपात केलेली रक्कम विनाशर्त बॅंक गॅरेंटीच्या (दोष दायित्व निवारण कालावधीपर्यंत) बदल्यास मुक्त करावी असे नमूद केलेले आहे. निवीदेतील सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit) कपात करणेचे तरतूदी नूसार ठेकेदार यांचे प्रत्येक रनिंग बिलातून ५% प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम रु.६,९२,२३,७२०/- मात्र कपात करणेत आलेले आहे. या रक्कमेतून वॉटरप्रुफिंग आणि ॲंटीटरमाईट ट्रिटमेंट पोटी कपात करावयाची रक्कम रु.१,२५,००,०००/- मात्र कपात करुन उर्वरीत रक्कमेतून ठेकेदार यांना रक्कम रु.५,४५,००,०००/- मात्रच्या विनाशर्त बॅंक गॅरेंटीच्या (दोष दायित्व निवारण कालावधीपर्यंत) बदल्यास मुक्त करता येईल. याबाबत निर्णय घेणेसाठी मा. तदर्थ समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करता येईल असे मत आहे.

प्रस्ताव: तरी मौजे निमगाव-कोऱ्हाळे येथील गट नं. १८३ पै. मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक संकुलाचे बांधकाम करणे कामाचे ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट प्रा.लि.,पुणे यांचे रनिंग बिलातून कपात करणेत आलेल्या सुरक्षा अनामत रक्कमेतून वॉटरप्रुफिंग आणि ॲंटीटरमाईट ट्रिटमेंट पोटी कपात करावयाची सिक्युरिटी डिपॉझिट रक्कम रु.१,२५,००,०००/- मात्र राखून ठेवणेस, तसेच रक्कम रु.५,४५,००,०००/- मात्र ठेकेदार यांना विनाशर्त बॅंक गॅरेंटीच्या (दोष दायित्व निवारण कालावधीपर्यंत) बदल्यात मुक्त करणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

19/07/21

(कान्हूराज बगाटे, भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

19.7 19/07

विषय क्र.- ४२

मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय
बांधकाम विभाग

विषय : मौजे निमगाव-कोऱ्हाळे येथील गट नं. १८३ पै. मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्प बांधकाम करणे कामाचे ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट प्रा.लि.,पुणे यांचे प्रकल्पाचे कामासाठी मुदतवाढ मागणीबाबत...

टिपणी-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद : अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट कलम (१) च्या खंड (ढ) अन्वये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना दईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे व अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

प्रस्तावना : मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४ नुसार ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट प्रा.लि.,पुणे यांना कार्यादेश देण्यात आला असुन सदरहू कामाचा तपशिल व दि.०९/०७/२०२१ पर्यंत ठेकेदार यांनी केलेल्या कामाची सद्यस्थिती खालील प्रमाणे –

१	कामाचे नांव	मौजे निमगाव को-हाळे गट नं.१८३ मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्प उभारणे.
२.	ठेकेदार	मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट प्रा.लि.,पुणे
३.	मंजूर निविदा रक्कम	रु.२१८/- कोटी.
४.	कार्यादेश क्र. व दिनांक	१) जा.नं.५६३६/२०१९ दि.०८/०३/२०१९ २) जा.नं.१६९०/२०१९ दि.०३/०८/२०१९
५.	करारनाम्यानुसार काम सुरु करण्याचा	दिनांक २३/०३/२०१९.
६.	काम पूर्ण करण्याचा कालावधी	१८ महिने (दि.२२/०९/२०२० अखेर)
७.	प्रथम मुदतवाढ	०६ महिने (दि.२२/०३/२०२१ अखेर) मा. तदर्थ समितीचे दि.११/१२/२०२१ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४९३
७.	कामाची सद्यस्थिती	**इंग्लिश मेडियम स्कूल इमारत**– आर.सी.सी, बांधकाम, प्लास्टर, फ्लोरींग, डॅडो, बाहेरील रंगकाम १००% पूर्ण, आतील रंगकाम ७५% पूर्ण, ॲल्युमिनीयम विंडो-४०% पूर्ण, खिडक्यांचे ग्रिल व रेलींग बसविणेचे काम- ९५% पूर्ण. बाहेरील बाजूने वायरकट ब्रिक क्लॅडींगचे काम – ६०% पूर्ण झाले असून उर्वरीत कामे सुरु आहे. **कन्या विद्या मंदिर इमारत, स्पोर्ट कॉम्पलॅक्स-** आर.सी.सी, बांधकाम, प्लास्टर, फ्लोरींग, डॅडो, बाहेरील रंगकाम, वायरकट ब्रिक क्लॅडींगचे काम, ॲल्युमिनीयम विंडो व खिडक्यांचे ग्रिल बसविण्याचे काम १००% पूर्ण, आतील रंगकाम ७५% पूर्ण, रेलींग बसविणेचे काम- ९५% पूर्ण असून उर्वरीत कामे सुरु आहे. **कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय -** आर.सी.सी, बांधकाम, प्लास्टर, फ्लोरींग, डॅडो, बाहेरील रंगकाम, ॲल्युमिनीयम विंडो व खिडक्यांचे ग्रिल बसविण्याचे काम १००% पूर्ण, आतील रंगकाम ७५% पूर्ण, रेलींग बसविणेचे काम- ९५% पूर्ण. बाहेरील बाजूने वायरकट ब्रिक क्लॅडींगचे काम – ९०% पूर्ण झाले असून उर्वरीत कामे सुरु आहे. **ऑडिटोरीयम-** आर.सी.सी, बांधकाम, आतील व बाहेरील प्लास्टर १००% पूर्ण, फ्लोरींग वर्क ९५% पूर्ण, वॉलपुट्टीचे काम प्रगतीत, बाहेरील बाजूने वायरकट ब्रिक क्लॅडींग व ऑडिटोरीयम रुफिंगचे काम सुरु आहे. **स्विमिंग पुल-** आर.सी.सी, बांधकाम, प्लास्टर चे काम १००% पूर्ण, फ्लोरींग वर्क ९०% पूर्ण, वॉलपुट्टीचे काम प्रगतीत, बाहेरील बाजूने वायरकट ब्रिक क्लॅडींगचे काम सुरु आहे. **परिसर विकास-** भूमिगत पाण्याच्या टाकीचे काम १००%पूर्ण, कम्पाऊंड भिंतीचे काम ९५% पूर्ण, डिजीरुम व गेट कमानी चे काम १००% पूर्ण, एसटीपीचे काम ७०% पूर्ण, अंतर्गत रस्ते तयार करणेचे काम १००% पूर्ण झाले असून प्लिंथ प्रोटेक्शनचे काम प्रगतीत.

पान क्र.०२ वर...

श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्पास करारनाम्यानुसार काम पुर्ण करण्यासाठी १८ महिने दि.२३/०३/२०१९ ते दि.२२/०९/२०२० असा कालावधी देणेत आलेला होता. तसेच राज्यात कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे कंत्राटदाराना चालू कंत्राटाबाबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणीं संदर्भात उपाययोजना व सहाय्य करणे विषयीचे महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचे दि.२९/०७/२०२० रोजीचे शासन निर्णयानूसार ठेकेदार यांना प्रकल्पाचे उर्वरीत काम पूर्ण करणेसाठी कोणतीही दरवाढ न देता सहा महिने दि.२२/०३/२०२१ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास मा. तदर्थ समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता सदरहू सभेतील निर्णय क्र.४९३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत करणेत आला आहे.

"...यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१८३ पै.मध्यें श्री साईबाबा शैक्षणिक कॉम्प्लेक्सचे बांधकाम करणे कामाचे ठेकेदार मे.न्याती इंजिनिअर्स अॅण्ड कन्सल्टंट प्रा.लि., पुणे यांचे प्रकल्पाचे कामास कोणतीही दरवाढ न देता सहा महिने कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली."

आता ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स अॅण्ड कन्सलटंट प्रा.लि.,पुणे यांनी त्यांचे दि.०९/०७/२०२१ रोजीचे पत्राने प्रकल्पाचे कामास ०६ महिने म्हणजेच दि.२२/०९/२०२१ पर्यंत मुदतवाढ मिळणेबाबात खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

"With reference to above subject, the completion date of the project as per above work order was 22nd September 2020 However, We have obtained the extension of six months as per your Extension letter received on 8th March 2021 (REF 3) i.e. revised completion date of project is 22nd March 2021.

Due to the second phase of COVID-19 pandemic Government had issued many guild lines & notifications to overcome the situation of pandemic as below:

1. As per the imposition of section 144 & Night Curfew declared by Government of Maharashtra on dated 4th April 2021 our labour strength decreased drastically due to the migration of labours to their hometown. As per the order received from collector that all private construction projects shall be remain closed.

2. Again new notification on dated 13th Apr 2021 Government announces stricter COVID restrictions.

3. As per notification on dated 20th Apr 2021 imposed strict restrictions on transport, it seems like Lockdown.

4. As per Government of Maharashtra revised notification regarding **Break The Chain**. The restriction period has been extended firstly up to 15th May 2021 & then further extended till 1st June 2021.

5. As per the latest notification on dated 30th May the restriction are extended up to 15th June 2021.

6. The Govt. of Maharashtra has notified break the chain order dated 26th June, Communication shutdown & Congestion restrictions has been applied by the Collector of Ahmednagar. Under the guidance of section No.14 all private construction sites will run till 4 PM only after that all labour should be instructed to leave the work place each day.

As per the current status of the project only exposed wire cut cladding work is balance, even by making efforts to deploy maximum force, we could have managed to complete the work even earlier, however, due to second phase of Covid-19 wave, the labourers are scared and they have strong objection to come down to Maharashtra which affect our work progress & delay in the completion of the project.

Considering the above facts and practical difficulties, we hereby request you to kindly grant the extension of completion of the project by six months beyond 22nd March 2021 i.e. up to 22nd September 2021."

प्रकल्पाचे आर्किटेक्ट डी. ओ. निकम, पुणे यांनी त्यांचे दि.०९/०७/२०२१ रोजीचे पत्राने ठेकेदार यांचे मुदतवाढ मागणीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

"With reference to the above subject and reference letter contractor has requested the four months i.e. up to 22th September 2021 time extension to complete the remaining work and handing over the complete project.

As per circular of Collector Ahmednagar, Government of Maharashtra break the chain program of COVID-19, the restrictions / guide line had been extended up to 15th June 2021. Now the restrictions are extended due to Delta Plus COVID-19 virus by Government of Maharashtra. Hence, we are of the opinion that contractors request for extension period up to 22th September 2021 to complete the remaining work may please granted."

पान क्र.०३ वर...

विभागाचा अभिप्राय :-

कोरोना साथीच्या दुस-या लाटेमुळे संपुर्ण देशासह महाराष्ट्रात शासनामार्फत मोठया प्रमाणात निर्बंध लावण्यात आले होते. त्याकरीता महाराष्ट्र शासनाचे दि.०४/०४/२०२१ रोजीचे आदेशान्वये सुरू असलेल्या बांधकामांकरीता खालीलप्रमाणे नियमावली जाहीर करणेत आली होती.

19. Construction Activity

a) To be allowed only for site where labours are living on site. Movement to and fro from outside must be avoided. Except for the purposed of material movements.

b) Every one engaged in the activity to get vaccinated at the earliest, as per criteria of GOI and till get vaccinated must carry a negative RTPCR test result certificate, which will be valid for 15 days. This rule will come into effect from 10th April, 2021.

c) Defaults will lead to a fine of 10,000/- for the developer of the construction site and repeated defaults may lead to closure of the site till existence of notification of COVID 19 epidemic.

d) If a worker is found positive he or she would be allowed medical leave and cannot be discontinued during this absence for this reason. He or she will be entitled for full wages that he or she might have earned had he or she not contacted corona.

राज्यात कोरोना साथीच्या आलेल्या दुस-या लाटेच्या प्रादुर्भावामुळे लावणेत आलेल्या निर्बंधांमुळे कुशल / अकुशल कारागीर उपलब्ध होणेसाठी अडचण निर्माण झाली. ठेकेदार यांचे मार्फत वायरकट ब्रिक क्लॅडिंग व अंतर्गत रंगकाम हि कामे प्रामुख्याने बाकी आहेत. त्यामुळे ठेकेदार यांना दुस-यांदा व शेवटची मुदतवाढ कुठलीही दरवाढ न देणेचे अटीवर देणेस हरकत नाही असे मत आहे.

प्रस्ताव:-

श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्प बांधकाम करणे कामाचे ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स अॅण्ड कन्सलटंट प्रा.लि., पुणे यांचे प्रकल्पाचे कामास दि.२३/०३/२०२१ ते दि.२२/०९/२०२१ अशी सहा महीने कालावधीची दुस-यांदा व शेवटची मूदतवाढ कुठलीही दरवाढ न देणेचे अटीवर देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

19/07/21

(कान्हूराज बगाटे, भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

19.7

19/07

20/7/21

विषय क्र.- ४३

मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषय
बांधकाम विभाग

विषय:- साई आश्रम भक्तनिवास येथिल इमारतींचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती करणे कामाचे ठेकेदार ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मुंबई यांनी काम पूर्ण करणेसाठी दि.१५/०९/२०२१ अखेर केलेल्या व्दितीय मूदतवाढ मागणीबाबत...

टिपणी-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:-

अधिनियम कलम २१(१) अन्वये, समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय:-

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३४८ (२७) अन्वये, साईआश्रम भक्तनिवास इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती करणेसाठी जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१२६०/२०१८, दि.१३/०६/२०१८ चे आदेशान्वये ठेकेदार ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मुंबई यांची नेमणूक करणेत आलेली आहे.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१८६ अन्वये, साई आश्रम भक्तनिवास इमारतींचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्तीचे काम पूर्ण करणेसाठी ठेकेदार ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मुंबई यांना दि.३१/१०/२०१९ अखेर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.

३) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३१४ अन्वये, साईआश्रम भक्तनिवास इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती कामातील एकूण १२ इमारतीपैकी ०७ इमारतीमधील टॉयलेटची खराब झालेली जुनी कन्सिल्ड जी. आय. पाईप लाईन काढून त्याठिकाणी चांगल्या प्रतीचे नविन सी.पी.व्ही.सी. पाईपलाईन टाकणेचे काम ठेकेदार मे ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मुंबई यांचेकडून करुन घेण्यास तसेच याकामी येणा-या अंदाजे रु.२७,६५,०५६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावना:-

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३४८ (२७) अन्वये, साई आश्रम भक्तनिवास इमारतींचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती करणेसाठी निविदाधारक ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मुंबई यांची एकूण रु.४,८२,८९,६५२/- मात्रची निम्नतम दराची ई-निविदा स्विकारणेत येऊन त्यांना जा.क्र.१२६०/२०१८,दि.१३/०६/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. ठेकेदार यांनी दि.२७/०६/२०१८ पासून कामास सुरुवात केलेली असून सदरहू कामाचा तपशिल व सद्यस्थिती खालीलप्रमाणे.

कामाचे नाव:	साई आश्रम भक्तनिवास इमारतींचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती करणे.
ठेकेदार:	ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मुंबई.
कार्यादेश:	जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१२६०/२०१८, दि.१३/०६/२०१८.
मंजूर निविदा रक्कम:	रु.४,८२,८९,६५२/-.
करारनामा दिनांक:	दि.२०/०६/२०१८.
काम सुरु करण्याचा दिनांक:	दि.२७/०६/२०१८.
कामाचा कालावधी:	०८ महिने.
करारनाम्यानुसार काम पूर्ण करणे दिनांक:	दि.२६/०२/२०१९.
मुदतवाढ:	मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ चे सभेतील निर्णय क्र.१८६ अन्वये दि.३१/१०/२०१९ अखेर मुदतवाढ देणेत आली आहे.
कामाची सद्यस्थिती:	ठेकेदार यांचेमार्फत **A, B, C, E, F, G, H, I, J, K, L** तसेच प्रशासकीय इमारत (R-Block), R-Block पहिला मजला प्रसादालय कक्ष, विद्युत जनित्र / रोहित्र कक्ष व ओपन एअर थिएटर (OAT) या इमारतींचे काम पूर्ण करुन साई भक्तांसाठी वापरास उपलब्ध करून देणेत आलेल्या आहेत. सध्या D - इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्तीचे काम प्रगतीत आहेत. सदर कामांतर्गत साई आश्रम भक्तनिवास येथील एकूण १२ निवासी इमारती (१५३६ खोल्या), स्टोअर रुम, प्रशासकीय इमारत, प्रसादालय कक्ष, विद्युत जनित्र / रोहित्र कक्ष तसेच ओपन एअर थिएटर चे कामाचा समावेश आहे.

पान ०२ वर

ठेकेदार यांनी दि.२९/१२/२०२० व दि.१२/०७/२०२१ रोजीचे पत्राने, उर्वरीत कामे पूर्ण करणेसाठी खालील मुद्दे व अडचणी नमूद करुन विहीत वेळेत काम पूर्ण करणे शक्य न झाल्याने मुदतवाढ मिळणेची विनंती केलेली आहे.

अ.क्र.	ठेकेदार यांनी नमूद केलेला मुद्दा	माहिती
01.	As per the facts and reasons mentioned in our request letter dated 22.04.2019 for Extension of Time we were granted 1st Extension of work till 31st October, 2019 by Sansthan.	मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१८६ अन्वये ठेकेदार यांना दि.३१/१०/२०१९ अखेर मुदतवाढ देणेत आली आहे.
02.	As you are aware that from Mid March-2020 there has been complete lockdown in entire India due to devastating Pandemic Covid – 19, which is still being continued till date. Since the imposition of lockdown, development of various projects are still in a standstill situation. The COVID-19 outbreak was first reported in China, and thereafter it spread across the globe. While the full lockdown imposed by the Government of India is being lifted in phased manners, the ground situation is that the work could not happen during lockdown, and the labours actually started returning to their native places when lockdown started to phase out. As a result, the project activities continue to remain severely hampered due to imposition of lockdown. Despite unlock-1 phase being initiated with restoration of few services (till 30th June 2020) and subsequent, unlock - 2 guidelines relaxing certain additional services, restrictions still continue like suspension of railways, imposition of night curfews, restriction on social gathering etc. Further, many cities & states continue to have stringent lockdown like situation in place. Such impositions have further impacted the project development activities in addition to the labours being unable to commute back to their workplaces till date. Further the second lockdown was initiated from March 2021 which continued to 30th June 2021. During this period the entire system collapsed again and material could not be procured at site and there was no work happening at site. The Lockdown impacted the progress drastically which added to the delay in progress of the work. Further, travel continues to remain prohibited till date, which has impacted the procurement process of Paint Material and Doors at site resulting in total halt in the Material logistics.	• महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परीपत्रक क्र.संकिर्ण-१०२०/प.क्र.१००/२०२०/व्यय-१२, दि.२९/०७/२०२० मध्ये खालील तरतूद नमूद आहे. *"... ... उपरोक्त विषयाबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.* *२. राज्यात कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील शासनाची कामे करणा-या कंत्राटदारांना सोसाव्या लागत असलेल्या अडचणींसंदर्भात उपाययोजना करणे व त्यांना सहाय्य करणे आवश्यक असून त्यादृष्टीने खालील उपाययोजना करण्यात यावी.* *१) शासकीय कामाच्या पूर्णत्वासाठी मुदतवाढीची विनंती कंत्राटदाराने केल्यास त्यास दि.१५ मार्च, २०२० ते दि.१५ सप्टेंबर, २०२० अशी सहा महिन्यांची मूदतवाढ देण्यात येईल. या कालावधीसाठी त्याचेवर कोणतीही दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार नाही. मात्र कंत्राटदारास या कालावधीसाठी कोणतेही दावे (Claims) करता येणार नाहीत. भाववाढी संदर्भात कंत्राटातील अटी व शर्ती लागू राहतील. वरील सुविधा ज्या प्रकरणी दि.१५ मार्च, २०२० पूर्वी निविदा शर्तींचा अन्यथा भंग झाला नसेल अशा कंत्राटांना लागू राहतील."* असे नमूद आहे. • कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे ठेकेदार यांनी त्यांचे साईटवरील काम दि.२०/०३/२०२० रोजी पासून बंद केले होते. तदनंतर संपूर्ण देशात केंद्र- शासनाने दि.२३/०३/२०२० पासून लॉकडाऊन जाहिर केला होता. • तदनंतर मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचेकडील पत्र क्र. डी.सी. /कार्या-९ब१/८६९/२०२०, दि.०३/०५/२०२० रोजीचे आदेशास अनुसरून वरील काम पुन्हा सुरू करणेसाठी ठेकेदार यांना संस्थानचे जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/१८४/२०२०, दि.०९/०५/२०२० रोजीचे पत्राने कळविणेत आले आहे. • मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचे आदेशातील अटी व शर्तीमध्ये नमूद होते की, *बांधकाम साईटवर मजूर उपलब्ध असल्यासच काम सुरू करणेत यावे. बाहेरून कामगार आणता येणार नाही.* तथापी साईटवर परराज्यातील कामगार गावी निघून गेलेले असल्याने साई आश्रम येथिल कामे सुरू होवू शकली नाही. • ठेकेदार यांनी माहे मे-२०२० मध्ये उपलब्ध ६ ते ७ कामगारांमध्ये कामास सुरूवात केली. तदनंतर माहे जुलै-२०२० चे अखेर पासुन परराज्यातील काही कामगार कामावर आलेनंतर पुढील उर्वरीत रंगकाम व दुरूस्तीचे कामास सुरूवात केलेली होती. • तसेच लॉकडाऊनचे काळात मटेरीअल, दरवाजे इ. आवश्यक मटेरीअलची उपलब्धता देखील नव्हती. तसेच अनलॉक झाल्यानंतर देखील ब-याच कंपन्यांचे प्रोडक्शन कमी कामगारांमध्ये होत असल्याने मटेरीअल लवकर उपलब्ध होत नाही, असे ठेकेदार यांचे म्हणणे आहे.

पान ०३ वर

अ.क्र.	ठेकेदार यांनी नमूद केलेला मुद्दा	माहिती
	The Force Majeure Situation has been observed due to present Pandemic Covid-19. The State Government has imposed Epidemic Disease Act-1897 and 144 Act initiating from time to time reducing working time from 11:00 am to 5:00 pm only. In this Situation we have commenced working after taking due Covid precautions prescribed by the State and Central Government with available local labours that too in a meager strength. The GOI is fully aware of these challenges, and to address the labour exodus challenges, Hon. Finance Minister, Smt. Nirmala Sitharaman had declared extension of six (06) months to all Public Private Partnership contracts. The GR dated 29th July 2020 has been attached along with this letter.	• तसेच आता याही वर्षी माहे मार्च / एप्रिल -२०२१ मध्ये देशात व राज्यात कविड-१९ चे रूग्णांमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाल्याने माहे एप्रिल-२०२१ पासून देशात व राज्यात कडक निर्बंध लागू करणेत आले आहे. सदर निर्बंध दि.०५/०४/२०२१ पासून लागू करणेत आले असून ते दि.१५/०५/२०२१ पर्यंत वाढविणेत आले. तदनंतर माहे जून-२०२१ मध्ये सदर निर्बंध काही प्रमाणात शिथिल करणेत आले आहेत. कोविड-१९ मूळे सध्या सुरू असलेल्या कामाचे गतीवर त्याचा परीणाम झालेला आहे.
03.	It is also pertinent to record that we have faced difficulties in procuring Doors from M/s. Rajshri despite of giving them Material Advance they have delayed supply due to lack of their capacity of production and also they demanded an increase in the Supply rates after covid, Since we were working with the prestigious Sansthan we continued to procure from them without claiming any additional cost /claim to the Sansthan.	मटेरीअल खरेदीबाबत व त्याचे उपलब्धतेबाबत ठेकेदार यांनी पूर्व नियोजन करणे अपेक्षित आहे.
04.	As mentioned in the tender we had to only carry out Touch-Up Putty work. But after opening the cracks and the surface it was advisable to do Full Putty work. Since we were working with the prestigious Sansthan, We decided to do the Full putty work in majority to the Buildings without any additional cost/claim to the Sansthan. Therefore to execute this work it resulted in delay in handover of some parts of the building.	खोल्यांचे रंगकाम करतेवेळी असे निदर्शनास आले की, टचअप पुट्टी करुन फिनिशिंग होत नव्हती. त्यामुळे ठेकेदार यांनी फुल पुट्टी करण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार काम प्रगतीत आहे. त्यामुळे कामास काही प्रमाणात विलंब होत आहे.
05.	Due to Ramjan Festival, Durga Puja Festival there was painter and labour shortage on the site. Inspite of lesser strength of labour we managed the work in overtime.	रमजान व नवरात्रोत्सव सन-२०१९ तसेच सन-२०२० चे काळात साईटवर पेंटर व लेबर यांची संख्या काही प्रमाणात कमी झालेली होती. तथापी कामाचे दृष्टीने ठेकेदार यांनी कामगारांचे पूर्व नियोजन करणे अपेक्षित आहे.
06.	In F - building and remaining buildings it was observed that we needed to replace the water pipe internally and the connection of the same needs to be done externally which was not in our scope and is an extra item which was intimated to your good selves through our letter.	साई आश्रम भक्तनिवास इमारतीचे A, B, C, D, E, F व G या इमारतींचे टॉयलेट / बाथरुमकरीता G. I. पाईपलाईन टाकणेत आलेली आहे. F-इमारतीचे काम सुरु असतांना भिंतीच्या टाईल्स काढलेनंतर असे लक्षात आले की, सदर इमारतींची G. I. लाईन ब-याच ठिकाणी गंजलेली होती व पुढील ०१ ते ०२ वर्षाचे काळात ती खराब होवून ती लिकेज होण्याची शक्यता होती. त्यामुळे सदरहू ०७ इमारतींकरीता CPVC पाईपलाईन टाकणेचा प्रस्ताव दि.०४/०७/२०१९ चे मा. व्यवस्थापन समिती सभेत करणेत आला होता. त्यास निर्णय क्र.३१४ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

पान ०४ वर

अ.क्र.	ठेकेदार यांनी नमूद केलेला मुद्दा	माहिती
	As the additional work of Plumbing is done by the breaking of existing tiles, plaster above the concealed pipe, making of gabadha and repairing inside the duct upto down take line and removing the existing damaged G. I. pipes and then laying concealed CPVC pipe with fittings and connecting to existing down take line with Revamping the joint finishing. This work requires an additional time which has increased the handover time for the building.	या सर्व कार्यवाही दरम्यान सदर F-इमारतीचे कामास काही प्रमाणात विलंब झालेला आहे. याकरीता जवळपास ०२ महिने इतका कालावधी लागलेला आहे. A, B, C, D, E, F व G या ०७ इमारतींमध्ये निविदेतील स्कोपचे कामांव्यतिरिक्त जुनी G. I. पाईपलाईन काढून त्याठिकाणी नविन CPVC पाईपलाईन टाकणेचे वाढीव कामाचा समावेश झाल्याने सदर काम पूर्ण करणेसाठी ठेकेदार यांना काही अतिरीक्त कालावधी लागलेला आहे.
07.	As per our Bar chart submitted by us at the inception of the project we had considered work front availability simultaneously at 2 building to complete the project in stipulated period of 8 months. However we were allocated 1 building at a time which has lapsed the schedule time period. During the rush period, festive season and online booking of rooms, Sansthan has not handed the additional building to us for the works. The on-going festive season has made the further restriction of handover and availability of work front.	श्री साईबाबा समाधी शताब्दी काळात तसेच उत्सव व गर्दीचे काळात भक्तांची सुविधा व निवासव्यवस्था विचारात घेता व ऑनलाईन बुकिंग विचारात घेता ठेकेदार यांना कामासाठी एका वेळी फक्त एकच इमारत उपलब्ध करणेत आलेली आहे.
08.	Looking at the past experience and the availability of the work front made to us we require another 2 months to complete the balance work and hand over the site in totality. Further this time period can be reduced if we are allotted atleast 2 buildings simultaneously in future or at least 2 Blocks in two buildings. We understand your concerns and acknowledge the same for the early completion of the project. We have also understood the devotee's regular schedule and occupancy in the Bhaktaniwas. Our all the efforts and support in terms of labour deployment, material etc. will be made available according to the work front provided by your good selves. *Considering the above facts & reasons, we request your good selves to kindly approve the extension of time upto 15/09/2021 considering force majeure condition to complete the project in toto and handover the site with the best quality & workmanship.*	सदर काम लवकर पूर्ण करणेसाठी साई आश्रम भक्तनिवास विभागामार्फत ठेकेदारास वेळोवेळी आवश्यकतेनूसार किमान ०२ इमारती एकाच वेळेस कामासाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तथापी साई आश्रम भक्तनिवास येथे अल्प दरात चांगली राहणूयाची सुविधा, पार्किंग, जेवण, चहा आदि सुविधा उपलब्ध असल्यामुळे येथे वास्तव्यास साईभक्तांची कायम गर्दी असते. त्यामुळे ठेकेदार यांना कामासाठी जादा इमारती / खोल्या उपलब्ध करून देता आलेल्या नाहीत.

ठेकेदार यांनी वरील पत्रान्वये दि.१५/०९/२०२१ पर्यंत मुदतवाढ मागणी केलेली आहे. आता ठेकेदार यांचे साई आश्रम भक्तनिवास इमारतींचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्तीचे काम हे अंतिम टप्प्यात आहे. ठेकेदार यांचेमार्फत आता फक्त D-इमारतीचे काम बाकी असून ते प्रगतीत आहे.

सदर कामासाठी खालील कारणांमुळे विलंब झालेला आहे.

१) ठेकेदार यांनी सदर कामासाठी साईटवर पुरेसे मनुष्यबळ (पेंटर, सुतार, गवंडी इ.) लावलेले नसल्याने तसेच साईटवर आवश्यक मटेरीअल वेळेवर उपलब्ध न केल्याने कामास काही प्रमाणात विलंब झालेला आहे.

२) श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीत तसेच सदर काम सुरु झाल्यापासून म्हणजेच जून-२०१८ पासूनचे कालावधीत साई आश्रम भक्तनिवास येथिल इमारती कायम भरलेल्या होत्या तसेच ऑनलाईन बुकींग देखील जास्त होते. साई आश्रम येथे अल्प दरात चांगल्या खोल्या, पार्किंग इ. सुविधा असल्यामुळे येथील खोल्या कायम भरलेल्या असतात. त्यामुळे ठेकेदार यांना कामासाठी जादा इमारती / खोल्या उपलब्ध करून देता आलेल्या नाही.

पान ०५ वर

३) A, B, C, D, E, F, G या ०७ इमारतींमध्ये टॉयलेटची जुने G. I. पाईपलाईन काढून त्याठिकाणी नविन CPVC पाईपलाईन टाकणेचे मा. व्यवस्थपन समितीचे मंजूरीस काही अवधी लागलेला आहे तसेच या ०७ इमारतींचे मध्ये निविदेतील कामांव्यतिरिक्त CPVC पाईपलाईन टाकणे या वाढीव कामाचा समावेश झाल्याने सदर काम पूर्ण करणेसाठी काही अतिरीक्त कालावधी ठेकेदार यांना लागलेला आहे.

४) रंगकाम करतेवेळी असे निदर्शनास आले आहे की, टचअप पुट्टी करून रंगकामास फिनिशिंग येत नव्हती. त्यामुळे ठेकेदार यांनी फुल पुट्टी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे या कामी काही अतिरिक्त वेळ लागलेला आहे.

५) कोविड-१९ या संसर्गजन्य आजारामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना म्हणून संपूर्ण देशात केंद्र शासनाने दि.२३/०३/२०२० पासून लॉकडाऊन जाहिर केला होता. त्यामुळे परराज्यातील तसेच परिसरातील गावाचे कामगार निघून गेलेले असल्याने साईटवरील कामे वेळेत पूर्ण होऊ शकली नाही. तसेच लॉकडाऊनचे कालावधीत अनेक कंपन्या बंद असल्याने वेळेत आवश्यक मालाचा पुरवठा देखील होऊ शकला नाही.

६) तसेच आता याही वर्षी माहे मार्च / एप्रिल -२०२१ मध्ये देशात व राज्यात काविड-१९ चे रूग्णांमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाल्याने माहे एप्रिल-२०२१ पासून देशात व राज्यात कडक निर्बंध लागू करणेत आले आहे. सदर निर्बंध दि.०५/०४/२०२१ पासून लागू करणेत आले असून ते दि.१५/०५/२०२१ पर्यंत वाढविणेत आले होते. तदनंतर माहे जून-२०२१ मध्ये सदर निर्बंध काही प्रमाणात शिथिल करणेत आले आहेत. तसेच शनिवार व रविवार विकेंड लॉकडाऊन सध्या सुरू आहे. कोविड-१९ मूळे सध्या सुरू असलेल्या कामाचे गतीवर त्याचा परीणाम झालेला आहे.

७) कोविड-१९ मुळे उदभवलेल्या महामारीच्या संकटामूळे साईटवरील कामात आलेल्या अडचणींमूळे ठेकेदार यांनी महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परीपत्रक क्र.संकिर्ण १०२०/प.क्र.१००/२०२०/व्यय-१२, दि.२९/०७/२०२० चे परीपत्रकाचे अनुषंगाने ठेकेदार यांनी मुदतवाढ मिळणेची विनंती केलेली आहे. सदर शासन निर्णयानुसार शासकिय कामाच्या पूर्णत्वासाठी सहा (०६) महिने मूदतवाढ देणेची तरतूद आहे.

विभागाचा अभिप्राय:- ठेकेदार यांचे पत्रातील वरील बाबींचे अवलोकन व कामातील अडचणींचा विचार करता सदर काम हे दि.३१/१०/२०१९ अखेर दिलेल्या वाढीव मुदतीत पूर्ण झालेले नाही. सदर कामात झालेल्या विलंबासाठी ठेकेदार यांना निविदा शर्तीनुसार रु.१०००/- प्रती दिवसाप्रमाणे त्यांचे चालू देयकांमधून दि.१८/०१/२०२१ अखेर दंडापोटी एकूण रक्कम रू.४,७७,०००/- मात्र कपात करणेत आलेली आहे.

ठेकेदार यांनी सदर काम पूर्ण करणेसाठी दि.१२/०७/२०२१ चे पत्रान्वये दि.१५/०९/२०२१ अखेरपर्यंत मूदतवाढ मिळणेची विनंती केलेली आहे. सदर काम हे आता अंतिम टप्प्यात आहे. ठेकेदार यांचे पत्रातील वरील मुद्दे व त्यावरील माहिती यांचे अवलोकन करता त्यांना सदर काम पूर्ण करणेसाठी दि.१५/०९/२०२१ अखेर दुसरी व शेवटची मूदतवाढ कुठलीही दरवाढ न देण्याचे अटीवर देणेबाबत मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णय होणे आवश्यक आहे.

प्रस्ताव:- तरी साई आश्रम भक्तनिवास येथिल इमारतींचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती करणे कामाचे ठेकेदार ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मुंबई यांना काम पूर्ण करणेसाठी दि.१५/०९/२०२१ अखेर दुसरी व शेवटची मूदतवाढ कुठलीही दरवाढ न देण्याचे अटीवर मंजूर करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

19/07/21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

19.7 19/07

विषय क्र.- ४४

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ
मालमत्ता विभाग

विषय – कान्होबा उर्फ कानिफनाथ देव देवस्थान ट्रस्ट मढी,ता.पाथर्डी,जि.अहमदनगर यांना शिर्डी संस्थान परिसरात माहिती केंद्राकरीता इमारत उपलब्ध करुन देणेबाबत श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर, माजी अध्यक्ष,कान्होबा उर्फ कानिफनाथ देव देवस्थान ट्रस्ट,मढी यांचेकडील दि.२९/१०/२०२० रोजीचे पत्र.

टिपणी -

अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना - श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर,माजी अध्यक्ष,कान्होबा उर्फ कानिफनाथ देव देवस्थान ट्रस्ट,मढी, ता.पाथर्डी यांनी मा.न्यायमुर्ती श्री.श्रीकांत आणेकर साहेब,प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय तथा अध्यक्ष, तदर्थ समिती,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना उद्देशून लिहीलेल्या दि.२९/१०/२०२० रोजीचे पत्रान्वये "श्री साई दरबारी अन्य देवस्थानांना प्रचार प्रसाराची संधी देण्याची आपली योजना स्वागतार्ह आहे. त्याबद्दल आपले व समितीचे हार्दिक अभिनंदन. मी साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे विश्वस्त असतांना तत्कालीन अध्यक्ष कै.जयंतराव ससाणे यांच्याकडे ही योजना प्रस्तुत केली होती. तथापि २७ मार्च २०१२ रोजी उच्च न्यायालयाने विश्वस्त मंडळाला कार्यमुक्त केल्याने ही योजना बारगळली. पाथर्डी तालुक्यातील मोहटा येथील जगदंबा देवस्थानला आपण प्रचार प्रसार माहिती केंद्र मंजूर केल्याचे समजते. त्याबद्दल मला अत्यानंद होत आहे. त्याच धर्तीवर पाथर्डी तालुक्यातील मढी येथील श्री कान्होबा उर्फ कानिफनाथ देव ट्रस्ट या देवस्थानला केंद्र मंजूर करण्यात यावे. २०१० ते २०१५ या कालावधीत मी उपरोक्त देवस्थानचा विश्वस्त,कार्याध्यक्ष व अध्यक्ष म्हणून कार्यरत होतो. कान्होबा उर्फ कानिफनाथ देव ट्रस्ट नोंदणीकृत रजिष्टर नंबर ई-८९/१९५४ चा न्यास आहे. कान्होबा उर्फ कानिफनाथ देवाने इ.स.१० व्या शतकात फाल्गुन मध्य रंगपंचमीला संजीवन समाधी घेतली. चैतन्य कानिफनाथ देवाने आपली समग्र हयात दीन-दलीत,भटक्या व निमभटक्या समाजाच्या जीवब्रम्ह सेवेत समर्पीत केली. त्यामुळे अखील भारतीय भटक्या व निमभटक्या जाती जमातीचे आराध्य दैवत बनले आहे. अठरा पगड जाती जमातीच्या भक्तांनी मंदीर उभारणीकामी मदत केली आहे. म्हणूनच या तीर्थक्षेत्राला "भटक्याची पंढरी" म्हणून संबोधले जाते. त्याचप्रमाणे विकोपास गेलेले तंटे या ठिकाणी जातपंचायतद्वारे चैतन्य कानिफनाथांना साक्षी ठेवून मिटवले जातात. त्यामुळे हे तीर्थक्षेत्र त्यांचे सर्वोच्च न्यायालय समजले जाते. रंगपंचमीला भरणारा गाढवांचा बाजार संपूर्ण देशात प्रसिध्द आहे. दरवर्षी रंगपंचमी यात्रा काळात १५ ते २० लाख भाविक दर्शनासाठी येत असतात. गुढी पाडवा प्रकटदिनाला देखील भाविक मोठया संख्येने हजेरी लावतात. या सर्व बाबींचा विचार करुन मढी येथील कान्होबा उर्फ कानिफनाथ देव ट्रस्टला प्रचार प्रसार माहिती केंद्र कार्यालयासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या परिसरात मोहटा देवीच्या धर्तीवर इमारत उपलब्ध करुन द्यावी,ही विनंती," असेबाबत विनंती केलेली आहे.

यापूर्वी श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास,मोहटे,ता.पाथर्डी यांना शिर्डी संस्थान परिसरात माहीती केंद्राकरीता जागा वापरास देणेसंबंधात मा.तदर्थ समितीचे दि.२८/०८/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.४३० प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"सदर प्रस्तावाबाबत समिती सदस्य सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, विषय पत्रिकेवरील विषय हा मुलत: ११ महिने व सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील अशा मासिक भाडेदराने आकारणी संदर्भात आहे. अशा प्रस्तावास मंजूरी देण्यासाठी संस्थानकडून स्वतंत्र धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. संस्थानकडून अशा प्रकारे कोणत्याही धार्मिक संस्थांना जागा आजपर्यंत देण्यात आलेली नाही. जर अशा प्रकारे प्रस्ताव मंजूर केल्यास इतर धार्मिक संस्थांच्या मागण्या देखील येतील व त्या नाकारता येणार नाही. सबब धोरणात्मक ठराव केल्याशिवाय सदर प्रस्तावाबाबत निर्णय करणे विधिवत नाही. तरी इतर धार्मिक देवस्थानांना जागा देण्याबाबत प्रथम धोरण व नियमावली निश्चित करावी व त्या संदर्भात निर्णय झाल्यानंतर सदर प्रस्तावाचा विचार करावा. मात्र समिती सदस्यांचे असे लक्षात आले की, संस्थान मालकीच्या विविध मालमत्ता व्यक्ती संस्था इ. यांना कुठलेही धोरण नसतांना नाममात्र दरावर दिल्या आहेत. अशा परिस्थितीत जर अहमदनगर जिल्हयातील एक नोंदणीकृत न्यास अशी मागणी भक्तांना माहिती व्हावी या उद्देशाने करत असेल तर धोरण व नियम नाही असे दाखविणे योग्य नाही.

यावर तदर्थ समितीचे सदस्य श्री.स्वामी साहेब यांनी असे प्रतिपादन केले की,सदरचा विषय दरमहा नाममात्र भाडे रु.५००/- (वीज बील व पाणीपट्टी व्यतिरिक्त) आकारुन मंजूरी देण्यात यावी, या विषयावर संस्थान प्रशासनाने कोणताही लेखी आक्षेप नोंदविलेला नाही. यावर सदस्य सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुन्हा प्रतिपादन केले की, संस्थानची जागा इतर धार्मिक संस्थांना देणेबाबत धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतर सदरचा प्रस्ताव मंजूर करणे योग्य राहील. यावर श्री.स्वामी साहेब यांनी असे प्रतिपादन केले की,संस्थान प्रशासनाने याबाबत सर्व समावेशक

असा अभ्यासपुर्वक धोरणात्मक निर्णयाचा प्रस्ताव तदर्थ समितीपुढे आणावा. तदनंतर पुढे त्यावर यथायोग्य निर्णय घेता येईल.

या विषयावर चर्चा करतांना अध्यक्ष व श्री.स्वामी साहेब यांनी असा निर्णय घेतला की, श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे यांना शिर्डी संस्थान परिसरात माहिती केंद्र सुरु करण्याकरीता विभागाच्या अभिप्रायामध्ये दर्शविलेली क्रं.२ मधील सेवाधाम इमारतीतील बाहेरील बाजूची १०x१० फुट मोजमापाची खोली क्रं.५७ ही दरमहा नाममात्र भाडे रु.५००/- (वीज बील व पाणीपट्टी व्यतिरिक्त) आकारुन प्रत्येकी ११ महिन्याच्या करारानंतर नुतनीकरणाच्या अटीवर ११ वर्षासाठी देण्यास मंजूरी देण्यात आली.

सदरचा श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यासास माहिती केंद्र सुरु करण्यासाठी सेवाधाम येथील वरील जागा देण्याचा निर्णय हा तदर्थ समितीचे अध्यक्ष व एक सदस्य यांचे २x१ मताधिक्याने घेण्यात आला." असेबाबत निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयात उक्त जागा दरमहा नाममात्र भाडे रु.५००/- आकारुन प्रत्येकी ११ महिन्याच्या करारानंतर नुतनीकरणाच्या अटीवर ११ वर्षांसाठी देण्यास मंजूरी देण्यात आली असलेबाबतचा असा उल्लेख आहे.

तथापि श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

मात्र उपरोक्त निर्णयात उक्त जागा वापरासाठी ११ महिन्यांच्या करारानंतर नुतनीकरणाच्या अटीवर ११ वर्षांसाठी वापरास देण्यास मंजूरी देण्यात आलेली असलेचे दिसून येत असलेने सदर कलमातील तरतुदीनुसार विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देता येणार नाही. सदरची बाब मा.तदर्थ समितीचे निदर्शनार्थ व निर्णयार्थचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. त्यावर निर्णय होणे बाकी आहे.

अर्जदार श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर,माजी अध्यक्ष,कान्होबा उर्फ कानिफनाथ देव देवस्थान ट्रस्ट,मढी, ता.पाथर्डी यांनी उपरोक्त पत्रात कान्होबा उर्फ कानिफनाथ देव देवस्थान ट्रस्टला प्रचार प्रसार माहिती केंद्र कार्यालयासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या परिसरात मोहटा देवीच्या धर्तीवर इमारत उपलब्ध करुन द्यावी, अशी विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय – सदरचा अर्ज/प्रस्ताव कान्होबा उर्फ कानिफनाथ देव देवस्थान ट्रस्ट,मढी,ता.पाथर्डीचे अध्यक्ष अथवा ट्रस्टी यांनी केलेला नसून श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर,माजी अध्यक्ष, कान्होबा उर्फ कानिफनाथ देव देवस्थान ट्रस्ट,मढी, ता.पाथर्डी यांनी केलेला आहे. त्यांचे विनंतीनुसार कान्होबा उर्फ कानिफनाथ देव देवस्थान ट्रस्ट,मढी,ता.पाथर्डी यांना शिर्डी येथे संस्थान परिसरात माहीती केंद्राकरीता इमारत/जागा उपलब्ध करुन दिल्यास तशी प्रथा पडली जाईल व इतर देवस्थान ट्रस्ट देखील संस्थान परिसरात त्यांचे माहीती केंद्रासाठी जागा वापरास मिळणेकामीची मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी संस्थानचे धोरण निश्चितीची आवश्यकता आहे.

प्रस्ताव - श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर,माजी अध्यक्ष,कान्होबा उर्फ कानिफनाथ देव देवस्थान ट्रस्ट,मढी, ता.पाथर्डी यांचे विनंतीनुसार कान्होबा उर्फ कानिफनाथ देव देवस्थान ट्रस्टला प्रचार,प्रसार माहीती केंद्र कार्यालयासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे परिसरात इमारत/जागा वापरास उपलब्ध करुन देणे अथवा न देणेच्या निर्णयार्थ सादर.

13.1.21.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ४५

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ

मालमत्ता विभाग

विषय – महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील शेती महामंडळाची जमीन संस्थानला कायम खरेदी मिळणेकामीचा सुधारीत प्रस्ताव सादर करणेबाबत.

टिपणी -

अधिनियमातील तरतूद – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविणेच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,असे नमूद आहे.

प्रस्तावना – उपरोक्त विषया संदर्भात मा.तदर्थ समितीचे दि.०९/०६/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.३२७ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला. शेती महामंडळाची जमीन संस्थानला खरेदी करावयाची झाल्यास या जमीनीचा उपयोग कोणत्या उपक्रम/योजनेसाठी करणार त्याचे नियोजन मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करावे,असे ठरले."

तदनुषंगाने खालीलप्रमाणे फेरप्रस्ताव सादर करणेत येत आहे.

पूर्वपिठीका- संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०२/२००९ रोजीच्या सभेत महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या लक्ष्मीवाडी मळया अंतर्गत येणा-या जमीनी विविध कारणांसाठी संस्थानने घेणेबाबतचा निर्णय क्रं.१६५ झालेला आहे. त्या अनुषंगाने मा.कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/भूसंपादन/२१२६ /२००९ दि.२०/०२/२००९ अन्वये खालील गावांचे त्यांचेपुढे दर्शविलेले क्षेत्र संस्थानला खरेदी देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

अ.नं.	गावाचे नाव	क्षेत्र हे.आर
१	निमगाव-को-हाळे	६३.०९
२	कनकुरी	०६.६५
३	शिर्डी	११.८२
४	निमगाव-को-हाळे (जी.आर.बी.वाडी)	०५.९५
५	साकुरी	१३.८२
६	सावळविहीर बु.	७५.७०
७	सावळविहीर खु.	३३.६७
८	चांदेकसारे/सोनेवाडी	१५३.७३
	एकूण	**३६४.४३**

उपरोक्त मागणी केलेल्या क्षेत्राबाबत शेती महामंडळाचे स्थानिक अधिकारी यांचेकडेस समक्ष चौकशी केली असता व सदर क्षेत्राचा ताळमेळ घेतला असता त्यापैकी काही गावातील काही क्षेत्र शेती महामंडळाने शासनामार्फत खंडकरी शेतक-यांना वाटप केलेले असलेचे व काही क्षेत्र वाटप करावयाचे प्रस्तावित असलेचे त्यांनी सांगितले. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी खाली नमूद केलेल्या गावांचे त्यांचेपूढे दाखविलेले क्षेत्र संस्थानला कायमस्वरुपी खरेदी करणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडेस सादर करणेकामी व त्याची प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन,मुंबई यांचेकडेस सादर करणेकामीच्या निर्णयार्थ प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीच्या सभेत सादर करण्यात आला. त्यात निर्णय क्रं.७४५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे निमगाव-को-हाळे,शिर्डी,साकुरी,सावळविहीर बु., सावळविहीर खु. व चांदेकसारे/सोनेवाडी येथील शेती महामंडळाची ३०१.८४ हेक्टर जमीन दुय्यम निबंधक यांनी कळविलेल्या रु.३६९,२८,९०,५३०/- मात्र मुल्यांकनाप्रमाणे खरेदी करणेस मान्यता देण्यात आली व तसा प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत,पुणे व मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन,मुंबई यांचेकडे सादर करणेत यावा,असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे सुधारीत प्रस्तावात खालील जमीनी दर्शविण्यात आलेल्या होत्या.

अ.नं.	गावाचे नाव	क्षेत्र हे.आर
१	निमगाव-को-हाळे	७१.०५
२	शिर्डी	११.६२
३	साकुरी	१३.८२
४	सावळविहीर बु.	७५.६१
५	सावळविहीर खु.	३३.६७
६	चांदेकसारे/सोनेवाडी	९६.०७
	एकूण	३०१.८४

उपरोक्त निर्णय क्रं.७४५ प्रमाणे उपरोक्त जमीनी संस्थानला कायमस्वरुपी खरेदी मिळणेकामीचा प्रस्ताव इकडील जा.नं. एसएसएसटी/मालमत्ता/३८९८/२०१६ दि.२४/१०/२०१६ अन्वये मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांचेकडे सादर करणेत आला व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करणेत आलेला होता.

तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीच्या सभेत खालीलप्रमाणेच्या सुधारीत प्रस्तावास मान्यता देणेत आलेली आहे.

सुधारीत प्रस्ताव- वरील जमीनींची संस्थानचे मा.अध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी यांनी दि.२८/०३/२०१७ रोजी समक्ष पाहणी केली असता त्यापैकी खालील नमूद केलेल्या जमीनी या संस्थानच्या जमीनीचे लगत असून सन २०१७-१८ हे श्रीं चे समाधी शताब्दी वर्ष असल्याने या कालावधीत साईभक्तांच्या गर्दीत मोठया प्रमाणात वाढ होण्याची शक्यता असलेने त्यासाठीचे नियोजन करणे, साईभक्तांना अन्न,निवारा,वैद्किय सेवा या मुलभूत सोयी-सुविधा विनासायास,विनाविलंब उपलब्ध व्हाव्यात तसेच साईभक्तांचे मनोरंजनासाठी सांस्कृतिक केंद्र उभारणे,उद्यानांची उभारणी करणे,वाहनतळ व्यवस्था करणे व प्रसादालयाचे विस्तारीकरण करणे यासाठी सदर जमीनींची संस्थानला तातडीने खरेदी करणे आवश्यक असलेचे मत झालेले आहे.

त्यासाठी खालील नमूद केलेल्या गावांचे त्यांचेपुढे दर्शविलेले क्षेत्र संस्थानला तातडीने कायम खरेदीने मिळणेकामी सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या.पुणे यांचेकडेस सादर करता येईल.

अ.नं.	गावाचे नाव	क्षेत्र हे.आर
१	निमगाव-को-हाळे	४०.७३
२	शिर्डी	११.६२
	एकूण	५२.३५

उपरोक्त क्षेत्र संस्थानला खालील विविध कारणांसाठी आवश्यक असलेबाबत प्रस्तावात नमूद करता येईल.

१) उपरोक्तपैकी मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.८५ या जमीनीलगत संस्थानचे प्रसादालय आहे. त्या प्रसादालयात लाडू निर्मिती व्यवस्था आहे. लाडू निर्मितीसाठी १) विभाग प्रमुख कार्यालय २) स्टोअर ३) ऑनलाईल चक्की ४) पुरुष स्वच्छतागृह, स्त्री स्वच्छतागृह ५) एल.पी.जी.शेगडया त्याठिकाणी फलाईंग पॅन असतात. ६) बुंदी सुकविणे. ७) बुंदीपासून लाडू तयार करणे. ८) लाडू सुकविणे ९) मेंटेनन्स रुम १०) कर्मचा-यांचे कपडे बदलण्याची जागा ११) कंट्रोल कॅबिन सुपरवायझर कार्यालय १२) वॉशिंग प्लॅन्ट तसेच एल.पी.जी.गॅससाठी स्वतंत्र गोडावून इ.साठी किमान ०.३० आर जागा लागते. १३) लायटींग रुम १४) पार्कींग इ.साठी संस्थानला उक्त सर्वे नं.८५ मधील पुरेशा जागेची आवश्यकता आहे व उर्वरित क्षेत्रात

२) साईभक्तांना जास्तीत जास्त निवासस्थाने उपलब्ध करुन देणे.

३) तात्पुरत्या स्वरुपाच्या निवासव्यवस्थेसह कॅम्पिंग ग्राऊंड.

४) पालखी तळ.

५) वाहनतळ व कॅम्पिंग ग्राऊंड इ.साठी सदर क्षेत्राची संस्थानला आवश्यकता आहे.

तसेच उपरोक्त मौजे निमगाव-को-हाळे व शिर्डी येथील जमीनींच्या किंमतीबाबतची माहीती मा.दुय्यम निबंधक,राहाता यांचेकडून प्राप्त करुन घेतली असून त्याप्रमाणे उपरोक्त जमीनींची एकूण किंमत रक्कम रु.१५७,२४,४३,०००/- (अक्षरी रु.एकशे सत्तावन्न कोटी चोवीस लाख त्रेचाळीस हजार मात्र) इतकी होत आहे. उपरोक्त गावांचे त्यांचेपुढे दर्शविलेले क्षेत्र संस्थानला तातडीने कायम खरेदी मिळणेकामी सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय

संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचेकडेस सादर करणेकामी मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई यांना सादर करणेच्या मान्यतेसाठी आणि उक्त जमीनींचे मा.दुय्यम निबंधक,राहाता यांनी कळविलेल्या मुल्यांकनाप्रमाणे खरेदी करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला.

त्यात निर्णय क्रं.३२४ प्रमाणे **"महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी कायम खरेदी करणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडेस सादर करणेत येवून त्याची प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई यांना देणेस व सदरहू जमीन मा.दुय्यम निबंधक,राहाता यांनी कळविलेल्या मुल्यांकनाप्रमाणे खरेदी करणेस मान्यता देण्यात आलेली आहे."**

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयाचे अनुषंगाने महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील खालील नमूद केलेप्रमाणे मौजे निमगांव-को-हाळे येथील ४०.७३ हेक्टर व मौजे शिर्डी येथील ११.६२ हेकटर असे एकूण ५२.३५ हेक्टर इतके क्षेत्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी कायमस्वरुपी खरेदी मिळणेकामीचा प्रस्ताव इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/५७७/२०१७ दि.०२/०५/२०१७ अन्वये ई-मेलद्वारे तसेच इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/७०३/२०१७ दि.०९/०५/२०१७ अन्वये मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडेस सादर करणेत आलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत, पुणे यांनी त्यांचेकडील जा.नं.शे.व्य./श्री सा.सं.वि.शि/ज.मा./लक्ष्मी/१७-१८/१५६ दि.०३/०५/२०१७ अन्वये महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणा कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ यातील कलम २८-१ अ अ पोट कलम १ अन्वये महामंडळास भोगवटा मुल्यावर देण्यात आली आहे. तसेच कलम (३)-(अ) अन्वये जमीन माजी खंडकरी शेतक-यांना वाटपाचे काम चालू आहे. तथापि, वरील जमीनीपैकी मौजे निमगाव-को-हाळे व सावळीविहीर येथील जमीनीबाबत काही माजी खंडक-यांनी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ,औरंगाबाद येथे याचिका क्रं.५८८६/२०१४ दाखल करुन दि.०८/०५/२०१४ रोजी जमीन वाटपास अंतरिम स्थगिती आदेश मिळविला आहे. सदर प्रकरणात मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद येथून स्थगिती आदेशाबाबत अंतिम निर्णय लागल्याशिवाय मौजे निमगाव-को-हाळे व शिर्डी येथील जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना खरेदीने उपलब्ध करुन देणेबाबत पुढील कार्यवाही करता येत नाही,असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

तद्नुषंगाने श्री साईबाबांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेतर्फे दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत श्री साईबाबा समाधी वर्ष साजरे केले जाणार आहे. या उत्सवासाठी देश विदेशातील विविध ठिकाणाहून साईभक्त शिर्डी येथे मोठया प्रमाणात येणार आहेत. भविष्यात या उत्सवासाठी होणा-या साईभक्तांच्या गर्दीच्या दृष्टिने समाधी शताब्दी महोत्सव आयोजनासाठी व विविध प्रकल्पांसाठी आणि साईभक्तांना पायाभूत सोयी-सुविधांसाठी संस्थानला संस्थानच्या जमीनींचे अत्यंत लगत असलेली शेती महामंडळाकडील मौजे शिर्डी व निमगाव-को-हाळे हद्दीतील जमीन क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर ची आवश्यकता आहे. यास्तव शेती महामंडळाचे जमीनी संबंधात मे.उच्च न्यायालय,खंडपीठ, औरंगाबाद यांचे कोर्टात श्री.प्रकाश तेजमल खाबीया व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर हे रिट पिटीशन नं.५८८६/२०१४ चे दाखल असून त्यात मे.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांनी दिलेला स्थगिती आदेश उठविणेकामी व उपरोक्त जमीनी संस्थानला कायम खरेदी करणेस परवानगी मिळणेकामी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील रिट पिटीशन नं.५८८६/२०१४ मध्ये सिव्हील ॲप्लीकेशन (इंटरव्हेंशन अर्ज) क्रं.१२५९६/२०१७ चे दाखल करणेत आले.

प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांनी त्यांचेकडील WRIT PETITION NO.5886 OF 2014 WITH CIVIL APPLICATION NO 12596 OF 2017 IN WRIT PETITION 5886 OF 2014 मध्ये दि.०९/१०/२०१७ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

ORAL ORDER :

Shri Kulkarni, learned Counsel for the petitioners, upon instructions, makes motion for withdrawal of the petition, with a prayer for issuance of direction to the respondent Collector to decide the representation in relation to the allotment of land, which was earlier claimed to have been owned by the petitioners or their ancestors.

2. Liberty is granted to the petitioners to file fresh representation in relation to the land claimed to have been owned by them to the concerned Competent Authority for its allotment. If such representation is made, the same be expeditiously decided by the respondent-Collector or the Competent Authority.

3. With above observations, the petition stands dismissed as withdrawn.

4. In view of dismissal of the petition, pending Civil Application stands disposed of.

मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचे उपरोक्त निर्णयामुळे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत, पुणे यांच्या लक्ष्मीवाडी मळा येथील संस्थानने कायम खरेदी करुन मिळणेकामी मागणी केलेल्या जमीनींचे संदर्भात वाद संपुष्टात आलेले आहेत. परिणामी स्थगिती आदेश रद्द झालेले आहेत. त्यामुळे मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडील उपरोक्त पत्र जा.क्रं.शे.व्य./श्री.सा.सं.वि.शि./ज.मा./लक्ष्मी/१७-१८/१५६ दि.०३/०५/२०१७ चे निरर्थक झालेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजी झालेल्या सभेतील विषय नं.१ दि.२३/१०/२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. यातील **निर्णय क्रं.९१४** अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

दि.२३/१०/२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या,त्यास मान्यता देण्यात आली.

(३) निर्णय क्रं.९००

"यावर सविस्तर चर्चा होऊन,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील जमीन संस्थानला कायमस्वरुपी खरेदी करणेकामी जागेची पाहणी करुन,त्या जागेचे स्थान,उपयुक्तता,त्यावरील अतिक्रमण याविषयी खात्री करुन सविस्तर फेरप्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा,असे ठरले."

याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन,दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३२४ अन्वये महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांचे ५२.३५ हेक्टर इतके क्षेत्र संस्थान जमीनींच्या अत्यंत लगत असलेने सदरची जमीन संस्थानसाठी खरेदी करणेचे ठरलेले आहे. त्या निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी."

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाकडील रिट पिटीशन नं.५८८६/२०१४ व सिव्हील ॲप्लिकेशन नं.१२५९६/२०१७ मधील दि.०९/१०/२०१७ रोजी निर्गत केलेल्या आदेशाचा संदर्भ देवून मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत,पुणे यांना त्यांचेकडेस यापूर्वी इकडील जा.नं. एसएसएसटी/ मालमत्ता/७०३/२०१७ दि.०९/०५/२०१७ चे प्रस्तावा अन्वये संस्थानने मागणी केलेली लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील शेती महामंडळाची मौजे निमगाव-को-हाळे येथील ४०.७३ हेक्टर व शिर्डी येथील ११.६२ हेक्टर अशी एकूण ५२.३५ हेक्टर जमीन संस्थानला कायमस्वरुपी खरेदी मिळणेकामी इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/ ५३४३/२०१७ दि.०४/०१/२०१८ अन्वये मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचेकडेस पुन:श्च प्रस्ताव सादर करणेत आला

व त्याची प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई यांना व मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस सादर करणेत आलेली आहे.

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.शेव्य/श्री.सा.स.वि.शि./लक्ष्मीवाडी/१८-१९/७७७ दि.०३/०८/२०१८ अन्वये इकडेस पत्र सादर केले असून त्यात त्यांनी "सदरचा विषय हा संचालक मंडळाचे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. यामध्ये संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थान यांना साईभक्तांच्या विविध प्रयोजनासाठी सदरची जमीन विक्री करणेबाबत The Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition,Rehabilitation and Resettlement Act २०१३ अन्वये व शासन निर्णय क्रं.संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ मे २०१५ यातील मार्गदर्शक तत्वांना अधीन राहून मौजे निमगाव-को-हाळे व मौजे शिर्डी येथील गट नंबरच्या क्षेत्राचे मुल्यांकन निश्चित करुन मिळण्यासाठी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना कळविले होते. तसेच त्यानंतरही दि.०१/०२/२०१८ व दि.२०/०२/२०१८ रोजी पुन्हा त्यांना सदर जमीनीचे मुल्यांकन पाठविण्याबाबत कळविले होते.

याबाबत मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.मह/कार्या.जमीन २ब/११०८/२०१८ दि.२०/०५/२०१८ अन्वये या कार्यालयास कळविण्यात आले आहे की शासन निर्णय क्रं.संकीर्ण/०३/ २०१५/प्र.क्र.३४/अ-२ दि.१२ मे २०१५ पाहता सदर शासन निर्णयात जमीन थेट खरेदी पध्दतीने खाजगी वाटाघाटीने सिंचन व इतर प्रकल्पासाठी द्यावयाची असल्यास मोबदला निश्चितीसाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीने मोबदला रक्कम निश्चित करावी असे स्पष्ट नमूद केले आहे व त्याची कार्यपध्दती नमूद केली आहे. त्यानुसार The Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition,Rehabilitation and Resettlement Act २०१३ अन्वये शासन निर्णय संकीर्ण ०३/२०१५ प्र.क्र.३४/अ-२ दि.१२/०५/२०१५ व एलक्युएन ०१/२०१७/प्र.क्र.१२ अ-२ दि.२५ जानेवारी २०१७ नुसार खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव संबंधीत खरेदीदार यंत्रणा यांनी

जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडे विहीत नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. तरी आपणास विनंती करण्यात येते की, जिल्हाधिकारी,अहमदनगर यांनी सुचित केल्याप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,लक्ष्मीवाडी मळयातील मौजे निमगाव-को-हाळे व मौजे शिर्डी येथील क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर जमीन मागणीचा प्रस्ताव विहीत नमुन्यामध्ये जिल्हाधिकारी,अहमदनगर यांना पाठविण्यात यावा. सदर जमीनीचे मुल्यांकन निश्चित होवून अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येईल." असेबाबत इकडेस कळविलेले होते.

तदनुषंगाने इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/२६२९/२०१८ दि.३०/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांना "श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या तयारीसाठी मा.ना. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दि.०३/०५/२०१७, दि.०६/०७/२०१७ व दि.०१/०२/२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचे मालकीचे लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील ५२ हेक्टर ३५ आर जमीन संस्थानला कायम खरेदी मिळणेबाबतच्या विषयावर चर्चा करण्यात आलेली असून दि.०१/०२/२०१८ रोजीच्या बैठकीत मा.ना.मुख्यमंत्री महोदय यांनी संस्थानने मागणी केलेली शेती महामंडळाकडील जमीन क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर इतके शासनाचे मुद्रांक विभागाच्या बाजारमुल्य तक्त्याप्रमाणे मुल्यांकन करण्यात यावे,असेबाबत स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे उक्त जमीनीचे मुल्यांकन भुमी संपादन अधिनियम २०१३ प्रमाणे व शासन निर्णय क्रं.संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ दि.१२/०५/२०१५ रोजीच्या निर्णयातील मार्गदर्शक तत्वांना अधीन राहून शासन परिपत्रक क्रं.एलक्युएन-०१/२०१७/प्र.क्र.१२ /अ-२ दि.२५ जानेवारी २०१७ नुसार खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडेस विहित नमुन्यात सादर करणेबाबतचा प्रश्न उदभवत नाही.

शेती महामंडळाकडील उपरोक्त क्षेत्र हे हरित विभागात (ग्रीन झोन) समाविष्ट असून भविष्यात संस्थानला सदर क्षेत्राचे रहिवास विभागात (येलो झोन) मध्ये रुपांतर करावे लागणार आहे. त्यासाठी संस्थानला मोठया प्रमाणात अधिमुल्य रक्कम (प्रिमीयम) शासनाला अदा करावे लागणार आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी ही धार्मिक संस्था असून धर्मादाय ट्रस्ट आहे. सदर ट्रस्टद्वारे लोकोपयोगी सार्वजनिक उपक्रम राबविले जातात. तरी मा.ना.मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेल्या निर्देशानुसार संस्थानने मागणी केलेले शेती महामंडळाचे मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे व मौजे शिर्डी येथील एकूण क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर इतके शासनाचे मुद्रांक विभागाच्या बाजारमुल्य दर तक्त्याप्रमाणे कायम खरेदी मिळणेकामी विनंती करणेत आली व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस सादर करुन त्यात मा.ना.मुख्यमंत्री महोदय यांनी दि.०१/०२/२०१८ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार उक्त क्षेत्राचे मुद्रांक विभागाच्या बाजारमुल्य तक्त्याप्रमाणे मुल्यांकन करणेबाबत त्यांचेमार्फत मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांना आदेश होणेकामी विनंती करणेत आली व प्रत मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडे सादर करणेत आलेली आहे.

तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील आयत्या वेळचा विषय नं.२७ निर्णय क्रं.४७४ प्रमाणे शेती महामंडळाची जमीन शासनाचे बाजारमुल्य दरानुसार खरेदी करण्यासाठी पाठपुरावा करणेत यावा,असा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाचे अनुषंगाने इकडील दि.०२/१०/२०१९ रोजीच्या कार्यालयीन टिपणीप्रमाणे मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांना पुन:श्च स्मरणपत्र सादर करणेत आलेले असून प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई व मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांना सादर करणेत आलेली आहे. सदरचा प्रस्ताव अद्याप महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचे कार्यालयाकडे प्रलंबित आहे.

तथापि उपरोक्त प्रस्तावातील काही जमीनी खंडकरी शेतकरी यांनी शासनाकडे मागणी केलेल्या असल्याचे समजते. तदनुषंगाने मौजे निमगाव-को-हाळे येथील शेती महामंडळाच्या मालकीच्या संस्थानच्या जमीनीलगत असलेल्या व खंडकरी शेतकरी यांनी मागणी न केलेल्या जमीनींबाबतची माहिती मा.स्थावर व्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता यांचे कार्यालयातून समक्ष प्राप्त करुन घेतली असता त्यात खालील नमुद केलेल्या व संस्थानच्या जमीनींच्या लगत असलेल्या जमीनी खंडकरी शेतकरी यांनी मागणी केल्याचे दिसून येत नाही.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचे लक्ष्मीवाडी मळा येथील संस्थानला खरेदी मिळणेकामीच्या सुधारीत प्रस्तावातील जमीनी.

अ.नं.	जमीन मागितली ते गाव	मागणीचे सर्वे नं. /गट नं.	क्षेत्र हे.आर	क्षेत्र एकर गुंठे
१	निमगाव-को-हाळे	८४/२	००.७७	१.३७
२	निमगाव-को-हाळे	८५/२	०२.१६	५.१६
३	निमगाव-को-हाळे	८६	०१.६२	४.०२
४	निमगाव-को-हाळे	८९	०१.८०	४.२०
५	निमगाव-को-हाळे	९०/२	१०.३६	२५.३६
६	निमगाव-को-हाळे	९७	००.११	०.११
७	निमगाव-को-हाळे	९८	००.१०	०.१०
८	निमगाव-को-हाळे	९९	००.१७	०.१७
	एकूण		१७.०९	४२.२९

शिर्डी हे आंतरराष्ट्रीय किर्तीचे तीर्थस्थळ झालेले आहे. त्यामुळे दिवसेंदिवस साईभक्तांच्या गर्दीत वाढच होत आहे. त्यासाठीचे नियोजन करणे,साईभक्तांना अन्न,निवारा,वैद्यकीय सेवा या मुलभुत सोयी-सुविधा विनासायास,विनाविलंब उपलब्ध व्हाव्यात तसेच साईभक्तांचे मनोरंजनासाठी सांस्कृतिक केंद्र उभारणे,उद्यानांची उभारणी करणे,वाहनतळ व्यवस्था करणे व प्रसादालयाचे विस्तारीकरण करणे इ. तातडीच्या उपाययोजना करणेसाठी संस्थानला संस्थानच्या जमीनीलगत असलेल्या महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील उपरोक्त नमुद केलेल्या जमीनी तातडीने उपलब्ध करणे जरुरीचे झालेले आहे.

सदर जमीनींचे मुल्यांकन मा.दुय्यम निबंधक श्रेणी-१,राहाता यांचेकडून प्राप्त करुन घेतले असून त्यात त्यांनी त्यांचेकडील जा.क्रं.मुल्यांकन/२०२०/१७/२०२० दि.३०/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये सदर जमीनींचे सन २०१९-२० चे बाजारमुल्य खालीलप्रमाणे दर्शविलेले आहे.

अ.नं.	स.नं.	गावाचे नाव	क्षेत्र	दर विभाग क्रं.	सन २०१९-२० चे बाजारमुल्य रुपये
१	८४/२	निमगाव-को-हाळे	०० हे. ७७ आर	११.७	३,८३,३८,०००/-
२	८५/२	निमगाव-को-हाळे	०२ हे. १६ आर	११.४	८,३५,२५,०००/-
३	८६	निमगाव-को-हाळे	०१ हे. ६२ आर	११.४	६,५९,७५,०००/-
४	८९	निमगाव-को-हाळे	०१ हे. ८० आर	११.४	७,१८,२५,०००/-
५	९०/२	निमगाव-को-हाळे	१० हे. ३६ आर	११.४	३५,००,२५,०००/-
६	९७	निमगाव-को-हाळे	०० हे. ११ आर	११.४	६७,६०,०००/-
७	९८	निमगाव-को-हाळे	०० हे. १० आर	११.४	६१,७५,०००/-
८	९९	निमगाव-को-हाळे	०० हे. १७ आर	११.४	१,०२,७०,०००/-
		एकूण	१७ हे. ०९ आर		६३,२८,९३,०००/-

शिर्डी हे आंतरराष्ट्रीय किर्तीचे तीर्थस्थळ झालेले आहे. त्यामुळे दिवसेंदिवस साईभक्तांच्या गर्दीत वाढच होत आहे. त्यासाठीचे नियोजन करणे,साईभक्तांना अन्न,निवारा,वैद्यकीय सेवा या मुलभुत सोयी-सुविधा विनासायास,विनाविलंब उपलब्ध व्हाव्यात तसेच साईभक्तांचे मनोरंजनासाठी सांस्कृतिक केंद्र उभारणे,उद्यानांची उभारणी करणे,वाहनतळ व्यवस्था करणे व प्रसादालयाचे विस्तारीकरण करणे इ. तातडीच्या उपाययोजना करणेसाठी संस्थानला संस्थानच्या जमीनीलगत असलेल्या महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील उपरोक्त नमुद केलेल्या जमीनी तातडीने उपलब्ध करणे जरुरीचे झालेले आहे.

यास्तव महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचे लक्ष्मीवाडी मळयातील निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या जमीनींचे एकूण क्षेत्र १७.०९ हेक्टर (४२.२९ एकर) इतके संस्थानला मा.दुय्यम निबंधक,राहाता यांनी कळविलेल्या उपरोक्त मुल्यांकनाप्रमाणे कायम खरेदी करुन मिळणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचेकडेस सादर करता येईल व प्रत मा.प्रधान सचिव, महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई आणि मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस सादर करणेच्या मान्यतेसाठीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.०९/०६/२०२० रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला. त्यात खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला. शेती महामंडळाची जमीन संस्थानला खरेदी करावयाची झाल्यास या जमीनीचा उपयोग कोणत्या उपक्रम/योजनेसाठी करणार त्याचे नियोजन मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करावे,असे ठरले."

मा.तदर्थ समितीचे दि.०९/०६/२०२० रोजीचे सभेतील उपरोक्त निर्णय क्रं.३२७ चे अनुषंगाने शेती महामंडळाच्या खरेदी करावयाच्या प्रस्तावित जमीनीचे नियोजनाबाबतचा अहवाल संस्थानचे बांधकाम विभागाकडून इकडील पत्र जा.नं. एसएसएसटी/मालमत्ता/४८२/२०२० दि.१४/०७/२०२० अन्वये मागविणेत आला. त्यास अनुसरुन बांधकाम विभागाने **त्यांचेकडील दि.०८/१२/२०२० रोजीचे टिपणी अन्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.**

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे लक्ष्मीवाडी मळयातील निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील जमीनीचे एकूण क्षेत्र १७.०९ हेक्टर (४२.२९ एकर) इतके संस्थानला खरेदी करणे प्रस्तावित आहे. याबाबत मा.तदर्थ समितीचे दि.०९/०६/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३२७ अन्वये याकामी खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला. शेती महामंडळाची जमीन संस्थानला खरेदी करावयाची झाल्यास या जमीनीचा उपयोग कोणत्या उपक्रम/योजनेसाठी करणार याचे नियोजन मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करावे, असे ठरले.

खरेदी करावयाचे प्रस्तावित क्षेत्र

अ.नं.	स.नं.	गावाचे नाव	क्षेत्र
१	८४/२	निमगाव-को-हाळे	०० हे. ७७ आर
२	८५/२	निमगाव-को-हाळे	०२ हे. १६ आर
३	८६	निमगाव-को-हाळे	०१ हें. ६२ आर
४	८९	निमगाव-को-हाळे	०१ हे. ८० आर
५	९०/२	निमगाव-को-हाळे	१० हे. ३६ आर
६	९७	निमगाव-को-हाळे	०० हे. ११ आर
७	९८	निमगाव-को-हाळे	०० हे. १० आर
८	९९	निमगाव-को-हाळे	०० हे. १७ आर
		एकूण	**१७ हे. ०९ आर**

मौजे निमगाव-को-हाळे हद्दीत संस्थान मालकीचे क्षेत्र व उपरोक्त तक्त्यात दर्शविलेले क्षेत्र यांचा नकाशा सोबत अवलोकनार्थ जोडला आहे.

तथापि श्री साईबाबा संस्थानच्या भविष्यातील गरजा विचारात घेऊन संस्थान मालकीच्या सर्व खुल्या जमीनींकरीता एकात्मिकृत विकास योजना (Integrated Development Plan/Master Plan) करणे आवश्यक आहे, असे वाटते.

यास्तव महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचेकडील उपरोक्त जमीन खरेदीबाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे वर नमुद निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणेकामी मालमत्ता विभागास आदेशित केलेले आहे.

तदनुषंगाने मा.तदर्थ समितीचे उपरोक्त निर्णय क्रं.३२७ चे अनुषंगाने शेती महामंडळाकडील खरेदी करावयाच्या प्रस्तावित क्षेत्राचा उपयोग कोणत्या उपक्रम/योजनेसाठी करणार आहेत याबाबतचा संस्थानचे बांधकाम विभागाने सादर केलेल्या उपरोक्त दि.०८/१२/२०२० रोजीचे अहवालात नमुद केलेप्रमाणे निमगाव-को-हाळे येथील **संस्थान मालकीच्या जमीनी व प्रस्तावित खरेदी करावयाच्या जमीनींमध्ये भविष्यात गोशाळा, लाडू व बर्फी निर्मिती विभाग, ऍम्युजमेंट पार्क (Amusement Park), औद्योगिक प्रशिक्षण केंद्र/सैनिक प्रशिक्षण शाळा/आश्रम शाळा, अद्ययावत मध्यवर्ती भांडार इमारत, अद्ययावत वाहन विभाग, वाहनतळ, रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय अशा प्रकारचे उपक्रम राबविता येतील.** त्यासाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचे लक्ष्मीवाडी मळयातील निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील **संस्थान मालकीचे जमीनींचे लगत असलेल्या उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या** जमीनींचे एकूण क्षेत्र १७.०९ हेक्टर (४२.२९ एकर) इतके संस्थानला नाममात्र दरात किंवा दुय्यम निबंधक, राहाता यांनी कळविलेल्या उपरोक्त मुल्यांकनाप्रमाणे कायम खरेदी करुन मिळणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचेकडेस सादर करता येईल व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई आणि मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस सादर करता येईल.

प्रस्ताव – निमगाव-को-हाळे येथील संस्थान मालकीच्या जमीनीलगत असलेल्या शेती महामंडळाचे मालकीच्या खरेदी करावयाच्या उपरोक्त प्रस्तावित क्षेत्रात भविष्यात गोशाळा, लाडू व बर्फी निर्मिती विभाग, ऍम्युजमेंट पार्क (Amusement

Park), औद्योगिक प्रशिक्षण केंद्र/सैनिक प्रशिक्षण शाळा/आश्रम शाळा, अद्ययावत मध्यवर्ती भांडार इमारत, अद्ययावत वाहन विभाग, वाहनतळ, रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय अशा प्रकारचे उपक्रम राबविता येतील. त्यासाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचे लक्ष्मीवाडी मळयातील निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील संस्थान मालकीचे जमीनींचे लगत असलेल्या उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या जमीनींचे एकूण क्षेत्र १७.०९ हेक्टर (४२.२९ एकर) इतके संस्थानला नाममात्र दरात किंवा दुय्यम निबंधक, राहाता यांनी कळविलेल्या उपरोक्त मुल्यांकनाप्रमाणे कायम खरेदी करुन मिळणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचेकडेस सादर करणेच्या व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई आणि मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडेस सादर करणेच्या मान्यतेसाठी सादर.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ४६

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ
मालमत्ता विभाग

विषय – श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरात रुग्ण व त्यांचे नातेवाईकांच्या सोयीसाठी झेरॉक्स मशिन चालविणेस देणेबाबत.

टिपणी -

अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना – मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं. श्रीसासंएक्रेसो/२०८/२०१९ दि.३०/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये "शिर्डी येथे श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरात उपचारासाठी मोठया प्रमाणावर रुग्ण येत असून प्रत्येक रुग्णास त्यांच्या फाईल व इतर कागदपत्रांच्या झेरॉक्स काढणे आवश्यक असल्याने व श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरात झेरॉक्स मशिन सुविधा नसल्याने रुग्णांना व त्यांचे नातेवाईकांना झेरॉक्स काढण्यासाठी हॉस्पिटल परिसराचे बाहेर जावे लागते. त्यामुळे रुग्णांची व त्यांचे नातेवाईकांची गैरसोय होत असून संस्था रुग्ण व त्यांचे नातेवाईकांचे सोईसाठी श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरात झेरॉक्स मशिन सुविधा चालविण्यास उत्सुक आहे. तरी संस्थेस श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरात रुग्ण व त्यांचे नातेवाईकांच्या सोईसाठी झेरॉक्स मशिन सुविधा चालविण्यास परवानगी मिळावी," असेबाबत इकडेस विनंती केलेली आहे.

प्रकरणाची पुर्वपिठीका - यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.१८४ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"साईनगर मैदानावरील डॉक्टर व स्टाफ पार्कींग भाडेतत्वावर चालविणेस देणेस मान्यता देण्यात आली. परंतु संस्थानमार्फत विविध उत्सवांमध्ये साईनगर मैदानावर धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करणेत येत असते त्यामुळे तेथे पार्कींगसाठी शेड तयार न करता आहे ते शेडही काढून घेण्यात यावे. तसेच विविध कामासाठी रुग्णांच्या नातेवाईकांना झेरॉक्स गरज भासते. याकरीता श्री साई संस्थान कर्मचारी सोसायटीला हॉस्पिटलकडील कॅन्टीन विभागामध्ये BOT तत्वावर झेरॉक्स मशिन चालविणेस देण्यात यावे,"असे ठरले.

दरम्यानचे काळात मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र क्रं.श्रीसासंएक्रेसो/२९५/२०१८ दि.१३/०१/२०१८ रोजीचे पत्राचे अनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०९/०३/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.१८४ मधील साईनगर मैदानावरील डॉक्टर व स्टाफ पार्कींग सोसायटीस भाडेतत्वावर चालविणेस **देणेच्या जागेऐवजी** संस्थान मालकीचे सर्वे नं.१२५ पैकी सुमारे १ एकर क्षेत्रात सशुल्क पार्कींग व्यवसाय करण्यास उक्त सोसायटीस ११ महिन्यांचे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारावर सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील या भाडेदराने व विद्युत बील आकार वेगळा आकारुन वापरास देणे तसेच सदर व्यवस्थेसाठी पार्कींग बुकींग कॅबिन,लाईट व इतर व्यवस्था संस्थानमार्फत पुरविणे, सदर पार्कींग व्यवस्था उक्त संस्थेच्या कर्मचा-यांमार्फत सशुल्क २४ तासांसाठी बस रु.५०/-, टेम्पो रु.२५/-, कार रु.२०/- व मोटार सायकल रु.५/- याप्रमाणे पार्कींग सेवा आकारणे तसेच संस्थानचे कर्मचारी यांना मासिक नाममात्र शुल्क आकारणे व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला. त्यात निर्णय क्रं.१७६ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला व सदरहू ठिकाणी पार्कींग व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेत यावी. तसेच वाहन पार्कींगचे ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टिने सीसीटीव्ही कॅमेरे व सुरक्षा रक्षक ठेवणेत यावेत, असे ठरले.

परिणामी उपरोक्त निर्णय क्रं.१८४ प्रमाणे पार्कींग संदर्भात व झेरॉक्स मशिन चालविणेस देणेसंदर्भात कार्यवाही करणेत आलेली नाही.

उक्त निर्णय क्रं.१८४ च्या उत्तरार्धात "विविध कामांसाठी रुग्णांच्या नातेवाईकांना झेरॉक्सची गरज भासते. याकरीता श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना हॉस्पिटल कडील कॅन्टीन विभागामध्ये BOT तत्वावर झेरॉक्स मशिन चालविणेस देण्यात यावे," असा निर्णय झालेला आहे. **सदरचा निर्णय अद्याप निरस्त झालेला नाही.**

दरम्यानचे काळात मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि,शिर्डी यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.३०/१२/२०१९ रोजीचे पत्रान्वये "शिर्डी येथे श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरात उपचारासाठी मोठया प्रमाणावर रुग्ण येत असून प्रत्येक रुग्णास त्यांच्या फाईल व इतर कागदपत्रांच्या झेरॉक्स काढणे आवश्यक असल्याने व श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरात झेरॉक्स मशिन सुविधा नसल्याने रुग्णांना व त्यांचे नातेवाईकांना झेरॉक्स काढण्यासाठी हॉस्पिटल

परिसराचे बाहेर जावे लागते. त्यामुळे रुग्णांची व त्यांचे नातेवाईकांची गैरसोय होत असून संस्था रुग्ण व त्यांचे नातेवाईकांचे सोईसाठी श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरात झेरॉक्स मशिन सुविधा चालविण्यास उत्सुक आहे. तरी संस्थेस श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरात रुग्ण व त्यांचे नातेवाईकांच्या सोईसाठी झेरॉक्स मशिन सुविधा चालविण्यास परवानगी मिळावी," असेबाबत इकडेस विनंती केलेली आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचे उपरोक्त दि.३०/१२/२०१९ रोजीचे पत्रातील विनंतीचे अनुषंगाने व उपरोक्त दि.०९/०३/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.१८४ चे अनुषंगाने वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी यांना इकडील जा.क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/३६८/२०२० दि.२९/०६/२०२० रोजीच्या पत्रान्वये मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील उपरोक्त दि.३०/१२/२०१९ रोजीचे पत्रात नमुद केलेप्रमाणे उक्त सोसायटीस श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरात रुग्ण व त्यांचे नातेवाईकांच्या सोयीसाठी झेरॉक्स मशिन सुविधा चालविण्यास देणेकामी साईबाबा हॉस्पिटल परिसरात सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचे ए.टी.एम. साठी प्रस्तावित केलेली जागा सोडून सध्यस्थितीत पुरेशी जागा उपलब्ध आहे किंवा कसे? याबाबत, तसेच पुरेशी जागा उपलब्ध असल्यास जागेच्या तपशिलासह व आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायासह इकडेस अहवाल सादर करणेबाबत कळविणेत आले.

त्यास अनुसरुन प्र.वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा संस्थान रुग्णालये,शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.नं.एसएसएस /एसएसबीएच/वै.प्र./५०/२०२० दि.१०/११/२०२० रोजीच्या पत्रान्वये त्यांचेकडील दि.११/०८/२०२० रोजीचे मंजूर टिपणी अन्वये "कॅन्टीन विभागात असलेली ओपीडी रुम बंद करणेस, माहिती केंद्र येथे सुरु असलेले कॅन्टीन विभाग पुर्ववत जुने ठिकाणी स्थलांतरीत करणेस व माहिती केंद्र येथे रिकामी होणारी जागा श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना झेरॉक्स मशिन बसविणेसाठी मान्यता देणेत आलेली आहे. तरी सोशल वर्कर ऑफीस यांचे शेजारी असलेले माहिती केंद्र येथे रिकामी होणारी जागा श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. शिर्डी यांना झेरॉक्स मशिन बसविणेसाठी आपणास उपलब्ध करुन देणेत येत आहे. आपण नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी," असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर चक्रीय पध्दतीने मान्यतेसाठी सादर करणेत आला होता. मा.अध्यक्ष,तदर्थ समिती,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.आस्था/१७८/२०२१ दि.१०/०५/२०२१ अन्वये सदरचा विषय एकतर तात्काळ करण्यासारखा नाही किंवा त्यावर सविस्तर चर्चा/विनिमय होणे गरजेचे आहे, असे अभिप्राय देवून विषय संचिका संस्थानकडे पाठविली आहे.

विभागाचा अभिप्राय - श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचे दि.३०/१२/२०१९ रोजीचे पत्रातील विनंतीचे अनुषंगाने व उपरोक्त दि.०९/०३/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.१८४ चे अनुषंगाने आणि वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी यांचेकडील उपरोक्त दि.१०/११/२०२० रोजीच्या पत्रात नमुद केलेप्रमाणे साईबाबा हॉस्पिटल परिसरात सोशल वर्कर ऑफीसचे शेजारी असलेल्या माहिती केंद्राच्या रिकाम्या झालेल्या सुमारे १०x१३ फुट असे एकूण क्षेत्र १३० चौ.फुट या जागेत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि, शिर्डी यांना झेरॉक्स मशिन बसविणेसाठी जागा उपलब्ध करुन देता येईल.

तथापि उक्त दि.०९/०३/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.१८४ चे उत्तरार्धात श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि,शिर्डी यांना **हॉस्पिटलकडील कॅन्टीन विभागामध्ये BOT तत्वावर झेरॉक्स मशिन चालविणेस देण्यात यावे,** असेबाबत नमुद आहे. मात्र आता सदर झेरॉक्स मशिन बसविणेस देणेकामीच्या प्रस्तावित जागेत बदल झालेला आहे. शिवाय उक्त निर्णयामध्ये सदर सोसायटीस वापरास देणेच्या प्रस्तावित जागेचे मासिक भाडेदरा बाबत व जागा वापराचे कालावधी बाबत काहीएक नमुद केलेले नसलेने मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि,शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंए क्रेसो/२०८/२०१९ दि.३०/१२/२०१९ रोजीचे पत्राचे अनुषंगाने उक्त सोसायटीस श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरात रुग्ण व त्यांचे नातेवाईकांच्या सोयीसाठी झेरॉक्स मशिन सुविधा चालविणेस देणेकामी संस्थानचे साईबाबा हॉस्पिटल परिसरात सोशल वर्कर ऑफीसचे शेजारी असलेलया माहिती केंद्राच्या रिकाम्या झालेल्या सुमारे १०x१३ फुट असे एकूण क्षेत्र १३० चौ.फुट या जागेत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि,शिर्डी यांना झेरॉक्स मशिन बसविणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या मासिक भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन ११ महिने कालावधीसाठी जागा वापरास देता येईल व त्याप्रमाणे करारनामा नोटराईज करुन घेता येईल.

प्रस्ताव - "मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि,शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंए क्रेसो/२०८/२०१९ दि.३०/१२/२०१९ रोजीचे पत्राचे अनुषंगाने उक्त सोसायटीस श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरात रुग्ण व

त्यांचे नातेवाईकांच्या सोयीसाठी झेरॉक्स मशिन सुविधा चालविण्यास देणेकामी संस्थानचे साईबाबा हॉस्पिटल परिसरात सोशल वर्कर ऑफीसचे शेजारी असलेल्या माहिती केंद्राच्या रिकाम्या झालेल्या सुमारे १०x१३ फुट असे एकूण क्षेत्र १३० चौ.फुट या जागेत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि,शिर्डी यांना झेरॉक्स मशिन बसविणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या मासिक भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन ११ महिने कालावधीसाठी जागा वापरास देणेच्या व त्याप्रमाणे करारनामा नोटराईज करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

(184)

विषय क्र.- ४७

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ

मालमत्ता विभाग

विषय - शिर्डी येथील साईबाबा सुपर हॉस्पिटल समोरील साईनगर मैदान येथील वाहन पार्कींग बाबत.

टिपणी –

अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्त व्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना – मा.तदर्थ समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.६७ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२५ पै. चे साईनगर मैदान या ठिकाणी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना Pay & Park या तत्वावर कार पार्कींग व्यवसायासाठी दिल्यास सोसायटी संस्थानला किती रक्कम देणार याबाबत स्पष्ट उल्लेख करुन सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

तदनुषंगाने खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

प्रकरणाची पुर्वपिठीका –

शिर्डी येथील साईबाबा हॉस्पिटल समोरील साईनगर मैदान येथील वाहन पार्कींग संबंधात संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर केलेले प्रस्ताव,त्यावर झालेले निर्णय व निर्णयाप्रमाणे केलेली कार्यवाही (घटनाक्रम) खालीलप्रमाणे क्रमवार सादर करणेत येत आहे.

१) मा.व्यवस्थापन समितीचे सभेचा दिनांक – ०९/०३/२०१७

मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर केलेला प्रस्ताव - साईबाबा हॉस्पिटल विभागामार्फत साईनगर मैदानावरील डॉक्टर व स्टाफ पार्कींग भाडेतत्वावर चालविणेस देणे व श्री साईबाबा हॉस्पिटलच्या कॅन्टीन विभागामध्ये झेरॉक्स मशिन बसविणे तसेच ते एम्प्लॉईज सोसायटीस भाडे तत्वावर चालविणेस देणेसंबंधातील प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता.

निर्णय क्रमांक – १८४.

झालेला निर्णय तपशिल - "साईनगर मैदानावरील डॉक्टर व स्टाफ पार्कींग भाडेतत्वावर चालविणेस देणेस मान्यता देण्यात आली. परंतु संस्थानमार्फत विविध उत्सवांमध्ये साईनगर मैदानावर धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करणेत येत असते त्यामुळे तेथे पार्कींगसाठी शेड तयार न करता आहे ते शेडही काढून घेण्यात यावे. तसेच विविध कामासाठी रुग्णांच्या नातेवाईकांना झेरॉक्स गरज भासते. याकरीता श्री साई संस्थान कर्मचारी सोसायटीला हॉस्पिटलकडील कॅन्टीन विभागामध्ये BOT तत्वावर झेरॉक्स मशिन चालविणेस देण्यात यावे,"असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे केलेली कार्यवाही - उपरोक्त निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेकामी सभा कामकाज विभागाकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४/४४६३ /२०१७ दि.२५/०३/२०१७ अन्वये वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी यांना निर्णयाची प्रत अलाहिदा पाठविणेत आलेली आहे.

तदनंतर प्रस्तुतचे प्रकरणी श्री साईबाबा हॉस्पिटल विभाग यांचेकडून त्यांचेकडील दि.२४/०४/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मालमत्ता विभागाकडे वर्ग करणेत आलेले आहे. त्यास अनुसरुन सदर निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेकामी इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/१७१४/२०१७ दि.१०/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांना कळविणेत आले.

सदर निर्णयाप्रमाणे कार्यवाही सुरु असतांना दरम्यानचे कालावधीत मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.नं.श्रीसासंएक्रेसो/२९५/२०१८ दि.१३/०१/२०१८ अन्वये श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये व श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे सोयीसाठी तसेच श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटल येथे उपचारासाठी येणा-या रुग्णांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या दुचाकी व चारचाकी वाहनांचे सुरक्षिततेकरीता कायमस्वरुपी आपल्या संस्थानच्या मालकीच्या साईनगरचे पाठीमागील बस डेपोच्या जागेत संस्था सशुल्क कार पार्कींग व्यवस्था चालविण्यास तयार आहे. सदर व्यवस्थेसाठी पार्कींग बुकींग कॅबिन, लाईट व इतर व्यवस्था संस्थानमार्फत पुरविल्यास सदर पार्कींग व्यवस्था संस्था संस्थेच्या कर्मचा-यांमार्फत सशुल्क २४ तासासाठी बस रु.५०/-,टेम्पो रु.२५/-,कार रु.२०/- व मोटार सायकल रु.५/- याप्रमाणे पार्कींग सेवा आकार आकारुन तसेच संस्थानचे कर्मचारी यांचेकरीता मासिक नाममात्र शुल्क आकारुन चालविण्यास तयार आहे. तरी सदर पार्कींग व्यवस्था संस्थेमार्फत सशुल्क चालविणेस परवानगी मिळावी, असेबाबतची विनंती केलेली होती.

सदर पत्राचे अनुषंगाने उपरोक्त दि.०९/०३/२०१७ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्रं.१८४ मधील साईनगर मैदानावरील डॉक्टर व स्टाफ पार्कींग सोसायटीस भाडेतत्वावर चालविणेस देणेच्या जागेऐवजी मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचे उपरोक्त दि.१३/०१/२०१८ रोजीचे पत्रातील विनंतीप्रमाणे संस्थान मालकीचे सर्वे नं.१२५ पैकी सुमारे १ एकर क्षेत्रात सशुल्क पार्कींग व्यवसाय करण्यास उक्त सोसायटीस ११ महिन्यांचे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारावर सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील या भाडेदराने व विद्युत बील आकार वेगळा आकारुन वापरास देणे तसेच सदर व्यवस्थेसाठी पार्कींग बुकींग कॅबिन,लाईट व इतर व्यवस्था संस्थानमार्फत पुरविणे, सदर पार्कींग व्यवस्था उक्त संस्थेच्या कर्मचा-यांमार्फत सशुल्क २४ तासांसाठी बस रु.५०/-, टेम्पो रु.२५/-, कार रु.२०/- व मोटार सायकल रु.५/- याप्रमाणे पार्कींग सेवा आकारणे तसेच तसेच संस्थानचे कर्मचारी यांना मासिक नाममात्र शुल्क आकारणे व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला.

२) मा.व्यवस्थापन समितीचे सभेचा दिनांक – ०७/०३/२०१८.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर केलेला प्रस्ताव - उपरोक्त दि.०९/०३/२०१७ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्रं.१८४ मधील साईनगर मैदानावरील डॉक्टर व स्टाफ पार्कींग सोसायटीस भाडेतत्वावर चालविणेस देणेच्या जागेऐवजी मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचे उपरोक्त दि.१३/०१/२०१८ रोजीचे पत्रातील विनंतीप्रमाणे संस्थान मालकीचे सर्वे नं.१२५ पैकी सुमारे १ एकर क्षेत्रात सशुल्क पार्कींग व्यवसाय करण्यास उक्त सोसायटीस ११ महिन्यांचे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारावर सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील या भाडेदराने व विद्युत बील आकार वेगळा आकारुन वापरास देणे तसेच सदर व्यवस्थेसाठी पार्कींग बुकींग कॅबिन,लाईट व इतर व्यवस्था संस्थानमार्फत पुरविणे, सदर पार्कींग व्यवस्था उक्त संस्थेच्या कर्मचा-यांमार्फत सशुल्क २४ तासांसाठी बस रु.५०/-, टेम्पो रु.२५/-,कार रु.२०/- व मोटार सायकल रु.५/- याप्रमाणे पार्कींग सेवा आकारणे तसेच तसेच संस्थानचे कर्मचारी यांना मासिक नाममात्र शुल्क आकारणे व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला.

निर्णय क्रमांक – १७६.

झालेला निर्णय तपशिल - उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला व सदरहू ठिकाणी पार्कींग व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेत यावी. तसेच वाहन पार्कींगचे ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टिने सीसीटीव्ही कॅमेरे व सुरक्षा रक्षक ठेवणेत यावेत, असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे केलेली कार्यवाही - संरक्षण अधिकारी,संरक्षण विभाग यांनी त्यांचेकडील कार्यालयीन टिपणी जा.क्रं.६९०/२०१९ दि.२०/१२/२०१९ मध्ये "पोलीस निरीक्षक,शिर्डी पोलीस स्टेशन,शिर्डी यांनी संदर्भीय पत्रात श्री साईबाबा संस्थान अंतर्गत श्री साईबाबा सुपर हॉस्पिटल,शिर्डी,ता.राहाता येथे मोठया प्रमाणात गर्दी होत असते. त्या अनुषंगाने रुग्णांचे नातेवाईक हे हॉस्पिटल समोरील फ्री पार्कींगमध्ये वाहन पार्कींग न करता हॉस्पिटल समोरील रस्त्यावर वाहने पार्क करत असतात. त्यामुळे ट्रॅफिक जाम होवून सर्वसामान्य ये-जा करणा-या लोकांना त्रास होत असतो. तसेच सदरच्या रस्त्यावरुन वाहने चोरी होण्याचे प्रमाणे जास्त आहे. तसेच हॉस्पिटल समोरील फ्री पार्कींगमध्ये वाहने लावतांना त्यांना कोणतेही टोकन अथवा पावती न दिल्याने मोटार सायकल मालक याने जरी वाहन पार्क केले असले तरी दुसराच कोणीतरी व्यक्ती सदरची वाहने घेवून जात असतो. त्यामुळे वाहन मालक व चोरी करणारे व्यक्ती यामध्ये फरक करणे शक्य होत नाही. तसेच सदरची फ्री पार्कींगच्या जागेला समोरील बाजूने जाळी असून उर्वरित बाजूला तशाच प्रकारची जाळी लावल्यास मोटार सायकल चोरीस आळा घालणे शक्य होवून श्री साईबाबा सुपर हॉस्पिटल येथे येणा-या पेशंट व त्यांचे नातेवाईक यांची गैरसोय होणार नाही. सन २०१९ मध्ये पो.स्टे.शिर्डी हद्दीतून एकुण ५४ मोटार सायकल चोरी झालेल्या असून त्यापैकी जवळपास ३२ मोटार सायकल या श्री साईबाबा सुपर हॉस्पिटल या ठिकाणाहून चोरीस गेलेल्या आहेत. तरी श्री साईबाबा सुपर हॉस्पिटल समोरील रस्त्यावर नो पार्कींगचे बोर्ड लावण्यात आल्यास सर्व वाहने पार्कींगच्या ठिकाणी लागतील. तसेच वाहन चालकास टोकन अथवा पावती दिल्यास पार्कींग करणाराच व्यक्ती वाहन घेवून जाईन. अशी व्यवस्था झाल्यास सुपर हॉस्पिटल येथे येणा-या लोकांची गैरसोय न होता वाहन चोरीस आळा बसेल. तरी आपले स्तरावर योग्य ती उपाययोजना होणेस विनंती केलेली आहे. सदरची वस्तुस्थिती सत्य असून तेथील नियुक्त सुरक्षा रक्षकांना देखील गाडी पार्क करुन गेलेली व्यक्ती ही तीच आहे किंवा इतर इसम याबाबत संभ्रम निर्माण होतो. त्यातूनच गाडया चोरीस जाण्याचे प्रकार घडत आहे. सदर प्रकारास आळा घालणेकामी संस्थान कर्मचारी सोसायटीतर्फे यापूर्वी कार पार्कींग चालविणेत येत होती. त्याप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने सोसायटीस पार्कींग चालविण्यास देणेबाबत पुढील कार्यवाही करणेकामी मालमत्ता विभागास सुचित केलेले आहे.

यापूर्वी संस्थानचे विधी विभागाकडील जा.क्रं.एसएसएस/वशी-विधी/६२३५/२०१२ दि.१२/०३/२०१२ रोजीचे पत्रान्वये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी,शिर्डी यांना साईभक्तांच्या सोयीसाठी व सेवेसाठी मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१४/०१/२०१२ रोजीचे ठरावास अनुसरुन संस्थानचे द्वारावती भक्तनिवासस्थान व साईबाबा भक्तनिवासस्थान परिसरात कार पार्कींग व्यवसाय करणेकामी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर दि.०१/०६/२०११ ते

दि.३१/०५/२०१२ या कालावधीसाठी द्वारावती भक्तनिवासस्थान येथील कार पार्कींगचे जागेचे मासिक भाडे रक्कम रु.१४,२६८/- व साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील कार पार्कींगचे जागेचे मासिक भाडे रक्कम रु.५७,०६४/- व विद्युत बील वेगळे आकारुन वापरास देणेत आलेले आहे. सदरची कार पार्कींग व्यवसायाची मुदत दि.३१/०५/२०१२ रोजी संपुष्टात आलेने सोसायटीने पुढील मुदतवाढ मिळणेकामी दि.२०/०४/२०१२ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली होती. मात्र दरम्यानचे काळात श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि,शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.१२/१२/२०१३ रोजीचे पत्राने कार पार्कींग व्यवसायाचे व्यवस्थापनावर होणारा कर्मचारी खर्च,जागा भाडे व स्टेशनरी खर्चाचे तुलनेत कार पार्कींगचे उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे सोसायटीमार्फत चालविणेत येणारे कार पार्कींग व्यवस्था दि.३१/१२/२०१३ पासून बंद करत असून सदर कार पार्कींगचे भाडे व विद्युत बीलाची आकारणी करु नये,असेबाबतची संस्थानला विनंती केलेली आहे. सदर पत्राचे अनुषंगाने उक्त सोसायटीस संस्थानचे विधी विभागाकडील पत्र जा.क्रं. एसएसएस/वशी-विधी/४९१९/२०१४ दि.२४/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये द्वारावती भक्तनिवास परिसरातील व साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) परिसरातील कार पार्कींग व्यवसाय बंद करणेबाबत कळविणेत आलेले आहे.

सध्यस्थितीत संस्थान परिसरात संस्थान मालकीचे जागेत कोणत्याही ठिकाणी पे ॲण्ड पार्क या तत्वावर कार पार्कींग व्यवसाय चालविणेस दिलेला नाही.

दरम्यानचे काळात मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं. श्रीसासंएक्रेसो/२०७/२०१९ दि.३०/१२/२०१९ रोजीचे पत्रान्वये " संस्था ही संस्थान कर्मचा-यांची नोंदणीकृत सहकारी संस्था असून संस्था संस्थान परिसरात संस्थान मान्यतेने श्री साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम, प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर,थंडपेय व दुग्धजन्य पदार्थ विक्रीचे स्टॉल तसेच शालेय विद्यार्थ्यांचे सोईसाठी शालेय साहित्य विक्री स्टोअर चालवत आहे तसेच साईभक्तांसाठी मोफत पादत्राणेगृह व बॅग क्लोकरुमद्वारे साईभक्तांना उत्तमोत्तम सेवा सुविधा पुरवत आहे. त्याचबरोबर संस्थेमार्फत संस्थेच्या सभासदांना व कर्मचा-यांना त्यांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी कर्जरुपाने मोठया प्रमाणावर अर्थसहाय्य करत असल्याने संस्था ही संस्थेचे सभासद व कर्मचारी यांची कामधेनू आहे. श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे सोईसाठी साईप्रसाद इमारत, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईआश्रम धर्मशाळा नं.१ व २,द्वारावती निवासस्थान परिसरात तसेच श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटल येथे उपचारासाठी येणा-या रुग्णांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या दुचाकी व चारचाकी वाहनांचे सुरक्षिततेकरीता कायमस्वरुपी आपल्या संस्थानच्या मालकीच्या साईनगर परिसर व साईनगरचे पाठीमागील बस डेपोच्या जागेत संस्था सशुल्क कार पार्कींग व्यवस्था संस्था संस्थेच्या कर्मचा-यांमार्फत सशुल्क २४ तासासाठी बस रु.५०/-, टेम्पो रु.२५/-, कार रु.२०/- व मोटार सायकल रु.५/- याप्रमाणे पार्कींग सेवा आकार आकारुन तसेच संस्थान कर्मचा-यांकरीता नाममात्र शुल्क आकारुन चालविण्यास तयार आहे. तरी संस्थेचे साईभक्त,रुग्ण व त्यांचे नातेवाईक तसेच संस्थान कर्मचा-यांचे सोईसाठी कार पार्कींग व्यवस्था संस्थेमार्फत सशुल्क चालविण्यास परवानगी मिळावी," असेबाबत इकडेस विनंती केलेली आहे.

३) मा.व्यवस्थापन समितीचे सभेचा दिनांक – ०६/०२/२०२०.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर केलेला प्रस्ताव - संरक्षण विभागाकडील उपरोक्त दि.२०/१२/२०१९ रोजीच्या कार्यालयीन टिपणीचे अनुषंगाने व श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी,शिर्डी यांचेकडील उपरोक्त दि.३०/१२/२०१९ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने उक्त सोसायटीस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२५ पै. चे साईनगर मैदान या ठिकाणी पे ॲण्ड पार्क या तत्वावर कार पार्कींग व्यवसाय, उक्त जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या मासिक दराने अथवा संस्थान निश्चित करील त्या मासिक भाडेदराने यापैकी जे जास्त असेल त्या मासिक भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी,शिर्डी यांना २४ तासांसाठी बससाठी आकार रु.५०/-, टेम्पो साठी रु.२५/-, कार साठी रु.२०/- व मोटार सायकलसाठी रु.५/- आणि संस्थान कर्मचा-यांकरीता नि:शुल्क या दराने आकारणेच्या अटीवर व इतर अटींवर ११ महिनेंच्या कालावधीसाठी चालविणेस देणेच्या व त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला.

निर्णय क्रमांक – ६७६.

झालेला निर्णय तपशिल - संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२५ पै. चे साईनगर मैदान या ठिकाणी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना पे ॲण्ड पार्क तत्वावर कार पार्कींग व्यवसायासाठी दिल्यास सोसायटी संस्थानला किती रक्कम देणार याबाबत स्पष्ट उल्लेख करुन सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करणेत यावा,असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे केलेली कार्यवाही - उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/४६२८/२०२० दि.२२/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२५ पै. चे साईनगर मैदान या ठिकाणी आपले संस्थेमार्फत पे ॲण्ड पार्क या तत्वावर कार पार्कींग व्यवसायासाठी साईनगर मैदान दिल्यास

सोसायटी संस्थानला दरमहा किती रक्कम देवू शकेल याबाबत मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना विचारणा करण्यात आली.

त्यास अनुसरुन मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/३३९/२०२० दि.१४/०३/२०२० रोजीच्या पत्रान्वये "श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे तसेच श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटल येथे उपचारासाठी येणारे रुग्ण त्यांचे नातेवाईक व संस्थान कर्मचा-यांचे सोईसाठी संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२५ पै. चे साईनगर मैदान या ठिकाणी पे ॲण्ड पार्क या तत्वावर संस्थेस कार पार्कींग व्यवस्था चालविण्यास दिल्यास सदर कार पार्कींग व्यवस्थेसाठी लागणारा कर्मचारी,स्टेशनरी,लाईट बील,सी.सी.टि.व्ही.सिस्टीम, पार्कींग परिसर कंपांऊंड व पार्कींग शेड उभारणी व त्या अनुषंगाने होणारा खर्च विचारात घेता संस्था श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीस दरमहा जागा भाडे रु.५,०००/- (अक्षरी रु.पाच हजार मात्र) अदा करण्यास तयार आहे मात्र त्यात १०% वार्षिक जागा भाडे वाढ वा इतर कोणतीही वाढ संस्था देवू शकणार नाही. तरी संस्थेस साईभक्त,रुग्ण व त्यांचे नातेवाईक तसेच संस्थान कर्मचा-यांचे सोईसाठी संस्थानचे साईनगर मैदान येथे सशुल्क कार पार्कींग व्यवस्था चालविण्यास परवानगी मिळावी,ही विनंती," असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

दरम्यानचे काळात संरक्षण अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी त्यांचेकडील संदर्भ जा.नं.३५३/२०२० दि.२७/०८/२०२० रोजीच्या पत्रान्वये "पोलीस निरीक्षक,शिर्डी पोलीस स्टेशन,शिर्डी यांचे दि.२०/११/२०१९ रोजीच्या पत्रान्वये साईबाबा सुपर हॉस्पिटल समोरील वाहन पार्कींगबाबतचे पत्र संरक्षण विभाग कार्यालयास प्राप्त झालेले असून त्यानुसार संरक्षण विभागाकडील दि.२०/१२/२०१९ रोजीच्या टिपणी अन्वये संरक्षण विभागाकडून सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्याने वाहन पार्कींगबाबतची पुढील कार्यवाही मालमत्ता विभागामार्फत करण्यात येत आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल येथील कर्मचारी यांनी दि.२४/०१/२०२० रोजी एकत्रित अर्ज करुन वाहन पार्कींग उपलब्ध करुन देणेबाबत मागणी केलेली आहे. सदर विषयाबाबतची कार्यवाही मालमत्ता विभागामार्फत चालू असल्याने सदरचे पत्र व श्री साईबाबा संस्थान कर्मचारी वेल्फेअर संघटना यांचे "संस्थान कर्मचारी यांचेकरीता स्वतंत्र पार्कींगची सुविधा साईनगर मैदानावर करणेत यावी" या आशयाचे दि.०६/०८/२०२० रोजीचे पत्र वाहन पार्कींग व्यवस्थेबाबतची कार्यवाही मालमत्ता विभागामार्फत चालू असलेने पुढील कार्यवाहीकामी सदरचे पत्र मालमत्ता विभागाकडे वर्ग करणेत येत असलेबाबत कळविलेले आहे.

तसेच संस्थान रुग्णालयामध्ये कोरोना विषाणु (कोविड-१९) चे अनुषंगाने करावयाचे उपाययोजनेबाबत घेण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्ताच्या अनुषंगाने संरक्षण विभागाकडील परिपत्रक जा.क्रं.एसएसएस/वशी-संरक्षण/१४१८ /२०२० दि.०५/११/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये उक्त बैठकीचे वेळी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी दि.१६/१०/२०२० रोजी रुग्णालये परिसरात घेण्यात आलेल्या राऊंडचे वेळी आढळून आलेल्या त्रुटीबाबत उपस्थितांशी चर्चा करुन सुचना दिलेल्या आहेत. त्यातील सुचना क्रं.११ "वाहनतळावर नागरीक,डॉक्टर्स,पेंशंटचे नातेवाईक यांनी २ चाकी/४ चाकी वाहने येत असल्याने सदरची पार्कींग Pay & Park तत्वावर चालविणेस देणेकामी संबंधीत विभागाकडून कार्यवाही करावी" अशी सुचना केलेली असून कार्यवाही विभाग म्हणून मालमत्ता विभागास निर्देशित केलेले आहे.

सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर चक्रीय पध्दतीने मान्यतेसाठी सादर करणेत आला होता. मा.अध्यक्ष,तदर्थ समिती,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.आस्था/१७८/२०२१ दि.१०/०५/२०२१ अन्वये सदरचा विषय एकतर तात्काळ करण्यासारखा नाही किंवा त्यावर सविस्तर चर्चा/विनिमय होणे गरजेचे आहे, असे अभिप्राय देवून विषय संचिका संस्थानकडे पाठविली आहे.

विभागाचा अभिप्राय - मा.तदर्थ समितीचे उपरोक्त दि.०६/०२/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.६७ चे अनुषंगाने मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी सादर केलेल्या त्यांचेकडील पत्र जा.नं. श्रीसासंएक्रेसो/३३९/२०२० दि.१४/०३/२०२० रोजीच्या पत्राचे अनुषंगाने आणि मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे निर्देशानुसार साईनगर मैदान या ठिकाणीची पार्कींग, पे ॲण्ड पार्क तत्वावर श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या मासिक भाडेदराने, पार्कींग सेवा आकार २४ तासांसाठी बससाठी रु.५०/-, टेम्पोसाठी रु.२५/-, कारसाठी रु.२०/- व मोटार सायकलसाठी र.५/- याप्रमाणे पार्कींग सेवा आकारुन, संस्थान कर्मचा-यांकरीता नाममात्र शुल्क आकारुन व उत्सव काळात संस्थानमार्फत सदर साईनगर मैदानात धार्मिक/सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात त्यावेळेस संस्थानचे आवश्यकतेनुसार व आवश्यक त्या कालावधीसाठी पे ॲण्ड पार्क तत्वावरील सदर पार्कींग व्यवस्था बंद ठेवणेच्या अटी व शर्तींवर ११ महिन्यांचे कालावधीसाठी चालविणेस देता येईल व त्याप्रमाणे करारनामा नोटराईज करुन घेता येईल.

271

प्रस्ताव - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२५ पै.चे साईनगर मैदान या ठिकाणी पे ॲण्ड पार्क तत्वावर श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या मासिक भाडेदराने, पार्कींग सेवा आकार २४ तासांसाठी बससाठी रु.५०/-, टेम्पोसाठी रु.२५/-, कारसाठी रु.२०/- व मोटार सायकलसाठी र.५/- याप्रमाणे पार्कींग सेवा आकारुन, संस्थान कर्मचा-यांकरीता नाममात्र शुल्क आकारुन व उत्सव काळात संस्थानमार्फत सदर साईनगर मैदानात धार्मिक/सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात त्यावेळेस संस्थानचे आवश्यकतेनुसार व आवश्यक त्या कालावधीसाठी पे ॲण्ड पार्क तत्वावरील सदर पार्कींग व्यवस्था बंद ठेवणेच्या अटी व शर्तींवर ११ महिन्यांचे कालावधीसाठी चालविणेस देणेच्या व त्याप्रमाणे करारनामा नोटराईज करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ४८

मा.तदर्थ समितीचे निदर्शनार्थ
मालमत्ता विभाग

272

विषय – श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास,मोहटे यांना शिर्डी संस्थान परिसरात माहिती केंद्राकरीता जागा मिळणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास,मोहटे,ता.पाथर्डी यांचेकडील पत्र जा.क्रं. ५१/२०२० दि.११/०२/२०२०.

टिपणी –

अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थे मध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना - संस्थानचे मा.तदर्थ समितीचे दि.२८/०८/२०२० रोजीच्या सभेतील विषय नं.२१ निर्णय क्रं.४३० प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"सदर प्रस्तावाबाबत समिती सदस्य सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, विषय पत्रिकेवरील विषय हा मुलतः ११ महिने व सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील अशा मासिक भाडेदराने आकारणी संदर्भात आहे. अशा प्रस्तावास मंजूरी देण्यासाठी संस्थानकडून स्वतंत्र धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. संस्थानकडून अशा प्रकारे कोणत्याही धार्मिक संस्थांना जागा आजपर्यंत देण्यात आलेली नाही. जर अशा प्रकारे प्रस्ताव मंजूर केल्यास इतर धार्मिक संस्थांच्या मागण्या देखील येतील व त्या नाकारता येणार नाही. सबब धोरणात्मक ठराव केल्याशिवाय सदर प्रस्तावाबाबत निर्णय करणे विधिवत नाही. तरी इतर धार्मिक देवस्थानांना जागा देण्याबाबत प्रथम धोरण व नियमावली निश्चित करावी व त्या संदर्भात निर्णय झाल्यानंतर सदर प्रस्तावाचा विचार करावा. मात्र समिती सदस्यांचे असे लक्षात आले की, संस्थान मालकीच्या विविध मालमत्ता व्यक्ती संस्था इ. यांना कुठलेही धोरण नसतांना नाममात्र दरावर दिल्या आहेत. अशा परिस्थितीत जर अहमदनगर जिल्हयातील एक नोंदणीकृत न्यास अशी मागणी भक्तांना माहिती व्हावी या उद्देशाने करत असेल तर धोरण व नियम नाही असे दाखविणे योग्य नाही.

यावर तदर्थ समितीचे सदस्य श्री.स्वामी साहेब यांनी असे प्रतिपादन केले की,सदरचा विषय दरमहा नाममात्र भाडे रु.५००/- (वीज बील व पाणीपट्टी व्यतिरिक्त) आकारुन मंजूरी देण्यात यावी, या विषयावर संस्थान प्रशासनाने कोणताही लेखी आक्षेप नोंदविलेला नाही. यावर सदस्य सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुन्हा प्रतिपादन केले की, संस्थानची जागा इतर धार्मिक संस्थांना देणेबाबत धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतर सदरचा प्रस्ताव मंजूर करणे योग्य राहील. यावर श्री.स्वामी साहेब यांनी असे प्रतिपादन केले की,संस्थान प्रशासनाने याबाबत सर्व समावेशक असा अभ्यासपुर्वक धोरणात्मक निर्णयाचा प्रस्ताव तदर्थ सभितीपुढे आणावा. तदनंतर पुढे त्यावर यथायोग्य निर्णय घेता येईल.

या विषयावर चर्चा करतांना अध्यक्ष व श्री.स्वामी साहेब यांनी असा निर्णय घेतला की, श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे यांना शिर्डी संस्थान परिसरात माहिती केंद्र सुरु करण्याकरीता विभागाच्या अभिप्रायामध्ये दर्शविलेली क्रं.२ मधील सेवाधाम इमारतीतील बाहेरील बाजूची १०x१० फुट मोजमापाची खोली क्रं.५७ ही दरमहा नाममात्र भाडे रु.५००/- (वीज बील व पाणीपट्टी व्यतिरिक्त) आकारुन प्रत्येकी ११ महिन्याच्या करारानंतर नुतनीकरणाच्या अटीवर ११ वर्षासाठी देण्यास मंजूरी देण्यात आली.

सदरचा श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यासास माहिती केंद्र सुरु करण्यासाठी सेवाधाम येथील वरील जागा देण्याचा निर्णय हा तदर्थ समितीचे अध्यक्ष व एक सदस्य यांचे २x१ मताधिक्याने घेण्यात आला."

उपरोक्त निर्णयात उक्त जागा दरमहा नाममात्र भाडे रु.५००/- आकारुन प्रत्येकी ११ महिन्याच्या करारानंतर नुतनीकरणाच्या अटीवर ११ वर्षांसाठी देण्यास मंजूरी देण्यात आली असलेबाबतचा असा उल्लेख आहे.

तथापि श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

मात्र उपरोक्त निर्णयात उक्त जागा वापरासाठी ११ महिन्यांच्या करारानंतर नुतनीकरणाच्या अटीवर ११ वर्षांसाठी वापरास देण्यास मंजूरी देण्यात आलेली असलेचे दिसून येत आहे.

उपरोक्त कलमातील तरतुदीनुसार विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देता येणार नाही.

सदरची बाब निदर्शनार्थ व निर्णयार्थ सादर.

(काकासाहेब नागरे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ४९

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ
मालमत्ता विभाग

विषय – मौजे शिर्डी येथील साईबाबा हॉस्पिटल परिसरातील सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी यांचे ए.टी.एम. मशिनचे जागा वापरास मुदतवाढ देणेबाबत. मा.शाखाधिकारी,सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी यांचेकडील जा.नं.शिर्डी/२०२१-२२/०५/३ दि.१३/०५/२०२१ रोजीचे पत्र.

टिपणी -

अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील नगरपंचायत हद्दीतील सर्वे नं.१२५ मधील साईबाबा हॉस्पिटलचे पूर्वीचे कॅन्टीनमधील क्षेत्र ९.६"x१०.३" (९७.३७ चौ.फुट) बांधीव जागा सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी यांचे ए.टी.एम.साठी दि.०६/०८/२०२० ते दि.०५/०७/२०२१ या ११ महिने कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.१,४५०/- आकारुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन वापरास देण्यात आलेली आहे व त्याप्रमाणे दि.२४/११/२०२० रोजी लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यात आलेला आहे. सदर करारनाम्याची मुदत दि.०५/०७/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने दि.०६/०७/२०२१ ते दि.०५/०६/२०२२ या ११ महिने कालावधीसाठी उक्त जागा वापराची मुदत वाढवून मिळणेकामी मा.शाखाधिकारी,सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी यांनी त्यांचेकडील उपरोक्त पत्र जा.नं.शिर्डी/२०२१-२२ /०५/३ दि.१३/०५/२०२१ अन्वये इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय - मा.शाखाधिकारी,सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी यांचेकडील उपरोक्त पत्रात नमुद केलेप्रमाणे त्यांचे ए.टी.एम.साठी संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.१२५ मधील साईबाबा हॉस्पिटलचे पूर्वीचे कॅन्टीनमधील क्षेत्र ९.६"x१०.३" (९७.३७ चौ.फुट) बांधीव जागा सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी यांचे ए.टी.एम.साठी दि.०६/०७/२०२१ ते दि.०५/०६/२०२२ या ११ महिने कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.१,४५०/- मध्ये १०% वाढ म्हणजेच रु.१,४५०/-+ १०% रु.१४५/- अशी एकूण रक्कम रु.१,५९५/- दरमहा भाडे आकारुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीच्याच अटी व शर्तीवर वापरास देता येईल व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव - सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी यांचे ए.टी.एम.साठी संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.१२५ मधील साईबाबा हॉस्पिटलचे.पूर्वीचे कॅन्टीनमधील क्षेत्र ९.६"x१०.३" (९७.३७ चौ.फुट) बांधीव जागा सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी यांचे ए.टी.एम.साठी दि.०६/०७/२०२१ ते दि.०५/०६/२०२२ या ११ महिने कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.१,४५०/- मध्ये १०% वाढ म्हणजेच रु.१,४५०/-+ १०% रु.१४५/- अशी एकूण रक्कम रु.१,५९५/- दरमहा भाडे आकारुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीच्याच अटी व शर्तीवर वापरास देणेच्या व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ५०

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ
मालमत्ता विभाग

274

विषय – मौजे शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थान परिसरात रेल्वे बुकींग काऊंटरसाठी रेल्वे विभागास विनामुल्य वापरास दिलेल्या सेवाधाम इमारतीतील दोन रुम्सच्या वापराची मुदत वाढवून मिळणेबाबत सिनियर डिव्हीजनल कमर्शियल मॅनेजर,सोलापूर यांचेकडील पत्र जा.नं.SUR/C/518/SNSI/PRS/2021 दि.१७/०५/२०२१.

टिपणी -

अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील नगरपंचायत हद्दीतील सिटी सर्वे नं.११९ क्षेत्र ६८७.८ चौमी.मधील सेवाधाम इमारतीतील तळमजल्यावरील रेल्वे विभागास वापरास दिलेल्या २ खोल्या नं.५६ व ७९ यांची एकत्रित लांबी ३ मी. व रुंदी ५.२९ मी. असे एकूण क्षेत्रफळ १५.८७ चौमी. या दोन रुम्सच्या वापराची मुदत दि.१५/०८/२०२० ते दि.१४/०७/२०२१ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी पूर्वीच्याच अटी व शर्तींवर वाढवून देणेच्या व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेकामी मा.तदर्थ समितीने चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेली आहे व त्याप्रमाणे दि.०२/०२/२०२१ रोजी लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा नोंदविणेत आलेला आहे.

सदर करारनाम्याची मुदत दि.१४/०७/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने मा.सिनियर डिव्हीजनल कमर्शियल मॅनेजर, सोलापूर यांनी त्यांचेकडील उपरोक्त पत्र जा.नं.SUR/C/518/SNSI/PRS/2021 दि.१७/०५/२०२१ अन्वये सदर दोन रुम्सच्या वापराची पुढील मुदत दि.१५/०७/२०२१ ते दि.१४/०६/२०२२ या ११ महिने कालावधीसाठी मुदत वाढवून मिळणेकामी इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय - मा.सिनियर डिव्हीजनल कमर्शियल मॅनेजर,सोलापूर यांचेकडील उपरोक्त पत्रात नमुद केलेप्रमाणे रेल्वे विभागास संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.११९ क्षेत्र ६८७.८ चौमी.मधील सेवाधाम इमारतीतील तळमजल्यावरील विनामुल्य वापरास दिलेल्या दोन रुम नं.५६ व ७९ यांची एकत्रित लांबी ३ मी. व रुंदी ५.२९ मी. असे एकूण क्षेत्रफळ १५.८७ चौमी. येणेप्रमाणे दोन रुम्सच्या वापराची पुढील मुदत दि.१५/०७/२०२१ ते दि.१४/०६/२०२२ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी पूर्वीच्याच अटी व शर्तींवर वाढवून देता येईल व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव – रेल्वे विभागास संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.११९ क्षेत्र ६८७.८ चौमी.मधील सेवाधाम इमारतीतील तळमजल्यावरील विनामुल्य वापरास दिलेल्या दोन रुम्स नं.५६ व ७९ यांची एकत्रित लांबी ३ मी. व रुंदी ५.२९ मी. असे एकूण क्षेत्रफळ १५.८७ चौमी. येणेप्रमाणे दोन रुम्सच्या वापराची पुढील मुदत दि.१५/०७/२०२१ ते दि.१४/०६/२०२२ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी पूर्वीच्याच अटी व शर्तींवर वाढवून देणेच्या व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

21/6/21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ५१

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ

मालमत्ता विभाग

विषय – मौजे शिर्डी येथील जमीन सर्वे नं.४८/१ पै. क्षेत्र १ हे.६२ आर व सर्वे नं.४८/२ पै. क्षेत्र २ हे. ४० आर असे एकूण ४ हे.०२ आर ही जमीन संस्थानला कायमस्वरुपी विकत देणेबाबतचा श्री.प्रकाश जयराम शेळके,रा.शिर्डी व इतर ६ यांचा दि.२४/११/२०२० रोजीचा अर्ज.

टिपणी –

अधिनियमातील तरतूद – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना - श्री.प्रकाश जयराम शेळके व इतर ६,रा.शिर्डी,ता.राहाता यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.२४/११/२०२० रोजीचा इकडेस अर्ज सादर केलेला आहे. त्यात त्यांनी "शिर्डी शिवारातील सर्वे नं.४८/१ व ४८/२ मध्ये आमच्या खरेदी मालकीच्या जमीनी असून त्या आमच्या ताब्यात व वहीवाटीत आहेत. सदर जमीनीस योग्य किंमत आल्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना विकत देण्यास आम्ही तयार आहोत. सर्वे नं.४८/१ क्षेत्र ४ एकर ०२ आर व सर्वे नं.४८/२ क्षेत्र ६ एकर असे एकूण १० एकर ०२ आर क्षेत्र आहे," असेबाबत नमुद केलेले आहे.

श्री.प्रकाश जयराम शेळके व इतर यांनी यापूर्वी देखील दि.०४/०३/२०१६ व दि.१४/०६/२०१६ रोजी इकडेस अर्ज सादर केले होते. सदर अर्जाच्या अनुषंगाने दि.१६/०६/२०१६ रोजीची कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आलेली होती. तिचे अवलोकन केले असता, प्रस्तुत जमीन संस्थानला भविष्यात उपयुक्त ठरेल किंवा कसे याबाबत संस्थानचे बांधकाम विभागास इकडील पत्र जा.नं.एसएसएस/मालमत्ता/४८०५/२०१६ दि.२३/०३/२०१६ रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय मागविणेत आलेले आहेत. तदनुषंगाने संस्थानचे बांधकाम विभागाने त्यांचेकडील जा.नं.२१/२०१६ दि.१८/०४/२०१६ अन्वये अभिप्राय सादर केले असून त्यात त्यांनी सदरचे क्षेत्र हे समाधी मंदिरापासून पूर्वेस अंदाजे १ किमी. अंतरावर असून सदरचे क्षेत्र पिंपळवाडी रस्त्यालगत दक्षिण बाजूने आहे. सदर क्षेत्रातून विद्युत वाहिन्या गेलेल्या असून सध्यस्थितीत काही भागात विहीर,बोअर व घर आहे. सदरहू क्षेत्र शिर्डी शहरालगत असून या क्षेत्रालगत पक्का रस्ता, विद्युत व्यवस्था इ. उपलब्ध आहे. आज सदरहू क्षेत्रात घेण्यासारखा प्रकल्प दृष्टिक्षेपात नाही. परंतु भविष्यात भक्तनिवास, कर्मचारी निवासस्थाने व इतर प्रकल्पांसाठी उपयुक्त होईल, असेबाबत नमुद केलेले आहे.

तसेच सदरचे क्षेत्र हरित पट्टयात (Green Zone) आहे किंवा कसे याबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना इकडील पत्र क्रं.एसएसएस/मालमत्ता/६१४/२०१६ दि.१२/०५/२०१६ रोजीचे पत्रान्वये विचारणा करण्यात आली. तदनुषंगाने शिर्डी विकास योजनेत सन १९९२ मध्ये सदर सर्वे नं.४८ हरित पट्टयात (Green Zone) होता. तथापि त्यात महाराष्ट्र शासनाद्वारे फेरबदल होवून सध्यस्थितीतील सर्वे नं.४८ हा संपूर्ण रहिवास विभागात समाविष्ट आहे, असेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.नप/टेक्र-८/१३६०/२०१६ दि.२४/०५/२०१६ रोजीचे पत्रान्वये इकडेस कळविलेले आहे.

सदर जमीन संबंधातील सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेच्या मान्यतेसाठी मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडेस सादर करणेत आलेला होता. त्यावर तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांनी उक्त क्षेत्राची पाहणी करुन नंतर प्रस्ताव सादर करता येईल, असेबाबतचे कार्यालयीन टिपणीवर दि.११/०७/२०१६ रोजीचे निर्देश दिलेले आहेत.

दरम्यानचे काळात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी जमीन खरेदी धोरण निश्चित करणेबाबत महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.सासंवि-१०१७/१८४४/प्र.क्र.२०१ /का.१६ दि.२५/०६/२०१८ रोजीचा निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर चक्रीय पध्दतीने मान्यतेसाठी सादर करणेत आला होता. मा.अध्यक्ष,तदर्थ समिती,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.आस्था/१७८/२०२१ दि.१०/०५/२०२१ अन्वये सदरचा विषय एकतर तात्काळ करण्यासारखा नाही किंवा त्यावर सविस्तर चर्चा/विनिमय होणे गरजेचे आहे, असे अभिप्राय देवून विषय संचिका संस्थानकडे पाठविली आहे.

विभागाचा अभिप्राय – महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील उपरोक्त शासन निर्णय क्रं.सासंवि-१०१७/१८४४/प्र.क्र.२०१/का.१६ दि.२५/०६/२०१८ रोजीच्या निर्णयातील **अ.नं.२ मध्ये खरेदीची वारंवारता** यात – श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीने अवास्तव प्रमाणात जमीन खरेदी करु नये. केवळ प्रस्तावित असलेल्या एखाद्या

प्रकल्पासाठी आवश्यकता असल्यास जमीन खरेदीचा विचार करण्यात यावा. जमीन खरेदीविषयी शासनाकडे पाठवावयाच्या प्रस्तावामध्ये संबंधीत प्रकल्पाचा तपशिल व व्यवस्थापन समितीचा ठराव सादर करणे आवश्यक राहील. केवळ खाजगी भूधारकाने जमीन विकत घेण्याची विनंती श्री साईबाबा संस्थानला केली आहे, या कारणास्तव जमीनीची गरज आणि उपयुक्तता विचारात न घेता अशी जमीन विकत घेण्याबाबत विचार करण्यात येवू नये, असेबाबत स्पष्टपणे नमुद केलेले आहे.

तसेच **अ.नं.५ जाहीर नोटीस प्रसिध्द करणे** यात - अ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्याकरीता जमीन खरेदी करावयाची झाल्यास तशा आशयाची जाहीर नोटीस मोठया प्रमाणात वितरीत होणा-या स्थानिक दैनिकामध्ये प्रसिध्द करण्यात यावी, असे नमुद केलेले आहे.

सध्यस्थितीत उक्त परिसरात संस्थानचा नव्याने कोणताही प्रकल्प प्रस्तावित नाही.

प्रस्ताव - अर्जदार श्री.प्रकाश जयराम शेळके व इतर ६ यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील उक्त जमीन सर्वे नं.४८/१ पै. क्षेत्र १ हे.६२ आर व सर्वे नं.४८/२ पै. क्षेत्र २ हे. ४० आर असे एकूण ४ हे.०२ आर इतके क्षेत्र संस्थानला कायमस्वरुपी खरेदी करणे अथवा न करणेच्या निर्णयार्थ सादर.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ५२

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ

मालमत्ता विभाग

277

विषय – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमार्फत मौजे निमगाव-को-हाळे,राहाता येथील संस्थान मालकीच्या गट नं.१८३ मधील शैक्षणिक संकुलाच्या पोहोच रस्त्यासाठी जमीन भुसंपादन करणेबाबत.

टिपणी -

अधिनियमातील तरतुद – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी, तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादित करील किंवा खरेदी करील, अशी तरतुद आहे.

प्रस्तावना - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमार्फत संस्थान मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील गट नं.१८३ मध्ये शैक्षणिक संकुल या प्रकल्पाचे बांधकाम सुरु असून सदरचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

उक्त शैक्षणिक संकुलामध्ये संस्थानचे १) साईबाबा इंग्लिश मेडीयम स्कूल (प्राथमिक व माध्यमिक) २) कन्या विद्या मंदिर ३) ज्युनियर कॉलेज ४) सिनियर कॉलेज इ. शैक्षणिक सुविधा सुरु होणार आहेत. सदर संकुलातील उक्त शैक्षणिक सुविधा सुरु झाल्यानंतर सदर संकुलाकडे जाणा-या येणा-या विद्यार्थी, शिक्षक,कर्मचारी,पालक यांची मोठया प्रमाणात गर्दी होवून रहदारी वाढणार आहे. सध्यस्थितीत उक्त शैक्षणिक संकुलाकडे जाण्यासाठी पाटबंधारे विभागाच्या चारीने हेलिपॅड रोडचा वापर करणेत आहे.

तथापि सध्यस्थितीतील सदरचा रस्ता हा नगर-मनमाड महामार्गातलगत असून सदर महामार्गावर मोठया प्रमाणात दैनंदिन रहदारी व वाहतुक असते व रस्त्यावर नेहमी मोठया प्रमाणावर गर्दी असते. उक्त शैक्षणिक संकुलातील विद्यार्थी, शिक्षक,कर्मचारी यांची संख्या विचारात घेता भविष्यात सदर संकुलाकडे जाण्यासाठी सध्यस्थितीत वापरात असलेल्या रस्त्यावर गर्दी होवून सदर रस्ता हा रहदारीसाठी अपुरा पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी सदर रस्त्यावर भविष्यात अपघाताचे प्रमाण वाढण्याची शक्यताही नाकारता येणार नाही.

विभागाचा अभिप्राय – उपरोक्त संदर्भान्वये सुरक्षिततेच्या दृष्टिने उक्त संकुलामध्ये विद्यार्थी,शिक्षक,कर्मचारी व पालक यांना विनासायास जाणे-येणेच्या दृष्टिने व रस्त्यावर गर्दी होवू नये या दृष्टिने सध्यस्थितीत वापरात असलेल्या रस्त्याला पर्यायी असा सोयीस्कर रस्ता करता येईल.

त्या दृष्टिकोनातून नगर-मनमाड रोडच्या पश्चिमेला सध्याच्या संस्थानच्या साईप्रसादालयाकडे जाणा-या रस्त्याच्या रुंदीकरणासह निमगाव-को-हाळे हद्दीतील गट नंबर ८०,८५,८६,८७,८८,८९,९०,१७८,१७९,१८०,१८१, १८२ मधून पूर्व-पश्चिम असा सुमारे १.५७ किमी. लांबीचा स्वतंत्र पोहोच रस्ता संस्थान खर्चाने जमीन भुसंपादन करुन रस्ता तयार करता येईल.

सदर रस्ता करणेचे ठरल्यास प्रस्तावित रस्त्यासाठीच्या जमीनीची मोजणी करुन घेवून सदर रस्त्याची लांबी,रुंदी व एकूण क्षेत्र निश्चित करता येईल.

प्रस्ताव - १) संस्थानचे मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील उपरोक्त गट नं.१८३ मधील संस्थानचे शैक्षणिक संकुलाकडे जाणे-येणेसाठी नगर-मनमाड रोडच्या पश्चिमेला सध्याच्या साई प्रसादालयाकडे जाणा-या रस्त्याच्या रुंदीकरणासह स्वतंत्र पोहोच रस्ता, संस्थानच्या खर्चाने भुसंपादन करुन पोहोच रस्ता तयार करणेच्या २) प्रस्तावित पोहोच रस्त्याची रुंदी निश्चित करणेच्या ३) उक्त रस्त्यासाठी आवश्यक असलेल्या जमीनींचा भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस सादर करणेच्या आणि तदनुषंगाने होणा-या खर्चास मान्यता मिळणेच्या निर्णयार्थ सादर.

(कन्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ५३

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ
मालमत्ता विभाग

विषय – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील गाळे/हॉल भाडेतत्वावर देणेबाबत.

टिपणी –

अधिनियमातील तरतूद – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अथवा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे खालील परिशिष्टात नमुद केलेले व्यापारी गाळे/ हॉल यापूर्वी त्यासमोर दर्शविलेल्या कारणास्तव मासिक भाडेतत्वावर देण्यात आलेले होते. तथापि सदर परिशिष्टातील गाळे/हॉल त्यासमोर दर्शविलेल्या कारणास्तव त्यासमोर दर्शविलेल्या तारखेपासून खाली करणेत आलेली असून सध्यस्थितीत रिकामे आहे. सदर गाळे/हॉल रिकामे असल्यामुळे व सध्यस्थितीत त्याचा वापर नसल्याने त्याची देखभाल होत नाही व व्यवस्था राहात नाही. परिणामी सदर परिसरात अस्वच्छता होत आहे. तसेच संस्थानला सदर गाळे /हॉलपासून मिळणारे भाडयाचे उत्पन्न बंद झालेले आहे.

सदर गाळे/हॉल भाडयाने वापरास मिळणेकामी संस्थानकडे कोणतेही अर्ज प्राप्त झालेले नाहीत.

व्यापारी स्वरुपाचे गाळे

(परिशिष्ट अ)

अ. नं.	जागेचे ठिकाण व इमारतीचे नाव	सर्वे नं. /सिटी सर्वे नं	गाळयाचे/ हॉलचे लोकेशन	गाळयाचे/ हॉलचे क्षेत्र	गाळयाचा/ हॉलचा यापूर्वीचा वापर	गाळे/हॉल खाली करतेवेळेस असलेले मासिक भाडे	गाळा/हॉल रिकामा झालेची तारीख	संभाव्य भाडे
१	शिर्डी साईनाथछाया इमारत	सिटी सर्वे नं.३२	साईनाथछाया इमारत	१२२५.९५ चौ.फुट (हॉल)	स्टेट बॅंक ऑफ इंडिया,शिर्डी	रु.१,३१,७६९/-	०२/११/२०२०	सदरचा हॉल मार्केट परिसरात आहे. सदर बॅंकेने सदरचा हॉल खाली केला नसता तर त्यांना हॉल खाली करते वेळेस असलेले भाडे रक्कम रु.१,३१,७६९ यात १०% वाढ करणेत आली असती.त्याप्रमाणे सदर हॉलचे आज मितीस भाडे सुमारे १,४४,९४६/- इतके झाले असते. म्हणजेच सदर हॉलचे संभाव्य भाडे १,४५,०००/- असे होईल.
२	शिर्डी साईनाथछाया इमारत	सिटी सर्वे नं.३२	साईनाथछाया इमारत	३६९.५६ चौ.फुट (गाळा)	युनियन बॅंक ऑफ इंडिया,शिर्डी	रु.२५,६३०/-	०६/०४/२०१६	सदरचा गाळा मार्केट परिसरात आहे. सदर बॅंकेने सदरचा गाळा खाली केला नसता तर त्यांना हॉल खाली करते वेळेस असलेले भाडे रक्कम रु.२५,६३० मध्ये दरवर्षी १०% वाढ करणेत आली असती.

							त्याप्रमाणे सदर गाळयाचे आज मितीस भाडे सुमारे रु.४१२७६ इतके झाले असते. म्हणजेच सदर हॉलचे संभाव्य भाडे रु.४१५०० असे होईल.
३	साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम)	सर्वे नं. १०९/११	साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम)	२४५.९७ चौ.फुट	--	यापूर्वी सदर जागा त्रयस्थ व्यक्ती/ संस्था यांना भाडेतत्वावर वापरास दिलेली नाही.	सदर परिसरात श्री साई संस्थान एम्प्लॉईज सोसायटी यांना गाळे भाडयाने देणेत आलेले आहेत. त्याचे मासिक भाडे रक्कम रु.६,०४०/- इतके आकारणेत आलेले आहे. म्हणजेच सदर गाळयाचे संभाव्य भाडे रु.६१००/- इतके होईल. तथापि सदर जागा संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.५९६ अन्वये मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित नागपूर यांना शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या भाडे दराने विक्री केंद्राकरीता वापरास देणेचे मुकरर करणेत आलेले आहे. सदर गाळा उक्त महामंडळाने त्यांचेकडील दि.११/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये करार करुन घेवून गाळा वापरास हस्तांतरीत करणेकामी विनंती केलेली आहे.

अर्धव्यापारी स्वरुपाचे गाळे

(परिशिष्ट ब)

१	साई धर्मशाळा	गट नं. १७२	साई धर्मशाळा	१५x१० अंदाजे फुट	--	यापूर्वी सदर जागा त्रयस्थ व्यक्ती/ संस्था यांना भाडेतत्वावर वापरास दिलेली नाही.	सदर परिसर हा निमगाव-को-हाळे शिवारात असून मार्केट परिसरात मोडत नाही. सदर धर्मशाळेचा उपयोग पायी साई पालखी घेवून येणा-या साईभक्तांना नाममात्र दराने मुक्कामासाठी उपलब्ध करुन देणेत येत असतो. सदर धर्मशाळेत नेहमीच गर्दी असते असे नाही. यापूर्वी सदरचे गाळे त्रयस्थ संस्था अथवा त्रयस्थ व्यक्ती यांना भाडे कराराने वापरास दिलेले नाहीत. त्यामुळे या ठिकाणी असलेले गाळे व्यापारी स्वरुपात मोडत नाहीत. सदर परिसरात कोणत्याही प्रकारचे व्यापारी गाळे नाहीत. त्यामुळे सदर गाळयाचे संभाव्य भाडे निश्चित करता येत नाही. यास्तव सदर गाळयांचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभाग ठरविल त्याप्रमाणे निश्चित करता येईल.
२	साई धर्मशाळा	गट नं. १७२	साई धर्मशाळा	१५x१० अंदाजे फुट	--	यापूर्वी सदर जागा त्रयस्थ व्यक्ती/ संस्था यांना भाडेतत्वावर वापरास दिलेली नाही.	वरीलप्रमाणे
३	साई धर्मशाळा	गट नं. १७२	साई धर्मशाळा	१५x१० अंदाजे फुट	--	यापूर्वी सदर जागा त्रयस्थ व्यक्ती/ संस्था यांना भाडेतत्वावर वापरास दिलेली नाही.	वरीलप्रमाणे

रहिवास स्वरुपाचे रुम 281

(परिशिष्ट क)

१	साई समर्पण इमारत	सिटी सर्वे नं.९०८	साई समर्पण इमारत	३२९.५९ चौ.फुट (रुम)	--	यापूर्वी सदर जागा त्रयस्थ व्यक्ती/ संस्था यांना भाडेतत्वावर वापरास दिलेली नाही.	यापूर्वी साई समर्पण इमारतीचे मालक सदरच्या खोल्या साईभक्तांना तात्पुरत्या निवासाकामी प्रति दिवस प्रति रुम रु.१०००/- प्रमाणे वापरास देत होत्या. म्हणजेच सदर रुमचे संभाव्य भाडे दरमहा रु.३०,००० असे होईल.

विभागाचा अभिप्राय – उपरोक्त परिशिष्ट अ मधील अ.नं.३ वर दर्शविलेल्या साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील गाळा वगळून परिशिष्ट अ मधील उर्वरित गाळे व परिशिष्ट ब आणि क मधील दर्शविलेले गाळे/हॉल भाडयाने देणेच्या दृष्टिकोनातून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(३) मधील तरतुदीनुसार सदरचे गाळे/हॉल भाडयाने देणेच्या दृष्टिने स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देवून गाळे/हॉल भाडयाने मिळणेसाठीचे अर्ज मागविता येतील. तसेच सदर गाळे/हॉलचे मासिक भाडेदर शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून निश्चित करुन घेवून त्या भाडेदराने अथवा संस्थान निश्चित करील त्या भाडेदराने यापैकी जे जास्त असेल तो भाडेदर निश्चित करुन त्या भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन ११ महिन्यांचे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स करारावर भाडयाने देता येईल व त्याप्रमाणे अटी व शर्तींवर लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

यापूर्वी संस्थान मालकीचे गाळे/हॉल/जागा लिव्ह ॲण्ड लायसन्स करारावर भाडेतत्वाने देणेकामी स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देवून अर्ज मागविणेत आलेले नाहीत. अशा प्रकारे जाहीरातीद्वारे अर्ज मागविल्यास खाजगी व्यक्ती देखील अर्ज करण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी संस्थानच्या मिळकतीत खाजगी व्यक्तींचा शिरकाव होवून मुदतीनंतर गाळे/हॉल/जागा खाली करुन घेणे दुरापास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरची बाब ही धोरणात्मक आहे. त्यासाठी मा.तदर्थ समितीचे निर्णयानुसार व आवश्यकतेनुसार मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करता येईल अथवा शासनाची मान्यता घेता येईल.

प्रस्ताव – संस्थान मालकीचे उपरोक्त परिशिष्ट अ मधील अ.नं.३ दर्शविलेल्या साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील गाळा वगळून परिशिष्ट अ मधील उर्वरित गाळे व परिशिष्ट ब आणि क मधील दर्शविलेले गाळे/हॉल भाडयाने देणेच्या दृष्टिकोनातून स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देवून गाळे/हॉल भाडयाने मिळणेसाठीचे अर्ज मागविणेच्या तसेच सदर गाळे/हॉलचे मासिक भाडेदर शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून निश्चित करुन घेवून त्या भाडेदराने अथवा संस्थान निश्चित करील त्या भाडेदराने यापैकी जे जास्त असेल तो भाडेदर निश्चित करुन त्या भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन ११ महिन्यांचे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स करारावर भाडयाने देणेच्या व त्याप्रमाणे अटी व शर्तींवर लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

28/6

विषय क्र.- ५४

लाडु प्रसाद निर्मिती विभाग

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय

विषय:- सन २०२०-२०२१ मध्ये (माहे एप्रिल-२०२० ते मार्च-२०२१) दर्शनरांगेत साईभक्तांना मोफत वाटप करणेत आलेल्या लाडूप्रसाद पाकीटांसाठी (५० ग्रॅम वजनाचे ०१ नगाचे पाकीट) आलेल्या खर्चाची एकत्रित नोंदघेणेबाबत.....

टिपणी,

अधिनियम २००४ मधील - सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे, अशी तरतुद केलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव :-मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१३ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.५३७ अन्वये,दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत लाडु प्रसाद वाटप करणेबाबत निर्णय संमत झालेला आहे.

अ) **विषयाची पुर्वपिठीका-** उपरोक्त सभेतील निर्णयानुसार दि.१५ ऑगस्ट २०१३ पासुन दर्शनरांगेतील साईभक्तांना प्रत्येकी १०० ग्रॅमचे वजनाचे एक पाकीट याप्रमाणे लाडु प्रसाद पाकीटांचे वाटप करण्यात येत आहे.तसेच मा.मुख्यलेखाधिकारी साहेबयांनी त्यांचेकडील पत्रात"मोफत लाडु प्रसाद पाकीटे वाटपाचे स्वतंत्र रजिस्टर ठेवावे, प्रत्येक दिवशी उत्पादित केलेली प्रसाद लाडु पाकीटे, वाटप केलली लाडु प्रसाद पाकीटे व शिल्लक राहिलेली लाडु प्रसाद पाकीटे यांचे विवरण दररोज स्वतंत्र ठेवावे, प्रत्येक महिन्यात वाटप केलेले लाडु प्रसाद पाकीटे व त्यासाठी झालेल्या खर्चाची रक्कम जमा-नावे करणेसाठी प्रत्येक महिन्यात खर्चाचा तक्ता तयार करुन लेखाशाखेकडे पाठविण्यात यावा, प्रत्येक महिन्यात प्रसादरुपी वाटप झालेली लाडु पाकिटे व त्यासाठी एकुण निर्धारीत किंमत याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये नोंद घेणेसाठी विषय ठेवण्यात यावा,प्रत्येक महिन्याचे मोफत लाडु प्रसाद पाकीटांचे रेकॉर्ड अंतर्गत लेखापरीक्षकांमार्फत तपासून घेण्यात यावे" असे निर्देश दिलेले आहेत.

मा.मुख्यलेखाधिकारी यांचे उपरोक्त निर्देशानुसार लाडु प्रसाद निर्मिती विभागामार्फत प्रत्येक महिन्यातीलदैनंदिनबुंदी प्रसाद पाकिटांचे वाटपाचा तपशिल, तसेच शालेय विद्यार्थांना माध्यान्ह भोजनासाठी देण्यात आलेल्या सुटी बुंदी पाकिटांचा तपशिल, शिल्लक पाकीटांचा तपशिल,मसिक खर्च जमा-नावे करणे इ. कार्यवाही करण्यात येत आहे.

ब) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०६/२०१४ रोजीचे सभेतील विषय नं.०८ निर्णय क्र.५६४ मध्ये "....दर्शन रांगेतील भक्तांना वाटप केलेला प्रसाद लाडु खर्चाची मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे मान्यतेसाठी सादर करणेत यावा व आर्थिक वर्षाचे शेवटी एकत्रित अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर नोंद घेणेकामी सादर करणेत यावा" असा निर्णय संमत झालेला आहे.

क) तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.११/०९/२०१४ रोजीचे सभेतील विषय नं.११ निर्णय क्र.८०३ मध्ये - "....दर्शन रांगेत साईभक्तांना १०० ग्रॅम वजानाचे दोन लाडुचे पाकिटाऐवजी त्याच वजनाची सुटी (लुज) बुंदिचे पाकिट प्रसाद रूपाने देणेस मान्यता देण्यात आली" असा निर्णय संमत झाला होता, त्यानुसार दि.०१ ऑक्टोंबर, २०१४ रोजीपासुन कार्यवाहीस सुरुवात करणेत आली होती.

ख) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील विषय क्र.२८ निर्णय क्र.६०९ मध्ये - ".....दर्शनरांगेतील साईभक्तांना माहे एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६ अखेर मोफत प्रसाद लाडू/बुंदी वाटपाची नोंद घेण्यात येऊन, त्याकामी आलेल्या एकुण रू.२४,२१,५५,७६४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहु बुंदी प्रसादाचे पाकिट उघडल्यानंतर साईभक्तांकडून पुर्ण प्रसाद खाल्ला जात नाही व तो इतरत्र पायाखाली येतो याकरीता, दर्शनरांगेमधील भक्तांना ५० ग्रॅम वजनाच्या बुंदी प्रसाद पाकिटाचे वाटप करण्यात यावे" असा निर्णय संमत झाला. त्यानुसार दि.०३ सप्टेंबर, २०१६ रोजीपासुन सदरचे कार्यवाहीस सुरुवात करणेत आली व सदर कार्यवाही दि.१७ मार्च, २०२० अखेर पर्यंत सुरु होती.

ग) उपरोक्त परिच्छेद "ख" मधील निर्णयास अनुसरून दि.१७ मार्च, २०२० अखेर पर्यंत साईभक्तांना दर्शनरांगेमध्ये ५० ग्रॅम वजनाचे बुंदी प्रसाद पाकिट वाटप करण्यात येत होते. दरम्यानचे कालावधीमध्ये कोरोना विषाणू (कोव्हीड १९) या संसर्गजन्य साथीचा प्रादुर्भाव रोखणेसाठी मा. केंद्र व राज्य शासनाचे विविध आदेशान्वये तसेच मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील या संदर्भातील मार्गदर्शक

कृ.पा.नं.०२ वर .. ..

निर्देशांनुसार, संस्थान व्यवस्थापनामार्फत लाडू प्रसाद निर्मिती विभागाकडील संपुर्ण कामकाज दि.१७ मार्च, २०२० पासुन ते दि.०२ मार्च, २०२१ अखेरपर्यंत बंद ठेवणेत आले होते.

घ) मा. केंद्र शासनाचे निर्देशानुसार तसेच मा.महाराष्ट्र शासनाचे दि.१४ नोव्हेंबर, २०२० रोजीचे आदेशानुसार, महाराष्ट्र राज्यातील धार्मिक स्थळे काही अटी-शर्तीसहवसदरहू आदेशात नमुद केलेल्या मार्गदर्शक सुचना-वजा-निर्देशानुसार भक्तांसाठी खुली करणेत आलेली होती.त्यानुसार दि.०४/०३/२०२१ रोजीपासुन लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत मोफत लाडु प्रसाद तयार करावायचे कामास सुरुवात करणेत आली असून,दि.०५ मार्च २०२१ रोजीचे मंजुर टिपणीन्वये, दि.०६ मार्च, २०२१ रोजीपासुन दर्शनरांगेत प्रत्येक साईभक्तास ५० ग्रॅम वजनाचे ०१ नगाचे लाडू प्रसाद पाकिट मोफत वाटप करण्यास सुरूवात करण्यात आली होती.

लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत लाडू प्रसाद वाटपासाठी आलेल्या खर्चाचा मासिक अहवाल मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे अवलोकनार्थ सादर करणेत येत असुन, दरमहा मोफत लाडू प्रसाद पाकिटे वाटपासाठी होत असलेला खर्च अन्नदान खाती वर्ग करण्यात येत आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५२३ नुसार माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२१ या आर्थिक वर्षामध्ये मोफत प्रसाद लाडू वाटपासाठी झालेला खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे-

तक्ता क्रमांक – ०१

अ.नं	महिना	बुंदी प्रसाद पाकिटे संख्या	झालेला खर्च
०१	एप्रिल-२०२० ते फेब्रुवारी २०२१	कोरोना विषाणुंच्या वाढत्या प्रांदुर्भावामुळे माहे एप्रिल २०२० ते माहे फेब्रुवारी २०२१ अखेर लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील संपुर्ण कामकाज बंद ठेवणेत आल्यानेलाडु प्रसाद पाकीटे तयार अथवा वितरीत करणेत आलेली नाहीत.	
०२	मार्च-२०२१ (दि.०६/०३२०२१ ते दि.३१/०३/२०२१)	२४७२४५	२११६४१७/-
	एकुण	२४७२४५	२११६४१७/-

विभागाचा अभिप्राय स्पष्ट मत- सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात (माहे एप्रिल २०२० ते मार्च - २०२१)दर्शनरांगेमध्ये साईभक्तांना एकुण २,४७,२४५ इतकी लाडु प्रसाद पाकीटे मोफत वाटप करण्यात आलेली आहेत. तसेच सदर लाडु प्रसाद पाकीटे वाटपासाठी (२,४७,२४५ x ८.५६) **रक्कम रू.२१,१६,४१७/- (अक्षरी रुपये- एकवीस लाख, सोळा हजार चारशे सतरा रुपये मात्र)** इतका खर्च आलेला आहे. सदर खर्चाची रक्कम दरमहा अन्नदान खाती वर्ग करणेत आलेली आहे.

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात उपरोक्त तक्ता क्र.०१ मध्ये नमुद केलेप्रमाणे दर्शनरांगेत साईभक्तांना वाटप करणेत आलेले मोफत लाडू प्रसादासाठी आलेल्या वार्षिक खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर.

21.5.21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ५५

लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय 284

विषय- **लाडु प्रसादाची गुणवत्तेत सुधारणा करणेसाठी बदाम, सुंठ पुड, लिक्वीड ग्लुकोज, खाता सोडा, मीठ व मगज बी इ. किराणा मालाची ९० दिवसांसाठी खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.. ..**

टिपणी,

दि.१७/०३/२०२० रोजी दुपारी ०३.०० वाजेपासुन कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे श्रींचे मंदीर साईभक्तांना दर्शनाकरीता बंद करण्यात आले होतें, तथापी दि.१४ नोव्हेंबर २०२० रोजीचे शासन आदेशान्वये, दि.१६ नोव्हेंबर, २०२० रोजीपासुन श्रींचे मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी खुले करण्यात आले आहे.

दर्शनरांगेमध्ये वाटप करण्यात येणारा ५० ग्रॅमचा सुटी बुंदी प्रसादही साईभक्तांकडुन पुर्णतः खाल्ला जात नाही. त्यापैकी काही साईभक्त सदरचा बुंदी प्रसाद मंदिर परिसरात हिंडणा-या कुत्री, मांजरे यांना खाण्यासाठी साईभक्त जमिनीवर टाकतात, तसेच काही प्रसाद खातांना जमिनीवरती खाली सांडतात, त्यामुळे तो पायाखाली येतो, त्याची नासधुस होते असे निदर्शनात आले आहे.

त्यामुळे सदरच्या ५० ग्रॅम बुंदीप्रसादाऐवजी त्याच वजनाचा ०१ नग लाडुचे पाकीट तयार करुन ते दर्शनरांगेत साईभक्तांना प्रसाद रुपाने वाटप करण्याची संकल्पना मांडण्यात आली होती.

तसेच उपरोक्त संदर्भ क्र.०१ चे टिपणीन्वये लाडू बनविण्याचे प्रक्रियेमध्ये तांत्रिकदृष्टया सुधारणा करून, अधिक रूचकर, स्वादिष्ट व दर्जेदार लाडू बनविणेकामी मुंबई येथील चटपट इन्सेन्ट स्नॅक ॲण्ड ग्रेव्ही, मुंबई या संस्थेच्या प्रतीनिधी वृषाली जोशी ह्या त्यांचे रेसीपीजनुसार तयार केलेल्या लाडूचे नमुने घेवुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो यांचेशी त्यांचे कक्षामध्ये दि.०३/०३/२०२१ रोजी चर्चा करण्यासाठी आले होते. त्यावर सविस्तर चर्चा होऊन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो यांनी चटपच इन्सेन्ट स्नॅक ॲण्ड ग्रेव्ही, मुंबई या संस्थेच्या प्रितनिधीश्रीमती वृषाली जोशी यांचे रेसीपीजनुसार व त्यांचे मार्गदर्शनाखाली लाडूचे प्रायोगिक तत्वावर प्रात्यक्षिक करावयाचे ठरविले होते.

त्यासअनुसरून दि.०३/०३/२०२१ रोजी लाडू तयार करून सदर लाडूचा दर्जा व गुणवत्ता तपासणी कामी सदरचे लाडू मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो यांचे कक्षामध्ये पाठविले असता. सदर लाडू बाबत सविस्तर चर्चा होऊन सदरचा लाडू प्रसाद दर्शन रांगेमध्ये साईभक्तांना मोफत वाटप करणेस हरकत नाही असे सुचविल आहे.

त्यासअनुसरून उपरोक्त संदर्भ क्र.०२ चे टिपणीन्वये दि.०६/०३/२०२१ रोजीपासुन दर्शन रांगेमध्ये साईभक्तांना मोफत लाडू प्रसाद वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

अ) दि.१७/०३/२०२० पुर्वी म्हणजेच लॉकडाऊन पुर्वी मोतीचूर लाडू तयार करणेकरीता साखर, हरबरा दाळ, शुध्द तुप, काजू पाकळी, खिसमिस, हिरवी विलायची व जिलेबी रंग इत्यादी कच्चे मटेरीयल वापरण्यात येत होते. सदर कच्च्या मालाची वार्षिक मागणी तयार करून, त्यास मान्यता घेवुनसदरची मागणी पुढील कार्यवाहीसाठी खरेदी विभागास सादर करणेत येत असे/करण्यात आलेली आहे.

ब) आता नव्या पद्धतीने लाडू प्रसाद तयार करुन वाटप करणेबाबत प्रशासनाने सुचविले आहे. त्यानुसार लाडू प्रसादाची गुणवत्ता व चव सुधारण्याकरीता नव्याने **बदाम, मगज बी, सुंठ, लिक्वीड ग्लुकोज, मीठ व खाता सोडा** इत्यादी अतिरिक्त कच्चा माल/सुका मेवा सदर लाडुमध्ये समाविष्ट करावयाचे असल्यानेवसदरचे साहित्य खरेदी विभागाकडे सध्या उपलब्ध नसल्यामुळे त्याची स्वतंत्र खरेदी करावी लागणार आहे.

सध्या कोव्हीड-१९ मुळे श्रींचे दर्शनाकरीता येणा-या साईभक्तांची संख्या गृहीत धरून दैनंदिन ०५ क्विंटलचे लाडू प्रसाद तयार करण्याचे नियोजन आहे. ०५ क्विंटलचे कच्चा मालापासुन दररोज अंदाजे २१-२२ हजार पाकिटे तयार होतील असे गृहीत धरूनव भविष्यात साईभक्तांची होणारी वाढती गर्दी लक्षात घेवुन सरासरी १० क्विंटलचे लाडू तयार करावयाचे गृहीत धरून पुढील ९० दिवसांकरीता लागणारा कच्चा मालबदाम, मगज बी, सुंठ, लिक्वीड ग्लुकोज, मीठ व खाता सोडाइ.अंदाजीत मागणी व त्यासाठीचा खर्च खालीलप्रमाणे –

अ.नं	मालाचे वर्णन	दैनंदिन सरासरी आवश्यक माल (कि. ग्रॅं.)	९० दिवसांकरीता सरासरी आवश्यक माल पुर्णाकीत (कि. ग्रॅं.)	दर प्रती कि. ग्रॅं.	एकूण रक्कम रुपये
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(४ X ५)= (६)
१	बदाम	२०	१८००	६७०/-	१२,०६,०००/-
२	मगज बी	१६	१४४०	१४०/-	२,०१,६००/-
३	सुंठ अखंड	२.५००	२२५	३००/-	६७,५००/-
४	खाता सोडा	०.९६०	९०	३००/-	२७,०००/-
५	टाटा मीठ	०.३२०	३०	२०/-	६००/-
६	लिक्वीड ग्लुकोज	१.७००	१६०	६०/-	९,६००/-
	एकुण	---	---	---	१५,१२,३००/-

कृ.पा.नं.०२ वर .. ..

ख)

१) उपरोक्त तक्त्यामधील (अ.नं.०२) मगज बी, (अ.नं.०३) सुंठ अखंड, व (अ.नं.५) मीठ हा किराणा माल श्री साई प्रसादालयाचे वार्षिक खरेदीत समाविष्ट आहेत. त्यामुळे सदरचा किराणा माल (मगज बी, सुंठ अखंड, मीठ इ.) सन २०२०-२१ किंवा २०२१-२२ चे मंजुर खरेदी दराने वाढीव मागणी म्हणुन खरेदी विभागामार्फत खरेदी करता येईल.

२) या व्यतिरिक्त उपरोक्त तक्त्यातील (अ.नं.०१) बदाम किराणा माल नव्याने वापरणेत येत असून, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पुढील ९० दिवसांसाठी अंदाजे १८०० कि.ग्रॅ बदाम आवश्यक आहेत. आजचे बाजारभावाने बदाम खरेदीसाठी अंदाजे रक्कम रू.१२,०६,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे याकामी मा. तदर्थ समितीची मान्यता घेऊन, सदर खरेदीसाठी खरेदी विभागामार्फत स्वतंत्ररित्या ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

३) तसेच (अ.नं.०४) खाता सोडाव (अ.नं.०६) लिक्विड ग्लुकोज हा किराणा माल पुढील ९० दिवसांसाठी अंदाजे अनुक्रमे ९० किलो व १६० किलो आवश्यक असुन, त्यासाठी आजचे बाजारभावाने अंदाजे रक्कम रू.३६,६००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे सदर किराणा मालाची खरेदी स्थानिक स्तरावर खरेदी विभागामार्फत दरपत्रके मागवुन करता येईल.

प्रस्ताव-

१) उपरोक्त मुद्दा क्र. (क-१) मध्ये नमुद केलेप्रमाणे, मगज बी, अखंड सुंठ, व मीठ सन २०२०-२१ किंवा सन २०२१-२२ चे मंजुर खरेदी दराने आवश्यकतेनुसार जादा मागणी म्हणुन खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्याकामी येणारे रक्कम रू. २,६९,७००/-(अक्षरी रूपये - दोन लाख एकोणसत्तर हजार सातशे) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

२) उपरोक्त मुद्दा क्र. (क्र-२) मध्ये नमुद केलेला बदाम हा किराणा माल खरेदीसाठी मा.तदर्थ समितीचे मान्यतेनंतर खरेदी विभागामार्फत विहीत पद्धतीने ई-निविदा मागवुन खरेदी करणेस व त्याकामी येणारे रक्कम रू.१२,०६,०००/- (अक्षरी रूपये - बारा लाख सहा हजार)मात्रचेखर्चास मान्यता असावी.

३) उपरोक्त मुद्दा क्र. (क्र-३) मध्ये नमुद केलेप्रमाणे खाता सोडा व लिक्विड ग्लुकोज खरेदी कामी स्थानिक पुरवठादाराकडून खरेदी विभागामार्फत दरपत्रके मागवुन खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रू. ३६,६०० (अक्षरी रूपये –छत्तीस हजार सहाशे) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

उपरोक्त अ.नं.०१, ०२ व ०३ मध्ये नमुद केलेप्रमाणे लाडु प्रसाद निर्मितीसाठी आवश्यक असणारा किराणा माल / साहित्य ९० दिवसांसाठी खरेदी करणेसाठीचा प्रस्ताव मान्यता मिळणेसाठी मा. तदर्थ समितीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

7/6/2021

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

विषय क्र.- ५६

286

लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय

विषय – दर्शन रांगेत साईभक्तांना वाटप करणेत येत असलेल्या ५० ग्रॅम सुटी बुंदी प्रसाद पाकीटाऐवजी त्याच वजनाने ०१ नगाचे लाडू पाकीट प्रसाद रूपाने विनामुल्य वाटप करणेस मान्यता मिळणेबाबत ...

टिपणी,

अ) विषयाची पुर्वपिठीका – श्रीं चे दर्शनासाठी राज्यातुन, देशातुन परदेशातुन साईभक्त येत असतात. साईंचे काकड आरतीनंतर श्रींचे मंगल स्नान होऊन दर्शनरांग सुरु होऊन साईभक्तांना दर्शन घेऊन बाहेर पडण्यासाठी साधारणतः ०२ तासांचा कालावधी लागतो. तर गर्दीचे काळात दर्शन रांगेतुन दर्शन घेऊन बाहेर पडण्यासाठी किमान ०३ तास किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी लागतो, त्यामुळे दर्शन रांगेतुन दर्शन कालावधीमध्ये साईभक्तांना अल्पोपहार देणे गरजेचे असते. तथापि, श्रींचे दर्शनसाठी येणा-या साईभक्तांची संख्या मोठया प्रमाणात असल्याने इतक्या मोठया प्रमाणावर इतक्या मोठया प्रमाणावर दर्शन रांगेत अल्पोपहार देणे अशक्य असल्याने श्री साईबाबा संस्थानतर्फे श्रीं चा प्रसाद म्हणुन ०१ नगाचे मोतीचुर बुंदीचे लाडु तयार करुन ते साईभक्तांना मोफत वाटप करण्याची संकल्पना मांडण्यात आली व त्यास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१३ रोजीचे सभेतील विषय क्र.०८ व निर्णय क्र.५३७ मान्यता देण्यात आली. त्यानुसार लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत मोतीचूर लाडूप्रसाद तयार करण्यासाठी आवश्यक असणारे किराणा मटेरियल (जसे - साखर, हरबरा दाळ, शुध्द तुप, काजू पाकळी, खिसमिस, हिरवी विलायची व जिलेबी रंग इ.) संस्थानचे खरेदी विभागामार्फत खरेदी करण्यात येते. लाडु प्रसाद निर्मिती विभागाचे दैनंदिन गरजेनुसार मध्यवर्ती भांडार विभागाकडे मागणीपत्र नोंदवुन सदरचा कच्चा माल घेऊन मोतीचुर बुंदी लाडू व सुटी बुंदी व बर्फी प्रसाद निर्मितीचे काम करण्यात येत आहे. लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडुन दैनंदिन ३०,००० ते ३५,००० मोतीचुर लाडु प्रसाद पाकीटे भक्तांना वितरीत (विक्री) करणेत येतात. सदर ५० ग्रॅम वजनाचा ०१ लाडु असे ०३ नग लाडुचे एक पाकीट (१५० ग्रॅम वजनाचे) तयार करणेकामी सर्व खर्चासह साधारणतः रुपये २३.३३ पैसे इतका खर्च येतो.

ब) श्रींचे दर्शन घेतलेनंतर साईभक्तांना प्रसाद वाटपाबाबत वेळोवेळी मा.व्यवस्थापन समितीचे सभांमध्ये यापुर्वी खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेले आहेत.

i. दि.२६/०७/२०१३ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.५३७ मध्ये –

श्रींचे दर्शनसाठी येणा-या साईभक्तांना दर्शनासाठी रांगेत उभे राहावे लागते व पुन्हा रांग लावुनच लाडु प्रसाद घ्यावा लागतो. यामध्ये परत-परत रांगेमध्ये उभे राहण्याचा साईभक्तांना त्रास होतो, हा भक्तांचा त्रास कमी व्हावा व त्यांना विनामुल्य प्रसाद मिळावा, तसेच संस्थानला दररोज मिळणा-या उत्पन्नाचा विचार करता लाडु प्रसाद भक्तांना मोफत देता येईल व निर्णयाने भक्तांना समाधान मिळेल, असे समितीला वाटते. विद्यमान मा.उच्च न्यायालयाची परवानगी मिळाल्यास दि.१५ ऑगस्ट, या शुभदिनापासुन या निर्णयाची अंमलबजावणी करणेत येईल. याकरीता विधी विभागामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठात परवानगीसाठी अर्ज दाखल करणेत यावा.

श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना दर्शन रांगेतुन विनामुल्य प्रसाद लाडुचे वितरण केल्यास अन्नदान फंडातील अखर्चीत उत्पन्नाचा विनियोग होईल. तसेच सदरचे मोतीचुर लाडु हे शुध्द गावरान तुपापासुन बनविलेले असल्याने ते सकस व पौष्टीक असतात त्यामुळे दर्शन रांगेमधुन साईभक्तांना प्रसाद लाडुचे मोफत वितरण केल्यास साईभक्तांना त्याचा अल्पोपहार / प्रसाद म्हणुनही उपयोग करता येईल, या सर्व बाबींचा विचार करता मा.त्रिसदस्यीय समिती, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाच्या निर्णयास अधीन राहुन दि.१५ ऑगस्ट, २०१३ पासुन साईभक्तांना दर्शन रांगेमध्ये मोफत लाडु प्रसाद वाटप करणेस मान्यता देत आहे.

दर्शन रांगेमध्ये साईभक्तांना प्रत्येकी ५० ग्रॅमचे दोन लाडु, भक्तांना हातात धरणे सोपे होईल अशा कागदी पिशवीमध्ये वाटप करणेत यावे, तसेच ज्या साईभक्तांना जास्त लाडु पाकीटांची आवश्यकता असेल अशा साईभक्तांसाठी पुर्ववत लाडु विक्री काऊंटर चालु ठेवणेत यावे, या काऊंटर्सवर पुर्वीप्रमाणे प्रत्येकी ५० ग्रॅमच्या तीन लाडुचे ०१ पाकीट विक्रीसाठी ठेवणेत यावे. मात्र या सशुल्क लाडु पाकीटाची किंमत रु.१०/- ऐवजी रु.२०/- मात्र प्रती पाकीट ठेवणेत यावी व एका साईभक्तांस फक्त ०२ लाडु प्रसाद पाकीटे देण्यात यावीत.

कृ.पा.नं.०२ वर.. ..

आपल्याकडे एका दिवसासाठी असलेल्या साठयामधुनच हि विक्री करणेत यावी. त्या दिवसांचा साठा संपुष्टात आल्यास सशुल्क लाडु विक्री काऊंटर्स त्या दिवसापुरते बंद ठेवणेत यावे.

दर्शन रांगेमधुन मोफत प्रसाद दिल्यामुळे अंदाजे २५% किंवा त्यापेक्षा कमी साईभक्त सशुल्क लाडु प्रसाद पाकीटे खरेदी करतील असे वाटते व या २५% भक्तांना लाडु प्रसाद प्रती पाकीट रु.२०/- मात्र दराने दिल्यास संस्थानच्या आवकमध्ये वाढ होईल. आजरोजी एका दिवसाला अंदाजे ५०, ००० लाडु प्रसाद पाकीटांची विक्री हौत आहे. यामधुन दर्शन रांगेमध्ये लाडु प्रसाद पाकीटांची मोफत वाटप केल्यास अंदाजे फक्त २५% साईभक्त लाडु प्रसाद पाकीटे खरेदी करतील, म्हणजेच १२,५०० पाकीटे सशुल्क द्यावे लागतील व या पाकीट विक्रीमधुन संस्थानला वार्षिक रु.९,१२,५०,०००/- मात्र रक्कम प्राप्त होणार आहे. आज आपण रु.१०/- मध्ये ०३ लाडु साईभक्तांना देतो. परंतु रु.२०/- मात्र प्रती लाडु प्रसाद पाकीट किंमत झाल्यास त्यामुळे रु.५/- कोटी मात्र वर्षाला जादा रक्कम मिळेल, ही रक्कम मोफत लाडु प्रसाद पाकीट वाटपासाठी खर्च होणा-या रु.१३ कोटीमधुन वजा करुन प्रचलीत पध्दतीनुसार सन २०१२-२०१३ ची आकडेवारी पाहता सध्या प्रसाद लाडुसाठी देत असलेले अनुदान गृहीत धरुन अतिरिक्त रु.८ ते ९ कोटी मात्र आर्थिक भार संस्थानला सोसावा लागेल.

हा महत्वाचा आर्थिक निर्णय असल्यामुळे याबाबत संस्थान वकीलामार्फत मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठाची मान्यता घेणेत यावी. तसेच दि.१५ ऑगस्ट, २०१३ पासुन सदर निर्णयाची अंमलबजावणी करावयाची असल्याने याबाबत तात्काळ योग्य तो पाठपुरावा करणेत यावा, असे ठरले.

तसेच लाडु तयार करण्याचे काम पुर्णतः मनुष्यबळाकरवी चालत असल्यामुळे व याकामी बाजारात अद्याप परीपक्व अशा मशिनरीज उपलब्ध नाहीत, त्यामुळे सदरची लाडु वळविणेसाठी पुर्णतः मनुष्यबळावरच अवलंबुन राहावे लागते. तसेच मोतीचुर बुंदी लाडु तयार करण्याची प्रक्रीयेसाठी सुमारे ०६ ते ०८ तासांचा कालावधी लागत असल्यामुळे साईभक्तांना दर्शन रांगेत मोफत प्रसाद वाटपाबाबत खालीप्रमाणे बदल करणेत येवुन त्यास मान्यता देण्यात आली.

ii. दि.११/०९/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ८०३ मध्ये –

दर्शन रांगेमध्ये भक्तांना १०० ग्रॅम वजनाचे दोन लाडुंचे पाकीट ऐवजी त्याच वजनाच्या सुटी (लुज) बुंदीचे पाकीट प्रसाद रुपाने देणेस मान्यता देण्यात आली, मात्र प्रसाद लाडु विक्री काऊंटरवर पुर्वीप्रमाणेच १५० ग्रॅम वजनाचे ०३ नग लाडुंचे पाकीट विक्रीसाठी ठेवणेत यावे, असे ठरले.

दि.११/०९/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाची अंमलबजावणीची कार्यवाही दि.०१/१०/२०१४ रोजीपासुन सुरु करणेत आली.

तसेच माहे एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ अखेर दर्शन रांगेत साईभक्तांना मोफत प्रसाद लाडु / बुंदी वाटपाकामी झालेल्या खर्चाची नोंद घेतांना मोफत सुटी बुंदी प्रसाद वाटपाबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यामध्ये खालीलप्रमाणे निर्णय संमत झाला आहे.

iii. दि.३१/०८/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.६०९ मध्ये -

दर्शनरांगेतील साईभक्तांना माहे एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ अखेर मोफत प्रसाद लाडु / बुंदी वाटपाची नोंद घेण्यात येऊन, त्याकामी आलेल्या एकुण रु.२४,२१,५५,७६४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच सदरहु बुंदी प्रसाद पाकीट उघडल्यानंतर साईभक्तांकडुन पुर्ण प्रसाद खाल्ला जात नाही व तो इतरत्र पडुन पायाखाली येतो, याकरीता दर्शनरांगेमधील भक्तांना ५० ग्रॅम वजनाच्या बुंदी प्रसाद पाकीटाचे वाटप करण्यात यांवे, असे ठरले. दि.३१/०८/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत ठरलेप्रमाणे निर्णयाची अंमलबजावणी दि.०३/०९/२०१६ रोजीपासुन सुरु करणेत आली.

लॉकडाऊन पुर्वी- दि.१७ मार्च २०२० अखेर पर्यंत दर्शनरांगेत प्रत्येक साईभक्तांस प्रत्येकी ५० ग्रॅम वजनाचे सुटी बुंदीचे ०१ पाकीट मोफत वाटप करणेत येत आहे. तथापि, ब-याच वेळा सदरचा ५० ग्रॅमचा सुटी बुंदी प्रसादही साईभक्तांकडुन पुर्णतः खाल्ला जात नाही. त्यापैकी काही प्रसाद मंदिर परिसरात हिंडणा-या कुत्री, मांजरे यांना खाण्यासाठी साईभक्त जमिनीवर टाकतात, तसेच काही प्रसाद खातांना जमिनीवरती खाली सांडतात, त्यामुळे तो पायाखाली येतो, त्याची नासधुस होते असे निदर्शनात आल्याने सदरच्या ५० ग्रॅम बुंदीप्रसादाऐवजी त्याच वजनाचा ०१ नग लाडुचे पाकीट तयार करुन ते दर्शनरांगेत साईभक्तांना प्रसाद रुपाने वाटप करता येईल अशी संकल्पना मांडण्यात आली व त्यास प्रथमत: प्रायोगिक तत्वावर सुरू करणेबाबत व मा.तदर्थ समितीची मान्यता घ्यावी असे ठरले.

कृ.पा.नं.०३ वर .. ..

क) तथापी दि.०२/०२/२०२१ रोजीचे मंजुर टिपणीन्वये चटपट इन्स्टंन्ट स्नॅक अॅण्ड ग्रेव्ही, मुंबईया संस्थेच्या प्रतिनिधी श्रीमती वृषाली जोशीयांचे रेसीपीजनुसार लाडूचे प्रायोगिक तत्वावर प्रात्यक्षिक करणेबाबत कळविण्यात आले होते, त्यासअनुसरून दि.०३/०३/२०२१ रोजी **"साखर, हरभरा बेसन, शुद्ध तुप, काजु, बदाम, हिरवी विलायची, सुंठ, मगज बी, लिक्वीड ग्लुकोज,खाता सोडा, मीठ, रवा इ."** कच्चा माल वापरून लाडू बनविण्याचे प्रात्यक्षिक करण्यात आले.

सदरचे मटेरीयल(कच्चामाल) वापरून तयार केलेले लाडू दि.०३/०३/२०२१ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो यांचे कक्षामध्ये चव व दर्जा तपासणेसाठी पाठविले असता त्यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त मटेरीयल मधुन रवा वगळुन, इतर सर्व साहित्यांचा वापर करून ५० ग्रॅम वजनाचे लाडू तयार करणेबाबत सुचविले आहे.

सन २०१९-२० मध्ये **साखर, हरबरा दाळ, शुध्द तुप, काजू पाकळी,हिरवी विलायची,इ.**कच्चा (मटेरीयल) माल वापरून दर्शन रांगेमध्ये साईभक्तांना ५० ग्रॅम वजनाचा मोफत बुंदी प्रसाद पाकिटे वितरीत करण्यात येत होते. सदर बुंदी प्रसादाचे ०१ पाकिट तयार करण्यासाठी सरासरी७.८७ इतका खर्च येत होता.

तथापि, नविन पध्दतीनुसार **"साखर, हरबरा दाळ, शुध्द तुप, काजू पाकळी, बदाम, हिरवी विलायची, सुंठ, मगज बी, लिक्वीड ग्लुकोज, खाता सोडा, मीठ इ."** किराणा मटेरीयलपासुन तयार होणारे लाडु प्रसाद म्हणुन वाटप करावयाचे झाल्यास ०१ नगास ७.६८ इतका अंदाजे खर्च येणार आहे. तसेच या अंदाजे खर्चात परिस्थितीनुसार वाढ व घट ही होऊ शकते. त्यानुसार दैनंदिन २०,००० नग मोफत लाडु वाटपासाठी रक्कम रु.१,५३,६३९/- (रु.७.६८X २०,००० पाकीटे) इतका खर्च अपेक्षित आहे, व सदरचा खर्च अन्नदान खाती खर्ची टाकता येईल असे या विभागाचे नम्र मत आहे.

ड) विभागाचा स्पष्ट अभिप्राय –

मा.राज्य शासनाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०२० रोजीचे आदेशासमवेत प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सुचना -वजा-निर्देशाप्रमाणे खालीलप्रमाणे नमुद करणेत आलेले आहे-

".. .. 04. All religious places shall also ensure:

.. ..viii. Any shopes,stalls,cafeteria etc., outside and within the permises shall follow social distancing norms at all times.

आवारातील किंवा परिसरातील दुकाने, स्टॉल्स, कॅफेटेरिया ई. ठिकाणी शरिरीक अंतराचे पालन नेहमी करणेत यावे.

.. ..xix.No physical offerings like Prasad/ distribution/ or sparkling of holy water, etc. to be allowed inside the religious place.

धार्मिक स्थळांवर मानवी स्पर्श होईल अशा रितीने प्रसाद/तीर्थ वितरण इ. करणेत येऊ नये.

.. ..xx. Commuinity kichense/ langars/ "Ann-daan" etc. at religious places should follow physical distancing norms while preparing and distributing food."

धार्मिक स्थळी सामुदायिक स्वयंपाकघर/लंगर/ "अन्न-दान" इत्यादींनी अन्न तयार करताना आणि वितरण करताना शारीरिक अंतराच्या निकषांनचे पालन केले पाहिजे.

उपरोक्त् निर्देशांचा विचार करता, श्री साई प्रसादालयात गेले ०३ महिन्यापासुन कोव्हीड-१९ रोग प्रतिबंधक उपाययोजनांचे पालन करून, प्रसाद भोजन तयार करून वितरित करणेत येत आहे.त्याच धर्तीवर लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत भक्तांना उपलब्ध करून द्यावयाचे बुंदी लाडू प्रसादाचे उत्पादन व वितरण, कोव्हीड-१९ या संसर्गजन्य साथीचे रोगासंबंधित मा.शासनाने निश्चित केलेल्या प्रतिबंधक नियम-निर्देशांचे पालन करून सुरू करता येईल.

तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीने वेळोवेळी मान्यता दिलेनुसार सुटी बुंदी प्रसाद (५० ग्रॅम पाकिट) दर्शन रांगेत साईभक्तांना विनामुल्य प्रसाद म्हणुन वाटप करणेत येत आहे, त्याच मान्यतेस अधिनराहुन प्रायोगिक तत्वावर बुंदी लाडू (५० ग्रॅम वजनाचा ०१ लाडू) पाकिटे दर्शन रांगेतील भक्तांना विनामुल्य वितरीत करता येतील तसेच सुधारित पद्धतीने करावयाचे लाडूमध्ये चवीसाठी समाविष्ट करावयाचे बदाम,सुंठ, मगज बी, लिक्वीड ग्लुकोज, खाता सोडा, मीठया साहित्यांसाठी स्वतंत्र खरेदी प्रस्ताव अलहिदा सादर करता येईल.

कृ.पा.नं.०४ वर.. ..

सध्या खरेदी विभागामार्फत खरेदी करणेत येणारे व पुर्वीपासुन उपलब्ध असलेल्या हरभरा दाळ, शुध्द (गावरान) तुप, हिरवी विलायची, सुंठ, काजु पाकळी, इत्यादी कच्चा माल / साहित्य वापरुन बुंदी लाडू तयार करण्यात येऊन त्याचे दर्शनरांगेमध्ये साईभक्तांना श्रींचा प्रसाद म्हणुन विनामुल्य वाटप करता येईल.

तरी दर्शनरांगेत साईभक्तांना मोफत वाटप करण्यात येणा-या सुटी बुंदी प्रसादाऐवजी लाडू प्रसाद असा बदल करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

7/6/21

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

3/6/21

विषय क्र.- ५.७

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय

(लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग) **290**

विषय - सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात लाडु प्रसाद बनविणेसाठी हरभरा दाळ व हिरवी विलायची या किराणा मालाची मान्य घट-तुटीपेक्षा जादा आलेल्या घट- तुटीस मान्यता मिळणेबाबत.....

टिपणी.

अधिनियम २००४ मधील तरतूद – सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१(१)(घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे अशी तरतुद केलेली आहे.

विषयाची पुर्वपिठीका – कोरोना विषाणुं या साथीच्या रोगाचे प्रादुर्भावापुर्वी (लॉकडाऊनपुर्वी) लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागांतर्गत श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे गर्दीनुसार दैनंदिन सरासरी अंदाजे ४०,००० ते ५०,००० मोफत बुंदी प्रसाद पाकीटे व सरासरी २५,००० ते ३०,००० मोतीचुर लाडु प्रसाद पाकीटांची निर्मिती करुन विक्री केली जाते. श्रींचे उत्सव कालावधीमध्ये सदरची पाकटांची संख्या वाढुन अंदाजे ६५,००० ते ७०,००० मोफत बुंदी प्रसाद पाकीटांचे वाटप केले जाते व अंदाजे ४०,००० ते ५०,००० लाडु प्रसाद पाकीटांची विक्री केली जाते. सदरचा प्रसाद तयार करणेसाठी लागणारे कडधान्य (हरभरा दाळ) लाडु विभागाकडील मशिनव्दारे व मनुष्यबळाव्दारे दाळीमध्ये निघणा-या काडया, खडे स्वच्छ करण्यात येते व त्यानंतर पीठ गिरणीवर सदरची हरभरा दाळ दळुन घ्यावी लागते, दाळ दळल्यानंतर तिच्या वजनामध्ये घट-तुट येते.

(अ) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.०७.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६० (३१) अन्वये, सन २००७ - २००८ या आर्थिक वर्षात आलेली प्रत्यक्ष घट/तुट खर्ची टाकण्यात आली होती. मात्र सदरील घट-तुटीस मान्यता देतांना अंतर्गत लेखापरीक्षक - मा. श्री. ए. जी. लोंगाणी व मुख्यलेखाधिकारी यांनी पुढील कालावधीसाठी खालीलप्रमाणे सुचना (नियमावली) सुचविली होती. सदर नियमावलीस मा. व्यवस्थापन समितीने दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६० (३१) नुसार मान्यता देण्यात आली आहे.

१. सन २००७ - ०८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट, इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचलित घट-तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असुन, इतरांचे तुलनेने कमी असल्याने प्रस्तावित प्रमाणानुसार घट-तुट जमा - नांवे टाकणेत यावी.
२. दर ०६ महिन्यांनी प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची पडताळणी करावी.
३. दर ०६ महिन्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणीअंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरीपेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर अवलोकनार्थ सादर करावा, मात्र प्रस्तावित सरासरीपेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

(ब) उपरोक्तप्रमाणे नियमावलीनुसार दरवर्षी लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागातील एकुण खर्ची पडलेल्या किराणा मालातील प्रत्यक्ष कमी आलेल्या घट-तुट मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे. तथापि, सन २०२०-२०२१ या कालावधीमध्ये कोरोना विषाणु (कोव्हीड १९) या संसर्गजन्य साथीचा प्रादुर्भाव रोखणेसाठी मा.केंद्र व राज्य शासनाचे विविध आदेशान्वये, तसेच मा. जिलहधिकारी, अहमदनगर यांचेकडील यासंदर्भातील मार्गदर्शक निर्देशांनुसार, संस्थान व्यवस्थापनामार्फत लाडु प्रसाद निर्मिती विभागाकडील संपुर्ण कामकाज दि.१७ मार्च २०२० पासुन ते दि.०२ मार्च २०२१ अखरेपर्यंत बंद ठेवणेत आले होते.

सदरचे कालावधीत बेसन आटा खराब होऊ नये, याकरीता वेळोवेळी चाळुन घेणेत येत होता. तसेच हरभरा दाळ किडीपासुन संरक्षण व्हावे, याकरीता दर १५ दिवसांनी उन्हात वाळवण्यात येत होती. सदरची प्रक्रीया अनेकवेळा केली असल्याने यावर्षी मान्य घट-तुटीपेक्षा अत्यल्प प्रमाणात म्हणजेच ००.३०० ग्रॅम इतकी जादा घट-तुट आलेली असुन, एकुण प्रती क्विंटल २.३०० ग्रॅम इतकी घट-तुट आलेली आहे.

कृ.मा. प. .. .. पान २ वर ..

(क) मा.केंद्र शासनाचे निर्देशांनुसार तसेच मा.महाराष्ट्र शासनाचे दि.१४ नोव्हेंबर, २०२० रोजीचे आदेशांनुसार, महाराष्ट्र राज्यातील धार्मिक स्थळे काही अटी-शर्तींसह व सदरहु आदेशात नमुद केलेल्या मार्गदर्शक सुचना वजा निर्देशांनुसार भक्तांसाठी खुली करणेत आली होती. त्यानुसार दि.०४/०३/२०२१ रोजीरपासुन लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत मोफत लाडु प्रसाद तयार करावयाचे कामास सुरुवात करणेत आली. दि.०५ मार्च, २०२१ रोजीचे मंजुर टिपणीन्वये, दि.०६ मार्च २०२१ रोजीपासुन दर्शनरांगेत प्रत्येक साईभक्तांस ५० ग्रॅम वजनाचे ०१ नगाचे लाडु प्रसाद पाकीट मोफत वाटप करणेस सुरुवात करण्यात आली.

दि.०५ मार्च २०२१ रोजीचे मंजुर टिपणीन्वये, दि.०६ मार्च २०२१ रोजीपासुन दर्शनरांगेत प्रत्येक साईभक्तांस ५० ग्रॅम वजनाचे ०१ नगाचे लाडु प्रसाद पाकीट मोफत वाटप करणेस सुरुवात करण्यात आल्याने माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२१ या आर्थिक वर्षामध्ये मोफत प्रसाद लाडू वाटप व विक्रीसाठी खर्च झालेल्या किराणा मालाचा तपशिल खालीलप्रमाणे-

सन २०२०-२१ मध्ये कडधान्य व किराणा मालामध्ये आलेल्या घट-तुटीचा तपशिल

दिनांक	किराणा मालाचा तपशिल	मागिल शिल्लकेसह एकुण जमा / आवक माल	झालेला एकुण खर्च माल	दि.३१.३.२१ विभागाकडील प्रत्यक्ष शिल्लक	प्रत्यक्ष आलेली घट-तुट	घट-तुटीचे प्रमाण प्रती कि.ग्रॅ. (प्रती क्विं.)	प्रती क्विंटलला मान्य घट-तुटीचे प्रमाण
		कि. ग्रॅ.	कि. ग्रॅ.	कि. ग्रॅ.	कि.ग्रॅ.	कि.ग्रॅ.	कि.ग्रॅ.
एप्रिल२०-२० ते फेब्रुवारी २०२१	कोरोना विषाणुंच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे माहे एप्रिल २०२० ते माहे फेब्रुवारी २०२१ अखेर लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील संपुर्ण कामकाज बंद ठेवणेत आल्याने लाडु प्रसाद पाकीटे तयार अथवा वितरीत करणेत आलेली नाहीत.						
मार्च-२०२१ (दि.०६/०३/२०२१ ते दि.३१/०३/२०२१)	हरभरा दाळ	२०,१६०.००२	१७,६७४.०००	२,०१९.०००	४६७.००२	०.०२३ (२.३००)	०२ .०००
	हिरवी विलायची	२१६.८५०	१९९.९००	१६.०००	००.९५०	०.००४ (०.४००)	०१.०००

(ड) **मागणी** - सन २०२०-२०२१ या कालावधीमध्ये कोरोना विषाणू (कोव्हीड १९) या संसर्गजन्य साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी संस्थान व्यवस्थापनामार्फत लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील संपुर्ण कामकाज दि.१७ मार्च २०२० पासुन ते दि.०२ मार्च, २०२१ अखेरपर्यंत बंद ठेवणेत आल्याने सदरचे कालावधीत बेसन आटा खराब होऊ नये याकरीता वेळोवेळी चाळुन घेणेत येत होता. तसेच हरभरा दाळीची किडींपासुन संरक्षण व्हावे, याकरीता दर १५ दिवसांनी उन्हात वाळवण्यात येत होती. सदरची प्रक्रीया अनेकवेळा केली असल्याने यावर्षी मान्य घट-तुटीपेक्षा अत्यल्प प्रमाणात जादा घट-तुट आलेली आहे.

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये प्रत्यक्ष शिल्लक किराणा मालाचा साठा व रजिस्टरप्रमाणे खर्ची पडलेला किराणा माल याची तपासणी करुन उपरोक्त तक्त्यातील घट-तुटीचे अवलोकन करता प्रत्यक्ष आलेली घट-तुट ही मान्य असलेल्या घट-तुटीच्या प्रमाणापेक्षा अल्प प्रमाणात म्हणजेच प्रती क्विंटल ००.३०० ग्रॅम जादा असुन, एकुण प्रती क्विंटल २.३०० ग्रॅम इतकी घट-तुट येत आहे. त्यामुळे मा.व्यवस्थापन समितीने दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६० (३१) मधील नियमावलीमधील अ.क्र.०३ नुसार सदरील मान्य घट-तुटीपेक्षा अत्यल्प प्रमाणात जादा असलेल्या घट-तुटीस मान्यता घेणेकामी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करावा लागणार आहे.

(इ) **विभागाचा स्पष्ट अभिप्राय व मत** – लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील दि.०१/०४/२०२० ते दि.३१/०३/२०२१ या कालावधीत कडधान्य व किराणा मालात झालेल्या घट-तुट ही मा.मुख्यलेखाधिकारी तसेच अंतर्गत लेखापरीक्षक यांनी सुचविलेल्या सुचनास (नियमावली अधीन राहुन) आहे, तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार मान्य घट-तुटीचे प्रमाणापेक्षा अत्यल्प प्रमाणात म्हणजेच ००.३०० ग्रॅम जादा असुन, एकुण २.३०० कि.ग्रॅ. इतकी घट-तुट येत आहे. तरी सदरच्या प्रती क्विंटल आलेल्या एकुण ०२.३०० कि.ग्रॅ. घट-तुटीस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निणयार्थ सविनय सादर.

29/03/21

कान्हूराज बगाटे (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

ICRPNO-272

विषय क्र.- ५८

लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग

292

मा. तदर्थ (Adhoc) समितीचे सभेपुढील विषय

विषय- सन २०२२ करीता लाडू व बर्फी प्रसाद बनविणेकामी उक्त्या मजुरीची अंदाजे रक्कम रु.१.५० कोटी मात्र खर्चाची ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत....

टिपणी

अधिनियम २००४ मधील तरतुद - सन २००४ चा महाराष्ट अधिनियम क्रमांक १४(भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील २१(१घ) नूसार श्री साईभक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

अ) प्रास्ताविक (पार्श्वभूमी) - लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग दि.०३/०१/२०१४ रोजीपासून श्री साई प्रसादालय विभागापासुन स्वतंत्र करून त्याची स्वतंत्र आस्थापना तयार करणेत आलेली आहे. त्यानुसार उपरोक्त अधिनियमास अनुसरुन सदरचे विभागामार्फत उक्त्या मजुरी दरांची ई-निविदा मागवुन लाडु, बुंदी व बर्फी प्रसाद तयार करण्यात येत आहे. "श्रीं"चे दर्शन घेतल्यानंतर दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना श्रींचा प्रसाद घरी घेऊन जाता यावा या सात्वीक उद्देशाने व मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय, अधिनियम व आयएसओ चे नियमावलीस अधिन राहुन संस्थानचे लाडु प्रसाद निर्मिती विभागामार्फत लाडु व बुंदी प्रसाद तयार करुन त्याची लाडू प्रसाद वितरण काऊंटर्सवर लाडू पाकीटांची विक्री केली जाते, तसेच यापुर्वी दर्शनरांगेत साईभक्तांना मोफत बुंदी पाकीटे वाटप करण्यासाठी सुटी बुंदी प्रसाद तयार करुन त्याचे ५० ग्रॅम वजनाचे पाकीटे पॅकींग करुन मोफत वाटप करण्यात होते.

तथापी माहे मार्च-२०२० मध्ये कोव्हीड-१९ या साथीचे रोगाचे प्रादुर्भावामुळे श्रींचे मंदिर दर्शनाकरीता बंद करण्यात आल्याने सदरचे कालावधीत लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाचे संपुर्ण कामकाज बंद करण्यात आले होते. कोव्हीड-१९ या साथीचे रोगाचे प्रादुर्भाव कमी झाल्याने दि.१५ नोव्हेंबर, २०२० रोजी पुन:श्च श्रींचे मंदिर दर्शनाकरीता खुले करण्यात आले होते. दरम्यानचे कालावधीमध्ये लाडू प्रसादाची दर्जा व गुणवत्ता सुधारणेकरीता अनेक वेळा प्रात्यक्षिके करण्यात आली व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो यांनी लाडू प्रसादाची गुणवत्ता प्रमाणीत केल्यानंतर दि.०६/०३/२०२१ रोजीपासुन संस्थान प्रशासनाचे मान्यतेने दर्शरांगेमध्ये साईभक्तांना ५० ग्रॅम वजनाचे बुंदी प्रसादा पाकिटाऐवजी त्याच वजनाचे ०१ नगाचे लाडू प्रसाद पाकिट विनामुल्य (मोफत) वाटप करण्यास सुरूवात करण्यात आली. सदरबाबतचा प्रस्ताव मान्यता मिळणेकामी मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला आहे.

तसेच प्रसादालयामध्ये भक्तांना भोजनात मिष्ठान्न म्हणुन देण्यात येणारी बर्फी प्रसादालयाचे मागणीनुसार उक्त्या मजुरी दराने तयार करुन देण्यात येत आहे.

ब) सध्या दि यशोधरा महिला औद्योगिक सहकारी उत्पादक संस्था, नाशिक या बाह्यस्त्रोत कंत्राटदारामार्फत सशुल्क लाडू वितरण काऊंटर व दर्शनरांगेत वाटप होणारा मोफत लाडू तयार करुन घेण्यात येत आहे. मा. तदर्थ समितीचे सभेतील निर्णय क्र.४८०, अन्वये सन २०२१ (दि. ०१ जानेवारी २०२१ ते दि.३१ डिसेंबर २०२१ अखेर) या कालावधीसाठी जा.नं.एसएसएस/लाडुप्रसाद/२८९०/२०२०, दि.३०/१२/२०२० अन्वये, दि यशोधरा महिला औद्योगिक सहकारी उत्पादक संस्था, नाशिक यांना मोतीचुर लाडु, बुंदी व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकींग करुन देण्याचे उक्त्या मजुरीचे कार्यकंत्राट देण्यात आले असुन, त्यांचे कार्यकंत्राटांचा कालावधी दि.३१ डिसेंबर २०२१ रोजी संपत आहे. त्यासअनुसरुन सन २०२२ करीता (दि.०१ जानेवारी २०२२ ते दि.३१ डिसेंबर २०२२ अखेर) नव्याने सशुल्क तसेच मोफत लाडू प्रसाद वाटपाकरीता व भोजनात मिष्ठान्न म्हणुन द्यावयाची बर्फी प्रसाद निर्मितीचे उक्त्या मजूरीची ई - निविदा विविध वृत्तपत्रात जाहिरात देऊन व www.mahatenders.org.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करुन पुढील कालावधीसाठी लाडू व बर्फी प्रसाद तयार करुन घेणेकामी नव्याने ठेकेदारांची नियुक्ती करणे गरजेचे आहे. लाडू व बर्फी निर्मिती प्रक्रीयेसाठी सध्या लाडु तयार करुन पॅकींग करुन देणेकामी **१००० लाडु नगास (५० ग्रॅम वजनाचा ०१ लाडु नग) रक्कम रुपये – २७१/-** इतका तर, बर्फी प्रसाद तयार करुन देणेकामी **१ क्विंटल साखरेसाठी रक्कम रुपये – १९५/-** इतकी उक्त्या पध्दतीने मजुरीचे दर मान्य करून कंत्राट देण्यात आले आहे. लाडु व बुंदी प्रसाद तसेच बर्फी प्रसाद तयार करुन घेतांना ठेकेदारांस मागील ०५ वर्षात खालीलप्रमाणे रक्कम उक्ती मजुरी म्हणुन आदा करण्यात आलेली आहे.

कृपया पान नं.२ वर...

अ.नं.	तपशिल	उक्त्या मजुरीच्या स्वरुपात आदा करण्यात आलेली रक्कम
०१	सन २०१५-२०१६	१,३५,८८,९१७/-
०२	सन २०१६-२०१७	१,१०,४१,०९२/-
०३	सन २०१७-२०१८	१,०७,०४,३८३/-
०४	सन २०१८-२०१९	१,५२,१२,६६९/-
०५	सन २०१९-२०२०	१,६०,३२,४१६/-
०६	सन २०२०-२०२१ (मार्च-२०२१ चे बील)	१,६४,२७९/-

क) विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत- सन २०२१ (दि. ०१ जानेवारी २०२१ ते दि.३१ डिसेंबर २०२१ अखेर) या कालावधीसाठी जा.नं.एसएसएस/लाडुप्रसाद/२८९०/२०२०, दि.३०/१२/२०२० अन्वये, दि यशोधरा महिला औद्योगिक सहकारी उत्पादक संस्था, नाशिक यांना मोतीचुर लाडु, बुंदी व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकींग करुन देण्याचे उक्त्या मजुरीचे कंत्राट देण्यात आले असुन, त्यांचे कार्यकंत्राटांचा कालावधी दि.३१ डिसेंबर २०२१ रोजी संपत आहे, त्यामुळे पुढील ०१ वर्ष कालावधीकरीता (म्हणजे सन २०२२ करीता) लाडु व बर्फी प्रसांद निर्मिती विभागामार्फत साईभक्तांना वितरीत केला जाणारा लाडू व बर्फी प्रसाद तयार करुन घेणेकामी नव्याने ठेकेदारांची नियुक्ती करणे गरजेचे आहे.

त्याकरीता सन २०२२ करीता (दि.०१ जानेवारी २०२२ ते दि.३१ डिसेंबर २०२२ अखेर) उपरोक्त तक्त्यात नमुद केलेल्या मागील ०५ वर्षाचे आदा केलेल्या उक्ती मजुरी दराची सरासरी गृहीत धरून व त्यामध्ये २०%ची वाढ गृहीत धरुन रु. १,५०,००,०००/- (अक्षरी रुपये- एक कोटी पन्नास लाख मात्र) इतका अंदाजे खर्च अपेक्षीत आहे.

त्यासअनुसरुन -

१) सन २०२२ करीता (दि.०१ जानेवारी २०२२ ते दि.३१ डिसेंबर २०२२ अखेर) लाडु व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकींग करुन घेणेकामी आदा करणेत येणा-या उक्त्या मजुरीची अंदाजे रक्कम रु. १,५०,००,०००/- (अक्षरी रुपये- एक कोटी पन्नास लाख मात्र) चे खर्चाची ई-निविदा मागविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस,

२) सदर ई-निविदेची महाराष्ट्रातील नामांकीत (उदा. पुणे, मुंबई, नाशिक, अहमदनगर व औरंगाबाद) मराठी (आवृत्तीमध्ये) वृत्तपत्रात जाहीरात प्रसिद्ध करणेस,

३) तसेच सदरची ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.org.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस मान्यता मिळणेकामीचा सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Adhoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

10/6/24

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

Bajaj 14/6/24

विषय क्र.- ५९

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर मान्यतेसाठी सादर

साईप्रसाद निवासस्थान विभाग

294

विषय – पाणी वाटप आऊटसोर्स कंत्राटी कर्मचा-यां बाबत.

टिपणी,

मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील, विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानसभा यांचे लोणी कार्यालयाकडील १०९६२ / २०२० दि.२१/११/२०२० रोजीचे पत्र, जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था /१६१४/ २०२० दि.०१/१२/२०२० अन्वये साईप्रसाद निवासस्थान विभागास दि.०१/१२/२०२० रोजी प्राप्त झाले असून त्यात प्रामुख्याने संस्थानमध्ये पाणी वाटपाचे काम करत असलेल्या ३२ आऊटसोर्स कर्मचा-यांचे लॉकडाऊन काळातील पगार, बोनस व त्यांना पुर्ववत सेवेत सामावून घेणेबाबत तातडीने उचित कार्यवाही करावी असे कळविले आहे.

याबाबत वस्तूस्थिती अशी की, कामगार विभागाने जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/१७३३/२०१९ दि.३०/१०/२०१९ अन्वये श्री साईप्रसादालयाकडे कार्यरत असलेले आऊटसोर्स ठेकेदार मे फोकस फॅसेलिटी ॲण्ड सिक्युरीटी सर्व्हीसेस लि. मुंबई यांना दि.१५/०९/२०१९ पासून साईप्रसाद निवासस्थान विभागास पाणी वाटपासाठी प्रतिदिनी २८ आऊटसोर्स कर्मचारी पुरविणेकामी आदेश दिला होता.

सदर आदेशाप्रमाणे मे फोकस फॅसेलिटी ॲण्ड सिक्युरीटी सर्व्हीसेस लि, मुंबई यांनी दि.१५/०९/२०१९ पासून साईप्रसाद निवासस्थान विभागास पाणी वाटपाकरीता प्रतिदिनी २८ आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी त्यांचे मार्फत पुरविणेत येत होते.

सदर कर्मचा-यांमार्फत श्रींचे मंदिर परिसर, शांतीनिवास व भक्तनिवास इमारत दर्शनलाईन, पिंपळवाडी रोड दर्शनलाईन, १६ गुंठे परिसर इत्यादि ठिकाणी साईभक्तांना मोफत पिण्याचे पाणी वाटप करणेत येत होते.

तथापि, मे फोकस फॅसेलिटी ॲण्ड सिक्युरीटी सर्व्हीसेस लि, मुंबई यांनी त्यांचे दि.१७/१२/२०१९ चे पत्रान्वये सदर कर्मचा-यांची वेतन बीले यापुर्वी प्रचलीत पध्दतीने (किमान वेतन दरानुसार) न देता प्रसादालयाच्या दराप्रमाणे अकुशल कामगारांचा प्रत्येकी दर रु.१२७५०/- प्रमाणे (या दरामध्ये सानुग्रह अनुदान ८.३३ टक्के याचा समावेश नाही) असे मिळावे अशी मागणी केली असून याबाबत लिखीत स्वरुपाचा कार्यादेश द्यावा अशी विनंती केली होती.

सदर पत्राचे अनुषंगाने संबंधी ठेकेदार यांना कार्यादेश देणेकामी व येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. तदर्थ समिती सभेत दि.२४/०२/२०२०, दि.०४/०३/२०२०, ११/०५/२०२०, ०९/०६/२०२० सादर करणेत आला, मात्र मान्यता न मिळाल्याने सदर विषय पुन्हा दि.१३/०७/२०२० चे मा.तदर्थ समिती सभेत सादर करणेत आला असता त्यात निर्णय क्र.३८२ अन्वये **"साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे पाणी वाटप काम करत असलेले २८ आऊटसोर्स कंत्राटी कर्मचा-यांनी दि.१५/०९/२०१९ ते दि.१७/०३/२०२० या कालावधीत केलेल्या कामाचे वेतन प्रसादालयाकडील सन २०१९-२० चे निवीदेतील मंजुर दरानुसार विहीत पद्धतीने त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली आहे. तसेच प्रस्तावातील 'ब' पाणी वाटपाची व्यवस्था यापुढे साईसेवकांकडून करुन घेता येईल व 'क' पाणीवाटपासाठी कार्यरत असलेले एकूण ३२ कंत्राटी कर्मचारी पुर्ववत प्रसादालय विभागाकडे वर्ग करता येतील, हे मुद्दे नामंजुर करण्यात आले"**

सदर निर्णयाप्रमाणे साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत जा.नं.एसएसएस/वशी-साप्रनि/ १३१८/ २०२० दि.०८/०९/२०२० अन्वये प्रसादालयाकडील ठेकेदार मे फोकस फॅसेलिटी ॲण्ड सिक्युरीटी सर्व्हीसेस लि, मुंबई यांना पत्र देणेत आले असून त्यांनी पाणी वाटपाचे काम करत असलेल्या २८+ ४ = ३२ आऊटसोर्स कंत्राटी कर्मचा-यांचे दि.१५/०९/२०१९ ते दि.१७/०३/२०२० या कालावधीत वेतन प्रसादालयाकडील सन २०१९-२० चे निवीदेतील मंजुर दरानुसार (अकुशल कामगारांचा प्रत्येकी दर रु.१२७५०/- प्रमाणे) विहीत पद्धतीने दि.१९/१२/२० रोजी आदा केले आहे. सदर पाणीवाटप आऊटसोर्स कर्मचा-यांकडून दि.१८/०३/२०२० पासून सेवा घेणे बंद केले आहे.

आता, मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील, विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानसभा यांचे १०९६२ / २०२० दि.२१/११/२०२० रोजीच्या प्राप्त पत्रात संस्थानमध्ये पाणी वाटपाचे काम करत असलेल्या ३२ आऊटसोर्स कर्मचा-यांचे लॉकडाऊन काळातील पगार, बोनस व त्यांना पुर्ववत सेवेत सामावून घेणेबाबत तातडीने उचित कार्यवाही करावी अशी विनंती केली आहे.

पान नं.०२ वर

विभागाचा स्पष्ट अभिप्राय – प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे

अ) दि.१३/०७/२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ समिती सभेतील निर्णय क्र.३८२ अनुसार सदर पाणी वाटप कर्मचा-यांकडून दि.१८/०३/२०२० पासून सेवा घेणे बंद करणेत आल्याने त्यांना लॉकडाऊन काळातील पगार देणेस,

ब) त्यांना दि.१५/०९/२०१९ ते दि.१७/०३/२०२० या कालावधीत दिलेल्या वेतनावर ८.३३ टक्के प्रमाणे सानुग्रह अनुदान देणेकामी संबंधीत ठेकेदार यांचेकडून सदर कालावधीतील बील घेवून सदर कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान आदा करणेस,

क) सदर कर्मचा-यांना पुर्ववत सेवेत सामावून घेणेस व त्यांना संस्थानचे साईआश्रम, प्रसादालय, द्वारावती व रुग्णालयाकडे कार्यरत असलेल्या आऊटसोर्स ठेकेदार यांचेकडे सम प्रमाणात वर्ग करणेस,

तरी उपरोक्त 'अ', 'ब' व 'क' प्रमाणे कार्यवाही करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे विचारार्थ सादर.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ४०

मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

(प्रकाशने विभाग)

विषय - " श्री साईनाथ स्तवनमंजरी " पुस्तक ओरिया भाषेत संस्थानमार्फत प्रकाशित करणेबाबत .. ..

टिपणी.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील तरतूद -

या अधिनियमातील कलम क्रमांक १७ (२)(ठ) मध्ये, *" श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील "* अशी तरतूद आहे.

आजअखेर संस्थानमार्फत **ओरिया (ORIA)** भाषेत एकूण ०२ पुस्तके प्रकाशित करणेत आलेली असून, ती सध्या भक्तांसाठी सशुल्क उपलब्ध आहेत, त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

अ.नं.	पुस्तकाचे नांव	भाषा	प्रकाशन वर्ष व आवृत्ती	छपाई संख्या	मागील ०३ वर्षातील सरासरी मासिक विक्री
०१	श्री साईसत्चरित	ओरिया	सन २०१९ – ०६ वी आवृत्ती	२५,००० प्रती	५०३ प्रती
०२	श्री साईनाथ सगुणोपासना (आरती)	ओरिया	सन २०२०- ०४ थी आवृत्ती	१५,००० प्रती	२९३ प्रती
(टिप – सन २०२०-२१ मध्ये कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाचे प्रादुर्भावामुळे पुस्तक विक्री केंद्रे बंद असल्याने ओरिया भाषेतील प्रकाशनाची सरासरी मासिक विक्री कमी दिसत आहे.)					

(अ) विषयाची पूर्वपीठीका व सद्यःस्थिती –

(०१) उपरोक्त विषयांस अनुसरुन, श्री. सत्यजित अक्षयकुमार मोहंती, बंगलोर यांनी दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१९ रोजी दिलेल्या विनंती पत्रात खालील प्रमाणे नमूद केलेले आहे -

" .. .. मी (श्री.मोहंती) ओरिसा येथील कायमस्वरुपी रहिवाशी असून ओरिसा राज्यामध्ये मोठया प्रमाणात साईभक्त असून, बरेचसे साईभक्त बाबांचे दर्शनासाठी शिर्डी येथे वेळोवेळी येत असतात व शिर्डी येथे श्री साईसच्चरित्राचे पारायण करीत असतात. संस्थानने साईचरित्र ओरिया भाषेत यापूर्वीच प्रकाशित केलेले असलेने ओरिसा राज्यातून येणा-या साईभक्तांना ओरिया भाषेतील साईचरित्र सहजासहजी उपलब्ध होते.

ओरिसा राज्यातून येणा-या ब-याचशा साईभक्तांची बाबांची स्तवनमंजरी दररोज वाचन करण्याची इच्छा असते, परंतु ओरिया भाषेतील स्तवनमंजरी प्रकाशित झालेली नसल्याने ओरिसा राज्यातून येणा-या साईभक्तांना रोज स्तवनमंजरी वाचणेची इच्छा पूर्ण होत नाही.

यासाठी ओरिसा राज्यातून येणा-या भक्तांसाठी मी ओरिया भाषेतील स्तवनमंजरी तयार केलेली आहे. सदर स्तवनमंजरीचे आपले संस्थानमार्फत पडताळणी करुन त्याप्रमाणे संस्थानमार्फत साईबाबांचे ओरिया भाषेतील सच्चरित्राप्रमाणेच साईंची ओरिया भाषेतील स्तवनमंजरी संस्थानमार्पत प्रकाशित होणेस विनंती आहे.

सोबत, ओरिया भाषेत तयार केलेली स्तवनमंजरीची प्रत सादर केली आहे. "

(०२) उपरोक्त श्री. मोहंती, बंगलोर यांचे विनंती पत्रानुसार, प्रकाशने विभागामार्फत दिनांक ३० मे, २०२० रोजी टिपणी सादर करणेत आलेली होती, सदर टिपणीवरील मा. वरिष्ठांचे निर्देशानुसार श्री साईनाथ स्तवनमंजरी – ओरिया भाषेत संस्थानमार्फत प्रकाशित करणेबाबत मा. तदर्थ समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला.

(०३) विषयांकित प्रस्तावावर मा. तदर्थ समितीचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ४०० खालीलप्रमाणे पारित करणेत आला –

" .. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ स्तवनमंजरी पुस्तक ओरिया भाषेत छपाई करुन त्या प्रांतातील मान्यताप्राप्त विद्यापीठातील तज्ञ व्यक्तीकडून तपासणी करुन त्याचा अहवाल मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले. "

(०४) मा. तदर्थ समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, प्रकाशने विभागाकडील दिनांक २९ सप्टेंबर, २०२० रोजीचे मंजूर टिपणीनुसार, श्री. मोहंती यांना दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२० रोजीचे पत्राव्दारे, श्री साईनाथ स्तवनमंजरी पुस्तक ओरिया भाषेत छपाई करणेकामी ओरिया प्रांतातील मान्यताप्राप्त विद्यापीठातील तज्ञ व्यक्तीकडून तपासणी करुन त्याचा अहवाल सादर करणेबाबत कळविणेत आले.

(०५) **आता,** श्री. सत्यजित मोहंती, बंगलोर यांनी त्यांचेकडील दिनांक १९ मार्च, २०२१ रोजीचे पत्राव्दारे, श्री साईनाथ स्तवनमंजरीचे ओरिया भाषेतील भाषांतर डॉ. रुद्रनारायण मोहपात्रा, पी.जी. डिपार्टमेन्ट ऑफ ओडिया, उत्कल युनिव्हर्सिटी, वाणीविहार, भुवनेश्वर यांचा दिनांक ०९ मार्च, २०२१ रोजीचा अहवाल (ODIA LANGUAGE QUALITY CERTIFICATION) सादर केला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

पान २ वर .. .. कृ. मा. प. .. ..

" .. .. This is hereby certify that I have gone through the Manuscript of Odia Transliteration Version (prepared by Shri Satyajit Mohanty & Shri Deepak Parekh) of ह.भ.प. श्री दासगणूकृत श्री साईनाथ स्तवनमंजरी व श्री साई सुमनांजली (मराठी) of Shri Saibaba Sansthan Biswastabyabastha, Shirdi and hereby confirm that the Transliteration part of the above mentioned manuscript is being prepared following the Marathi Phonetic Position and its possible Phonetic position of Odia Language. As per my best of the knowledge no line of the Original manuscript that is available in market is omitted or deleted but kept as is and where is basis but in Odia Script and in exact Transliterate Version.

Therefore, if this manuscript may be published in Odia, it will serve to mankind and I feel it is the holy blessings of Baba. With this I am also praying for the successful publication of this manuscript. "

थोडक्यात, उपरोक्त अहवालानुसार, श्री साईनाथ स्तवनमंजरी – मराठी भाषेतील मजकुर हा ओरिया भाषेतील भाषांतरीत मजकुर उचित व अचूक आहे. मूळ मजकुरातील कोणतीही ओळ ओरिया भाषेतील भाषांतरात वगळली किंवा हटविली गेलेली नाही.

(ब) विभागाचा अभिप्राय –

०१. श्री साईचे भक्त ह. भं. प. दासगणू महाराज यांनी मूळ मराठी भाषेतील " श्री साईनाथ स्तवनमंजरी " ही रचलेली आहे. सध्या संस्थानमार्फत " श्री साईनाथ स्तवनमंजरी " हे पुस्तक ०९ भाषेत (मराठी, हिंदी, इंग्रजी, तेलगू, कन्नड, गुजराथी, बंगाली, पंजाबी व जर्मन) उपलब्ध आहे. सदर पुस्तक ओरिया भाषेत प्रसिध्द करावयाचे ठरल्यास एकूण १० भाषेत भक्तांना स्तवनमंजरी उपलब्ध होईल.

०२. " श्री साईनाथ स्तवनमंजरी " ओरिया भाषेत छपाई करावयाची ठरल्यास, मराठी भाषेतील स्तवनमंजरीप्रमाणे, ११ सेंमी x १४ सेंमी आकारात, ०४ रंगी मुख्यपृष्ठ व ०१ रंगातील मजकुर छपाईसह, अंदाजे ३६ पानी छपाईसाठी अंदाजे रुपये ७/- मात्र प्रती प्रत / नग इतका खर्च येईल. प्रायोगिक तत्वावर ५००० प्रती छपाई करणेसाठी अंदाजे ३५,०००/- मात्र इतका खर्च येईल. छपाई प्रतींची संख्या वाढल्यास / मागणी वाढविल्यास त्याप्रमाणात छपाई दर कमी होऊ शकेल.

०३. " श्री साईनाथ स्तवनमंजरी " ही ओरिया भाषेत संस्थानमार्फत छपाई करुन प्रकाशित करणेबाबतचा निर्णय हा धोरणात्मक असून, त्यास मा. तदर्थ समितीची मान्यता मिळणे आवश्यक आहे.

(क) प्रस्ताव –

" श्री साईनाथ स्तवनमंजरी " ही ओरिया भाषेत संस्थानमार्फत छपाई करुन प्रकाशित करणेबाबतचा निर्णय हा धोरणात्मक असून, सदरची स्तवनमंजरी ओरिया भाषेत प्रसिध्द झाल्यास ओडिशा प्रांतातील तसेच देश-विदेशातील ओरिया भाषिक साईभक्तांना त्याचा निश्चितच फायदा होईल.

उपरोक्तप्रमाणे ओरिया भाषेतील स्तवनमंजरी संस्थानमार्फत छपाई करुन प्रकाशित करावयाची निश्चित झाल्यास, सदर पुस्तकाच्या प्रायोगिक तत्वावर ५००० प्रती विहित पध्दतीने सिलबंद निविदा अथवा दरपत्रके मागवून छपाई करणेस आणि याकामी येणा-या अनुषंगिक सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेकामी विषयांकित प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे निर्णयार्थ सादर.

15/5/2021

कान्हूराज बगाटे (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

15/5

ERP. 138

विषय क्र.- ६१

मा. तदर्थ समिती सभेचे निर्णयार्थ

(प्रकाशने विभाग)

298

विषय – संस्थान व्यवस्थापनामार्फत सन २०२२ (दि. ०१ जानेवारी, २०२२ ते दि. ३१ डिसेंबर, २०२२) अखेरचे कालावधीकरीता विविध प्रकारच्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशित करुन, साईभक्तांना सशुल्क उपलब्ध करुन देणेबाबत..

टिपणी

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिडी अधिनियम, २००४ मधील तरतूद -

या अधिनियमातील कलम क्रमांक १७ (२)(ठ) मध्ये, *" श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"* अशी तरतूद आहे.

उपरोक्त तरतुदीस अनुसरुन, संस्थान व्यवस्थापनामार्फत दरवर्षी संस्थानकडून साईभक्तांना पुरविणेत येणा-या सोयी-सुविधा, वर्षभरात साई मंदिरात साजरे करणेत येणारे उत्सव, रथ-पालखी व इतर दैनंदिन कार्यक्रम या विषयाची सर्व माहितीने परिपूर्ण अशी श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका छपाई करुन, साई भक्तांना वाजवी व माफक दरात सशुल्क विक्री करणेत येतात. दरवर्षी अशा प्रसिध्द करणेत येणा-या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका यांना साईभक्तांचा चांगला प्रतिसाद मिळतो.

(अ) विषयाची पूर्वपीठीका –

(०१) सन २०२१ करीता मा. तदर्थ समितीचे दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २७३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय पारित करणेत आलेला होता -

".. .. सन-२०२१ ची श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका संस्थानमार्फत प्रकाशित करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू.४,९७,५०,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता देण्यात आली. साठा संपत आलेल्या सन-२०२१ ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका यांची २५ टक्के जादा छपाई करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले. "

(०२) मा. तदर्थ समितीचे दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २७३ अन्वये, सन २०२१ चे दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी मान्यता मिळणेसाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडेस दिवाणी अर्ज क्रमांक ४४९०/२०२० हा दिनांक ०९ जुलै, २०२० रोजी दाखल करणेत आलेला होता.

तथापि, माहे मार्च, २०२० पासून संपूर्ण देशात तसेच महाराष्ट्र राज्यात कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याने, संस्थानमार्फत दाखल करणेत आलेला दिवाणी अर्ज क्रमांक ४४९०/२०२० यावर मा. न्यायालयात सुनावणी होऊ शकली नाही व त्याबाबत आदेश प्राप्त झाले नाहीत.

(०३) दरम्यानचे कालावधीत, संस्थान प्रशासनामार्फत सन २०२१ करीता दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करणेसाठी माहे डिसेंबर, २०२० / माहे जानेवारी, २०२१ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या आदेशास अधिन राहून ई-निविदा मागणी करणेत आली.

(०४) सन २०२१ – दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी मागणी करणेत आलेल्या ई-निविदांच्या तांत्रिक व व्यावसायिक निविदा संस्थानचे प्रशासकीय स्तरावरील खरेदी समितीपुढे अनुक्रमे दिनांक १२/०१/२०२१ व दिनांक १४/०१/२०२१ रोजी उघडणेत आल्या. सदर ई-निविदांचा अहवाल मा. तदर्थ समितीचे समक्ष दिनांक १९ जानेवारी, २०२१ रोजी चक्रीय पध्दतीने मान्यतेस्तव सादर करणेत आला असतां, त्यावर मा. तदर्थ समितीने *" मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे."* असा निर्णय पारित केला.

(०५) सन २०२१ चे दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई कामी मा. तदर्थ समितीने दिनांक १९ जानेवारी, २०२० रोजी घेतलेल्या सुधारित निर्णयावर, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे समक्ष मूळ दिवाणी अर्ज क्रमांक ४४९०/२०२० वर सुनावणी होऊन, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे –

" .. .. Mr. Bajaj, the learned counsel submits that the applicant was under impression that the application has been allowed and the order is passed. The cause list also shows that the civil application is disposed of. However, no such order is passed. The applicant in good faith proceeded further with the e-tender process and the work order is issued subject to the confirmation by this Court. The total amount of work order for the said purpose is to the tune of Rs.1,35,30,007/- (Rupees One Crore Thirty five Lacks Thirty thousand and seven)

पान २ वर .. .. कृ. मा. प. ... ..

CDD - 1772

The printing of Shri Sai Diaries and Calenders is ritual undertaken every year by the Sansthan.

In light of the above, We permit the application to proceed ahead with the work order issued for printing Shri Sai Diaries and Calenders for the year 2021 as per its resolution dated 19.01.2021 which is annexed to the present civil application as per the leave granted by this Court. "

(०६) तथापि, सन २०२१ चे दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकरीता साधारणतः ०२ महिन्याचा विलंब झाल्याने, प्रशासकीय स्तरावरील मंजूर टिपणी दिनांक २२ जानेवारी, २०२१ व दिनांक २६ जानेवारी, २०२१ अन्वये एकूण ०८ प्रकारचे प्रकाशनापैकी फक्त श्री साई दैनंदिनी – २०२१ (छपाई संख्या - १५०००० प्रती) व श्री साई दिनदर्शिका – मोठी १ पानी (छपाई संख्या – ५०००० प्रती) याकरीता अनुक्रमे दिनांक २३ जानेवारी, २०२१ / ०१ एप्रिल, २०२१ व दिनांक ०२ मार्च, २०२१ रोजी कार्यादेश देणेत आले. या कार्यादेशानुसार माहे मार्च / एप्रिल, २०२१ अखेर छपाई पूर्ण होऊन, दैनंदिनी व दिनदर्शिका साईभक्तांसाठी वाजवी किंमतीत सशुल्क उपलब्ध करुन देणेत आलेली आहेत.

परंतु, माहे एप्रिल, २०२१ मध्ये पुनःश्च कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव वाढल्याने, मा. शासनाने घातलेल्या टाळेबंदी सदृश्य कडक निर्बंधामुळे दर्शन व इतर व्यवस्था ठप्प झाल्याने दैनंदिनी व दिनदर्शिका विक्रीत मोठ्या प्रमाणावर घट झालेली आहे. त्यामुळे सदरहू दैनंदिनी व दिनदर्शिका विक्री अथवा वाटपाबाबतचा प्रस्ताव स्वतंत्ररित्या अलाहिदा सादर करणेत येत आहे.

(०७) मा. तदर्थ समितीने दिनांक १९ जानेवारी, २०२१ व मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी ई-निविदेतील एकूण ०८ प्रकारचे प्रकाशन साहित्य छपाईसाठी व त्याकामी येणारा अंदाजे खर्च रुपये १,३५,३०,००७/- मात्रचे रक्कमेस मान्यता दिलेली होती. तथापि, माहे मार्च, २०२० पासून देशात तसेच राज्यात कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाचा मोठया प्रमाणावर प्रादुर्भाव झाल्याने व छपाई कामास झालेला विलंब लक्षात घेता, एकूण ०८ प्रकाशनांपैकी फक्त ०२ म्हणजेच श्री साई दैनंदिनी (१५०००० प्रती) व श्री साई दिनदर्शिका (५०००० प्रती) छपाईसाठी अनुक्रमे रुपये ८५,५०,०००/- व रुपये ७,२५,०००/- मात्र असे एकूण रुपये ९२,७५,०००/- मात्र प्रत्यक्ष खर्चाचे कार्यादेश देणेत आलेले असून, या ई-निविदा प्रक्रियेत सहभाग घेतलेल्या इतर ०४ उर्वरीत निविदाधारकांच्या बयाणा रक्कमा विहित पध्दतीने दिनांक १२ एप्रिल, २०२१ रोजीचे प्रशासकीय मान्यतेने परत करणेत आलेल्या आहेत. त्यामुळे सन २०२१ करीता छपाई करावयाचे दैनंदिनी व दिनदर्शिकांबाबतची कार्यवाही जवळजवळ संपुष्टात आलेली आहे.

(ब) सन २०२२ (दि.०१ जानेवारी, २०२२ ते दि. ३१/१२/२०२२) या कालावधीकरीता छपाई करावयाचे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांबाबत विवेचन -

(०१) श्री साईभक्तांना सन २०२२ या वर्षाच्या दैनंदिनी व दिनदर्शिका उपलब्ध व्हाव्यात म्हणून, छपाई कामकाजाची कार्यवाही सुरु करणेचे दृष्टीने सर्वप्रथम सन २०२१ मधील वस्तुस्थितीदर्शक विवेचन खालीलप्रमाणे –

तक्ता क्रमांक ०१

अ.क्र.	उप क्रमांक	तपशील	सन २०२१ करीता सुधारीत छपाई संख्या	सन २०२१ मंजूर छपाई दर / प्रती नग	सन २०२१ करीता छपाई करणेत आली किंवा नाही	सन २०२१ मध्ये पारित करणेत आलेल्या कार्यादेशाची रक्कम रु.
१	२.	३	४	५	६	७
०१	--	श्री साई दैनंदिनी (डिलक्स)				
	०१	दैनंदिनी – मराठी	१,००,०००	५७.००	होय	८५,५०,०००/-
	०२	दैनंदिनी – हिंदी	०,१५,०००	५७.००	होय	
	०३	दैनंदिनी – इंग्रजी	०,१०,०००	५७.००	होय	
	०४	दैनंदिनी – तेलगू	०,२५,०००	५७.००	होय	
		अ.क्र. ०१ करीता एकूण	१,५०,०००	--	--	
०२	--	श्री साई दैनंदिनी (पॉकेट साईज)	०,०५,०००	२३.४०	नाही	--
०३	--	श्री साईबाबा दिनदर्शिका (१ पानी / मोठी)	०,५०,०००	१४.५०	होय	७,२५,०००/-
०४	--	श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस)	०,०५,०००	१४२.००	नाही	--
०५	--	श्री साईबाबा ग्रीडी डेस्क कॅलेंडर्स (७ पेजेस)	०,०५,०००	११०.००	नाही	--
०६	--	श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स (ऑफीस)	०,०५,०००	२१.५०	नाही	--
०७	--	श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स (घरगुती)	०,०५,०००	११.००	नाही	--
०८	--	श्री साईबाबा कार कॅलेंडर्स	०,०८,०००	०९.१५	नाही	--
					एकूण रक्कम रुपये -	९२,७५,०००/-

उपरोक्त तक्ता क्रमांक ०१ मधील बाबींबाबत विवेचन खालीलप्रमाणे -

०१. अ.नं. ०१ श्री साई दैनंदिनी (डिलक्स) – २०२१ करीता एकत्रित १,५०,००० प्रतींची मंजुरी होती, परंतु आहे त्याच मंजूर छपाई दरात प्रशासकीय मान्यतेने सदरची दैनंदिनी ०४ भाषेत छपाई करुन घेणेत आलेली आहे. अ. नं. ०३ श्री साईबाबा दिनदर्शिका २०२१ – मोठी / ०१ पानी मंजूर छपाई संख्या २,००,००० प्रती होती, परंतू प्रशासकीय मान्यतेने प्रत्यक्षात ५०,००० प्रती छपाई कार्यादेश देणेत आलेला आहे.

पान ३ वर .. ..

०२. उपरोक्त तक्त्यातील अ.क्र. २ व ४ ते ८ छपाईकरीता कार्यादेश पारित करणेत आलेले नाहीत.

०३. मा. तदर्थ समितीने दिनांक १९ जानेवारी, २०२१ व मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी ई-निविदेतील एकूण ०८ प्रकारचे प्रकाशन साहित्य छपाईसाठी व त्याकामी येणारा अंदाजे खर्च रुपये १,३५,३०,००७/- मात्रचे रक्कमेस मान्यता दिलेली होती. तथापि, देशात तसेच राज्यात कोव्हीड-१९ या संसर्गजन्य साथीच्या रोगाचा मोठया प्रमाणावर प्रादुर्भाव असल्याने व छपाई कार्यवाहीस झालेला विलंब लक्षात घेता, एकूण ०८ प्रकाशनांपैकी फक्त ०२ म्हणजेच श्री साई दैनंदिनी (१५०००० प्रती) व श्री साई दिनदर्शिका (५०००० प्रती) छपाईसाठी अनुक्रमे रुपये ८५,५०,०००/- व रुपये ७,२५,०००/- मात्र असे एकूण रुपये ९२,७५,०००/- मात्र प्रत्यक्ष खर्चाचे कार्यादेश पारित करणेत आले. तसेच ई-निविदा प्रक्रियेत सहभाग घेतलेल्या इतर ०४ उर्वरित निविदाधारकांच्या बयाणा रक्कमा विहित पध्दतीने दिनांक १२ एप्रिल, २०२१ रोजीचे प्रशासकीय मान्यतेने परत करणेत आलेल्या आहेत.

(क) विभागाचा अभिप्राय व प्रस्ताव -

(०१) सन २०२१ मध्ये कोव्हीड-१९ या संसर्गजन्य साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव असल्याने दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी करावयाचे कार्यवाहीस झालेला विलंब तसेच छपाई करणेत आलेल्या ०२ प्रकाशनांच्या विक्रीत झालेली मोठ्या प्रमाणावरील घट विचारात घेतां **आणि** सन २०२२ मध्येही सदरचा प्रस्ताव सादर करत असतांना, संपूर्ण देशात व राज्यात कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे सुरु असलेली अंशतः टाळेबंदी तसेच जागतिक स्तरावर या रोगाच्या प्रादुर्भावाबाबत व्यक्त करणेत येणारे अंदाज विचारात घेतां, सन २०२२ चे उर्वरित कालावधीत जनजीवन / दर्शन व्यवस्था किती प्रमाणात सुरळीत होईल तसेच अशा परिस्थितीत विषयांकित प्रकाशने छपाईबाबतची कार्यवाही पूर्ण होणेस किती कालावधी लागेल याचा स्पष्ट अंदाज व्यक्त करता येणे शक्य नाही.

या बाबींचा विचार करतां, **सोबत,** सन २०२१ मध्ये दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईबाबत प्रत्यक्ष कार्यवाहीचे वेळेस परिस्थितीनुरुप जे बदल करणेत आले त्याचे विवेचन आणि **सन २०२२** करीता प्रस्तावित करणेत आलेली छपाई संख्या व त्यासाठी येणारा अंदाजित खर्च याचा तपशील दर्शविणारा **तक्ता क्रमांक ०२ / (परिशिष्ट अ)** स्वतंत्ररित्या जोडला आहे, त्याचे अवलोकन होणेस विनंती आहे.

(०२) उपरोक्त परिच्छेद क (१) मध्ये नमुद केलेप्रमाणे, तक्ता क्रमांक ०२ मधील सविस्तर विवेचनास अनुसरुन, आता खालील तक्ता क्रमांक ०३ मध्ये, सन २०२२ करीता छपाई करावयाच्या विविध दैनंदिनी व दिनदर्शिका यांची माहिती, प्रस्तावित छपाई संख्या व त्यासाठी येणारा अंदाजित खर्च प्रस्तावित करणेत येत आहे -

तक्ता क्रमांक ०३

अ.क्र.	उप क्रमांक	तपशील	सन २०२१ छपाई संख्या	सन २०२१ मंजूर छपाई दर / प्रती नग	सन २०२२ करीता प्रस्तावित छपाई संख्या	सन २०२२ करीता अंदाजित छपाई दर / प्रती नग	सन २०२२ अंदाजित छपाई खर्च रक्कम रुपये
१	२	३	४	५	६	७	८
०१	–	श्री साई दैनंदिनी (डिलक्स)					
	०१	दैनंदिनी – मराठी	१,००,०००	५७.००	१,००,०००	७४.००	७४,००,०००/-
	०२	दैनंदिनी – हिंदी	०,१५,०००	५७.००	०,५०,०००	७४.००	२२,२०,०००/-
	०३	दैनंदिनी – इंग्रजी	०,१०,०००	५७.००	०,२५,०००	७४.००	२२,२०,०००/-
	०४	दैनंदिनी – तेलगू	०,२५,०००	५७.००	०,५०,०००	७४.००	२९,६०,०००/-
		अ.क्र. ०१ करीता एकूण	१,५०,०००	--	२,२५,०००	–	–
०२	--	श्री साई दैनंदिनी पॉकेट साईज	छपाई नाही	२३.४०	०,५०,०००	३१.००	१५,५०,०००/-
०३	--	श्री साई दिनदर्शिका (०१ पानी / मोठे)	५०,०००	१४.५०	२,००,०००	१९.००	३८,००,०००/-
०४	--	श्री साईबाबा डिलक्स वॉल कलेंडर (८ पेजेस)	छपाई नाही	१४२.००	१०,०००	१८५.००	१८,५०,०००/-
०५	--	श्री साईबाबा मेटपेट वॉल कलेंडर (७ पेजेस)	सन २०२१ चे निविदेत समावेश नसल्याने, छपाई नाही.		१०,०००	२२४.००	२२,४०,०००/-
०६	--	श्री साईबाबा श्री डी वॉल कलेंडर (०१ पानी)			३,०००	२३०.००	६,९०,०००/-
०७	--	श्री साईबाबा श्री डी डेस्क कॅलेंडर (०७ पानी)	छपाई नाही	११०.००	१०,०००	१४३.००	१४,३०,०००/-
०८	--	श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर (१४ पानी)	सन २०२१ चे निविदेत समावेश नसल्याने, छपाई नाही.		१०,०००	७०.००	७,००,०००/-
०९	--	श्री साईबाबा वॉल कॅलेंडर (कार्यालय / ०६ पानी)	छपाई नाही	२१.५०	१०,०००	२८.००	२,८०,०००/-
१०	--	श्री साईबाबा वॉल कॅलेंडर (घरगुती / ०६ पानी)	छपाई नाही	११.००	१०,०००	१५.००	१,५०,०००/-
११	--	श्री साईबाबा कार कॅलेंडर्स (०७ पानी)	छपाई नाही	९.१५	१५,०००	१२.००	१,८०,०००/-
						एकूण रक्कम रुपये -	२,९५,२०,०००/-

उपरोक्त तक्ता क्रमांक ०३ मधील रकाना क्रमांक ०५ मधील सन २०२१ चे न्यूनतम मंजूर छपाई दरांवर, सरासरी ३० टक्के वाढ गृहित धरुन, सन २०२२ करीता रकाना क्रमांक ०७ मधील अंदाजित छपाई दर नमूद करणेत आलेले आहेत. यामध्ये ई-निविदा प्रक्रिया पूर्ण झालेनंतर प्रत्यक्षात वाढ अथवा घट होऊ शकते तसेच छपाई संख्येचे प्रमाण कमी-अधिक झाल्यास त्यानुसार छपाई दरात वाढ अथवा घट होण्याची शक्यता असते.

पान ४ वर .. .. कृ. मा. प. ... ..

(०३) उपरोक्त तक्ता क्रमांक ०३ मधील अ.नं. ०१ ते ११ मध्ये नमूद केलेल्या सन २०२२ चे विविध दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईसाठी अंदाजित रक्कम रुपये २,९५,२०,०००/- मात्र (अक्षरी रुपये दोन कोटी पंच्यान्नव लाख वीस हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च प्रकाशने विभागाकडील सन २०२२ चे पुस्तके / फोटो / दैनंदिनी / दिनदर्शिका छपाईकामी करणेत आलेल्या अंदापत्रकीय तरतूद रक्कम रुपये १२ कोटी मात्रतून खर्च करता येईल, त्यास मान्यता असावी.

(०४) विषयांकित प्रकाशने छपाईकामी रक्कम रुपये ५० लाख मात्रपेक्षा जास्त खर्च असल्याने, मा. तदर्थ समितीचे मान्यतेने, सदर प्रस्तावास मान्यता मिळणेबाबतचा दिवाणी अर्ज मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडेस मान्यतेस्तव सादर करता येईल, त्यास मान्यता असावी.

(०५) विषयांकित प्रकाशने छपाईकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेकामी जनसंपर्क विभागामार्फत वृत्तपत्रातून जाहिरात प्रसिध्द करणे, माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणे व इतर अनुषंगिक कार्यवाहीस करणेस व त्याअनुषंगाने येणारे सर्वसमावेशक खर्चास मान्यता असावी.

(०६) मा. तदर्थ समितीचे मान्यतेनंतर, साईभक्तांना सन २०२२ च्या दैनंदिनी व दिनदर्शिका वेळेत उपलब्ध व्हाव्यात तसेच याकामी कालापव्यय होऊ नये म्हणून, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेस अधिन राहून विषयांकित प्रकाशने छपाई कामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करणेत आहे, त्यास मान्यता असावी.

उपरोक्त तक्ता क्रमांक ०३ मधील छपाई करावयाच्या दैनंदिनी व दिनदर्शिकांबाबत मा. उच्च न्यायालय ज्या पध्दतीने मान्यता देईल, त्यानुसार विषयांकित साहित्यांची छपाई करणेसाठी कार्यादेश देता येईल आणि याबाबत प्रसिध्द करावयाचे निविदेतील अटी-शर्ती मध्ये याबाबीचा सविस्तररित्या समावेश करता येईल. तसेच वर नमूद केलेल्या साहित्यांचा अंतिम छपाई कार्यादेश पारित करणेपूर्वी, त्या-त्या वेळेची वस्तुःस्थिती लक्षांत घेऊन, परिस्थितीनुरुप विषयांकित साहित्य छपाई करणेबाबत प्रशासकीय स्तरावर निर्णय घेता येईल, असे मत आहे.

(०७) तसेच, सन २०२२ करीता छपाई करावयाच्या दैनंदिनी व दिनदर्शिका यांचा मंजूर छपाई साठा संपुष्टात आल्यास व त्यानंतर विक्रीचे कालावधीचा अंदाज घेऊन आवश्यकता भासल्यास, सन २०२२ करीता मंजूर होणा-या दरानेच जादा २५ टक्के छपाई करुन घेणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करणेत येत आहे, त्यास मान्यता असावी.

उपरोक्त सविस्तर विवेचनास अनुसरुन, **परिच्छेद क** मध्ये नमूद केलेल्या **अ.नं. (०१) ते (०७)** बाबींस तसेच त्या अनुषंगाने करावयाचे कार्यवाहीस मान्यता मिळणेसाठी विषयांकित प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

11/6/22

कान्हूराज बगाटे (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

प्रकाशने विभाग
दि.०२.०६.२०२१

तक्ता क्रमांक -०२ परिशिष्ट " अ "

विषय- सन-२०२२ मध्ये छपाई करावयाच्या प्रकाशन साहित्याचे विवेचन दर्शविणारा तक्ता-

अ.क्र.	उप क्रमांक	तपशील	सन-२०२१ मध्ये मूळ प्रस्तावीत केलेली छपाई संख्या	सन-२०२१ मध्ये सुधारीत केलेली प्रस्तावीत छपाई संख्या	सन-२०२१ मध्ये प्रत्यक्ष छपाई केलेली संख्या	सन-२०२१ मध्ये प्राप्त झालेले मंजूर छपाई दर	सन-२०२२ मध्ये प्रस्तावीत छपाई संख्या	सन- २०२२ करिता ३० % वाढ गृहीत धरून अंदाजित छपाई दर	एकूण खर्च
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
०१	--	श्री साई दैनंदिनी (डिलक्स)	२,२५,०००						
	०१	दैनंदिनी- मराठी		१,००,०००	१,००,०००	५७.००	१,००,०००	७४.००	७४,००,०००/-
	०२	दैनंदिनी- हिंदी		१५,०००	१५,०००	५७.००	५०,०००	७४.००	३७,००,०००/-
	०३	दैनंदिनी- इंग्रजी		१०,०००	१०,०००	५७.००	२५,०००	७४.००	१८,५०,०००/-
	०४	दैनंदिनी-तेलगू		२५,०००	२५,०००	५७.००	५०,०००	७४.००	३७,००,०००/-
		अ.क्र.१ करिता एकूण -		१,५०,०००	१,५०,०००	-	२,२५,०००	-	-
०२	--	श्री साई दैनंदिनी पॉकेट साईज	१,००,०००	२५,०००	-	२३.४०	५०,०००	३१.००	१५,५०,०००/-
०३	--	श्री साई दिनदर्शिका (१ पानी मोठे डेटरसह)	३,२५,०००	२,००,०००	५०,०००	१४.५०	२,००,०००	१९.००	३८,००,०००/-
०४	--	श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स(८ पेजेस)	२०,०००	५,०००	-	१४२.००	१०,०००	१८५.००	१८,५०,०००/-
०५	--	श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स (७ पेजेस)	१५,०००	-	-	१७२.००	१०,०००	२२४.००	२२,४०,०००/-
०६	--	श्री साईबाबा ग्रीडी वॉल कॅलेंडर्स (१ पानी)	३,०००	-	-	१७७.००	३,०००	२३०.००	६,९०,०००/-
०७	--	श्री साईबाबा ग्रीडी डेस्क कॅलेंडर्स (७ पानी)	१५,०००	५,०००	-	११०.००	१०,०००	१४३.००	१४,३०,०००/-
०८	--	श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर्स (१४ पानी)	१५,०००	-	-	५४.००	१०,०००	७०.००	७,००,०००/-
०९	--	श्री साईबाबा वॉल कॅलेंडर (कार्यालय- ६ पानी)	१०,०००	५,०००	-	२१.५०	१०,०००	२८.००	२,८०,०००/-
१०	--	श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स (घरगूती- ६ पानी)	१५,०००	५,०००	-	११.००	१०,०००	१५.००	१,५०,०००/-
११	--	श्री साईबाबा कार कॅलेंडर्स (७ पानी)	२५,०००	८,०००	-	९.१५	१५,०००	१२.००	१,८०,०००/-
								एकूण खर्च-	२,९५,२०,०००/-

302

विशेष टिपणी-

१) मागील वर्षी (सन-२०२१ साठी) सुरूवातीस मंजूरीसाठी एकूण ११ प्रकाशने (९ प्रकारच्या दिनदर्शिका व २ प्रकारच्या दैनंदिनी) छपाई कामी खर्चास मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

२) कोवीड-१९ च्या पहिल्या लाटेमध्ये मा.शासनाचे कडक निर्बंधामुळे साईभक्तांची साई दर्शनासाठी घटलेली गर्दी या गोष्टींचा सर्वांगाने विचार करून उपरोक्त तक्त्यातील अ.नं.०५) श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स (७ पेजेस), अ.नं.०६) श्री साईबाबा ग्रीडी वॉल कॅलेंडर्स (१ पानी) व ०८) श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर्स (१४ पानी) या तीन दिनदर्शिका दि.१४.१२.२०२० रोजीचे प्रशासकीय मान्यतेने छपाई न करणेस मान्यता घेणेत आलेली होती. त्यामुळे सदरील दिनदर्शिका सन-२०२२ मध्ये छपाई करणेसाठी सन-२०२० चे दर गृहीत धरून अंदाजे छपाई खर्च काढण्यात आलेला आहे.

३) मा.उच्च न्यायालयाची प्रकाशने छपाईकामी मान्यता उशिराने प्राप्त झाल्याने, झालेला विलंब लक्षात घेऊन उपरोक्त साहित्यापैकी फक्त अ.नं.१ व अ.नं.३ ची छपाई करणेत आलेली आहे.

विषय क्र.- ६.2

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय 303

माहिती तंत्रज्ञान विभाग

विषय :- शिर्डी गावातील रहिवाशी साईभक्तांना दर्शन प्रवेशाकरीता स्मार्टकार्ड वितरीत करणेकामी सदरचे स्मार्ट कार्ड प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून छपाई करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत....

टिपणी,

अधिनियम २००४ मधील तरतुद :- कलम १७ (०१) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र :- नाही.

प्रास्ताविक :- जागतिक स्तरावर उद्भवलेल्या कोरोना विषाणू (Covid-19) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेअंतर्गत संस्थान व्यवस्थापन संचलीत श्री साई समाधी मंदिराबरोबरच इतर सर्व मंदिरे दि.१७.०३.२०२० पासून पुढील आदेश होईपर्यंत संदर्भ क्र.०१ चे आदेशान्वये, साईभक्तांना दर्शनाकरीता बंद करणेत आले होते. दि.१६.११.२०२० पासून राज्य शासनाचे मार्गदर्शक सुचनांप्रमाणे श्री साईबाबांचे मंदिर कोरोना विषाणू (Covid-19) चा प्रादुर्भाव रोखणेसंदर्भातील सर्व प्रतिबंधात्मक उपाय-योजनांचे पालन करुन साईभक्तांना दर्शनासाठी सुरु करणेत आलेले आहे.

श्रींचे मंदिर साईभक्तांकरीता दर्शनाकरीता खुले केल्यानंतर करावयाच्या उपाययोजना व सोयी सुविधांबाबत वेळोवेळी झालेल्या बैठका व प्रत्यक्ष पाहणीअंती देणेत आलेल्या निर्देशाप्रमाणे, दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीअंतर्गत श्रीराम पार्कींग, संस्थानचे सर्व निवासस्थाने व शिर्डी बसस्थानक इ. ठिकाणी मोफत दर्शनपास (Time Base) वितरण केंद्र तसेच साईउद्यान समोर प्रवेशद्वार क्र. ०२ येथे बाहेरून येणारे साईभक्त यांचेकरीता व प्रवेशद्वार क्र.०३ चे उत्तरेस गावकरी साईभक्तांकरीता दर्शनपास पडताळणी केंद्र कार्यान्वीत करणेत आलेले आहेत. तसेच दर्शनरांग प्रवेशद्वार नंबर ०१ व संस्थानचे सर्व निवासस्थान येथे सशुल्क दर्शनपास वितरण केंद्र सुरू करणेत आलेले आहेत. याव्यतिरीक्त संस्थानचे online.sai.org.in या वेबसाईटद्वारे सशुल्क तसेच मोफत दर्शनपास आरक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. वेळोवेळी देणेत येणा-या निर्देशाप्रमाणे सदर प्रणालींमध्ये अनुषंगिक बदल करणेत येतात.

निर्देशीत केलेप्रमाणे सद्यस्थितीत शिर्डी गावातील रहिवाशी साईभक्तांकरीता १६ गुंठे येथील स्टेजशेजारी मोफत दर्शनपास वितरण केंद्र सुरू करणेत आलेले आहे. सदर वितरण केंद्रावरुन रहिवाशी साईभक्तांचे मतदान ओळखपत्र किंवा आधारकार्डची पडताळणी करुन दर्शनपास वितरीत करणेत येतात. सदर दर्शनपास घेऊन आलेल्या साईभक्तांना १६ गुंठे येथील साई कॉम्प्लेक्स समोरील प्रवेशद्वारातून दर्शनाकरीता प्रवेश देणेत येतो. सदर दर्शनपास वितरण केंद्रावर अनेकवेळेस इतर साईभक्त उदा.परिसरातील साईभक्त चुकीचे ओळखपत्र दाखवून दर्शनपास मिळविणेचा प्रयत्न करतात. अशावेळी तेथे कार्यरत असलेल्या कर्मचा-यांबरोबर सदर साईभक्तांचे वाद होतात. यापुर्वीही (लॉकडाऊनपुर्वी) गावकरी प्रवेशद्वाराद्वारे खोटे ओळखपत्र दाखवून दर्शनासाठी प्रवेश मिळविणेचा प्रयत्न इतर साईभक्तांनी केल्याचे वेळोवेळी निदर्शनास आलेले आहे. अशावेळी डयुटीवर असलेले संस्थान कर्मचा-यांबरोबर सदर साईभक्तांनी वाद केलेले आहेत.

दर्शनरांग व्यवस्थापन संदर्भात वेळोवेळी झालेल्या बैठकींदरम्यान सदरची बाब प्रामुख्याने संबंधीतांनी निदर्शनास आणून दिलेली आहे. सदर विषयी सविस्तर चर्चेअंती शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांचे दर्शन सुलभ व्हावे व सदर व्यवस्थेद्वारे इतर साईभक्तांना प्रवेश प्रतिबंधीत करणेच्या दृष्टीने

शिर्डी रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत करणेबाबत निर्देशीत करणेत आलेले आहे. याअंतर्गत शिर्डी रहिवाशी साईभक्तांची अनुषंगिक ओळखपत्रांची पडताळणी अंती नोंदणी करणेत येऊन त्यांना स्मार्टकार्ड वितरीत करणेस निर्देशीत करणेत आलेले आहे.

निर्देशीत केलेप्रमाणे शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत करणेसाठी अनुषंगिक प्रणाली कार्यान्वीत करावयाची झाल्यास पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी लागेल, असे नम्र मत आहे.

1. यासंदर्भात सविस्तर प्रस्ताव सादर करुन त्यास मान्यतेअंती धोरणात्मक निर्णयानुसार संबंधीत साईभक्तांचे अनुषंगिक ओळखपत्रांची पडताळणी करुन नोंदणी करणे.
2. नोंदणी केलेल्या साईभक्तांचे स्मार्टकार्ड प्रिंट करणे. सदरची कार्यवाही संस्थानमार्फत प्रिंटर खरेदी करुन अथवा थेट पुरवठाधारकाकडून करुन घेता येईल.
3. साईभक्तांची नोंदणी (One Time Registration) व स्मार्टकार्ड पडताळणीकामी अनुषंगिक प्रणाली मे.टिसीएस यांचेमार्फत विकसीत करुन कार्यान्वीत करता येईल.

उपरोक्त निर्देशान्वये, शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत करणेकामी या क्षेत्रातील पुरवठाधारकांशी संपर्क करुन चर्चा केली असता, त्यांनी स्मार्टकार्डसाठी पुढीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे.

01. M/s Technowave ID Systems (P) Ltd., Kochin

Sr.No.	Details	Qty	Rate	Amount
01	Proximity Cards	25,000	25.00	6,25,000
02	ID Card Printer	01	50,000	50,000
03	Installation & Others		3,000	3,000
			Total	**6,78,000+ Tax**

02. M/s ID Smarttech, Pune

Sr.No.	Details	Qty	Rate	Amount
01	Pre Printed 4 Colour front side & 4 Colour back side offset colour drum static data printing	25,000	26.00	6,50,000
02	Card Printer	01	56,000	56,000
03	Drum holder notch 2 sided	01	3,400	3,400
04	Secured ID's App	01	12,500	12,500
			Total	**7,21,900+ Tax**

शिर्डी शहरातील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत करावयाचे झाल्यास साधारण २५,००० इतके स्मार्टकार्ड सुरवातीचे काळात छपाई करुन वितरीत करावे लागण्याची शक्यता आहे. उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे २५,०००० स्मार्टकार्ड छपाई करीता साधारण रक्कम रुपये ७,००,०००/- + कर मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर स्मार्टकार्ड संस्थानमार्फत प्रिंटर खरेदी करुन मे.टिसीएस यांचे सहकार्याने प्रिंट करता येतील. यामुळे संस्थानची आर्थिक बचत होऊन साईभक्तांची माहितीही सुरक्षीत राहिल.

नमुद केलेप्रमाणे शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड प्रिंट करुन वितरीत केल्यास योग्य साईभक्तास दर्शनास प्रवेश देणे सुलभ होऊन यासंदर्भात वेळोवेळी होणारे वादही टाळता येऊ शकतील. पर्यायाने इतर साईभक्तांचे दर्शन सुलभ होऊन प्रशासनावरील ताण कमी होणेस मदत होईल.

सबब, शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड छपाई करुन वितरीत करणेकामी स्मार्ट कार्डसह अनुषंगिक साहित्य खरेदी करणेसाठी मे.टिसीएस यांचे तांत्रिक सल्ल्याने प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे खर्च रक्कम रुपये ७,००,०००/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी :- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे, शिर्डी गावातील रहिवाशी साईभक्तांना दर्शन प्रवेशाकरीता स्मार्टकार्ड वितरीत करणेकामी प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे खर्च रक्कम रुपये ७,००,०००/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छानणी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छानणी करुन अनुमान :- आर्थिक, प्रशासकीय व तांत्रिक.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :- श्रींचे मंदिर साईभक्तांकरीता दर्शनाकरीता खुले केल्यानंतर करावयाच्या उपाययोजना व सोयी सुविधांबाबत वेळोवेळी झालेल्या बैठका व प्रत्यक्ष पाहणीअंती निर्देश देणेत आलेले आहेत. शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांचे दर्शन सुलभ व्हावे व सदर व्यवस्थेद्वारे इतर साईभक्तांना प्रवेश प्रतिबंधीत करणेच्या दृष्टीने शिर्डी रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत करणेबाबत निर्देशीत करणेत आलेले आहे. याअंतर्गत शिर्डी रहिवाशी साईभक्तांची अनुषंगिक ओळखपत्रांची पडताळणी अंती नोंदणी करणेत येऊन त्यांना स्मार्टकार्ड वितरीत करणेस निर्देशीत करणेत आलेले आहे.

उपरोक्त निर्देशान्वये, शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत करणेकामी या क्षेत्रातील पुरवठाधारकांशी संपर्क करुन चर्चा केली असता, त्यांनी स्मार्टकार्डसाठी पुढीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे.

01. M/s Technowave ID Systems (P) Ltd., Kochin

Sr.No.	Details	Qty	Rate	Amount
01	Proximity Cards	25,000	25.00	6,25,000
02	ID Card Printer	01	50,000	50,000
03	Installation & Others		3,000	3,000
			Total	**6,78,000+ Tax**

02. M/s ID Smarttech, Pune

Sr.No.	Details	Qty	Rate	Amount
01	Pre Printed 4 Colour front side & 4 Colour back side offset colour drum static data printing	25,000	26.00	6,50,000
02	Card Printer	01	56,000	56,000
03	Drum holder notch 2 sided	01	3,400	3,400
04	Secured ID's App	01	12,500	12,500
			Total	**7,21,900+ Tax**

शिर्डी शहरातील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत करावयाचे झाल्यास साधारण २५,००० इतके स्मार्टकार्ड सुरवातीचे काळात छपाई करुन वितरीत करावे लागण्याची शक्यता आहे. उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे २५,०००० स्मार्टकार्ड छपाई करीता साधारण रक्कम रुपये ७,००,०००/- + कर मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर स्मार्टकार्ड संस्थानमार्फत प्रिंटर खरेदी करुन मे.टिसीएस यांचे सहकार्याने प्रिंट करता येतील. यामुळे संस्थानची आर्थिक बचत होऊन साईभक्तांची माहितीही सुरक्षीत राहिल.

शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत केल्यास प्रामुख्याने पुढीलप्रमाणे फायदे होतील.

1. शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड वितरीत केल्यास त्यांचे दर्शन सुलभ होऊन प्रशासनावरील ताण कमी होणेस मदत होईल.
2. शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना आरती/ दर्शनासाठी प्रवेश देणेकामी अनुषंगिक संगणक प्रणाली विकसीत करुन कार्यान्वीत केल्यास वितरीत करणेत येणा-या स्मार्टकार्डद्वारे सदरचे कार्ड घेऊन येणा-या पात्र साईभक्तास प्रवेश देणे सुलभ होईल.

3. सद्यस्थितीत साईभक्तांचे मतदान ओळखपत्र किंवा आधारकार्डची पडताळणी करुन दर्शनपास वितरीत करणेत येतात. त्याऐवजी स्मार्टकार्डमध्ये नोंदणी केलेली असल्यास खोटे ओळखपत्र दाखवून दर्शनासाठी प्रवेश मिळविणा-या साईभक्तांची संख्या नगण्य होऊन शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांची दर्शनाची सुविधा सुलभ होईल. त्यामुळे तेथे कार्यरत असलेल्या कर्मचारी/सुरक्षा रक्षकाबरोबर होणारे सदर साईभक्तांचे वाद-विवाद टळतील व इतर साईभक्तांना याबाबत चुकीचा संदेश जाणार नाही. तसेच संस्थानचे नाव-लौकीकास बाधा पोहचणार नाही.
4. धोरणात्मक निर्णयानुसार सदर साईभक्तांना आरती/दर्शनासाठी प्रवेश देणेबाबतच्या निकषांचा या प्रणालीमध्ये समावेश करता येईल.

सदर प्रवेशद्वाराद्वारे आरती/दर्शन घेणा-या साईभक्तांची माहिती प्रणालीद्वारे सहज उपलब्ध होईल.

सबब, शिर्डी येथील रहिवाशी साईभक्तांना स्मार्टकार्ड छपाई करुन वितरीत करणेकामी स्मार्ट कार्डसह अनुषंगिक साहित्य खरेदी करणेसाठी मे.टिसीएस यांचे तांत्रिक सल्ल्याने प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे खर्च रक्कम रुपये ७,००,०००/- + कर मात्रचे खर्चास मान्यता सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सविनय सादर.

27/5/2021

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

13/05/2021 13/05

IT-MEETING-135-2021

विषय क्र.- 23

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर

माहिती तंत्रज्ञान विभाग

विषय :- साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत Oracle Database व Oracle ERP या प्रणालीचे कार्यान्वीत Licenses चे नुतनीकरण तसेच आवश्यक Licenses खरेदी करणेकामी थेट उत्पादक कंपनी M/s Oracle Corporation यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

टिपणी,

अधिनियम २००४ मधील तरतुद :- कलम १७ (१) भक्तगणांना सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :-

०१. दि.०७.११.२००९ निर्णय क्र.७९९. ०२. दि.१६.०८.२०१६ निर्णय क्र.५७२.
०३. दि.०४.०४.२०१८ निर्णय क्र.२७५. ०४. दि.०२.०५.२०१८ निर्णय क्र.३४१.
०५. दि.०१.०६.२०१८ निर्णय क्र.३६८. ०६. दि.३०.०६.२०१८ निर्णय क्र.४५१.
०७. दि.२६.०७.२०१८ निर्णय क्र.४६१. ०८. दि.०१.११.२०१८ निर्णय क्र.६८५.

प्रास्ताविक :- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.११.२००९ रोजीचे निर्णय क्र.७९९ अन्वये "साईटेक प्रकल्प" कार्यान्वीत करणेकरीता विहीत पद्धतीने मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना कार्यादेश देणेत आला होता. साईटेक प्रकल्पाअंतर्गत संस्थानचे विविध विभागांकरीता एकूण ३८ संगणक प्रणाली विकसीत करुन कार्यान्वीत करणेत आलेल्या आहेत. कार्यान्वीत करणेत आलेल्या विविध प्रणालीअंतर्गतची माहिती (Database) संकलीत करणेकरीता Oracle Database हि प्रणाली कार्यान्वीत करणेत आलेली आहे. तसेच खरेदी, भांडार, लेखाशाखा विभागाकरीता Oracle ERP हि कार्यप्रणाली मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत कार्यान्वीत करणेत आलेली आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत Oracle Database व Oracle ERP ह्या प्रणालींचे Licenses नुतनीकरण मे-२०१७ पासून प्रलंबीत आहेत. सबब, मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.२७५ यास अधिन राहुन Oracle Database व Oracle ERP ह्या प्रणालींचे मे-२०१७ पासूनचे Licenses नुतनीकरण व आवश्यक Oracle Licenses खरेदी करणेबाबतची प्रक्रिया मे.टिसीएस यांचे मार्गदर्शनाखाली सुरू करणेत आलेली होती. मे.टिसीएस यांनी वेळोवेळी मे.कॉग्नीझंट व मे.ओरॅकल यांचेबरोबर सविस्तर चर्चा करुन अवलोकनाअंती कार्यान्वीत सॉफ्टवेअरचे Oracle Support Licenses Renewal करणे व नव्याने Oracle Database Enterprise Edition (10 Proc) व Oracle Developer Suite Licenses-5 खरेदी करणे आवश्यक असल्याचा अभिप्राय इकडील विभागास दिलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे व मे.टिसीएस यांचे अभिप्रायाप्रमाणे, Oracle लायसन्सेस नुतनीकरण व आवश्यक नविन Oracle लायसन्सेस खरेदीकरीता इकडील विभागाचे दि.२३.०५.२०१८ रोजीचे तत्कालीन मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेन्वये, Oracle यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-आयटी/९२५/२०१८, दि.२४ मे, २०१८ रोजी एकूण रक्कम रुपये १,५३,८९,०४९.९६ मात्रचा पुरवठा आदेश देणेत आलेला होता. सदर पुरवठा आदेशाची नोंद घेऊन याकामी येणारे खर्चास व सदरची रक्कम Oracle यांना अदा करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्य.स. दि.०१.०६.२०१८ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर निर्णय क्रं.३६८ नुसार पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले होते. "या विषयावरील चर्चेच्यावेळी सदर सॉफ्टवेअर लायन्ससेस रु.१.२८ कोटी इतक्या कमी किंमतीपर्यंत मिळू शकतात, असे समिती सदस्य श्री. प्रताप भोसले यांचे मत असल्याचे मा.अध्यक्षांनी नमूद केले. यावेळी Oracle Corporation चे प्रतिनिधी श्री. कौस्तुभ देशपांडे यांचेशी दर कमी करणेबाबत भ्रमणध्वनीद्वारे चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली. यावर सविस्तर चर्चा होऊन, Oracle Software Licenses Purchase & Support Renewal करणेकामी Oracle Corp. यांना देण्यात आलेला पुरवठा आदेश रद्द करणेत यावा".

उपरोक्त निर्देशान्वये Oracle Corporation यांना देण्यात आलेला पुरवठा आदेश रद्द करणेत येत असलेबाबत जा.क्र.एसएसएसटी/वशी-आयटी/१२७६/२०१८, दि.१३ जुन, २०१८ रोजीचे पत्राद्वारे त्यांना कळविणेत आलेले होते.

मा.व्य.स.चे दि.२६.०७.२०१८ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र.४६१ अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देणेत आले आहेत. "यापुर्वी ओरॅकल कंपनीकडून जे लायसन्सेस खरेदी केलेले आहेत त्यांचे नुतनीकरण कंपनीकडूनच करणे आवश्यक आहे. त्यामुळे पुढील लायसन्सेसचे नुतनीकरण ओरॅकल कंपनीकडूनच करुन घेण्यास व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत आली. तसेच, जे लायसन्सेस नव्याने घ्यावयाचे आहे ते खरेदी करणेस विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत आली".

उपरोक्त निर्देशान्वये M/s Oracle (I) Pvt Ltd., Pune यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-आयटी/३०४९/२०१८, दि.२४ सप्टे., २०१८ अन्वये कार्यान्वीत Oracle Licenses नुतनीकरण करणेकामी कार्यादेश देणेत आलेला आहे. परंतू आजपावेतो त्यांचेमार्फत नुतणीकरणाची कार्यवाही करणेत आलेली नाही. तसेच, सदर निर्णयान्वये आवश्यक नविन Oracle Licenses खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली होती. ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेल्या निम्नतम दराप्रमाणेची Oracle Licenses खरेदी कामीची एकूण रक्कम रु.३,४१,३१,००६/- (करासह) इतकी होती. सदर रक्कम हि Oracle Corporation यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशामधील याकामीचे रक्कम रुपये १,४१,२४,४४५ (करासह) पेक्षा रक्कम रु.२,००,०६,५६१/- ने जास्त असल्याने याबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्य.स.चे दि.०१.११.२०१८ रोजीचे सभेसमोर सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चेअंती निर्णय क्र.६८५ अन्वये, पुढीलप्रमाणे निर्देश देणेत आलेले होते. **"संस्थानचे हिताचे दृष्टीने Oracle Licenses हे ई-निविदेतील निम्नत्तम दरधारकाकडून खरेदी न करता OEM यांचेकडून त्यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशाप्रमाणे खरेदी करणेस व रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी".**

उपरोक्त निर्देशान्वये, आवश्यक Oracle Licenses हे OEM (Oracle Corporation) यांचेकडून खरेदी करणेस व याकामीची रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव एसएसएसटी/वशी-आयटी/४३१८/२०१८, दि.३०.११.२०१८ अन्वये, मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावाबाबत वारंवार पाठपुरावा केलेनंतर, महाराष्ट्र शासन यांचे सासंवि-१०१९/१८२३/प्र.क्र.०३/का.१६, कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, दि.२३.०७.२०२० अन्वये पुढीलप्रमाणे अभिप्राय प्राप्त झालेला आहे. **"उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदर प्रस्तावावर शासनाच्या प्रचलित खरेदी धोरण व नियमानुसार व्यवस्थापन समितीने कार्यवाही करावी."**

नविन Oracle Licenses खरेदी करणेकामी M/s Oracle यांनी देऊ केलेले दर व ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेले निम्नत्तम दर याचा विचार करता, याकामी थेट M/s Oracle यांना पुरवठा आदेश देणे अर्थिक दृष्टीने हितावह होणार आहे. सबब, मा.व्य.स.चे दि.०१.११.२०१८ सभेतील निर्णय क्र.६८५ व महाराष्ट्र शासनाचा याबाबतचा अभिप्राय यास अनुसरून, कार्यान्वीत Oracle Licenses चे नुतनीकरण व आवश्यक नविन Licenses खरेदी करणेकामी थेट M/s Oracle यांना खरेदी नियमावली **मुद्दा ३.२.६ एकल स्त्रोत खरेदी – (अ)** यास अधिन राहून पुरवठा आदेश देता येईल.

त्यानुसार, दि.१६.०२.२०२१ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, दि.१६.०३.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे M/s Oracle यांना याबाबत त्यांचा अभिप्राय तथा प्रस्ताव सादर करणेस सुचित करणेत आले होते. त्यावर M/s Oracle यांनी दि.२९.०३.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे Oracle Licenses Renewal करीता स्वतंत्र ई-मेलद्वारे त्यांचे यासंदर्भातील विभागाशी संपर्क करुन देणेत येईल, असे कळविले होते. तसेच आवश्यक Oracle Licenses खरेदी आमचे अधिकृत वितरकांमार्फत करावी असे ई-मेलमध्ये नमुद करून, अधिकृत वितरकांचे माहितीकरीता इंटरनेट लिंक सादर केलेली आहे.

त्यानुसार M/s Oracle यांनी दि.०६.०४.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे Oracle Licenses Renewal करीता पुढीलप्रमाणे दर कळविलेले आहेत. त्यांनी कळविलेल्या दराप्रमाणे कार्यान्वीत Oracle Database व Oracle ERP Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२२ या कालावधीचे नुतनीकरणासाठी एकुण रक्कम रु.१,१४,८६,५६३/- + कर मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

M/s Oracle यांनी दि.१२.०४.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांचे अर्थिक वर्ष हे मे अखेर संपत असल्याने संस्थानने नविन Oracle Licenses खरेदी करणेकामी दि.१५.०५.२०२१ पर्यंत त्यांचे अधिकृत पुरवठाधारकामार्फत पुरवठा आदेश द्यावा, अन्यथा पुरवठा आदेशाची अंमलबजावणी वेळेत होणेची तसेच यावर अधिकची सुट मिळणेची शक्यता कमी आहे, असे कळविलेले आहे. M/s Oracle यांचे सदर ई-मेलबाबत अभिप्राय कळणेसंदर्भात मे.टिसीएस यांना दि.१३.०४.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे विनंती करणेत आली होती. त्यानुसार मे.टिसीएस यांनी दि.१५.०४.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे. "आवश्यक Oracle Licenses खरेदी व नुतनीकरण हे M/s Oracle यांचेमार्फतच करुन घ्यावे, तसेच Oracle Standard Edition ऐवजी Oracle Enterprise Edition चे नुतनीकरण करावे. याकामी संस्थानने यापुर्वी दिलेल्या पुरवठा आदेशाची अंमलबजावणी करणेबाबत प्राधान्याने विचार करणेत यावा. "

मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार, कार्यान्वीत Oracle Licenses चे नुतनीकरण व आवश्यक नविन Oracle Licenses चा पुरवठा थेट M/s Oracle यांनीच संस्थानला करणे अपेक्षीत असल्याचे पुनश्च: एकदा त्यांना दि.०३.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे सुचित करणेत आले होते. त्यानुसार M/s Oracle यांनी

दि.१४.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे Oracle Licenses ची खरेदीकामी त्यांचे संभाव्य दर पुढीलप्रमाणे सादर केलेले आहे.

Programs and Program-Related Service Offerings				
Item	**Part No.**	**Descriptions / License Type**	**Qty**	**Net Fee**
1.0	A90611	Oracle Database Ent.Edition – Proc. Perpetual	10	1,29,12,141.60
1.1		Software Updates		19,36,821.24
1.2		Product Support		9,03,849.91
2.0	L10021	Oracle Int.Dev.Suite - Named User Plus Perpetual	5	7,88,320.15
2.1		Software Updates		1,18,248.02
2.2		Product Support		55,182.41
		Program-Related Technical Support Fees		30,14,101.58
		Total Programs and Program-Related Service Offerings Fees		**1,67,14,563.33**

उपरोक्त प्रमाणे नविन Oracle Licenses ची खरेदीकामी M/s Oracle यांनी एकुण रक्कम रुपये १,६७,१४;५६३/- + कर इतका खर्च कळविलेला आहे. सदरचे ई-मेलमध्ये त्यांनी देऊ केलेले दर हे फक्त दि.२७.०५.२०२१ पर्यंतच ग्राह्य धरण्यात येतील असे नमुद केलेले असून, याकामी तूयांना पुरवठा आदेशाबरोबरच पुरवठा आदेशाप्रमाणे याकामीची रक्कम आगाऊ प्राप्त होणे आवश्यक असल्याचे कळविलेले आहे.

M/s Oracle यांनी दि.०६.०४.२०२१ व दि.१४.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे कळविलेप्रमाणे कार्यान्वीत Oracle Database व Oracle ERP Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२२ या कालावधीचे नुतनीकरणासाठी एकुण रक्कम रु.१,१४,८६,५६३/- + कर इतका व नविन Oracle Licenses ची खरेदीकामी रक्कम रुपये १,६७,१४,५६३/- + कर इतका असा एकुण एकुण रक्कम रु. २,८२,०१,१२६/- (अक्षरी – रु. दोन कोटी ब्यांएशी लाख एक हजार एकशे सव्वीस मात्र) + कर इतका खर्च अपेक्षीत आहे.

मा.व्य.स.चे दि.०१.११.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८५ अन्वये, देणेत आलेले निर्देश व याबाबत शासनाकडून प्राप्त झालेला अभिप्राय यानुसार खरेदी नियमावली मुद्दा ३.२.६ एकल स्त्रोत खरेदी – (अ) यास अधिन राहून, याकामी थेट M/s.Oracle Corporation (OEM) यांना पुरवठा आदेश देता येईल. सबब, मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचे मान्यतेने याकामी मुळ उत्पादक कंपनी (OEM) M/s.Oracle Corporation यांचेशी चर्चा करुन त्यांना याकामी पुरवठा आदेश देणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,८२,०१,१२६/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर चक्रिय पद्धतीने सादर करणेस दि.२२.०५.२०२१ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये मान्यता घेणेत आलेली होती.

त्यानुसार सदरचा प्रस्ताव दि.२५.०५.२०२१ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांचे समोर प्रत्यक्ष सादर करणेत आला होता. यावेळी प्रस्तावासंदर्भात झालेल्या चर्चेअंती मा.अध्यक्ष महोदय यांनी "M/s.Oracle Corporation यांनी कार्यान्वीत M/s.Oracle Licenses चे नुतनीकरण करणेकरीता कळविलेल्या रकमेतील दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२१ या कालावधीची रक्कम अनुक्रमे ६३,२९,७२६/- व ३४,६०,९४८/- एकूण रक्कम रुपये ९७,९०,६७४/- हि कमी करणेसंदर्भात त्यांना सुचित करणेत यावे," असे निर्देशीत केले होते. सदर निर्देशानुसार M/s.Oracle Corporation यांना यासंदर्भात दुरध्वनीद्वारे तसेच इकडील विभागाचे दि.२९.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे सदरची रक्कम कमी करणेस कळविणेत आले होते. त्यानुसार M/s.Oracle यांनी दि.२९.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे सुरवातीस सदरचे नुतनीकरण एक वर्षपेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबीत असल्याने सदर रकमेत कोणत्याही प्रकारे सवलत देणे शक्य नसल्याचे कळविलेले आहे. तसेच, Oracle Licenses Renewal & Purchase यासाठी त्यांनी देऊ केलेले दर हे दि.३१.०५.२०२१ अखेरच लागू राहतील असेही त्यांनी ई-मेलमध्ये नमुद केलेले आहे. याबाबत M/s.Oracle यांचे वरिष्ठांशी संपर्क साधून मागील कालावधीचे नुतनीकरणाची रक्कम कमी करणेबाबत पुनश्च: विनंती करणेत आली होती. त्यानुसार M/s.Oracle यांनी दि.२९.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे याकामी सुधारीत दर देऊ केलेले आहेत. त्यानुसार त्यांचेकडून यापुर्वी प्राप्त व दि.२९.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे प्राप्त याकामीचे दर पुढीलप्रमाणे.

Sr. No.	**Product**	**Serial Number**	**No of Users**	**Total Amt. as per previous quote**	**Total amt as per quote received thr mail dtd 29.05.2021**
A.					
01	Oracle Internet Application Server Enterprise Edition - Named User Plus Perpetual	17623698	100	74,26,127.56	54,85,012.00
02	Oracle Golden Gate - Processor Perpetual	17623698	04		
03	Oracle Database Standard Edition - Processor Perpetual	17623698	04		

B.					
01	Oracle Discrete Manufacturing - Application User Perpetual	17741397	75	40,60,435.08	29,99,077.80
02	Oracle Purchasing - Application User Perpetual	17741397	75		
03	Oracle Purchasing - Application User Perpetual	17741397	25		
04	Oracle Financials - Application User Perpetual	17741397	25		

M/s.Oracle यांनी उपरोक्त ई-मेलद्वारे कळविलेप्रमाणे कार्यान्वीत Oracle Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२२ या कालावधीकरीताचे नुतनीकरण करणेकामी एकूण रक्कम रुपये ८४,८४,०९०/- + कर मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. तसेच, आवश्यक Oracle Licenses चे खरेदी करणेकामी त्यांनी यापुर्वी कळविलेल्या दराप्रमाणे एकूण रक्कम रुपये १,६७,१४,५६३/- + कर इतका खर्च अपेक्षीत आहे. M/s.Oracle यांनी दि.२९.०५.२०२१ व दि.३१.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांनी देऊ केलेले दर हे फक्त दि.३१.०५.२०२१ अखेर ग्राह्य धरणेत येतील, असे कळविलेले आहे.

दि.३१.०५.२०२१ रोजी सदर प्रस्तावाबाबत मा.अध्यक्ष महोदय यांचेबरोबर झालेल्या चर्चेदरम्यान M/s.Oracle यांनी देऊ केलेल्या सुधारीत दरांबाबत अवगत करणेत आले. यावेळी चर्चेअंती मा.अध्यक्ष महोदय यांनी सदरचा प्रस्ताव M/s.Oracle यांचेकडून दि. २९.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे प्राप्त झालेल्या सुधारीत प्रस्तावासह फेरसादर करणेबाबत निर्देशीत केलेले आहे.

M/s.Oracle यांनी दि. ३१.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांनी Oracle Licenses चे नुतनीकरण तसेच आवश्यक Oracle Licenses खरेदीसाठी देऊ केलेल्या दरांची वैधता दि. ३१.०५.२०२१ रोजी संपुष्टात आली असल्याचे कळविले आहे. सदर ई-मेलचे उत्तरादाखल त्यांना दि. ०१.०६.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांचेमार्फत Oracle Licenses खरेदीस सहमती तसेच याकामीचे दर दि. १४.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे संस्थानला प्राप्त झाले आहेत, त्यानुसार याबाबतची कार्यवाही संस्थानमार्फत प्राधान्याने चालू असून, यास आणखी काही अवधी लागू शकतो असे कळविलेले होते. त्यावर M/s.Oracle यांनी दि. ०४.०६.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांनी यापुर्वी सादर केलेला प्रस्तावाची वैधता दि.३१.०५.२०२१ अखेर संपुष्टात आलेली असुन, नविन प्रस्तावाबाबत ते पुढील आठवडयात संस्थानशी संपर्क करतील, असे कळविलेले आहे.

Oracle Database व Oracle ERP Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२२ या कालावधीचे नुतनीकरण व आवश्यक नविन Oracle Licenses खरेदी करणेकामी M/s.Oracle यांनी कळविलेप्रमाणे त्यांचेमार्फत याकामी प्रस्ताव प्राप्त झालेनंतर त्यांचेबरोबर मा.तदर्थ समितीचे वतीने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेमार्फत चर्चा/वाटाघाटी करुन त्यांना याकामी प्रचलीत पद्धतीने मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेने कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामीचा फेरप्रस्ताव मान्यतेस्तव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी :- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.११.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८५ अन्वये, देणेत आलेले निर्देश व याबाबत शासनाकडून प्राप्त झालेला अभिप्राय यानुसार खरेदी नियमावली मुद्दा ३.२.६ एकल स्त्रोत खरेदी – (अ) यास अधिन राहून, साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत Oracle Database व Oracle ERP Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२२ या कालावधीचे नुतनीकरण व आवश्यक नविन Oracle Licenses ची खरेदीकामी थेट M/s.Oracle Corporation (OEM) यांना पुरवठा आदेश देता येईल.

प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे कार्यान्वीत Oracle Database व Oracle ERP Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२२ या कालावधीचे नुतनीकरण व आवश्यक नविन Oracle Licenses ची खरेदी मुळ उत्पादक कंपनी (OEM) M/s.Oracle Corporation यांचेकडून केल्यास अर्थिकदृष्टया संस्थानचे हिताचे होणार आहे. सबब, याकामी मुळ उत्पादक कंपनी (OEM) M/s.Oracle Corporation यांचेशी मा.तदर्थ समितीचे वतीने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेमार्फत चर्चा-वाटाघाटी करुन त्यांना याकामी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचे मान्यतेने पुरवठा आदेश देणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,८२,०१,१२६/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणे कामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :- "साईटेक प्रकल्प-२" साठी नविन कंपनीची नेमणूक न झाल्याने खरेदी, भांडार व लेखाशाखा विभागांसाठी कार्यान्वीत Oracle ERP व Oracle Database या प्रणालींचे

Oracle Support Licenses दि.०१.०५.२०१७ पासून Renewal करणे व मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार आवश्यक नविन Oracle Licenses खरेदी करणे प्रलंबीत आहे.

मा.व्य.स.चे सभेमध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे व मे.टिसीएस यांचे अभिप्रायाप्रमाणे, Oracle Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०१९ या कालावधीकरिता नुतनीकरण व आवश्यक नविन Oracle Licenses खरेदीकरीता तत्कालीन मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेन्वये, इकडील विभागाचे दि.२३.०५.२०१८ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये Oracle यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-आयटी/९२५/२०१८, दि.२४ मे, २०१८ नुसार एकूण रक्कम रुपये १,५३,८९,०४९.९६ मात्रचा पुरवठा आदेश देणेत आलेला होता. Oracle यांना देण्यात आलेल्या सदर पुरवठा आदेशाची नोंद घेऊन याकामी येणारे खर्चास व सदरची रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्य.स.चे दि.०१.०६.२०१८ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रं.३६८ नुसार Oracle Software Licenses Purchase & Support Renewal करणेकामी Oracle Corp. यांना देण्यात आलेला पुरवठा आदेश रद्द करणेत यावा, असे निर्देश देणेत आले होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०७.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४६१ अन्वये "यापुर्वी ओरॅकल कंपनीकडून जे लायसन्सेस खरेदी केलेले आहेत त्यांचे नुतनीकरण कंपनीकडूनच करणे आवश्यक आहे. त्यामुळे पुढील लायसन्सेसचे नुतनीकरण ओरॅकल कंपनीकडूनच करुन घेण्यास व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत आली. तसेच, जे लायसन्सेस नव्याने घ्यावयाचे आहे ते खरेदी करणेस विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत आली".

उपरोक्त निर्देशाप्रमाणे M/s Oracle(I)Pvt Ltd., Pune यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-आयटी/३०४९/२०१८, दि.२४ सप्टे., २०१८ अन्वये कार्यान्वीत Oracle Licenses नुतनीकरण करणेकामी कार्यादेश देणेत आलेला आहे. परंतू आजपावेतो Oracle Corporation यांचेमार्फत नुतणीकरणाची कोणतीही कार्यवाही करणेत आलेली नाही. तसेच, आवश्यक नविन Oracle Licenses खरेदी करणेकरिता राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेल्या निम्नतम दराप्रमाणेची येणारी एकूण रक्कम रु.३,४१,३१,००६/- (करासह) इतकी होती. सदर रक्कम हि Oracle Corporation यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशामधील याकामीचे रक्कम रुपये १,४१,२४,४४५ (करासह) पेक्षा रक्कम रु.२,००,०६,५६१/- ने जास्त असल्याने याबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.११.२०१८ रोजीचे सभेसमोर सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चेअंती निर्णय क्र.६८५ अन्वये, पुढीलप्रमाणे निर्देश देणेत आलेले होते. **"संस्थानचे हिताचे दृष्टीने** Oracle Licenses **हे ई-निविदेतील निम्नत्तम दरधारकाकडून खरेदी न करता** OEM **यांचेकडून त्यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशाप्रमाणे खरेदी करणेस व रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी".**

उपरोक्त निर्देशान्वये, आवश्यक Oracle Licenses हे OEM (Oracle Corporation) यांचेकडून खरेदी करणेस व याकामीची रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव एसएसएसटी/वशी-आयटी/४३१८/२०१८, दि.३०.११.२०१८ अन्वये, मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावाबाबत वारंवार पाठपुराव्याअंती महाराष्ट्र शासन यांचे सासंवि-१०१९/१८२३/प्र.क्र.०३/का.१६, दि.२३.०७.२०२० अन्वये पुढीलप्रमाणे अभिप्राय प्राप्त झालेला आहे. **"उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदर प्रस्तावावर शासनाच्या प्रचलित खरेदी धोरण व नियमानुसार व्यवस्थापन समितीने कार्यवाही करावी."**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.११.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६८५ अन्वये, देणेत आलेले निर्देश व याबाबत शासनाकडून प्राप्त झालेला अभिप्रायानुसार कार्यान्वीत Oracle Database व Oracle ERP Licenses चे नुतनीकरण व आवश्यक नविन Oracle Licenses खरेदी करणेकामी थेट M/s Oracle यांना खरेदी नियमावली **मुद्दा ३.२.६ एकल स्त्रोत खरेदी – (अ)** यास अधिन राहून पुरवठा आदेश देता येईल. त्यानुसार इकडील विभागाचे दि.१६.०२.२०२१ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये दि.१६.०३.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे याबाबत M/s Oracle यांना त्यांचा प्रस्ताव सादर करणेस सुचित करणेत आले होते.

M/s.Oracle यांनी कळविलेप्रमाणे कार्यान्वीत Oracle Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२२ या कालावधीकरीताचे नुतनीकरण करणेकामी एकूण रक्कम रुपये ८४,८४,०९०/- + कर मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. तसेच, आवश्यक Oracle Licenses चे खरेदी करणेकामी त्यांनी यापुर्वी कळविलेल्या दराप्रमाणे एकूण रक्कम रुपये १,६७,१४,५६३/- + कर इतका खर्च अपेक्षीत आहे. M/s.Oracle यांनी दि.२९.०५.२०२१ व दि.३१.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांनी देऊ केलेले दर हे फक्त दि.३१.०५.२०२१ अखेर ग्राह्य धरणेत येतील, असे कळविलेले आहे.

दि.३१.०५.२०२१ रोजी सदर प्रस्तावाबाबत मा.अध्यक्ष महोदय यांचेबरोबर झालेल्या चर्चेदरम्यान M/s.Oracle यांनी देऊ केलेल्या सुधारीत दरांबाबत अवगत करणेत आले. यावेळी चर्चेअंती मा.अध्यक्ष महोदय यांनी सदरचा प्रस्ताव M/s.Oracle यांचेकडून दि. २९.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे प्राप्त झालेल्या सुधारीत प्रस्तावासह फेरसादर करणेबाबत निर्देशीत केलेले आहे.

M/s.Oracle यांनी दि. ३१.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांनी Oracle Licenses चे नुतनीकरण तसेच आवश्यक Oracle Licenses खरेदीसाठी देऊ केलेल्या दरांची वैधता दि. ३१.०५.२०२१ रोजी संपुष्टात आली असल्याचे कळविले आहे. सदर ई-मेलचे उत्तरादाखल त्यांना दि. ०१.०६.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांचेमार्फत Oracle Licenses खरेदीस सहमती तसेच याकामीचे दर दि. १४.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे संस्थानला प्राप्त झाले आहेत, त्यानुसार याबाबतची कार्यवाही संस्थानमार्फत प्राधान्याने चालू असून, यास आणखी काही अवधी लागू शकतो असे कळविलेले होते. त्यावर M/s.Oracle यांनी दि. ०४.०६.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांनी यापुर्वी सादर केलेला प्रस्तावाची वैधता दि.३१.०५.२०२१ अखेर संपुष्टात आलेली असुन, नविन प्रस्तावाबाबत ते पुढील आठवडयात संस्थानशी संपर्क करतील, असे कळविलेले आहे.

Oracle Database व Oracle ERP Licenses चे दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०२२ या कालावधीचे नुतनीकरण व आवश्यक नविन Oracle Licenses खरेदी करणेकामी M/s.Oracle यांनी कळविलेप्रमाणे त्यांचेमार्फत याकामी प्रस्ताव प्राप्त झालेनंतर त्यांचेबरोबर मा.तदर्थ समितीचे वतीने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेमार्फत चर्चा/वाटाघाटी करुन त्यांना याकामी प्रचलीत पद्धतीने मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेने कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामीचा फेरप्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सविनय सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

21/06/2021

IT-MEETING-21.06.2021

विषय क्र.- ६४

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय 313

पाणी पुरवठा विभाग

विषय:- वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा-१ चे कामातील पाईपलाईन मार्गातील रस्त्यांची दुरुस्ती खर्चास मान्यता मिळणेबाबत.

टिपणी,

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीपुढे विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनयोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल, अशी तरतुद आहे.

तसेच अधिनियमाचे कलम २१ (१) मधील पोटकलम (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे, अशी तरतूद आहे.

मा. शासन निर्णय:-

१. महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/प्र.क्र.१७७(भाग-१)/का.१६, दि.०७ फेब्रुवारी, २०१८ अन्वये मुख्य अभियंता (प्रभारी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दि.२५/०१/२०१८ रोजी दिलेल्या तांत्रिक मान्यतेनुसार वाढीव श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगांव नगरपालिका संयुक्त पाणी पुरवठा योजना, ता.राहाता, जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्भव घेऊन) योजनेस श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव, २०१७-१८ करीता सदर योजनेची निकड विचारात घेऊन ही योजना टप्पा क्रं.१ (शिर्डी परिसरातील करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनचे काम करणे) – अंदाजे मुल्य रु.२७,१३,०३,९८०/- आणि टप्पा क्रं.२ (निळवंडे धरण ते मौजे कनकरी संस्थान जलशुध्दीकरण केंद्र, शिर्डी नगरपंचायत ते कोपरगांव नगरपरिषद जलशुध्दीकरण केंद्र पर्यंत पाईपलाईन टाकणे) अंदाजे मुल्य रु.२०५,५९,८९,८०४/- या दोन स्वतंत्र टप्प्यात राबविण्यात येईल. सदर अंदाजित रकमेवर escalation charge व त्यावरील एकुण ५% P.M.C. charge यांची गणना करुन अटी व शर्तींच्या अधिन राहून सदर योजनेसाठी एकुण रु.२६०.३९ कोटी इतक्या खर्चास सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली असून या योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करुन मोजमाप नोंदणी शुल्क २% व प्रकल्प व्यवस्थापन शुल्क ३% अशी एकुण ५% इतकी फी देखील आदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

२. मा.विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/का.१६, दि.२१ डिसेंबर, २०१८ अन्वये वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.-१ चे पात्र निविदाधारक ठेकेदार द इंडियन हयुम पाईप कंपनी लि.पुणे यांना रु.२३,८१,००,०००/- (रु.तेवीस कोटी एक्याऐंशी लाख फक्त) इतक्या रकमेचा कार्यारंभ आदेश देण्यास व त्यावर अधिक ५% Contg व २% W.C. सह एकुण रु.२५,२२,२४,५७६.२५ इतक्या रकमेस मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रकल्पाची माहिती:-

टप्पा क्रं .-१ चे कामात खालीलप्रमाणे कामाचा अंतर्भाव आहे.

Estimated Cost- २७.१३ कोटी.

१. १७ द.ल.लिटर क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करणे.
२. ५०० mm व्यास शुध्द पाणी उर्ध्वनलिका डी आय के-९, लांबी- १०० मिटर.
३. आर.सी.सी. मुख्य संतुलीत जलकुंभ, क्षमता- १४,२५,००० लिटर, उंची- २५ मिटर.
४. आर.सी.सी. उंच जलकुंभ-
   अ) क्षमता- ६,६०,००० लिटर, उंची- १५ मिटर.
   ब) क्षमता- ७,६५,००० लिटर, उंची- १५ मिटर.
   क) क्षमता- ३,४०,००० लिटर, उंची- १५ मिटर.
   ड) आर.सी.सी. सम्प, क्षमता-२८०००लिटर-०२ नग.
५. ८०० mm ते १५० mm व्यास शुध्द पाणी गुरुत्ववाहिनी विविध भागासाठी डी आय के-७, एकुण लांबी- ९१८० मिटर.
६. अस्तित्वातील उंच संतुलित जलकुंभ, क्षमता- १०,००,००० लिटर दुरुस्ती कामे.

..2/-

७. वितरण व्यवस्था-

अ) ३५० mm ते १०० mm व्यास पाईप- डीआय के-७, लांबी-५६१९ मिटर.

ब) ३५० mm ते ९० mm व्यास पाईप शुध्द पाणी सम्प पर्यंत वितरण व्यवस्थासाठी, लांबी-७२८२ मिटर.

८. ६ महिनेकरीता O & M व चाचणीकरीता कालावधी इत्यादी.

प्रस्तावना:-

वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.-१ चे कामासाठी ठेकेदार THE INDIAN HUME PIPE CO.LTD.,यांना जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणी पुरवठा/४६६५/२०१८, दि.२२/१२/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. त्यानुसार ठेकेदार यांचेकडून टप्पा क्रं.०१ चे काम सुरु आहे.

वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा क्रं.०१ चे कामाचा आढावा घेणेसाठी दि.२१/०८/२०२० रोजी सकाळी ११:०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे समवेत उपविभागीय अधिकारी, शिर्डी, तहसिलदार, राहाता, मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव व टप्पा क्र.०१ कामाचे ठेकेदार यांचे समवेत बैठक आयोजित करणेत आलेली होती.

सदरहू बैठकित पाईपलाईन ज्या मार्गाने जाणार आहे, त्या मार्गातील शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्याची खोदाई करावी लागणार आहे. याकरिता सदरहू मार्गातील रस्त्याची दुरुस्ती करावी लागणार आहे. यासाठी आवश्यक खर्चाचे इस्टीमेट तयार करुन, येणारे खर्चास मान्यता घेणेबाबतची कार्यवाही करुन घ्यावी असे निर्देश देण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव यांचेकडून जा.क्रं./तांशा-१/२७२/२०२०, दि.२१/०९/२०२० रोजीचे पत्रान्वये शिर्डी नगरपंचायत हद्दीतुन पाईपलाईनचा मार्ग निश्चित करण्याच्या अनुषंगाने आदेशीत केल्याप्रमाणे दोन मार्गाचे पुर्न:स्थापन व पाईपच्या खर्चाचे अंदाजपत्रक सादर करण्यात आलेले आहेत.

उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव यांचेकडून सादर केलेल्या अंदाजपत्राची पडताळणी केली असता, त्यामध्ये श्री साईबाबा दर्शन रांग प्रकल्प, श्री समाधी मंदिर, श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी बसस्थानक करीता येणा-या पाईपलाईनचे कामात होणारे रस्ता दुरुस्तीचे कामाचा समावेश नसल्याने यामध्ये या कामाचा समावेश करुन अंदाजपत्रक फेर सादर करणेसाठी उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव यांना जा.नं.एसएसएस/वशी/ पाणी पुरवठा/१७९४/२०२०, दि.१२/१०/२०२० अन्वये पत्र देण्यात आलेले होते.

उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव यांचेकडून जा.क्रं./तांशा-१/३०८/२०२०, दि.१५/१०/२०२० रोजीचे पत्रान्वये शिर्डी नगरपंचायत हद्दीतुन पाईपलाईनचा मार्ग निश्चित करण्याच्या अनुषंगाने आदेशीत केल्याप्रमाणे दोन मार्गाचे पुर्न:स्थापन व पाईपच्या खर्चाचे अंदाजपत्रक सादर करण्यात आलेले आहेत. (सोबत दि.१५/१०/२०२० रोजीचे पत्राची प्रत सादर आहे.)

दोन्ही मार्गाचे पुर्न:स्थापन खर्चाचे अंदाजपत्रकाचा तपशिल खालीलप्रमाणे:-

A)	Rout – A Road Reinstating	Length	Unit	Rate	Amount
1	From MSEB sub station to Hotel Siddhant	400.00	MTR	4445.00	17,78,000.00
2	From Hotel Siddhant to Bhakta Niwas 500 Rooms.	1700.00	MTR	4445.00	75,56,500.00
3	From MSEB sub station to Existing ESR 10 lakhs cap.	600.00	MTR	4445.00	26,67,000.00
4	Existing ESR 10 lakhs cap. To Shri SaiBaba darshan rang, Samadhi Mandir, SaiBaba Hospital, Bus Stand and Other.	5640.00	MTR	4445.00	2,50,69,800.00
	Total Length-	**8340.00**	**MTR**	**Total Amount-**	3,70,71,300.00

B)	Rout – B Road Reinstating	Length	Unit	Rate	Amount
1	From MSEB sub station to Zhulelal Mandir.	290.00	MTR	4445.00	12,89,050.00
2	From Zhulelal Mandir to NH 60 (Ratnakar Bank).	1400.00	MTR	4445.00	62,23,000.00
3	NH 60 (Ratnakar Bank)to Bhakta Niwas Existing ESR.	450.00	MTR	4445.00	20,00,250.00
4	From Zhulelal Mandir to Existing ESR 10 lakhs cap.	565.00	MTR	4445.00	25,11,425.00
5	Existing ESR 10 lakhs cap. To Shri SaiBaba darshan rang, Samadhi Mandir, SaiBaba Hospital, Bus Stand and Other.	5640.00	MTR	4445.00	2,50,69,800.00
	Total Length-	**8340.00**	**MTR**	**Total Amount-**	3,70,93,525.00

..3/-

टप्पा क्रं.०१ चे कामात टाकावयाच्या पाईपलाईन ज्या मार्गाने जाणार आहे, त्या मार्गातील रस्त्याची खोदाई करावी लागणार आहे. पाईपलाईन टाकलेनंतर सदरहू मार्गातील रस्त्याची दुरुस्ती करावी लागणार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग यांचेकडून टप्पा क्रं.०१ चे कामाची निविदा तयार करतेवेळी सदरहू निविदेमध्ये या कामाचा समावेश करण्यात आलेला नसल्याने यासाठी आवश्यक खर्चाचे इस्टीमेट तयार करुन, येणारे खर्चास मान्यता घेणेबाबतची कार्यवाही करुन घ्यावी लागणार आहे.

उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव यांचेकडून सादर केलेल्या दोन्ही मार्गाचे पुर्न:स्थापन खर्चाचे अंदाजपत्राची पडताळणी केली असता, **Rout – B** प्रमाणे दर्शविलेनुसार पाईपलाईनची अलायनमेंट निश्चित करणेत आलेली आहे.

उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव यांचेकडून सादर केलेल्या दोन्ही मार्गाचे पुर्न:स्थापन खर्चाचे अंदाजपत्रकानुसार **Rout – B** पुर्न:स्थापन खर्चाचे अंदाजपत्राची रक्कम ३,७०,९३,५२५/- मात्र दर्शविणेत आलेली आहे. त्यानुसार शिर्डी नगरपंचायत व जागतिक बॅंक प्रकल्प विभाग (PWD) हद्दीतुन खालीप्रमाणे पाईपलाईन जात आहे.

B)	ROUTE – B ROAD IN POSSESSION OF SHIRDI NAGAR PANCHAYAT	Length	Unit
1	From MSEB sub station to Zhulelal Mandir.	290.00	MTR
2	From Zhulelal Mandir to RBL Bank	1400.00	MTR
3	From Existing ESR to Zhulelal Mandir.	565.00	MTR
4	From Existing ESR 10 lakhs cap. to Laxmi Nagar.	895.00	MTR
	Total Length-	**3150.00**	**MTR**
	ROAD IN POSSESSION OF NATIONAL HIGHWAY AUTHORITY		
1	From Laxmi Nagar to Saibaba Bhaktaniwas 500 Rooms.	1610.00	MTR
	Total Length-	**1610.00**	**MTR**

Rout – B प्रमाणे दर्शविलेनुसार पाईपलाईनची अलायनमेंट निश्चित केल्यास शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे हद्दीतून एकुण ३१५० मिटर व जागतिक बॅंक प्रकल्प विभाग (PWD) हद्दीतुन १६१० मिटर पाईपलाईन जात आहे.

सदरहु काम करणेस परवानगी मिळणेसाठी मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना जा.क्रं.एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/२४३५/२०२०, दि.०१/१२/२०२० अन्वये व कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प विभाग (PWD) यांना जा.क्रं.एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/२४३४/२०२०, दि.०१/१२/२०२० अन्वये पत्र देण्यात आलेले होते.

<u>प्रस्ताव:-</u>

- यावर शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून जा.क्रं./टे-०८/८३/२०२१, दि.११/०१/२०२१ रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. सदरहू पत्रान्वये त्यांनी पाईपलाईनसाठी शिर्डी नगरपंचायतने नव्याने विकसीत केलेल्या रस्त्यास अंदाजे ३१५० मीटर लांब, २.५ मीटर रुंद व १.५ मीटर खोल खोदाई करावी लागणार आहे. त्यामुळे रस्त्याचे मोठया प्रमाणावर नुकसान होणार आहे.
  तरी टप्पा-१ चे अंतर्गत संस्थानकरीता पाईपलाईन टाकणेचे काम पुर्ण झालेवर संस्थानमार्फत रस्ता दुरुस्ती करुन दयावा. यासाठी रस्ता दुरुस्ती हमी पोटी सुरक्षा ठेव (अनामत रक्कम) रु.१,९१,३४,०९१/- नगरपंचायतकडे जमा करावी. सदर रस्त्यास संस्थानमार्फत पाईपलाईन टाकलेनंतर खोदाई केलेला रस्ता पुर्ववत दुरुस्ती केलेबाबत नगरपंचायतचे अभियंतामार्फत समक्ष पाहणी करुन सदर रस्ता पुर्ववत केला आहे. याबाबत खातरजमा झालेवर, आपण जमा केलेली सुरक्षा रक्कम (अनामत रक्कम) आपणास परत करणेत येईल. असे कळविलेले आहे. (सोबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दि.११/०१/२०२१ रोजीचे पत्र जोडलेले आहे)
- कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांचेकडून जा.क्रं.रेशा/इतिवृत्त/८२/सन २०२१, दि.१३/०१/२०२१ रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. सदरहू पत्रान्वये त्यांनी पाईपलाईन टाकणेस परवानगी मिळणेकामी या कार्यालयात पुर्न:स्थापित शुल्क रु.५,६३,७५०/- व सिक्युरीटी डिपॉझिट शुल्क १,००,०००/- भरण्यात यावे. तसेच बॅंक गॅरंटी रक्कम रु.४०,२५०/- Executive Engineer, World Bank Project (P.W.) Division, Ahmednagar यांचे नांवे या कार्यालयाकडे जमा करावी. त्यांनतरच आपणास परवानगी देणेकामीची पुढील कार्यवाही करता येईल. असे कळविलेले आहे. (सोबत कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांचे दि.१३/०१/२०२१ रोजीचे पत्र जोडलेले आहे). सदर नगर-मनमाड रस्ता हा संस्थानमार्फत दुरुस्त करावयाचा आहे.
- टप्पा क्रं.०१ चे कामात टाकावयाच्या पाईपलाईन ज्या मार्गाने जाणार आहे, त्या मार्गातील रस्त्याची खोदाई करावी लागणार आहे. पाईपलाईन टाकलेनंतर सदरहू मार्गातील रस्त्याची दुरुस्ती करावी लागणार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग यांचेकडून टप्पा क्रं.०१ चे कामाची निविदा तयार करतेवेळी सदरहू निविदेमध्ये या कामाचा समावेश करण्यात आलेला नाही. टप्पा क्रं.०१ चे निविदेमध्ये या कामाचा उल्लेख नसल्याने हा खर्च वेगळा करावा लागेल.
  उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव यांचेकडून सादर अंदाजपत्रकानुसार पाईपलाईन टाकावयाच्या मार्गाचे पुर्न:स्थापन खर्चाचे अंदाजपत्रकानुसार खर्चाची रक्कम रु. ३,७०,९३,५२५/- मात्र दर्शविणेत आलेली आहे.

तरी याबाबत खालील बाबींवर निर्णय होणे गरजेचे आहे.

- मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी व कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प विभाग (PWD) यांनी कळविलेनुसार पाईपलाईन मार्गाची दुरुस्ती संस्थानमार्फत करावी लागेल. याकामी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेने सल्लागार नेमुन विहीत पध्दतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबवून या कामासाठी ठेकेदार यांची नेमणूक करावी लागेल.
- मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी मागणी केलेनुसार संस्थानमार्फत रस्ता दुरुस्ती करणे, रस्ता दुरुस्ती हमी पोटी सुरक्षा ठेव (अनामत रक्कम) रु.१,९१,३४,०९१/- नगरपंचायतकडे जमा करणेचे कळविलेले आहे. तथापि जर रस्ता संस्थानमार्फत दुरुस्ती करावयाचा आहे तर सदरहू सुरक्षा ठेव रक्कम रु.१,९१,३४,०९१/- शिर्डी नगरपंचायत, शिर्डी कडे जमा करणेची आवश्यकता नाही, असे मत आहे. तसे मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना कळविता येईल.
- कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांनी कळविलेनुसार संस्थानमार्फत रस्ता दुरुस्ती करणे, पुर्नःस्थापित शुल्क रु.५,६३,७५०/- व सिक्युरीटी डिपॉझिट शुल्क १,००,०००/- तसेच बॅंक गॅरंटी रक्कम रु.४०,२५०/- Executive Engineer, World Bank Project (P.W.) Division, Ahmednagar यांचे नांवे जमा करणेस मान्यता मिळावी.
- उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उपविभाग कोपरगांव यांचेकडून प्राप्त अंदाजपत्रकानुसार पाईपलाईन टाकावयाच्या मार्गाचे पुर्नःस्थापन खर्चाचे अंदाजपत्रकानुसार खर्चाची रक्कम रु. ३,७०,९३,५२५/- मात्र दर्शविणेत आलेली आहे. सदरहू पुर्नःस्थापन खर्चाचे अंदाजपत्रक रु. ३,७०,९३,५२५/- मात्रचे खर्चास व याकामी सल्लागार नेमुन विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस, ई-निविदा सुचना वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस मान्यता असावी.

तरी सदरहू प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

कान्हूराज बगाटे (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

WC-Meeting-22-2020

विषय क्र.- ६५

मा.तदर्थ (Ad.hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर
पाणी पुरवठा विभाग

टिपणी-

विषय:- **सन २०२२-२०२३ करीता बारा महिन्याचे कालावधीसाठी पाणी पुरवठा विभागास पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिंलेडर खरेदी करणेस व त्यासाठी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत...**

सविनय सादर,

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-

अ.नं.	कलम/ तरतुद क्र.	कलम/ तरतुदीचे शीर्षक	पोटकलम/ उपंकलम क्र.	तरतूद
०१	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	१	राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.
०२	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	२ (झ)	सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.
०३	१७	समितीची कर्तव्ये व अधिकार	६	या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील.

प्रस्तावना:-

संस्थानकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, कनकुरी व पिंपळवाडी या संयुक्त पाणी पुरवठा योजनेच्या मौजे कनकुरी हद्दीतील पाणी साठवण तलावातुन पाणी पुरवठा करणेत येत आहे. या ठिकाणी पाणी साठविणेसाठी चार साठवण तलावांची निर्मिती करणे आलेली असून, सदरहू चार साठवण तलावांची एकुण पाणी साठवण क्षमता ३११ एम.एल.(द.ल.लिटर) इतकी आहे. सदर साठवण तलावात जलसंपदा (इरिगेशन) विभागाकडुन गोदावरी/दारणा नदी, गोदावरी उजवा तट कालवा याव्दारे शासन मंजुरीनुसार पाणी पुरवठा आवर्तन देण्यात येत आहे. याबाबत नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन ५३.३२०५ एम.सी.एफ.टी वार्षिक पाणी साठा मंजुर आहे.

संस्थानचे मौजे कनकुरी, ता.राहाता येथे साठवण तलावालगत जलशुध्दीकरण केंद्र असून, साठवण तलावातील पाणी शुध्द करणेसाठी ब्लीचिंग पावडर (विक्रम ब्रॅन्ड, ग्रासिम मेक, आय.एस.आय मार्क, ३४% क्लोरीन उपलब्ध), फेरीक ॲलम (१६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध) व क्लोरीन गॅस सिलेंडर यांची दैनदिन आवश्यकता भासते.

सन २०२०-२०२१ करीता साठवण तलावातील पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर इ. साहित्य ई-निविदा मागवून खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे **रु.२१,८७,५००/-** मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.१३/०६/२०२० रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

यावर मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभा दि. १३/०६/२०२०, निर्णय क्रं.३९९ खालीलप्रमाणे पारित करणेत आलेला होता. "... यावर सिवतर चचा होऊन, पाणी शुध्दीकरणासाठी माहे- सप्टेंबर -२०२० ते ऑगस्ट २०२१ या बारा महिन्याचे कालावधीसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निवीदा प्रक्रीया राबविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२१,८७,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.."

..2/-

याबाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभा दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४७० अन्वये खालील दराने नमूद पुरवठाधारकांना एक वर्ष कालावधीसाठी पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

अ.क्र	पुरवठादार	पुरवठा आदेश क्र.	मागणी	मंजूर दर
०१	मे. हितु जीतु एंटरप्रायजेस, मुंबई	खरेदी/३२६२/२०२१, दि.२५/०१/२०२१	३५ मे.टन	ब्लिचिंग पावडर रु.२६,०५०/- प्रती मे. टन (जी.एस.टी. सह)
०२	मे. यश केमिकल्स, नाशिक	खरेदी/३२१३/२०२१, दि.२१/०१/२०२१	५५ मे.टन	फेरीक ॲलम रु.७,८००/- प्रती मे. टन (जी.एस.टी. सह)
०३	मे. जी. एस. कमर्शियल कार्पोरेशन, नाशिक	खरेदी/३२२९/२०२१, दि.२२/०१/२०२१	५० सिलेंडर	रु.४,२५०/- प्रती सिलेंडर (जी.एस.टी. सह)

उपरोक्त नमूद पुरवठा कालावधी माहे-जानेवारी-२०२२ अखेर असुन त्यानंतर पुढील कालावधीसाठी नव्याने खरेदी प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिंलेडर करीता सन २०१८-१९ या वार्षिक टेंडरचे कालावधीत झालेल्या खर्चाचा तपशिल.

अ. नं	तपशिल	ऑगस्ट -२०१८ सुरवातीची विभागाकडील शिल्लक	ऑगस्ट-२०१८ ते ऑगस्ट -२०१९ मागणी करण्यात आलेले मटेरियल	एकुण	माहे ऑगस्ट - २०१९ अखेर खर्च	विभागाकडील शिल्लक ऑगस्ट - २०१९ अखेर
०१	ब्लिचींग पावडर	०.५७५ मे.टन	३४.७५० मे.टन	३५.३२५ मे.टन	३०.५५० मे.टन	४.७७५ मे.टन
०२	फेरीक ॲलम	३.०६० मे.टन	५४.९२० मे.टन	५७.९८० मे.टन	४९.९६० मे.टन	८.०२० मे.टन
०३	क्लोरीन गॅस सिलेंडर (प्रत्येकी १०० किलो वजन)	०२ सिलेंडर	५१ सिलेंडर	५३ सिलेंडर	४६ सिलेंडर	०७ सिलेंडर

पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिंलेडर करीता सन २०१९-२० या वार्षिक टेंडरचे कालावधीत झालेल्या खर्चाचा तपशिल.

अ.नं	तपशिल	सप्टेंबर-२०१९ सुरवातीची विभागाकडील शिल्लक	सप्टेंबर-२०१९ पासुन नविन टेंडरचे मागणी करण्यात आलेले मटेरियल	एकुण	खर्च	विभागाकडील शिल्लक
०१	ब्लिचींग पावडर	४.७७५ मे.टन	३४.००० मे.टन	३८.७७५ मे.टन	३७.९७५ मे.टन	०.८००मे.टन (मार्च २०२१ अखेर)
०२	फेरीक ॲलम	८.०२० मे.टन	४८.८०० मे.टन	५६.८२० मे.टन	५५.४०० मे.टन	१.४२० मे.टन (फेब्रुवारी २०२१ अखेर)
०३	क्लोरीन गॅस सिलेंडर (प्रत्येकी १०० किलो वजन)	०७ सिलेंडर	४९ सिलेंडर	५६ सिलेंडर	५३ सिलेंडर	०३ सिलेंडर (२४, जाने. २०२१)

कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिंलेडर करीता सन २०२१-२२ या वार्षिक टेंडरचे कालावधीत दि. ३० जुन, २०२१ अखेर झालेल्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.नं	तपशिल	मागिल टेंडरचे विभागाकडील सुरवातीची शिल्लक	सन २०२१-२२ चे टेंडरचे मागणी करण्यात आलेले मटेरियल	दि. ३० जुन, २०२१ अखेर खर्च	विभागाकडील शिल्लक ३०जुन, २०२१ अखेर	मागणी येणे बाकी (जाने-२०२२ अखेर वापर)
०१	ब्लीचिंग पावडर	०.८०० मे.टन (०१ एप्रिल २०२१)	७.५०० मे.टन	६.१५० मे.टन	२.१५० मे.टन	२७.५०० मे.टन
०२	फेरीक ॲलम	१.४२० मे.टन (०१, मार्च २०२१)	२०.०००मे.टन	१२.५२० मे.टन	८.९०० मे.टन	३५.००० मे.टन
०३	क्लोरीन गॅस सिलेंडर (प्रत्येकी १०० किलो वजन)	०३ सिलेंडर (२५, जाने. २०२१).	१६ सिलेंडर	१८ सिलेंडर	०१ सिलेंडर	३४ सिलेंडर

माहे एप्रिल ते जुलै या कालावधीत जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन पुरविण्यात येणारे पाणी हे जादा प्रमाणात दुषित, गाळ मिश्रीत व पाण्याला वास येत असलेने या कालावधीत पाणी शुध्दीकरणांसाठी जादा प्रमाणात मटेरियलचा वापर करावा लागतो. सध्या कोरोनाचे प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन असलेने पाणी शुध्दीकरणांसाठी मटेरियलचा वापर कमी प्रमाणात होत आहे, परंतु मंदिर सुरू झालेवर सदर मटेरियलचा वापर वाढवावा लागणार आहे. उपरोक्त नमूद पुरवठा कालावधी माहे-जानेवारी-२०२२ अखेर असुन त्यानंतर पुढील कालावधीसाठी नव्याने खरेदी प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

3/-

प्रस्ताव:-

सन २०२२-२०२३ करीता १२ (बारा) महिन्यांचे कालावधीसाठी पाणी शुध्दीकरण करणेकामी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर इ. मटेरियलचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.नं.	खरेदी करावयाच्या साहित्याचा तपशिल	आवश्यकता	अंदाजे दर (GST18%सह)	एकुण रक्कम
०१	ब्लीचिंग पावडर (विक्रम ब्रॅन्ड, ग्रासिम मेक, आय.एस.आय मार्क, ३४% क्लोरीन उपलब्ध)	३५ मे.टन	रु.३४,५००/- प्रती मे.टन (सर्वसमावेशक दर)	१२,०७,५००/-
०२	फेरीक ॲलम (१६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध)	५५ मे.टन	रु. १२,००० /- प्रती मे.टन (सर्वसमावेशक दर)	६,६०,०००/-
०३	क्लोरीन गॅस सिलेंडर (प्रत्येकी १०० किलो वजन)	५० सिलेंडर	रु.६,५०० प्रती सिलेंडर (सर्वसमावेशक दर)	३,२५,०००/-
	(अक्षरी रुपये एकवीस लाख ब्यान्नव हजार पाचशे मात्र)		**एकुण रक्कम:-**	**२१,९२,५००/-**

विभागाचा अभिप्राय:-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ नुसार वरील नमुद तरतुदीस अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेवून खरेदी विभागामार्फत सन २०२२-२०२३ करीता १२ (बारा) महिन्यांचे कालावधीसाठी पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून मटेरियल खरेदी करता येईल असे नम्र मत आहे.

वरील नमुद केलेनुसार पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक मटेरियल खरेदी करणेसाठी अंदाजे **रु. २१,९२,५००/-मात्र (अक्षरी रुपये एकवीस लाख ब्यान्नव हजार पाचशे मात्र)** खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचे साहित्य ई-निविदा मागवून विहित पध्दतीने खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे **रु. २१,९२,५००/- (अक्षरी रुपये एकवीस लाख ब्यान्नव हजार पाचशे मात्र)** मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी निर्णय होणेस विनंती..

(कान्हुराज बगाटे, भा.प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी

विषय क्र.- ९९

मा.तदर्थ समितीचे सभेपुढील विषय.

मंदिर विभाग.

विषय –श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवर व देणगीदार साईभक्त तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांचे सत्कारासाठी लागणा-या शॉल्स खरेदी विभागामार्फत खरेदी करणेबाबत...

टिपणी.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१९ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं. १८, निर्णय क्र.३३ - " यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे दर्शनासाठी येणारे व्हीआयपी व देणगीदार साईभक्तांचे सत्कारासाठी देणगीदार साईभक्त श्री.के.बालासारावणन, ईरोडे, मॅनेजिंग डायरेक्टर, साई लोगबाला (ओपीसी) प्रा.लि., ईरोडे, तामिळनाडू यांचेकडून श्री साईबाबांचा फोटो व श्री साईबाबा संस्थानचे नाव असलेल्या शॉल्स देणगी स्वरुपात स्विकारणेस, तसेच श्री.बालासारावणन यांना वर्षातून ५ ते ६ वेळा त्यांचे मागणीप्रमाणे आरतीचे सशुल्क पासेस प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. "

प्रस्तावना -श्रींचे दर्शनासाठी जगभरातून मान्यवर व देणगीदार साईभक्त मोठया संख्येने शिर्डीत येत असतात. त्यांचे दर्शनाची व्यवस्था जनसंपर्क कार्यालयामार्फत करणेत येते. मान्यवर व देणगीदार साईभक्तांचा जनसंपर्क कार्यालय व वरिष्ठ अधिकारी यांचे निर्देशानुसार मंदिरात व्हीआयपी कक्षात मुर्ती व शॉलदेऊन यथोचित सत्कार करणेत येतो. (सध्यस्थितीत कोव्हीड-१९ मुळे मंदिरातील सत्कार बंद आहेत.) आता सध्या कोव्हिड-१९ मुळे देणगीदार व मान्यवर साईभक्तांचे सत्कार हे 'साईसभागृह हॉल' (0-नंबर) येथे वरीष्ठांचे हस्ते करण्यात येतात. तसेच संस्थानचे आस्थापनेवरील स्थायी कर्मचारी सेवानिवृत्त होत असतात. अशा सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांचा आस्थापना विभागामार्फत मा.मुख्य व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे हस्ते श्रींची मुर्ती व शॉल देऊन सत्कार करणेत येतो.करीता सत्कारासाठी लागणा-या शॉल व मुर्ती मंदिर विभागामार्फत संबंधीत विभागांना पुरविण्यात येतात.

यापुर्वी समाधी मंदिर दर्शनार्थ खुले असताना (लॉकडाऊन होणेपुर्वीचे कालावधीत) देणगीदार,महत्वाचे व अतीमहत्वाचे मान्यवरव इ. साईभक्तयांचे सत्कारासाठी दैनंदिन खर्ची रजिष्टरनुसार साधारण सरासरी १५० ते २०० शॉल्स प्रती महिन्यास लागतात. सदरहू सत्कारासाठी लागणा-या शॉल्स साईभक्त श्री.के.बालासारावणन, ईरोडे, तामिळनाडु यांचेकडून उपरोक्त संदर्भिय निर्णयानुसार देणगी स्वरुपात स्विकारणेत आल्या होत्या. देणगीदार यांनी सन २०१९ मध्ये एकूण २१८० नग शॉल्स (रु.२३०/-प्रती नग) व ३२०० नग पट्टे (रु.५५/- प्रती नग) देणगी स्वरुपात दिलेले आहे. आजतागायतपर्यंत सदरहू स्विकारण्यात आलेल्यादेणगी शॉल्स व पट्टे वापरणेत आलेल्या असून, आता मंदिर विभागाकडे देणगी शॉल्स शिल्लक राहिलेले नसून ११०० नग पट्टे शिल्लक आहेत.

त्यानुसार मान्यवरांचे सत्कारासाठी ई-निविदा प्रक्रीयेव्दारे खरेदी विभागामार्फत कार्यवाही होऊन एकूण २४०० नग शॉल खरेदी करणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आला होता. परंतु सदरहू प्रस्तावावर मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी **" ५ लाख रु. चे आतील खर्चाच्या शॉल घेणे योग्य राहील असे मत आहे ",** असे निर्देश दिले आहे.

उपरोक्त मा.वरीष्ठांचे निर्देशानुसार यापुर्वीच्या असलेल्या सत्कार शॉल्सचे नमुनानुसार आवश्यक शॉल्सचा तपशिल खालीलप्रमाणे -

तपशिल	साईज	आवश्यक नग
शॉल –प्रिंटेड (अल्ट्रा सॅटीन चमकदार पांढरे रंगाचे कापड, त्यावर डिजीटल प्रींटसह -- श्रींचा फोटोसह)	३६" x ८०"	२००० नग

अभिप्राय -- मा.वरीष्ठांचे निर्देशानुसार श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवर व देणगीदार साईभक्त तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांचे सत्कारासाठी पुढील आर्थिक वर्ष सन २०२१-२०२२ करीता २००० नग शॉल्स खरेदी करता येईल. त्याअनुषंगाने एकूण २००० नगास अंदाजे रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख मात्र) मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सन २०२१-२०२२ या वर्षाकरीता मान्यवरांचे सत्कारांसाठी नमुद केलेप्रमाणे शॉल्स खरेदी करावयाचे झाल्यास ई-निविदा प्रक्रीयेव्दारे खरेदी विभागामार्फत कार्यवाही करता येईल तसेच आता तूर्त सध्या मान्यवरांचे सत्कारासाठी शिल्लक पट्टे वापरता येईल, असे नम्र मत आहे. याआधी इकडील विभागामार्फत शॉल खरेदी प्रस्तावास मान्यता घेऊन पुढील कार्यवाहीसाठी खरेदी विभागाकडे वर्ग करण्यात आला असता, त्यांनी सदरहू खर्चास मा.तदर्थ समितीची मान्यता घेऊन देण्यात यावा, असे कळविण्यात आलेले आहे.

प्रस्ताव -तरी उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेनुसार श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवर व देणगीदार साईभक्त तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांचे सत्कारासाठी लागणा-या शॉल्स खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे एकूण रु. ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयास्तव सविनय सादर.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- ९७

मा.तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

321

मंदिर विभाग.

टिपणी.

विषय – समाधी मंदिर गाभा-यातील श्रींचे समकालीन साईभक्तांचे खराब / जिर्ण झालेले फोटोंचे चावडी मंदिरातील फोटोप्रमाणे अत्याधुनिकरण, नुतनीकरण करणेकामी साईभक्त श्री.श्रीकांत किशोर जाधव, शिर्डी यांना विनामुल्य सेवा करण्याची संधी देणेस मान्यता मिळणेबाबत...

संदर्भ – १) मा.तदर्थ समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील विषय नं.७०, निर्णय क्र.५२३

२) साईभक्त श्री.श्रीकांत किशोर जाधव, शिर्डी यांचा दि.२६/०२/२०२१ रोजीचा अर्ज.

मा.तदर्थ समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील विषय नं.७०, निर्णय क्र.५२३ " यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त श्री.विनोद जाधव, मुंबई यांनी श्रींचे चावडी मंदिरातील खराब, जीर्ण झालेले देवी-देवतांचे फोटोंची कलर प्रिंट काढून वॉटरप्रुफ सनबोर्डवर आधुनिक पध्दतीने फोटो फ्रेम करुन ते देणगी स्वरुपात देण्यात तयार दर्शविलेली असल्याने सदर देवी-देवतांचे फोटो फ्रेम त्यांचेकडुन देणगी स्वरुपात स्विकारणेस व देणगीदार यांना आभारपत्र देणेस तसेच देणगीदार यांनी नव्याने आधुनिक पध्दतीने तयार करुन देणगी स्वरुपात दिलेले देवी-देवतांचे फोटो श्रींचे चावडी मंदिरात बसविणेस मान्यता देणेत आली. "

प्रस्तावना - उपरोक्त विषयांकीत संदर्भिय क्र.२ चे पत्रान्वये साईभक्त श्री.श्रीकांत किशोर जाधव, शिर्डी (मो.न.९३२०४७४७९५) यांनी " सध्या आपले संस्थानचे सीसीटीव्ही विभागामध्ये Video Editing, Online Scrolling देखभाल / दुरुस्ती संबंधीत कामे तसेच प्रकाशने विभागाकरीता श्रींचे मंदिर व संस्थान परीसरातील QR code करीता Video Editing / Design संबंधीत असलेली कामे मी विनामुल्य केली आहे. सदरहू कामाची मुदत आता फेब्रुवारी मध्ये संपत आलेली आहे.

आता सध्या मंदिर विभागाचे चावडी मंदिरातील लावलेली देवी-देवतांचे फोटो खराब/जीर्ण झाल्याने ते आम्ही नव्याने अत्याधुनिक पध्दतीने नुतनीकरण करुन देणगी स्वरुपात दिलेली असून चावडी मंदिरात लावण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर समाधी मंदिर गाभा-यातील श्रींचे समकालीन साईभक्तांची लावलेली फोटो बरेच वर्ष झाल्याने खराब/ जीर्ण होत आलेली आहे. सदरहू फोटो चावडीतील फोटोप्रमाणे आधुनिकीकरण / नुतनीकरण करणेसाठी मी विनामुल्य सेवा देण्यास तयार आहे." अशी विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय – अर्जदार श्री.श्रीकांत किशोर जाधव, शिर्डी यांनी संस्थानचे परीसरातील सर्व ठिकाणचे व्हिडीओ शुटींग, फोटोग्राफी संकलित करुन त्याची Documentry Film तयार करणेकामी तसेच प्रकाशने विभागाकरीता मंदिर व संस्थानचे विविध विभागातील QR code करीता video editing; Design संबंधीत कामेही करणेकामी अर्जदार यांनी विनामुल्य सेवा दिलेली आहे. फेब्रुवारी अखेर त्यांची मुदत संपलेली आहे.

तसेच संदर्भिय क्र.१ चे मा.तदर्थ समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२३ अन्वये सध्या श्रींचे चावडी मंदिरातील असलेले देव-देवीतांचे फोटो अत्याधुनिक पध्दतीने नुतनीकरण करुन आकर्षक बनविणेत येऊन श्री.जाधव यांनी देणगी स्वरुपात दिले असून ते चावडी मंदिरात बसविणेत आलेले आहे. मा.तदर्थ समितीचे निर्णयानुसार श्री.जाधव यांना जा.नं.एसएसएस/वशी-मंदिर/३३०४२०२१ दि.२८/०१/२०२१ अन्वये आभारपत्रही देणेत आलेले आहे.

तसेच चावडीतील फोटोंप्रमाणेच त्याच पध्दतीने समाधी मंदिर गाभा-यातील श्रींचे समकालीन भक्तांचे फोटो बरेच कालावधी झालेला असलेने खराब व जीर्ण झालेले आहे. चावडी मंदिरातील फोटोंप्रमाणेच समाधी मंदिर गाभा-यातील फोटोंचे नुतनीकरण केल्यास ते आकर्षक दिसेल व फोटोंचे आयुष्यमानही वाढेल. त्याकामी श्री.श्रीकांत जाधव यांना फोटोग्राफी मध्ये अनुभव असलेने सीसीटीव्ही विभागाप्रमाणेच इकडील विभागाकडे ०२ महिने विनामुल्य सेवा करणेस परवानगी मिळाल्यास, त्यांचेमार्फत सदरचे फोटोंचे नुतनीकरण करुन घेता येईल, असे नम्र मत आहे.

त्यानुसार श्री.श्रीकांत जाधव यांचेकडून सदरहू समाधी मंदिरातील श्रींचे समकालीन साईभक्तांचे फोटोंचे नुतनीकरण करण्याचे काम विनामुल्य करणेस मान्यता मिळणेकामी इकडील विभागामार्फत प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू प्रस्तावावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांनी " मा.व्यवस्थापन समितीचे समोर ठेवावे ", असे निर्देश दिलेले आहे.

प्रस्ताव –तरी अर्जदार श्री.श्रीकांत जाधव, शिर्डी यांनी केलेल्या विनंती नुसार चावडी मंदिरातील देव-देवीतांचे फोटोंचे नुतनीकरणा प्रमाणेच समाधी मंदिर गाभा-यातील असलेले श्रींचे समकालीन साईभक्तांचे जीर्ण व खराब झालेले फोटोंचे श्री.जाधव यांचेकडून विनामुल्य कलर प्रिंट काढून वॉटरप्रुफ सनबोर्डवर अत्याधुनिक, आकर्षक पध्दतीने फ्रेम करुन नुतनीकरण करणेस मान्यता मिळणेकामी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

२१/०२/२१

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- ९८

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर 322

विभागाचे नांव :- विदयुत विभाग

विषय :- श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्याकरीता आणलेल्या केबल ऑक्सिजन प्लान्टकरीता वापरण्यात आलेल्या असल्याने आता वाढीव तिस-या मजल्यावरील इलेक्ट्रीकल लोडला सप्लाय देणेकरिता २४० स्क्वेअर एम.एम.ची इलेक्ट्रीकल केबल, पितळी फ्लॅंज टाईप केबल ग्लॅन्ड, ॲल्युमिनियम लग्जची खरेदी करणेकामी येणा-या खर्चास तसेच दरपत्रके मागविणे, संस्थानचे वेबसाईटवर दरपत्रक नोटीस प्रसारीत करणेबाबत ....

प्रस्तावना :- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-
(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

शासन निर्णय परिच्छेद क्र. ३.२.३ मध्ये सुधारणा करुन दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणा-या खरेदीची आर्थिक मर्यादा रु.३ लाखावरुन(रु. ३,००,०००/-) रु. १० लाखापर्यंत (रु. १०,००,०००/-) सर्व कर अंतर्भूत करुन वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

प्रस्ताव :- कोव्हिड-१९ या साथ रोगाचे रूग्णांना श्री साईनाथ रूग्णालयात पुढील उपचार देण्याचे ठरलेले असल्याने श्री साईनाथ रुग्णालयासाठी १२०० LPM क्षमतेचा ऑक्सिजन प्लान्ट तातडीने उभारण्याचे ठरले. वरील संदर्भीय पत्रानुसार श्री साईनाथ रुग्णालयामार्फत सदर प्लान्टचे २१० केडब्ल्यु इलेक्ट्रीक लोड असलेबाबत व त्याकरीता इलेक्ट्रीक केबल टाकून ऑक्सिजन प्लॉन्टला इलेक्ट्रीक सप्लाय देणेबाबत कळविणेत आले होते.

ऑक्सिजन प्लान्ट तातडीने चालू करावयाचा असल्याने त्याकरीता आवश्यक असलेली २४० स्क्वेअर एम.एम.ची केबल विद्युत विभागाचे सबस्टोअरला तसेच भांडार विभागाकडे शिल्लक नसल्याने श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यामधील ICCU ऑपरेशन थिएटर व इतर इलेक्ट्रीक लोडसाठी सप्लाय देणेकरीता आणलेल्या केबलमधून २४० स्क्वेअर एम.एम.ची केबल घेऊन ऑक्सिजन प्लान्ट करीता तातडीने टाकून घेऊन इलेक्ट्रीक सप्लाय जोडण्यात आलेला आहे. आता श्री साईनाथ रुग्णालयामधील वाढीव तिस-या मजल्याचे कामही अंतिम टप्प्यात असल्याने तेथेही इलेक्ट्रीक केबल टाकून विद्युतपुरवठा करावा लागणार आहे. त्याकरीता सदरचे ठिकाणी २४० स्क्वेअर एम.एम.ची इलेक्ट्रीक केबल टाकून घ्यावी लागणार आहे. याकरीता आवश्यक असणारी इलेक्ट्रीकल केबल, कनेक्शनसाठी लग्ज, पितळी फ्लॅन्ज टाईप केबल ग्लॅन्ड खरेदी करावी लागणार आहे.

मागणी :- श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील इलेक्ट्रीकल लोडला सप्लाय देणेसाठी इलेक्ट्रीकल केबल, पितळी फ्लॅन्ज टाईप केबल ग्लॅन्ड, ॲल्युमिनियम लग्जची खरेदी ही दरपत्रके मागवुन करावी लागणार आहेत. सदर मटेरीयलचे दराकरीता बाहेरील दुकानदारांकडून ई-मेलव्दारे दरपत्रक घेऊन त्यांनी दिलेल्या दरांचे सरासरी प्रमाणे प्रती ॲटमच्या दरानुसार खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे तयार करण्यात आलेला आहे.

Sr.No.	Description	Qty	Rate Rs	Amount Rs
01)	Supplying XLPE armoured cable 3½ core 240 sq.mm.aluminium conductor with continuous 12.97 sq.mm.(8 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs on wall/ trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL	660 Mtrs.	1149/-	7,58,340/-
02)	Supplying Flange type brass cable glands for 3½ core 240 sq.mm.for XLPE armoured cable as per specification no.CB-CL/3½	10 Nos.	770/-	7,700/-
03)	Supplying crimping type aluminium lugs for cable 240 sq.mm.complete specification no.CB-CL/AL	40 Nos.	86/-	3,440/-
			Total Rs :-	7,69,480/-

tlc Meeting - 191

विभागाचा अभिप्राय स्पष्ट / मत :-

323

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्याकरीता आणलेल्या केबल ऑक्सिजन प्लान्टकरीता वापरण्यात आलेल्या असल्याने आता वाढीव तिस-या मजल्यावरील इलेक्ट्रीकल लोडला सप्लाय देणेसाठी इलेक्ट्रीकल केबल, पितळी फ्लॅन्ज टाईप केबल ग्लॅन्ड, ॲल्युमिनियम लग्जची खरेदी करणेकामी येणा-या रक्कम रुपये ७,६९,४८०/- इतक्या खर्चास तसेच सदरची खरेदी करणेकरीता बाहेरील ठेकेदार यांना पोस्टाव्दारे दरपत्रके पाठविणेस तसेच ई-मेलव्दारे कळविणेस व खरेदीची नोटीस संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकामी व दरपत्रके प्राप्त झाल्यानंतर खरेदी समितीसमोर उघडणेस मान्यता मिळणेस विनंती.

12/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

10.6

विषय क्र.- ९९

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर 324

विभागाचे नांव :- विदयुत विभाग

विषय :- **श्री साईबाबा संस्थानचे भोयरे पठार (सुपा) येथे उभारणेत आलेल्या २.५ मेगावॅट (१.२५ मेगावॅट x २) पवनचक्की यंत्रणेचे वीज विक्री करणेकरीता तसेच त्यासाठी दिनांक ०१-१२-२०२१ ते दिनांक ३०-११-२०२२ या एका वर्षाचे कालावधीकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीशी वीज विक्री करारनामा करणेकरीता मान्यता मिळणेबाबत ....**

प्रस्तावना :- श्री साईबाबा संस्थानने भोयरे पठार (सुपा) याठिकाणी सन-२००७ मध्ये अपारंपारिक उर्जा श्रोतापासून विद्युत निर्मिती करणेसाठी मे.सुझलॉन एनर्जी लि. यांचेमार्फत २.५ मेगावॅट (१.२५मेगावॅटx २) चा पवनचक्की प्रकल्प उभारलेला आहे.

दिनांक १४ ऑगस्ट २००७ रोजी दुपारी १६.०० वाजता प्रकल्प चालू करून कार्यान्वित केलेला आहे. सदर प्रकल्प उभारणीकरीता एकुण रक्कम रुपये १५,३९,६४,८००/- इतक्या रक्कमेचा कार्यादेश देण्यात आला होता. परंतू प्रत्यक्षात रक्कम रु. १४,७८,६३,४२०/- इतका खर्च झालेला आहे. तसेच याव्यतिरिक्त मे. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांना सल्लागार फी (२%) रक्कम रु. २९,५७,२६८/- इतकी व मे.मिटकॉन, पुणे यांना सल्लागार फी (२.५% + टॅक्सेस) रक्कम रु. ४१,५३,४८३/- इतकी आदा करण्यात आलेली आहे. आतापर्यंत या प्रकल्पातून जून-२०२१ पर्यंत रु.२७,०१,४१,१५१/- इतके उत्पन्न झालेले आहे.

या प्रकल्पापासून निर्माण होणारी वीज महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला पुरविली जाते. याकामी श्री साईबाबा संस्थान व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेमध्ये वीज विक्रीबाबत दिनांक १९-०४-२००८ रोजी करारनामा (PPA) करणेत आलेला होता.

सदरच्या जुन्या करारनाम्याची मुदत दि. १४-०८-२००७ या तारखेपासून पुढे १३ वर्ष होती. त्यानुसार सदर करारनाम्याची मुदत ही दिनांक १३-०८-२०२० रोजी संपत असलेबाबत मे.सुझलॉन एनर्जी लि. यांनी दिनांक ०४-०५-२०२० रोजी ई-मेलद्वारे कळविलेले होते. तसेच त्यांनी पुढील पर्याय उपलब्ध असल्याचे कळविलेले होते.

०१). पर्याय क्र. ०१:- 3rd party-With this option the generator can sell the power to the consumer having contract demand of 1 MW & above.

०२). पर्याय क्र. ०२:- Captive - It is highly recommended that generator having power consumption requirements with contract demand of 1 MW and above should consider switching to self-use of the generated power.

०३). पर्याय क्र. ०३:- Sale to MSEDCL -You can sale Power to MSEDCL for short term i.e. period from 03 Months to 12 Months.

उपरोक्त प्रमाणे मे. सुझलॉन एनर्जी लि. यांनी तीन पर्याय असल्याचे कळविले होते.

०१). पर्याय क्र. ०१ - 3rd Party हा स्विकारण्याचे झाल्यास त्याकरीता कोणत्याही एक कनेक्शनचा (ग्राहकाचा) contract demand हा १ मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त असणे गरजेचे आहे. परंतु संस्थानचे एकही कनेक्शनचा contract demand हा १ मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त नाही. त्यामुळे हा पर्याय आपणांस लागू होत नाही.

०२). पर्याय क्र. ०२ – Captive हा स्विकारण्याचे झाल्यास त्याकरीता ग्राहकाचा कोणत्याही एक कनेक्शनचा (ग्राहकाचा) contract demand हा 1 मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त असणे गरजेचे आहे. तेव्हा आपण ती विज स्वत:साठी वापरु शकतो. परंतु संस्थानचे एकही कनेक्शनचा contract demand हा 1 मेगावॅट किंवा त्यापेक्षा जास्त नाही. **त्यामुळे हा पर्याय सध्या आपणांस लागू होत नाही. (परंतू हा पर्याय आपणासाठी मंदिर परिसरातील नविन दर्शनलाईन कॉम्प्लेक्स मधील सबस्टेशन चालू झाल्यानंतर उपलब्ध होऊ शकतो.)**

०३). पर्याय क्र. ०३ - Sale to MSEDCL सध्या आपणास लागू होऊ शकतो.

त्यामुळे पर्याय क्र. ०३ - Sale to MSEDCL ०३ महिने ते १२ महिनेकरीता वीज विक्री करणेचा पर्याय स्विकारणेस व त्याकामी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे संकेत स्थळावर जाऊन ऑनलाईन ॲप्लिकेशन करणेस व सध्याचा दर हा रुपये २.५२ प्रति युनिट इतका असून तो स्विकारणेस तसेच २.५ मेगावॅट (१.२५ मेगावॅट x २) पवनचक्की यंत्रणेचा वीज विक्रीचा (पीपीए) करारनामा करणेस मान्यता मिळणेकामी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचा चक्रीय पध्दतीचा ठराव दिनांक १०-०८-२०२० रोजी विद्युत विभागास प्राप्त झालेला होता.

त्यानुसार मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयानुसार दि. १२-०८-२०२० रोजी दि. ०१-०९-२०२० ते दिनांक ३०-११-२०२० या ०३ महिन्याचे कालावधीकरीता (Short Term Power Purchase Agreement) नव्याने करारनामा करण्यात आलेला होता.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयानुसार दि.१२-०८-२०२० रोजी दिनांक ०१-०९-२०२० ते दिनांक ३०-११-२०२० या ०३ महिन्याचे कालावधीकरीता (Short Term Power Purchase Agreement) करण्यात आलेल्या करारनाम्याची मुदत ही दिनांक ३०-११-२०२० रोजी संपत असल्याने पुढील करारनामा करणेकामी विद्युत विभागाचे दिनांक १२-१०-२०२०रोजीचे टिपणी अन्वये खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

[०१]. सध्या ०१).साईआश्रम भक्तनिवास सबस्टेशन ०२). साईआश्रम भक्तनिवास ए.सी.सबस्टेशन तसेच ०३). साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) सबस्टेशन एकत्रिकरण करुन उपयोग होणार नाही असे वाटते. त्यामुळे सध्या विंडमिलपासून निर्माण होणारी वीज ही महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला विक्री करणे हाच योग्य पर्याय (पर्याय क्र.०३ Sale to MSEDCL) आहे, असे वाटते. तरीही याबाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयातील अ.क्र.०१ नुसार संस्थान पॅनेल वरील ॲडव्होकेट, श्री.संजय आर.चौकीदार यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार कन्सल्टंटची नेमणूक झाल्यास फायदे व तोटे याबाबत स्पष्ट अभिप्राय त्यांचेकडून मिळू शकेल व त्यावर पुढील निर्णय घेणे योग्य राहील असे वाटते.

[०२].पर्याय क्र. ०२ Captive Open Access साठी साईआश्रम भक्तनिवास सबस्टेशन, साईआश्रम भक्तनिवास ए.सी.सबस्टेशन तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) सबस्टेशन एकत्रिकरणासाठी खालीलप्रमाणे खर्च करावा लागणारा आहे.

अ.क्र.	खर्चाचा तपशील	एकुण खर्च
०१)	एकत्रिकरणाचा खर्च	रु. ५६,६२,८७३/-
०२)	महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे सिक्युरिटी डिपॉझिट	रु. ६० ते ७५ लाख
०३)	नविन 0.2 S Meter व 0.2 S C.T. बसविणे.	रु. १५,००,०००/-
	एकुण होणारा अंदाजे खर्च-	**रु. १.३१ कोटी ते १.४६ कोटी**

उपरोक्तप्रमाणे Captive Open Access साठी साईआश्रम भक्तनिवास सबस्टेशन, साईआश्रम भक्तनिवास ए.सी.सबस्टेशन तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) सबस्टेशन एकत्रिकरणासाठी अंदाजे रक्कम रु. १.३१ कोटी ते १.४६ कोटी इतका अतिरिक्त खर्च करावा किंवा कसे ?

तसेच उपरोक्त एकत्रिकरणात व येणा-या खर्चास मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची जर मान्यता मिळाली तर त्यानंतर शासन व मा. उच्च न्यायालय. औरंगाबाद यांची मान्यता घ्यावी लागणार आहे. व या एकत्रिकरणाच्या व पुढील सर्व कार्यवाहीसाठी साधारण ९ ते १० महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

[०३]. साईआश्रम भक्तनिवास सबस्टेशन, साईआश्रम भक्तनिवास ए.सी.सबस्टेशन तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) सबस्टेशन एकत्रिकरणाऐवजी सध्या नविन दर्शनलाईनच्या प्रकल्पाचे बांधकाम प्रगतीपथावर असून प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यास ०६ ते ०८ महिन्याचा कालावधी लागणार आहे. या प्रकल्पाकरीता तसेच मंदिर परिसराकरीता आवश्यक असणारा वीज वापराचा लोड हा ३००० केव्हीए क्षमतेचा असून सदरचा लोड महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून मंजूर करुन घेण्यात आलेला असून याकरीता आवश्यक असणारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे चार्जेस भरण्यात आलेले आहे. सदरचा प्रकल्प सुरु झाल्यानंतर मंदिर परिसरातील सबस्टेशनचा वापर हा पुर्ण क्षमतेने होणार असल्याने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या परिपत्रकातील मुद्दा क्र.३.८ तसेच मुद्दा क्र.१५.१ नुसार कोणतीही पेनल्टी संस्थानला लागणार नाही अथवा करारनामा रद्द होऊ शकणार नाही.

त्यामुळे सध्या वींडमील पासून निर्माण होणा-या वीज विक्रीचा करारनामा ०९ ते १२ महिन्याचा कालावधी वाढवून घेतल्यास विंडमील पासून निर्माण होणारी वीज ही Captive Open Access व्दारे संस्थानला थेट वापरता येईल. तसेच मंदिर परिसरातील सबस्टेशनचा वीज वापर हा दर्शनलाईन प्रकल्प सुरु झाल्यानंतर पुर्ण क्षमतेने वापरता येणार असल्याने वींडमील पासून निर्माण होणारे सर्वच्या सर्व युनिट हे मंदिर परिसरातील सबस्टेशनच्या वीज बीलातून वजा होऊ शकेल. त्यामुळे वींडमील पासून निर्माण होणारे वीजेचे कोणतेही अरिरिक्त युनिट शिल्लक राहणार नाही अथवा कोणतीही पेनल्टी संस्थानला लागणार नाही किंवा करारनामा रद्द होऊ शकणार नाही. त्यामुळे साईआश्रम भक्तनिवास सबस्टेशन, साईआश्रम भक्तनिवास ए.सी.सबस्टेशन तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) सबस्टेशन एकत्रिकरणासाठी अंदाजे रक्कम रु. १.३१ कोटी ते १.४६ कोटी इतका अतिरिक्त खर्च करावा लागणार नाही.

[०४]. त्यामुळे नविन दर्शनलाईन प्रकल्पासह मंदिर परिसरातील सबस्टेशन हे पुर्ण क्षमतेने ०६ ते ०८ महिन्याच्या कालावधीत चालू होणार असल्याने सदर सबस्टेशन चालू झाल्यानंतर त्याच्या लोडवर पुढील करारनामा करणेकरीता त्यानंतर २ ते ३ महिन्याचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे आता ३ महिन्यांकरीता केलेल्या करारनाम्याची मुदत दि.३०-११-२०२० रोजी संपल्यानंतर करावा लागणारा पुढील करारनामा हा पुढील १ वर्षाकरीता म्हणजेच दिनांक ०१-१२-२०२० ते दि.३०-११-२०२१ पर्यंत करणेकरीता सदरील करारनाम्याचे ऑप्लीकेशन १ महिना अगोदर ३१ ऑक्टोबर, २०२० चे अगोदर करणे आवश्यक आहे. तसे याबाबत महावितरण कंपनीच्या Online Application For RE Short Term Power Purchase या Online Portal वर Terms & Conditions मध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार सदर Application हे ३० दिवस अगोदर करावे लागणार आहे.

उपरोक्तप्रमाणे विद्युत विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या ०१ ते ०४ मुद्दयावर विचार विनिमय होऊन दिनांक १२-१०-२०२० रोजी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीने पर्याय क्र.०३ व ०४ यास चक्रीय पध्दतीने मंजुरी दिलेली आहे.

दिनांक १२-१०-२०२१ रोजी मिळालेले मान्यतेनुसार पर्याय क्र.०४ करीता दिनांक ०१-१२-२०२० ते दिनांक ३०-११-२०२१ पर्यंत ०१ वर्षाकरीता प्रति युनिट रु. २.५२ इतक्या दराने वीज विक्री करणेसाठी विद्युत विभागाचे दिनांक २२-१०-२०२० रोजीचे टिपणी अन्वये दिनांक २३-१०-२०२० रोजी ऑनलाईन अप्लीकेशन करण्यात येऊन दिनांक ०१-१२-२०२० ते दिनांक ३०-११-२०२१ या ०१ वर्षाचे कालावधीकरीता नव्याने करारनामा करण्यात आलेला आहे. आता सदरच्या करारनाम्याची मुदत दिनांक ३०-११-२०२१ रोजी संपणार आहे.

तसेच दिनांक १२-१०-२०२० रोजी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीने मंजुर केलेल्या पर्याय क्र.०३ नुसार कार्यवाही करणेकरीता प्रस्तावित नविन दर्शनलाईनच्या प्रकल्पाचे काम पुर्ण झालेले नाही.

त्यामुळे नविन दर्शनलाईन प्रकल्पासह मंदिर परिसरातील सबस्टेशन हे पुर्ण क्षमतेने ०६ ते ०८ महिन्याच्या कालावधीत चालू होणार असल्याने व सदर सबस्टेशन चालू झाल्यानंतर Captive Open Access **साठी पुढील करारनामा करणेकरीता त्यानंतर २ ते ३ महिन्याचा कालावधी लागणार असल्याने दिनांक ०१-१२-२०२० ते दिनांक ३०-११-२०२१ या कालावधीत एक वर्षासाठी करण्यात आलेल्या करारनाम्याची मुदत संपल्यानंतर पुन्हा एक वर्षासाठी म्हणजेच दिनांक ०१-१२-२०२१ ते दिनांक ३०-११-२०२२ या कालावधीकरीता पुढील करारनामा करणे गरजेचे आहे.**

मागणी :- याकरीता सदरील करारनाम्याचे ऑप्लीकेशन १ महिना अगोदर म्हणजेच ३१ ऑक्टोबर, २०२१ रोजीचे अगोदर करणे आवश्यक असल्याचे महावितरण कंपनीच्या Online Application For RE Short Term Power Purchase या Online Portal वर Terms & Conditions मध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार सदर Application हे ३० दिवस अगोदर करणेकामी तसेच दिनांक ०१-१२-२०२१ ते दिनांक ३०-११-२०२२ या एका वर्षाचे कालावधीकरीता वीज विक्री करणेचा पर्याय स्विकारणेस व त्याकामी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे संकेत स्थळावर जाऊन ऑनलाईन ॲप्लिकेशन करणेस व सध्याचा दर हा रुपये २.५२ प्रति युनिट इतका असून तो स्विकारणेस तसेच २.५ मेगावॅट (१.२५ मेगावॅट x २) पवनचक्की यंत्रणेचा वीज विक्रीचा (पीपीए) करारनामा करणेकामी मान्यता मिळणेस विनंती.

२९/१०/२१

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

२९.१०

विषय क्र.- ७०

मा. तदर्थ समितीचे पुढील विषय

विषय- शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता कामांचा सन २०२०-२१ चे पाहणी समिती मार्फत केलेल्या आकस्मित पहाणी अहवालाबाबत.

संदर्भ- १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १३/१२/२०१८, विषय नं. ७, निर्णय क्र. ७३४

२) जा.नं.एसएसएसटी/लेखा-अनुदान/३५१९/२०१९ दि. ०२/०३/२०१९

३) जा.नं.एसएसएसटी/लेखा-अनुदान/२८९६/२०२० दि. २३/०३/२०२०

४) मा.तदर्थ समिती सभा दि. ११/०५/२०२०, विषय नं.४५, निर्णय क्र. २७९

५) जा.नं.एसएसएसटी/लेखा-अनुदान/१३७/२०२१ दि. २२/०४/२०२१

• श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम -२००४ मधिल तरतुद-

अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (ग) अन्वये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिर प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडणेसाठी सोयी व सुविधा पुरविणे अशी तरतुद आहे.

• प्रास्ताविक

मा. व्यवस्थापन समितीच्या सभेच्या दि. १३/१२/२०१८ रोजीच्या सभेतील –

विषय नं. ७ - शिर्डी नगरपंचायत, शिर्डी हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदिन स्वच्छता विषयक साफसफाईची कामे ठोक पध्दतीने करण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस रक्कम रुपये ४२,५१,५९९/- प्रमाणे प्रतिमहा अर्थसहाय्य मंजुरीचे शासन निर्णयाचे अवलोकन होणेबाबत.

निर्णय क्र. ७३४ – यावर सविस्तर चर्चा होऊन, विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्र.सासवि-१०१८/१७९/प्र.क्र.२०/का.१६ दि.०७ एप्रिल २०१८ मध्ये शासन शुध्दीपत्रक क्र. सासंवि-१०१८//१७९/प्र.क्र.२० का.१६ दि. २२/११/२०१८, अन्वये शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदिन स्वच्छता विषयक साफसफाईची कामे ठोक पध्दतीने करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्याकडून शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना दि. ०१/१२/२०१७ पासून दरमहा ४२,५१,५९९/- इतका निधी पुढील पाच वर्षासाठी अनुदान स्वरुपात देण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच शिर्डी नगरपंचायतीस दि. ०१/१२/२०१७ ते ०३/१०/२०१८ या ११ महिने कालावधीत रक्कम रु. ३०,००,०००/- प्रतिमहा या प्रमाणे ३,३०,००,०००/- रुपये वितरीत करण्यात आलेले आहेत. शासनाचे दि. २२/११/२०१८ चे शुध्दी पत्रकानुसार दि. ०१/१२/२०१७ ते ३/१०/२०१८ या ११ महिने कालावधीतील फरकाची रक्कम रु. १,३७,५८९/- मात्रशिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली. सदरची कार्यवाही दि. ०१/०१/२०१९ नंतर करावी.

तथापि सदर अनुदानाचा विनियोग योग्य पध्दतीने होत आहे किंवा नाही, नगरपंचायतीने काढलेल्या निविदेतील अटी शर्ती प्रमाणे व कामाच्या व्याप्तीप्रमाणे (Scope of Work) कार्यवाही ठेकेदाराकडून केली जाते किंवा नाही, तसेच शहरात होणा-या स्वच्छतेबाबत नागरिकांचे अभिप्राय घेणेसाठी संस्थानच्या प्रशासकीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कर्मचा-यांसह एक समिती करण्यात यावी. या समितीने सदर कामाचे दरमहा परिक्षण करावे व त्याबाबतचा सविस्तर अहवाल प्रत्येक तिमाहीस व्यवस्थापन समितीचे सभेस सादर करावा.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेकडून शिर्डी नगरपंचायतीस, शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छतेची कामे करण्यासाठी दरमहा रु. ४२,५१,५९९/- इतके अनुदान देण्यात येत असते, स्वच्छता कामी शिर्डी नगरपंचायतीने नेमलेल्या ठेकेदारामार्फत होणारी साफसफाईची कामे करारनाम्यातील अटी शर्तीनुसार होतात किंवा कसे ? याबाबत आकस्मित पाहणी करण्यासाठी संस्थानचे प्रशासकीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय झाला आहे. त्यानुसार संदर्भ क्र.१ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

सदर समिती शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या नगरमनमाड रोड, हॉटेल कलासाई ते हॉटेल शांताई रोड, पालखी रोड, पिंपळवाडी रोड, दत्त नगर, माऊली नगर, एच.पी.गॅस रोड ,हॉटेल सन ॲंड सन रोड, हॉटेल गणपती पॅलेस, हॉटेल सेंट लॉरेन्स रोड, बाजार तळ व परिसर, संभाजीनगर, कालिकानगर, बिरेगांव रोड, सातभाई मळा रोड, पानमळा रोड, शिर्डी विमानतळ रोड, श्री रामनगर, पाण्याची टांकी कनकुरी रोड, प्रसादालयासमोरील रिंगरोड, लक्ष्मीनगर नाला, इ. रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता विषयक कामांची संदर्भ क्र. १ अन्वये गठीत करण्यात आलेल्या समितीकडून दरमहा आकस्मिक पाहणी करण्यात येऊन, पाहणी अहवाल व्यवस्थपनास सादर करण्यात येतो. यापुर्वी उपरोक्त संदर्भ क्र. ४ मा.तदर्थ समिती सभा दि. ११/०५/२०२०, विषय नं.४५, निर्णय क्र. २७९ नुसार मार्च २०२० पर्यंत मा.तदर्थ समितीसमोर अवलोकनार्थ सादर करण्यात आलेले आहेत. तसेच माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२१ या कालावधीतील पाहणी अहवाल लेखाशखा अनुदान विभागाकडे सादर करण्यात आले असून संदर्भ क्र. ५ नुसार मा. तदर्थ समितीचे पुढे चक्रीय पध्दतीने तात्काळ सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या स्वच्छता कामांची पाहणी अहवाल प्रत्येक महिन्यास लेखाशाखा अनुदान विभागास खालील प्रमाणे सादर करण्यात आलेला आहे.

अ.नं.	शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत स्वच्छतेच्या कामांची आकस्मिक पाहणी समितीने समक्ष पाहणी केलेली महिना		लेखाशाखा विभागास पाहणी अहवाल सादर करण्यात आलेली तारीख
	महिना	दिनांक	
१	एप्रिल २०२०	दि. ०१/०५/२०२०	दि. ०२/०५/२०२०
२	मे २०२०	दि. ०२/०६/२०२०	दि. १६/०६/२०२०
३	जुन २०२०	दि. २०/०७/२०२०	दि. २१/०७/२०२०
४	जुलै २०२०	दि. ०४/०८/२०२०	दि. १२/०८/२०२०
५	ऑगस्ट २०२०	दि. ०५/०९/२०२०	दि. ०८/०९/२०२०
६	सप्टेबर २०२०	दि. ०३/१०/२०२०	दि. २१/१०/२०२०
७	ऑक्टोबर २०२०	दि. ०५/११/२०२०	दि. ०४/१२/२०२०
८	नोव्हेंबर २०२०	दि. ०४/१२/२०२०	दि. १४/१२/२०२०
९	डिसेंबर २०२०	दि. ०४/०१/२०२१	दि. ०९/०१/२०२१
१०	जानेवारी २०२१	दि. ०८/०२/२०२१	दि. १७/०२/२०२१
११	फेब्रुवारी २०२१	दि. ०४/०३/२०२१	दि. ०२/०४/२०२१
१२	मार्च २०२१	दि. ०६/०४/२०२१	दि. १९/०४/२०२१

उपरोक्त नमुद केलेल्या पाहणी समितीचे अहवाला सोबत नगरपंचायत ठेकेदार कंपनी यांचेकडून वेळोवळी प्राप्त झालेले कर्मचा-यांचे बायोमॅट्रीक पंचींग हजेरी रिपोर्ट, कर्मचा-यांचा पी.एफ. भरणा केलेले चलनांच्या प्रती, शिर्डी नगरपंचायत हद्दीत किटकनाशक कार्बोलिक (जंतुनाशक) पावडर, औषधांची फवारणी व धुर फवारणी, केल्याबाबतचे रहिवाशांचे अभिप्राय, स्वच्छता कामांसाठी लागणा-या साहित्यांच्या खरेदीच्या बीलांच्या प्रती, त्याचप्रमाणे घंटागाडीव्दारे ओला व सुका कचरा नियमितपणे घेऊन जाण्यात येत असलेबाबत नागरिकांच्या अभिप्राय नोंद वहिच्या झेरॉक्स प्रती अहवाला सोबत जोडून लेखाशाखा अनुदान विभागास सादर केलेले आहेत.

सदर पाहणी समितीने वेळोवेळी प्रत्येक महिन्यात वस्तुस्थितीदर्शक अहवाल नियमितपणे आवश्यक प्राप्त अभिलेखांसह माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२१ पर्यंत लेखाशाखा – अनुदान विभागास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आलेले आहेत.

सदर विषयाची नोंद घेण्यासाठी मा. तदर्थ समितीचे पुढे सादर.

11/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

9/6/21

MEETING - 209

विषय क्र.- 09

मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

विषय- संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिन साफसफाई करुन निघणारा प्लॅस्टीक कचरा विक्री करणेबाबत.

संदर्भ – १) ग्लोबल पॉलीमर्स, चिखली, ता. हवेली जि. पुणे यांचे दि. ०४/०४/२०२१ रोजीचे पत्र.

२) आरोग्य विभागाकडील दि. ०९/०४/२०२१रोजीची मंजुर टिपणी.

३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात दि. ०८/०५/२०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त.

संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिन साफसफाई करुन निघणा-या प्लॅस्टीकचा पुर्नवापर / विक्री दराबाबत ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांचे प्रतिनिधीशी चर्चा करणेकामी दि. ०८/०५/२०२१ रोजी दुपारी १३.१५ वा. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात मिटींग आयोजित करण्यात आली होती. सदर मिटींगचे वेळी खालील अधिकारी /कर्मचारी उपस्थित होते.

१) श्री. कान्हूराज बगाटे- मुख्य कार्यकारी अधिकारी
२) श्री. रविंद्र ठाकरे- उप मुख्य कार्यकारी अधिकारी
३) श्री. प्रताप कोते- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग
४) श्री. प्रताप थोरात - प्रतिनिधी , ग्लोबल पॉलीमर्स, चिखली

संस्थान इमारती व परिसर दैनंदिन साफसफाई करुन निघणा-या घनकच-यामध्ये प्लॅस्टीकचे प्रमाण जास्त आहे. सदरचा घनकचरा सर्व्हे नं. १८२ मध्ये खड्डे करुन डपिंग डेपोवर साठविण्यात येत आहे. सदरचा कच-यावर कोणतीही प्रक्रीया न होता सध्या कचरा खड्डयांमध्ये टाकून त्यावर मातीचा थर देऊन बुजून टाकण्यात येत आहे. त्यामुळे भविष्यात सदर जागेचा वापर करावयाचा झाल्यास प्लॅस्टीक कच-याचे विल्हेवाट लावण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. गर्दीचे कालावधीत सुमारे २ ते २.५ टन सुका कचरा निघतो. त्यामध्ये प्लॅस्टीक बाटल्या, दुध पिशवी, सलाईनचे बॉटल, इत्यादी विक्री होणारे प्लॅस्टीक वगळता, सध्या विक्री न होणारे प्लॅस्टीक (पॉलीथीन बॅग, खाद्यपदार्थांचे पाऊच, इतर विभागाकडील पॅकींगचे प्लॅस्टीक व इतर) सुमारे दैनंदिन १५ ते २० किलो ग्रॅम प्रमाण असते. म्हणजेच महिन्याला सुमारे ४०० ते ६०० किलो ग्रॅम इतके प्लॅस्टीक निघते, साधारणपणे वार्षिक ५ ते ६ टन इतका प्लॅस्टीक कचरा विक्री करुन संस्थानला विक्रीतून रु. १० ते १२ हजाराचे वार्षिक उत्पन्न मिळून उर्वरीत कुजणा-या कच-याचा संस्थानचे बगीचा विभागासाठी खत म्हणून उपयोग होईल. तसेच कचरा डेपोसाठी भविष्यात संस्थानची किंमती जागा अडकुण पडणार नाही.

ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांचे दि.०४/०४/२०२१ रोजीचे विनंती पत्र व आरोग्य विभागाकडील दि. ०९/०४/२०२१ रोजीचे मंजुर टिपणीनुसार दि.०८/०५/२०२१ रोजी संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिन साफसफाई करुन निघाण-या प्लॅस्टीकचा पुर्नवापर करणे व विक्री दराबाबत चर्चा करणेकामी बोलविण्यात आलेले होते. त्यानुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो यांचे कक्षात खालील मुद्दयांवर चर्चा करुन निर्णय घेण्यात आला आहे.

ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांनी दि.०४/०४/२०२१ रोजीचे पत्रामध्ये खालीलप्रमाणे दोन प्रस्ताव संस्थानकडे सादर केले आहेत.

१) संस्थान मार्फत प्लॅस्टीक मटेरीयल वर्गीकरण करुन व गठ्ठे बांधुन दिल्यास ०३ रुपये प्रति किलो ग्रॅम या प्रमाणे (रु. ३००० प्रति टन) संस्थानास मोबदला देण्यात येईल.
२) शिर्डी संस्थान डेपो ठिकाणी आमचे कामगार लावून मटेरियल वेगळे करुन गठ्ठे बांधून घेतले तर रु. १.५/- प्रति किलो ग्रॅम म्हणजे (१५०० रुपये प्रति टन) या प्रमाणे संस्थानास मोबदला देण्यात येईल.

उपरोक्त प्रस्तावाबाबत दि. ०८/०५/२०२१ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांचे प्रतिनिधी श्री. प्रताप थोरात यांचेशी सविनय चर्चा करुन त्यांनी त्यांचे कामगार लावून प्लॅस्टीक मटेरीयलचे वर्गीकरण करुन गठ्ठे बांधुन वाहतुक व इतर सर्व समावेशक खर्चासह रु. ०२.०० प्रति किलो ग्रॅम (रुपये २०००/- प्रति टन) दर त्यांनी मान्य केले आहेत.

विभागाचा अभिप्राय- संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिन साफसफाई करुन निघणा-या प्लॅस्टीक कचरा ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांना पुर्नवापर करणेसाठी दिल्यास उर्वरीत कुजणा-या कच-याचे संस्थानचे बगीचा

विभागामार्फत खत तयार करुन संस्थानचे बगीच्यांसाठी वापर करता येईल. भविष्यात पर्यायी संस्थानच्या बगीचा विभागासाठी खत उपलब्ध होऊन संस्थानचा अर्थिक फायदा होईल. तसेच कचरा डेपोसाठी संस्थानची जागा, कर्मचारी व वेळ वाचेल. तसेच संस्थाना प्लॅस्टीक कचरा विक्री पासून अर्थिक उत्पन्न मिळून शेजारील शेतक-यांच्या शेतामध्ये उडणा-या प्लॅस्टीक कच-याबाबत तक्रारी येणार नाही, असे नम्र मत आहे.

करीता,

अ) संस्थान इमारती व परिसरातील दैनंदिन साफसफाई करुन निघणा-या तसेच संस्थानमार्फत विक्री न होणा-या प्लॅस्टीकचा पुर्नवापर करणेकामी वेळोवेळी जमा होणारा प्लॅस्टीक कचरा ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांना सशुल्क **रु. ०२.०० प्रति किलो ग्रॅम (रुपये २०००/- प्रति टन)** दराने प्रायोगिक तत्वावर ११ महिने कालवाधी करीता देणेस व सदरील रक्कम लेखाशाखेत जमा करणेस,

ब) प्रस्तावित कामाचा करारनामा विधी विभागामार्फत संस्थानचे कायदेशीर सल्लागार यांचेकडून करणेस,

क) ग्लोबल पॉलीमर्स, चिखली यांना वर्कऑर्डर देणेस,

तरी उपरोक्त **अ, ब, व क** बाबत निर्णयार्थ मा. तदर्थ **(Ad-hoc)** समितीचे सभेपुढे सादर.

16/6/14

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

16/6/14

GRBND - 179

विषय क्र.- 62

मा.तदर्थ(Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय

बगीचा विभाग

331

टिपणी -

विषय - गोवंश संवर्धनार्थ गाय हा राष्ट्रीय प्राणी (कामधेनू) म्हणून ठराव करणेबाबत.

प्रास्ताविक -

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे जागतिक किर्तीचे देवस्थान असल्याने श्री साईबाबांच्या दर्शनासाठी वर्षभर लाखो साईभक्त येत असतात. संस्थानमार्फत गोशाळा प्रकल्प सुरु करणेबाबत कार्यवाही चालू आहे. परंतु आता समाजात मोठया प्रमाणात गोवंशाची हत्या होत असलेचे निर्दशनास आलेले आहे.

गाय ही हिंदूंकरता अत्यंत पवित्र आहे. गाईचे दूध, गोमूत्र, शेण, तूप, दही व त्यापासून बनलेले पदार्थ यांत औषधी गुण असल्याचे आयुर्वेदात सांगितले आहे.त्याला पंचगव्य असे म्हणतात. स्मरणशक्ती वाढवायला गायीचे दूध उत्तम आहे. गाईचे शेणाने सारविलेल्या घरात कीटक कमी आढळतात. गाईच्या दुधात २१ प्रकारची ॲमिनो आम्ले, ११ प्रकारचे फॅटी आम्ले, ६ प्रकारची जीवनसत्त्वे, २५ प्रकारची धातुजन्य तत्त्वे, २ प्रकारची साखर, ४ प्रकारचे फॉस्फरस व ११ प्रकारची नायट्रोजन तत्त्वे आढळून येतात.

जगभरात दुधाच्या शुद्धतेसाठी आदर्श असलेल्या भारतीय दुधाळू संपदेला ग्रहण लागले आहे. देशी गायींच्या अनेक जाती लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. सिंथेटिक दुधाचा वापर, हिरव्या चाऱ्याची कमतरता आणि पशूवध यांमुळे त्यांच्या पोषणाची गंगा आटत चालली आहे. दुध वाढवण्याच्या लोभापायी भारतीय आणि विदेशी जातींचे गोवंश यांच्यात क्रॉस ब्रीड करण्यात येत आहे. त्यामुळे अमृतावरच अन्याय होत आहे. न्युझीलंडमध्ये प्राध्यापक डॉ. वुडफोर्ड यांनी त्यांच्या शोधपत्रात स्पष्ट केले आहे की, भारताच्या सर्व गायींमध्ये बीटा कॅसिन -२ आढळून येते, ज्यात शरीरस्वास्थ्य आणि बुद्धीवर्धक सर्वच गुणधर्म आहेत. त्यात अनेक रोगांना समूळ नष्ट करण्याची क्षमता वैज्ञानिक आधारे सिद्ध झाली आहे.

भारतीय वंशाच्या गायीचे पालन, पोषण, संवर्धन करणे गरजेचे आहे.

संस्थान अधिनियम ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान -

सदरचा विषय धोरणात्मक स्वरुपाचा आहे.

मागणी -

<u>भारतात देशी गायींविषयी उदासीनता !</u>

१. पश्चिम उत्तरप्रदेशमध्ये गाय आणि म्हशी यांच्या तुलनेत गायींची संख्या ६० टक्के आहे, जी काळानुसार अल्प होत आहे.

२. पशूपालनाविषयी उदासीनता आणि अंदाधुंद गोहत्या यांमुळे देशात देशी गायी अल्प होत आहेत.

३. जगात सर्वोत्तम जातीच्या गिर गायीची संख्या सौराष्ट्रात १० सहस्रांहूनही अल्प आहे; परंतु ब्राझिलमध्ये या गायी सर्वाधिक आहेत.

४. अनेक कृषी विद्यापिठांमध्ये साहीवाल, गिर, थारपारकर, अंगोल आणि राठी यांसह उत्तम जातीच्या गायींचे विभाग चालू करण्यात आले आहेत; परंतु विदेशी अनुदानासाठी क्रॉस ब्रीडला प्रोत्साहन देण्यात येत आहे.

५. जगभरात २५० गायींच्या जातीमध्ये ३२ जाती भारतीय गोवंशांच्या आहेत.

<u>गोवंश रक्षणासाठी करावयाच्या उपाययोजना</u>

१. प्रत्येक घरी निदान एका गायीचे पालन करणे, ते शक्य नसल्यास गोशाळेतील एखाद्या गायीच्या पालन-पोषणाचा व्यय करणे

२. पंचगव्यापासून निर्माण झालेल्या स्वास्थ्यवर्धक लाभदायी असे दंतमंजन, साबण, उटणे, धूप, मच्छर निरोधक उदबत्ती अशा उत्पादनांचा नित्य वापर करणे

३. घरामध्ये गायीचेच दूध, दही, ताक आणि तूप यांचा वापर करणे

४. घरामध्ये आजारपणाच्या काळात स्वस्त, सुलभ आणि दोष निर्माण न करणाऱ्या पंचगव्य औषधींचा उपयोग करणे.

५. लक्षावधी गोवंशाच्या मृत्यूचे कारण बनत असलेल्या प्लास्टिक पिशव्या न वापरणे

६. गोवंश हत्या करून निर्माण होत असलेली उत्पादने समजून घेऊन त्यांच्या वापराच्या विरोधात जनजागरण करणे, उदा. चामड्यापासून बनवलेल्या चपला, बूट, कोट, पर्स, सुटकेस, पट्टे, गालीचे, फर्निचर कव्हर्स, क्रिकेट बॉल, फूटबॉल, कलात्मक मूर्ती, गोमांस आणि चरबीपासून निर्माण केलेले तूप, आईस्क्रीम, चॉकलेट, टूथपेस्ट आणि पावडर, काही साबण, कोल्ड क्रीम, लिपस्टीक, परफ्यूम,नेलपॉलिश, शाम्पू, सिंथेटिक दूध इत्यादी

७. गोहत्या करून निर्माण होत असलेली औषधे, उदा. इन्शुलिन, विविध कॅल्शिअम पूरक औषधींच्या वापरास विरोध करणे

८. सेंद्रिय खत वापरून निर्माण केल्या गेलेल्या खाद्यांन्नाचाच वापर करणे

९. संकटात सापडलेल्या आणि कत्तलखान्याकडे जात असलेल्या गोवंशाला वाचवण्यासाठी साहाय्य करणे.

गोरक्षणासाठी कसे प्रयत्न कराल

१. गोवंशाच्या बेकायदेशीर वाहतुकीवर लक्ष ठेवा.

२. गोवंशाची होणारी बेकायदेशीर वाहतूक वैध मार्गाने रोखा.

३. 'गोवंश कत्तलीसाठीच नेला जात आहे', असे गाऱ्हाणे प्रविष्ट करा.

४. आरक्षकांना गोरक्षणाचा कायदा माहिती नसतो. त्यांना तो समजावून सांगा. त्याची प्रत त्यांना द्या. त्यासाठी आधी गोरक्षणाचा कायदा समजून घ्या.

५. ज्या हिंदूंकडे जागा असेल, त्यांनी एकतरी गाय पाळण्याचा प्रयत्न करावा.

६. 'गाय वाचली, तरच हिंदु वाचेल', असे सर्वत्र फलक लावावेत.

विभागाचा अभिप्राय -

उपरोक्तप्रमाणे गोवंशाच्या होत असणा-या कत्तलीमुळे देशी गायींच्या अनेक जाती लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. अशी कत्तल थांबविणे आवश्यक आहे. यासाठी गोवंश वाचविण्यासाठी प्रयत्न करणा-या संस्थाना श्री साईबाबा संस्थानमार्फत गोवंश संवर्धनार्थ गाय हा राष्ट्रीय प्राणी (कामधेनू) म्हणून ठराव करणेबाबतचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

11/6/24

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ७३

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर

बगीचा विभाग 333

टिपणी -

विषय - मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्याबाबत.

अधिनियम २००४ मधील तरतूद -

अधिनियम २००४ मध्ये १४(२) (ग) समितीच्या अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्य या बाबत असून त्या प्रमाणे "नाशवंत अर्पण वस्तुंची लिलावाद्वारे किंवा अन्य प्रकारे, विल्हेवाट लावण्याचे आणि त्यांचे उत्पन्न विश्वस्त व्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करणे." अशी तरतूद प्रस्तूत कलमा मध्ये नमुद केलेली आहे.

प्रस्तावना -

अधिनियम २००४ मध्ये १४(२) (ग) मधील तरतुदी नुसार मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्याची लिलाव करुन विल्हेवाट लावता येईल व त्याचे उत्पन्न संस्थानच्या निधी मध्ये जमा करता येईल. तसेच दि.०९/०३/२०१७ रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.२२१ अन्वये, श्रींचे मंदिरातुन निघणाऱ्या निर्माल्यापासुन बचतगटांमार्फत सुगंधीत द्रव्ये / साई आगरबत्ती तयार करणेत यावी व त्या वस्तु बचतगटाकडुन संस्थानने खरेदी करुन विक्रीसाठी ठेवणेबाबत असे ठरलेले आहे. त्यानुसार दि.३०/०६/२०१७ रोजीच्या पत्रानुसार इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हीसेस व जनसेवा फाऊंडेशन बचत गट यांनी मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्य मिळणेबाबत एकत्रीत प्रस्ताव सादर केलेला होता. दि. २५/०७/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.५३० अन्वये सदर निर्माल्य जनसेवा फाउंडेशन बचत गट व इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर यांचे प्रकल्पास ०३ वर्षासाठी विनामुल्य देऊन त्याबदल्यात सदर बचत गट हे अगरबत्ती विक्रीतुन मिळणाऱ्या प्रतिमाह उत्पन्नाच्या १०% रक्कम संस्थानला जमा करतील असे ठरले त्यानुसार दि. १०/१०/२०१७ रोजी करारनामा करुन घेणेत आलेला आहे. जनसेवा फाउंडेशन बचत गट व इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर यांनी दि. ०९/११/२०१७ पासुन मंदीरातील निर्माल्य उचलेले आहे. मंदीरातुन सरासरी दररोज दीड ते दोन टन निर्माल्य निघते. जनसेवा फाउंडेशन यांना देणेत येणा-या निर्माल्याचा कालावधी माहे ऑक्टोबर - २०२० अखेर संपलेला आहे.

महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाचे क्र.सासंवि - १०१७/१४७८/प्र. क्र. १६०/ का. १६ दिनांक १८/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये नाशवंत अर्पण वस्तूंची लिलावाद्वारे किंवा अन्यप्रकारे विल्हेवाट लावण्याचे आणि त्यांचे उत्पन्न विश्वस्तव्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना आहेत. मंदिरातून निघणारे हार व फुलांची विल्हेवाट लावणेबाबतच्या प्रस्तावाला शासनाची मान्यतेची अवश्यकता नसुन या प्रस्तावाबाबत निर्णय घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सक्षम आहेत. यास्तव प्रस्तुत प्रकरणी आपल्या स्तरावर उचित निर्णय घेण्यात यावा असे सुचविलेले आहे.

त्यानुसार मंदिरातून निघणारे हार व फुलांच्या निर्माल्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे आवश्यक आहे .

संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी,शासन,निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान - सदरचा विषय धोरणात्मक स्वरूपाचा आहे.

मागणी -

दिनांक २५/०७/२०१७ रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.५३० अन्वये मंदिरातून निघणारे हार व फुलांचे निर्माल्य जनसेवा फाउंडेशन बचत गट व इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर यांचे प्रकल्पास ०३ वर्षासाठी विनामुल्य देऊन त्याबदल्यात सदर बचत गट हे अगरबत्ती विक्रीतुन मिळणाऱ्या प्रतिमाह उत्पन्नाच्या १०% रक्कम संस्थानला जमा करतील असे ठरले त्यानुसार अगरबत्ती विक्रीतून खालीलप्रमाणे रक्कम संस्थानला जमा करणेत आलेली आहे.

अ.न	कालावधी	संस्थानला मिळणारे १०% उत्पन्न
०१	१८ मार्च - २०१८ ते ३१ मार्च -२०१८	२२,३०५/-
०२	एप्रिल - २०१८ ते मार्च - २०१९	९,७७,६१०/-
०३	एप्रिल - २०१९ ते मार्च - २०२०	५, ८४,०९५ /-

सदर जनसेवा फाउंडेशन, लोणी यांचे मंदिरातून हार व फुले उचलणेबाबतचा कालावधी माहे ऑक्टोबर - २०२० अखेर संपलेला आहे. तसेच कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन असलेकारणाने दिनांक १७ मार्च २०२० पासून समाधी मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी बंद करणेत आलेले असून तदनंतर मंदिरात व हार व फुले नेणेस मनाई करणेत आलेली असलेमुळे मंदिरातून निघणारे हार व फुलांचे निर्माल्य बंद झालेले आहे.

परंतु सध्या कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव कमी होत असून सर्वत्र अनलॉक होत असलेमुळे समाधी मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले झाल्यानंतर मंदिरातून निघणारे हार व फुलांचे निर्माल्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

श्रींचे समाधी मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्याची विल्हेवाट लावणेकामी परिसरातील बचत गट किंवा निर्माल्यावर प्रकिया करणाऱ्या इतर संस्थांकडून दरपत्रके मागवून त्यांना पुढील ०५ वर्षांसाठी उच्चत्तम दराने विक्री करता येईल व त्यापासुन मिळणारे उत्पन्न संस्थानच्या निधीमध्ये जमा करता येईल असे मत आहे.

विभागाचा अभिप्राय -

श्रींचे समाधी मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्याचे पावित्र्य कायम ठेऊन योग्य प्रकारे विल्हेवाट लावणेकामी परिसरातील बचत गट किंवा निर्माल्यावर प्रकिया करणाऱ्या इतर संस्थांकडून निवीदा मागवून पुढील ०५ वर्ष कालावधीसाठी उच्चतम दराने विक्री करता येईल. सदर निर्माल्याची विक्री करणेकामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर तसेच जनसंपर्क विभागामार्फत विविध वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेस व याकामी निवीदा प्रक्रिया राबविणेबाबतचा विषय मा. तदर्थ (Ad -hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

ERP NO-232

विषय क्र.- ७४

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय

जनसंपर्क विभाग

मान्यतेस सविनय सादर,

विषय:- पर्यटन विषयक प्रसिध्दीकरीता साईबाबा समाधीमंदीर व परीसराचे फोटोग्राफ व चित्रिकरण करण्यास परवानगी बाबत...

संदर्भ:- १. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांचे दि. १० जून २०२१ रोजीचे जनसंपर्क कार्यालयाकडे दि.१५ जून २०२१ रोजी प्राप्त झालेले पत्र व त्यावरील मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे निर्देश.

२. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पर्यटक निवास, शिर्डी यांचे दि. ११ जून २०२१ रोजीचे जनसंपर्क कार्यालयाकडे दि.१५ जून २०२१ रोजी प्राप्त झालेले पत्र व त्यावरील मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे निर्देश.

अधिनियम २००४ मधील तरतूद – महाराष्ट्रशासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात " समितीची कर्तव्य व अधिकार " या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – मा.व्यवस्थापन मंडळाचे दिनांक २१.१०.२००४ व दिनांक ०८.०२.२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२ व ७६ मध्ये दुरचित्रवाहिन्यांचे प्रतिनिधींना-

०१. कमी गर्दीचे वेळी चित्रिकरण दुपारनंतर सर्वसाधारण एक तास.

०२. गुरुवार, रविवार व गर्दीचे दिवशी आतील चित्रिकरणास शक्यतो परवानगी देवू नये.

०३. चित्रिकरण करतांना भक्तांचे दर्शनात कुठलाही अडथळा येवू नये.

अशा प्रकारे निर्णय झालेले आहेत. तसेच-

तदर्थ (Ad-hoc) समितीचा ठराव क्रमांक- मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दिनांक ०४.१२.२०१९ रोजीचे सभेतील विषय नं. ५५ श्री साईबाबा संस्थान मंदिर परिसरामध्ये ड्रोन कॅमे-याने व शुटींग कॅमे-याने श्री साईबाबांची गाणी व भजन रेकॉर्डींग परवानगी बाबत निर्णय क्र.५३४ अन्वये साई भक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे.

प्रस्ताविक – श्री साईबाबा संस्थानचे वतीने वर्षभरात साजरे होणारे उत्सवाचे प्रचार व प्रसाराकरीता विविध दुरचित्रवाहीन्यांना तसेच इतर वेळेस दुरचित्रवाहीन्यांच्या मागणीनुसार वृत्तसंकलना करीता मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास अधिन राहुन परवानगी देण्यात येते.

तरी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांनी महाराष्ट्रातील विविध पर्यटनस्थळे, धार्मिक तिर्थक्षेत्र यांचा पर्यटनाचा विकास होण्यासाठी या महामंडळामार्फत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येते. त्यादृष्टिने म.प.वि. महामंडळाचे कार्य अग्रेसर आहे. महाराष्ट्रातील विविध पर्यटनस्थळे, तिर्थक्षेत्र यांचे फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींगचे काम मे. सनजित कम्युनिकेशन्स प्रा.लि. हे करत आहे. नाशिक प्रादेशिक कार्यालयातंर्गत येणारे तिर्थक्षेत्र व पर्यटनस्थळांचे फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींगचे काम दि. १५.०६.२०२१ ते दि. १५.०७.२०२१ कालावधीमध्ये पूर्ण करावयाचे आहे. त्यामध्ये शिर्डी हे मोठे सर्व धर्मिय तिर्थक्षेत्र येत असून, महामंडळाच्या वेबसाईटवरील प्रसिध्दीसाठी साईबाबा समाधी मंदीर परीसरामध्ये मे. सनजित कम्युनिकेशन्स प्रा.लि. या संस्थेचे (एकूण १५ व्यक्तींची टिम) विविध कॅमेरे ड्रोनच्या सहाय्याने फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग करण्याची परवानगी मिळणेस तसेच फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींगच्यावेळी महामंडळातील २ अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित राहतील. सदर फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींगसाठी आम्ही आपल्या कार्यालयाकडून दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करण्यास कटिबध आहोत. असे कळविले आहे. याबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पर्यटक निवास, शिर्डी यांचेही पत्र प्राप्त झाले आहे.

त्यांनी कळविल्यानुसार ड्रोनच्या सहाय्याने फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग करण्याचे परवाणगीबाबत यापूर्वी सीसीटीव्ही विभाग व संरक्षण विभाग यांनी अभिप्राय दिलेले असुन ते खालील प्रमाणे.

सीसीटीव्ही विभाग अभिप्राय- डॉक्युमेन्टरी तयार करणेकामी मंदिराचे आतील व बाहेरील बाजुचे शुटींग ड्रोन कॅमे-याद्वारे करणेकामी परवानगी मिळणेबाबत मा. विश्वस्त ॲड मोहन जयकर सो. यांचे प्रतिनीधी श्री.अशित ठाकुर, मुंबई यांनी देखील कळविलेले होते. परंतु त्यांना देखील परवानगी देण्यात आलेली नाही.

संरक्षण विभाग अभिप्राय- श्री साई मंदिर परिसरात यापुर्वी ड्रोनद्वारे शुटींग घेण्याची परवानगी देण्यात आलेली नाही. तसेच मंदिर व भाविकांचे सुरक्षेच्या दृष्टीकोणातून यापुढील काळात ड्रोनद्वारे शुटींग घेण्याची परवानगी देण्यात येऊ नये, असे नम्र मत आहे. आजपावेतो सदर शुटींगची परवानगी फक्त टी. व्ही. चॅनल्सना जनसंपर्क विभागाकडून दिलेली आहे. त्यानुसार टी. व्ही. चॅनेल असेल तर देण्यात यावी.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत – श्री साईबाबा संस्थानच्या वतीने वर्षभरात साजरे करण्यात येणा-या उत्सवासाठी जनसंपर्क विभागामार्फत श्री साईबाबांच्या प्रचार व प्रसाराकरीता फक्त दुरचित्रवाहीन्यांनाच त्यांच्या मागणीनुसार मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास अधिन राहुन प्रशासकीय मान्यतेने परवानगी देण्यात येते. आजपावेतो शुटींगची परवानगी फक्त टी. व्ही. चॅनल्सना जनसंपर्क विभागाकडून दिलेली आहे. तसेच सीसीटीव्ही विभाग व संरक्षण विभाग यांचे अभिप्राय नुसार मंदिर व भाविकांचे सुरक्षेच्या दृष्टीकोणातून यापुढील काळात ड्रोनद्वारे शुटींग घेण्याची परवानगी देण्यात येऊ नये. तसेच यापुर्वी मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दिनांक ०४.१२.२०१९ रोजीचे सभेतील विषय नं. ५५ श्री साईबाबा संस्थान मंदिर परिसरामध्ये ड्रोन कॅमे-याने व शुटींग कॅमे-योने श्री साईबाबांची गाणी व भजन रेकॉर्डींग परवानगी बाबत निर्णय क्र.५३४ अन्वये साई भक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे.

मात्र श्री साईबाबांच्या प्रचार व प्रसाराकरीता समाधी मंदिरातील व परिसरातील संस्थानच्या कॅमे-याने केलेले चित्रिकरण त्यांना देता येईल असे नम्र मत आहे.

तरी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, नाशिक यांचे संदर्भीय पत्रान्वये शिर्डी हे मोठे सर्व धर्मिय तिर्थक्षेत्र येत असून, महामंडळाच्या वेबसाईटवरील प्रसिध्दीसाठी साईबाबा समाधी मंदीर परीसरामध्ये मे. सनजित कम्युनिकेशन्स प्रा.लि. या संस्थेचे (एकूण १५ व्यक्तींची टिम) विविध कॅमेरे ड्रोनच्या सहाय्याने फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग करण्याची परवानगी मिळावी ही विनंती केलेली आहे. याबाबत संरक्षण विभाग व सीसीटीव्ही विभाग यांचे वरील प्रमाणे अभिप्राय प्राप्त झालेले आहे. तरी मे. सनजित कम्युनिकेशन्स प्रा.लि. यांना ड्रोनच्या सहाय्याने फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग करण्याची परवानगी द्यावी किंवा कशी याबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे समोर निर्णयार्थ सादर .

18/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी

18/6
17/6

विषय क्र.- ७.५

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषय.

(संरक्षण विभाग) 337

विषय:- श्री साईबाबा संस्थान मंदिर परीसरामध्ये ड्रोन कॅमे-याने व शुटींग कॅमे-याने शुटींग करणेस बंदि असलेबाबतचे अशायाचे फलक मंदिर परीसरामध्ये लावणेस मान्यता मिळणेबाबत...

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की,सिसिटीव्ही विभाग कायम कर्मचारी श्री मनोज वैदय यांचा दि.१९/०२/२०२१ रोजीचा दूरध्वणी संदेश नुसार,दि.१९/०२/२०२१ रोजी दुपारी ठिक .३.३० वाजता सी.सी.टी.व्ही,विभाग कायम कर्मचारी श्री मनोज वैदय यांनी संरक्षण कार्यालय येथे दूरध्वणी व्दारे कळविले की,आज रोजी सकाळी ९.२० ते १० वाजेच्या दरम्यान व्दारकामाई मंदिरासमोरील खुले नाटयगृह समोर अनोळखी इसमाने ड्रोन कॅमे-याचे सहाय्याने सदर परिसराचे चित्रीकरण केले असल्याचे कळविले.

श्री आण्णासाहेब दाभाडे कायम कर्मचारी यांचा दि.१९/०२/२०२१ रोजीचे घटनेचा लेखी अहवाल नुसार त्यांची १२ ते ०८ डयुटी चालू असतानी डयुटी काळात ३.३० वाजता सीसीटिव्ही विभाग कर्मचारी श्री मनोज वैदय यांच्या फोन वरील मेसेज नुसार मी समक्ष सी.सी.टिव्ही कंट्रोल रूम येथे जावुन प्रत्यक्ष घटनेचे सी.सी.टि.व्ही फुटेज पहाणी केली असता,सदर इसम हा सकाळी ९.२० वाजता खुलेनाटयगृह येथिल कर्तव्यावर असलेले साईमंदिर सुरक्षा पोलीस कर्मचारी यांचे जवळ जावुन चर्चा करतो व त्याचे जवळील असलेली बॅग सदर पोलीस कर्मचारी यांचे जवळ ठेवुन बॅगमधून ड्रोन कॅमेरा काढून नाटयगृह समोरून,सदर परिसराचे ड्रोन कॅमे-याचे सहाय्याने ९.२० ते ९.३० वा.चे दरम्यान चित्रीकरण करून पुंन्हा आपली बॅग पोलीस कर्मचारी यांचे जवळून घेवुन मारूती मंदिराकडे जात असल्याचे सीसी.टिव्ही फुटेज मध्ये निदर्शनास येत आहे.

तथापी सदर घटनेबाबद सुरक्षा निरीक्षक संजय पाटणी यांना कळविले,तसेच साईमंदिर सुरक्षा पोलीस उपनिरीक्षक श्री लाड यांचे निदर्शनास आणून दिली.असता श्री लाड यांनी समक्ष सीसी.टिव्ही फुटेज मध्ये कैद झालेले चित्रीकरण तपासले व सदर घटनेबाबत वरिष्ठानां कळवितो असे सांगितले.

तसेच श्री भगवान सि.रजपुत कायम कर्मचारी संरक्षण विभाग यांचा दि.१९/०२/२०२१ रोजी खुले नाटयगृह परिसरात घडलेल्या घटनेबाबत लेखी खुलासा दि.१९/०२/२०२१ रोजी सकाळी ०४ ते १२ डयुटी चावडी व्दारकामाई परिसरात करत असता,अनोळखी व्यक्तीने व्दारकामाई समोर ड्रोन कॅमे-याचे सहाय्याने छायाचित्रण केलेले आहे.अशी माहिती आम्हांला मिळाली परंतु सदर पॉईंटवर गेलो असता कुणीही इसम आढळून आला नाही.असे नमुद केले आहे.

त्याचप्रमाणे श्री बाळासाहेब आवारे कंत्राटी सुरक्षा गार्ड साईप्रसाद परिसर यांचा दि.१९/०२/२०२१ रोजी घडलेल्या घटनेबाबत लेखी खुलासा दि.१९/०२/२०२१ रोजी माझी डयुटी ०४ ते १२ गेट नं.०४ ते चावडी परिसर पेट्रोलींग डयुटी होती .पेट्रोलिंगच्या दरम्यान सदर परीसरात विक्रेते,फेरिवाले,भिक्षेकरी आणि इतर अनधिकृत व्यक्तिंना येण्यास मज्जाव करतो.तसेच भक्तांनी विचारलेल्या प्रश्नांना नम्रपणे माहीती देणे.

सदर दिवशी ०९.३० वाजेच्या दरम्यान कुणी अनोळखी व्यक्तीने व्दारकामाई परीसराचे ड्रोन कॅमे-याने छायाचित्रण केले अशी माहीती आंम्हाला मिळाली.सदर वेळेत आंम्ही गेट नं.०४ कडून व्दारकामाई परीसराकडे येतच होतो.त्यामुळे सदर इसम आंम्हास तेथे आढळून आलेला नाही. असे नमुद केले आहे.

सदर कालावधीतील CCTV फुटेज पहाणी केली असता उक्त घटनेचे गांर्भिर्य तसेच साईमंदिराची सुरक्षा लक्षात घेता सदर ठिकाणी कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी यांनी सदर इसमास ड्रोन कॅमे-याचे सहाय्याने केलेले चित्रीकरण करणेस अटकाव करणे आवश्यक होते परंतु पोलीस कर्मचारी यांनी तसे केल्याचे निदर्शनास येत नाही,करीता सदर घटनेची पुंन्हा पुनरावृ-ती होवु नये करिता संस्थानचे सर्व सुरक्षा कर्मचारी यांना रोलकॉलचे वेळी समज/सुचना देता येईल तसेच साईमंदिर परिसरात कर्तव्यावर असलेले सर्व पोलीस कर्मचारी यांना रोलकॉलचे वेळी डयुटी काळात सतर्क राहाणे तसेच संस्थान परिसराचे चित्राकरण करणेकामी संस्थानची पुर्व परवानगीचे पत्र असल्याशिवाव मंदिर व परिसराचे कोणीही बाहेरील व्यक्ती ड्रोन कॅमे-या मार्फत चित्रीकरण करणार नाही तसेच कोणताही अनुचितप्रकार घडणार नाही.तसेच सदर दिवशी साईमंदिर परीसरामध्ये ड्रोन कॅमे-याव्दारे चित्रीकरण करणा-या इसमाबाबत चौकशी होवून पुढील उचीत कार्यवाही करीता पोलीस निरीक्षक साईमंदिर सुरक्षा यांना पत्राने कळविलेले आहे.

त्यानुसार-सदर गुन्हयातील आरोपी याने दिनांक १९/०२/२०२१ रोजी दुपारी १३.०० वाचे सुमारास साईबाबा मंदिर परीसरात ड्रोन उडविले असल्याने शिर्डी पोलीस स्टेशन गुंन्हा रजीस्टर नंबर ७७/२०२० भा.द.वि.कलम १८८.२८७ प्रमाणे दिनांक २२/०२/२०२१ रोजी दाखल झालेला आहे.

प्रस्ताव - त्यासअनुसरून साईमंदिर परीसरामध्ये भविष्यात असे प्रकार घडूनये तसेच साईमंदिर व साईभक्तांचे सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाची बाब असल्याने श्रींचे दर्शनार्थी साईभक्तांची वाढती गर्दी,देशात घडणारे घातपात लक्षात घेता मंदिर व मंदिर सुरक्षा तसेच साईभक्तांची सुरक्षितता ही बाब अतिशय संवेदनशिल आहे सुरक्षा हा विषय धोरणात्मक बाब असून या अगोदर संस्थानास विनावी धमकी देणारे पत्र आणि देशातील काही मंदिरात हिंसाचाराचा देण्यात आलेला इशारा या अनुषांगाने श्री साईबाबा संस्थान मंदिर परीसरामध्ये ड्रोन कॅमे-याने व शुटींग कॅमे-याने शुटींग करणेस बंदी असलेबाबतचे अशयाचे फलक मंदिर परीसरामध्ये लावणेस मान्यता मिळणेबाबत.

विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मत – यापूर्वी जनसंपर्क विभागामार्फत श्री पांडुरंग डी भिगारदिवे ,रा.मुंबई श्रीवैभव जय मातादी फिल्म प्रोडक्शन मुंबई यांचे दि.२९/०७/२०१९ रोजीचे प्राप्त पत्रानुसार दि.३१/०७/२०१९ रोजी श्री साईबाबा संस्थान मंदिर परीसरामध्ये ड्रोन कॅमे-याने शुटींग करणेस परवानगी बाबत प्रस्ताव दि.०४/१२/२०१९ रोजी झालेल्या तदर्थ (Ad-hoc)समितीचे सभेतील विषय नं.५५ श्री साईबाबा संस्थान मंदिर परिसरामध्ये ड्रोन कॅमे-याने व शुटींग कॅमे-याने श्री साईबांबाची गाणी व भजन रेकॉर्डींगची परवानगी बाबत.झालेला **निर्णय क्र.५३४ यावर सविस्तर चर्चा होऊन ,साई भक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोणतुन सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

श्री साईमंदिर परीसरात यापुर्वी ड्रोनकॅमेराव्दारे शुटींग घेण्यासाठी परवानगी देण्यात आलेली नाही.तसेच श्रींचे मंदिर व साईभक्तांची सुरक्षितता लक्षात घेता संस्थान परिसराची माहिती गोपनिय ठेवणे आवश्यक आहे. ड्रोनकॅमेराद्वारे शुटींग घेणे हे सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य नाही.

तरी साईमंदिर व साईभक्तांचे सुरक्षेच्या दृष्टीने साईमंदिर परीसरामध्ये श्री साईबाबा संस्थान मंदिर परीसरामध्ये ड्रोन कॅमे-याने व शुटींग कॅमे-याने शुटींग करणेस बंदी असलेबाबतचे आशयाचे फलक मंदिर परीसरामध्ये लावणेस मान्यता देणेस मान्येतेकरीता प्रस्ताव मा.तदर्थ समिती (Ad-hoc) पुढे सादर .

SEC- meeting 4/12-2019

(कान्तराज बगाटे,भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

ERP-279

339

विषय क्र.- ०६

खरेदी विभाग

"मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर"

विषयः- संस्थानचे स्थायी कर्मचाऱ्यांना गणवेश भत्ता देणेबाबत...

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५.०२.२०१७ चे सभेत निर्णय क्रं. ७४ अन्वये संस्थान स्थायी कर्मचारी यांना सुटींग- शर्टींग व शिलाईसह गणवेश जोड देणेकामी रु. ५४,९७,५९६/- चे खर्चास मान्यता मिळाली होती.

तथापी सदर प्रस्ताव दि. १८.१२.२०१७ रोजी प्राप्त झाला होता.त्यावर दि. १४.०२.२०१८ रोजी खरेदी विभागाकडून प्रस्ताव सादर केला होता. तथापी सदर कापड खरेदी ई-निविदेसाठी येणा-या अडचणींबाबत मा. उप जिल्हाधिकारी महोदय यांचेशी दि.०५.०३.२०१८ रोजी झालेले चर्चेत नाशिक महानगरपालिकेकडून कापडाचे तांत्रिक स्पेसिफीकेशन घेण्याचे ठरले होते. त्यानुसार प्राप्त झालेले स्पेसिफीकेशन नुसार दि. १३.०३.२०१८ रोजी प्रथम ई-निविदा प्रस्ताव तयार केला होता. त्यास मान्यता मिळून दि. १२.०४.२०१८ ते दि.०३.०५.२०१८ या कालावधीत प्रथम ई-निविदा प्रक्रीया करण्यात आली होती. तथापी सदर निविदेतील न्युनतम निविदाकार मे. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे कापडाचे काही लॅब रिपोर्ट निविदेतील तांत्रिक स्पेसिफीकेशनशी न जुळल्यामुळे दि. ३०.०१.२०१९ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रं. ३७४ अन्वये गणवेश कापड खरेदीसाठी फेर ई-निविदा प्रक्रीया करण्याचा निर्णय झाला होता.

त्यानंतर कापडाचे तांत्रिक स्पेसिफीकेशन पुन्हा तपासून ई-निविदा प्रक्रीया करण्याचे निर्देश झाले होते. त्यानुसार स्पेसिफीकेशन Textile Committee Lab, Mumbai यांचेकडून तपासून पुन्हा दुस-यांदा दि.२५.११.२०१९ ते दि. १०.१२.२०१९ या कालावधीत फेर ई-निविदा प्रक्रीया करण्यात आली होती. यामध्ये १० items पैकी २ items चे दर चुकल्याचे मे. खादी ग्रामोद्योग समिती, नवी दिल्ली यांनी कळविल्यामुळे निर्णय क्रं. ११६ दि. २४.०२.२०२० नुसार पुन्हा २ items साठी तिस-यांदा दि. १९.०३.२०२० ते दि. ३१.०३.२०२० या कालावधीत फेर ई-निविदा प्रक्रीया करण्यात आली.

दुस-यांदा फेर ई-निविदा प्रक्रीयेमध्ये मे. आशा, नासिक यांचे दर १० items साठी तर मे. सोनल टेक्स, मुंबई यांचे १ item साठी न्युनतम होते. तर तिस-यांदा केलेल्या निविदाप्रक्रीयेमध्ये मे. श्रध्दा सुनिल गिते, अकोले यांचे दर २ items साठी न्युनतम होते.

सदर तीनही न्युनतम दरधारकांकडून ते न्युनतम असणा-या कापडांचे नमुने घेण्यात आले होते. सदर कापडांच्या नमुन्यांपैकी मे. आशा, नासिक व मे.सोनल टेक्स, नासिक यांचे नमुने दि.०८.१०.२०२० रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात सादर केले होते. त्यावेळी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा. मुख्यलेखाधिकारी, प्र. अधीक्षक, सामान्यप्रशासन, प्र. अधीक्षक, खरेदी हे उपस्थित होते. सदर बैठकीत मे. आशा, नासिक यांनी सादर केलेले गणवेश कापडाचे नमुने संबंधित विभागांचे प्रतिनिधींना दाखवून अंतिम करण्याचे ठरले होते. परंतु सदर बैठकीत गणवेश कापडाचे दर्जाबाबत चर्चा होऊन नमुना दाखल केलेले कापड हे हलक्या दर्जाचे असलेमुळे ते खरेदी करणे उचित होणार नाही. तसेच हे कापड खरेदी करुन गणवेश शिवल्यास कापड चांगले दर्जाचे नसलेमुळे कापड व शिलाई दोन्ही खर्च वाया जाईल अशी परिस्थिती असलेमुळे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी संस्थान कर्मचा-यांना जे गणवेश द्यावयाचे आहेत. ते चांगल्या दर्जाचे असावेत असे निर्देशित करुन रेमंड सारख्या कंपनीचे कापडाचे गणवेश देणेबाबत सूचना केल्या होत्या.

वरील सुचनेस अनुसरुन रेमंड कंपनीशी संपर्क साधला असता त्यांनी नासिक येथील अधिकृत विक्रेते मे. चंपालाल & कंपनी, यांचे प्रो.प्रा. श्री.निलेश जाजू यांना शिर्डी येथे पाठविले होते. त्यांनी कापडाचे नमुने सादर केले होते. त्यानुसार खर्चाचा अंदाज येण्यासाठी त्यांना Estimate देण्यास सांगितले होते. त्यांनी १३९३ कर्मचा-यांना गणवेश कापड व शिलाईसह रक्कम रु. ४३,२४,९७७/- चे Estimate सादर केले होते. त्यानंतर रेमंड कंपनीने त्यांचे ठाणे येथील अधिकृत विक्रेते मे. कुबेर एंटरप्रायजेस, यांचे प्रो.प्रा. श्री.संजय शिंदे यांना शिर्डी येथे पाठविले होते. त्यांनी ही कापडाचे नमुने सादर केले होते. त्यामुळे मे. कुबेर एंटरप्रायजेस, ठाणे यांनाही खर्चाचा अंदाज येण्यासाठी Estimate देण्यास सांगितले होते.

मे. कुबेर एंटरप्रायजेस, ठाणे यांनी रक्कम रु. ६६,२७,४३४/- चे प्रथम Estimate सादर केले होते. तथापी ते जरा जास्त वाटत असल्यामुळे पुन्हा सुधारित Estimate देण्यास कळविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी दि.०३.०६.२०२१ रोजी सुधारित केलेले रक्कम रु. ५९,८५,८४९/- इतक्या रकमेचे Estimate सादर केले आहे. तथापी संस्थानला एखाद्या विक्रेत्याकडून थेट कापड खरेदी व शिलाईचे काम करुन घेता येणार नाही. तसेच वरील नमूद केलेप्रमाणे ३ वेळेस निविदा प्रक्रीया करुन ही समाधानकारक गणवेश कापड उपलब्ध होत नाही ही वस्तुस्थिती आहे. तसेच गणवेश शिलाई करुन घेणेचा मागील अनुभव विचारात घेता ते ही समाधानकारक होत नाही. त्यामुळे कर्मचा-यांना वर्ग वाईज गणवेशाचा ड्रेस कोड निश्चित करुन तसेच कापडाचा दर्जा ठरवून देऊन गणवेश जोड खरेदीकामी गणवेश भत्ता देण्याचे

वरील चर्चेत ठरले आहे. सदर गणवेश दर्जा व गणवेश वर्ग निहाय ड्रेस कोड ठरवून दिल्यामुळे त्या दर्जाप्रमाणे कर्मचारी त्यांचे पसंतीप्रमाणे बाजारातुन कापड खरेदी करून वर्गनिहाय ड्रेस कोड प्रमाणे गणवेश कोणाकडून ही शिवून घेतील. संस्थानने ठरवून दिल्याप्रमाणे कर्मचा-यांनी खरेदी करावयाच्या कापडाचा दर्जा व ड्रेस कोड यानुसार खरेदी करणे कर्मचा-यांवर बंधनकारक राहील. कमी दर्जाचे व ड्रेस कोड प्रमाणे नसलेला गणवेश ग्राह्य धरला जाणार नाही. त्यामुळे गणवेशाचा दर्जा व शिलाईही उत्तम होईल. तसेच कापड चांगले दर्जाचे घेतलेमुळे त्याचे life वाढेल. मागील गणवेश खरेदी व गणवेश शिलाईचा अनुभव विचारात घेता गणवेश भत्ता देण्याची बाब प्रायोगिक तत्त्वावर करणे उचित होईल असे वाटते.

ज्या संस्थान कर्मचा-यांना ड्रेस द्यावयाचे आहेत त्यांचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे:-

अ.नं	अधिकारी कर्मचारी तपशील	संख्या	ड्रेस कोड
१	उप कार्यकारी अभियंता, विद्युत विद्युत पर्यवेक्षक, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक अभियंता, कृषी अधिकारी, प्र. लेखाधिकारी, अधीक्षक, प्र.अधीक्षक, वरीष्ठ लिपीक- वरिष्ठ लेखापाल, साईलीला सहाय्यक संपादक, तांत्रिक सहाय्यक, कनिष्ठ अभियंता, उप अभियंता	५१	फुल शर्ट व पॅन्ट
२	लिपीक टंकलेखक	१७१	फुल शर्ट व पॅन्ट
३	सुरक्षा निरीक्षक व पहारेकरी	१३७	रेग्युलर खाकी सुरक्षा ड्रेस
४	सफाई कर्मचारी	१३३	हाफ सफारी
५	तांत्रीक कर्मचारी व नवीन आलेले फायर सेप्टी कर्मचारी	१३७	फुल शर्ट व पॅन्ट
६	फायर सेप्टी विभागातील कर्मचारी	२३	फुल शर्ट व पॅन्ट
७	मदतनीस/शिपाई	६५१	हाफ सफारी
८	वॉर्डबॉय / मदतनीस	८९	हाफ सफारी
९	प्र. फायर सेफ्टी ऑफीसर	१	शर्ट व पॅन्ट
	एकूण कर्मचारी संख्या	१३९३	

महाराष्ट्र शासनाचे महसूल व वन विभागाने शासन निर्णय क्रमांक एफएसटी-०९/१६/प्र.क्र./४१५/फ-४ दि. ०३.११.२०१६ अन्वये वन विभागातील कर्मचा-यांना गणवेश व त्यासोबतच्या २५ बाबींसाठी वार्षिक रु. ५,१६७/- प्रमाणे गणवेश भत्ता व अनुशंगिक साहित्य खरेदीसाठी देण्यासाठी शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच गृह विभागाकडील एमव्हीडी-०४१६/प्र.क्र.१८७/परि-४ दि. २७.०८.२०१८ अन्वये मोटार वाहन विभागातील सहायक मोटार वाहन निरीक्षक/मोटार वाहन निरीक्षक/सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांना गणवेश भत्त्यासाठी रुपये ५,०००/- देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सर्वसाधारण शर्ट व पॅण्ट म्हणजेच १ ड्रेस शिलाईसाठी बाजारात अंदाजे रु.८०० ते ९००/- चे दरम्यान शिलाईचा भाव चालू आहे. त्याप्रमाणे २ ड्रेससाठी अंदाजे रु.१६०० ते १८००/- शिलाई व सध्या कापडाचे बाजारभाव रु. ३,००० ते ३,२००/- मध्ये ०२ ड्रेस साठी कापड अशी मिळून रक्कम रु. ५,०००/- संस्थान कर्मचा-यांना आदा करणेबाबतही वरील चर्चेत ठरले आहे.

वरील शासन निर्णयांच्या धर्तीवर संस्थानकडून संस्थानच्या कर्मचा-यांना चांगले दोन गणवेश उपलब्ध होणेसाठी प्रती अधिकारी/ कर्मचारी रुपये ५,०००/- गणवेश भत्ता म्हणून प्रायोगिक तत्वावर आदा करावी. यासाठी संस्थानच्या खरेदी समितीकडून कापडाचे वरील ड्रेस कोड ठरवून देता येतील व त्याप्रमाणे कापड संस्थानच्या कर्मचा-यांना खरेदी करणेबाबत व संस्थानकडून दिलेले ड्रेसकोड प्रमाणे शिवून घेणेस सुचित करता येईल.

तसेच कापड खरेदीचे दुस-या निविदेतील Specification प्रमाणे मे. आशा, नासिक आणि मे. सोनल टेक्स, मुंबई आणि तिस-या निविदेतील मे. श्रध्दा सुनिल गिते, अकोला यांनी दिलेले कापडाचे नमुने प्रथम दर्शनी समाधानकारक वाटत नसल्यामुळे त्यांना दिलेले इरादापत्र रद्द करावे लागेल. त्यांचे कापडाचे नमुने त्यांना परत करुन, सदर दोन्ही ही ई-निविदा प्रक्रीया रद्द करुन त्यांची सुरक्षा अनामत रक्कम परत करावी लागेल. तसेच पेटीकोट कापडासाठी पुन्हा दरपत्रके मागविता येतील.

गणवेश भत्ता कर्मचा-यांना देणे ही बाब सामान्यप्रशासन विभागाशी संबंधित असल्याने वरील १३९३ कर्मचा-यांना द्यावयाचे गणवेश भत्त्याची रक्कम अदा करणेची उचित कार्यवाही सामान्य प्रशासन विभागामार्फत करता येईल , गणवेश भत्ता अदा केल्यानंतर ६० ते ९० दिवसांत गणवेश शिवून घेण्याचे बंधन कर्मचा-यांवर ठेवता येईल. कर्मचा-यांनी ड्रेस शिवून घेतले की नाही? याबाबतची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखांवर सोपविता येईल. ज्याविभागातील कर्मचा-यांचे ड्रेस शिवून होतील त्याबाबत विभाग

6/11/17

प्रमुखांनी खात्री करुन सामान्य प्रशासन विभागाकडे याबाबतचा पूर्तता अहवाल सादर करणेस कळविता येईल. तसेच सामान्य प्रशासन विभागामार्फत या बाबीवर वेळोवेळी पाठ पुरावा करुन नियंत्रण ठेवता येईल.

वरील प्रमाणे १३९३ कर्मचा-यांना गणवेश जोडसाठी गणवेश भत्ता म्हणून रक्कम रु. ५,०००/- प्रमाणे एकूण रु.६९,६५,०००/- (अक्षरी रु. एकोणसत्तर लाख पासष्ट हजार मात्र) खर्च येणार आहे. सदर रक्कम ही रु. पन्नास लाखांपेक्षा जास्त असल्यामुळे मा. तदर्थ समितीची मान्यता मिळाल्यास याकामी मा. उच्च न्यायालयाची ही मान्यता घ्यावी लागेल असे वाटते.

मा. तदर्थ समितीची रविवार दि. १८.०७.२०२१ रोजी संस्थानचे सभेपुढील विषयांबाबत आढावा बैठक झाली. या बैठकीमध्ये संस्थान कर्मचा-यांना गणवेश भत्ता देणेंचे विषयाबाबत चर्चा होऊन मागील वेळेस संस्थानचे गणवेश खरेदी केले होते. त्याकामी किती खर्च झाला होता. याबाबतची माहिती सदर टिपणीमध्ये समाविष्ट करणेबाबत निर्देश झाले होते. त्यास अनुसरुन मागील वेळेस सन २०१४-१५ मध्ये गणवेश कापड खरेदीकामी रु. २७,०१,३५०/- व गणवेश शिलाईकामी रु. ९,०३,५९५/- असा मिळून एकूण रु.३६,०५,१२५/- (अक्षरी रुपये छत्तीस लाख पाच हजार एकशे पंचवीस मात्र)इतका खर्च झाला होता.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता,

१. संस्थान कायम कर्मचा-यांना वरील महसूल व वन विभागाचे शासन निर्णय क्रमांक एफएसटी-०९/१६/प्र.क्र./४१५/फ-४ दि. ०३.११.२०१६ आणि गृह विभागाकडील एमव्हीडी-०४१६/प्र.क्र.१८७/परि-४ दि. २७.०८.२०१८ अन्वये शासन निर्णयाच्या धर्तीवर दोन गणवेश जोडसाठी प्रायोगिक तत्त्वावर गणवेश भत्ता म्हणून प्रत्येक अधिकारी/ कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभागामार्फत कार्यालयीन उचित पूर्तता करुन प्रती कर्मचारी रक्कम रु. ५,०००/- पगारात आदा करणेस व याकामी गणवेश भत्त्यासाठी एकूण येणारे रक्कम रुपये ६९,६५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस
२. संस्थान कर्मचा-यांना गणवेश खरेदीसाठी कापडाचे नमुने व ड्रेस कोड खरेदी समितीकडून निश्चित करुन देणेस
३. मे. आशा, नासिक आणि मे. सोनल टेक्स, मुंबई आणि मे. श्रध्दा सुनिल गिते, अकोला यांना दिलेले इरादापत्र व दोन्ही ही ई-निविदा प्रक्रीया रद्द करुन त्यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम परत करणेस
४. पेटीकोट कापडासाठी पुन्हा दरपत्रके मागविणेस
५. सदर खर्चाचे मान्यता मिळणेकामी मा. उच्च न्यायालयाची परवानगी घेणेसाठी विधी विभागामार्फत **Civil Application** दाखल करणेकामी उचित कार्यवाही करणेस

तरी वरील अ.नं. १ ते ५ प्रमाणे प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा. तदर्थ समितीसमोर सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

23/7/2021

विषय क्र.- ७७

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषयाची टिपणी

श्री साई प्रसादालय विभाग

342

टिप्पणी,

विषय: श्री साई प्रसादालयातील माहे एप्रिल-२०२० ते मार्च-२०२१ अखेर खादयतेल, वनस्पती तुप, शुद्ध तूप व काजूचे रिकामे डब्यांचा अहवाल...

अधिनियम २००४ मधील तरतूद : अधिनियम २००४ कलम १७ (४) नुसार निरुपयोगी वस्तुंची विल्हेवाट लावणे.

प्रास्ताविक :- श्रींचे साईभक्तांना संस्थानचे साईप्रसादालयामध्ये प्रसादभोजनाची सुविधा पुरविली जाते. प्रसादभोजनामध्ये चपाती, पुरी, भाजी, बर्फी इ.पदार्थ दिले जात असून सदरील पदार्थ बनविण्यासाठी खाद्यतेल, गावरान तूप, वनस्पती तूपाचा वापर होत असतो. त्यासाठी १५ किग्रॅ. पत्र्याच्या डब्याचा वापर होत असून मध्यवर्ती भांडार कडून माल पुरवठा होतो व रिकामे झालेल्या डब्यांची अभिलेख कक्षामार्फत विक्री केली जाते.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०७/२०१४ मधील निर्णय क्र.५९२ अन्वये तेला-तूपाचे एकुण डबे, रिकामे झालेले डबे तसेच रिकामे डबे कोठे वापरण्यात आले त्याच्या नोंदी ठेवणेत येऊन, त्याचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी यांचे समोर व वार्षिक अहवाल मा. त्रिसदस्य समितीसमोर सादर करणेत यावा असे ठरलेले आहे. त्यानुसार त्रैमासिक अहवाल वेळोवेळी मा.कार्यकारी अधिकारी यांचेसमोर सादर करणेत येत आहे.

श्री साईप्रसादालय वापरणेत येणारे खाद्यतेल, वनस्पती तूपाचे व प्रसादलाडू विभागाकडील गावरान तूप व काजूचे रिकामे झालेले डबे हे अभिलेख कक्षामार्फत विक्री करण्यात येतात. याव्यतिरीक्त संस्थानमधील स्वच्छता, मंदिर आदी इतर विभागांना वापराकामी व प्रसादालयाचे गिरण्यासाठी काही डबे वापरले जातात.

प्रसादालयासाठी खरेदी करणेत आलेल्या व विक्री तसेच इतर विभागास वापरणेत आलेल्या रिकाम्या डब्यांचा दि.०१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ अखेर ताळमेळाचा तपशिल खालीलप्रमाणे-

तपशिल	खरेदी व मागील शिल्लक एकुण डबे			विक्री/वापरणेत आलेले डबे (०१ एप्रिल २० ते ३१ मार्च २१)		एकुण खर्च डबे	३१ मार्च २०२१ रोजी शिल्लक रिकामे डबे
	३१ मार्च २०२० रोजी शिल्लक	संस्थानसाठी खरेदी करणेत आलेले तेल,तूप व काजूचे डबे (मध्यवर्ती भांडार विभागामार्फत)		स्वच्छता, मंदिर, लाडू विभागा साठी वापरणेत/ देणेत आलेले डबे	अभिलेख कक्षामार्फत विक्री करणेत आलेले डबे		
	रिकामे डबे	आवक	एकुण जमा				
खाद्यतेल	२९९७	४५१२	७५०९	०८	७३७०	७३७८	१३१
वनस्पती तूप	८२७	४६६	१२९३	३०	१११०	११४०	१५३
काजू डबे	०२	३३	३५	३३	--	३३	०२
गावरान तूप	०५	७७२	७७७	७१४	--	७१४	६३
एकुण	३८३१	५७८३	९६१४	७८५	८४८०	९२६५	३४९

मागील पानावर

उपरोक्त प्रमाणे प्रसादालयात वापरणेत आलेले खादयतेल व वनस्पती तूपाचे ३८ रिकामे डबे हे आरोग्य विभाग व मंदिर विभागास वापरासाठी देणेत आलेले असून काजू डबे व शुद्ध तूपाचे डबे हे लाडू विभागाकडे विक्रीसाठी जमा करणेत आलेले आहे.

अभिलेख कक्षामार्फत विक्री करणेत आलेले एकुण डबे -	अभिलेख कक्षामार्फत विक्री करणेत आलेल्या रिकाम्या डब्यांची रक्कम-
७३७० + १११० = ८४८० डबे	रु. २,६७,६७६/-

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :- उपरोक्त प्रमाणे माहे एप्रिल-२०२० ते मार्च-२०२१ अखेर खरेदी विभागामार्फत खरेदी करणेत आलेल्या खादयतेल, वनस्पती तूप, शुद्ध तूप व काजूचे रिकामे डबे अभिलेख कक्षामार्फत विक्री करणे व दैनंदिन वापरणेसाठी देण्यात आलेल्या रिकाम्या डब्यांच्या अहवालाची नोंद घेणेकामी उपरोक्त विषयाची टिप्पणी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- १७८

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषयाची टिपणी

श्री साई प्रसादालय विभाग

344

टिप्पणी,

विषय :- सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षातील श्री साई प्रसादालयातील धान्य-कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबतचा अवलोकनार्थ अहवाल..

संदर्भ :-१) महाराष्ट्र शासन, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचा शासन निर्णय क्र.गोतुनि/१०९९/१२३६/प्र.क्र.८४०/ना.पु.१६-ब दि.३० नोव्हेंबर, १९९९.

२) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२.०५.२००७ मधील निर्णय क्र.४०५.

३) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७.०७.२००८ मधील निर्णय क्र.५६०.

४) द्रि फुड ऑफ कार्पोरेशन ऑफ इंडीया यांचे संदर्भ क्र.STK/RL/Misc./NZ/11/Vol.III/581 दि.१२.१२.२०१२ चे परिपत्रक.

अधिनियम २००४ मधील तरतुद : सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ भाग-४ मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

प्रस्ताविक : श्री साई प्रसादालयातील प्रसाद-भोजनासाठी लागणारा किराणा माल, धान्य-कडधान्य डाळी इत्यादी माल डिस्टोनर मशिनद्वारे व मनुष्यबळाकरवी साफ करण्यात येतो. गहू, हरबरा दाळ, अखंड मिरची, अखंड हळद, अखंड धने दळल्यानंतर काही प्रमाणात घट येते. त्याचप्रमाणे दळण-कांडन व साफ केल्यानंतर काही प्रमाणात कचरा, खडे, मातेरे निघते. तसेच वातावरणातील बदलामुळेही कडधान्याच्या वजनात घट येते.

प्रसादालयातील किराणा मालाचे घट-तुटीच्या संदर्भातील माहिती खालीलप्रमाणे-

१. संदर्भ क्र.१ मधील **महाराष्ट्र शासनाचे निर्णयानुसार, मुद्दा क्र.१ मध्ये शासकीय गोदामातील धान्य तुटीचे मूल्य निर्लेखित करण्याबाबतच्या आदेशामध्ये शासनाने तुटीची कोणतीही अनुज्ञेय मर्यादा निश्चित केलेली नसून प्रत्येक प्रकरणी गुणवत्तेच्या आधारेच तूट निर्लेखित करणे आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे.**

२. प्रसादालयाकडील किराणा मालाचे घट-तुटीबाबत अंतर्गत लेखापरीक्षक यांचे सुचनेनुसार शासकीय संस्था आदीकडून माहिती घेऊन नियमावली तयार करणेत यावी असा निर्णय झालेला असल्याने शासकीय संस्थेकडून माहिती घेऊन श्री लोंगाणी यांचे मार्गदर्शनाने नियमावली करुन घट-तुट दर्शविण्याची कार्यवाही करणेस संदर्भ क्र.२ अन्वये मान्यता मिळालेली होती. त्यानंतर शासकीय संस्था, इतर देवस्थान, सरकारी कारागृह, मिलीटरी कॅम्प, सरकारी अन्नधान्य महामंडळ अशा १० संस्थाना पत्र पाठवून त्यांचेकडे असलेली धान्य कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीची पध्दती लिखीत स्वरुपात मागविणेत आलेनंतर नियमावली बनविणेत आलेली होती. त्यास संदर्भ क्र.३ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळालेली आहे. सोबत मान्य झालेल्या नियमावलीचे **परिशिष्ट 'अ'** म्हणून सादर केलेले आहे. तेव्हापासून प्रचलीत नियमावलीप्रमाणे आजतागायत प्रसादालयातील मालाची घट-तुटीची कार्यवाही चालू आहे.

३. संदर्भ क्र.४ मधील **दि फुड कार्पोरेशन ऑफ इंडीया, न्यु दिल्ली** यांचे परिपत्रकामध्ये मध्यवर्ती गहू व तांदुळ साठयामधील घट व तुटीबाबतचे परिपत्रकामध्ये तांदुळाचे घटीबाबत उदाहरण दिलेले असून त्यात For subsequent driage i.e. from 14% moisture level to below, the allowance @ 0.7% for every 1% driage has been allowed असा उल्लेख केलेला आहे. शासनाचे फुड सेफ्टी ॲक्ट मधील नियमाचा विचार करता प्रसादालयात आलेला मालाचे दळण-कांडन आदीनंतर अल्पशः प्रमाणात घट आलेली आहे.

पान २ वर..

४. **शासनाचे फुड सेफ्टी ॲण्ड स्टॅण्डर्ड ॲक्ट २००६, रुल्स २०११, रेग्युलेशन २०११** मधील नियम २.४.६ मध्ये विविध किराणा मालामध्ये गहू, तांदुळ, कडधान्य, डाळी, मसाला आदी मालास १०% ते १६% आद्रता (Moisture) व इतर वस्तु, बारीक दगड, काडीकचरा आदीस १% (Foreign Matter/Extraneous Matter) प्रमाण शासनाने निश्चीत केलेले आहे. त्याबाबतचे सोबत **परिशिष्ट 'ब'** म्हणून सादर केलेले आहे. हवेतील आद्रता अथवा इतर बाबीमुळे मालाचे वजन कमी होऊ शकते.

५. **सन २०२०-२०२१ मधील घट-तुटीची रक्कम-** मध्यवर्ती भांडार विभागाकडून प्राप्त झालेल्या व प्रसादभोजनासाठी वापरणेत आलेल्या किराणा मालाचे दळण-कांडण आदीमुळे काही प्रमाणात घट आढळून आलेली आहे. त्यानुसार एकुण खरेदी करणेत आलेला अथवा मध्यवर्ती भांडार विभागाकडून घेणेत आलेला माल, प्रत्यक्ष वापरणेत आलेला माल, त्यात निघालेली घट-तुट, घट-तुटीचे प्रमाण व एकुण रकमेबाबतचा तपशिल सोबतचे **परिशिष्ट 'क'** म्हणून सोबत सादर केलेला आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :- मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७.०७.२००८ मधील निर्णय क्र.५६० मध्ये लेखापरिक्षकांची मान्य झालेल्या नियमावलीतील घट-तुटीचा विचार करता, सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षामध्ये श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य व किराणा मालातील प्रत्यक्ष आलेली घट-तुट ही संस्थानने निश्चित केलेल्या प्रमाणापेक्षा कमी आहे.

तरी उपरोक्त संदर्भ व परिशिष्टाचे अवलोकन करता, प्रसादालयातील धान्य व कडधान्य किराणा मालातील प्रत्यक्ष आलेली घट तुट ही संस्थानने निश्चित केलेल्या प्रमाणापेक्षा कमी आहे. करीता सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षामधील श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य व किराणा माल घट-तुटीची वस्तुनिष्ठ अहवालाची टिपणी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

(रविंद्र ठाकरे)
- प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

परिशिष्ट 'अ'

..किराणा मालाचे घट-तुटीबाबतची नियमावली..

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२.०५.२००७ मधील निर्णय क्र.४०५ अन्वये शासकीय संस्था, इतर देवस्थान, सरकारी कारागृह, मिलीटरी कॅम्प, सरकारी अन्नधान्य महामंडळ अशा १० संस्थाना पत्र पाठवून त्यांचेकडे असलेली धान्य कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीची पध्दती लिखीत स्वरुपात माहिती मागविणेत आली होती.

त्यानूसार धान्य कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबत खालील तीन शासकीय व धार्मिक देवस्थानांकडून धान्य कडधान्य व किराणा मालाचे प्रचलीत घट-तुटीबाबत माहीती प्राप्त झालेली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

अ.नं.	संस्थेचे नांव	तपशिल (प्रति क्विंटल घट-तुट)
०१.	येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे	ज्वारी-४%, बाजरी-५%, गहू-५%, तांदूळ-२%, सर्व प्रकारच्या डाळी-२%, फळभाजी-५%, पालेभाजी-१०%, ज.लाकूड/कोळसा-५%
०२.	मध्यवर्ती कारागृह, नासिकरोड	साखर व वन.तुप या खाद्यतेलास घट नाही मात्र कडधान्य व डाळी-२%
०३.	गजानन महाराज संस्थान, शेगांव	प्रती क्विंटल ३% ते ५% एवढी घट-तुट दर्शविलेली आहे.

उपरोक्त सदर पध्दतीचा विचार करुन मा.श्री अभय शास्त्री (सी.ए.), मा.श्री.ए.जी.लोंगाणी, (सी.ए.) हे संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षक व मुख्य लेखाधिकारी यांनी संस्थानची घट-तुटीबाबतची खालील नियमावली बनविणेत आलेली आहे.

१) सन २००७ -२००८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचिलत घट- तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असून इतरांचे तुलनेने कमी असलेने दर सहा महिन्यानंतर प्रस्तावित घट-तुट नांवे टाकणेत यावी.

२) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे दिसणारा मालाचा साठा याची पडताळणी करावी.

३) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल मा. व्यवस्थापन समिती समोर अवलोकनार्थ सादर करावा. मात्र प्रस्तावित सरासरी पेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अधिनियम २००६, नियम २०११

अ.नं.	मालाचा तपशिल	As per Food Saftey & Standards Act 2006, Rules 2011, Regulations, 2011			As per Board Resolution	Actual Losses in Store 2020-2021
		Section	आद्रता (Moisture)	इतर वस्तु (Extraneous Matter)	घट-तुटीचे प्रमाण	घट-तुटीचे प्रमाण
			टक्केवारीमध्ये	टक्केवारीमध्ये	टक्केवारीमध्ये	टक्केवारीमध्ये
०१	गहु	2.4.6 (2)	14%	1%	3%	2.13%
०२	तांदूळ	2.4.6 (5)	16%	1%	1%	0.04%
०३	तुरदाळ	2.4.6 (10)	14%	1%	1%	0.01%
०४	हरबरा दाळ	2.4.6 (13)	16%	1%	2%	0.03%
०५	गुळ	2.8.4 (1)	10%	2%	1%	0.07%
०६	शेंगदाणे	2.3.47 (1)	7%	--	1%	0.47%
०७	अखंड मिरची	2.9.3 (1)	11%	1%	4%	3.06%
०८	अखंड हळद	2.9.18 (1)	12%	1%	4%	2.65%
०९	मोहरी	2.9.13 (1)	10%	2%	2%	1.58%
१०	जिरे	2.9.8 (1)	10%	3%	2%	0.37%
११	अखंड मसाला	2.9.20	--	5%	2.25%	1.15%
१२	अखंड धने	2.9.7 (1)	9%	1%	2.50%	0.32%
१३	खोबरेवाटी	--	--	--	1%	0.22%
१४	मैदा	2.4.2 (1)	14%	--	0.50%	0.01%
१५	मुग आख्खा	2.4.6 (8)	14%	1%	1%	0.22%
१६	मठ आख्खा	2.4.6 (15)	16%	1%	1%	0.06%
१७	कच्चे पोहे	--	----	--	1%	0.44%
१८	हिरवी विलायची				1%	0.79%
१९	सुंठ (अखंड)	2.9.11 (1)	12%	1%	5.25%	5.05%

परिशिष्ट 'क'

माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२१ अखेर किराणा मालाची खरेदी,वापर, घट तुट व त्यानुसार होणारी घट तुटीची रक्कम

अ.नं.	मालाचा तपशिल	एकुण खरेदी	दि.०१/०४/२०ते दि.३१/०३/२०२१ अखेर प्रत्यक्ष खर्च झालेला माल	मान्य झालेल्या घट-तुटीचे प्रमाण	प्रत्यक्ष घट-तुटीचे प्रमाण	दि.०१/०४/२० ते दि.३१/०३/२०२१ अखेर प्रत्यक्ष आलेली घट-तुट	दर	रक्कम
		किलो/ग्रॅम	किलो/ग्रॅम	टक्केवारीमध्ये	टक्केवारीमध्ये	किलो/ग्रॅम	रु. पै.	रु. पै.
०१	गहु	४१६८१३.०००	३१०५६९.०००	३	२.१३	६६२७.०००	२१.६१	१,४३,२०९.४७
०२	तांदूळ	२०६८५८.०००	१४७३९२.०००	१	०.०४	५८.०००	२९.९१	१,७३४.७८
०३	तुरदाळ	४१३९६.५००	२३९२४.५००	१	०.०१	३.०००	८९.००	२६७.००
०४	हरबरा दाळ	२८७८६.५८६	१७१३०.२८६	२	०.०३	५.०००	६३.६३	३१८.१५
०५	गुळ	१४८४४.७९०	९४१५.९९०	१	०.०७	७.०००	३३.८०	२३६.६०
०६	शेंगदाणे	२००९६.५००	१२७८१.०००	१	०.४७	६०.०००	९८.७०	५,९२२.००
०७	अखंड मिरची	११९६९.६००	३६०५.५००	४	३.०६	११०.५००	९९.००	१०,९३९.५०
०८	अखंड हळद	१२३३३.९५०	२३७८.६००	४	२.६५	६३.१५०	८४.९०	५,३६१.४३
०९	मोहरी	२९०५.९००	१११९.४५०	२	१.५८	१७.५५०	५१.००	८९५.०५
१०	जिरे	३३३६.७००	१६९८.७००	२	०.३७	६.३००	१६८.००	१०५८.४०
११	अखंड मसाला	१६००.६५०	६११.८००	२.२५	१.१५	७.०५०	३८४.८६	२,७१३.२६
१२	अखंड धने	६३९७.४००	३४३७.६००	२.५०	०.३२	१०.९००	७०.५०	७६८.४५
१३	खोबरेवाटी	६५५२.८००	४६९९.०००	१	०.२२	१०.३००	१४४.००	१,४८३.२०

अ.नं.	मालाचा तपशिल	एकुण खरेदी	दि.०१/०४/१९ ते दि.३१/०३/२०२० अखेर प्रत्यक्ष खर्च झालेला माल	मान्य झालेल्या घट-तुटीचे प्रमाण	प्रत्यक्ष घट-तुटीचे प्रमाण	दि.०१/०४/१९ ते दि.३१/०३/२०२० अखेर प्रत्यक्ष आलेली घट-तुट	दर	रक्कम
		किलो/ग्रॅम	किलो/ग्रॅम	टक्केवारीमध्ये	टक्केवारीमध्ये	किलो/ग्रॅम	रु. पै.	रु. पै.
१४	मैदा	१६९२९.०००	८९८०.०००	०.५०	०.०१	१.०००	२४.४५	२४.४५
१५	मुग आख्खा	३०२९३.२५०	१४९६०.२५०	१	०.२२	३३.०००	८०.९८	२,६७२.३४
१६	मठ आख्खा	२५३१४.५००	१६३८०.५००	१	०.०६	१०.०००	७५.०५	७५०.५०
१७	कच्चे पोहे	२९४०.५००	१०२८.०००	१	०.४४	४.५००	३५.००	१५७.५०
१८	हिरवी विलायची	२४.०७५	६.३५०	१	०.७९	०.०५०	१६११.००	८०.५५
१९	सुंठ (अखंड)	२१०.६८०	६६.८२५	५.२५	५.०५	३.३७५	२७३.००	९२१.३७
							एकुण रक्कम रु.	१,७९,५१४.००

(अक्षरी रक्कम रुपये- एक लाख एकोंणऐंशी हजार पाचशे चौदा मात्र)

विषय क्र.- ७८

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर

350

विभाग- श्री साईबाबा इं. मि. स्कुल, शिर्डी

टिपणी:-

विषय – शाळामधील संरचनात्मक बदल व सुधारित निकषांच्या आधारे माध्यमिक विभागासाठी आवश्यक लागणारे शिक्षक मानधन तत्वावर (११ महिने कालावधी) भरणेस मान्यता मिळणेबाबत.....

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी,शैक्षणिक संस्था स्थापन करील.

प्रास्ताविक:- उपरोक्त संदर्भीय क्र. १ शासन निर्णयानुसार बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार -२००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाच्या (स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानीत, अंशतः अनुदानित इ. सर्व) नवीन शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे त्यानुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणे आणि संचमान्यतेचे सुधारित निकष विहित करणेबाबतच्या आदेशान्वये –

२.३ माध्यमिक शाळा (इयत्ता ९ वी ते १० वी)

२.३.२ सध्या अस्तित्वात असलेल्या शाळांमध्ये इयत्ता ९ वी व १० वी चे दोनही वर्ग मिळून ४० पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास एकूण ३ शिक्षक (१ भाषा, १ विज्ञान/ गणित, १ समाजशास्त्र) शिक्षक अनुज्ञेय राहतील.

२.३.३ नववी किंवा दहावी कोणत्याही वर्गामध्ये ६० पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास एक शिक्षकांचे पद अनुज्ञेय होईल व चाळीशीच्या पटीने विद्यार्थी संख्येस १ शिक्षक अनुज्ञेय राहील.

२.२ उच्च प्राथमिक शाळा (इयत्ता ५ वी ते ७ वी किंवा ६ वी ते ८ वी)

२.२.२ सध्या अस्तित्वात असलेल्या अन्य शाळांमध्ये तीनही वर्ग मिळून ३६ पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास एकूण ३ शिक्षक (१ विज्ञान / गणित, १ भाषा, १ समाजशास्त्र) शिक्षक अनुज्ञेय राहतील.

२.२.३ विद्यार्थी संख्या १०५ पेक्षा अधिक झाल्यास ३५ च्या पटीमध्ये १ अतिरिक्त शिक्षक अनुज्ञेय राहील. मात्र प्रत्येक शिक्षकासाठी एक वर्ग खोली असणे आवश्यक आहे. अन्यथा जादा शिक्षक पद मंजूर करु नये.

शासनाच्या उपरोक्त आदेशानुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये इयत्ता ८ वी ते १० वी माध्यमिक शाळा असून एकूण ६३९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्राथमिक शाळा ही सकाळचे सत्रात दुपारी १२.३० ते सायं. ०५.३० या वेळेत भरविण्यात येत आहे.

मा. व्यवस्थापन समितीची दि. ०६/०६/२०१९ रोजीचे सभेत विषय नं. ४० अन्वये सन २०१८-१९ चे शिक्षक संच मान्यतेनुसार माध्यमिक विभागासाठी आवश्यक लागणारे सहा. शिक्षक हे कंत्राटी/ आऊटसोर्स पद्धतीने घेण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव ठेवण्यात आला होता. **निर्णय क्रमांक २९६ अन्वये , " यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. शिक्षण अधिकारी यांचेकडील मंजूर संच मान्यतेनुसार संस्थानचे कामगार विभागाकडील शैक्षणिक पात्रतेनुसार पात्र उमेदवारांची मुलाखत घेऊन पात्र कंत्राटी कर्मच-यांची सेवा श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे अध्यापन करणेकामी तात्पुरत्या स्वरुपात वर्ग करणेस तसेच बी. ए. बी. एड. इंग्रजी स्पेशल विषय असलेले ०२ शिक्षक व बी. ए. बी. एड. हिंदी स्पेशल विषय असलेला ०१ शिक्षक असे एकूण ०३ शिक्षक बाह्ययंत्रणेमार्फत कंत्राटी पद्धतीने ११ महिने कालावधीसाठी घेण्यास मान्यता देण्यात आली. "**

परंतू संस्थानचे शाळेकरीता यापुर्वी मंजूर असलेल्या आकृतींबंधात सदरचे शिक्षक पदांची मंजूरी नसल्याने व आकृतीबंधाचे मान्यतेचे बाहेर जाऊन पदे भरती करता येत नसल्याने सदरचे पदे भरण्यात आलेली नाही. तथापि मा. वरिष्ठांचे सूचनेनुसार संस्थाचे इतर विभागात काम करणारे व आवश्यक लागणा-या शैक्षणिक अर्हतेनुसार जे कंत्राटी कर्मचारी उपलब्ध झाले त्यांची कागदपत्रे पडताळणी करुन प्रशासकीय मान्यतेने तात्पुरते श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडे त्यांची सेवा वर्ग करण्यात आली व त्यांना अध्यापनाचे कामकाज सोपविण्यात आले. तरीही इतर वर्गांना शिकविणेकामी शिक्षक कमी पडल्याने ५ वर्ग तुकडीचे एकत्रीकरण करुन ४ वर्ग तुकडी करण्यात आल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना अध्यापना करण्यात व वैयक्तीक लक्ष देण्यास अनंत अडचणी आल्यात.

पान नं. २ वर....

१) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये आर. टी. ई. अधिनियमानुसार इयत्ता ९ वी व १० वी प्रति वर्ग ६० विद्यार्थी याप्रमाणे एकूण ५०९ विद्यार्थ्यांचे एकूण १० वर्ग कार्यरत होत असून एकूण १४ सहा. शिक्षक अध्यापनासाठी गरजेचे आहे. इयत्ता ९ वी व १० वीच्या एकूण ५०९ विद्यार्थ्यांना सध्या **एकूण १०** वर्गखोल्या उपलब्ध असल्याने या १० वर्गखोल्यात हे विद्यार्थी बसविण्यात येणार आहेत. आपल्या शाळेच्या संच मान्येतेमध्ये इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी चे वर्ग हे माध्यमिक शाळा विभागात मध्ये मोडतात. या वर्गांना अध्यापन हे तासिका पद्धतीचे असल्याने **एकूण १० वर्गांना शिकविणेकामी एकूण १४ शिक्षक असणे गरजेचे आहे.** आजमितीस इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी चे वर्ग अध्यापन करणेकामी **एकूण ०७ शिक्षक उपलब्ध असून, ०७ शिक्षक भरणे** अत्यंत गरजेचे आहे. **सदरचे वर्ग भरविणेकामी वर्गखोल्यां उपलब्ध आहेत.**

२) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये आर. टी. ई. अधिनियमानुसार इयत्ता ८ वी प्रति वर्ग ३५ विद्यार्थी याप्रमाणे ०६ वर्ग कार्यरत होत असून एकूण ०६ सहा. शिक्षक अध्यापानासाठी गरजेचे आहे. सन २०२०-२१ मध्ये इयत्ता ८ वीच्या एकूण २४९ विद्यार्थ्यांना बसविणेकामी सध्या **एकूण ०६** वर्गखोल्या उपलब्ध असल्याने या ०६ वर्गखोल्यात हे विद्यार्थी बसविण्यात येणार आहेत. आपल्या शाळेच्या संच मान्येतेमध्ये इयत्ता ८ वी चे वर्ग हे माध्यमिक विभागात मध्ये मोडतात. या वर्गांना अध्यापन हे तासिका पद्धतीचे असल्याने **एकूण ०६ वर्गांना शिकविणेकामी एकूण ०७ शिक्षक असणे गरजेचे आहे.** आजमितीस इयत्ता ८ वी चे वर्ग अध्यापन करणेकामी **एकूण ०६ शिक्षक उपलब्ध असून, ०१ शिक्षक भरणे** अत्यंत गरजेचे आहे. **सदरचे वर्ग भरविणेकामी वर्गखोल्यां उपलब्ध आहेत.**

विभागाची मागणी:-

उ) माध्यमिक विभाग - शाळेचा मंजूर आकृतीबंध व २०१८-१९ शिक्षक संच मान्यता मंजूर शिक्षक पदे ---

अ.नं.	पदाचा तपशिल	सन २००९ ते २०१७ सुधारित आकृती बंध मंजूर पदे	शै.वर्ष २०१८ - १९ मंजूर शिक्षकसंच मान्यता पदे	२००९ आकृती बंधात मंजूर असलेले पदे	सध्या असलेले कंत्राटी शिक्षक पदे १९-२०	एकूण कायम/ कंत्राटी शिक्षक पदे १९-२०	इ. ८ वी ते १०वी एकूण विद्यार्थी संख्या २१-२२	नियमा नुसार एकूण आवश्यक पदे २१-२२	एकूण रिक्त पदे २१-२२
०१	मुख्याध्यापक	०१	०१	०१	००	०१	---	०१	००
०२	पदवीधर इ. ९ वी ते १०वी	०४	०८	०५	०२	०७	५०९	१४	०७
०३	पदवीधर इ. ८ वी	०४	०४	०२	०४	०६	२४९	०७	०१
०४	संगणक शिक्षक	०१	--	०१	--	०१	---	०१	००
	एकूण	१०	१३	०९	०६	१५	६३९	२३	०८

ब) **आर.टी.ई.अधिनियमानुसार** अहमदनगर जिल्हा परिषद यांचेकडून एकूण शालेय विद्यार्थी संख्येनुसार माध्यमिक विभागासाठी आवश्यक लागणारे सहाय्यक शिक्षकांची सन २०१६-१७, २०१७ -१८ व २०१८- १९ ची शिक्षक संच मान्यता मिळालेली आहे. सदर संच मान्यतेनुसार एकुण १३ स्थायी पदांना मान्यता देण्यात आलेली आहे.

मात्र सद्यस्थितीत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी विभागाकडील माध्यमिक विभागाकडे ०९ स्थायी व ०६ कंत्राटी असे एकुण १५ सहाय्यक शिक्षक कार्यरत आहेत. म्हणजेच सन २०२१-२२ या वर्षी शासन निर्णयाआधारे आवश्यक शिक्षक पदे २३ वजा एकूण कार्यरत शिक्षक पदे १५ = ८ पदे रिक्त आहेत . शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता आवश्यक शिक्षक पदे सदर शासन निर्णयाचे आधारे निश्चित केलेली आहे. तरी एकूण शालेय विद्यार्थी संख्येनुसार माध्यमिक विभागासाठी नवीन शिक्षक पदे भरती करावी लागणार आहे. सदर नवीन शिक्षक भरती मंजूर पदांचा संस्थानचे नवीन आकृतीबंधात समावेश करण्यात येत असून संबधित विभागाकडे नवीन आकृतीबंधा बाबत कळविण्यात आलेले आहे. **. सन २०१९-२० व सन २०२०-२१ ची संच मान्यता अद्यापावेतो मिळालेली नाही.**

क) सन २०२१-२२ शैक्षणिक वर्षात नैसर्गिक विदयार्थी संख्या वाढीनुसार विभागाकडे वर्ग खोल्यां उपलब्ध असून विद्यार्थी संख्या विचारात घेता व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता शिक्षक भरती करावी लागणार आहे. सदरचे पदे भरतीकामी जाहिरात देऊन भरती करावी लागणार आहे असे नम्र मत आहे.

सन २०२१-२२ शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना अध्यापनासाठी उपलब्ध वर्ग खोल्यानुसार किमान **शैक्षणिक अर्हता - बी.ए.बी.एड. (इंग्रजी/भूगोल) ०२ , बी.ए.बी.एड. (इंग्रजी/इतिहास) ०२, बी.ए.बी.एड. (हिंदी)०१, बी.ए.बी.एड. (मराठी) ०१, बी.ए.बी.एड. (हिंदी/संस्कृत) ०१, बी.एस्सी.बी.एड(विज्ञान/गणित) ०१, (टी.ई.टी पात्र व शिक्षण इंग्रजी माध्यमात झालेले असल्यास प्राधान्य) असे** एकूण ०८ शिक्षक पदे एकत्रित मानधनावर ११ महिने कालावधी करीता भरती करणे गरजेचे आहे.

पान नं. ३ वर....

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी करुन अनुमान:- शालेय विद्यार्थी अध्यापन करणे ही महत्वाची बाब विचारात घेता नवीन शिक्षक भरती करणे अत्यंत गरजेचे आहे.

विभागाची अभिप्राय :- उपरोक्त प्रास्ताविकात नमुद केलेनुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल माध्यमिक विभाग करीता आवश्यक लागणारे शिक्षक पदे ही ११ महिन्याचे कालावधीपुरते एकत्रित मासिक मानधनावर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता भरता येतील. सदर शिक्षकांना कुशल कंत्राटी कर्मचारी यांच्या प्रमाणे मासिक वेतन देता येईल. सदर शिक्षक भरतीबाबतची सर्व कार्यवाही (उदा. वर्तमानपत्रात जाहिरात देणे, मुलाखती घेणे, कार्यादेश देणे) संस्थानच्या सामान्य प्रशासन विभाग (आस्थापना विभाग) मार्फत करता येईल असे नम्र मत आहे.

तरी **शाळामधील संरचनात्मक बदल व सुधारित निकषांच्या आधारे माध्यमिक विभागासाठी आवश्यकतेनुसार** सन २०२१-२२ शैक्षणिक वर्ष करीता, **शैक्षणिक अर्हता -बी.ए.बी.एड. (इंग्रजी/भूगोल) ०२, बी.ए.बी.एड. (इंग्रजी/इतिहास) ०२, बी.ए.बी.एड. (हिंदी)०१, बी.ए.बी.एड. (मराठी) ०१, बी.ए.बी.एड. (हिंदी/संस्कृत) ०१, बी.एस्सी.बी.एड(विज्ञान/गणित) ०१ (टी.ई.टी पात्र व शिक्षण इंग्रजी माध्यमात झालेले असल्यास प्राधान्य) असे एकूण ०८ शिक्षक** एकत्रित मानधनावर (११ महिने कालावधी) करीता भरती करणेकामी **निर्णयार्थ तथा मान्यतेस्तव सादर,**

10/7/21

(कान्हूराज बगाटे , भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- १०

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर
विभाग- श्री साईबाबा इं. मि. स्कुल, शिर्डी

353

दि. २२/०६/२०२१

विषय – **प्राथमिक विभागासाठी शाळा संच मान्यतेनुसार आवश्यक शिक्षक मानधन तत्वावर (११ महिने) घेण्यास मान्यता मिळणेबाबत.....**

संदर्भ – १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र, एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५/टीएनटी-२ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ दिनांक २८ ऑगस्ट, २०१५

२) प्राथमिक विभाग जिल्हा परिषद अ. नगर यांचेकडून दि. १०/०५/२०१९ रोजीची प्रत.

३)मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०२/२०१८ रोजीची सभा निर्णय क्रमांक ९४

४) मा. व्यवस्थापन समितीची दि./ ०६/०६/२०१९ रोजीची सभा निर्णय क्रमांक २९६

सेवेशी सादर,

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी,शैक्षणिक संस्था स्थापन करील.

प्रास्ताविक:- उपरोक्त संदर्भीय क्र. १ शासन निर्णयानुसार बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार -२००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाच्या (स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानीत, अंशतः अनुदानित इ. सर्व) नवीन शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे त्यानुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणे आणि संचमान्यतेचे सुधारित निकष विहित करणेबाबतच्या आदेशान्वये –

उच्च प्राथमिक विभाग:-

२.२ उच्च प्राथमिक शाळा (इयत्ता ५ वी ते ७ वी किंवा ६ वी ते ८ वी)

२.२.२ सध्या अस्तित्वात असलेल्या अन्य शाळांमध्ये तीनही वर्ग मिळून ३६ पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास एकूण ३ शिक्षक (१ विज्ञान / गणित, १ भाषा, १ समाजशास्त्र) शिक्षक अनुज्ञेय राहतील.

२.२.३ विद्यार्थी संख्या १०५ पेक्षा अधिक झाल्यास ३५ च्या पटीमध्ये १ अतिरिक्त शिक्षक अनुज्ञेय राहील. मात्र प्रत्येक शिक्षकासाठी एक वर्ग खोली असणे आवश्यक आहे. अन्यथा जादा शिक्षक पद मंजूर करु नये.

प्राथमिक विभाग:-

२.१ प्राथमिक शाळा (इयत्ता १ ली ४ थी किंवा इयत्ता १ ली ते ५ वी.)

२.१.१ शाळेमधील सर्व विद्यार्थी मिळून ६० पर्यंत २ शिक्षक, त्यानंतर वाढ होणा-या प्रत्येक ३० विद्यार्थ्यांमागे ०१ अतिरिक्त शिक्षक.

शासनाच्या उपरोक्त आदेशानुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये इयत्ता १ ली ते ७ वी प्राथमिक शाळा असून एकूण १७२१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्राथमिक शाळा ही सकाळचे सत्रात सकाळी ०७.१५ ते दुपारी १२.१५ या वेळेत भरविण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेत विषय नं.२० अन्वये शैक्षणिक संकुलातील आकृतीबंध शिक्षणाधिकारी/शिक्षण उपसंचालकांकडून मंजूर करण्यात येणा-या शिक्षक संचाप्रमाणे करण्यास मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव ठेवण्यात आला होता. त्यानुसार **निर्णय क्रमांक ९४ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुलाकडील आकृतीबंध शिक्षणाधिकारी/शिक्षण उपसंचालकांकडून मंजूर करण्यात येणा-या शिक्षण संचाप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात आली. परंतू याकामी विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांची पूर्वपरवानगीसाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा,असे ठरले.**

मा. व्यवस्थापन समिती दि. ०६/०६/२०१९ रोजीचे सभेत विषय नं. ३९ अन्वये सन २०१८-१९ चे शिक्षक संच मान्यतेनुसार प्राथमिक विभागासाठी आवश्यक लागणारे सहा. शिक्षक हे कंत्राटी/ आऊटसोर्स पद्धतीने घेण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव ठेवण्यात आला होता. **निर्णय क्रमांक २९६ अन्वये , " यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. शिक्षण अधिकारी यांचेकडील मंजूर संच मान्यतेनुसार प्राथमिक विभागासाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये शैक्षणिक अर्हता - एस.एस.सी. / एच. एस. सी. डी.एड (इंग्रजी माध्यम) असलेले एकूण ४ तसेच बी. एस्सी. बी.एड – १, बी. ए. बी. एड. -२ (हिंदी, मराठी) असे एकूण ७ शिक्षक बाह्ययंत्रणेमार्फत कंत्राटी पद्धतीने ११ महिने कालावधीसाठी घेण्यास मान्यता देण्यात आली. "**

परंतू संस्थानचे शाळेकरीता यापुर्वी मंजूर असलेल्या आकृतीबंधात सदरचे शिक्षक पदांची मंजूरी नसल्याने व आकृतीबंधाचे मान्यतेचे बाहेर जाऊन पदे भरती करता येत नसल्याने सदरचे पदे भरण्यात आलेली नाही. तथापि मा. वरिष्ठांचे सूचनेनुसार संस्थाचे इतर विभागात काम करणारे व आवश्यक लागणा-या शैक्षणिक अर्हतेनुसार जे कंत्राटी कर्मचारी उपलब्ध झाले त्यांची कागदपत्रे पडताळणी करुन प्रशासकीय मान्यतेने तात्पुरते श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडे त्यांची सेवा वर्ग करण्यात आली व त्यांना अध्यापनाचे कामकाज सोपविण्यात आले. तरीही इतर वर्गांना शिकविणेकामी शिक्षक वर्ग कमी पडल्याने ५ वर्ग तुकडीचे एकत्रीकरण करुन ४ वर्ग तुकडी करण्यात आल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना अध्यापना करण्यात व वैयक्तीक लक्ष देण्यास अनंत अडचणी आल्यात.

१) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये आर. टी. ई. अधिनियमानुसार इयत्ता ६ वी व ७ वी प्रति वर्ग ३५ विद्यार्थी याप्रमाणे १४ वर्ग कार्यरत होत असून एकूण १४ सहा. शिक्षक अध्यापनासाठी गरजेचे आहे. इयत्ता ६ वी व ७ वीच्या एकूण ४८४ विद्यार्थ्यांना सध्या एकूण १० वर्गखोल्या उपलब्ध असल्याने या १० वर्गखोल्यात हे विद्यार्थी बसविण्यात येणार आहेत. आपल्या शाळेच्या संच

मान्येतेमध्ये इयत्ता ६ वी व इ. ७ वी चे वर्ग हे उच्च प्राथमिक विभागात मध्ये मोडतात. या वर्गांना अध्यापन हे तासिका पद्धतीचे असल्याने एकूण १० वर्गांना शिकविणेकामी एकूण १४ शिक्षक असणे गरजेचे आहे. आजमितीस उच्चप्राथमिक विभागाकडे अध्यापन करणेकामी एकूण १३ शिक्षक उपलब्ध असून, ०१ शिक्षक भरणे अत्यंत गरजेचे आहे. **सदर १० वर्ग भरविणेकामी वर्गखोल्यां उपलब्ध आहेत.**

१) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये आर. टी. ई. अधिनियमानुसार इयत्ता १ ली ते ५ वी प्रति वर्ग ३० विद्यार्थी याप्रमाणे ४१ वर्ग कार्यरत होत असून ४१ सहा. शिक्षक अध्यापानासाठी गरजेचे आहे. सन २०२१-२२ मध्ये इयत्ता १ ली ते ५ वीच्या एकूण १२३४ विद्यार्थ्यांना बसविणेकामी सध्या एकूण २५ वर्गखोल्या उपलब्ध असल्याने या २५ वर्गखोल्यात हे विद्यार्थी बसविण्यात येणार आहेत. आपल्या शाळेच्या संच मान्येतेमध्ये इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी चे वर्ग हे प्राथमिक विभागात मध्ये मोडतात. या वर्गांना अध्यापन हे १ वर्ग ०१ शिक्षक ही पद्धती असल्याने एकूण २५ वर्गांना शिकविणेकामी एकूण २५ शिक्षक असणे गरजेचे आहे. आजमितीस प्राथमिक विभागाकडे अध्यापन करणेकामी एकूण २४ शिक्षक उपलब्ध आहेत, **परंतू त्यापैकी माहे ३० जून२०२० अखेर ०१ सहा. शिक्षक सेवानिवृत्त झाले आहेत, सदरची जागा रिक्त असल्याने सदर वर्गाला शिकविणेकामी शिक्षकाची अडचण भासणार आहे. तसेच माहे जून २०२१ पासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होत असल्याने ०१ शिक्षक भरणे अत्यंत गरजेचा आहे. सदरचे २५ वर्ग भरविणेकामी वर्गखोल्यां उपलब्ध आहेत.**

विभागाची मागणी:-

ई) प्राथमिक विभाग - शाळेचा मंजूर आकृतीबंध व २०१८-१९ शिक्षक संच मान्यता मंजूर शिक्षक पदे ---

अ .नं	पदाचा तपशिल	सन २००९ ते २०१७ सुधारित आकृती बंध मंजूर पदे	शै.वर्ष २०१८ -१९ शिक्षक संच मान्यता पदे	सध्या कार्यरत शिक्षक पदे कायम	सध्या कार्यरत शिक्षक पदे कंत्राटी	एकूण कार्यरत शिक्षक संख्या	इ. १ली ते ७ वी एकूण विद्यार्थी संख्या सन- २०२१-२२	विद्यार्थी संख्ये नुसार आवश्यक पदे	एकूण रिक्त पदे	आवश्यक शिक्षक संख्या
१	मुख्याध्यापक	०१	०१	०१	००	०१	---	०१	००	००
२	उपमुख्याध्यापक	००	०१	००	००	००	---	०१	०१	००
३	पर्यवेक्षक	००	०२	००	००	००	---	०२	०२	००
४	पदवीधर ६ वी ते ७ वी	०४	१५	१०	०३	१३	४८४	१४	०१	०१
५	अ पदवीधर १ ली ते ५ वी	१८	४२	११	११	२२	१२३४	४१	१९	०१
६	संगणक शिक्षक	०१	--	०१	०१	०२	---	००	००	
	एकूण	२४	६१	२३	१५	३८	१७१८	५९	२३	०२

ब) आर.टी.ई.अधिनियमानुसार अहमदनगर जिल्हा परिषद यांचेकडून एकूण शालेय विद्यार्थी संख्येनुसार प्राथमिक विभागासाठी आवश्यक लागणारे सहाय्यक शिक्षकांची सन २०१६-१७, २०१७ -१८ व २०१८- १९ ची शिक्षक संच मान्यता मिळालेली आहे. सदर संच मान्यतेनुसार एकुण ६१ स्थायी पदांना मान्यता देण्यात आलेली आहे.

मात्र सद्यस्थितीत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी विभागाकडील प्राथमिक विभागाकडे २३ स्थायी व १५ कंत्राटी असे एकुण ३८ सहाय्यक शिक्षक कार्यरत आहेत. म्हणजेच शिक्षक संच मान्यतेनुसार एकूण मंजूर पदे ६१ वजा एकूण कार्यरत पदे ३९ = एकूण संच मान्यतेनुसार २३ पदे रिक्त आहेत. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता आवश्यक शिक्षक पदे सदर शासन निर्णयाचे आधारे निश्चित केलेली आहे. तरी एकूण शालेय विद्यार्थी संख्येनुसार प्राथमिक विभागासाठी नवीन शिक्षक पदे भरती करावी लागणार आहे. सदर नवीन शिक्षक भरती मंजूर पदांचा संस्थानचे नवीन आकृतीबंधात समावेश करण्यात येत असून संबधित विभागाकडे नवीन आकृतीबंधा बाबत कळविण्यात आलेले आहे. **सन २०१९-२० ची संच मान्यता अद्यापावेतो मिळालेली नाही.**

क) सन २०२१-२२ शैक्षणिक वर्षात विभागाकडील उपलब्ध वर्ग खोल्यांची संख्या विचारात घेता व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता नवीन शिक्षक भरती करावी लागणार आहे. तसेच इंग्रजी माध्यम असल्याने प्रत्येक पालकाला असे वाटते की, आपल्या मुलाकडे वैयक्तीक लक्ष द्यावे, परंतू विद्यार्थी संख्या मोठयाप्रमाणावर असल्याने वैयक्तीक लक्ष देता येत नाही त्यामुळे काही पालकांचा प्रशासनावर नाराजीचा सुर असतो. सदरचे नवीन रिक्त पदे भरणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन भरती करावी लागणार

पान नं.३ वर...

आहे असे नम्र मत आहे. **शैक्षणिक अर्हता** - एच.एस.सी.डी.एड., (इंग्रजी माध्यम) टी.ई.टी.पात्र – एकूण ०२ शिक्षक पदे एकत्रित मानधनावर (११ महिने कालावधी) करीता भरती करणे गरजेचे आहे.

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी करुन अनुमान:- शालेय विद्यार्थी अध्यापन करणे ही महत्वाची बाब विचारात घेता नवीन शिक्षक भरती करणे अत्यंत गरजेचे आहे.

विभागाची अभिप्राय/ स्पष्ट मत:-

उपरोक्त प्रास्ताविकात नमुद केलेनुसार मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०२/२०१८ रोजीची सभा निर्णय क्रमांक ९४ अन्वये व इकडील विभागाकडील वस्तूस्थितीचे अवलोकन होऊन, शै.वर्ष सन २०२१-२२ करिता श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल प्राथमिक विभागात शिक्षण विभागाने मंजुर केलेल्या शिक्षक संचमान्यतेनुसार आवश्यक लागणारे शिक्षक पदे हे ११ महिन्याचे कालावधीपुरते एकत्रित मासिक मानधनावर भरता येतील. सदर शिक्षकांना कुशल कंत्राटी कर्मचारी यांच्या प्रमाणे मासिक वेतन देता येईल.सदर शिक्षक भरतीबाबतची सर्व कार्यवाही (उदा. वर्तमानपत्रात जाहिरात देणे, मुलाखती घेणे, कार्यादेश देणे) संस्थानच्या सामान्य प्रशासन विभाग (आस्थापना विभाग) मार्फत करता येईल असे नम्र मत आहे.

तरी सन २०२१-२२ शैक्षणिक वर्ष करीता **शैक्षणिक अर्हता - एच.एस.सी.डी.एड., (इंग्रजी माध्यम) टी.ई.टी पात्र** – एकूण ०२ पदे एकत्रित मानधनावर (११ महिने कालावधी) करीता भरती करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

(कान्हूराज बगाटे,भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ८१

मा.तदर्थ (Ad-Hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर

खरेदी विभाग, श्री साईबाबा हॉस्पिटल

विषय:- श्री साईनाथ रूग्णालयात नव्याने तयार करण्यात आलेल्या तिस-या मजल्याकरीता मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर तसेच लिनन खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२,०२,६०,८३६/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

टिपणी,

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत असून तेथील मुलभूत सोयी-सुविधा फारच कमी पडत असल्यामुळे तत्कालीन मा.तदर्थ समितीचे दिनांक ०४.०२.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८५ अन्वये, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाच्या आवश्यक सुविधांमध्ये व बेडचे संख्येत वाढ करणेस मान्यता मिळालेली असून, त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३८ अन्वये, श्री साईनाथ रुग्णालयाच्या दोन्ही इमारतींवर वाढीव एका मजल्याचे बांधकाम करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आलेली होती.

त्यानुसार रुग्णांच्या सोयीसाठी श्री साईनाथ रुग्णालयामधील बेडच्या संख्येत वाढ करणेकामी श्री साईनाथ रुग्णालयाच्या दोन्ही इमारतीवरील वाढीव मजल्याचे काम अंतीम टप्प्यात असून तेथे Medical ICCU -11 Bed, Deluxe Room 4 Bed, FMW-25 Bed, MMW-25 Bed, Male Ortho-20 Bed, Female Ortho-20 Bed, Ortho O.T.-02 Bed, Conference Hall-01 व 08 Doctor room तयार करण्यात आलेले आहे. यास अनुसरुन श्री साईनाथ रुग्णालयाने वाढीव तिस-या मजल्याकरीता आवश्यक असणा-या मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर तसेच लिनन खरेदीची मागणी इकडील विभागाकडे केलेली आहे.

सदर साहित्य खरेदी करणेकामी येणारा अंदाजे खर्च निश्चित करणेसाठी बायोमेडीकल विभागामार्फत पुरवठाधारकांकडून ई-मेल व्दारे अंदाजे खर्चाचे दरपत्रक मागविण्यात आलेले होते. त्यानुसार पुरवठाधारकांनी ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

०१) Machinery/Equipment

S. N.	Item Description	Qty.	Rate per Unit in Rs.	LAMC for Next 5 Years after Warranty Period	Rate per Unit in Rs.	LAMC for Next 5 Years after Warranty Period	Average Rate Per in Rs.		Total Amount in Rs. Machine + Warranty 1 year + LAMC
							Machine Cost in Rs.	LAMC Price in Rs.	
1	Boyles Machine with Ventilator	2	Envision Biomedical Company, Pune		Pioneer Healthcare & Consultant, Aurangabad				
			1019200/-	327782/-	865000/-	94400/-	942100/-	211091/-	2306382/-
2	Cautery Machine	2	Pioneer Healthcare & Consultant, Aurangabad		Ethicon				
			600000/-	70800/-	878825/-	231476/-	739412.50	151138/-	1781101/-
3	Fully Auto Autoclave Machine (18KW)	2	Vida Life Science, Pune		Soul Sterile Industry, Ahmedabad				
			767000/-	180371/-	436600/-	186583/-	601800/-	183477/-	1570554/-
4	Battery Operated Drill Machine	1	MDE, Pune		Manman, Pune				
			420000/-	-	501630/-	-	460815/-		460815/-
5	Multipara Monitor with IBP,ETCO2	2	Global Medicare System, Nashik		Envision Biomedical Company, Pune				
			273000/-	84449/-	324800/-	104458/-	298900/-	94454/-	786708/-
6	Biphasic Defibrillator	2	Envision Biomedical Company, Pune		Pioneer Healthcare & Consultant, Auarngabad				
			280000/-	90049/-	210000/-	26550/-	245000/-	58300/-	606600/-
7	Ultrasonic Cleaner	1	Periclave, Mumbai		Precision Medicare Services, Kopargaon				
			328040/-	-	153400/-	-	240720/-	-	240720/-

S. No.	Item Description	Qty.	Rate per Unit in Rs.	LAMC for Next 5 Years after Warranty Period	Rate per Unit in Rs.	LAMC for Next 5 Years after Warranty Period	Average Rate Per in Rs.		Total Amount in Rs. Machine + Warranty 1 year + LAMC
							Machine Cost in Rs.	LAMC Price in Rs.	
8	Multipara Monitor 5 para (Ortho O.T-2+Deluxe Ward-4)	6	Global Medicare System, Nashik		Envision Biomedical Company, Pune				
			168000/-	54029/-	173600/-	55830/-	170800/-	54929.50	1354377/-
9	Minor OT Operation Table simple	1	Precision Medicare Services, Kopargaon		Penta Medilab Tech. Chemical, Tamilnadu				
			212400/-	-	224000/-	-	218200/-	-	218200/-
10	10 KVA Online UPS	1	Power Gun Systems Pvt.Ltd., Thane		New Tejas Electronics, Ahmednagar				
			178016/-	29500/-	138900/-	26550/-	158458/-	28025/-	186483/-
11	Electric Power Drill system with accessories	2	Manman,Pune		MDE, Pune				
			132797/-		171203/-		152000/-		304000/-
12	12 Channel ECG Machine	1	Precision Medicare Services, Kopargaon		Gandhi Enterprises, Ahmednagar				
			123200/-	32450/-	93000/-	29395/-	108100/-	30922.50	139022/-
13	Patient Warmer with Blanket	4	Global Medicare System, Nashik		Pioneer Healthcare & Consultant, Aurangabad				
			134400/-	43224/-	125950/-	17700/-	130175/-	30462/-	642548/-
14	Tourniquett Machine with accessories	2	MDE, Pune		Collateral Medical Pvt.Ltd., Mumbai				
			86968/-	-	62421/-	-	74695/-	-	149390/-
15	Pulse Oximeter	1	Hemodiaz Life Science Ltd, Delhi		Precision Medicare Services, Kopargaon				
			31360/-	8260/-	35000/-	29500/-	33180/-	18880/-	52060/-
16	Syringe Pumps (Ortho O.T-7+Deluxe Ward-8)	15	Global Medicare System, Nashik		Plenum Tech Pvt.Ltd., Nagpur				
			29120/-	9365/-	28000/-	9004/-	28560/-	9184.50	137767.50
17	Electric Suction Machine (Ortho O.T-3+Deluxe Ward-3)	6	Pravara Life Care Services, Loni		Precision Medicare Services, Kopargaon				
			24780/-	-	28000/-	-	26390/-	-	158340/-
18	Plaster cutter	1	MDE, Pune		Manman,Pune				
			21056/-	-	9000/-	-	15028/-	-	15028/-
19	Fumigation Machine	2	United Service, Mumbai		Pravara Life Care Services, Loni				
			9086/-	-	14160/-	-	11623/-	-	23246/-
20	Central Suction Trolly	2	United Service, Mumbai		Pravara Life Care Services, Loni				
			7670/-		12320/-		9995/-		19990/-
21	Instrument sterilizer	1	Technotech Instrument, Kerala		Iinnotech, Gujrat				
			4760/-		2800/-		3780/-		3780/-
22	Needle Destoyer	1	United Service, Mumbai		Pravara Life Care Services, Loni				
			1623/-		1770/-		1696/-		1696.50
23	Nebulizer	2	United Service, Mumbai		Precision Medicare Services, Kopargaon				
			1363/-		1012/-		1188/-		2376/-
24	Shadowless Lamp 2-Dome (LED)	2	Vishal Surgical, Equipment co Pvt.Ltd., Mumbai		Steries (India) Pvt Ltd., Thane				
			1232000/-	88500/-	1665436/-	193912/-	1448718/-	141206/-	3179848/-
25	C-Arm II TV system	1	Siemens Healthineers,		Pioneer Healthcare & Consultant, Aurangabad				
			3363000/-	612341/-	3200000/-	586089/-	3281500/-	599215/-	3880715/-
								Total Amt in Rs.	18221747/-

०२) Furniture

S. N.	Description	Total Qty.	Shree Impex, Shriram pur	S. Comfort Seating Systems, Pune	Rajneel Distributors, Nashik	Total Amt. in Rs.	Rate per (Average Amt.)	Total Amt. in Rs.
1	Full Fowler Beds with Attach IV Stand - Overall approx dimension: Length 2170mm x Width 1000mm Optional Accessories for ICU Beds: Full Length Collapsible side Railings with SS Tube & MS Frame (Pair), Collapsible side Railings with SS Tube & MS Brackets(Pair), Swing Away Type SS Tube Railings (Pair), Swing Away Type MS Tube Railings (pair), Urine Bag Holder (MS EPC), Chart Holder (MS EPC), PU Foam Mattress – Four Sections	4	10650/-	8850/-	10136.20	29636.20	9878.73	39514.93
2	Linen Trolley with cover - Linen Trolley without cloth in MS with powder coating.	20	4500/-	6844/-	8690.70	20034.70	6678.23	133564.67
3	Revolving chair full back rest with side arm with wheel - high back chair for main person. Leather chair with different colour, appropriate for home use, office use etc. Solid wood with plywood inside structure. Multifunctional mechanism. Tower shape 5 star crome base with dual-wheel casters. Pneumatic seat height adjustment. Armrest: PU paddies armrest. Back can be adjusted. Headrest adjustable. High density, Environmental and harmless sponge, Use top grade metal. Skilfully handwork, modern design.	15	9500/-		7670/-	17170/-	8585/-	128775/-
4	Revolving Chair half back rest with side arm with wheel * With PU Soft handle with metal Strips inside back attach arm rest. * With 50 density moulded foam at seat and back 15mm hot press commercial ply at seat and back. *Tilt Mechanism with front locking * Class three gas lift. * Metal powder coated base * Nylon wheels.	20	3000/-	7080/-	6490/-	16570/-	5523.33	110466.67
5	Office Tables – Office Table with Square Tubular Frame 3 Drawer with in one Side & Box with on Shelf on other. Size 60"x 30"	15	6350/-	8850/-	6549/-	21749/-	7249.67	108745/-
6	Cupboard – SS Cupboard 6 Feet Cupboard Stainless Steel – Size 1981mm x 914mm x 483mm. Gauge of Steel 18 with four Compartment.	10		21500/-	12980/-	34480/-	172840/-	172400/-
7	Iron plain bed- Overall Size: 1880 mm L x 830mm W x 570mm H . Pre-treated and epoxy powder coated .CRCA steel bed	20	4560/-	4130/-	4130/-	12820/-	4273.33	85466.67

S. N.	Description	Total Qty.	Shree Impex, Shriram pur	S. Comfort Seating Systems, Pune	Rajneel Distributors, Nashik	Total Amt. in Rs.	Rate per (Average Amt.)	Total Amt. in Rs.
8	Crash cart trolley with Alcon box - overall dimensions (mm)- 690(L)x385(W)x1080/1700 (H)Features – • 6 Polymer Drawers with 6 colours medicine Bins• shelves with SS Top, Monitor Stand with I.V. Stand Rod • O2 Holder with Wooden Pad• Cardiac Message Pad Hook, Epoxy Powder Coated• 100mm Wheels, 4 Pieces (2 With Brake)	6	16750/-		16048/-	32798/-	16399/-	98394/-
9	Bed side Locker with Stainless Steel top wheels with Braked- Bed side Locker-Overall Dimensions (MM)-410 (L)x410(W) x830(H) Features- 18mm pre-laminated sheet with PVC2 Drawers 500mm wheels in Legs	50	4318/-	4130/-	5310/-	13758/-	4586/-	229300/-
10	Cardiac Table Overall approx. size:1120mm L x 450mm W x 965mmH.MS tubular framework mounted on four twin wheel, non-rusting castors, 50mm dia. Top 760mml x450mm W made of laminated board. Pre-treated and powder coated. Supplied in kdc.	20	6867/-		6612.72	13479.72	6739.86	134797.20
11	Patients Stretcher-Overall size: 2080mm L x 610mm W x 840mm H . Pretreated and epoxy powder coated base frame with removable top . Available in stainless steel top & complete stainless steel . 100mm diameter Diagonal wheels with brake	5	5310/-		4130/-	9440/-	4720/-	23600/-
12	Folding Wheel Chair - Overall size : 680mm L x 1040mm W x 890mm H Seat size : 510mm L x 410mm W x 460mm H . Chrome plated, CRCA tubular framework with cushion and armrest . 200 mm front wheels & 610mm back wheels	5		5900/-	6490/-	12390/-	6195/-	30975/-
13	IV Stand : Heavy MS pipe Base, with stainless steel 8mm bar, with knob, fully epoxy powder coated.	20	2138/-	2596/-		4734/-	2367/-	47340/-
							Total Amt. in Rs.	1343339/-

०३) Linen

S. N.	Description	Qty.	Sai Apurv Super stocist, Yeola	Gurukrupa Dresses, Rahuri	Kalika Dress Wear, Manmad	Total Amt. in Rs.	Rate per in Rs. (Average Amt.)	Total Amt. in Rs.
1	Bedsheet	500	275/-	295/-	285/-	855/-	285/-	142500/-
2	Pillow Cover	200	85/-	95/-	100/-	280/-	93.33	18666.67
3	Napkin	50	50/-	60/-	55/-	165/-	55/-	2750/-
4	Patient Dress (Male)	200	350/-	375/-	365/-	1090/-	363.33	72666.66
5	Patient Dress (Female)	200	350/-	375/-	365/-	1090/-	363.33	72666.66
6	Staff Dress (Medium/ Large)	200	400/-	425/-	415/-	1240/-	413.33	82666.66
7	Doctor Dress (Medium/ Large)	100	400/-	425/-	415/-	1240/-	413.33	41333.33
8	Green Cloth	500	90/-	95/-	100/-	285/-	95/-	47500/-
9	Blue Cloth	500	85/-	100/-	90/-	275/-	92/-	46000/-
10	Pillow	200	360/-	380/-	370/-	1110/-	370/-	74000/-
11	Curtain Cloth	1000	90/-	100/-	95/-	285/-	95/-	95000/-
							Total Amt. in Rs.	695750.00

सोबत दिलेल्या दरपत्रकाच्या तक्त्यानुसार मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर तसेच लिनन खरेदीकामी एकूण रु.२,०२,६०,८३६/- (अक्षरी रक्कम रु.दोन कोटी दोन लाख साठ हजार आठशे छत्तीस) मात्र खर्च अपेक्षित आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखंस– २०१४/ प्र.क्र. ८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. १ डिसेंबर २०१६ अन्वये परिच्छेद ३.२.– नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रू.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-

श्री साईनाथ रुग्णालयाच्या दोन्ही इमारतीवर करण्यात आलेल्या वाढीव मजल्याचे काम अंतीम टप्प्यात असून तेथे रुग्णांच्या सोयीचे दृष्टीने आवश्यक असणारे मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर तसेच लिनन खरेदीकामी एकत्रित रु.२,०२,६०,८३६/- (अक्षरी रक्कम रु.दोन कोटी दोन लाख साठ हजार आठशे छत्तीस) मात्र खर्च आवश्यक आहे. परंतु प्रत्येक आयटेमवाईज खर्चाची रक्कम ही रु.५०,००,०००/- मात्रपेक्षा कमी येत असल्यामुळे मा.औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणे आवश्यक असणार नाही, सबब प्रत्येक आयटेमवाईज ई-निविदा प्रसिध्द करणेस मान्यता मिळावी, तसेच ज्या मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर व लिनन या साहित्यांची खरेदीकामी येणारी अंदाजे खर्चाची रक्कम रु.३,००,०००/- मात्रपेक्षा कमी आहे, असे साहित्य कोटेशन मागवून खरेदी करता येईल, असे नम्र मत आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाच्या दोन्ही इमारतीवर करण्यात आलेल्या वाढीव मजल्याचे काम अंतीम टप्प्यात असून तेथे रुग्णांच्या सोयीचे दृष्टीने आवश्यक असणारे मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर/ लिनन तातडीने खरेदीकामी खालील बाबींस मान्यता मिळावी, ही विनंती.

(०१) महाराष्ट्र शासनाचे खरेदी नियमावलीस अनुसरुन, प्रस्तावित साहित्यांपैकी ज्या साहित्यांची अंदाजे खर्चाची रक्कम प्रत्येकी रुपये तीन लाखपेक्षा जास्त आहे, असे साहित्य विहित पध्दतीने स्वतंत्र ई-निविदा मागवून खरेदी करणेस मान्यता असावी.

(०२) महाराष्ट्र शासनाचे खरेदी नियमावलीस अनुसरुन, प्रस्तावित साहित्यांपैकी ज्या साहित्यांची खरेदीकामी येणारी अंदाजे खर्चाची रक्कम प्रत्येकी रुपये तीन लाख मात्रपेक्षा कमी आहे, असे साहित्य विहीत पध्दतीने आयटेमवाईज कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता असावी.

(०३) सदरहू खरेदीकामी मोठया प्रमाणात प्रसिध्दी मिळणेसाठी महाराष्ट्र राज्यातील जास्त खपाच्या मराठी, हिंदी व इंग्रजी वर्तमानपत्रात तसेच बाहेरील राज्यातील जादा खपाच्या हिंदी व इंग्रजी वर्तमानपत्रामध्ये ई-निविदेची/ कोटेशनची जाहिरात देण्यात येऊन, महाराष्ट्र शासनाच्या खरेदी नियमावलीनुसार सर्व प्रक्रिया राबविणेस मान्यता असावी.

(०४) प्रस्तावित मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर/ लिनन खरेदीकामी येणा-या एकत्रित अंदाजे रक्कम रु.२,०२,६०,८३६/- (अक्षरी रक्कम रु.दोन कोटी दोन लाख साठ हजार आठशे छत्तीस) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

तरी श्री साईनाथ रुग्णालयाच्या दोन्ही इमारतींवरील नव्याने करण्यात आलेल्या वाढीव मजल्यामध्ये रुग्णांच्या सोयी-सुविधांसाठी विविध वार्ड/ विभाग सुरु करणेकामी आवश्यक असणा-या मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर/ लिनन इ.ची खरेदी करणेकामी उपरोक्त ०१ ते ०४ मुद्दयास मंजुरी मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीच्या सभेसमोर सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्यकार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- १२

मा तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोरील विषय
विभागाचे नाव - श्री साईबाबा हॉस्पिटल

विषय- **श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांचे संबंधीत पदासाठी सातव्या वेतन आयोगात मंजुर वेतनश्रेणीनुसार मुळ वेतन व सध्याचे महागाई भत्यानुसार होणारे सुरवातीचे वेतनाइतके एकत्रित मासिक मानधन देणेबाबत ....**

टिपणी-

आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ – "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी." तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

मा व्यवस्थापन समिती ठराव क्र-

१) मा व्यवस्थापन समिती दि. ०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६०८.

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांचे संबंधीत पदासाठी मंजुर आकृतीबंधामध्ये नमुद असलेल्या वेतश्रेणीनुसार व सध्याचे महागाई भत्यानुसार एकत्रित मानधन देण्यास मान्यता देण्यात आली.

२) मा व्यवस्थापन समिती दि. ०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ५६८.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयातील कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांचे संबंधीत पदासाठी सातव्या वेतन आयोगात मंजुर वेतनश्रेणीनुसार मुळ वेतन व सध्याचे महागाई भत्यानुसार मासिक एकत्रित मानधन देणेबाबत सखोल अभ्यास करून सविस्तर प्रस्ताव तदर्थ (Ad-hoc) समितीचे, सभेसमोर सादर करावा, असे ठरले.

प्रस्तावना-

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांचे संबंधीत पदासाठी मंजुर आकृतीबंधामध्ये नमुद असलेल्या (सहाव्या वेतन आयोगानुसार) वेतश्रेणीनुसार व सध्याचे महागाई भत्यानुसार एकत्रित मानधन देण्याबाबतचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. ०५/१०/२०१८ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ६०८ नुसार, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांचे संबंधीत पदासाठी मंजुर आकृतीबंधामध्ये नमुद असलेल्या वेतश्रेणीनुसार व सध्याचे महागाई भत्यानुसार एकत्रित मानधन देण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार दि. ०१/११/२०१८ पासुन मासिक देय मानधन संबंधीत वैद्यकीय अधिका-यांना अदा करणेबाबत दि. ०७/११/२०१८ रोजी आदेश पारीत करणेत आलेला आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयाकरीता आवश्यक वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने कालावधीसाठी भरणेकामी सन २०१८ ते २०२० मध्ये खालीलप्रमाणे जाहीरात प्रसिध्द करून वॉक इन इंटरव्युव्ह घेणेत आल्या आहेत.

अ नं	जाहिरात दिनांक	वॉक इन इंटरव्युव्ह दिनांक	जाहीरात केलेले पदे	नेमणूक
१	१५/०२/२०१८	१३/०३/२०१८	३५	१३
२	०८/०८/२०१८	१४/०८/२०१८	५४	१४
३	०१/०१/२०१९	११/०१/२०१९	६१	३०
४	२३/०७/२०१९	०२/०८/२०१९	५२	११
५	२१/१०/२०२०	१०/११/२०२०	४१	१३

उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे वेळोवेळी जाहीरात देऊन आवश्यक संख्येने वैद्यकीय अधिकारी रूग्णालयास मिळालेले नाहीत.

मा व्यवस्थापन समिती दि. ०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३७१ नुसार, संस्थान आस्थापनेवरील कायम (स्थायी) कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा सुधारीत वेतन नियम, २०१९ म्हणजेच सातवा वेतन आयोग त्यातील तरतुदीसह व इतर अनुषंगीक बाबीसह दि. ०१/०१/२०१६ पासून पुर्वलक्षी प्रभावाने लागु करणेस मान्यता देणेत आलेली आहे. ०१ जूलै २०१९ चे वेतन सातव्या वेतन आयोगानुसार अदा करणेत आलेले आहे. सहाव्या वेतन आयोगानुसार ज्या दराने व्यवसाय रोध भत्ता देण्यात येत होता त्याच दराने सध्या व्यवसाय रोध भत्ता अदा करणेत येत आहे.

सध्या स्थायी पदावर कार्यरत वैद्यकीय अधिकारी व कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांचे कामाचे स्वरूप सारखेच आहे. मात्र सध्या स्थायी पदावर कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी यांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतन देण्यात येत असुन त्यांना एच.आर.ए., टी.ए., इत्यादी भत्ते व नियमित वार्षीक वेतनवाढ देण्यात येत आहे. तथापि, कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांना वार्षीक वेतनवाढ देण्यात येत नसुन सध्या सहाव्या वेतन आयोगानुसार होणारे वेतनाइतके (जवळपासचे) मासिक मानधन देण्यात येत असल्याने त्यांचे वेतनात बरीच तफावत आहे.

कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांनाही सातव्या वेतन आयोगानुसार होणारे वेतनाइतके (जवळपासचे) मासिक मानधन देणे आवश्यक आहे.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयामध्ये कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने कालावधीकरीता खालीलप्रमाणे वैद्यकीय अधिकारी कार्यरत असुन सध्या त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेप्रमाणे एकत्रित मासिक मानधन देण्यात येत आहे.

अ नं	वैद्यकीय अधिका-यांचे नाव पदनाम व रूग्णालय	सध्याचे मानधन
०१	०२	०३
१	डॉ श्रीकांत मधुकर नागरे सिनीअर रेडीओलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल	रू. ६९,०००
२	डॉ राजेंद्र उत्तमराव बिडगर आर्थोपेडीक सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल	रू. ६९,०००
३	डॉ प्रसाद रामभाऊ उंबरकर न्युरोसर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल	रू. ६९,०००
४	डॉ विक्रांत विश्वास खैरनार मानसोपचार तज्ञ, श्री साईबाबा हॉस्पिटल	रू. ६९,०००
५	डॉ गगन सुरेंद्रकुमार शर्मा इंटरव्हेश्नल कार्डीओलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल	रू. ६९,०००
६	डॉ संदीप नारायणराव देवरे इंटरव्हेश्नल कार्डीओलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल	रू. ६९,०००

अ नं	वैद्यकीय अधिका-यांचे नाव पदनाम व रूग्णालय	सध्याचे मानधन
०१	०२	०३
७	डॉ नितीन दशरथ ठाकरे कार्डीयाक सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल	रू. ६९,०००
८	डॉ विद्या मनोहर बोराडे जनरल सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल	रू. ६९,०००
९	डॉ विजय मुरलिधर थोरात जनरल सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल दि.०४/०५/२०२१ अखेरपासून राजीनामा मंजूर	रू. ६९,०००
१०	डॉ शिरीष शशिकांत शेळके ईएनटी सर्जन, श्री साईनाथ रूग्णालय	रू. ६९,०००
११	डॉ अमित दिपक नाईकवाडे मेडीकल ऑफीसर (आर्थोपेडीक सर्जन), श्री साईनाथ रूग्णालय	रू. ६९,०००
१२	डॉ विशाल धनाजी पटेल मेडीकल ऑफीसर (आर्थोपेडीक सर्जन), श्री साईनाथ रूग्णालय	रू. ६९,०००
१३	डॉ शोभना तुकाराम कोल्हे मेडीकल ऑफीसर (ईएनटी सर्जरी), श्री साईनाथ रूग्णालय	रू. ६९,०००
१४	डॉ शिल्पा दशरथ सोनावणे वरीष्ठ शरीरविकृती शास्त्रज्ञ, श्री साईबाबा हॉस्पिटल	रू. ६९,०००
१५	डॉ प्रिती हिरालाल दोशी स्त्री रोग तज्ञ, श्री साईनाथ रूग्णालय	रू. ६९,०००
१६	डॉ मुकुंद अर्जुन चौधरी न्युरोसर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल	रू. ६९,०००
१७	डॉ गायत्रीलक्ष्मी बापुराव नागपुरे सिनीअर ॲनेस्थेसियालॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल	रू. ६९,०००
१८	डॉ अनंतकुमार किशोर भांगे पेडीयाट्रीशियन, श्री साईनाथ रूग्णालय	रू. ६९,०००
१९	डॉ उज्वला लक्ष्मण शिरसाठ पेडीयाट्रीशियन, श्री साईनाथ रूग्णालय	रू. ६९,०००
२०	डॉ पोर्णिमा रामराव शेळके वैद्यकीय अधिकारी (दंतरोग), श्री साईबाबा हॉस्पिटल	रू. ५७,०००
२१	डॉ सचिन श्रीहरी यादव ज्युनिअर ॲनेस्थेसियालॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल दि. २४/०२/२०२१ अखेर पासून राजीनामा मंजूर.	रू. ५७,०००
२२	डॉ रोहित राजेंद्र सप्रे ज्युनिअर मायक्रोबायोलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल	रू. ५७,०००
२३	डॉ स्वप्नाली राम चव्हाण आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल	रू. ५७,०००
२४	डॉ स्वाधीन किसनराव गाडेकर आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल दि.०६/०३/२०२१ रोजी नेमणूक संपुष्टात आली.	रू. ५७,०००
२५	डॉ अंजली पदमाकर सोनवणे आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल	रू. ५७,०००

अ नं	वैद्यकीय अधिका-यांचे नाव पदनाम व रूग्णालय	सध्याचे मानधन
०१	०२	०३
२६	डॉ कल्याणी साहेबराव शिंदे निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल दि.१९/०६/२०२१ रोजी नेमणूक संपुष्टात आली.	रू. ५७,०००
२७	डॉ प्राची सुनिल जाधव आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल दि. ०१/०३/२०२१ पासून राजीनामा मंजूर	रू. ५७,०००
२८	डॉ प्रियंका अनंत राऊत आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल	रू. ५७,०००
२९	डॉ वृषाली सोमनाथ धोंडे आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल दि. ०१/०३/२०२१ पासून राजीनामा मंजूर	रू. ५७,०००
३०	डॉ अनुराधा भगवत चिंधे आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल	रू. ५७,०००
३१	डॉ राहुल दत्तात्रय डोंगरे ज्युनिअर पॅथोलॉजीस्ट, श्री साईनाथ रूग्णालय दि.०६/०३/२०२१ रोजी नेमणूक संपुष्टात आली.	रू. ५७,०००
३२	डॉ उज्वला भाऊसाहेब काळे मेडीकल ऑफीसर (दंत तज्ञ), श्री साईनाथ रूग्णालय	रू. ५७,०००
३३	डॉ देविदास लक्ष्मण लव्हाटे आरएमओ, श्री साईनाथ रूग्णालय दि. १२/०२/२०२१ अखेर पासून राजीनामा मंजूर	रू. ५७,०००
३४	डॉ अभिषेक जयराम खोडे होमिओपॅथी तज्ञ, श्री साईनाथ रूग्णालय	रू. ५७,०००

उपरोक्त वैद्यकीय अधिकारी यांना वेळोवेळी घेणेत आलेल्या मा व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार आकृतीबंधामध्ये संबंधीत पदाचे मंजुर वेतनश्रेणीनुसार (बेसिक+ग्रेड पे+एनपीए) होणारे सुरवातीचे वेतनाएवढे मानधन अ.नं. ०१ ते १९ वैद्यकीय अधिका-यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबॅन्ड रू.१५६००-३९१००, ग्रेड पे रू. ६६०० व अ.नं. २० ते ३४ वैद्यकीय अधिका-यांना वेतनबॅन्ड रू.१५६००-३९१०० ग्रेड पे रू. ५४०० या वेतनश्रेणीनुसार होणारे वेतनाईतके मासिक एकत्रित मानधन (तक्ता अ मधील स्तंभ क्र ६ मध्ये नमुद केलेनुसार) देणेत येत आहे. (तसेच साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयातील तज्ञ वैद्यकीय अधिका-यांना संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो).

तक्ता अ

नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले होते व काही ठिकाणी निकडीच्या प्रसंगी बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही,असे मत आहे.

तरी उपरोक्त १४ कर्मचा-यांना स्वत: व त्यांचेवर अवलंबित व्यक्ती(रुग्ण १५) यांचे वैद्यकीय उपचारापोटी आलेल्या खर्चाच्या उपरोक्त तक्त्यामध्ये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या देय होत असलेल्या रकमेचा परतावा त्यांना अदा करणेस व त्याकामी येणा-या रु. १४,०१,९६८/-मात्र रकमेच्या खर्चास मान्यता मिळणेस्तव सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेसमोर सविनय सादर.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

BRPNS - 236
D-M-18-19-Ja Cha.

विषय क्र.- ११/४

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर

खरेदी विभाग, श्री साईबाबा हॉस्पिटल

विषय संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१४,६९,४२९/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत...,

टिपणी,

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक – खालील संस्थान कर्मचा-यांची वार्षिक रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

मागणी – पुढील तक्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

अ.नं.	कर्मचा-याचे नाव	कर्मचा-याशी नाते	आजाराचे नाव	डॉक्टरांचे नाव	रुग्णालयाचे नाव	एकूण मागणी रक्कम	एकूण देय रक्कम	शेरा
	अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले -							
१.	प्रदिप विश्वनाथ त्रिभुवन विभाग- प्रसादालय हुद्दा-मदतनीस	स्वत:	HTN Diabetes उच्च रकतदाब मधुमेह	डॉ.पोरवाल	श्री साईनाथ हॉस्पिटल	६९८६.००	६९८६.००	१७२१७.००
२.	सुनिता बाळासाहेब एरंडे विभाग-साईबाबा हॉस्पि. हुददा-परिचारिका	स्वत:	Diabetes मधुमेह	डॉ.इंगळे डॉ.बागडे	श्री साईबाबा हॉस्पिटल	२४८८.००	२४८८.००	१९९६७.००
३.	जगन्नाथ रामनाथ शेलार विभाग-साईबाबा हॉस्पि. हुद्दा-स्टाफ नर्स	स्वत:	Covid 19 RTPCR Positive	डॉ.ढाकणे	श्री साईबाबा हॉस्पिटल	२५४६४.००	२५४६४.००	१८९४४.००
४.	दिगंबर अनंत सलगरकर विभाग-साईनाथ हॉस्पि. हुद्दा-स्टाफ नर्स	स्वत:	Covid 19 RTPCR Positive	डॉ.जाधवर	श्री साईबाबा हॉस्पिटल	३७७००.००	३७४६७.००	२९६०.००
५.	संध्या विनायक जाधव विभाग-साईबाबा हॉस्पि. हुद्दा-स्टाफ नर्स	पती	HTN Diabetes उच्च रक्तदाब / मधुमेह	डॉ.जाधवर	श्री साईबाबा हॉस्पिटल	८९५४.००	८९५४.००	२२७६१.००
६.	लक्ष्मण सदाशिव चव्हाण विभाग-भक्तनिवास ५००रुम हुद्दा-माजी अधिक्षक (सेवानिवृत्त कर्मचारी)	पत्नी	Diabetes मधुमेह	डॉ.पोरवाल	श्री साईनाथ हॉस्पिटल	६०८४.००	६०८४.००	१९८७४.००
					अ एकूण रक्कम रु.	८७६७६.००	८७४४३.००	
	ब. संस्थान रुग्णालयात उपचार न झालेले संस्थान मान्य यादीत रेफर केलेले							
७.	सुभाष मल्हारी बंदावणे विभाग-ध्वनिक्षेपण हुद्दा-विदयुत पर्यवेक्षक	मुलगा	Kidney Transplant	डॉ.जाधवर	सहयाद्री हॉसिपटल नासिक	१५८१७६.००	१५७५७६.००	१३७५९१.००

पान नं-२ वर

८.	कल्पना रघुनाथ मुसमाडे विभाग-साईनाथ हॉस्पि. हुद्दा-स्टाफ नर्स	पती	Covid 19 RTPCR Positive	डॉ.पोरवाल	रुबी हॉल क्लिनिक, पुणे	८०१५२८.००	७५७८४८.००	१५६०६.००
९	नवनाथ साहेबराव मते विभाग-पाणीपुरवठा हुद्दा-लिपिक	स्वत:	Phaeochromo atomy	डॉ.जाधवर	रुबी हॉल क्लिनिक, पुणे	२४१६०.००	२४१६०.००	
					ब एकूण रक्कम रु.	९८३८६४.००	९३९५८४.००	
	क. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले रेफर केलेले तातडीने खाजगी रुग्णालयात गेलेले							
१०	संजया सतिष वाणी विभाग–साईनाथ हॉस्पि. हुद्दा-सिस्टर इनचार्ज	मुलगी	Fever with Cytopenia	डॉ.प्रितेश	प्रितेश जुनागडे हॉस्पिटल, नासिक	९४१८.००	७५३४.००	१९३८३.००
					क एकूण रक्कम रु.	९४१८.००	७५३४.००	
	ड. संस्थान रुग्णालयात उपचार न घेतलेले रेफर केलेले ,निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले							
११.	जगन्नाथ देवराम डांगे विभाग–साईबाबा हॉस्पि. हुद्दा- डायलेसिस टेक्निशियन	स्वत:	Covid 19 RTPCR Positive	डॉ.सचिन बागडे	असिअन नोबेल हॉस्पिटल, अहमदनगर	३०४९५९.००	२४३९६८.००	५०९४९७.००
१२.	किरण सुनिल साळवे विभाग- साईबाबा हॉस्पि. हुद्दा-स्टाफ नर्स	स्वत:	Covid 19 RTPCR Positive	डॉ.सचिन बागडे	होली फॅमिली हॉस्पि.मुंबई	९१७५८.००	३७९९५.००	९१७९.००
१३.	पुनम लक्ष्मीकांत पोतदार विभाग-साईबाबा हॉस्पि. हुद्दा-स्टाफ नर्स	स्वत:	Covid 19 RTPCR Positive	डॉ.सचिन बागडे	एस.एम.बी.टी.हॉ स्पिटल घोटी	३७४०४.००	२९९२३.००	००
					ड एकूण रक्कम रु.	४३४१२१.००	३११८८६.००	
	इ. संस्थान रुग्णालयात उपचार न घेतलेले रेफर न केलेले ,निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले							
१४	निलेश बाळकृष्ण रावस विभाग-साईबाबा हॉस्पि. हुद्दा-स्टाफ नर्स	आई वडिल	Covid 19 RTPCR Positive	डॉ.पूजा सावंत	डॉ.विखे पाटील मेमोरियल हॉस्पि. अहमदनगर	३९८४६.००	३३०६३.००	१७९१४.००
१५.	गोरक्षनाथ रायभान नलगे विभाग-विधी विभाग हुद्दा-विधी अधिकारी	वडिल	Covid 19 RTPCR Positive	डॉ.पुजा कसबा	धन्वंतरी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, संगमनेर	११८१९९.००	८९९१९.००	००
					इ एकूण रक्कम रु.	१५८०४५.००	१२२९८२.००	
					अ+ब+क+ड+इ एकूण रक्कम रु.	१६७३१२४.००	१४६९४२९.००	

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.१४,६९,४२९-/-मात्र आहे.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत –

नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले होते व काही ठिकाणी निकडीच्या प्रसंगी बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही,असे मत आहे.

पान नं-३ वर

तरी उपरोक्त १५ कर्मचा-यांना स्वत: व त्यांचेवर अवलंबित व्यक्ती(रुग्ण १६) यांचे वैद्यकीय उपचारापोटी आलेल्या खर्चाच्या उपरोक्त तक्त्यामध्ये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या देय होत असलेल्या रकमेचा परतावा त्यांना अदा करणेस व त्याकामी येणा-या रु. १४,६९,४२९/-मात्र रकमेच्या खर्चास मान्यता मिळणेस्तव सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेसमोर सविनय सादर.

(कान्हूराज बगाटे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ८८/क

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर

388

खरेदी विभाग, श्री साईबाबा हॉस्पिटल

विषय संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.९,७०,१६७/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत...,

टिपणी,

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक – खालील संस्थान कर्मचा-यांची वार्षिक रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत. मागणी – पुढील तक्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

अ.नं.	कर्मचा-याचे नाव	कर्मचा-याशी नाते	आजाराचे नाव	डॉक्टरांचे नाव	रुग्णालयाचे नाव	एकूण मागणी रक्कम	एकूण देय रक्कम
	अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले -						
१.	अभयकुमार शांताराम दुनाखे विभाग –आय.टी.आय हुद्दा-निर्देशक	पत्नी	Ca कर्करोग	डॉ.बो-हाडे	श्री साईबाबा हॉस्पिटल	२४९०.००	२४९०.००
२.	विजय गणपत रोहमारे विभाग- विदयुत हुद्दा- उप कार्यकारी अभियंता	स्वत:	Hyper Tension उच्च रक्तदाब	डॉ.देवरे	श्री साईबाबा हॉस्पिटल	१८४६.००	१३६९.००
३.	आण्णासाहेब गोवर्धन कुदळे विभाग- भक्तनिवास हुद्दा- मदतनीस	स्वत:	Diabetes मधुमेह	डॉ.पोरवाल	श्री साईनाथ हॉस्पिटल	१४३६०.००	१४३६०.००
४.	नवनाथ साहेबराव जाधव विभाग- बगीचा हुद्दा-मदतनीस	आई	पटकी झटके येणे मेंदूचा आजार	डॉ.उंबरकर	श्री साईबाबा हॉस्पिटल	२०१२.००	२०१२.००
५.	ज्योतिलाल भिका जाधव विभाग- आय.टी.आय हुद्दा-सहा.भांडारपाल	स्वत:	HTN उच्च रक्तदाब	डॉ.पोरवाल	श्री साईबाबा हॉस्पिटल	७०४०.००	७०४०.००
६.	सुभाष श्रीराम शामकुंवर विभाग-साईबाबा हॉस्पि. हुददा-आर.एम.ओ	स्वत:	कोविड-१९RT PCR Positive	डॉ.जाधवर	श्री साईबाबा हॉस्पिटल	२२०२९.००	२०४४०.००
७	राजेश रमणलाल वाकडे विभाग-साईबाबा हॉस्पि. हुददा-सि.बायो.इंजिनिअर	आई स्वत:	HTN उच्च रक्तदाब आतडयाच्या सुजेने होणारा अल्सर	डॉ.जाधवर	श्री साईबाबा हॉस्पिटल	४६९१६.००	४६९१६.००
					अ एकूण रक्कम रु.	९६६९३.००	९४६२७.००
	ब. संस्थान रुग्णालयात उपचार न झालेले संस्थान मान्य यादीत रेफर केलेले						
८.	सुभाष मल्हारी बंदावणे विभाग-ध्वनिक्षेपण हुददा- विदयुत पर्यवेक्षक	मुलगा	Chromic Renual failure किडनी आजार	डॉ.जाधवर	रुबी हॉल क्लिनिक, पुणे	३१७११.००	३१७११.००
					ब एकूण रक्कम रु.	३१७११.००	३१७११.००

पान नं-२ वर

	क.संस्थान रुग्णालयात उपचार न घेतलेले रेफर केलेले निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले						
९.	सचिन वसंत देशमुख विभाग-साईबाबा हॉस्पि. हुददा-आर.एम.ओ.	स्वत: मुलगा	Covid -19 RTPCR Positive	डॉ.कनसे	नोबेल हॉस्पिटल, अहमदनगर	१९६६०९.००	१०६५८३.००
१०.	देठे स्वप्ना प्रल्हाद विभाग-साईबाबा हॉस्पि. हुददा-स्टाफ नर्स	स्वत:	Covid -19 RTPCR Positive	डॉ.कनसे	नोबेल हॉस्पिटल, अहमदनगर	१०१३९३.००	६५४१८.००
११.	संतोष कुमार मराठे विभाग-साईबाबा हॉस्पि. हुददा-भुलतज्ञ	स्वत: पत्नी	Covid -19 RTPCR Positive	डॉ.दिपक गिरी	रेजिंग मेडीकेअर हॉस्पिटल खराडी पुणे	११६१३७.००	९२९०९.००
	क एकूण रक्कम रु.					४१४१३९.००	२६४९१०.००
	ड.संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले रेफर केलेले निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले						
१२.	अरुण गणपत जाधव विभाग-विदयुत विभाग हुददा-तारतंत्री	आई	Covid -19 RTPCR Positive	डॉ.संदिप सांगळे	संजीवन हॉस्पिटल, संगमनेर	१६५४५३.००	१२८७६२.००
१३.	सुधाकर मारुती कुलकर्णी विभाग-लेखाशाखा हुददा-लिपिक	स्वत: पत्नी	Covid -19 RTPCR Positive	डॉ.प्रशांत सिनारे	सिनारे हॉस्पिटल, अहमदनगर	२०७५०५.००	१६२९६४.००
१४.	शमा शौकत शेख विभाग-साई प्रसादालय हुददा-मदतनीस	सासू	Covid -19 RTPCR Positive	डॉ.शाहनवाज (दानिश) खान	सेवा हॉस्पिटल, संगमनेर	१२६५३५.००	९६६२०.००
१५.	गौतम सुखदेव शेजवळ विभाग-साईनाथ हॉस्पि. हुददा-मदतनीस	स्वत:	Obstretive Uropates	डॉ.देशमुख	देशमुख हॉस्पिटल, शिर्डी	२५४२७.००	१८९९८.००
१६.	रोहिदास कचेश्वर मोकळ विभाग-मदतनीस हुददा-मदतनीस	पती	R/C/O Phychiatric disorder	डॉ.पाटील	वोकार्ड हॉस्पिटल, नासिक	२२८२२९.००	१७१५७५.००
	ड एकूण रक्कम रु.					७५३१४९.००	५७८९१९.००
	अ+ब+क+ड एकूण रक्कम रु.					१२९५६९२.००	९७०१६७.००

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.९,७०,१६७-/-मात्र आहे.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत –

नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले होते व काही ठिकाणी निकडीच्या प्रसंगी बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही,असे मत आहे.

तरी उपरोक्त १६ कर्मचा-यांना स्वत: व त्यांचेवर अवलंबित व्यक्ती (रुग्ण २०) यांचे वैद्यकीय उपचारापोटी आलेल्या खर्चाच्या उपरोक्त तक्त्यामध्ये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या देय होत असलेल्या रकमेचा परतावा त्यांना अदा करणेस व त्याकामी येणा-या रु. ९,७०,१६७/-मात्र रकमेच्या खर्चास मान्यता मिळणेस्तव सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेसमोर सविनय सादर.

10/7/2021

(कान्हूराज बगाटे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

SSH-Meeting-243

विषय क्र.- ८६

मा. व्यवस्थापनसमितीचेसभेपुढेनिर्णयार्थसादर

विभाग – श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी

विषयः- श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये एप्रिल २०२१ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३१,०७,००१/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत..

टिपणी,

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे **एप्रिल २०२१** मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण **६,९१० व ४८८** आयपीडी रुग्णांपैकी **९४७** ओपीडी व **२००** आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण **रु.२९,८५,३०१/-** इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **११६** रुग्णाना **रु.१,२१,७००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल

अ.नं.	रुग्णांची गटवारी	लाभार्थी संख्या	एकुण बिल रक्कम	बिलापोटी मिळालेली रक्कम	बिलात दिलेली सवलत
१	गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम	७४	४,४९,७०३/-	-	४,४९,७०३/-
२	आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम	१४२	६,५८,८८७/-	२,६७,०२८/-	३,९१,८५९/-
३	सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम	४	७,३००/-	-	७,३००/-
४	कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ.	३८१	१९,२६,१४९/-	९,९४,९५०/-	९,३१,१९९/-
५	महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत	१०१	७१,०५,९८०/-	६३,१३,२४५/-	७,९२,७३५/-
६	महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत	४४५	४,१२,५०५/-	- -	४,१२,५०५/-
	एकुण	१,१४७	१,०५,६०,५२४/-	७५,७५,२२३/-	२९,८५,३०१/-

SSH-MEETING-239-2021

(ब) श्री साईनाथ रक्तपेढी

अ.नं.	रुग्णांची गटवारी	लाभार्थी संख्या	एकुण बिल रक्कम	बिलापोटी मिळालेली रक्कम	बिलात दिलेली सवलत
१	थॅलॅसिमिया	२६	२९,०००/-	-	२९,०००/-
२	हिमोफिलीया	०	-	-	-
३	सिकल सेल ॲनेमीया फ्रि	०	-	-	-
४	ऑदर ब्लड डिसऑर्डर	३	४,०००/-		४,०००/-
५	फ्रि डन बाय एमएडी/एमएस	१	१,२००/-	-	१,२००/-
६	व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि	२८	३,१००/-	-	३,१००/-
७	महात्मा फुले आरोग्या योजना	२६	४३,०००/-	-	४३,०००/-
८	संस्थान एम्प्लॉयी फ्रि	३	४,८००/-	-	४,८००/-
९	कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि	०	-	-	-
१०	श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि	२९	३६,६००/-	-	३६,६००/-
	एकुण	११६	१,२१,७००/-	-	१,२१,७००/-
	एकुण अ+ब	१,२६३	१,०६,८२,२२४/-	७५,७५,२२३/-	३१,०७,००१/-

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये **एप्रिल २०२१** मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम **रु.३१,०७,००१/-** ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-Hoc) समितीचे सभेसमोर निर्णयास्तव सादर.

5/11/21

(कान्हूराज बगाटे ,भा.प्र.से)
मुख्यकार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ९०

मा. व्यवस्थापनसमितीचेसभेपुढेनिर्णयार्थसादर

विभाग – श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी

विषयः- श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये मे २०२१ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.१२,४४,०४१/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत..

टिपणी,

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

मा.उच्च न्यायालय यांचे रिट पिटीशन (पी.आय.एल) नं.३१३२/मधील दि.१७/०८/२००६ अन्वये समाजातील गरीब रुग्णांना वैद्यकिय बिलामध्ये सवलत देण्यासाठी योजना (स्किम) केलेली आहे. त्यामध्ये सुध्दा गरीब व गरजु (इंडिजेंट) रुग्णांसाठी १० % खाटा पूर्ण सवलतीच्या दरात व दुर्बल घटकातील १० % खाटा ५०% सवलतीच्या दरात राखीव ठेवुन बिल आकारणी करण्यास सूचविले आहे. त्याचप्रमाणे सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे **मे २०२१** मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण **३,६५२ व ५२२** आयपीडी रुग्णांपैकी **३९१** ओपीडी व **५६** आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण **रु.११,०९,९४१/-** इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **९१** रुग्णाना **रु.१,३४,१००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल

अ.नं.	रुग्णांची गटवारी	लाभार्थी संख्या	एकुण बिल रक्कम	बिलापोटी मिळालेली रक्कम	बिलात दिलेली सवलत
१	गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम	२६	२,११,२८२/-	-	२,११,२८२/-
२	आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम	५५	१,९२,४१०/-	८४,७४९/-	१,०७,६६१/-
३	सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम	३	१३,३६९/-	४,०००/-	९,३६९/-
४	कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ.	२१६	७,३१,५१७/-	२,०८,७४८/-	५,२२,७६९/-
५	महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत	२४	१२,०९,६००/-	१०,०९,७५०/-	१,९९,८५०/-
६	महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत	१२३	५९,०१०/-	-	५९,०१०/-
	एकुण	४४७	२४,१७,१८८/-	१३,०७,२४७/-	११,०९,९४१/-

SSBH-MEETING-24-5-2021

393

(ब) श्री साईनाथ रक्तपेढी

अ.नं.	रुग्णांची गटवारी	लाभार्थी संख्या	एकुण बिल रक्कम	बिलापोटी मिळालेली रक्कम	बिलात दिलेली सवलत
१	थॅलॅसिमिया	४८	८०,६००/-	-	८०,६००/-
२	हिमोफिलीया	०	-	-	-
३	सिकल सेल ॲनेमीया फ्रि	०	-	-	-
४	ऑदर ब्लड डिसऑर्डर	१	८००/-		८००/-
५	फ्रि डन बाय एमएडी/एमएस	२	१,८००/-	-	१,८००/-
६	व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि	१६	२,२००/-	-	२,२००/-
७	महात्मा फुले आरोग्या योजना	१४	३७,३००/-	-	३७,३००/-
८	संस्थान एम्प्लॉयी फ्रि	२	२,४००/-	-	२,४००/-
९	कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि	०	-	-	-
१०	श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि	८	९,०००/-	-	९,०००/-
	एकुण	९१	१,३४,१००/-	-	१,३४,१००/-
	एकुण अ+ब	५३८	२५,५१,२८८/-	१३,०७,२४७/-	१२,४४,०४१/-

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये मे २०२१ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.१२,४४,०४१/- (एकुण सवलत अक्षरी रुपये बारा लाख चौव्वेचाळीस हजार एक्केचाळीस मात्र) ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-Hoc) समितीचे सभेसमोर निर्णयास्तव सादर.

10/7/21

(कान्हूराज बगाटे ,भा.प्र.से)
मुख्यकार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

विषय क्र.- ८७

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर

394

श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी

विषय:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता ५० नग Ventilator खरेदी करणेबाबत.

टिपणी,

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाने मागणीपत्रकान्वये Ventilator (Adult, Paediatric, C-PAP, High Flow Nasal Oxygen) ची मागणी केलेली आहे.

रुग्णालयामध्ये दाखल झालेल्या ज्या रुग्णांना नैसर्गिकरित्या श्वासोच्छवास करणेस त्रास होतो अथवा अशक्य होते, त्यांना सदर व्हेंटीलेटरद्वारे कृत्रिम श्वासोच्छवास पुरविला जातो. त्यासाठी प्रौढ रुग्णांसाठी Adult Ventilator व बाल रुग्णांसाठी Pediatric Ventilator चा वापर केला जातो. तसेच सध्या कोविड-१९ या साथरोगाच्या रुग्णांना ऑक्सिजनची मोठया प्रमाणात आवश्यकता असते. त्यासाठी हायफ्लो ऑक्सिजन थेरपी करिता High Flow Nasal Oxygen व C-PAP ची सुविधा असलेले Ventilator वापरले जातात.

त्यानुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता एकूण ५० नग Ventilator ची मागणी आलेली असून सदरहू Ventilator खरेदीकामी अंदाजे रक्कम निश्चित करणेसाठी बायोमेडीकल विभागाने काही पुरवठाधारकांना ई-मेल केलेले होते. त्यानुसार त्यांनी ई-मेल अन्वये दिलेले दरपत्रकाचा तपशील खालीलप्रमाणे:-

Sr. No.	Item Description	Qty.	Rate per in Rs.	CAMC for Next 5 Years after Warranty Period	Rate per in Rs.	CAMC for Next 5 Years after Warranty Period	Machine Cost in Rs.	CAMC Price in Rs.	Total Amount of Machine.+ Warranty1 year+CAMC
1	Ventilator Adult	15	India Medtronic Pvt. Ltd.		R.S. Enterprises, Pune		Average Rate Per in Rs.		
			1120000/-	358687/-	1176000/-	619500/-	1148000/-	489093.50	24556402.00
2	Ventilator Paediatric	10	India Medtronic Pvt. Ltd.		R.S. Enterprises, Pune		Average Rate Per in Rs.		
			1120000/-	358687/-	1176000/-	619500/-	1148000/-	489093.5	16370935.00
3	High Flow Nasal Oxygen	15	Drager India Pvt. Ltd.		World Class Healthcare, Pune		Average Rate Per in Rs.		
			408606/-	168750/-	475000/-	354000/-	441803/-	261375	10547670/-
4	CPAP Machine	10	R.S. Enterprises, Pune		Resmed, New Delhi		Average Rate Per in Rs.		
			Machine cost	CAMC	Machine cost	CMC	Average Rate Per in Rs.		
			173600/-	324500/-	75000/-	24133.36	124300/-	174317/-	2986170/-
							Total Amt in Rs.		54461177.00

उपरोक्त दरपत्रकाच्या तक्त्यानुसार मशिनरी व उपकरणे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु.५,४४,६१,१७७/- (अक्षरी रक्कम रु.पाच कोटी चव्वेचाळीस लाख एकसष्ठ हजार एकशे सत्त्याहत्तर मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र.१७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. १ डिसेंबर २०१६ अन्वये परिच्छेद ३.२.३–रू. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली होती परंतु, नविन सुधारीत शासन नियमावली नुसार शासन निर्णय क्र.भांखस– २०२१/ प्र.क्र. ८/ उद्योग– ७ मे,

242/21

२०२१ अन्वये परिच्छेद ३.२.३– "दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणा-या खरेदीची आर्थिक मर्यादा रू.३ लाखावरून (रू.३,००,०००/-) रू. १० लाखापर्यंत (रू. १०,००,०००/-) व त्यापुढील खरेदीसाठी ई-निविदा पध्दतीचा अवलंब करणे अनिवार्य करण्यात येत आहे."

३) नविन Ventilator– Adult, Ventilator –Paediatric, C-PAP व High Flow Nasal Oxygen खरेदीकामी अंदाजे खर्च हा ५०,००,०००/- पेक्षा जास्त येत असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घ्यावी लागणार आहे.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-

रुग्णालयामध्ये दाखल झालेल्या ज्या रुग्णांना नैसर्गिकरित्या श्वासोच्छवास करणेस त्रास होतो अथवा अशक्य होते, त्यांना सदर व्हेंटीलेटरद्वारे कृत्रिम श्वासोच्छवास पुरविला जातो. त्यासाठी प्रौढ रुग्णांसाठी Adult Ventilator व बाल रुग्णांसाठी Pediatric Ventilator चा वापर केला जातो. तसेच सध्या कोविड-१९ या साथरोगाच्या रुग्णांना ऑक्सिजनची मोठया प्रमाणात आवश्यकता असते. त्यासाठी हायफ्लो ऑक्सिजन थेरपी करिता High Flow Nasal Oxygen व C-PAP ची सुविधा असलेले Ventilator वापरले जातात. सदरहू Ventilator खरेदी करणेकामी पुर्णांकित रक्कम रु.५,४४,६१,१७७/- (अक्षरी रक्कम रु.पाच कोटी चव्वेचाळीस लाख एकसष्ठ हजार एकशे सत्त्याहत्तर मात्र) खर्च अपेक्षीत असून याकामी येणारा खर्च रु.५० लाख मात्रपेक्षा अधीक असल्यामुळे त्यास मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद याची मान्यता घेणे आवश्यक राहील व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत येऊन खरेदी करता येईल, असे मत आहे.

तरी श्री साईबाबा व साईनाथ रूग्णालयाकरीता Ventilator– Adult, Ventilator– Paediatric, C-PAP व High Flow Nasal Oxygen विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५,४४,६१,१७७/- (अक्षरी रक्कम रु.पाच कोटी चव्वेचाळीस लाख एकसष्ठ हजार एकशे सत्त्याहत्तर मात्र) तसेच याकामी मा.औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव तदर्थ समितीच्या सभेसमोर सादर.

5/7/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्यकार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

01/07/21

विषय क्र.- e2

:मा. व्यवस्थापन समितीचे तदर्थ समितीपूढील विषय:

विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल

विषय- महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत रूग्णांच्या प्रत्यक्ष उपचारापोटी प्राथमिक मंजूरी आदेशापेक्षा विमा कंपनीकडून कमी मिळालेल्या रकमेस वैद्यकीय सवलत म्हणून नावे टाकण्यास मान्यता मिळणेबाबत..

संदर्भ- १. दि.२९/०७/२०१२ रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्रं.०३ निर्णय क्रं.६४७
२. दि.७/३/२०१८ रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्रं.६० निर्णय क्रं. १९८
३. दि.४/१२/२०१९ रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्रं.८६ निर्णय क्रं. ५६५
४. जा.नं.एसएसएसटी/एसएसबीएच/वित्त-१८ दि.७ मे २०२१ चे वित्त विभागाचे पत्र
५. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनच्या दि. २५/३/२०१५ रोजीच्या गाईडलाइन्स

प्रास्तविक- श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महाराष्ट्र शासनाची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना दि. १४ फेब्रूवारी २०१३ पासून चालू आहे. दि. १ जून २०१७ पासून राज्य शासनाने या योजनेच्या नावात बदल करून महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना असे नामकरण केलेले आहे. तसेच १ फेब्रूवारी २०२१ पासून महात्मा 'ज्योतिबा' फुले ऐवजी **महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना** असा पुन्हा नावांत बदल करण्यात आलेला आहे. रूग्णालयातून रूग्ण डिसचार्ज झाल्यानंतर ११ दिवसांनंतर प्राथमिक मंजूरी आदेशाप्रमाणे विमा कंपनीस ऑनलाइन बीले सादर करण्यात येतात. विमा कंपनीकडून सदर बीलांची रूग्णावर करण्यात आलेल्या उपचारांच्या रिपोर्टवरून व शस्त्रक्रियेच्या फोटोवरून शहानिशा करण्यात येते. तसेच बीले अदा करण्यापूर्वी योजनेच्या नियम व गाइडलाइन्सनुसार प्राथमिक मंजूर रकमेत कपात करून देय बीलाची रक्कम रूग्णालयाच्या बँक खात्यात आरटीजीएस पध्दतीने जमा करण्यात येते.

सदर योजनेच्या काही पॅकेजमध्ये प्राथमिक मंजूरी आदेशापेक्षा कमी रक्कम प्राप्त होण्याची कारणे ही संस्थान रूग्णालय व रा.गां.जी.आ.यो. किंवा महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना यांच्यात झालेल्या एमओयू व योजनेच्या गाइडलाइन्सप्रमाणे आहेत.

१. उपचार/ शस्त्रक्रियेनंतर रूग्णाची प्रकृती समाधानकारक नसल्यास नातेवाईक रूग्णास इतरत्र घेवून जातात, अशा परिस्थितीत रूग्णास डॉक्टरांच्या सल्लयाविरूदध् **(Dama)** डिसचार्ज दयावा लागतो, अशा रूग्णांच्या मंजूर पॅकेजच्या ७५% इतकीच रक्कम विमा कंपनीकडून अदा केली जाते, उर्वरीत २५% रक्कम रूग्णालय त्या रूग्णाकडून योजनेच्या नियमाप्रमाणे वसूल करू शकत नाही.
२. एखादया रूग्णाच्या शस्त्रक्रियेनंतर २४ तासांचे आंत रूग्णाचे निधन **(Death)** झाल्यास मंजूर पॅकेजच्या ७५% इतकीच रक्कम विमा कंपनीकडून अदा केली जाते.
३. ऑर्थो प्रोसिजर्समध्ये एकत्रित फ्रॅक्चर्सचे पॅकेज असते, रूग्णाचे प्रत्यक्ष ऑपरेशन करतांना किती फ्रॅक्चर्स ऑपरेट केलेले आहेत, याबाबतची खात्री करून फक्त ऑपरेट केलेल्या फ्रॅक्चर्सनूसार रक्कम विमा कंपनीकडून अदा केली जाते.
४. मेडिसिन पॅकेजअंतर्गत रूग्णालयात दाखल असणा-या उपचार करतांना योजनेच्या मंजूरीपासून डिसचार्जपर्यंतचा कालावधीच देय रकमेसाठी ग्राहय धरला जातो. म्हणून पॅकेजच्या नियमाप्रमाणे प्रतिदिवसानुसार लागू होणारी रक्कम विमा कंपनीकडून अदा केली जाते.(उदा. एखादया रूग्णासाठी मंजूर पॅकेज १५ दिवसांचे असेल, परंतू त्याला ५ दिवसांत डिसचार्ज केलेले आहे, तर त्या रूग्णाचे फक्त ५ दिवसांची रक्कम मिळते.)
५. हॉस्पिटलमध्ये रूग्णावर एकाच वेळी दोन पॅकेजअंतर्गत उपचार किंवा दोन शस्त्रक्रिया केलेल्या असतील, अशा रूग्णाच्या बीलांची रक्कम अदा करतांना पहिल्या पॅकेजची रक्कम १००% व त्यापूढील कोणत्याही दुस-या पॅकेजची रक्कम ५०% प्रमाणे विमा कंपनीकडून अदा केली जाते.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेकडे ऑनलाइन पध्दतीने सादर केलेल्या फाइलच्या दि. १४/०२/२०१३ ते दि. ३०/११/२०१७ पर्यंच्या प्राथमिक मंजूरी आदेशापेक्षा कमी प्राप्त झालेल्या रकमेस संदर्भ क्र.२ नुसार तसेच संदर्भ क्रं. ३ नुसार ०१/१२/२०१७ ते दि. ३१/०३/२०१९ पर्यंतच्या कमी आलेल्या रकमेस मा.व्यवस्थापन समितीची मंजूरी घेण्यात आलेली आहे. तरी आता संदर्भ क्र. ४ प्रमाणे दि. ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२१ अखेरपर्यंतच्या कमी आलेल्या रकमेस वैदयकीय सवलत म्हणून नावे टाकणेकरिता मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सद्यस्थिती-

परिशिष्ट- अ

कालावधी	कमी रक्कम प्राप्त झालेल्या रूग्णांची संख्या	प्राथमिक मंजूरी आदेशाप्रमाणे येणे असलेली रक्कम	विमा कंपनीकडून प्रत्यक्ष प्राप्त झालेली रक्कम	प्रत्यक्षात वसूल झालेली रक्कम	एकूण कमी आलेली रक्कम
०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२१	२६	२२,८२,०३१	१६,३७,३००	१३,६१५	६,३१,११६

सोबत Annexure-A जोडलेले आहे.

विभागाचा अभिप्राय –

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेकडे (महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना) त्यांचेसोबत संस्थान रूग्णालयाने केलेल्या एमओयू व गाइडलाइन्सनुसार रूग्णालयास कमी प्राप्त झालेली रक्कम ही विमा कंपनीने गाइडलाइन्समध्ये नमूद केल्याप्रमाणे कपात केलेली आहे. त्यामूळे विमा कंपनीकडून यापूढे ही रक्कम प्राप्त होणार नसल्याने लेखापरिक्षणाच्या दृष्टीने सदरची रक्कम संस्थान वैदयकीय सवलत म्हणून नावे टाकण्यास मा. व्यवस्थापन समितीची मंजूरी घ्यावी लागणार आहे, असे नम्र मत आहे.

मागणी-

वित्त विभागाच्या संदर्भ क्र.४ च्या पत्राप्रमाणे दि.०१/०४/२०१९ ते दि. ३१/०३/२०२१ पर्यंतच्या कालावधीतील २६ रूग्णांच्या कमी प्राप्त झालेल्या रू. ६,३१,११६/- रकमेस परिशिष्ट- अ प्रमाणे वित्त विभागामार्फत वैदयकीय सवलत म्हणून नावे टाकण्यास मंजूरी मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती तथा तदर्थ सभेपूढे निर्णयार्थ सादर.

10/7/21

(कान्हूराज बगाटे भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

ARP No. 246
Dated. 14/7/21

विषय क्र.- ८३

मा तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोरील विषय
विभागाचे नाव - श्री साईबाबा हॉस्पिटल

विषय - दि.१५/०५/२०२१ रोजीचे मुलाखतीद्वारे वैद्यकीय संचालक पदासाठी निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांस नेमणूक देणेबाबत . . .

टिपणी -

प्रस्तावना -

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक रिक्त पदे भरणेबाबतचा मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर चक्रीय पध्दतीने अनुक्रमे दि.२९/०१/२०२१, दि.२३/०२/२०२१ व दि.१३/०३/२०२१ रोजी सादर केलेल्या प्रस्तावावर अनुक्रमे दि.०१/०२/२०२१, दि.०१/०३/२०२१ व दि.२३/०३/२०२१ निर्णय झालेले आहेत. सदर निर्णयास अनुसरून दि.०६/०४/२०२१ रोजी वर्तमानपत्रामध्ये व संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करून १० दिवसाचे आत अर्ज करणेसाठी कालावधी दिला होता. तसेच, उपरोक्त संदर्भीय मा तदर्थ (Ad-hoc) समितीचे झालेले निर्णयानुसार मा मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथील सिव्हील ॲप्लीकेशन नं.४६८४/२०२१ वरील दि.२०/०४/२०२१ रोजी खालीलप्रमाणे मंजुरी आदेश दिला आहे.

The Sansthan is permitted to appoint qualified doctors on contract basis as per circulatory resolution dated 23.02.2021 for eleven (11) months. The said task be performed immediately on priority basis.

सिव्हील ॲप्लीकेशनमधील आदेशास अनुसरून उमेदवारांना दि. २७/०४/२०२१ रोजी मुलाखतीसाठी हजर राहणेबाबत दुरध्वनीद्वारे, ई-मेल द्वारे कळविले होते. सदर जाहीरातीस अनुसरून प्राप्त अर्जदारांच्या दि.२७/०४/२०२१ रोजी निवड समितीसमोर मुलाखती घेऊन निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांना दि.२९/०७/२०२१ रोजी नेमणूक आदेश दिले आहेत.

सदर पदांपैकी रिक्त राहीलेल्या तज्ञ वैद्यकीय अधिकारी, आरएमओ, सीएमओ इ. पदांची २९/०४/२०२१ रोजीचे मंजुर टिपणीस अनुसरून दि.०१/०५/२०२१ रोजी वर्तमानपत्रामध्ये व संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करणेत आली होती. सदर जाहीरातीमध्ये ७ दिवसाचे आत अर्ज करणेसाठी कालावधी दिला होता. सदर जाहीरातीस अनुसरून प्राप्त अर्जदारांच्या दि.१५/०५/२०२१ रोजी निवड समितीसमोर मुलाखतीसाठी बोलविणेत आले होते.

तसेच वैद्यकीय संचालक, निवासी वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक, वैद्यकीय प्रशासक व इतर पदांकरीता सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्याने गर्दी टाळणेकरीता त्यांच्या मुलाखती दुस-या टप्प्यात घेणेचे ठरले. सदर वैद्यकीय संचालक, उपवैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय प्रशासक या पदाकरीता प्राप्त अर्जदार उमेदवारांनाही दि.१५/०५/२०२१ रोजी मुलाखतीकरीता बोलविणेत आले होते.

अ.नं.	पदाचे नाव	जाहीरात केलेली पद संख्या
SAIBABA HOSPITAL		
१	Medical Director	१
२	Resident Dy Medical Director	१
३	Medical Administrator	१

अ.नं.	पदाचे नाव	जाहीरात केलेली पद संख्या
४	Neurologist	२
५	Gastroenterologist	१
६	Junior Radiologist	२
७	Casualty Medical Officer	६
८	R M O	५
	SAINATH HOSPITAL	
१	Medical Superintendent	१
२	Medical Officer (Physician)	१
३	Chief Blood Transfusion Officer	१
४	Medical Officer (Ophthalmologist)	१
५	Blood Transfusion Officer	१
६	Medical Officer (Sonologist)	१
७	Junior Anesthesiologists	१
८	Casualty Medical Officer (CMO)	१
९	Resident Medical Officer (RMO)	३

उपरोक्त पदांकरीता मुलाखती निवड समिती १) मा. श्री कान्हूराज बगाटे, मुख्य कार्यकारी अधिकारी, (भा.प्र.से.) २) मा. श्री भानुदास पालवे साहेब, सदस्य, तदर्थ समिती तथा अप्पर आयुक्त नाशिक विभाग, नाशिक (ऑनलाईन झुम मिटींगद्वारे उपस्थित) ३) डॉ गोकुळ घोगरे, जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे प्रतिनिधी ४) डॉ प्रितम वडगावे, प्र वैद्यकीय संचालक ५) डॉ मैथिली पितांबरे, प्र वैद्यकीय अधिक्षिका यांचे समितीसमोर दि.१५/०५/२०२१ रोजी मुलाखती घेणेत आल्या.

वैद्यकीय संचालक या पदाची पात्रता व मानधन खालीलप्रमाणे आहे.

Required Qualification	Fixed Honorarium Per month
1) Age not more than 45 yrs, age relaxation of 5yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience. 2) MBBS, MD/ MS from recognized university. 3) DHA / MHA / M Phil in Hospital Administration from recognized university will be preferred 4) MS-CIT 5) MMC / MCI registration with renewal is mandatory 6) Experience of Hospital Administration as Medical Director / Dy Medical Director/ Medical Administrator/ Medical Superintendent/civil surgeon in minimum 300 bedded hospital for 7 years. 7) Age limit will be relaxed for persons who is ex-employee of Govt/ Semi. Govt. experience. 8) Preference will be given to the candidates who have exceptional qualification or experience or both.	105100 + Incentive as per Sansthan rule

वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा रूग्णालय या पदाकरीता ६ उमेदवारांना मुलाखतीकरीता बोलविणेत आले होते यापैकी ०१ उमेदवार गैरहजर असल्याने उर्वरित ५ उमेदवारांच्या मुलाखती घेणेत आल्या. त्यापैकी.

अ नं १ चे उमेदवार डॉ योगेश कांतीलाल शिंदे यांची मुळ शैक्षणिक पात्रता बी.ए.एम.एस. असुन वैद्यकीय संचालक या पदाकरीता आवश्यक असलेली मुळ शैक्षणिक पात्रता नसल्याने या पदावर नेमणूकीकरीता निवड करणेत आली नाही.

अ.नं.२ डॉ योगेश बाळकृष्ण गेठे हे सध्या संस्थानचे रूग्णालयात ई.एन.टी सर्जन या पदावर स्थायी पध्दतीने कार्यरत असुन त्यांनी वैद्यकीय संचालक या पदावर स्थायी स्वरूपात नेमणूक देणेत येत असल्यास काम करणेची ईच्छा दर्शविली असुन ११ महिने कालावधीकरीता काम करणेस तयार नसलेचे मुलाखतीमध्ये सांगितले. त्यामुळे त्यांचा या पदावर नेमणूकीकरीता निवड करणेत आली नाही.

अ.नं. ३ श्री चेतन बापुराव नागपुरे हे मुलाखतीकरीता गैरहजर होते. तसेच त्यांची शैक्षणिक पात्रता बी.ई. एम.बी.ए. असल्याने या पदाकरीता आवश्यक असलेली मुळ शैक्षणिक पात्रता नसल्याने पदावर नेमणूकीकरीता निवड करणेत आली नाही.

अ.नं. ४ डॉ संध्या सतिष खडसे यांचेकडे आवश्यक पात्रता आहे. परंतु त्यांचे वय ६२ वर्ष आहे. परंतु त्यांचे अनुभव व पात्रता विचारात घेता त्यांची या पदाकरीता मा तदर्थ समितीच्या मंजुरीस अधीन राहुन निवड करणेत आली.

अ.नं. ५ डॉ संभाजी डांगे यांचेकडे आवश्यक पात्रता आहे. परंतु त्यांचे वय ६१ वर्ष आहे. त्यांची या पदावर नेमणूकीकरीता विचार करणेत आला नाही.

अ.नं. ६ डॉ दिपक नाईकवाडे यांचेकडे आवश्यक पात्रता आहे. परंतु त्यांचे वय ६२ वर्ष आहे. त्यांची या पदावर नेमणूकीकरीता निवड करणेत आली नाही.

उपरोक्त अ.नं. ४ डॉ संध्या सतिष खडसे यांची निवड समितीने मा तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेस अधिन राहुन वैद्यकीय संचालक या पदावर नेमणूकीसाठी शिफारस केलेली आहे. त्यांची जन्मतारीख दि.०४/०१/१९५९ असुन वय ६२ वर्षे आहे.

डॉ संध्या सतिष खडसे यांची पात्रता व अनुभव खालीलप्रमाणे आहे.

पात्रता - एम बी बी एस, एम डी (बालरोग), एफ आय ए पी (फेलोशिप)

अनुभव –

अ नं	पदाचे नाव	संस्थेचे नाव	कालावधी
१	असिस्टंट प्रोफेसर (बालरोग)	श्री व्हीएनजीसी यवतमाळ	दि.०३/०६/१९९३ ते १८/०२/१९९९ (५ वर्ष ८ महिने)
२	असोसिएट प्रोफेसर (बालरोग)	श्री व्हीएनजीसी यवतमाळ	दि.१९/०२/१९९९ ते २९/१०/२००३ (४ वर्ष २ महिने)
३	प्रोफेसर पेडीयाट्रीक्स व बालरोग विभाग प्रमुख	ग्रॅन्ड मेडीकल कॉलेज मुंबई	दि.३०/१०/२००३ ते १२/०५/२०१७ (१३ वर्ष ६ महिने)
४	अधिष्ठाता	आरजीएमसी,ठाणे महानगरपालीका	दि.३०/०५/२०१७ ते ०८/०१/२०२० (२ वर्ष ७ महिने)
५	प्रो व्हाईस चान्सलर	निम्स युनिर्व्हर्सिटी जयपुर	दि.१५/०१/२०२० ते ११/११/२०२० (९ महिने)

रिक्त पदे भरणेकामी प्रसिध्द केलेल्या जाहीरातीमध्ये वैद्यकीय संचालक या पदासाठी वयोमर्यादा ४५ वर्षे बी.जे. मेडीकल डीन यांनी तयार करून दिलेप्रमाणे जाहीरातीत नमुद केले आहे. तसेच कोणत्याही पदासाठी उमेदवार कमी असतील व अनुभव जाहिरातीत नमुद केलेप्रमाणे नसल्यास सदर पदासाठी उपस्थित उमेदवारांकरीता निकष व अनुभव शिथील करण्यात येवुन त्याखालील वेतनश्रेणी / ग्रेड पे (एकत्रित वेतन) देणेत येईल बी.जे. मेडीकल डीन यांनी तयार करून दिलेप्रमाणे जाहीरातीत नमुद केले आहे. तसेच

मा व्यवस्थापन समितीचे दि. ०४ मे १९९१ रोजीचे सभेतील निर्णय क्र ०३ नुसार मंजूर करणेत आलेले संस्थान नोकरांचे सेवानियम जा.नं.एसएसएस/वशी१/९४१९/ १९९१ दि. ०६/०९/१९९१ चे आदेशान्वये अंमलात आणणेत आलेले आहेत. या इंग्रजी भाषेतील सेवानियमात कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीविषयी खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"Clause No.07:

AGE OF RETIRMENT : The Age of retirement at superannuation of the employee shall be 60 years".

वरील सेवानियमानुसार, कर्मचा-यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे निश्चिती केलेले आहे.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाने दि.३१ मे २०२१ रोजी शासननिर्णय पारीत केला असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

प्रस्तावना -

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून सामान्य रूग्णालये, उपजिल्हा रूग्णालये, ग्रामीण रूग्णालये राज्य कामगार विमा रूग्णालये यामधून रूग्णांना आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात. तथापि, सदर रूग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व वरिष्ठ अधिका-यांच्या कमतरतेमुळे रूग्णांना वेळेत योग्य आरोग्य सुविधा पुरविण्यात अडचणी निर्माण होत आहेत. वैद्यकीय अधिकारी तसेच विशेषज्ञ पदासाठी प्रयत्न करून देखील पुरेशा प्रमाणात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होत नाहीत वा उपलब्ध झाल्यासही पसंतीच्या ठिकाणी पदस्थापना न मिळाल्यास सेवेत रूजू न होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. परिणामी आरोग्य सेवेतील पदे मोठ्या प्रमाणात रिक्त राहत असून त्याचा राज्यातील रूग्णसेवेवर विपरित परिणाम होत आहे. त्याअनुषंगाने शासन निर्णय दि. २९.०८.२०१८ अन्वये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी व राज्य कामगार विमा योजनेंतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट अ मधील वैद्यकीय अधिकारी व वरिष्ठ पदावरील अधिका-यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरून ६० वर्षापर्यंत वाढविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सदर निर्णय दि.३१/०५/२०१८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने पाच वर्षासाठी (दि.३१/०५/२०२३ पर्यंत) लागू करण्यात आला आहे.

२. तसेच, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ व राज्य कामगार विमा योजनेतील महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी तसेच जिल्हा शल्यचिकित्सक, विशेषज्ञ संवर्गातील जे थेट रूग्णसेवा देतात अशा अधिका-यांचे सेवानिवृत्तीचे वय दि.३१/०५/२०१९ पासून पूर्वलक्षी प्रभावाने दोन वर्षासाठी (दि.३१/०५/२०२१ पर्यंत) ६० वरून ६२ वर्षापर्यंत वाढविण्याबाबतचा निर्णय दि.०१/०७/२०१९ च्या शासन निर्णयान्वये व दि.२६/११/२०१९ च्या शुध्दीपत्रकान्वये मा मंत्रीमंडळाच्या मान्यतेच्या अधीन राहून घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयाची मुदत दि.३१/०५/२०२१ रोजी संपुष्टात येत आहे.

३. सध्या राज्यात कोरोना साथरोग संसर्गाचा प्रादुर्भाव वेगाने वाढत असून, त्याच बरोबर नजीकच्या कालावधीत तिसरी लाट येणार असण्याची शक्यता आहे. यास्तव त्यावर नियंत्रण मिळविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी तसेच वरिष्ठ अधिका-यांची विभागास नितांत आवश्यकता आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील विविध संवर्गातील १९३ अधिकारी दि.३१/०५/२०२१ अखेर सेवानिवृत्त होत आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात एकाच वेळी अधिकारी सेवानिवृत्त होत असल्याने, आरोग्य सेवेवर होणारा परिणाम व कोव्हिड – १९ चा वाढता प्रदुर्भाव विचारात घेता, आरोग्य सेवा आयुक्तालयातंर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी (वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस-२०: ५६१००-१७७५००) व वरीष्ठ पदावरील (वेतन मॅट्रीक्स मधील वेतनस्तर एस-२३: ६७७००-२०८७०० व त्यावरील) अधिकारी तसेच राज्य कामगार विमा योजनेतील महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ (वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस-२०: ५६१००-१७७५००) व वरिष्ठ पदावरील अधिका-यांचे <u>सेवानिवृत्तीचे वय कोव्हिड - १९ च्या पार्श्वभूमीवर वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.</u>

शासन निर्णय :-

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवा आयुक्तालयातंर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी (वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस - २०: ५६१००-१७७५००) व वरिष्ठ पदावरील (वेतन मॅट्रीक्स मधील वेतनस्तर एस - २३: ६७७००-२०८७०० व त्यावरील) सर्व अधिकारी तसेच राज्य कामगार विमा योजनेतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट - अ (वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस - २०: ५६१००-१७७५००) व वरिष्ठ पदावरील सर्व कार्यरत अधिकारी यांचे सेवानिवृत्तीचे वय एक वर्षासाठी ६२ वर्षांपर्यंत वाढविण्यात येत आहे. सदर शासन निर्णय हा दि.३१/०५/२०२१ पासून दि.३१/०५/२०२२ पर्यंत अंमलात राहील.

२. सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाची कार्योत्तर मान्यता मिळण्याच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय-

कोव्हीड १९ चे पार्श्वभुमीवर डॉक्टरांची संख्याच कमी असल्याने वैद्यकीय संचालक या पदावर उमेदवार उपलब्ध होत नाहीत म्हणून शासनाने दि.३१/०५/२०२१ रोजीचे शासननिर्णयाद्वारे सेवानिवृत्तीचे वय वाढविण्याचा निर्णय घेतलेला आहे. म्हणजे ६२ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीचे वय वाढविणेचे धर्तीवर एक वर्षाकरीता अनुभवी व्यक्तीस संधी देण्याचा विचार करता येईल असे मत आहे.

डॉ संध्या सतिष खडसे यांची निवड समितीने वैद्यकीय संचालक या पदावर नेमणूकीसाठी शिफारस केली असल्याने डॉ खडसे यांची वैद्यकीय संचालक या पदावर दि.३१/०५/२०२१ रोजीचे शासननिर्णयाचे धर्तीवर एक वर्ष कालावधीकरीता नेमणूक करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

19/7/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

19/7/21

विषय क्र.- ९४

मा. तदर्थ (Ad.Hoc) समितीचे सभेपुढील विषय,

विभागः- श्री साईनाथ (धर्मादाय) रुग्णालय, शिर्डी (वैद्यकिय आर्थिक अनुदान विभाग)

टिपणी-

विषयः – दि. ०१ एप्रिल २०२० ते दि.३१ मार्च २०२१ अखेर / कालावधीत वाटप करणेत आलेली अनुदान रक्कम व रुग्ण संख्या यांची नोंद घेणेबाबत...

मान्यतेस्तव सविनय सादर,

अधिनिय २००४ मधील तरतुद :- कलम १७ (१) व १७ (२) (ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रः- १) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४/०७/२०११ विषय नं.१४, निर्णय क्र.५८१.

२) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९/१२/२०२०विषयनं.१२, निर्णय क्र.५४७.

प्रास्तविक :-

उपरोक्त विषयाकिंत संदर्भान्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी. यांचे मार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय,उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात येते. त्यासाठी संस्थानने मा.व्यवस्थापन समितीचे सभा दि.२४/०७/२०११ विषय नं.१४, निर्णय क्र.५८१.अन्वये, स्वतंत्र नियमावली तयार केलेली होती. यास शासन निर्णय क्र.सासंवि-२००५/३७६/(७६)-का सोळा,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई. दि.५ मे २००६.अन्वये शासन मान्यता होती.

आता शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/१६१४/प्र.क्र.२०९/का.१६ मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२, दि.२२ ऑगस्ट, २०१९ व शासन शुध्दिपत्रक क्र.सासंवि-१०१८/१६१४/प्र.क्र.२०९/का.१६ मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२, दि.०१ फेब्रुवारी, २०२०. अन्वये सुधारीत नियमावलीस मान्यता मिळालेली असुन मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९/१२/२०२० विषय नं.१२, निर्णय क्र.५४७.अन्वये, दि.२९/०१/२०२१ पासुन सुधारीत नियमावली लागु करणेत आलेली आहे.

नियमावली :-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदान हे केवळ, भारतातील सरकारी जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी खर्चाच्या १५% अगर रुपये २५,०००/- पैकी जी कमी पुर्णाकिंत रक्कम असेल तेवढी रक्कम, पॅनलवरील ८१ रुग्णालयांना रुग्णाचे नावे प्रचलित नियमावलीतील खालील आठ आजारांकरीता देण्यात येत होते.

१) हृदयशस्त्रक्रिया व नंतरचे उपचार

२) किडनी डायलेसिस, प्रत्यारोपन व नंतरचे उपचार

३) मेंदुची शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार

४) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार

५) रक्तासंबधीचे आजार (उदा.हिमोफेलिया)

६) जी.बी.एस.(Guillain Barre Syndrome)

७) मणका शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार

८) कॉक्लीअर इंम्प्लांट

आता दि.२९/०१/२०२१ पासुन सुधारीत नियमावली लागु करणेत आलेली असुन, वैद्यकीय आर्थिक अनुदान हे केवळ, भारतातील सरकारी जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी खर्चाच्या २५% अगर रुपये ५०,०००/- पैकी जी कमी पुर्णाकिंत रक्कम असेल तेवढी रक्कम, पॅनलवरील ८१ रुग्णालयांना रुग्णाचे नावे सुधारीत नियमावलीतील पुढिल पाच आजारांकरीता देण्यात येते.

१) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार

२) रक्तासंबंधी आजार

३) जी.बी.एस (Gullian Barre Sundrome)

४) कॉक्लीअर इंम्प्लांट

५) सर्व प्रकारच्या ट्रान्सप्लॅन्ट (Transplant), शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार

पान.क्र.२ वर

(पान.क्र.२...)

त्यास अनुसरुन दि.१ एप्रिल-२०२० ते दि.३१ मार्च २०२१ अखेर/कालावधीत मासिक दिलेले वैद्यकिय आर्थिक अनुदान लाभार्थी रुग्ण संख्या व रक्कम खालील प्रमाणे आहे.

अं.नं.	महिना	लाभार्थी रुग्ण संख्या	अनुदान वाटप रक्कम	मंजुर बजेट
१	०१ एप्रिल -२०२०	०१	२५,०००/-	७,००,००,०००/-
२	मे -२०२०	०३	७५,०००/-	
३	जुन – २०२०	०५	१,२५,०००/-	
४	जुलै -२०२०	१०	२,३०,०००/-	
५	ऑगस्ट -२०२०	१३	३,०७,५००/-	
६	सप्टेंबर -२०२०	१२	२,८२,५००/-	
७	ऑक्टोंबर -२०२०	२१	५,०७,१६८/-	
८	नोव्हेंबर -२०२०	१७	४,०६,५००/-	
९	डिसेंबर -२०२०	२९	७,०२,५००/-	
१०	जानेवारी -२०२१	३६	८,९०,७५०/-	
११	फेब्रुवारी -२०२१	०१ (विशेष बाब)	२५,०००/-	
१२	३१ मार्च -२०२१	११	५,५०,०००/-	
एकुण		१५९	४१,२६,९१८/-	

दि.१ एप्रिल२०२० ते दि.३१ मार्च २०२१ अखेर १५९ रुग्णांना रक्कम रु.४१,२६,९१८/- वैद्यकिय आर्थिक अनुदान देणेत आलेले आहे.त्याबाबतचा रुग्णालयनिहाय तपशिल खालीलप्रमाणे.

अ.क्र.	रुग्णालयाचे नाव	रुग्ण संख्या	अनुदान रक्कम (रुपये)
०१)	आनंदऋषीजी हॉस्पिटल अॅन्ड हार्टकेअर सेंटर,अहमदनगर.	०१	२५,०००/-
०२)	अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित, सोलापूर.	०२	३४,०००/-
०३)	बालाजी हॉस्पीटल अॅण्ड डायग्नोस्टिक सेंटर, मुंबई.	०५	१,२५,०००/-
०४)	बॉम्बे हॉस्पीटल अॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर, मुंबई.	०२	५०,०००/-
०५)	कार्डिनल ग्रेसिएस मेमोरिअल ट्रस्ट , वसई.	०१	२५,०००/-
०६)	डिन बी वाय एल नायर चॅरिटेबल हॉस्पिटल, मुंबई.	०१	२५,०००/-
०७)	डॉ.हेडगेवार रुग्णालय, औरंगाबाद.	०३	७५,०००/-
०८)	हॉली स्पिरीट हॉस्पिटल, मुंबई.	०२	५०,०००/-
०९)	जसलोक हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटर, मुंबई .	०२	७५,०००/-
१०)	जहॉगीर हॉस्पिटल , पुणे.	१३	३,२२,५००/-
११)	के एल ई एस हॉस्पिटल अॅन्ड मेडिकल रिसर्च सेंटर, बेळगांव, कर्नाटक.	०१	२५,०००/-
१२)	कमलनयन बजाज हॉस्पिटल, औरंगाबाद.	०१	२५,०००/-
१३)	किंग एडवर्ड मेमोरिअल हॉस्पिटल (के ई एम), पुणे.	२३	६,२५,०००/-
१४)	कोंकण मित्र मंडळ मेडिकल ट्रस्ट, सह्याद्री स्पेशालीटी हॉस्पिटल, पुणे.	१५	४,४९,६६८/-
१५)	कृष्णा हॉस्पिटल अॅन्ड मेडिकल रिसर्च सेंटर, कराड.	०२	४७,५००/-
१६)	महात्मा गांधी मिशन मेडिकल सेंटर अॅन्ड रिसर्च इन्स्टिट्युट, औरंगाबाद.	२३	६,७५,०००/-
१७)	मुलजीभाई पटेल युरोलॉजिकल हॉस्पिटल, नदियाड, गुजरात.	२१	५,१५,०००/-
१८)	नामको चॅरिटेबल ट्रस्ट कॅन्सर हॉस्पिटल, नाशिक.	०१	२५,०००/-
१९)	नर्गिस दत्त मेमोरिअल कॅन्सर हॉस्पिटल, बार्शी.	०४	१,५०,०००/-
२०)	पी डी हिंदुजा नॅशनल हॉस्पिटल अॅन्ड मेडिकल रिसर्च सेंटर, मुंबई.	०२	५०,०००/-
२१)	पुणा हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटर पुणे.	०२	५०,०००/-
२२)	आर टी भोईटे स्मृती आरोग्य प्रतिष्ठाण गिरीराज हॉस्पिटल, पुणे .	०२	५०,०००/-
२३)	शेठ नंदलाल धुत हॉस्पिटल, औरंगाबाद.	०१	२५,०००/-
२४)	श्री सिध्देश्वर कॅन्सर हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटर, सोलापूर.	०८	१,८०,०००/-
२५)	श्री मार्कण्डेय सोलापूर सहकारी रुग्णालय, सोलापूर.	१६	३,१३,२५०/-
२६)	श्री सिध्दीविनायक गणपती कॅन्सर हॉस्पिटल, मिरज.	०३	६५,०००/-
२७)	टाटा मेमोरिअल हॉस्पिटल, मुंबई.	०१	२५,०००/-
२८)	मिडे पॉईंट हॉस्पिटल प्रा.लि. पुणे. (विशेष बाब)	०१	२५,०००/-
	एकुण	१५९	४१,२६,९१८/-

पान.क्र.३ वर

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९/१२/२०२० विषय नं.१३, निर्णय क्र.५४८. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री प्रकाश आनंदराव गायकवाड यांना कॅन्सर आजार असुन तो संस्थान नियमावलीत मान्यता प्राप्त आजार आहे.मात्र उपचार घेत असलेले रुग्णालय मान्यताप्राप्त यादीतील नाही.मात्र आजार मान्यताप्राप्त यादीत असल्याने एक विशेष बाब म्हणुन संस्थानमार्फत आर्थिक अनुदान रक्कम रु.२५,०००/- मात्र उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.तसेच या निर्णयाचा संदर्भ इतर अशा प्रकारच्या प्रकरणांना लागु करण्यात येऊ नये, असे ठरले. या निर्णयान्वये प्रकाश आनंदराव गायकवाड उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे प्रशासकीय मान्येतेने वित्त विभागामार्फत रक्कम रु.२५,०००/- मात्र आरटीजीएस द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

तसेच **आर्थिक वर्ष दि.०१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ अखेर** रुग्णाने रुग्णालय बदलल्याने / रुग्ण उपचारासाठी दाखल न झाल्याने / शस्त्रक्रिया रद्द झाल्याने / रुग्ण मयत झाल्याने / जीवनदायी अंतर्गत उपचार पुर्ण झाल्याने / काही रक्कम उपचारासाठी वापरुन **उर्वरीत ९० रुग्णांची रक्कम रु.१५,०१,३७०/- मात्र संस्थानखाती जमा झालेली आहे.**

उपरोक्त तक्त्यात नमुद रुग्णालयाचे नावे आर्थिक वर्ष दि.०१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ अखेर १५८ रुग्णांसाठी रक्कम रु.४१,०१,९१८/- व विशेष बाब म्हणुन ०१ रुग्णास रक्कम रु.२५,०००/- असे एकुण **१५९ रुग्णांना रुक्कम रु.४१,२६,९१८/-मात्र** वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात आलेले आहे.

प्रस्ताव:-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे मार्फत दि.०१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ अखेर गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय, उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे, देण्यात आलेल्या,वैद्यकीय आर्थिक अनुदानाच्या रक्कमेची, रुग्णांची परत आलेल्या रक्कमेची व विशेष बाब म्हणुन उपलब्ध करुन देण्यात आलेल्या रक्कमेची नोंद घेणेचा प्रस्ताव, **मा. तदर्थ (Ad Hoc) समितीचे** सभेसमोर निर्णयार्थ सादर .

22/06/21

काकुराज बगाटे (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

मिटिंग विषय फाईल -१६७-१६९

SSHMEETING - 22/-2021

विषय क्र.- ८५

मा. तदर्थ (Ad.Hoc) समितीचे सभेपुढील विषय,

विभाग:- श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी (वैद्यकिय आर्थिक अनुदान विभाग)

टिपणी-

विषय:- एम.आय.टी.हॉस्पिटल (धर्मादाय) ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद या रुग्णालयाचा संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेचे यादीत समावेश करणेबाबत...

मान्यतेस्तव सविनय सादर,

अधिनियम २००४ मधील तरतुद :- कलम १७ (१) व १७ (२) (ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:- दि.१९/१२/२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील विषय नं.१२ निर्णय क्र.५४७.

प्रास्तविक :-

उपरोक्त विषयी, श्री साईबाबा संस्थानने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी स्वतंत्र नियमावली तयार केलेली असुन, यास महाराष्ट्र शासनाची मान्यता आहे. श्री साईबाबा संस्थान यांचेमार्फत नियम क्र.३ अनुदान हे केवळ भारतातील सरकारी जिल्हा परिषद वा महानगरपालिका रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) अथवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी देण्यात येईल. परंतु अशा रुग्णालयाची नोंद संस्थानच्या अनुदान यादीत असणे आवश्यक असते.

उपरोक्त विषयी ग्रामौद्योगीक शिक्षण मंडळ (जी.एस.मंडळ) यांचे एम.आय.टी.हॉस्पिटल (धर्मादाय) ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद यांनी संदर्भ क्र.१ चे अर्जान्वये, एम.आय.टी.हॉस्पिटल (धर्मादाय) ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद या रुग्णालयाचा समावेश श्री साईबाबा संस्थानच्या वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेचे रुग्णालयाच्या यादीत करणेस विनंती केलेली होती. याबाबत सदर रुग्णालयास जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/२४०७/२०२०, दि.०७/०३/२०२० चे पत्रान्वये, रुग्णालयाचा समावेश श्री साईबाबा संस्थानच्या वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्याचे यादीत करावयाचा झाल्यास संस्थान नियमावलीप्रमाणे, खालील कागदपत्रे सादर करणेस कळविण्यात आले होते.

१) मा.धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालयात रजिस्टर ट्रस्ट असल्याबाबत नोंदणी प्रमाणपत्रची झेरॉक्स प्रत.

२) ट्रस्ट नियमावली. (Trust Byelaws)

३) आयकर ८० जी, १२ ए प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत.

४) मागील तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट.

५) रुग्णालयात कोणकोणत्या आजारावरील शस्त्रक्रिया / उपचार केले जातात याबाबतची माहिती. (दरपत्रकासह) .

६) रुग्णालय हे धर्मदाय असलेबाबतचे हमी पत्र. (रुग्णालयाचे लेटरहेडवर नोंदणी क्रमांकासह.)

७) रुग्णालयास शासनाचे महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेची मान्यता आहे किंवा कसे ? याबाबत रुग्णालय प्रमुखाचे प्रमाणपत्र.

८) रुग्णालय हे धर्मदाय संस्थेच्या स्वमालकीचे आहे किंवा करारावर अथवा भाडेतत्वावर चालविणेस घेतलेले आहे.

विभागाचा अभिप्राय-

प्रास्तविकात नमुद केलेप्रमाणे कागदपत्रांची मागणी इकडील कार्यालयाकडुन करणेत आली होती त्यास अनुसरुन एम.आय.टी.हॉस्पिटल (धर्मादाय) ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद यांनी दि.१५/०७/२०२० रोजीचे पत्रान्वये, खालील कागदपत्रे सादर केलेली आहे.

अ.क्र	सुधारीत नियमावलीप्रमाणे रुग्णालयाने सादर करावयाची कागदपत्रे	नियमावलीप्रमाणे सादर केलेली आहे किंवा नाही.
१)	मा. धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालयात रजिस्टर ट्रस्ट असल्याबाबत नोंदणी प्रमाणपत्रची झेरॉक्स प्रत.	मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम -१९५० या अन्वये औरंगाबाद प्रदेश औरंगाबाद येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात नोंद केलेली आहे. १) विश्वस्त व्यवस्थेचे नाव – ग्रामौद्योगिक शिक्षण मंडळ, वैजापुर, ता.वैजापुर, जि.औरंगाबाद. २) सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्र. एफ- ४२९, (औरंगाबाद) श्री आनंदराव भगवंतराव देशमुख यांचे नावे दि.१३/०३/ १९७६ रोजी दिले.

(पान क्र.२ वर)

(पान क्र २...)

अ.क्र	सुधारीत नियमावलीप्रमाणे रुग्णालयाने सादर करावयाची कागदपत्रे	नियमावलीप्रमाणे सादर केलेली आहे किंवा नाही.
२)	ट्रस्ट नियमावली. (Trust Byelaws)	ट्रस्ट नियमावलीमध्ये संस्थेचे नाव, संस्थेचे नोंदणी कार्यालय, संस्थेची उद्दिष्टे कार्यक्षेत्र, ट्रस्ट नियम व अटी, कार्यकारी मंडळ, संस्थेचे हिशेबी वर्ष, सभासद व त्यांची वर्गणी ,सभासद नोंदणी रजिस्टर व त्यांची पात्रता, त्यांची निवडणुक, त्यांचे पदाधिकारी, बॅकेचे खाते, मालमत्तेची मालकी, विश्वस्त निधी, संस्थेची सर्वसाधारण सभा, संस्थेची नियमावली, उद्दिष्टे यांत करावयाचे बदल, सोसा.प्रमुखाचे अधिकार, संस्थेचे वर्गीकरण व इतर अनुशांगीक माहीती या सर्वाचा उल्लेख केलेला आहे.
३)	आयकर ८० जी, १२ ए प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत.	ABD/CIT/TECH/80G/GSM/98/12/2010-11 NAME AND ADDRESS – GRAMAUDYOGIK SHIKSHAN MANDAL, MIT, COMPLEX, BEED BYPASS ROAD, SATARA ROAD, AURANGABAD, PAN NO.- AAATG 2943 C CERTIFICATE SECTION 80 G OF THE I.T.ACT 1961. REGISTRATION U/S 12A OF THE INCOME TAX ACT - 1961 Date – 01/04/2001.
४)	मागील तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट.	सन २०१६-२०१७, २०१७-२०१८, २०१८-२०१९ या तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट सादर केलेले आहेत.
५)	रुग्णालयात कोणकोणत्या आजारावरील शस्त्रक्रिया / उपचार केले जातात याबाबतची माहिती. (दरपत्रकासह).	एम आय टी रुग्णालयामध्ये ई एन टी , सर्जिकल गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजी, गायनीक, ओगी, आर्थोपेडीक, जॉईन्ट रिप्लेसमेंट, न्युरोलॉजी, ऑप्थलमोलॉजी, कार्डीओलॉजी ॲन्ड कार्डीयाक सर्जरी, नॉन सर्जिकल प्रोसेजर, कॅन्सर प्रोसेजेस, तसेच इतर डे केअर, मायनर इंटर्मिडेट, मेजर-सुप्रा मेजर, हाय एन्ड सर्जरी, यावर शस्त्रक्रिया / उपचार केले जातात तसेच असिस्टंट सर्जन, ॲनस्थेटिस्ट चार्जस, शस्त्रक्रिया खर्च असे कागदपत्रावरुन दिसुन येते.
६)	रुग्णालय हे धर्मदाय असलेबाबतचे हमी पत्र. (रुग्णालयाचे लेटरहेडवर नोंदणी क्रमांकासह.)	एम आय टी रुग्णालय हे ग्रामौद्योगीक शिक्षण मंडळ (जी.एस.मंडळ) यांचे असुन, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम -१९५० या अन्वये औरंगाबाद प्रदेश औरंगाबाद येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात नोंद केलेली आहे. नोंदणी क्रमांक . अेजीडी- २/७६ आहे. सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्र. एफ- ४२९, (औरंगाबाद) श्री आनंदराव भगवंतराव देशमुख यांचे नावे दि.१३/०३/ १९७६ रोजी दिले असे दिसुन येते. सोबत विश्वस्त यादी दिलेली नसुन, फक्त प्रेसिडेंट, व्हाईस प्रेसिडेंट, जनरल सेक्रेटरी, जॉईन्ट सेक्रेटरी, ट्रेसुरर, चिफ एक्झेक्युटीव्ह असा उल्लेख केलेला आहे.
७)	रुग्णालयास शासनाचे महात्मा ज्योतिबा फुल जन आरोग्य योजनेची मान्यता आहे किंवा कसे ? याबाबत रुग्णालय प्रमुखाचे प्रमाणपत्र.	रुग्णालयाने शासनाचे महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेची मान्यता घेतलेली आहे. त्याबाबत दि.२६/०२/२०२१ रोजी डॉ.राजेन्द्र प्रधान (चिफ मेडिकल ॲडमिनिस्ट्रेटर) यांचे पत्र आपल्याला प्राप्त झालेले आहे.
८)	रुग्णालय हे धर्मदाय संस्थेच्या स्वमालकीचे आहे किंवा करारावर अथवा भाडेतत्वावर चालविणेस घेतलेले आहे, याबाबतचे पत्र.	एम.आय.टी.हॉस्पिटल (धर्मादाय) ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद हे ग्रामौद्योगीक शिक्षण मंडळ (जी.एस.मंडळ) यांचेमार्फत चालविले जात आहे., रुग्णालय चालविण्यासाठीची जागा ही ९० वर्ष कराराच्या वार्षीक रु.१००/- मात्र च्या भाडेतत्वावर घेतलेली आहे. असे सोबतचे कागदपत्र रु.२० चे स्टॅम्प पेपरवरील उल्लेखावरुन दिसुन येते. सिडको नं.००२२७३ सिटी ॲन्ड इंडस्ट्रीयल डेव्हेलोपमेंट कार्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लि. न्यु औरंगाबाद, प्रोजेक्ट पोसेशन स्लिप यावर प्लॉट नं.१४४, सेक्टर एन-४/ एफ, १५४८.४३ स्केअर मि. असा उल्लेख केलेला आहे.

उपरोक्त कागदपत्रे अ.नं.३ व ४ वित्त विभागाने व इतर कागदपत्रे अनुदान विभागाने नियमावलीप्रमाणे तपासली असता, रुग्णालयास शासनाचे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची (महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना) मान्यता आहे किंवा कसे ? याबाबतचे पत्र सादर केलेले नसल्याने त्यांना जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/५७९/२०२० दि.२१/०८/२०२० रोजीचे पत्रान्वये, जीवनदायी योजनेचे पत्र सादर करणेस कळविणेत आले होते. त्यांनी दि.२६/०२/२०२१ रोजीचे पत्रान्वये, शासनाचे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनची (महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना) मान्यता आहे किंवा कसे ? याबाबतचे पत्र सादर केलेले आहे. श्री साईबाबा संस्थानने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी स्वतंत्र नियमावली तयार केलेली असुन, यास महाराष्ट्र राज्य शासनाची मान्यता आहे.

(पान क्र.३ वर)

एम.आय.टी.हॉस्पिटल (धर्मादाय) ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद हे ग्रामौद्योगीक शिक्षण मंडळ (जी.एस.मंडळ) वैजापूर,ता.वैजापूर जि.औरंगाबाद यांचे असुन, हे मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्र.२९) अन्वये, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी पुस्तकातील क्र.एफ -४२९ (औरंगाबाद) दि.१३/०३/१९७६ अन्वये, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय आहे. सुधारित नियमावलीतील नियम क्र.१६ अन्वये, बरोबर आहे. तरी सदर रुग्णालय संस्थान पॅनलवर घेण्यास हरकत नाही.

प्रस्ताव-

तरी विभागाच्या अभिप्रायात नमुद केलेप्रमाणे एम.आय.टी.हॉस्पिटल (धर्मादाय) ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद यांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन, सदर रुग्णालयाचा वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेचे यादीत समावेश करणेबाबतचा प्रस्ताव सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-Hoc) समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

29/3/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

हॉस्पीटल यादीत नाव समाविष्ट फाईल-१३-१५

SSH-MEETING- 222-2021

विषय क्र.- ee

मा. तदर्थ (Ad. Hoc) समितीचे सभेपुढील विषय
श्री साईनाथ रुग्णालय, शिरडी

टिपणी

विषय – श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईनाथ रुग्णालय येथे डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर (DCHC) सुरु करणेबाबत...

प्रास्तविक - सध्या जगभरात थैमान घातलेल्या कोरोना विषाणु (कोविड १९) च्या विषाणूचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत चाललेला आहे. सदर साथीचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता श्री साईबाबा संस्थानमार्फत साईधर्मशाळा तसेच श्री साईबाबा हॉस्पीटल येथे खालील इमारतीत कोविड सेंटर सुरु करण्यात आलेले आहेत.

अ.नं	इमारत क्र	दिनांक पासुन सुरु	बेड संख्या	कोविड अधिगृहण इमारत
०१	इमारत B	०४/०६/२०२०	२८०	Dedicated Covid Health Center (DCHC)
०२	इमारत E	११/०९/२०२०	६०	Dedicated Covid Health Center (DCHC) with Oxygen
०३	इमारत F	०४/०६/२०२०	२८०	Corona Care Center (CCC)
०४	श्री साईबाबा हॉस्पीटल	१५/०४/२०२१	१४२	Additional Dedicated Covid Hospital (DCH)

सदर सेंटरमध्ये एप्रिल २०२१ पर्यत एकुण ६९०० रुग्णांवर कोविड उपचार करण्यात आले आहेत. सदर सेंटरकरीता लागणारे आवश्यक मनुष्यबळ, औषधे व तपासण्या (लॅब, एक्स रे, एच.आर. सी.टी.) श्री साईबाबा संस्थानमार्फत मोफत देणेत येत आहेत.

मा. तहसीलदार तथा इंसिडेंट कमांडर, राहाता यांनी कोरोना रुग्णांची वाढती संख्या विचारात घेता श्री साईनाथ रुग्णालय शिर्डी येथे मोफत सेवेचे सुसज्ज ३०० खाटांचे अद्ययावत DCHC संपूर्ण मनुष्यबळ, वैद्यकीय सुविधेसह तात्काळ कार्यान्वीत करण्यात यावे व याबाबत नोडल अधिकारी नियुक्त करुन त्यांच्या मोबाईल क्रमांकासह इतर सविस्तर माहिती जिल्हा व तालुका प्रशासनास उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय - राहाता तालुक्यात सद्यस्थितीमध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव असुन कोरोना बाधितांची संख्येमध्ये वारंवार वाढ होत आहे. त्यामुळे कोरोना बाधित व्यक्तींव्दारे कोरोनाचा प्रसार रोखणेकामी श्री साईनाथ रुग्णालयामध्ये Dedicated Covid Health Center कार्यन्वित करणे आवश्यक आहे.

सध्या कोविड सेंटर हे श्री साईआश्रम धर्मशाळा इमारतीत सुरु आहे. मा.जिल्हाधिकारी महोदय, अहमदनगर यांनी श्री साईबाबा हॉस्पीटल येथे कोविड हॉस्पीटल सुरु करणेकामी मा.प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना समक्ष दिलेले निर्देश तसेच मा. तहसीलदार यांचे दि.११/०४/२०२१ चे पत्रास अनुसरुन, दि.१५/०४/२०२१ पासुन श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये एकुण १४० बेड ऑक्सीजन तसेच व्हेंनटीलेटर सह कोविड हॉस्पीटल सुरु करणेत आलेले आहे.

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये Dedicated Covid Health Center सुरु करण्यासाठी ऑक्सीजन प्लांट कार्यान्वित झालेनंतर खाली नमुद केलेल्या विभागांकडुन त्यांचे नावांसमोर दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करुन घ्यावी लागेल.

अ.नं	विभाग	कार्यवाही
०१	श्री साईप्रसादालय विभाग	श्री साईनाथ रुग्णालय येथील Dedicated Covid Health Center मध्ये ३०० रुग्ण व स्टाफ करीता सकाळी नाष्टा व दोन वेळ भोजन मोफत व्यवस्था करणेबाबत. (अंदाजे ३०० व्यक्तींकरीता)
०२	कॅटीन विभाग	श्री साईनाथ रुग्णालय येथील Covid Hospital मध्ये ३०० रुग्ण व स्टाफ करीता सकाळी व संध्याकाळी दोन वेळा चहा, दुध मोफत व्यवस्था करणेबाबत. (अंदाजे ३०० व्यक्तींकरीता)

अ.नं	विभाग	कार्यवाही
०३	आरोग्य विभाग	१) श्री साईनाथ रुग्णालय येथील Covid Hospital मध्ये स्वच्छता करणेकामी चार शिफ्टमध्ये स्वतंत्र कर्मचारी नेमणेबाबत. २) श्री साईनाथ रुग्णालय येथील Covid Hospital इमारतीचा परिसर देखील स्वच्छ ठेवणेकामी आवश्यक ते मटेरियल पुरविणेबाबत.
०४	वाहन विभाग	१) श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथे कोरोना रुग्णांना ने – आण करणेकरीता वाहन चालकासहित ॲम्बुलन्स ठेवणेबाबत. २) तसेच श्री साईआश्रम निवासस्थान येथे वास्तव्यास असणा-या कर्मचा-यांना श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथे ने आण करणेकामी वाहन उपलब्ध ठेवणे.
०५	पाणी पुरवठा विभाग	१) श्री साईनाथ रुग्णालय येथे वॉश बेसिन, संडास, बाथरुमसाठी सुरळीत पाणी पुरवठा करणेबाबत. २) तसेच तिस-या मजल्यावरील बाथरुम, बेसीन यांचे पाण्याचे व ड्रेनेज पाईपलाईन जोडणी तात्काळ करणेबाबत.
०६	मेकॅनिकल विभाग	श्री साईनाथ रुग्णालय येथे पिण्याच्या पाण्याकरीता वॉटर कुलर अद्ययावत ठेवणेबाबत.
०७	साईआश्रम निवासस्थान	साईआश्रम निवासस्थान येथील इमारत B व C मधील एकुण २५६ रुमस पूर्वीपासुन राखून ठेवलेल्या आहेत ते तसेच राखीव ठेवणेबाबत.
०८	संरक्षण विभाग	१) श्री साईनाथ रुग्णालयामध्ये ठेवणेत आलेल्या रुग्णांवर निरीक्षण करणेबाबत. २) सदरहु परिसराजवळील बाहेरील लोकांमध्ये कोरोना विषाणु प्रादुर्भाव रोखणेकामी आस – पासचे क्षेत्र रिकामे करणेबाबत. ३) श्री साईनाथ रुग्णालयाच्या बाजुने आवश्यकते प्रमाणे बॅरिकेडींग करणेबाबत. ४) प्रति शिफ्ट प्रत्यक्ष पहाणी करुन आवश्यकतेनुसार सुरक्षारक्षक उपलब्ध ठेवणेबाबत. ५) कोरोना रुग्णांचा प्रादुर्भाव रोखणेकामी नातेवाईकांचा सेंटर मध्ये आत प्रवेश करणेवर निर्बंध घालणे.
०९	विद्युत विभाग	१) श्री साईनाथ रुग्णालयामध्ये लाईट व फॅनचे मेंटेनंन्स करणेबाबत. २) श्री साईनाथ रुग्णालयामध्ये आवश्यकता भासलेस व अतिरिक्त विद्युत पॉईट काढुन देणेबाबत. ३) नवीन तिस-या मजल्याची विदयुत जोडणी प्रत्यक्ष पाहुन मोकळया वायर जोडुन घेणे.
१०	औषध खरेदी विभाग, श्री साईबाबा हॉस्पीटल व सबस्टोअर व मेडीकल स्टोअस श्री साईनाथ रुग्णालय	श्री साईनाथ रुग्णालय येथे सर्व औषधे व वैद्यकिय उपकरणे तसेच पी.पी.ई. किट, एन ९५ मास्क व Pulse Oxymeter तातडीने खरेदी करुन उपलब्ध करुन देणेबाबत.
११	बायोमेडीकल वेस्ट विभाग, श्री साईबाबा हॉस्पीटल	श्री साईनाथ रुग्णालयामधील कच-याची योग्य ती नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणेकामी प्रत्येक शिफ्ट करीता मनुष्यबळ पुरविणेबाबत व बायोमेडीकल कच-याची विल्हेवाट लावणेचे नियोजन करणेबाबत.
१२	बायोमेडीकल विभाग, श्री साईबाबा हॉस्पीटल	श्री साईनाथ रुग्णालय येथे आवश्यकतेनुसार योग्य ते वैद्यकीय उपकरणे तसेच ऑक्सीजन सुविधा सुरळीत पुरवठा करणेबाबत.
१३	साईनाथ रुग्णालय अधिसेविका कार्यालय	१) श्री साईनाथ हॉस्पीटल मधील डॉक्टर्स, नर्स व इतर कर्मचारी यांना मा. तहसीलदार, राहाता यांचेकडुन आलेल्या वेळापत्रकाप्रमाणे कामकाजाच्या ठिकाणी हजर ठेवणेबाबत. २) सदर केंद्रामध्ये लागणारे वैद्यकीय उपकरणे व आवश्यक तो औषधसाठा तसेच पी.पी.ई किट, एन ९५ मास्क उपलब्ध ठेवणेबाबत.
१४	फोकस फॅसिलिटी लि.	१) श्री साईनाथ रुग्णालय येथील Dedicated Covid Health Center मध्ये स्वच्छता करणेकामी आवश्यकतेनुसार कर्मचारी नेमणे बाबत. २) श्री साईनाथ रुग्णालय येथील Dedicated Covid Health Center मध्ये इमारतीचा परिसर देखील स्वच्छ ठेवणेकामी आवश्यक ते मटेरियल पुरविणेबाबत.

(पान क्र. ०३ वर...)

अ.नं	विभाग	कार्यवाही
१५	श्री साईबाबा हॉस्पीटल	श्री साईनाथ रुग्णालयात ज्या तपासण्या होत नाहीत त्या तपासण्या श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये (औषधे, २ डी इको, रेडीओलॉजी,लॅब इ.) करणेबाबत.

मा.अध्यक्ष साहेब, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचे जा.नं.स्वीस /२६/२०२१, अन्वये सदरहु विषय हा चक्रीय पदधतीने सादर करण्याची कुठलीही तातडी भासत नाही व या विषयावर तदर्थ समितीच्या नियमित बैठकीत सखोल चर्चा होणे आवश्यक दिसते करिता तथापि सदरहु विषय परत पाठवत आहे ते तदर्थ समितीच्या पुढील नियमित बैठकीत ठेवण्यात यावेत, असे पत्रान्वये आदेशीत केलेले आहे.

<u>प्रस्ताव</u> - तरी विभागाच्या अभिप्रायात नमुद केले प्रमाणे संबंधित विभागांकडुन जो पर्यंत श्री साईनाथ रुग्णालय येथील Dedicated Covid Health Center सुरु आहे तो पर्यंत सदरची कार्यवाही होणेस व कोवीड रुग्णांना मोफत सेवा देणेस (औषधे, तपासण्या, लॅब, एक्स – रे, HRCT, चहा, जेवण, निवास इ.) मान्यता असावी. तसेच ज्या तपासण्या श्री साईनाथ रुग्णालयात होत नाहीत परंतु श्री साईबाबा रुग्णालयात होतात अशा तपासण्या देखील मोफत करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad. Hoc) समितीचे सभेसमोर निर्णयास्तव सादर.

21.06.21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

21/06/21

विषय क्र.- ८७

मा. तदर्थ समिती सभेसमोरील विषय
श्री साईनाथ रुग्णालय, शिरडी

टिपणी –

विषय – श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोबर २०२० ते मार्च २०२१ अखेर वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३,२७,१२,८९५/- च्या खर्चास नोंद घेणेस मान्यता मिळणेबाबत...

- **अधिनियम २००४ मधील तरतुद** – कलम १७(२)(ण) मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.
- **मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय –**

१) **मा. व्यवस्थापन समितीचे दि. २२/१२/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ९४४.**
श्री साईनाथ रुग्णालय हे धर्मदाय रुग्णालय म्हणुन संस्थानमार्फत चालविले जात असुन त्याचा जास्तीत जास्त फायदा गोरगरीब रुग्णांना होत आहे. यासाठी प्रस्तावात नमुद केलेल्या चिकन गुनिया व गोचिडताप या तपासण्या श्री साईनाथ रुग्णामध्ये मोफत करण्यात याव्यात, असे ठरले.

याचवेळी अशीही चर्चा करणेत आली की, श्री साईबाबांनी त्यांच्या हयातीमध्ये स्वतःच्या हाताने अनेक रुग्णांची सेवा सुश्रुषा करुन त्यांच्या व्याधी ब-या केलेल्या आहेत. श्री साईबाबांनी सुरु केलेले हे रुग्णसेवेचे कार्य संस्थान व्यवस्थापनाने अविरतपणे पुढे सुरु ठेवलेले आहे. हे रुग्णसेवेचे कार्य असेच पुढे चालू ठेवून त्याची व्याप्ती वाढविणेकरीता दि. ०१ जानेवारी २०१७ पासुन श्री साईनाथ रुग्णालयामध्ये होत असलेले सर्व प्रकारचे वैद्यकीय उपचार सर्वांसाठी मोफत करणेत यावे. याबाबतचा धोरणात्मक निर्णय आजचे सभेत घेण्यात आला. तसेच श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांकडुन प्रवेशासाठी फक्त रु.१०/- मात्र पुर्वीप्रमाणेच आकारणेत यावे, असे ठरले.

२) **मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५/०२/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ०६**
श्री साईनाथ रुग्णालयामध्ये होत असलेले वैद्यकीय उपचार दि. ०१/०१/२०१७ पासुन सर्वांसाठी मोफत करणेत आलेले असुन त्यासाठी प्रस्तावित केलेल्या नियमावली मधील अ.नं. ०३,०४,०५ व ०६ या मुद्दयास मान्यता देण्यात आली.

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये मोफत वैद्यकीय सेवा मिळत असल्यामुळे खाजगी वैद्यकीय व्यावसायिक त्यांचेकडील रुग्णांना वैद्यकीय चाचण्या करण्यासाठी श्री साईनाथ रुग्णालयात पाठवितात, अशा प्रकारच्या चाचण्या करण्यात येऊ नये व याबाबत रुग्णांना कळविण्यासाठी तेथे फलक लावण्यात यावा.

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये गोर गरीब रुग्ण उपचार घेत असतात, याकरीता मोफत उपचार करणेसाठी आर्थिक निकष लावणेत येऊ नये. रुग्ण, रुग्णालयामध्ये दाखल झाल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे उपचार घेऊ शकेल व जादा मनुष्यबळ वापरणेऐवजी आवश्यक त्या ठिकाणी नवीन सॉफ्टवेअर विकसीत करणेत यावे. तसेच संस्थान रक्तपेढीमध्ये रक्त अथवा रक्तघटक उपलब्ध नसल्यास इतर रक्तपेढयांकडे रक्ताची मागणी करण्यात यावी, रक्त अथवा रक्तघटकांअभावी रुग्णांची गैरसोय होऊ देऊ नये. याकरीता इतर रक्तपेढयांबरोबर MOU करणेत यावा व रक्तदात्यांची यादीही बनविणेत येऊन, दि. ०१ मार्च २०१७ पासुन रुग्णांना रक्त व रक्त घटक मोफत उपलब्ध करुन देण्यात यावे, असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.

(कृ.मा.प.)

तसेच श्री साईनाथ रुग्णालयामध्ये राजीवगांधी जीवनदायी आरोग्य योजना राबविणेत यावी व केसपेपर विभागामध्ये काऊंटरची संख्या वाढविणेत यावी, असे ठरले.

३) **मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०१/११/२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ६१२** शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे शासकीय रुग्णालयामधुन देण्यात येणा-या तपासणी व त्याबाबतच्या रुग्णशुल्काबाबतचे सेवाआकारामध्ये आकारण्यात येणा-या शुल्क दरामध्ये दर दोन वर्षांनी १५ ते २० टक्के वाढ करणेत येईल असे नमुद केलेले आहे. याअनुषंगाने श्री साईनाथ रुग्णालयातील दर निश्चीत झालेनंतर दर दोन वर्षांनी १० टक्के वाढ करणेस मान्यता देण्यात आली.

या ऐवजी खालीलप्रमाणे निर्णय करण्यात आले.

श्री साईबाबा रुग्णालयातील सद्यस्थितीला लागु असणारे दर जसेच्या तसे श्री साईनाथ रुग्णालयात लागु करणेत यावेत, व जे उपचार, शस्त्रक्रिया श्री साईबाबा रुग्णालयात होत नाहीत परंतु शासकीय रुग्णालयात होत आहेत. अशा उपचारांचे दर शासनाच्या दराप्रमाणे घेण्यात यावे. तसेच शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे शासकीय रुग्णालयामधुन देण्यात येणा-या तपासणी व त्याबाबतच्या रुग्णशुल्काबाबतचे सेवाआकारामध्ये आकारण्यात येणा-या शुल्क दरामध्ये दर दोन वर्षांनी १५ ते २० टक्के वाढ करणेत येईल असे नमुद केलेले आहे. याअनुषंगाने श्री साईनाथ रुग्णालयातील दर निश्चीत झालेनंतर दर दोन वर्षांनी १० टक्के वाढ करणेस मान्यता देण्यात आली.

- **प्रास्तविक** – श्री साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुन गरीब व गरजु रुग्णांना दि. ०१/०१/२०१७ रोजी पासुन श्री साईनाथ रुग्णालय संपुर्णपणे मोफत उपचार सुरु केलेले आहे.
- **विभागाचा अभिप्राय -**

श्री साईनाथ रुग्णालयात माहे. ऑक्टोबर २०२० ते मार्च २०२१ अखेर सर्व घटकातील रुग्णांना मोफत तपासणी, शस्त्रक्रिया व औषधांसाठी रक्कम रु. ३,२७,१२,८९५/- मात्र खर्च झालेला आहे त्याचे विवरण खालील प्रमाणे आहे.

- **अंर्तरुग्णांवर झालेला खर्च** –

अ.नं	महिना	एकुण रुग्ण संख्या	जनरल रुग्णांपोटी झालेला खर्च	संस्थान कायम कर्मचारीपोटी झालेला खर्च	संस्थान कंत्राटी कर्मचारीपोटी झालेला खर्च	एकुण रुपये
०१	ऑक्टोबर २०२०	४६८	१५,४६,८३६/-	३९,७०८/-	४९,७१८/-	१६,३६,२६२/-
०२	नोव्हेंबर २०२०	४५४	१७,७६,९५६/-	४१,०८४/-	३२,०७५/-	१८,५०,११५/-
०३	डिसेंबर २०२०	७९०	३०,०२,४७८/-	५०,६०६/-	३९,०२४/-	३०,९२,१०८/-
०४	जानेवारी २०२१	९११	३५,२७,६१०/-	६०,८५९/-	५१,४३१/-	३६,३९,९००/-
०५	फेब्रुवारी २०२१	८६०	३९,४७,४२४/-	४९,१७८/-	१९,६६५/-	४०,१६,२६७/-
०६	मार्च २०२१	८५०	३८,०९,२३१/-	४९,०३३/-	३५,१७९/-	३८,९३,४४३/-
					एकुण रक्कम रुपये	१,८१,२८,०९५/-

(पान क्र. ०३ वर...)

- बाह्यरुग्णांवर झालेला खर्च -

अ.नं	महिना	एकुण रुग्ण संख्या	जनरल रुग्णांपोटी झालेला खर्च	संस्थान कायम कर्मचारीपोटी झालेला खर्च	संस्थान कंत्राटी कर्मचारीपोटी झालेला खर्च	एकुण रुपये
०१	ऑक्टोबर २०२०	११,९२३	७,००,५७७/-	८९,७१९/-	७०,८४८/-	८,६१,१४४/-
०२	नोव्हेंबर २०२०	१२,३८७	७,०६,१३५/-	८५,२०२/-	५९,६६२/-	८,५०,९९९/-
०३	डिसेंबर २०२०	१४,२३९	१०,८८,३२७/-	७१,०९८/-	६३,११६/-	१२,२२,५४१/-
०४	जानेवारी २०२१	१२,३८७	११,२४,७९९/-	६९,८४२/-	७६,६८३/-	१२,७१,३२४/-
०५	फेब्रुवारी २०२१	१८,५२४	११,३६,५६०/-	६०,३७७/-	६१,९८७/-	१२,५८,९२४/-
०६	मार्च २०२१	१८,१४३	११,०९,०५२/-	१,०७,०६०/-	८४,८८८/-	१३,०१,०००/-
					एकुण रक्कम रुपये	६७,६५,९३२/-

- औषधांवरील झालेला एकुण खर्च –

अ.नं	महिना	एकुण रुपये
०१	ऑक्टोबर २०२०	१०,६२,१०८/-
०२	नोव्हेंबर २०२०	६,७८,३०१/-
०३	डिसेंबर २०२०	१३,२३,९५८/-
०४	जानेवारी २०२१	१५,४०,२९१/-
०५	फेब्रुवारी २०२१	१४,७१,६६९/-
०६	मार्च २०२१	१७,४२,५४१/-
एकुण रक्कम रुपये		७८,१८,८६८/-

- एकुण खर्च रक्कम विवरण –

अ. नं	महिना	अंर्तरुग्ण संख्या	अंर्तरुग्णांवर झालेला खर्च रक्कम रुपये	बाह्यरुग्ण संख्या	बाह्यरुग्णांवर झालेला खर्च रक्कम रुपये	औषधांवर खर्च झालेला एकुण रक्कम रुपये	एकुण रुग्ण संख्या (३+५)	एकुण रुपये (४+६+७ = ९)
१	२	३	४	५	६	७	८	९
०१	ऑक्टोबर २०२०	४६८	१६,३६,२६२/-	११,९२३	८,६१,१४४/-	१०,६२,१०८/-	१२,३९१	३५,५९,५१४/-
०२	नोव्हेंबर २०२०	४५४	१८,५०,११५/-	१२,३८७	८,५०,९९९/-	६,७८,३०१/-	१२,८४१	३३,७९,४१५/-
०३	डिसेंबर २०२०	७९०	३०,९२,१०८/-	१४,२३९	१२,२२,५४१/-	१३,२३,९५८/-	१५,०२९	५६,३८,६०७/-
०४	जानेवारी २०२१	९११	३६,३९,९००/-	१२,३८७	१२,७१,३२४/-	१५,४०,२९१/-	१३,२९८	६४,५१,५१५/-
०५	फेब्रुवारी २०२१	८६०	४०,१६,२६७/-	१८,५२४	१२,५८,९२४/-	१४,७१,६६९/-	१९,३८४	६७,४६,८६०/-
०६	मार्च २०२१	८५०	३८,९३,४४३/-	१८,१४३	१३,०१,०००/-	१७,४२,५४१/-	१८,९९३	६९,३६,९८४/-
						एकुण	९१,९३६	३,२७,१२,८९५/-

उपरोक्तप्रमाणे झालेल्या खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समिती समोर ठेवता येईल, असे नम्र मत आहे. (सोबत उपरोक्त खर्च रक्कम रु.३,२७,१२,८९५/- चे विवरण सादर केले आहे.)

(पान क्र. ०४ वर...)

मा. अध्यक्ष साहेब, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचे जा.नं.स्वीस/२६/२०२१ दि. १७/०६/२०२१ अन्वये सदरहु विषय हा चक्रीय पद्धतीने सादर करण्यांची कुठलीही तातडी भासत नाही व या विषयावर तदर्थ समितीच्या नियमित बैठकीत सखोल चर्चा होणे आवश्यक दिसते करिता तथापि सदरहु विषय परत पाठवत आहे ते तदर्थ समितीच्या पुढील नियमित बैठकीत ठेवण्यात यावेत; असे पत्रान्वये आदेशीत केलेले आहे.

- **प्रस्ताव -** तरी विभागाच्या अभिप्रायामध्ये नमुद केल्याप्रमाणे माहे. ऑक्टोबर २०२० ते मार्च २०२१ या कालावधीत श्री साईनाथ रुग्णालयात एकुण रुग्ण संख्या ९१,९३६ वर रक्कम रु.३,२७,१२,८९५/- (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी सत्तावीस लाख बारा हजार आठशे पंच्याण्णव मात्र) इतक्या रक्कमेचे वैद्यकीय उपचार व औषधांवरील झालेल्या खर्चाची नोंद घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad. Hoc) समितीचे सभेसमोर निर्णयार्थ तसेच मा. तदर्थ समितीची मान्यता मिळालेनंतर सदरचा विषय मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर मान्यतेकरीता सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

SSH - meeting - 227 - 2021

MEETING- 247 -2020

विषय क्र. - ८८

मा. तदर्थ समिती सभेपुढील विषय

आरोग्य विभाग

416

विषय – स्वच्छता साहित्य खरेदीबाबत.

मान्यतेस्तव सादर,

आरोग्य विभागामार्फत समाधी मंदिर, मंदिर परिसर, संस्थान परिसर, काही भक्तनिवासस्थाने व कर्मचारी / अधिकारी निवासस्थाने इ. परिसरातील साफ सफाई नियमित केली जाते. साफसफाईचे कामासाठी स्वच्छता साहित्याची नेहमीच गरज असते. यासाठी आवश्यक लागणा-या स्वच्छता साहित्याची खरेदी वारंवार करणेपेक्षा विहीत पध्दतीने वार्षिक खरेदी करण्यात येते.

यापुर्वी आपण सन २०१७ – २०१८ या वर्षामध्ये वार्षीक स्वच्छता साहित्य रु.१९,२१,९२६/-इतके रक्कमेचे खरेदी विभागामार्फत खरेदी केले होते.

सदर साहित्य शिल्लक असलेमुळे सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० या कालावधीमध्ये वार्षीक खरेदी करण्यात आलेली नाही. परंतु आवश्यकतेनुसार काही साहित्य आरोग्य विभागामार्फत कोटेशन्स मागवुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे मान्यतेने रु. ८,९०५४८/- इतक्या रक्कमेचे खरेदी करण्यात आले होते. असे एकुण रु. २८;१२,४७४/- रक्कमेचे स्वच्छता साहित्य खरेदी करण्यात आले होते. सदर उर्वरीत स्वच्छता साहित्यांपैकी अंदाजे माहे फेब्रुवारी २०२१ पर्यंत पुरेल इतके साहित्य शिल्लक आहे. (शिल्लक असलेले साहित्यांची यादी सोबत परिशिष्ट 'ब' मध्ये जोडलेली आहे) तो पर्यंत सन २०२१-२०२२ या कालावधीसाठी लागणारे स्वच्छता साहित्यांची खरेदी प्रक्रिया खरेदी विभागामार्फत पुर्ण होईल.

आरोग्य विभागासाठी सन २०२१-२०२२ करिता दैनंदिन साफसफाईचे कामासाठी आवश्यक असणा-या साहित्यांची यादी सोबत परिशिष्ठ 'अ' मध्ये जोडली आहे. परिशिष्ठातील 'अ' मधील अ. नं. ०१ ते १८ नुसार साहित्य खरेदीकामी रुपये- २०,०२,९०५/- (अक्षरी- रु. वीस लाख दोन हजार नऊशे पाच मात्र) खर्च अपेक्षित आहे.

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी स्वच्छता साहित्य खरेदीसाठी मंजूर अंदाजपत्रक रुपये- ४५,००,०००/- तरतुद असुन त्यापैकी रुपये -४०,००,०००/- स्वच्छता साहित्य खरेदीकामी खरेदी विभागाकडे वर्ग करण्यात आले आहे. सदरचे साहित्य, खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी कार्यवाही करता येईल असे नम्र मत आहे.

सध्या कोरोना साथीचे रोगाचा प्रार्दुभाव रोखणेकामी मंदिर परिसर व दर्शन रांग येथील साफसफाई स्वच्छता साहित्य जास्त प्रमाणात लागणार असल्यामुळे सोबतचे परिशिष्ठ ' अ ' मधील यादीप्रमाणे स्वच्छता साहित्य खरेदी करणेसाठी येणा-या **अंदाजे रुपये- २०,०२,९०५/- (अक्षरी- रु. वीस लाख दोन हजार नऊशे पाच मात्र)** चे खर्चास व खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने ई-निविदा मागवून आवश्यक साहित्य खरेदी करणेस मान्यता मिळणेकामी मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

8/12/2020

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

सोबत-१) परिशिष्ट ' अ '
२) परिशिष्ट ' ब '

परिशिष्ट " अ "

आरोग्य विभागास सन २०२१-२०२२ या वर्षा करिता साफसाफाई कामी खालील प्रमाणे स्वच्छता साहित्याची आवश्यकता आहे.

अ.नं.	साहित्याचा तपशिल	साईज / वर्णन	मेक/ब्रॅड/घटक	मागणी परिमाण/संख्या	मगनलाल देवशंकर, नाशिक	दिग्विजय एन्टरप्रायजेस, नाशिक	वर्धमान नॉव्हेल्टीज, नाशिक	ओम साई ट्रेडर्स,शिर्डी	अदाजे दर (सरासरी)	अंदाजे रक्कम
१	२	३	४	७	८	९	१०	११	१२	१३
१	सेंटेड फिनेल	पाण्याशी डायल्यूशन रेशो १:१०० कोरे (प्युअर)	घटक प्रती लिटर पाईन ऑईल Aग्रेड ६५० ग्रॅम टर्किड ऑईल(TRO 75%)३५० ग्रॅम	३००० लिटर	२२०/-प्र.लि.	१७५/-प्र.लि.	१८०-प्र.लि.	११०/-प्र.लि.	१७१/-	५१३०००/-
२	लिक्वीड सोप	कोणत्याही रंगाचे	घटक प्रती लिटर ॲसीड स्लरी (८०%) १०० ग्रॅम कॉस्टीक सोडा (४०%कॉस्टीक लाय द्रावण) २० ग्रॅम	३००० लिटर	१००/-प्र. .लि..	८५/- प्र.लि.	९०/- प्र.लि.	६०/- प्र.लि.	८४/-	२५२०००/-
३	बी.एच.सी. पर्यायी पावडर/ फॉलीडॉल पावडर	२५ किलोची ब्रॅग	Fenvalrate – 0.4 % आयएसआय मार्क असलेली	२००० किलो	४६/- प्र.कि.	३०/- प्र.कि.	४०/- प्र.कि.	६०/- प्र.कि.	४४/-	८८०००/-
४	ब्लिचिंग पावडर	२५ किलोची बॅग	आयएसआय मार्क असलेली	१००० किलो	४५/-प्र.कि.	३५/- प्र.कि.	४२/- प्र.कि.	४५/- प्र.कि.	४२/-	४२०००/-
५	रबरी वायफर स्टील दांड्यासहीत	२"-३" रुंदी व १८" लांब,दांडे ५ फुट लांबीचे	चांगल्या प्रतीचे लवचिक रबर असलेले	२०० नग	३२०/- प्र.नग	२५०/- प्र.नग	३००/- प्र.नग	१६०/- प्र.नग	२५८/-	५१६००/-
६	किटकनाशक औषध (किटकनाशक फवारणी कामी)	०५ लिटरचे पॅकींग	Diachloro-EC 76 % आयएसआय मार्क असलेले	२५ लिटर	२२७५/-प्र.लि.	२२२५/- प्र.लि.	२२५०/- प्र.लि.	३५०/- प्र.लि.	१७७५/-	४४३७५/-
७	डस्टपॅन (कचरा गोळा करणेकामी)	स्टॅडर्ड साईज, दोन फुट लांब दांडी, झाकण असलेले	चांगल्या प्रतीचे फायबर	१०० नग	६००/- प्र.नग	५५०/- प्र.नग	५७५/- प्र.नग	७५०/- प्र.नग	६१९/-	६१९००/-
८	वॉश बेशीन / टॉयलेट क्लिनर (Toilet cleaners) (वॉश बेशीन / संडास भांडेचे डाग काढणे कामी)	०५ लिटरचे पॅकींग	Harpic/Tanaz/ Dr. Ideal/Super Shine/ Any Other Company	१००० लिटर	९०/- प्र.लि.	८०/-प्र.लि.	८५/-प्र.लि.	५०/-प्र.लि.	७६/-	७६०००/-
९	लिक्वीड (फरशीवरील सर्व प्रकारचे डाग काढणेकामी)	०५ लिटरचे पॅकींग	Taski / Ecolab / Schevron Any Other Company	३०० लिटर	२२५/- प्र.लि.	१५०/- प्र.लि.	२००/- प्र.लि	८०/- प्र.लि.	१६४/-	४९२००/-
१०	All purpose cleaners तेलकट डाग काढणेसाठी	०५ लिटर पॅकींग	Taski / Ecolab / Schevron Any Other Company	३०० लिटर	१७५/- प्र.लि.	१००/- प्र.लि.	१२५/- प्र.लि.	१५०/- प्र.लि.	१३८/-	४१४००/-
११	नायलॉन ब्रश- लांबदांडीचे (टॉयलेट साफ करणे कामी)	स्टॅडर्ड	चांगल्या प्रतीचे	१०० नग	१७५/- प्र.न.	९०/- प्र.नग	१२५/- प्र.नग	६०/- प्र.नग	११३/-	११३००/-
									एकूण रुपये -	१२,३०,७७५/-

अ.नं.	साहित्याचा तपशिल	साईज / वर्णन	मेक/ब्रॅंड/घटक	मागणी परिमाण/संख्या	मगनलाल देवशंकर, नाशिक	दिग्विजय एन्टरप्रायजेस, नाशिक	वर्धमान नॉव्हेल्टज, नाशिक	ओम साई ट्रेडर्स,शिर्डी	अदाजे दर (सरासरी)	अंदाजे रक्कम
	२	३	४	७	८	९	१०	११	१२	१३
								मागील पानावरील बेरीज...		
१२	नायलॉन ब्रश- लहान (डाग घासणे कामी)	स्टॅंडर्ड	चांगल्या प्रतीचे	१०० नग	१२५/- प्र.न	५०/- प्र.नग	१००/- प्र.नग	३०/- प्र.नग	७६/-	७६००/-
१३	चोक रिमुव्हर	स्टॅंडर्ड	चांगल्या प्रतीचे	१०० नग	१५०/- प्र.नग	५०/- प्र.नग	१२०/- प्र.नग	६०/- प्र.नग	९५/-	९५००/-
१४	खराटे	प्रत्येकी ५०० ग्रॅम वजनाचे, खुंटी नसलेले, लांब काड्याचे, मजबूत बांधणीचे व साळलेले	चांगल्या प्रतीचे	३००० नग	५८/- प्र.नग	५०/- प्र.नग	५२/- प्र.नग	६०/- प्र.नग	५५/-	१६५०००/-
१५	कुंचे	प्रत्येकी ५०० ग्रॅम वजनाचे, स्पेशल लांब काड्याचे, खुंटी नसलेले, मजबूत बांधणीचे	चांगल्या प्रतीचे	३००० नग	१५०/- प्र.नग	९०/- प्र.नग	१२०/- प्र.नग	८०/- प्र.नग	११०/-	३३०००/-
१६	रबरी मॅट काळया रंगाची	साईज - लांबी ४ फुट, रुंदी २.५ फुट, व उंची पाऊण इंच (गोल छिंद्राचे)	चांगल्या प्रतीचे	२०० नग	१६५०/- प्र.नग	१०००/-प्र.नग.	१५००/-प्र.नग.	३५०/-प्र.नग.	११२५/-	२२५०००/-
१७	लिक्वीड पॉलिश पितळी अक्षरे साफ करणे कामी	२०० ml. पॅकींग असलेले	चांगल्या प्रतीचे ब्रासो/धारा/पितांबरी किंवा इतर कंपनीचे	०५ लिटर	१६००/- प्र.लि.	१४५०/-प्र.लि.	१५७५/-प्र.लि.	१०००/-प्र.लि.	१४०६/-	७०३०/-
१८	सेन्टेड डांबर गोळी	०१ किलो पॅकिंग	चांगल्या प्रतीच्या	१०० किलो	३००/- प्र.कि.	२५०/-प्र.कि.	२७०/-प्र.कि.	३००/-प्र.कि.	२८०/-	२८०००/-
									एकूण रुपये -	२०,०२,९०५/-

8/12/2020

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

आरोग्य विभाग
दि.२३/११/२०२०

परिशिष्ट " ब "

आरोग्य विभागाकडील सन २०१७-२०१८ या वर्षाचे स्वच्छता साहित्य खरेदी, खर्च व शिल्लक बाबत माहिती खालील प्रमाणे-

अ.नं.	साहित्याचे नांव	खरेदी प्रमाण	खर्च	विभागाकडील शिल्लक
०१	खराटे	४००० नग	३०५५ नग	९४५ नग
०२	कुंचे	४००० नग	३०५० नग	९५० नग
०३	सेंटेड फिनेल	३००० लिटर	२५५४ लिटर	४४६ लिटर
०४	लिक्वीड सोप	३००० लिटर	२६९३ लिटर	३०७ लिटर
०५	वॉश पावडर	७०२० किलो	२२६० किलो	४७६० किलो
०६	बी.एच.सी. पवाडर	४००० किलो	२८३५ किलो	११६५ किलो
०७	ब्लिचिंग पावडर	२००० किलो	१०५५ किलो	९४५ किलो
०८	रबरी वायफर	४०० नग	२३० नग	१७० नग
०९	नुआन किटकनाशक औषध	२५ लिटर	२३ लिटर	०२ लिटर
१०	डस्ट पॅन	१०० नग	९६ नग	०४ नग
११	टॉयलेट /बेसीन क्लिनर	१००० लिटर	५८२ लिटर	४१८ लिटर
१२	ऑल परपज क्लिनर	५०० लिटर	३६९ लिटर	१३१ लिटर
१३	नायलॉन ब्रश (लांब दांडी)	१५० नग	२२ नग	१२८ नग
१४	टॉयलेट ब्रश (लहान)	१०० नग	३७ नग	६३ नग
१५	रबरी मॅट (काळया रंगाची)	२०० नग	१५० नग	५० नग
१६	चोक रिमुव्हर	१०० नग	८६ नग	१४ नग

23/11/20
(प्रताप कोते)
प्र.अधिक्षक
(अतिरिक्त कार्यभार)
23/11

2582

विषय क्र.- ee

लेखाशाखा,
मा.तदर्थ समितीच्या सभेपुढील विषय

420

विषयः- संस्थानमधील स्थायी कर्मचा-यांसाठी लागु करण्यात आलेल्या सवलतपात्र गृहकर्ज व्याज सवलत योजनेच्या अट क्र.१२ मध्ये सुधारणा करणेबाबत...

टिपणीः-

प्रस्तावना- साधारणतः सन १९९६-९७ या काळात संस्थानकडे उपलब्ध असणा-या निवासस्थानांची संख्या खुपच कमी होती. तसेच संस्थानकडे निवासस्थाने बांधणेकामी पुरेशी जागाही उपलब्ध नसल्याकारणाने बाहेर गावावरुन संस्थानमध्ये नोकरीसाठी आलेल्या कर्मचा-यांची खुप हाल होत असत. तसेच कर्मचा-यांच्या संस्थान निवासस्थानासाठी (Staff Quarter) वाढत्या मागण्या लक्षात घेता, संस्थानमार्फत गृहकर्ज घेणा-या कर्मचा-यांना व्याजाच्या दरात सवलत दिल्यास कर्मचा-यांना घर मिळेल. तसेच कर्मचारी संस्थानकडे निवासस्थानची मागणीही करणार नाही, अशा स्वरुपाची संस्थान कायम कर्मचा-यांसाठी कल्याणकारी योजना तत्कालीन मा.अध्यक्ष तसेच मा.कार्यकारी आधिकारी यांनी प्रस्तावीत केली. तसेच गृहकर्ज व्याज सवलत योजनेत वेळोवेळी बदल करण्यात येऊन, संस्थान कर्मचाऱ्यांना वैयक्तिक गृहबांधणी कर्जाच्या व्याजातील संस्थानच्या अनुदानरुपी सहभागामध्ये ५० % पर्यंत वाढ *(व्याजाच्या रकमेत संस्थान हिस्सा ५० % व कर्मचारी हिस्सा ५०%)* करणेबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. त्याअनुषंगाने संस्थानच्या कायम कर्मचा-यांनी हौसिंग सोसायटी अंतर्गत, तसेच वैयक्तीक गृहकर्ज योजनेअंतर्गत वेळोवेळी विविध बॅंकाकडून गृहकर्ज घेतलेले असुन, आजपर्यंत साधारणतः ४३० कर्मचा-यांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे.

त्याअनुषंगाने, दिनांक १४.११.२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.९६७ अन्वये, संस्थान कर्मचा-यांसाठी सवलतपात्र गृहकर्जाच्या पुर्वीच्या नियम व अटीत बदल करुन सुधारीत नियम व अटींस मान्यता देण्यात आली. सुधारीत नियमावली पुढीलप्रमाणे -

१) या योजनेअंतर्गत राष्ट्रीयीकृत बॅंकेकडून घेतलेल्या कर्जासाठी वेळोवेळी लागु असलेल्या व्याजाच्या रक्कमेच्या ५०% रक्कम संस्थानकडून अनुदान म्हणून थेट बॅंकेला कर्मचा-याच्या मासिक हप्त्याच्या वसुलीसोबत आदा करण्यात येईल.

२) सदर कर्मचारी हा संस्थानचा कायम कर्मचारी असावा व त्याची सेवा ही किमान ५ वर्ष झालेली असावी.

३) गृहकर्जासाठी द्यावयाचा जामीनदार हा संस्थानचा कायम कर्मचारी असावा व त्याचीही सेवा ५ वर्ष पुर्ण झाली असली पाहिजे.

४) कर्जदाराकडुन गृहकर्जाची परतफेड झाली नाही तर त्यांला संस्थानकडून देय असलेल्या रक्कमेतून वसूल करुन बॅंकेस भरण्यात येईल त्यातून परतफेड झाली नाही तर जामिनदाराकडून वसूल करण्यात येईल.

५) ज्या कर्मचा-याचे सध्या स्वतःचे नांवे घर नाही त्यालाच या योजनेचा लाभ घेता येईल.

६) ज्या कर्मचा-यांना गृहकर्ज व्याज सवलत योजनेचा लाभ घ्यायचा आहे त्यांचे स्वतःचे नांवावर (७/१२ उतारा) जागा असेल तरच त्याला व्याजाची सवलत देता येईल. इतरांकडून घेतलेले संमतीपत्र चालणार नाही.

७) संस्थान कर्मचा-यांस गृहकर्जावर व्याजाची सवलत ही त्याच्या पगाराच्या *(Pay in Pay Band+Grade pay+DA)* ४० पट किंवा जास्तीत जास्त रु.१० लाख यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम बॅंकेडून घेणेकामी हमी देण्यात येईल.

८) संपुर्ण सेवाकालावधीत एका कर्मचा-यास या योजनेचा एकदाचं लाभ घेता येईल. पती व पत्नी दोघेही सेवेत असतील तर त्यापैकी एकालाच (विहीत मर्यादेतच) घरबांधणी /खरेदीकामी या योजनेचा लाभ घेता येईल.

९) गृहकर्ज व्याज सवलत योजना मंजुर करण्याकरीता घर/फ्लॅट अर्जदा-याच्या स्वतःच्या नावावर असणे आवश्यक राहिल व ते महाराष्ट्रात कोठेही असले तरी या योजनेचा लाभ घेता येईल.

१०) दि.१ मे, २००१ रोजी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असणा-या अर्जदारास (दुस-या वेळेस जुळ्या अपत्यांचा अपवाद वगळता) या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

११) गृहकर्ज व्याज सवलत योजना मंजुरीच्या आदेशाची त्याचप्रमाणे गृहकर्ज वसुली पुर्ण झाल्यानंतर सक्षम प्राधिका-याच्या प्रमाणपत्राच्या आधारे दोन्ही बाबींची नोंद सेवा पुस्तकात घेण्यात येईल.

१२) कर्मचारी/अधिका-याने संस्थानकडून गृहकर्ज व्याज सवलत योजनेचा लाभ घेतल्यानंतर मंजुरी दिनांकापासून ६ महिन्यात घराचे काम सुरु करणे आवश्यक आहे. कमाल १८ महिन्यात बांधकाम पुर्ण करणे आवश्यक राहिल. १८ महिने किंवा घराचे/फ्लॅटचे बांधकाम/ताबा मिळविण्याचा दिनांक यापैकी जे आगोदर घडेल त्या दिनांकापासून

संस्थानचे निवासस्थान खाली करुन द्यावे लागेल. अन्यथा संबंधीत कर्मचा-यावर पुढीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करणेत येईल.

अ) जर कर्मचारी संस्थान निवासस्थानात राहत असेल तर संस्थान घराचे बाजार मुल्यानुसार भाडे वसुल करण्यात येईल.

आ) सदर कर्मचा-याने गृहकर्ज संदर्भातील अटी व शर्तींचे पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास संस्थानने दिलेली व्याजाची सवलत प्रचलित व्याजदरापेक्षा २.७५ प्रतिशत जास्त दराने दंडनीय व्याजाची आकारणी करुन ती रक्कम त्याचे वेतनातून समान हप्त्यामध्ये वसूल करण्यात येईल.

१३) काही योग्य कारणामुळे घर बांधणीस विलंब झाल्यास/होत असल्यास सदर कारणे नमूद करुन घर बांधणीसाठी १८ महिन्यापेक्षा जास्त लागणा-या कालावधीस विशेष बाब म्हणून मुदतवाढ देणेबाबत निर्णय गृहकर्ज व्याज सवलती मंजुर करण्यास सक्षम कमिटिस राहिल. मात्र अशी वाढ करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

१४) संपुर्ण गृहकर्जाची परतफेड होईपर्यंत घराची/फ्लॅटची मालमत्ता तारण ठेऊन त्यावर कर्ज उभारणी करता येणार नाही अथवा विक्री करता येणार नाही.

१५) संस्थान संमतीशिवाय गृहकर्ज बॅंकेकडून परस्पर घेतले असेल तर त्यांना व्याजाचीसवलत देण्यात येणार नाही. अशा प्रकरणात गृहकर्जाचा हप्ता वसूल करुन बॅंकेत भरणा करण्याचे बंधन संस्थानवर राहणार नाही.

१६) गृहकर्ज व्याज सवलतीचा लाभ घेतलेल्या अधिकारी/कर्मचा-याला सेवा समाप्तीपर्यंत संस्थानची संमती घेतल्याशिवाय घर/सदनिकेची विक्री करता येणार नाही, किंवा अन्यप्रकारे मालमत्तेची विल्हेवाट लावता येणार नाही.

१७) गृहकर्जधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास, अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला तरीही गृहकर्जाच्या मासिक हप्ता बॅंकेस नियमित परतफेड करण्यास संबंधित कर्मचारी स्वतः जबाबदार राहील. कर्ज हप्ता भरणा केल्याचे चलन सादर केल्यानंतरच संस्थान स्वहिस्स्याची व्याजाची रक्कम भरणा करेल. विलंब आकारास कर्मचारी जबाबदार राहिल.

१८) गृहकर्ज व्याज सवलत योजना मंजुर झाल्याच्या दिनांकापासुन किमान १५ वर्ष किंवा सेवानिवृत्ती यापैकी जी घटना आगोदर घडेल त्या कालावधीपर्यंत संस्थानमध्ये सेवा करणे बंधनकारक राहिल. अगोदर राजीनामा दिल्यास किंवा सेवा सोडून गेल्यास, संस्थानने आदा केलेल्या व्याजाच्या रक्कमेची पुर्ण वसुली त्याचे रजा वेतन, ग्रॅच्युटीद्वारे मिळणा-या रक्कमेतून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

१९) या योजनेचा लाभ घेणारा कर्मचारी मयत झाल्यास त्याच्या वारसांना देय असलेल्या कुठल्याही रक्कमेतून त्यावेळेस शिल्लक असलेल्या कर्जाची एकुण (व्याजासह) रक्कम सदर गृहकर्ज पुरविणा-या बॅंकेस वर्ग करुन त्याचे कर्जखाती भरण्यात येईल.

२०) या योजनेअंतर्गत भाग घेणा-या कर्मचा-यांनी फक्त राष्ट्रीयीकृत बॅंकेकडूनच गृहकर्ज घेण्याचा प्रस्ताव संस्थानकडे सादर करावा. इतर बॅंकां/संस्थेकडून घेतलेल्या गृहकर्जास संस्थान हमी देणार नाही.

२१) या योजनेअंतर्गत गृहकर्ज पुरविणा-या राष्ट्रीयीकृत बॅंकेस, तसेच संस्थानला आवश्यक असणा-या सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन देण्याची जबाबदारी संबंधीत कर्मचा-याची राहिल.

२२) संबंधीत राष्ट्रीयीकृत बॅंकांच्या धोरणानुसार गृहकर्ज व्याजासाठी असणारा प्रचलीत व्याजदरानुसार गृहकर्जावरील व्याजाची सवलत परिगणित करण्यात येईल.

२३) गृहकर्ज व्याज सवलतीचा लाभ मिळविण्यासाठी कर्मचा-याला खालील कागदपत्रे संस्थानकडे सादर करावे लागतील.

१. अर्ज. २.प्रतिज्ञापत्र (१००रु.स्टॅम्पवर). ३. जामिनदाराचे संमतीपत्र. ४. संस्थान सेवेत पाच वर्षे सेवा झाल्याचा आस्थापनेचा दाखला. ५. स्वत:चे नांवे तसेच पत्नीच्या नांवे घर नसल्याचा नगरपंचायत/ग्रामपंचायतचा दाखला. ६. जर जुने वीट माती पत्र्याचे घर असेल तर ते मोडून त्याजागी नवीन घर बांधणेबाबतचे प्रतिज्ञापत्र. ७. स्वत:चे नांवे 7/12 चा उतारा. ८. प्लॅन (मुख्याधिकारी /ग्रामसेवकाची सही असलेला). ९. इस्टिमेट. १०. बांधकाम परवाना. ११. नवीन घर खरेदी करावयाचे असल्यास इसार पावती/साठेखताची प्रत. १२. रेशन कार्डची झेरॉक्स. १३. कर्मचारी सोसायटी निरंक दाखला १४. मागील महिन्याची पगारस्लीप.

२४) गृहकर्ज व्याज सवलत मंजुर करण्याचे अधिकार "गृहकर्ज व्याज सवलत योजना" समितीस राहतील व त्या समितीचे खालील सदस्य असतील.

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, २. उपकार्यकारी अधिकारी, ३. मुख्य लेखाधिकारी, ४. सर्व प्रशासकीय अधिकारी.

उपरोक्त नियमावलीस शासनाची मान्यता मिळणेकामी, इकडील जा.क्र.एसएसएसटी/लेखा/२३०१/२०१८, दि.०९/०८/२०१८ अन्वये, शासनास पाठविण्यात आली होती. परंतु, शासनाने क्र.संकीर्ण-१०१८/१३७८/प्र.क्र.१५०/

का.१६, विधी व न्याय, मंत्रालय, मुंबई, दि-२७/११/२०१९ रोजीचे पत्रान्वये सदर योजनेस स्थगिती दिलेली आहे. त्यामुळे सदर पत्रास अनुसरुन नव्याने गृहकर्ज घेणा-या कर्मचा-यांची प्रकरणे स्थगित ठेवण्यात आलेली आहेत.

उपरोक्त निर्णय क्र.९६७ अन्वये, मान्यता मिळालेल्या सुधारीत नियमावलीतील अट क्र.१२ मध्ये संदिग्धता असल्याने, त्यामध्ये काही सुधारणा करणे गरजेचे आहे. काही कर्मचा-यांनी अहमदनगर, पुणे येथे फ्लॅट घेतलेला असून ते सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या घराचा वापर करणार असून, त्यांनी सध्या संस्थान निवासास्थान मिळावे म्हणून अर्जाद्वारे मागणी केलेली आहे. तथापि, संस्थान नियमावलीतील अट क्र.१२ पुढीलप्रमाणे आहे.

अट क्र.१२. कर्मचारी /अधिका-याने संस्थानकडून गृहकर्ज व्याज सवलत योजनेचा लाभ घेतल्यानंतर मंजुरी दिनांकापासून ६ महिन्यात घराचे काम सुरु करणे आवश्यक आहे. कमाल १८ महिन्यात बांधकाम पुर्ण करणे आवश्यक राहिल. १८ महिने किंवा घराचे/फ्लॅटचे बांधकाम/ताबा मिळविण्याचा दिनांक यापैकी जे आगोदर घडेल त्या दिनांकापासून संस्थानचे निवासस्थान खाली करुन द्यावे लागेल. अन्यथा संबंधीत कर्मचा-यावर पुढीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करणेत येईल.

अ) जर कर्मचारी संस्थान निवासस्थानात राहत असेल तर संस्थान घराचे बाजार मुल्यानुसार भाडे वसुल करण्यात येईल.

आ) सदर कर्मचा-याने गृहकर्ज संदर्भातील अटी व शर्तींचे पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास संस्थानने दिलेली व्याजाची सवलत प्रचलित व्याजदरापेक्षा २.७५ प्रतिशत जास्त दराने दंडनीय व्याजाची आकारणी करुन ती रक्कम त्याचे वेतनातून समान हप्त्यामध्ये वसूल करण्यात येईल.

तथापि, सदर अटीमध्ये संदिग्धता असल्याने, प्रत्यक्षात कार्यवाही करतांना अडचणी येत आहेत, तसेच शासनाच्या नियमावलीत अशी तरतुद नसल्यामुळे, सदर अट ही शासनाच्या नियमात येत नाही. त्यामुळे उपरोक्त अट क्र.१२ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करणे गरजेचे आहे.

सुधारीत अट क्र.१२. कर्मचारी /अधिका-याने संस्थानकडून गृहकर्ज व्याज सवलत योजनेचा लाभ घेतल्यानंतर मंजुरी दिनांकापासून ६ महिन्यात घराचे काम सुरु करणे आवश्यक आहे. कमाल १८ महिन्यात बांधकाम पुर्ण करणे आवश्यक राहिल. १८ महिने किंवा घराचे/फ्लॅटचे बांधकाम/ताबा मिळविण्याचा दिनांक यापैकी जे आगोदर घडेल त्या दिनांकापासून संस्थानचे निवासस्थान खाली करुन द्यावे लागेल. अन्यथा संबंधीत कर्मचा-यावर पुढीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करणेत येईल.

अ) जर कर्मचारी संस्थान निवासस्थानात राहत असेल तर संस्थान घराचे बाजार मुल्यानुसार भाडे वसुल करण्यात येईल.

आ) सदर कर्मचा-याने गृहकर्ज संदर्भातील अटी व शर्तींचे पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास संस्थानने दिलेली व्याजाची सवलत प्रचलित व्याजदरापेक्षा २.७५ प्रतिशत जास्त दराने दंडनीय व्याजाची आकारणी करुन ती रक्कम त्याचे वेतनातून समान हप्त्यामध्ये वसूल करण्यात येईल.

तथापि, १५ किमी त्रिज्येच्या क्षेत्राबाहेर स्वमालकीचे घर/फ्लॅट बांधणारा/खरेदी करणार कर्मचारी वरील नमूद 'अ' व 'आ' नुसार कारवाईस पात्र असणार नाही. सदरची अट ही, सुधारीत नियमावली लागू होण्यापुर्वी जी नियमावली होती तीच्यामध्ये पण अंतर्भुत होती.

तरी गृहकर्ज व्याज सवलत योजनेच्या नियमावलीतील अट क्र.१२ मध्ये उपरोक्तप्रमाणे प्रस्तावित केल्यानुसार पुर्वलक्षी प्रभावाने सुधारणा करणेस, तसेच सदर योजना ही, यापुर्वी या योजनेत भाग घेतलेल्या संस्थानच्या स्थायी कर्मचा-यांना लागु करणेकरीता, सदरचा प्रस्ताव योग्य त्या निर्णयास्तव मा.तदर्थ समितीच्या सभेपुढे सविनय सादर.

29/01/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- 900

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ
मालमत्ता विभाग

423

विषय - संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकुण ११ रस्त्यांपैकी एलएक्यु/एसआर/ ०७/२००७ या भूसंपादन प्रकरणात मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी घोषित केलेला अंतिम निवाडा दि.३१/०१/२०११ चे भूसंपादन प्रकरणी संबंधित जमीन मालक यांनी कलम १८ खाली कोर्टात दाखल केलेल्या भूसंदर्भ दाव्याच्या निकालाच्या आधारे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना अदा करणेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडील पत्र क्रं.न.प/टे-०८/९२१/२०२१ दि.२५/०५/२०२१.

टिपणी

अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम २१ (२) अन्वये पोटकलम (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना:- शिर्डी शहरातील साईभक्तांना प्रामुख्याने उपयोग होईल अशी विकास कामे हाती घेवून पुर्ण करणेसाठी संस्थान व्यवस्थापन समिती शिर्डी नगरपंचायतीस नेहमी मदत करीत असते. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील २५ रस्ते भूसंपादन व विकसित करणेकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमध्ये त्रिपक्षीय करार दि.१५/१०/२००६ रोजी झाला होता व त्यानुसार रस्ते विकसन व रस्ते भूसंपादन कामासाठी सर्व खर्च श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी करावा, असे ठरले. सदर करारानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमार्फत ०५ रस्ते विकसनाचे काम सन २०१२ मध्ये पुर्ण झालेले आहे. उर्वरीत ०६ रस्ते संस्थानमार्फत विकसित करणेत आलेले असल्याने सध्या फक्त शिर्डी नगरपंचायत,शिर्डी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे दरम्यान करारानुसार कार्यवाही चालू आहे.

उक्त करारात ठरलेनुसार शिर्डी नगरपंचायतमार्फत प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यापैकी भूसंपादनाची आवश्यकता असलेल्या ०९ रस्त्यांचे भूसंपादन करणे,सेवा वाहिन्या स्थलांतरीत करणे,अतिक्रमणे हटविणे इ.कामे करणेत आलेली आहेत व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमार्फत रस्ते विकसनाचे काम करण्यात आले.

